# श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी)

सभा क्र.३/२०२१ | दिनांक ०६.०८.२०२१
स्थळ- साईनिवास अतिथीगृह | वेळ-सकाळी ११.०० वाजता

मा. उच्च न्यायालय, मुंबई खंडपीठ औरंगाबाद येथील जनहित याचिका नं.१२०/२०१९ यावर दि. ०९/१०/२०१९ रोजी मा.न्यायालयाने दिलेल्या आदेशान्वये श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी करीता नियुक्त केलेल्या मा.तदर्थ (Ad-hoc) समितीचे शनिवार दि.३१.०७.२०२१ रोजी झालेल्या सभेतील निर्णय क्र.९९ अन्वये 'सदर सभा दि.३१.०७.२०२१ मधील विषय नं.६२ ते १०३ हे वेळेअभावी प्रलंबित राहिल्याने पुढील दिनांकास सर्वसंमतीने तारीख व वेळ निश्चित करुन अजेंडयानुसार घेण्यात यावेत, असे सर्वानुमते ठरले. त्याकरीता स्वतंत्ररित्या नोटीस काढण्याची आवश्यकता नाही. असेही ठरले.' आहे.

त्यानुसार मा.तदर्थ (Ad-hoc) समितीची सभा शुक्रवार दि.०६.०८.२०२१ रोजी सकाळी ११.०० वाजता शिर्डी येथील संस्थानचे साईनिवास अतिथीगृहामध्ये पुढील विषय नं.६२ ते १०३ साठी आयोजित केली असलेबाबत जा.नं.एसएसएस/वशी-०४/१४९८/२०२१, दि.०२.०८.२०२१ अन्वये सर्व मा.सदस्यांना कळविणेत आलेले होते.

सदरहु सभा शुक्रवार दि.०६.०८.२०२१ रोजी सकाळी ११.०० वाजता सुरु करण्यात आली.

समिती सदस्य मा.श्री.भानुदास पालवे हे सभेसाठी अनुपस्थित.

या सभेस खालील मा. सदस्य उपस्थित होते.

१. मा. न्या. सुधाकर यार्लगड्डा, प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधिश, अहमदनगर. तथा
   अध्यक्ष, तदर्थ (Ad-hoc) समिती.
२. मा.श्री. कान्हूराज बगाटे,भा.प्र.से.मुख्य कार्यकारी अधिकारी,
   श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिर्डी. तथा सदस्य सचिव, तदर्थ (Ad-hoc) समिती.
३. मा.श्रीमती गीता प्र.बनकर, सहाय्यक धर्मादाय आयुक्त, अहमदनगर, तथा
   सदस्य, तदर्थ (Ad-hoc) समिती.

सभेच्या सुरुवातीस श्री साईबाबांची प्रार्थना करणेत आली.
त्यानंतर विषयपत्रिकेवरील विषयांवर चर्चा सुरु केली.

---

**विषय नं.६२** शिर्डी गावातील रहिवाशी साईभक्तांना दर्शन प्रवेशाकरीता स्मार्टकार्ड वितरीत करणेकामी सदरचे स्मार्ट कार्ड प्रचलीत पध्दतीने ई-निविदा प्रक्रिया राबवून छपाई करणेस व याकामी येणा-या खर्चास मान्यता मिळणेबाबत.

**निर्णय क्र.१०२** यावर सविस्तर चर्चा केली. यापुर्वी चक्रिय पध्दतीने ग्रामस्थांचे दर्शनासाठी विशेष प्रवेशाबद्दल विषय ठेवला होता. त्यामध्ये २x२ मतविभाजन झाल्यामुळे ठराव मंजूर झालेला नाही. त्याचा सी. ए. मा.उच्च न्यायालयात प्रलंबीत असल्याची माहिती दिली. सदर विषय त्या सी. ए. मध्ये मंजूर झाल्यावर हा विषय ठेवावा.

(कार्यवाही-माहिती तंत्रज्ञान विभाग)

---

**विषय नं.६३** साईटेक प्रकल्पांतर्गत कार्यान्वीत Oracle Database व Oracle ERP या प्रणालीचे कार्यान्वीत Licenses चे नुतनीकरण तसेच आवश्यक Licenses खरेदी करणेकामी थेट उत्पादक कंपनी M/s Oracle Corporation यांना पुरवठा आदेश देणेस मान्यता मिळणेबाबत.

**निर्णय क्र.१०३** यावर सविस्तर चर्चा केली. मे.Oracle यांनी ई-मेलव्दारे दिलेली ऑफर दि.३१.०५.२०२१ पर्यंत असल्याने त्यांना दि.३१.०९.२०२१ पर्यंत मुदत वाढविण्यास विनंती करावी. त्यांनी मान्य केल्यास चक्रिय पध्दतीने समितीकडे प्रस्ताव आणावा.

(कार्यवाही-माहिती तंत्रज्ञान विभाग)

---

विषय नं.६४ वाढीव शिर्डी संस्थान, कोपरगाव नगरपालीका व शिर्डी नगरपंचायत संयुक्त पाणी पुरवठा योजना (निळवंडे धरण उद्भव धरुन) ता.राहाता, जि.अहमदनगर टप्पा-१ चे कामातील पाईपलाईन रस्त्यांची दुरुस्ती खर्चास मान्यता मिळणेबाबत.

निर्णय क्र.१०४ दि.१६.०३.२०२१ रोजी मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी चक्रिय पध्दतीने जो प्रस्ताव तयार केला तो हाच विषय आहे. त्यास दि.२५.०५.२०२१ रोजी चक्रिय पध्दतीने मंजूरी दिलेली असल्याने व दि.१९.०६.२०२१ चे सभेत तो कायम झालेला असल्याने विषय क्र.६४ वगळण्यात आला.

(कार्यवाही- पाणी पुरवठा विभाग)

---

विषय नं.६५ सन २०२२-२३ करीता बारा महिन्याचे कालावधीसाठी पाणी पुरवठा विभागास पाणी शुध्दीकरणासाठी आवश्यक ब्लीचींग पावडर, फेरीक ॲलम व क्लोरीन गॅस सिलेंडर खरेदी करणेस व त्यासाठी येणारे खर्चास मान्यता मिळणेबाबत.

निर्णय क्र.१०५ यावर सविस्तर चर्चा केली. दि.२५.०१.२०२२ पर्यंत सध्याचे टेंडर अस्तित्वात आहे म्हणून सदरचा विषय सप्टेंबर/ आक्टोंबर महिन्यात सभेपुढे ठेवण्यात यावा. -

(कार्यवाही- पाणी पुरवठा विभाग)

---

विषय नं.६६ श्रींचे दर्शनासाठी येणारे मान्यवर व देणगीदार साईभक्त तसेच सेवानिवृत्त कर्मचा-यांचे सत्कारासाठी लागणा-या शॉल्स खरेदी विभागामार्फत खरेदी करणेबाबत.

निर्णय क्र.१०६ यावर सविस्तर चर्चा केली. देणगीदार आणि मान्यवर यांची श्रेणी ठरवावी व त्या श्रेणीनुसार शॉल देण्यासाठी शॉलची किंमत, डिझाईन व रंग एकच किंवा वेगळवेगळे घ्यायचे या सर्व माहितीसह प्रस्ताव पुन्हा ठेवावा. सदरचा विषय धोरणात्मक असल्याने सी.ए. दाखल करण्याची तजवीज ठेवावी.

(कार्यवाही- मंदिर विभाग/विधी विभाग)

---

विषय नं.६७ समाधी मंदिर गाभा-यातील श्रींचे समकालीन साईभक्तांचे खराब/जिर्ण झालेले फोटोचे चावडी मंदिरातील फोटोप्रमाणे अत्याधुनिकरण, नुतनीकरण करणेकामी साईभक्त श्री.श्रीकांत किशोर जाधव, शिर्डी यांना विनामुल्य सेवा करण्याची संधी देणेस मान्यता मिळणेबाबत.

निर्णय क्र.१०७ यावर सविस्तर चर्चा केली. मुळ फोटा बदलु नये, फक्त फ्रेम बदलण्यास मान्यता देण्यात येते. मात्र त्याचा नमुना समितीला दाखवून मान्यता घ्यावी.

(कार्यवाही- मंदिर विभाग)

---

विषय नं.६८ श्री साईनाथ रुग्णालयाचे वाढीव तिस-या मजल्याकरीता आणलेल्या केबल ऑक्सिजन प्लान्टकरीता वापरण्यास आलेल्या असल्याने आता वाढीव तिस-या मजल्यावरील इलेक्ट्रीकल लोडला सप्लाय देणेकरीता २४० स्केअर एम.एम.ची इलेक्ट्रीकल केबल, पितळी फ्लॅंज टाईप केबल ग्लॅन्ड, ॲल्युमिनियम लग्जची खरेदी करणेकामी येणा-या खर्चास तसेच दरपत्रके मागविणे, संस्थानचे वेबसाईटवर दरपत्रक नोटीस प्रसारीत करणेबाबत.

निर्णय क्र.१०८ यावर सविस्तर चर्चा केली. प्रस्तावामध्ये अ.क्र.१ ते ३ या प्रमाणात केबल ६६० मिटर+१०नग +४०नग श्री साईनाथ रुग्णालाचे वाढीव तिस-या मजल्याकरीता आणलेल्या पैकी ऑक्सिजन प्लॅन्ट करीता वापरण्यास तातडीचे काम असल्यामुळे मुख्य कार्यकारी अधिकारी यांचेकडून दुरध्वनीव्दारे परवानगी घेऊन वापरल्याचे सांगीतले. पण याबाबत अद्याप लेखी आदेश श्री. प्रकाश अभंग, प्र.उपकार्यकारी अभियंता, विद्युत विभाग यांनी प्राप्त करुन घेतलेला नाही. आणि थेट दि.१०.०६.२०२१ रोजी खरेदीच्या प्रस्तावासाठी टिपणी तयार केली आहे. त्यांनी तातडीचे वापरासाठीची परवानगी रितसर घ्यावी. व प्रस्ताव पुढील सभेसमोर ठेवण्यात यावा.

(कार्यवाही-विद्युत विभाग)

---

विषय नं.६९ श्री साईबाबा संस्थानचे भोयरे पठार (सुपा) येथे उभारणेत आलेल्या २.५ मेगावॅट (१.५ मेगावॅटx२) पवनचक्की यंत्रणेचे वीज विक्री करणेकरीता तसेच त्यासाठी दिनांक ०१.१२.२०२१ ते दिनांक ३०.११.२०२२ या एक वर्षाचे कालावधीकरीता महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनीशी वीज विक्री करारनामा करणेकरीता मान्यता मिळणेबाबत.

निर्णय क्र.१०९ यावर सविस्तर चर्चा केली. दिनांक ०१.१२.२०२१ ते दिनांक ३०.११.२०२२ या एक वर्षाचे कालावधीकरीता महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनीशी वीज विक्री करारनामा करणेस मान्यता देण्यात आली. कॅप्टीव्ह मोडसाठी अभ्यास पुर्वक सविस्तर प्रस्ताव समितीसमोर ठेवावा.

(कार्यवाही-विद्युत विभाग)

---

विषय नं.७० शिर्डी नगरपंचायत हद्दीतील रस्त्यांच्या दैनंदिन स्वच्छता कामांचा सन २०२०-२१ चे पाहणी समिती मार्फत केलेल्या आकस्मित पाहणी अहवालाबाबत.

निर्णय क्र.११० नोंद घेतली.

(कार्यवाही-आरोग्य विभाग)

---

विषय नं.७१ संस्थान इमारती व परिसरातील दैनंदिन साफसफाई करुन निघणारा प्लॅस्टीक कचरा विक्री करणेबाबत.

निर्णय क्र.१११ यावर सविस्तर चर्चा केली. फक्त ग्लोबल पॉलीमर्स, चिखली यांचेवर विसंबुन न राहता. त्यांचे व्यतिरिक्त जे-कोणी हे काम करण्यास तयार आहेत त्यांची माहिती संस्थानचे संकेत स्थळावर व वर्तमान पत्रामधुन जाहिर प्रसिध्दी देऊन मागवुन घ्यावी. व पुढील कार्यवाहीसाठी समितीसमोर प्रस्ताव ठेवण्यात यावा. ग्लोबल पॉलीमर्स, चिखली यांना देण्याचा प्रस्ताव नामंजूर करण्यात येत आहे.

(कार्यवाही-आरोग्य विभाग)

---

विषय नं.७२ गोवंश संवर्धनार्थ गाय हा राष्ट्रीय प्राणी (कामधेनू) म्हणून ठराव करणेबाबत.

निर्णय क्र.११२ यावर सविस्तर चर्चा केली. गायीस कामधेनु म्हटले जाते याबाबत कुठलाही वाद नाही. तदर्थ समितीने तसा ठराव करण्याची आवश्यकता नाही. सबब नामंजूर.

(कार्यवाही-बगीचा विभाग)

---

विषय नं.७३ मंदिरातुन निघणारे हार व फुलांचे निर्माल्याबाबत.

निर्णय क्र.११३ यावर सविस्तर चर्चा केली. प्रस्ताव सर्वानुमते मंजूर. सध्या जनसेवा फाऊंडेशन, लोणी यांचेकडे शिल्लक असलेल्या साठयाचा आढावा घेऊन फेरप्रस्ताव सादर करण्यात यावा.

(कार्यवाही-बगीचा विभाग)

---

विषय नं.७४ पर्यटन विषयक प्रसिध्दी करीता साईबाबा समाधीमंदिर व परिसराचे फोटोग्राफ व चित्रिकरण करण्यास परवानगी बाबत.

निर्णय क्र.११४ यावर सविस्तर चर्चा केली. सुरक्षीततेच्या दृष्टीकोनातून ड्रोन कॅमेरा व शुटींग कॅमे-याने शुटींग करण्यास मंजूरी नाही. यापुर्वी दि.४.१२.२०१९ रोजीचे सभेतील विषय क्र.५५ अन्वये ठराव झालेला आहे, त्यामध्ये बदल नाही.

(कार्यवाही-जनसंपर्क विभाग)

---

विषय नं.७५ श्री साईबाबा संस्थान मंदिर परिसरामध्ये ड्रोन कॅमे-याने व शुटींग कॅमे-याने शुटींग करणेस बंदी असलेबाबतचे आशयाचे फलक मंदिर परिसरामध्ये लावणेस मान्यता मिळणेबाबत.

निर्णय क्र.११५ यावर सविस्तर चर्चा केली. याबाबत केंद्र शासनाने किंवा राज्य शासनाने काही मार्गदर्शक तत्वे विहीत केली असल्यास त्याबाबतची माहिती समितीपुढे पुढील बैठकीत ठेवावी, तसेच ज्या वास्तुंचे चित्रीकरण निषिध्द करावयाचे आहे, त्याचा प्रस्तावामध्ये स्पष्ट उल्लेख करावा.

(कार्यवाही-संरक्षण विभाग)

---

विषय नं.७६ संस्थानचे स्थायी कर्मचा-यांना गणवेश भत्ता देणेबाबत.

निर्णय क्र.११६ यावर सविस्तर चर्चा केली. महिला कर्मचा-यांच्या पेटीकोट बाबत आणलेला प्रस्ताव हा सन २०२०-२१ साठीचा आहे. महसुल व वन विभागाचे शासन निर्णय क्र.एफएसटी-०९/१६/प्र.क्र.४१५ /फ-४, दि.३ नोव्हेंबर,२०१६ प्रमाणे वार्षिक रुपये ५१६७/- आणी गृह विभाग शासन निर्णय क्र.एमव्हीडी-०४१६/प्र.क्र.१८७/परि-४, दि.२७ एप्रिल, २०१८ प्रमाणे रुपये पाच हजार प्रति वर्षी देण्यास मान्यता देण्यात आलेली आहे. वर्ष २०१४-१५ मध्ये अंदाजे १६०० कर्मचा-यांसाठी रु.३६,०५,१२५/- गणवेष व शिलाई कामासाठी खर्च झाला होता. अंदाजे रुपये २,२५३/- प्रति कर्मचारी एवढा खर्च आला होता . तो खर्च सहा वर्षापुर्वीचा आहे हे विचारात घेऊन प्रत्येक कर्मचा-याला वर्षभरात कमीतकमी दोन नग गणवेष बनुन घेणे आवश्यक राहील याचा विचार करुन प्रति कर्मचा-यास प्रत्येक वर्षाला रु.५,०००/- देण्याचा प्रस्ताव मंजूर केला. प्रस्तावातील तक्ता १ ते ९ या श्रेणीतील सर्व पात्र कर्मचा-यांना महिला कर्मचा-यांसह १ एप्रिल, २०२२ पासून हा लाभ अनुज्ञेय राहिल. धोरणात्मक निर्णय असल्यामुळे मा.उच्च न्यायालयात या सर्व गोष्टींच्या उल्लेखासह सिव्हील ॲप्लीकेशन दाखल करण्यात यावे. सदर निर्णयाची अंमलबजावणी प्रस्तावातील परिच्छेद क्र.१,२ ३ व ५ मंजूर, कार्यवाही करावी.

(कार्यवाही-खरेदी विभाग/विधी विभाग)

---

विषय नं.७७ श्री साई प्रसादालयातील माहे एप्रिल-२०२० ते मार्च-२०२१ अखेर खाद्यतेल वनस्पती तुप, शुध्द तुप व काजूचे रिकामे डब्यांचा अहवाल.

निर्णय क्र.११७ नोंद घेतली.

(कार्यवाही-श्री साई प्रसादालय विभाग)

---

विषय नं.७८ सन २०२०-२०२१ या आर्थिक वर्षातील श्री साई प्रसादालयातील धान्य, कडधान्य व किराणा मालाचे घट-तुटीबाबतचा अवलोकनार्थ अहवाल.

निर्णय क्र.११८ नोंद घेतली.

(कार्यवाही-श्री साई प्रसादालय विभाग)

---

विषय नं.७९ शाळामधील संरचनात्मक बदल व सुधारीत निकषांच्या आधारे माध्यमिक विभागासाठी आवश्यक लागणारे शिक्षक मानधन तत्वावर (११ महिने कालावधी) भरणेस मान्यता मिळणेबाबत.

निर्णय क्र.११९ यावर सविस्तर चर्चा केली. कंत्राटी पध्दतीने भरती करणेस मंजूरी देण्यात आली, परंतु अशी भरती करतांना शिक्षणाधिकारी माध्यमिक व प्राथमिक यांचेकडून कंत्राटी पध्दतीने शिक्षक भरती करणेसाठीची विहीत प्रक्रियेची संपुर्ण माहिती घेऊन त्याप्रमाणे कार्यवाही करावी.

(श्री साईबाबा इंग्लिश मिडीयम स्कुल)

---

विषय नं.८० प्राथमिक विभागासाठी शाळा संच मान्यतेनुसार आवश्यक शिक्षक मानधन तत्वावर (११ महिने) घेण्यास मान्यता मिळणेबाबत.

निर्णय क्र.१२० यावर सविस्तर चर्चा केली. कंत्राटी पध्दतीने भरती करणेस मंजूरी देण्यात आली, परंतु अशी भरती करतांना शिक्षणाधिकारी माध्यमिक व प्राथमिक यांचेकडून कंत्राटी पध्दतीने शिक्षक भरती करणेसाठीची विहीत प्रक्रियेची संपुर्ण माहिती घेऊन त्याप्रमाणे कार्यवाही करावी.

(श्री साईबाबा इंग्लिश मिडीयम स्कुल)

---

विषय नं.८१ श्री साईनाथ रुग्णालयात नव्याने तयार करण्यात आलेल्या तिस-या मजल्याकरीता मशिनरी/उपकरणे/फर्निचर तसेच लिनन खरेदी करणेस व त्याकामी येणा-या अंदाजे रु.२,०२,६०,८३६/- मात्रचे खर्चास प्रशासकीय मान्यता मिळणेबाबत.

निर्णय क्र.१२१ यावर सविस्तर चर्चा केली. किती पेशंट, किती बेड व किती रुमसाठी कोणकोणती यंत्रसामग्री किती प्रमाणात लागणार आहे, याबाबत शासनाचे मार्गदर्शक तत्वासह सविस्तर प्रस्ताव सादर करावा. मा.उच्च न्यायालयात सिव्हील ॲप्लीकेशन दाखल करणे अनिवार्य राहिल.

(कार्यवाही- श्री साईबाबा हॉस्पिटल)

---

विषय नं.८२ श्री साईबाबा व श्री साईनाथ रुग्णालयात कंत्राटी पध्दतीने तात्पुरत्या स्वरुपात नेमणूक केलेल्या वैद्यकीय अधिका-यांना त्यांचे संबधीत पदासाठी सातव्या वेतन आयोगात मंजुर वेतनश्रेणीनुसार मुळ वेतन व सध्याचे महागाई भत्त्यानुसार होणारे सुरुवातीचे वेतनाइतके एकत्रित मासिक मानधन देणेबाबत.

निर्णय क्र.१२२ यावर सविस्तर चर्चा केली. सातव्या वेतन आयोगानुसार कंत्राटी पध्दतीने तात्पुरत्या स्वरुपात नेमणूक केलेल्या वैद्यकीय अधिका-यांचे एकत्रित मासिक मानधन अद्याप अद्ययावत केलेले नाही. तक्ता अ मधील सध्या देय असलेले एकत्रित मानधन आकारण्याची पध्दत दाखविली आहे. तो तक्ता दि.०४.१२.२०१९ रोजीचे सभेतील निर्णय क्र.५६८ प्रमाणे आहे. त्यामुळे त्यांना देय एकुण मासिक एकत्रित मानधन प्रस्तावात नमुद केले प्रमाणे वाढविणे योग्य आहे, प्रस्ताव मंजूर. तसेच पुढे महागाई भत्यामध्ये महाराष्ट्र शासनाकडून होणा-या वाढीनुसार या एकत्रित मानधनात मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे मान्यतेने वाढ करणेबाबत मंजूरी देण्यात आली. सध्या असलेले एकत्रित मासिक मानधन ठरवतांना यापुर्वी याच पध्दतीने मानधन वाढविण्यात आले आहे, असे सांगतात. नविन वेतन लागु झाल्यानंतर त्याची अंमलबजावणी संस्थानचे कर्मचा-यांना लागु करावयाची किंवा नाही, हा धोरणात्मक विषय आहे असे वाटते. त्यामुळे मा.उच्च न्यायालयात सिव्हील ॲप्लीकेशन दाखल करण्यात यावे.

(कार्यवाही- श्री साईबाबा हॉस्पिटल/विधी विभाग)

---

विषय नं.८३ डॉ.हरिष हुकुमचंद बजाज व डॉ.गौरव सरदारीलाल वर्मा, ह्दयविकार तज्ञ (निलंबीत) श्री साईबाबा हॉस्पिटल यांचे खाते चौकशी अहवालाबाबत.

निर्णय क्र.१२३ यावर सविस्तर चर्चा केली. यासंबधीचे रेकॉर्ड ॲन्ड प्रोसिडींग सर्व समिती सदस्यांना अभ्यासासाठी उपलब्ध करुन देण्यात यावे. तहकुब.

(कार्यवाही- श्री साईबाबा हॉस्पिटल)

---

विषय नं.८४ रुग्णालय प्रशासक (Hospital Administrator) पद तात्पुरत्या स्वरुपात ११ महिने कालावधीकरीता जाहिरातीव्दारे भरणेबाबत.

निर्णय क्र.१२४ यावर सविस्तर चर्चा केली. आकृतीबंधामध्ये सदरचे पदास मंजूरी नाही. सबब नामंजूर.

(कार्यवाही- श्री साईबाबा हॉस्पिटल)

---

विषय नं.८५ श्री साईबाबा हॉस्पिटलमधील प्रयोगशाळा या विभागाकरीता जुने Fully Automatic Biochemistry Analyser परत (Buyback) करुन नवीन Fully Automatic Biochemistry Analyser खरेदी करणेबाबत.

निर्णय क्र.१२५ यावर सविस्तर चर्चा केली. यापुर्वी व्यवस्थापन समितीचे दि.२०.११.२०१८ रोजीचे सभेमध्ये निर्णय क्र.७१० अन्वये अशा प्रकारे Refrigerated Blood Bag Centrifuge Machine Buyback करुन नविन मशिन खरेदी केले असल्याचे दाखविण्यात आले. या पार्श्वभूमीवर सदरचा प्रस्ताव मंजूर.

(कार्यवाही- श्री साईबाबा हॉस्पिटल)

---

विषय नं.८६ Corona Virus (Covid-19) या संसर्गजन्य रोगाच्या रक्ताच्या तपासण्या करणेकामी लॅबोरेटरी किट्स खरेदी करणेबाबत.

निर्णय क्र.१२६ यावर सविस्तर चर्चा केली. प्रस्ताव मंजूर, ई-निविदा प्रक्रिया राबवावी.

(कार्यवाही- श्री साईबाबा हॉस्पिटल)

---

| | |
|---|---|
| विषय नं.८७ | श्री साईबाबा संस्थानचे रुग्णालयासाठी बॉन्डेड ग्रॅज्युएट व पोस्ट ग्रज्युएट उमेदवारांची नेमणूक करणेबाबत. |
| निर्णय क्र.१२७ | यावर सविस्तर चर्चा केली. यापुर्वी तदर्थ समितीचे तत्कालीन अध्यक्ष मा.श्री. जयंत कुलकर्णी यांनी दि.१५.१.२०१४ रोजी सचिव, D.M.E. & R., Mumbai यांचेकडे अशा प्रकारचे पोस्ट ग्रज्युएट उमेदवार मिळणेबाबत मागणी केली होती. तत्कालीन समिती सदस्य मा.श्री.अनिल कवडे यांनीही अशाप्रकारची मागणी सचिव, वैद्यकीय शिक्षण व संशोधन, मुंबई यांना दि.२३.१०.२०१४ रोजीचे पत्रान्वये केली होती. तसेच श्री साईबाबा संस्थानचे तत्कालीन मुख्य कार्यकारी अधिकारी यांनीही अशाच प्रकारची मागणी प्रधान सचिव, वैद्यकीय शिक्षण व संशोधन, मुंबई दि.०२.०५.२०१७ रोजीचे पत्रान्वये केलेली होती. तसेच श्री साईबाबा संस्थानचे तत्कालीन मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी अशाच प्रकारची मागणी Vice Chancellor, Maharashtra University of Health Science, Nashik यांचेकडे दि. ०७.०१.२०१७ रोजीचे पत्रान्वये केलेली होती. अशा प्रकारे मंजूर पदापैकी रिक्त पदावर त्यांचे सेवा घेण्यासाठी शासनाकडे पत्रव्यवहार करणेत आला आहे. परंतु त्याला प्रतिसाद मिळालेला नाही. असे समितीला सांगण्यात आले. पद रिक्त ठेवण्याऐवजी प्रस्तावीत केल्याप्रमाणे नियुक्ती करुन त्यांची सेवा घेणे रुग्णांचे हिताचे राहील. याकरीता मा.उच्च न्यायालयात सिव्हील ॲप्लीकेशन दाखल करुन महाराष्ट्र शासनाने अशा प्रकारचे बॉन्डेड ग्रॅज्युएट व पोस्ट ग्रज्युएट उमेदवार इतर शासकिय रुग्णालयांना पुरविले जातात त्याप्रमाणे श्री साईबाबा संस्थानचे रुग्णालयाकरीता पुरविणेबाबत महाराष्ट्र शासनाला निर्देश देणेबाबत विनंती करण्यात यावी. |

(कार्यवाही- श्री साईबाबा हॉस्पिटल)

---

विषय नं.८८ (अ) संस्थान कर्मचारी व त्यांचेवर अवलंबीतांचा वैद्यकीय बिलाचा परतावा रक्कम अदा करणेस मंजूरी मिळणेबाबत.

निर्णय क्र.१२८/अ यावर सविस्तर चर्चा केली. चर्चेअंती मंजूर.

(कार्यवाही- श्री साईबाबा हॉस्पिटल)

---

(ब) संस्थान कर्मचारी व त्यांचेवर अवलंबीतांचा वैद्यकीय बिलाचा परतावा रक्कम अदा करणेस मंजूरी मिळणेबाबत.

निर्णय क्र.१२८/ब यावर सविस्तर चर्चा केली. चर्चेअंती मंजूर.

(कार्यवाही- श्री साईबाबा हॉस्पिटल)

---

(क) संस्थान कर्मचारी व त्यांचेवर अवलंबीतांचा वैद्यकीय बिलाचा परतावा रक्कम अदा करणेस मंजूरी मिळणेबाबत.

निर्णय क्र.१२८/क यावर सविस्तर चर्चा केली. चर्चेअंती मंजूर.

(कार्यवाही- श्री साईबाबा हॉस्पिटल)

---

| | |
|---|---|
| विषय नं.८९ | श्री साईबाबा हॉस्पिटल व श्री साईनाथ रक्तपेढीमध्ये एप्रिल-२०२१ या महिन्यात वैद्यकीय बिलात देण्यात आलेली सवलत रक्कम रु.३१,०७,००१/-मात्रची नोंद घेऊन खर्चास मान्यता मिळणेबाबत. |
| निर्णय क्र.१२९ | नोंद घेतली. |

(कार्यवाही- श्री साईबाबा हॉस्पिटल)

---

| | |
|---|---|
| विषय नं.९० | श्री साईबाबा हॉस्पिटल व श्री साईनाथ रक्तपेढीमध्ये मे-२०२१ या महिन्यात वैद्यकीय बिलात देण्यात आलेली सवलत रक्कम रु.१२,४४,०४१/-मात्रची नोंद घेऊन खर्चास मान्यता मिळणेबाबत. |
| निर्णय क्र.१३० | नोंद घेऊन मंजूर. |

(कार्यवाही- श्री साईबाबा हॉस्पिटल)

---

विषय नं.९१ श्री साईबाबा व श्री साईनाथ रुग्णालयाकरीता ५० नग Ventilator खरेदी करणेबाबत.

निर्णय क्र.१३१ यावर सविस्तर चर्चा केली. मुख्य कार्यकारी अधिकारी व वैद्यकीय संचालक यांनी कोव्हीड-१९ या महामारीच्या दुस-या लाटेतील अनुभव सांगीतला त्यावरुन कोव्हीड-१९ च्या तिस-या लाटेच्या तयारीसाठी प्रस्तावीत Ventilator खरेदीची आवश्यकता वाटते, म्हणून प्रस्ताव मंजूर. मा.उच्च न्यायालयात सिव्हील ॲप्लीकेशन दाखल करण्यात यावे.

(कार्यवाही- श्री साईबाबा हॉस्पिटल/ विधी विभाग)

---

विषय नं.९२ महात्मा ज्योतिबा फुले जन आरोग्य योजनेअंतर्गत रुग्णांच्या प्रत्यक्ष उपचारापोटी प्राथमिक मंजूरी आदेशापेक्षा विमा कंपनीकडून कमी मिळालेल्या रकमेस वैद्यकीय सवलत म्हणून नावे टाकण्यास मान्यता मिळणेबाबत.

निर्णय क्र.१३२ यावर सविस्तर चर्चा केली. चर्चेअंती मंजूर.

(कार्यवाही- श्री साईबाबा हॉस्पिटल)

---

विषय नं.९३ दि.१५.०५.२०२१ रोजीचे मुलाखतीव्दारे वैद्यकीय संचालक पदासाठी निवड समितीने निवड केलेल्या उमेदवारास नेमणूक देणेबाबत.

निर्णय क्र.१३३ यावर सविस्तर चर्चा केली. प्रस्ताव नामंजूर करण्यात आला. वैद्यकीय संचालक पद भरतीसाठी नविन प्रक्रिया राबविणेत यावी.

(कार्यवाही- श्री साईबाबा हॉस्पिटल)

---

विषय नं.९४ दि.०१ एप्रिल २०२० ते दि.३१ मार्च, २०२१ अखेर/कालावधीत वाटप करणेत आलेली अनुदान रक्कम व रुग्ण संख्या यांची नोंद घेणेबाबत.

निर्णय क्र.१३४ नोंद घेतली.

(कार्यवाही-श्री साईनाथ रुग्णालय)

---

विषय नं.९५ एम.आय.टी. हॉस्पिटल (धर्मादाय) ॲण्ड रिसर्च इन्स्टीटयुट, औरंगाबाद या रुग्णालयाचा संस्थानचे वैद्यकीय आर्थिक अनुदान देणेचे यादीत समावेश करणेबाबत.

निर्णय क्र.१३५ यावर सविस्तर चर्चा केली. दि.२२.०८.२०१९ चा शासन निर्णय क्र.सासंवि-१०१८/१६१४/प्र.क्र.२०९/ का.१६ अनुसार एम.आय.टी. हॉस्पिटल (धर्मादाय) ॲण्ड रिसर्च इन्स्टीटयुट, औरंगाबाद औरंगाबाद या रुग्णालयाचा संस्थानचे वैद्यकीय आर्थिक अनुदान देणेचे यादीत समावेश करणेस मान्यता देण्यात आली.

(कार्यवाही-श्री साईनाथ रुग्णालय)

---

विषय नं.९६ श्री साईबाबा संस्थानमार्फत श्री साईनाथ रुग्णालय येथे डेडीकेटेड कोव्हिड हेल्थ सेंटर (DCHC) सुरु करणेबाबत.

निर्णय क्र.१३६ यावर सविस्तर चर्चा केली. नविन स्वतंत्र नेमणूक करावयाची नाही तर कार्यरत असलेल्या कर्मचा-यांना सदर ठिकाणी वर्ग करावयाचे आहे, मनुष्यबळासाठी वेगळा आर्थिक खर्च होणार नाही, असे सांगण्यात आले. त्यामुळे सदरचा प्रस्ताव मंजूर. यासाठी येणा-या दरमहा खर्चाचा अहवाल समितीसमोर सादर करण्यात यावा.

(कार्यवाही-श्री साईनाथ रुग्णालय)

---

विषय नं.९७ श्री साईनाथ रुग्णालयात माहे ऑक्टोंबर-२०२० ते मार्च-२०२१ अखेर वैद्यकीय बिलात देण्यात आलेली सवलत रक्कम रु.३,२७,१२,८९५/- च्या खर्चास नोंद घेणेस मान्यता मिळणेबाबत.

निर्णय क्र.१३७ नोंद घेतली. मा.उच्च न्यायालय, खंडपीठ औरंगाबाद यांचेकडे सिव्हील ॲप्लीकेशन दाखल करण्यात यावे.

(कार्यवाही-श्री साईनाथ रुग्णालय/विधी विभाग)

---

विषय नं.९८ स्वच्छता साहित्य खरेदी बाबत.

निर्णय क्र.१३८ यावर सविस्तर चर्चा केली. चर्चेअंती मंजूर. ई-निविदा प्रक्रिया राबविणेत यावी.

(कार्यवाही-आरोग्य विभाग)

---

विषय नं.९९ संस्थानमधील स्थायी कर्मचा-यांसाठी लागु करण्यात आलेल्या सवलतपात्र गृहकर्ज व्याज सवलत योजनेच्या अट क्र.१२ मध्ये सुधारणा करणेबाबत.

निर्णय क्र.१३९ यावर सविस्तर चर्चा केली. अभ्यासपुर्वक सविस्तर प्रस्ताव पुढील सभेसमोर सादर करावा.

(कार्यवाही-लेखाशाखा)

---

विषय नं.१०० संस्थान निधीतून शिर्डी नगरपंचायत हद्दीतील प्रथम प्राधान्य गटातील एकुण ११ रस्त्यांपैकी एलएक्यएसआर नं.०७/२००७ या भूसंपादन प्रकरणात मा.उपविभागीय अधिकारी, श्रीरामपूर,भाग श्रीरामपूर यांनी घोषित केलेला अंतिम निवाडा दि.३१.०१.२०११ चे भूसंपादन प्रकरणी संबधीत जमीन मालक यांनी कलम १८ खाली कोर्टात दाखल केलेल्या भूसंदर्भ दाव्याच्या निकालाच्या आधारे वाढीव नुकसान भरपाईची रक्कम मुख्याधिकारी, शिर्डी नगरपंचायत, शिर्डी यांचेमार्फत मा.उपविभागीय अधिकारी, शिर्डी भाग, शिर्डी यांना अदा करणेबाबत मुख्याधिकारी, शिर्डी नगरपंचायत, शिर्डी यांचेकडील पत्र क्र.न.पं./टे-०८/९२१ दि.२५.०५.२०२१.

निर्णय क्र.१४० यावर सविस्तर चर्चा केली. या विषयासंदर्भातील भूसंपादन प्रकरणाची सर्व कागदपत्रे अभ्यासासाठी सर्व समिती सदस्य यांना उपलब्ध करुन देण्यात यावे. तहकुब.

(कार्यवाही-मालमत्ता विभाग)

---

विषय नं.१०१ शिर्डी विकास योजना पालखी रस्ता ९.० मिटर रुंदीकरण भूसंपादन एलएक्यएसआर नं.२१/२००३ दि.२५.११.२००३ यामध्ये दिवाणी न्यायाधीश, वरिष्ठ स्तर, राहाता यांचे कोर्टात लॅण्ड रेफरन्स नं. (भूसंपादन निर्देश अर्ज) ४/२००४ व ५/२००४ मध्ये वाढीव नुकसान भरपाईची रक्कम अदा करणेबाबत.

निर्णय क्र.१४१ यावर सविस्तर चर्चा केली. या विषयासंदर्भातील भूसंपादन प्रकरणाची सर्व कागदपत्रे अभ्यासासाठी सर्व समिती सदस्य यांना उपलब्ध करुन देण्यात यावे. तहकुब.

(कार्यवाही-मालमत्ता विभाग)

---

विषय नं.१०२ रुग्णालये विभागातील वार्षिक औषध खरेदीमध्ये खरेदी व्यवस्थापक यांच्या अनियमित व आक्षेपार्ह कामकाजाची विभागीय चौकशी होणेबाबत.

निर्णय क्र.१४२ यावर सविस्तर चर्चा केली. या विषयासंदर्भातील सर्व कागदपत्रे अभ्यासासाठी सर्व समिती सदस्य यांना उपलब्ध करुन देण्यात यावे. तहकुब.

(कार्यवाही-श्री साईबाबा हॉस्पिटल)

---

विषय नं.१०३ श्री साईबाबा हॉस्पिटल व श्री साईनाथ रक्तपेढीमध्ये जुन २०२१ महिन्यात वैद्यकिय बिलात देण्यात आलेली सवलत रक्कम रु.२६,४४,९२५/-ची नोंद घेऊन खर्चास मान्यता मिळणेबाबत.

निर्णय क्र.१४३ नोंद घेऊन मंजूर. (कार्यवाही-श्री साईबाबा हॉस्पिटल)

---

यानंतर मा.अध्यक्ष महोदय यांचे परवानगीने आयत्या वेळेच्या विषयावर चर्चा करण्यात आली.

आयत्या वेळेचा

विषय नं.०१ महाराष्ट्र राज्यात पावसामुळे उद्भवलेल्या नैसर्गिक आपत्तीग्रस्तांच्या मदतीसाठी 'मुख्यमंत्री सहाय्यता' निधी मध्ये रक्कम रु.५ कोटी मात्र अर्थसहाय्य देणेच्या प्रस्तावास मान्यता मिळणेबाबत.

निर्णय क्र.१४४ यावर सविस्तर चर्चा केली. प्रस्ताव मंजूर. सिव्हील ॲप्लीकेशन दाखल करावे.

(कार्यवाही-लेखाशाखा/विधी विभाग)

---

आयत्या वेळेचा

विषय नं.०२ संस्थानमधील कायम कर्मचा-यांना द्यावयाच्या ग्रॅज्युईटी (उपदान) रकमेची कमाल मर्यादा रक्कम रु.२० लाख मात्र करणेबाबत.

निर्णय क्र.१४५ यावर सविस्तर चर्चा केली. यापुर्वी या प्रकरणात सिव्हील ॲप्लीकेशन दाखल करण्याचा निर्णय झालेला आहे. असा सी.ए.दाखल करतांना त्यामध्ये शासनाचा नविन जी.आर. मा.उच्च न्यायालयाचे निदर्शनास आणून देण्यात यावा. (कार्यवाही-लेखाशाखा)

---

आयत्या वेळेचा

विषय नं.०३ श्री.अनिल कचरु कोते व इतर संस्थान आस्थापनेवरील कंत्राटी कर्मचारी यांनी दाखल केलेल्या रिट पिटीशन क्र.६२२४/२०२० मधील मा.उच्च न्यायालयाचे दि.०३.०७.२०२१ रोजीचे निकालपत्राबाबत.

निर्णय क्र.१४६ यावर सविस्तर चर्चा केली. मा.उच्च न्यायालयाचे आदेशाची तंतोतंत अंमलबजावणी करण्यात यावी. (कार्यवाही-सामान्य प्रशासन विभाग)

---

आयत्या वेळेचा

विषय नं.०४ कर्मचारी निवासस्थान वापरास मुदतवाढ मिळणेबाबत कै.मोहन जगन्नाथ यादव यांचे वारस श्रीमती सुरेखा मोहन यादव यांचा दि.२७.०७.२०२१ रोजीचा विनंती अर्ज.

निर्णय क्र.१४७ यावर सविस्तर चर्चा केली. यापुढे मुदतवाढ मिळणार नाही या अटीवर शेवटची मुदतवाढ म्हणून प्रस्ताव मंजूर. (कार्यवाही-सामान्य प्रशासन विभाग)

---

आयत्या वेळेचा

विषय नं.०५ शासन निर्णय व परिपत्रके यांचे वाचन.

निर्णय क्र.१४८ नोंद घेतली. (कार्यवाही-मागसवर्ग कक्ष)

---

आयत्या वेळेचा

विषय नं.०६ मे.व्हि.एम.डिस्ट्रीबुटर्स, नाशिक यांचा दुध पुरवठा आदेश रद्द करणे व दुध खरेदीसाठी नव्याने ई-निविदा प्रक्रिया करणेबाबत.

निर्णय क्र.१४९ यावर सविस्तर चर्चा केली. मे.व्हि.एम.डिस्ट्रीबुटर्स, नाशिक यांना समितीचे पुढील सभेसमोर बोलविण्यात यावे. प्रयोगशाळेचा अहवाल समितीसमोर सादर करण्यात आला. (कार्यवाही-खरेदी विभाग)

---

आयत्या वेळेचा

विषय नं.०७ संस्थानचे प्रसादालय व लाडू निर्मिती विभागासाठी मसाले, ड्रायफ्रुटस व इतर किराणामाल खरेदीकामी ई-निविदा प्राप्त न्युनतम दराबाबत निर्णय होणेबाबत.

निर्णय क्र.१५० यावर सविस्तर चर्चा केली. मुख्य कार्यकारी अधिकारी यांना वाटाघाटी करुन निर्णय घेण्यास अधिकृत करण्यात आले. खरेदी आदेश देण्यास व आवश्यकतेनुसार खरेदी करण्यास मान्यता देण्यात आली. (कार्यवाही-खरेदी विभाग)

---

आयत्या वेळेचा

विषय नं.०८ संस्थानचे भांडार विभागाकडील गाईचे शुध्द तुपाची ई-निविदा कम लिलाव अगर ई-लिलाव पध्दतीने विक्री करणेबाबत.

निर्णय क्र.१५१ यावर सविस्तर चर्चा केली. मिलीटरी, नेव्ही, एअर फोर्स प्रोव्हिजन सप्लायर्स, गुरुव्दारा वैगरे हे तुप घेऊ शकतात. त्यांचेकडे संपर्क साधुन त्यांना खरेदी किंमतीमध्ये (Base price) दुस-या बॅचचे ४३१.८५ क्विंटल तुप विक्री करण्यासाठी प्रयत्न करावेत. (कार्यवाही-भांडार विभाग)

---

आयत्या वेळेचा

विषय नं.०९ — संस्थानचे मंदिर व मंदिर परिसरातील सर्व इमारतीमध्ये स्थायी अग्निशमन यंत्रणा उभारणी करणेकामी मागविणेत आलेल्या ई-निविदानुसार प्राप्त न्युनतम दरधारकास कार्यारंभ आदेश देणेबाबत निर्णय होणेबाबत.

निर्णय क्र.१५२ — यावर सविस्तर चर्चा केली. अभ्यासपुर्वक सविस्तर प्रस्ताव समितीसमोर सादर करावा. तहकुब.

(कार्यवाही-फायर अॅन्ड सेफ्टी विभाग)

---

आयत्या वेळेचा

विषय नं.१० — संस्थान आस्थापनेवरील कायम, कायम कंत्राटी, मानधन तत्वावरील / एकत्रित वेतनावरील तसेच व्हिजीटर्स म्हणून सेवा देणारे वैद्यकीय अधिकारी आदी यांना संस्थान प्रकाशीत श्री साईबाबा दैनंदिनी-२०२१ ही देणगी मुल्य रुपये २५/-मात्र प्रति नग स्विकारुन उपलब्ध करुन देणेबाबत.

निर्णय क्र.१५३ — यावर सविस्तर चर्चा केली. श्री साईबाबा दैनंदिनी-२०२१ ची आहे. या वर्षाची मुदत सात महिने होऊन गेले. दैनंदिनी शिल्लक ठेऊन उपयोग नाही. त्यामुळे प्रस्ताव १ मंजुर. तसेच नाममात्र किंमतीस म्हणजे रुपये २५/- या दराने ठोक स्वरुपात कोणी दैनंदिनी घेण्यास तयार असल्यास ठोक पध्दतीने विक्री करण्यास मान्यता देण्यात आली. तेलगु भाषेतील दैनंदिनी संस्थानचे हैद्राबाद व सिकंदराबाद येथील माहिती केंद्रावर विक्रीसाठी रुपये २५/- या दराने उपलब्ध करुन देण्यात यावी.

(कार्यवाही-प्रकाशने विभाग)

---

आयत्या वेळेचा

विषय नं.११ — श्री साई प्रसादालयाकरीता नविन आटा युनिट खरेदी करणेकामी निविदा प्रक्रिया रद्द करुन फेर ई-निविदा मागणविणेबाबत.

निर्णय क्र.१५४ — यावर सविस्तर चर्चा केली. दरपत्रकाबाबत माहिती घेणे आवश्यक आहे. तहकुब.

(कार्यवाही-मेकॅनिकल विभाग)

---

आयत्या वेळेचा

विषय नं.१२ — मा.उच्च न्यायालयाचे मार्गदर्शन मिळणेकामी सिव्हील अॅप्लीकेशन दाखल करणेबाबत.

निर्णय क्र.१५५ — यावर सविस्तर चर्चा केली. आवश्यकता नाही. नामंजूर

(कार्यवाही-विधी विभाग)

---

आयत्या वेळेचा

विषय नं.१३ — संस्थान कर्मचारी व त्यांचेवर अवलंबीतांचा वैद्यकीय बिलाचा परतावा रक्कम रु.१४,११,१७४/- मात्र अदा करणेस मंजुरी मिळणेबाबत.

निर्णय क्र.१५६ — मंजूर.

(कार्यवाही-श्री साईबाबा हॉस्पिटल)

---

आयत्या वेळेचा

विषय नं.१४ — संस्थान कर्मचारी व त्यांचेवर अवलंबीतांचा वैद्यकीय बिलाचा परतावा रक्कम रु.८,६०,४७०/- मात्र अदा करणेस मंजुरी मिळणेबाबत.

निर्णय क्र.१५७ — मंजूर.

(कार्यवाही-श्री साईबाबा हॉस्पिटल)

---

आयत्या वेळेचा

विषय नं.१५ बाहययंत्रणेव्दारे ठेकेदारामार्फत श्री साईबाबा व श्री साईनाथ रुग्णालयात कार्यरत बी.ए.एम.एस. वैद्यकीय अधिकारी यांचे वेतनाबाबत.

निर्णय क्र.१५८ यावर सविस्तर चर्चा केली. यासबंधीची कागदपत्रे व शासन निर्णय अभ्यासासाठी सर्व समिती सदस्य यांना देण्यात यावीत. तहकुब. (कार्यवाही-श्री साईबाबा हॉस्पिटल)

---

आयत्या वेळेचा

विषय नं.१६ दिनांक 31/07/2021 रोजीच्या तदर्थ समितीच्या सभेत विषय क्र. 27 वरील निर्णयानुसार समाधी मंदिराचे दक्षिण भिंतीला असणा-या खिडक्या व दरवाजास बुलेटप्रुप काचा बसवायच्या किंवा नाही याची पाहणी करण्याकरिता तसेच श्री. साईबाबांचे समकालीन यांचे फोटोंचे नूतनीकरणाचा विषय, विषयसुचीमधील विषय क्र. 67 चर्चेसाठी येणार असल्यामुळे तदर्थ समितीचे अध्यक्ष व सदस्या श्रीमती बनकर यांनी सभा संपल्यानंतर श्रींचे समाधी मंदिराची पाहणी केली. त्यावेळेस हॉलमध्ये मध्यभागी उत्तरबाजुला पॅरापेट वॉल भिंत तोडून बांधकाम चालू असल्याचे निदर्शनास आले. दिनांक 02/08/2021 रोजी सकाळी मा. मुख्य कार्यकारी अधिकारी यांना तदर्थ समितीचे अध्यक्ष यांनी भ्रमणध्वनीद्वारे त्याबाबत विचारणा केली. त्यांना सदरहू कामास तदर्थ समितीची मंजूरी नसल्याने ते काम थांबविण्यास विनंती केली. मा. मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी त्याप्रमाणे कामकाज थांबविल्याचा संदेश व एक फोटो अध्यक्ष यांना व्हॉटसअॅपवर पाठविला.

अशी तक्रार आली आहे की, कोरोना विषाणू महामारीच्या काळात अशी अनेक कामे विनापरवानगी करण्यात आली आहेत. अशा कामांची माहिती अध्यक्ष यांना मिळालेली आहे. त्याचा थोडक्यात तपशील खालीलप्रमाणे:-

| अ.नं. | तपशील |
|---|---|
| 1. | श्री साईबाबा मंदिरालगत पारायण कक्षाची भिंत पाडून त्याचे विलिनीकरण करुन हॉल बनवणे, हा विषय (दि. 19/06/2021 च्या सभेत कायम झालेला निर्णय क्र. 1/82) चक्रीय पध्दतीने दि. 06/01/2021रोजी चक्रीय पध्दतीने सादर करण्यात आलेला होता व त्या विषयावर 2 विरुध्द 2 अशी मत विभागणी झाल्याने तो विषय मंजूर झालेला नाही. तरी देखील सदरचे काम कार्यान्वीत झालेले आहे. |
| 2. | श्री साईबाबा समाधी मंदिर परिसरातील साई सभागृह अथवा पारायण हॉलचा वापर प्रतिक्षालय म्हणून करण्यासाठी सदर हॉलमध्ये फर्नीचर व इंटेरीयर कामे करण्यासाठी अपेक्षित रक्कम रु.8,65,000/- चे अंदाजपत्रकीय खर्चास तसेच या कामी निविदा काढण्यासाठी मान्यतेसाठी प्रस्ताव दिनांक 06/01/2021 रोजी चक्रीय पध्दतीने आणलेला होता, त्यावरील निर्णय (दि.19/06/2021 च्या सभेत कायम झालेला निर्णय क्र.1/83) 2 विरुध्द 2 अशी मत विभागणी झाल्याने तो विषय मंजूर झालेला नाही. तरी देखील सदरचे काम कार्यान्वीत झालेले आहे. |
| 3. | दिनांक 14/05/2021 रोजी अक्षय तृतीयेचे दिवशी प्रसादालयात अन्नपूर्णामातेची मूर्ती बसविण्यात आली. |

उपरोक्त कामे, पी.आय.एल. क्र. 120/2019 मधील मा. उच्च न्यायालयाने दिलेल्या निर्देशाचे उल्लंघन असल्याचा आरोप आहे. तदर्थ समितीचे काम देखरेख ठेवणे व असे जर उल्लंघन झालेतर त्याचा अहवाल मा. उच्च न्यायालयात सदरहू प्रकरणात सादर करणे, हे आहे. याबाबत तदर्थ समितीचे अध्यक्ष यांनी या अगोदरच दिनांक 02/08/2021 च्या जा. क्र.258 च्या पत्रान्वये अशा सिव्हील कामाची माहिती मा. मुख्य कार्यकारी अधिकारी यांचेकडून मागविलेली आहे. त्याची एका आठवडयात पूर्तता करणे.

निर्णय क्र.१५९ सदरचा विषय समितीचे पुढील सभेमध्ये ठेवण्यात यावा. (कार्यवाही-बांधकाम विभाग)

---

आयत्या वेळेचा

विषय नं.१७ दि. 31/07/2021 रोजी तदर्थ समितीचे अध्यक्ष व सदस्या श्रीमती बनकर यांनी कोव्हीड-19 च्या नियमांचे उल्लंघन करुन श्रींचे मंदिरात प्रवेश केल्याबाबत बातमी, अध्यक्ष व सदरच्या सदस्या यांच्या छायाचित्रासह समाज प्रसार माध्यमात प्रसारीत केलेली आहे. तदर्थ समितीचे अध्यक्ष व या सदस्या मंदिर परिसरात त्यांच्या वाहनातून उतरुन आंत जातानाचे सीसीटीव्ही फुटेज देखील समाजप्रसार

माध्यमात प्रसारीत करण्यात आले. दिनांक 02/05/2018 रोजी पारीत निर्णय क्र. 318 दि. 01/06/2018 चे व्यवस्थापन समितीचे सर्वसाधारण सभेत दुरुस्तीसह कायम करुन त्यान्वये सीसीटीव्ही फुटेज त्रयस्त इसमांना देण्यास बंदी घातलेली आहे. त्यामुळे ही तक्रार तदर्थ समितीचे अध्यक्ष यांच्याकडे आल्यावरुन त्यांनी दि. 03/08/2021 रोजी जा.क्र. 260/2021 प्रमाणे मा. मुख्य कार्यकारी अधिकारी यांना विनंती केली की, त्यांनी उप मुख्य कार्यकारी अधिकारी श्री. रविंद्र ठाकरे यांच्यामार्फत संबंधीतांचे जबाब नोंदवून अध्यक्ष यांचेकडे पाठविण्याची व्यवस्था करावी. ते दि. 05/08/2021 रोजी संध्याकाळी 05 वाजेपर्यंत अप्राप्त आहेत. ते काम त्यांचेकडून तात्काळ पूर्ण करुन घेणे.

निर्णय क्र.१६० सदरचा विषय समितीचे पुढील सभेमध्ये ठेवण्यात यावा.

(कार्यवाही-सामान्य प्रशासन विभाग/संरक्षण विभाग/मंदिर विभाग/जनसपंर्क विभाग/सीसीटीव्ही कंट्रोल सेल)

---

आयत्या वेळेचा

विषय नं.१८ तदर्थ समितीचे अध्यक्ष यांचेकडे अशी तक्रार प्राप्त झाली की, संस्थेचे काही अधिकारी व काही कर्मचारी श्री साईबाबा संस्थान विश्वस्थ व्यवस्था, शिर्डी, सेवा (वर्तनणूक) विनिमयाचे कलम 6 व 15 चे उल्लंघन करुन समाज प्रसार माध्यमावर भाग घेतात आणि तदर्थ समितीचे कामकाजाबाबत टिपणी करत आहेत त्यामुळे संस्थानचे सर्व अधिकारी व कर्मचारी यांना सदर नियमांचे उल्लंघन करु नये असे स्मरण करुन देण्यासाठी मा. मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी परिपत्रक काढावे. तसेच या परिस्थितीत मा.उच्च न्यायालयाने पी.आय.एल.120/2019 मध्ये श्री. साईबाबा संस्थानचे व्यवस्थापनासाठी दि. 09 ऑक्टोबर, 2019 रोजी स्थापना केल्यापासून संस्थानचे जे अधिकारी व कर्मचारी यांनी समाज प्रसार माध्यमामध्ये भाग घेतला याची चौकशी तदर्थ समितीचे सदस्य तथा अपर महसूल आयुक्त, नाशिक विभाग,नाशिक श्री. भानुदास पालवे यांनी एका आठवडयात करावी व त्यांनी तसा सविस्तर अहवाल तदर्थ समितीचे अध्यक्ष तथा प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश यांचेकडे द्यावा.

निर्णय क्र.१६१ यावर सविस्तर चर्चा झाली. असे ठरले की, मा.मुख्य कार्यकारी अधिकारी हे मा.पोलीस अधिक्षक, अहमदनगर यांचे अधिनस्त सायबर गुन्हे पोलीस अधिकारी यांचेमार्फत मटेरिअल गोळा करतील व मा. अध्यक्ष, तदर्थ (Ad-hoc) समिती यांचेकडे सादर करतील. त्यावरुन मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे मार्फत गोपनिय अहवाल, तदर्थ समितीचे अध्यक्ष यांचेकडे सादर करावा.

(कार्यवाही-सामान्य प्रशासन विभाग/श्री साईबाबा हॉस्पिटल)

---

आयत्या वेळेचा

विषय नं.१९ संस्थान आस्थापनेवरील विविध विभागांचे सुधारीत आकृतीबंध, सेवाप्रवेश नियम याविषयी संस्थानने जो प्रारुप तयार केलेला आहे त्यास अंतिम मंजुरी मिळणे बाकी आहे. तरीही संस्थाननेच हा प्रारुप तयार केलेला असल्याने त्यातील प्रस्तावित नियम, नियमावली व विनिमय यांचा प्रायोगिक तत्वावर अंमल केल्यास त्यात काय अडचणी येवू शकतात याची माहिती संस्थान प्रशासनाला मिळणार आहे आणि ही माहिती सदरहू प्रारुपाचे स्वरुप अंतिम करतांना उपयोगी ठरु शकते. म्हणून सस्थानचा कोणताही अधिकारी किंवा कर्मचारी यांचा याद्वारे कोणताही हक्क निर्माण न करता त्याची अंमलबजावणी करता येईल. संस्थान आस्थापनेवरील विविध विभागांचे सुधारीत आकृतीबंध, सेवाप्रवेश नियम याविषयी संस्थानने जो प्रारुप तयार केलेला आहे त्यामध्ये प्रस्तावीत केल्याप्रमाणे शैक्षणिक पात्रता, अनुभव इत्यादि प्रमाणे सद्या विविध विभागाचे प्रभारी प्रमुख व इतर महत्वाचे पदावरील प्रभारी कर्मचारी कार्यरत आहेत काय? याचा सविस्तर खुलासा मा.मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी अध्यक्षांकडे सादर करावा. त्यांनी सदरहू प्रारुपातील प्रस्तावीत पध्दतीचा अवलंब करुन सर्व प्रभारी विभाग प्रमुखांचा (हॉस्पीटल्स, आय.टी.आय., शैक्षणिक संस्था यांसह) व महत्वाचे पदांचा प्रभारी म्हणून जोपर्यंत त्या पदावर नियमित नियुक्ती होत नाही तोपर्यंत किंवा समितीचा पुढील आदेश होईपर्यंत कार्यभार ठेवण्याबाबतचा प्रस्ताव तयार करावा व सद्या प्रभारी पदावर कार्यरत असलेले कर्मचारी जे शैक्षणिक पात्रता व आवश्यक अनुभव या निकषात बसत नाहीत त्यांचा पदभार काढून घेण्याचा प्रस्ताव व त्यांचे जागी सदरचे निकषात बसणारे कर्मचा-यांकडे प्रभारी पदभार

ठेवण्याचा प्रस्ताव एका आठवडयाचे आंत अध्यक्ष, तदर्थ समिती तथा प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश यांचेकडे पाठविण्यात यावा.

निर्णय क्र.१६२ सदरचा विषय समितीचे पुढील सभेमध्ये ठेवण्यात यावा.

(कार्यवाही-सामान्य प्रशासन विभाग श्री साईबाबा हॉस्पिटल)

---

**वरील निर्णय क्र.१०२ ते १६२ घेण्यात आले.**
**यानंतर सायं. ०८.०० वाजता सभा समाप्तीची घोषणा करण्यात आली.**

स्वाक्षरीत/-
(श्रीमती गिता पी.बनकर)
सहा.धर्मादाय आयुक्त, अहमदनगर. तथा
सदस्य, तदर्थ (Ad-hoc) समिती
श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिर्डी.

स्वाक्षरीत/-
(कान्हूराज बगाटे,भा.प्र.से.)
मुख्य कार्यकारी अधिकारी, तथा
सदस्य सचिव, तदर्थ (Ad-hoc) समिती.
श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिर्डी.

स्वाक्षरीत/-
(सुधाकर यार्लगड्डा)
प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधिश, अहमदनगर. तथा
अध्यक्ष, तदर्थ (Ad-hoc) समिती.
श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिर्डी.

विषय क्र.- ८२



**मा.तदर्थ (Ad-hoc) समितीचे सभेपुढील विषय**
**माहिती तंत्रज्ञान विभाग**

**विषय :- शिर्डी गावातील रहिवाशी साईभक्तांना दर्शन प्रवेशाकरीता स्मार्टकार्ड वितरीत करणेकामी सदरचे स्मार्ट कार्ड प्रचलीत पद्धतीने ई-निविदा प्रक्रिया राबवून छपाई करणेस व याकामी येणा-या खर्चास मान्यता मिळणेबाबत....**

टिपणी,

**अधिनियम २००४ मधील तरतुद :-** कलम १७ (०१) नुसार भक्तगणांना आवश्यक त्या सोयी व सुविधा उपलब्ध करुन देणे.

**मा.व्यवस्थापन समितीचे सभेतील निर्णय क्र :-** नाही.

**प्रास्ताविक :-** जागतिक स्तरावर उद्भवलेल्या कोरोना विषाणू (Covid-19) चा प्रादुर्भाव रोखणेसाठी प्रतिबंधात्मक उपाय योजनेअंतर्गत संस्थान व्यवस्थापन संचलीत श्री साई समाधी मंदिराबरोबरच इतर सर्व मंदिरे दि.१७.०३.२०२० पासून पुढील आदेश होईपर्यंत संदर्भ क्र.०१ चे आदेशान्वये, साईभक्तांना दर्शनाकरीता बंद करणेत आले होते. दि.१६.११.२०२० पासून राज्य शासनाचे मार्गदर्शक सुचनांप्रमाणे श्री साईबाबांचे मंदिर कोरोना विषाणू (Covid-19) चा प्रादुर्भाव रोखणेसंदर्भातील सर्व प्रतिबंधात्मक उपाय-योजनांचे पालन करुन साईभक्तांना दर्शनासाठी सुरु करणेत आलेले आहे.

श्रींचे मंदिर साईभक्तांकरीता दर्शनाकरीता खुले केल्यानंतर करावयाच्या उपाययोजना व सोयी सुविधांबाबत वेळोवेळी झालेल्या बैठका व प्रत्यक्ष पाहणीअंती देणेत आलेल्या निर्देशाप्रमाणे, दर्शनरांग व्यवस्थापन (Time Base) कार्यप्रणालीअंतर्गत श्रीराम पार्कींग, संस्थानचे सर्व निवासस्थाने व शिर्डी बसस्थानक इ. ठिकाणी मोफत दर्शनपास (Time Base) वितरण केंद्र तसेच साईउद्यान समोर प्रवेशद्वार क्र. ०२ येथे बाहेरून येणारे साईभक्त यांचेकरीता व प्रवेशद्वार क्र.०३ चे उत्तरेस गावकरी साईभक्तांकरीता दर्शनपास पडताळणी केंद्र कार्यान्वीत करणेत आलेले आहेत. तसेच दर्शनरांग प्रवेशद्वार नंबर ०१ व संस्थानचे सर्व निवासस्थान येथे सशुल्क दर्शनपास वितरण केंद्र सुरू करणेत आलेले आहेत. याव्यतिरीक्त संस्थानचे online.sai.org.in या वेबसाईटद्वारे सशुल्क तसेच मोफत दर्शनपास आरक्षणाची सुविधा उपलब्ध करुन देणेत आलेली आहे. वेळोवेळी देणेत येणा-या निर्देशाप्रमाणे सदर प्रणालींमध्ये अनुषंगिक बदल करणेत येतात.

निर्देशीत केलेप्रमाणे सद्यस्थितीत शिर्डी गावातील रहिवाशी साईभक्तांकरीता १६ गुंठे येथील स्टेजशेजारी मोफत दर्शनपास वितरण केंद्र सुरू करणेत आलेले आहे. सदर वितरण केंद्रावरुन रहिवाशी साईभक्तांचे मतदान ओळखपत्र किंवा आधारकार्डची पडताळणी करुन दर्शनपास वितरीत करणेत येतात. सदर दर्शनपास घेऊन आलेल्या साईभक्तांना १६ गुंठे येथील साई कॉम्प्लेक्स समोरील प्रवेशद्वारातून दर्शनाकरीता प्रवेश देणेत येतो. सदर दर्शनपास वितरण केंद्रावर अनेकवेळेस इतर साईभक्त उदा.परिसरातील साईभक्त चुकीचे ओळखपत्र दाखवून दर्शनपास मिळविणेचा प्रयत्न करतात. अशावेळी तेथे कार्यरत असलेल्या कर्मचा-यांबरोबर सदर साईभक्तांचे वाद होतात. यापुर्वीही (लॉकडाऊनपुर्वी) गावकरी प्रवेशद्वाराद्वारे खोटे ओळखपत्र दाखवून दर्शनासाठी प्रवेश मिळविणेचा प्रयत्न इतर साईभक्तांनी केल्याचे वेळोवेळी निदर्शनास आलेले आहे. अशावेळी डयुटीवर असलेले संस्थान कर्मचा-यांबरोबर सदर साईभक्तांनी वाद केलेले आहेत.

दर्शनरांग व्यवस्थापन संदर्भात वेळोवेळी झालेल्या बैठकींदरम्यान सदरची बाब प्रामुख्याने संबंधीतांनी निदर्शनास आणून दिलेली आहे. सदर विषयी सविस्तर चर्चेअंती शिर्डी येथील रहिवाशी साईभक्तांचे दर्शन सुलभ व्हावे व सदर व्यवस्थेद्वारे इतर साईभक्तांना प्रवेश प्रतिबंधीत करणेच्या दृष्टीने

शिर्डी रहिवाशी साईभक्तांना स्मार्टकार्ड वितरीत करणेबाबत निर्देशीत करणेत आलेले आहे. याअंतर्गत शिर्डी रहिवाशी साईभक्तांची अनुषंगिक ओळखपत्रांची पडताळणी अंती नोंदणी करणेत येऊन त्यांना स्मार्टकार्ड वितरीत करणेस निर्देशीत करणेत आलेले आहे.

निर्देशीत केलेप्रमाणे शिर्डी येथील रहिवाशी साईभक्तांना स्मार्टकार्ड वितरीत करणेसाठी अनुषंगिक प्रणाली कार्यान्वीत करावयाची झाल्यास पुढीलप्रमाणे कार्यवाही करावी लागेल, असे नम्र मत आहे.

1. यासंदर्भात सविस्तर प्रस्ताव सादर करुन त्यास मान्यतेअंती धोरणात्मक निर्णयानुसार संबंधीत साईभक्तांचे अनुषंगिक ओळखपत्रांची पडताळणी करुन नोंदणी करणे.
2. नोंदणी केलेल्या साईभक्तांचे स्मार्टकार्ड प्रिंट करणे. सदरची कार्यवाही संस्थानमार्फत प्रिंटर खरेदी करुन अथवा थेट पुरवठाधारकाकडून करुन घेता येईल.
3. साईभक्तांची नोंदणी (One Time Registration) व स्मार्टकार्ड पडताळणीकामी अनुषंगिक प्रणाली मे.टिसीएस यांचेमार्फत विकसीत करुन कार्यान्वीत करता येईल.

उपरोक्त निर्देशान्वये, शिर्डी येथील रहिवाशी साईभक्तांना स्मार्टकार्ड वितरीत करणेकामी या क्षेत्रातील पुरवठाधारकांशी संपर्क करुन चर्चा केली असता, त्यांनी स्मार्टकार्डसाठी पुढीलप्रमाणे खर्च कळविलेला आहे.

01. M/s Technowave ID Systems (P) Ltd., Kochin

| Sr.No. | Details | Qty | Rate | Amount |
|---|---|---|---|---|
| 01 | Proximity Cards | 25,000 | 25.00 | 6,25,000 |
| 02 | ID Card Printer | 01 | 50,000 | 50,000 |
| 03 | Installation & Others | | 3,000 | 3,000 |
| | | | **Total** | **6,78,000+ Tax** |

02. M/s ID Smarttech, Pune

| Sr.No. | Details | Qty | Rate | Amount |
|---|---|---|---|---|
| 01 | Pre Printed 4 Colour front side & 4 Colour back side offset colour drum static data printing | 25,000 | 26.00 | 6,50,000 |
| 02 | Card Printer | 01 | 56,000 | 56,000 |
| 03 | Drum holder notch 2 sided | 01 | 3,400 | 3,400 |
| 04 | Secured ID`s App | 01 | 12,500 | 12,500 |
| | | | **Total** | **7,21,900+ Tax** |

शिर्डी शहरातील रहिवाशी साईभक्तांना स्मार्टकार्ड वितरीत करावयाचे झाल्यास साधारण २५,००० इतके स्मार्टकार्ड सुरवातीचे काळात छपाई करुन वितरीत करावे लागण्याची शक्यता आहे. उपरोक्त तक्त्यात नमुद केलेप्रमाणे २५,०००० स्मार्टकार्ड छपाई करीता साधारण रक्कम रुपये ७,००,०००/- + कर मात्र इतका खर्च अपेक्षीत आहे. सदर स्मार्टकार्ड संस्थानमार्फत प्रिंटर खरेदी करुन मे.टिसीएस यांचे सहकार्याने प्रिंट करता येतील. यामुळे संस्थानची आर्थिक बचत होऊन साईभक्तांची माहितीही सुरक्षीत राहिल.

नमुद केलेप्रमाणे शिर्डी येथील रहिवाशी साईभक्तांना स्मार्टकार्ड प्रिंट करुन वितरीत केल्यास योग्य साईभक्तास दर्शनास प्रवेश देणे सुलभ होऊन यासंदर्भात वेळोवेळी होणारे वादही टाळता येऊ शकतील. पर्यायाने इतर साईभक्तांचे दर्शन सुलभ होऊन प्रशासनावरील ताण कमी होणेस मदत होईल.

सबब, शिर्डी येथील रहिवाशी साईभक्तांना स्मार्टकार्ड छपाई करुन वितरीत करणेकामी स्मार्ट कार्डसह अनुषंगिक साहित्य खरेदी करणेसाठी मे.टिसीएस यांचे तांत्रिक सल्ल्याने प्रचलीत पद्धतीने ई-निविदा प्रक्रिया राबविणेस व याकामी येणारे अंदाजे खर्च रक्कम रुपये ७,००,०००/- + कर मात्रचे खर्चास मान्यता मिळणेकामीचा प्रस्ताव मा.तदर्थ समितीचे सभेसमोर सादर करता येईल, असे नम्र मत आहे.

**मागणी :-** प्रास्ताविकेत नमुद केलेप्रमाणे, शिर्डी गावातील रहिवाशी साईभक्तांना दर्शन प्रवेशाकरीता स्मार्टकार्ड वितरीत करणेकामी प्रचलीत पद्धतीने ई-निविदा प्रक्रिया राबविणेस व याकामी येणारे अंदाजे खर्च रक्कम रुपये ७,००,०००/- + कर मात्रचे खर्चास मान्यता मिळणेकामीचा प्रस्ताव मा.तदर्थ समितीचे सभेसमोर सादर करणेस मान्यता असावी, हि नम्र विनंती.

**संस्थान अधिनियम / ठराव यानुसार छाननी, शासन निर्देश, तांत्रिक, कायदेशीर तसेच आर्थिक विषय इ. छाननी करुन अनुमान :-** आर्थिक, प्रशासकीय व तांत्रिक.

**विभागाचा अभिप्राय / स्पष्ट मत :-** श्रींचे मंदिर साईभक्तांकरीता दर्शनाकरीता खुले केल्यानंतर करावयाच्या उपाययोजना व सोयी सुविधांबाबत वेळोवेळी झालेल्या बैठका व प्रत्यक्ष पाहणीअंती निर्देश देणेत आलेले आहेत. शिर्डी येथील रहिवाशी साईभक्तांचे दर्शन सुलभ व्हावे व सदर व्यवस्थेद्वारे इतर साईभक्तांना प्रवेश प्रतिबंधीत करणेच्या दृष्टीने शिर्डी रहिवाशी साईभक्तांना स्मार्टकार्ड वितरीत करणेबाबत निर्देशीत करणेत आलेले आहे. याअंतर्गत शिर्डी रहिवाशी साईभक्तांची अनुषंगिक ओळखपत्रांची पडताळणी अंती नोंदणी करणेत येऊन त्यांना स्मार्टकार्ड वितरीत करणेस निर्देशीत करणेत आलेले आहे.

उपरोक्त निर्देशान्वये, शिर्डी येथील रहिवाशी साईभक्तांना स्मार्टकार्ड वितरीत करणेकामी या क्षेत्रातील पुरवठाधारकांशी संपर्क करुन चर्चा केली असता, त्यांनी स्मार्टकार्डसाठी पुढीलप्रमाणे खर्च कळविलेला आहे.

01. M/s Technowave ID Systems (P) Ltd., Kochin

| Sr.No. | Details | Qty | Rate | Amount |
|---|---|---|---|---|
| 01 | Proximity Cards | 25,000 | 25.00 | 6,25,000 |
| 02 | ID Card Printer | 01 | 50,000 | 50,000 |
| 03 | Installation & Others | | 3,000 | 3,000 |
| | | | **Total** | **6,78,000+ Tax** |

02. M/s ID Smarttech, Pune

| Sr.No. | Details | Qty | Rate | Amount |
|---|---|---|---|---|
| 01 | Pre Printed 4 Colour front side & 4 Colour back side offset colour drum static data printing | 25,000 | 26.00 | 6,50,000 |
| 02 | Card Printer | 01 | 56,000 | 56,000 |
| 03 | Drum holder notch 2 sided | 01 | 3,400 | 3,400 |
| 04 | Secured ID's App | 01 | 12,500 | 12,500 |
| | | | **Total** | **7,21,900+ Tax** |

शिर्डी शहरातील रहिवाशी साईभक्तांना स्मार्टकार्ड वितरीत करावयाचे झाल्यास साधारण २५,००० इतके स्मार्टकार्ड सुरवातीचे काळात छपाई करुन वितरीत करावे लागण्याची शक्यता आहे. उपरोक्त तक्त्यात नमुद केलेप्रमाणे २५,०००० स्मार्टकार्ड छपाई करीता साधारण रक्कम रुपये ७,००,०००/- + कर मात्र इतका खर्च अपेक्षीत आहे. सदर स्मार्टकार्ड संस्थानमार्फत प्रिंटर खरेदी करुन मे.टिसीएस यांचे सहकार्याने प्रिंट करता येतील. यामुळे संस्थानची आर्थिक बचत होऊन साईभक्तांची माहितीही सुरक्षीत राहिल.

शिर्डी येथील रहिवाशी साईभक्तांना स्मार्टकार्ड वितरीत केल्यास प्रामुख्याने पुढीलप्रमाणे फायदे होतील.

1. शिर्डी येथील रहिवाशी साईभक्तांना स्मार्टकार्ड वितरीत केल्यास त्यांचे दर्शन सुलभ होऊन प्रशासनावरील ताण कमी होणेस मदत होईल.
2. शिर्डी येथील रहिवाशी साईभक्तांना आरती/ दर्शनासाठी प्रवेश देणेकामी अनुषंगिक संगणक प्रणाली विकसीत करुन कार्यान्वीत केल्यास वितरीत करणेत येणा-या स्मार्टकार्डद्वारे सदरचे कार्ड घेऊन येणा-या पात्र साईभक्तास प्रवेश देणे सुलभ होईल.

3. सद्यस्थितीत साईभक्तांचे मतदान ओळखपत्र किंवा आधारकार्डची पडताळणी करुन दर्शनपास वितरीत करणेत येतात. त्याऐवजी स्मार्टकार्डमध्ये नोंदणी केलेली असल्यास खोटे ओळखपत्र दाखवून दर्शनासाठी प्रवेश मिळविणा-या साईभक्तांची संख्या नगण्य होऊन शिर्डी येथील रहिवाशी साईभक्तांची दर्शनाची सुविधा सुलभ होईल. त्यामुळे तेथे कार्यरत असलेल्या कर्मचारी/सुरक्षा रक्षकाबरोबर होणारे सदर साईभक्तांचे वाद-विवाद टळतील व इतर साईभक्तांना याबाबत चुकीचा संदेश जाणार नाही. तसेच संस्थानचे नाव-लौकीकास बाधा पोहचणार नाही.
4. धोरणात्मक निर्णयानुसार सदर साईभक्तांना आरती/दर्शनासाठी प्रवेश देणेबाबतच्या निकषांचा या प्रणालीमध्ये समावेश करता येईल.

सदर प्रवेशद्वाराद्वारे आरती/दर्शन घेणा-या साईभक्तांची माहिती प्रणालीद्वारे सहज उपलब्ध होईल.

सबब, शिर्डी येथील रहिवाशी साईभक्तांना स्मार्टकार्ड छपाई करुन वितरीत करणेकामी स्मार्ट कार्डसह अनुषंगिक साहित्य खरेदी करणेसाठी मे.टिसीएस यांचे तांत्रिक सल्ल्याने प्रचलीत पद्धतीने ई-निविदा प्रक्रिया राबविणेस व याकामी येणारे अंदाजे खर्च रक्कम रुपये ७,००,०००/- + कर मात्रचे खर्चास मान्यता सदरचा प्रस्ताव मा.तदर्थ समितीचे सभेसमोर सविनय सादर.

27/5/2021

(कान्हूराज बगाटे, भा.प्र.से.)
**मुख्य कार्यकारी अधिकारी,**
श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी.

13/05/2021 13/05

IT-MEETING - 135-2021

विषय क्र.- ९३



मा.तदर्थ (Ad-hoc) समितीचे सभेसमोर सादर

माहिती तंत्रज्ञान विभाग

विषय :- साईटेक प्रकल्पाअंतर्गत कार्यान्वीत Oracle Database व Oracle ERP या प्रणालीचे कार्यान्वीत Licenses चे नुतनीकरण तसेच आवश्यक Licenses खरेदी करणेकामी थेट उत्पादक कंपनी M/s Oracle Corporation यांना पुरवठा आदेश देणेस मान्यता मिळणेबाबत.

टिपणी,

**अधिनियम २००४ मधील तरतुद :-** कलम १७ (१) भक्तगणांना सोयी व सुविधा उपलब्ध करुन देणे.

**मा. व्यवस्थापन समितीचा ठराव क्रं. :-**

०१. दि.०७.११.२००९ निर्णय क्र.७९९.
०२. दि.१६.०८.२०१६ निर्णय क्र.५७२.
०३. दि.०४.०४.२०१८ निर्णय क्र.२७५.
०४. दि.०२.०५.२०१८ निर्णय क्र.३४१.
०५. दि.०१.०६.२०१८ निर्णय क्र.३६८.
०६. दि.३०.०६.२०१८ निर्णय क्र.४५१.
०७. दि.२६.०७.२०१८ निर्णय क्र.४६१.
०८. दि.०१.११.२०१८ निर्णय क्र.६८५.

**प्रास्ताविक :-** मा.व्यवस्थापन समितीचे दि.०७.११.२००९ रोजीचे निर्णय क्र.७९९ अन्वये "साईटेक प्रकल्प" कार्यान्वीत करणेकरीता विहीत पद्धतीने मे.कॉग्नीझंट टेक्नॉलॉजी, पुणे यांना कार्यादेश देणेत आला होता. साईटेक प्रकल्पाअंतर्गत संस्थानचे विविध विभागांकरीता एकूण ३८ संगणक प्रणाली विकसीत करुन कार्यान्वीत करणेत आलेल्या आहेत. कार्यान्वीत करणेत आलेल्या विविध प्रणालीअंतर्गतची माहिती (Database) संकलीत करणेकरीता Oracle Database हि प्रणाली कार्यान्वीत करणेत आलेली आहे. तसेच खरेदी, भांडार, लेखाशाखा विभागाकरीता Oracle ERP हि कार्यप्रणाली मे.कॉग्नीझंट टेक्नॉलॉजी, पुणे यांचेमार्फत कार्यान्वीत करणेत आलेली आहे.

साईटेक प्रकल्पाअंतर्गत कार्यान्वीत Oracle Database व Oracle ERP ह्या प्रणालींचे Licenses नुतनीकरण मे-२०१७ पासून प्रलंबीत आहेत. सबब, मा.व्यवस्थापन समितीचे निर्णय क्र.२७५ यास अधिन राहुन Oracle Database व Oracle ERP ह्या प्रणालींचे मे-२०१७ पासूनचे Licenses नुतनीकरण व आवश्यक Oracle Licenses खरेदी करणेबाबतची प्रक्रिंया मे.टिसीएस यांचे मार्गदर्शनाखाली सुरू करणेत आलेली होती. मे.टिसीएस यांनी वेळोवेळी मे.कॉग्नीझंट व मे.ओरॅकल यांचेबरोबर सविस्तर चर्चा करुन अवलोकनाअंती कार्यान्वीत सॉफ्टवेअरचे Oracle Support Licenses Renewal करणे व नव्याने Oracle Database Enterprise Edition (10 Proc) व Oracle Developer Suite Licenses-5 खरेदी करणे आवश्यक असल्याचा अभिप्राय इकडील विभागास दिलेला आहे.

मा.व्यवस्थापन समितीचे सभेमध्ये दिलेल्या निर्देशाप्रमाणे व मे.टिसीएस यांचे अभिप्रायाप्रमाणे, Oracle लायसन्सेस नुतनीकरण व आवश्यक नविन Oracle लायसन्सेस खरेदीकरीता इकडील विभागाचे दि.२३.०५.२०१८ रोजीचे तत्कालीन मा.अध्यक्ष महोदय यांचे मान्यतेन्वये, Oracle यांना जा.नं.एसएसएसटी/वशी-आयटी/९२५/२०१८, दि.२४ मे, २०१८ रोजी एकूण रक्कम रुपये १,५३,८९,०४९.९६ मात्रचा पुरवठा आदेश देणेत आलेला होता. सदर पुरवठा आदेशाची नोंद घेऊन याकामी येणारे खर्चास व सदरची रक्कम Oracle यांना अदा करणेस मान्यता मिळणेकामीचा प्रस्ताव मा.व्य.स. दि.०१.०६.२०१८ रोजीचे सभेपुढे सादर करणेत आलेल्या प्रस्तावावर निर्णय क्रं.३६८ नुसार पुढीलप्रमाणे निर्देश देण्यात आलेले होते. "या विषयावरील चर्चेच्यावेळी सदर सॉफ्टवेअर लायसससेस रु.१.२८ कोटी इतक्या कमी किंमतीपर्यंत मिळू शकतात, असे समिती सदस्य श्री. प्रताप भोसले यांचे मत असल्याचे मा.अध्यक्षांनी नमूद केले. यावेळी Oracle Corporation चे प्रतिनिधी श्री. कौस्तुभ देशपांडे यांचेशी दर कमी करणेबाबत भ्रमणध्वनीद्वारे चर्चा केली असता त्यांनी दर कमी करणेस असमर्थता दर्शविली. यावर सविस्तर चर्चा होऊन, Oracle Software Licenses Purchase & Support Renewal करणेकामी Oracle Corp. यांना देण्यात आलेला पुरवठा आदेश रद्द करणेत यावा".

उपरोक्त निर्देशान्वये Oracle Corporation यांना देण्यात आलेला पुरवठा आदेश रद्द करणेत येत असलेबाबत जा.क्र.एसएसएसटी/वशी-आयटी/१२७६/२०१८, दि.१३ जुन, २०१८ रोजीचे पत्राद्वारे त्यांना कळविणेत आलेले होते.

मा.व्य.स.चे दि.२६.०७.२०१८ रोजीचे सभेमध्ये निर्णय क्र.४६१ अन्वये पुढीलप्रमाणे निर्देश देणेत आले आहेत. "यापुर्वी ओरॅकल कंपनीकडून जे. लायसन्सेस खरेदी केलेले आहेत त्यांचे नुतनीकरण कंपनीकडूनच करणे आवश्यक आहे. त्यामुळे पुढील लायसन्सेसचे नुतनीकरण ओरॅकल कंपनीकडूनच करुन घेण्यास व त्यासाठी येणा-या खर्चास मान्यता देणेत आली. तसेच, जे लायसन्सेस नव्याने घ्यावयाचे आहे ते खरेदी करणेस विहीत पद्धतीने ई-निविदा प्रक्रिया राबविणेस व येणा-या खर्चास मान्यता देणेत आली".

उपरोक्त निर्देशान्वये M/s Oracle (I) Pvt Ltd., Pune यांना जा.नं.एसएसएसटी/वशी-आयटी/३०४९/२०१८, दि.२४ सप्टे., २०१८ अन्वये कार्यान्वीत Oracle Licenses नुतनीकरण करणेकामी कार्यादेश देणेत आलेला आहे. परंतू आजपावेतो त्यांचेमार्फत नुतणीकरणाची कार्यवाही करणेत आलेली नाही. तसेच, सदर निर्णयान्वये आवश्यक नविन Oracle Licenses खरेदी करणेकामी विहीत पध्दतीने ई-निविदा प्रक्रिया राबविणेत आली होती. ई-निविदा प्रक्रियेअंतर्गत प्राप्त झालेल्या निम्नतम दराप्रमाणेची Oracle Licenses खरेदी कामीची एकूण रक्कम रु.३,४१,३१,००६/- (करासह) इतकी होती. सदर रक्कम हि Oracle Corporation यांना देण्यात आलेल्या पुरवठा आदेशामधील याकामीचे रक्कम रुपये १,४१,२४,४४५ (करासह) पेक्षा रक्कम रु.२,००,०६,५६१/- ने जास्त असल्याने याबाबतचा प्रस्ताव निर्णयार्थ मा.व्य.स.चे दि.०१.११.२०१८ रोजीचे सभेसमोर सादर केलेल्या प्रस्तावावर सविस्तर चर्चेअंती निर्णय क्र.६८५ अन्वये, पुढीलप्रमाणे निर्देश देणेत आलेले होते. **"संस्थानचे हिताचे दृष्टीने Oracle Licenses हे ई-निविदेतील निम्नत्तम दरधारकाकडून खरेदी न करता OEM यांचेकडून त्यांना देण्यात आलेल्या पुरवठा आदेशाप्रमाणे खरेदी करणेस व रक्कम अदा करणेस मान्यता देण्यात आली. तसेच याकामी शासनाची मान्यता घेण्यात यावी".**

उपरोक्त निर्देशान्वये, आवश्यक Oracle Licenses हे OEM (Oracle Corporation) यांचेकडून खरेदी करणेस व याकामीची रक्कम त्यांना अदा करणेस मान्यता मिळणेकामीचा प्रस्ताव एसएसएसटी/वशी-आयटी/४३१८/२०१८, दि.३०.११.२०१८ अन्वये, मा.प्रधान सचिव, विधी व न्याय विभाग यांना सादर करणेत आलेला होता. सदर प्रस्तावाबाबत वारंवार पाठपुरावा केलेनंतर, महाराष्ट्र शासन यांचे सासंवि-१०१९/१८२३/प्र.क्र.०३/का.१६, कार्यासन अधिकारी, विधी व न्याय विभाग, दि.२३.०७.२०२० अन्वये पुढीलप्रमाणे अभिप्राय प्राप्त झालेला आहे. **"उपरोक्त विषयाबाबत संदर्भाधीन पत्रान्वये प्राप्त प्रस्तावाच्या अनुषंगाने आपणास कळविण्यात येते की, सदर प्रस्तावावर शासनाच्या प्रचलित खरेदी धोरण व नियमानुसार व्यवस्थापन समितीने कार्यवाही करावी."**

नविन Oracle Licenses खरेदी करणेकामी M/s Oracle यांनी देऊ केलेले दर व ई-निविदा प्रक्रियेअंतर्गत प्राप्त झालेले निम्नत्तम दर याचा विचार करता, याकामी थेट M/s Oracle यांना पुरवठा आदेश देणे अर्थिक दृष्टीने हितावह होणार आहे. सबब, मा.व्य.स.चे दि.०१.११.२०१८ सभेतील निर्णय क्र.६८५ व महाराष्ट्र शासनाचा याबाबतचा अभिप्राय यास अनुसरून, कार्यान्वीत Oracle Licenses चे नुतनीकरण व आवश्यक नविन Licenses खरेदी करणेकामी थेट M/s Oracle यांना खरेदी नियमावली **मुद्दा ३.२.६ एकल स्त्रोत खरेदी – (अ)** यास अधिन राहून पुरवठा आदेश देता येईल.

त्यानुसार, दि.१६.०२.२०२१ रोजीचे मंजुर टिपणीअन्वये, दि.१६.०३.२०२१ रोजीचे ई-मेलद्वारे M/s Oracle यांना याबाबत त्यांचा अभिप्राय तथा प्रस्ताव सादर करणेस सुचित करणेत आले होते. त्यावर M/s Oracle यांनी दि.२९.०३.२०२१ रोजीचे ई-मेलद्वारे Oracle Licenses Renewal करीता स्वतंत्र ई-मेलद्वारे त्यांचे यासंदर्भातील विभागाशी संपर्क करुन देणेत येईल, असे कळविले होते. तसेच आवश्यक Oracle Licenses खरेदी आमचे अधिकृत वितरकांमार्फत करावी असे ई-मेलमध्ये नमुद करून, अधिकृत वितरकांचे माहितीकरीता इंटरनेट लिंक सादर केलेली आहे.

त्यानुसार M/s Oracle यांनी दि.०६.०४.२०२१ रोजीचे ई-मेलद्वारे Oracle Licenses Renewal करीता पुढीलप्रमाणे दर कळविलेले आहेत. त्यांनी कळविलेल्या दराप्रमाणे कार्यान्वीत Oracle Database व Oracle ERP Licenses चे दि.०१.०५.२०१७ ते दि.३०.०४.२०२२ या कालावधीचे नुतनीकरणासाठी एकुण रक्कम रु.१,१४,८६,५६३/- + कर मात्र इतका खर्च अपेक्षीत आहे.

M/s Oracle यांनी दि.१२.०४.२०२१ रोजीचे ई-मेलद्वारे त्यांचे अर्थिक वर्ष हे मे अखेर संपत असल्याने संस्थानने नविन Oracle Licenses खरेदी करणेकामी दि.१५.०५.२०२१ पर्यंत त्यांचे अधिकृत पुरवठाधारकामार्फत पुरवठा आदेश द्यावा, अन्यथा पुरवठा आदेशाची अंमलबजावणी वेळेत होणेची तसेच यावर अधिकची सुट मिळणेची शक्यता कमी आहे, असे कळविलेले आहे. M/s Oracle यांचे सदर ई-मेलबाबत अभिप्राय कळणेसंदर्भात मे.टिसीएस यांना दि.१३.०४.२०२१ रोजीचे ई-मेलद्वारे विनंती करणेत आली होती. त्यानुसार मे.टिसीएस यांनी दि.१५.०४.२०२१ रोजीचे ई-मेलद्वारे याबाबत पुढीलप्रमाणे अभिप्राय दिलेला आहे. "आवश्यक Oracle Licenses खरेदी व नुतनीकरण हे M/s Oracle यांचेमार्फतच करुन घ्यावे, तसेच Oracle Standard Edition ऐवजी Oracle Enterprise Edition चे नुतनीकरण करावे. याकामी संस्थानने यापुर्वी दिलेल्या पुरवठा आदेशाची अंमलबजावणी करणेबाबत प्राधान्याने विचार करणेत यावा."

मे.टिसीएस यांचे अभिप्रायानुसार, कार्यान्वीत Oracle Licenses चे नुतनीकरण व आवश्यक नविन Oracle Licenses चा पुरवठा थेट M/s Oracle यांनीच संस्थानला करणे अपेक्षीत असल्याचे पुनश्च: एकदा त्यांना दि.०३.०५.२०२१ रोजीचे ई-मेलद्वारे सुचित करणेत आले होते. त्यानुसार M/s Oracle यांनी

दि.१४.०५.२०२१ रोजीचे ई-मेलद्वारे Oracle Licenses ची खरेदीकामी त्यांचे संभाव्य दर पुढीलप्रमाणे सादर केलेले आहे.

| Programs and Program-Related Service Offerings | | | | |
|---|---|---|---|---|
| Item | Part No. | Descriptions / License Type | Qty | Net Fee |
| 1.0 | A90611 | Oracle Database Ent.Edition – Proc. Perpetual | 10 | 1,29,12,141.60 |
| 1.1 | | Software Updates | | 19,36,821.24 |
| 1.2 | | Product Support | | 9,03,849.91 |
| 2.0 | L10021 | Oracle Int.Dev.Suite - Named User Plus Perpetual | 5 | 7,88,320.15 |
| 2.1 | | Software Updates | | 1,18,248.02 |
| 2.2 | | Product Support | | 55,182.41 |
| Program-Related Technical Support Fees | | | | 30,14,101.58 |
| **Total Programs and Program-Related Service Offerings Fees** | | | | **1,67,14,563.33** |

**उपरोक्त प्रमाणे नविन Oracle Licenses ची खरेदीकामी M/s Oracle यांनी एकुण रक्कम रुपये १,६७,१४,५६३/- + कर इतका खर्च कळविलेला आहे. सदरचे ई-मेलमध्ये त्यांनी देऊ केलेले दर हे फक्त दि.२७.०५.२०२१ पर्यंतच ग्राह्य धरण्यात येतील असे नमुद केलेले असून, याकामी त्यांना पुरवठा आदेशाबरोबरच पुरवठा आदेशाप्रमाणे याकामीची रक्कम आगाऊ प्राप्त होणे आवश्यक असल्याचे कळविलेले आहे.**

M/s Oracle यांनी दि.०६.०४.२०२१ व दि.१४.०५.२०२१ रोजीचे ई-मेलद्वारे कळविलेप्रमाणे कार्यान्वीत Oracle Database व Oracle ERP Licenses चे दि.०१.०५.२०१७ ते दि.३०.०४.२०२२ या कालावधीचे नुतनीकरणासाठी एकुण रक्कम रु.१,१४,८६,५६३/- + कर इतका व नविन Oracle Licenses ची खरेदीकामी रक्कम रुपये १,६७,१४,५६३/- + कर इतका असा एकुण एकुण रक्कम रु. २,८२,०१,१२६/- (अक्षरी – रु. दोन कोटी ब्यांएशी लाख एक हजार एकशे सव्वीस मात्र ) + कर इतका खर्च अपेक्षीत आहे.

मा.व्य.स.चे दि.०१.११.२०१८ रोजीचे सभेतील निर्णय क्र.६८५ अन्वये, देणेत आलेले निर्देश व याबाबत शासनाकडून प्राप्त झालेला अभिप्राय यानुसार खरेदी नियमावली मुद्दा ३.२.६ एकल स्त्रोत खरेदी – (अ) यास अधिन राहून, याकामी थेट M/s.Oracle Corporation (OEM) यांना पुरवठा आदेश देता येईल. सबब, मा.उच्च न्यायालय खंडपीठ, औरंगाबाद यांचे मान्यतेने याकामी मुळ उत्पादक कंपनी (OEM) M/s.Oracle Corporation यांचेशी चर्चा करुन त्यांना याकामी पुरवठा आदेश देणेस व याकामी येणारे अंदाजे रक्कम रुपये २,८२,०१,१२६/- + कर मात्रचे खर्चास मान्यता मिळणेकामीचा प्रस्ताव मा.तदर्थ समितीसमोर चक्रिय पद्धतीने सादर करणेस दि.२२.०५.२०२१ रोजीचे मंजुर टिपणीअन्वये मान्यता घेणेत आलेली होती.

त्यानुसार सदरचा प्रस्ताव दि.२५.०५.२०२१ रोजी मा.अध्यक्ष महोदय यांचे समोर प्रत्यक्ष सादर करणेत आला होता. यावेळी प्रस्तावासंदर्भात झालेल्या चर्चेअंती मा.अध्यक्ष महोदय यांनी "M/s.Oracle Corporation यांनी कार्यान्वीत M/s.Oracle Licenses चे नुतनीकरण करणेकरीता कळविलेल्या रकमेतील दि.०१.०५.२०१७ ते दि.३०.०४.२०२१ या कालावधीची रक्कम अनुक्रमे ६३,२९,७२६/- व ३४,६०,९४८/- एकूण रक्कम रुपये ९७,९०,६७४/- हि कमी करणेसंदर्भात त्यांना सुचित करणेत यावे," असे निर्देशीत केले होते. सदर निर्देशानुसार M/s.Oracle Corporation यांना यासंदर्भात दुरध्वनीद्वारे तसेच इकडील विभागाचे दि.२९.०५.२०२१ रोजीचे ई-मेलद्वारे सदरची रक्कम कमी करणेस कळविणेत आले होते. त्यानुसार M/s.Oracle यांनी दि.२९.०५.२०२१ रोजीचे ई-मेलद्वारे सुरवातीस सदरचे नुतनीकरण एक वर्षपेक्षा जास्त कालावधीसाठी प्रलंबीत असल्याने सदर रकमेत कोणत्याही प्रकारे सवलत देणे शक्य नसल्याचे कळविलेले आहे. तसेच, Oracle Licenses Renewal & Purchase यासाठी त्यांनी देऊ केलेले दर हे दि.३१.०५.२०२१ अखेरच लागू राहतील असेही त्यांनी ई-मेलमध्ये नमुद केलेले आहे. याबाबत M/s.Oracle यांचे वरिष्ठांशी संपर्क साधून मागील कालावधीचे नुतनीकरणाची रक्कम कमी करणेबाबत पुनश्च: विनंती करणेत आली होती. त्यानुसार M/s.Oracle यांनी दि.२९.०५.२०२१ रोजीचे ई-मेलद्वारे याकामी सुधारीत दर देऊ केलेले आहेत. त्यानुसार त्यांचेकडून यापुर्वी प्राप्त व दि.२९.०५.२०२१ रोजीचे ई-मेलद्वारे प्राप्त याकामीचे दर पुढीलप्रमाणे.

| Sr. No. | Product | Serial Number | No of Users | Total Amt. as per previous quote | Total amt as per quote received thr mail dtd 29.05.2021 |
|---|---|---|---|---|---|
| A. | | | | | |
| 01 | Oracle Internet Application Server Enterprise Edition - Named User Plus Perpetual | 17623698 | 100 | 74,26,127.56 | 54,85,012.00 |
| 02 | Oracle Golden Gate - Processor Perpetual | 17623698 | 04 | | |
| 03 | Oracle Database Standard Edition - Processor Perpetual | 17623698 | 04 | | |

| B. | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| 01 | Oracle Discrete Manufacturing - Application User Perpetual | 17741397 | 75 | 40,60,435.08 | 29,99,077.80 |
| 02 | Oracle Purchasing - Application User Perpetual | 17741397 | 75 | | |
| 03 | Oracle Purchasing - Application User Perpetual | 17741397 | 25 | | |
| 04 | Oracle Financials - Application User Perpetual | 17741397 | 25 | | |

M/s.Oracle यांनी उपरोक्त ई-मेलद्वारे कळविलेप्रमाणे कार्यान्वीत Oracle Licenses चे दि.०१.०५.२०१७ ते दि.३०.०४.२०२२ या कालावधीकरीताचे नुतनीकरण करणेकामी एकूण रक्कम रुपये ८४,८४,०९०/- + कर मात्र इतका खर्च अपेक्षीत आहे. तसेच, आवश्यक Oracle Licenses चे खरेदी करणेकामी त्यांनी यापुर्वी कळविलेल्या दराप्रमाणे एकूण रक्कम रुपये १,६७,१४,५६३/- + कर इतका खर्च अपेक्षीत आहे. M/s.Oracle यांनी दि.२९.०५.२०२१ व दि.३१.०५.२०२१ रोजीचे ई-मेलद्वारे त्यांनी देऊ केलेले दर हे फक्त दि.३१.०५.२०२१ अखेर ग्राह्य धरणेत येतील, असे कळविलेले आहे.

दि.३१.०५.२०२१ रोजी सदर प्रस्तावाबाबत मा.अध्यक्ष महोदय यांचेबरोबर झालेल्या चर्चेदरम्यान M/s.Oracle यांनी देऊ केलेल्या सुधारीत दरांबाबत अवगत करणेत आले. यावेळी चर्चेअंती मा.अध्यक्ष महोदय यांनी सदरचा प्रस्ताव M/s.Oracle यांचेकडून दि. २९.०५.२०२१ रोजीचे ई-मेलद्वारे प्राप्त झालेल्या सुधारीत प्रस्तावासह फेरसादर करणेबाबत निर्देशीत केलेले आहे.

M/s.Oracle यांनी दि. ३१.०५.२०२१ रोजीचे ई-मेलद्वारे त्यांनी Oracle Licenses चे नुतनीकरण तसेच आवश्यक Oracle Licenses खरेदीसाठी देऊ केलेल्या दरांची वैधता दि. ३१.०५.२०२१ रोजी संपुष्टात आली असल्याचे कळविले आहे. सदर ई-मेलचे उत्तरादाखल त्यांना दि. ०१.०६.२०२१ रोजीचे ई-मेलद्वारे त्यांचेमार्फत Oracle Licenses खरेदीस सहमती तसेच याकामीचे दर दि. १४.०५.२०२१ रोजीचे ई-मेलद्वारे संस्थानला प्राप्त झाले आहेत, त्यानुसार याबाबतची कार्यवाही संस्थानमार्फत प्राधान्याने चालू असून, यास आणखी काही अवधी लागू शकतो असे कळविलेले होते. त्यावर M/s.Oracle यांनी दि. ०४.०६.२०२१ रोजीचे ई-मेलद्वारे त्यांनी यापुर्वी सादर केलेला प्रस्तावाची वैधता दि.३१.०५.२०२१ अखेर संपुष्टात आलेली असुन, नविन प्रस्तावाबाबत ते पुढील आठवड्यात संस्थानशी संपर्क करतील, असे कळविलेले आहे.

Oracle Database व Oracle ERP Licenses चे दि.०१.०५.२०१७ ते दि.३०.०४.२०२२ या कालावधीचे नुतनीकरण व आवश्यक नविन Oracle Licenses खरेदी करणेकामी M/s.Oracle यांनी कळविलेप्रमाणे त्यांचेमार्फत याकामी प्रस्ताव प्राप्त झालेनंतर त्यांचेबरोबर मा.तदर्थ समितीचे वतीने मा. मुख्य कार्यकारी अधिकारी महोदय यांचेमार्फत चर्चा/वाटाघाटी करुन त्यांना याकामी प्रचलीत पद्धतीने मा.उच्च न्यायालयाचे मान्यतेने कार्यादेश देणेस मान्यता मिळणेकामीचा फेरप्रस्ताव मान्यतेस्तव मा.तदर्थ समितीचे सभेसमोर सादर करता येईल, असे नम्र मत आहे.

**मागणी :-** मा.व्यवस्थापन समितीचे दि.०१.११.२०१८ रोजीचे सभेतील निर्णय क्र.६८५ अन्वये, देणेत आलेले निर्देश व याबाबत शासनाकडून प्राप्त झालेला अभिप्राय यानुसार खरेदी नियमावली मुद्दा ३.२.६ एकल स्त्रोत खरेदी – (अ) यास अधिन राहून, साईटेक प्रकल्पाअंतर्गत कार्यान्वीत Oracle Database व Oracle ERP Licenses चे दि.०१.०५.२०१७ ते दि.३०.०४.२०२२ या कालावधीचे नुतनीकरण व आवश्यक नविन Oracle Licenses ची खरेदीकामी थेट M/s.Oracle Corporation (OEM) यांना पुरवठा आदेश देता येईल.

प्रास्ताविकेत नमुद केलेप्रमाणे कार्यान्वीत Oracle Database व Oracle ERP Licenses चे दि.०१.०५.२०१७ ते दि.३०.०४.२०२२ या कालावधीचे नुतनीकरण व आवश्यक नविन Oracle Licenses ची खरेदी मुळ उत्पादक कंपनी (OEM) M/s.Oracle Corporation यांचेकडून केल्यास अर्थिकदृष्टया संस्थानचे हिताचे होणार आहे. सबब, याकामी मुळ उत्पादक कंपनी (OEM) M/s.Oracle Corporation यांचेशी मा.तदर्थ समितीचे वतीने मा. मुख्य कार्यकारी अधिकारी महोदय यांचेमार्फत चर्चा-वाटाघाटी करुन त्यांना याकामी मा.उच्च न्यायालय खंडपीठ, औरंगाबाद यांचे मान्यतेने पुरवठा आदेश देणेस व याकामी येणारे अंदाजे रक्कम रुपये २,८२,०१,१२६/- + कर मात्रचे खर्चास मान्यता मिळणे कामीचा प्रस्ताव मा.तदर्थ समितीचे सभेसमोर सादर करणेस मान्यता असावी, हि नम्र विनंती.

**संस्थान अधिनियम / ठराव यानुसार छाननी, शासन निर्देश, तांत्रिक, कायदेशीर तसेच आर्थिक विषय इ. छाननी करुन अनुमान :-** तांत्रिक, आर्थिक व प्रशासकीय

**विभागाचा अभिप्राय / स्पष्ट मत :-** "साईटेक प्रकल्प-२" साठी नविन कंपनीची नेमणूक न झाल्याने खरेदी, भांडार व लेखाशाखा विभागांसाठी कार्यान्वीत Oracle ERP व Oracle Database या प्रणालीचे

Oracle Support Licenses दि.०१.०५.२०१७ पासून Renewal करणे व मे.टिसीएस यांचे अभिप्रायानुसार आवश्यक नविन Oracle Licenses खरेदी करणे प्रलंबीत आहे.

मा.व्य.स.चे सभेमध्ये दिलेल्या निर्देशाप्रमाणे व मे.टिसीएस यांचे अभिप्रायाप्रमाणे, Oracle Licenses चे दि.०१.०५.२०१७ ते दि.३०.०४.२०१९ या कालावधीकरिता नुतनीकरण व आवश्यक नविन Oracle Licenses खरेदीकरीता तत्कालीन मा.अध्यक्ष महोदय यांचे मान्यतेन्वये, इकडील विभागाचे दि.२३.०५.२०१८ रोजीचे मंजुर टिपणी अन्वये Oracle यांना जा.नं.एसएसएसटी/वशी-आयटी/९२५/२०१८, दि.२४ मे, २०१८ नुसार एकूण रक्कम रुपये १,५३,८९,०४९.९६ मात्रचा पुरवठा आदेश देणेत आलेला होता. Oracle यांना देण्यात आलेल्या सदर पुरवठा आदेशाची नोंद घेऊन याकामी येणारे खर्चास व सदरची रक्कम त्यांना अदा करणेस मान्यता मिळणेकामीचा प्रस्ताव मा.व्य.स.चे दि.०१.०६.२०१८ रोजीचे सभेपुढे सादर करण्यात आलेला होता. त्यावर सविस्तर चर्चा होऊन निर्णय क्रं.३६८ नुसार Oracle Software Licenses Purchase & Support Renewal करणेकामी Oracle Corp. यांना देण्यात आलेला पुरवठा आदेश रद्द करणेत यावा, असे निर्देश देणेत आले होते.

मा.व्यवस्थापन समितीचे दि.२६.०७.२०१८ रोजीचे सभेतील निर्णय क्र.४६१ अन्वये "यापुर्वी ओरॅकल कंपनीकडून जे लायसन्सेस खरेदी केलेले आहेत त्यांचे नुतनीकरण कंपनीकडूनच करणे आवश्यक आहे. त्यामुळे पुढील लायसन्सेसचे नुतनीकरण ओरॅकल कंपनीकडूनच करुन घेण्यास व त्यासाठी येणा-या खर्चास मान्यता देणेत आली. तसेच, जे लायसन्सेस नव्याने घ्यावयाचे आहे ते खरेदी करणेस विहीत पद्धतीने ई-निविदा प्रक्रिया राबविणेस व येणा-या खर्चास मान्यता देणेत आली".

उपरोक्त निर्देशाप्रमाणे M/s Oracle(I)Pvt Ltd., Pune यांना जा.नं.एसएसएसटी/वशी-आयटी/३०४९/२०१८, दि.२४ सप्टे., २०१८ अन्वये कार्यान्वीत Oracle Licenses नुतनीकरण करणेकामी कार्यादेश देणेत आलेला आहे. परंतू आजपावेतो Oracle Corporation यांचेमार्फत नुतणीकरणाची कोणतीही कार्यवाही करणेत आलेली नाही. तसेच, आवश्यक नविन Oracle Licenses खरेदी करणेकरिता राबविणेत आलेल्या ई-निविदा प्रक्रियेअंतर्गत प्राप्त झालेल्या निम्नतम दराप्रमाणेची येणारी एकूण रक्कम रु.३,४१,३१,००६/- (करासह) इतकी होती. सदर रक्कम हि Oracle Corporation यांना देण्यात आलेल्या पुरवठा आदेशामधील याकामीचे रक्कम रुपये १,४१,२४,४४५ (करासह) पेक्षा रक्कम रु.२,००,०६,५६१/- ने जास्त असल्याने याबाबतचा प्रस्ताव निर्णयार्थ मा.व्यवस्थापन समितीचे दि.०१.११.२०१८ रोजीचे सभेसमोर सादर करणेत आलेला होता. सदर प्रस्तावावर सविस्तर चर्चेअंती निर्णय क्र.६८५ अन्वये, पुढीलप्रमाणे निर्देश देणेत आलेले होते. **"संस्थानचे हिताचे दृष्टीने Oracle Licenses हे ई-निविदेतील निम्नत्तम दरधारकाकडून खरेदी न करता OEM यांचेकडून त्यांना देण्यात आलेल्या पुरवठा आदेशाप्रमाणे खरेदी करणेस व रक्कम अदा करणेस मान्यता देण्यात आली. तसेच याकामी शासनाची मान्यता घेण्यात यावी"**.

उपरोक्त निर्देशान्वये, आवश्यक Oracle Licenses हे OEM (Oracle Corporation) यांचेकडून खरेदी करणेस व याकामीची रक्कम त्यांना अदा करणेस मान्यता मिळणेकामीचा प्रस्ताव एसएसएसटी/वशी-आयटी/४३१८/२०१८, दि.३०.११.२०१८ अन्वये, मा.प्रधान सचिव, विधी व न्याय विभाग यांना सादर करणेत आलेला होता. सदर प्रस्तावाबाबत वारंवार पाठपुराव्याअंती महाराष्ट्र शासन यांचे सासंवि-१०१९/१८२३/प्र.क्र.०३/का.१६, दि.२३.०७.२०२० अन्वये पुढीलप्रमाणे अभिप्राय प्राप्त झालेला आहे. **"उपरोक्त विषयाबाबत संदर्भाधीन पत्रान्वये प्राप्त प्रस्तावाच्या अनुषंगाने आपणास कळविण्यात येते की, सदर प्रस्तावावर शासनाच्या प्रचलित खरेदी धोरण व नियमानुसार व्यवस्थापन समितीने कार्यवाही करावी."**

मा.व्यवस्थापन समितीचे दि.०१.११.२०१८ रोजीचे सभेतील निर्णय क्रमांक ६८५ अन्वये, देणेत आलेले निर्देश व याबाबत शासनाकडून प्राप्त झालेला अभिप्रायानुसार कार्यान्वीत Oracle Database व Oracle ERP Licenses चे नुतनीकरण व आवश्यक नविन Oracle Licenses खरेदी करणेकामी थेट M/s Oracle यांना खरेदी नियमावली **मुद्दा ३.२.६ एकल स्त्रोत खरेदी – (अ)** यास अधिन राहून पुरवठा आदेश देता येईल. त्यानुसार इकडील विभागाचे दि.१६.०२.२०२१ रोजीचे मंजुर टिपणीअन्वये दि.१६.०३.२०२१ रोजीचे ई-मेलद्वारे याबाबत M/s Oracle यांना त्यांचा प्रस्ताव सादर करणेस सुचित करणेत आले होते.

M/s.Oracle यांनी कळविलेप्रमाणे कार्यान्वीत Oracle Licenses चे दि.०१.०५.२०१७ ते दि.३०.०४.२०२२ या कालावधीकरीताचे नुतनीकरण करणेकामी एकूण रक्कम रुपये ८४,८४,०९०/- + कर ,मात्र इतका खर्च अपेक्षीत आहे. तसेच, आवश्यक Oracle Licenses चे खरेदी करणेकामी त्यांनी यापुर्वी कळविलेल्या दराप्रमाणे एकूण रक्कम रुपये १,६७,१४,५६३/- + कर इतका खर्च अपेक्षीत आहे. M/s.Oracle यांनी दि.२९.०५.२०२१ व दि.३१.०५.२०२१ रोजीचे ई-मेलद्वारे त्यांनी देऊ केलेले दर हे फक्त दि.३१.०५.२०२१ अखेर ग्राह्य धरणेत येतील, असे कळविलेले आहे.

दि.३१.०५.२०२१ रोजी सदर प्रस्तावाबाबत मा.अध्यक्ष महोदय यांचेबरोबर झालेल्या चर्चेदरम्यान M/s.Oracle यांनी देऊ केलेल्या सुधारीत दरांबाबत अवगत करणेत आले. यावेळी चर्चेअंती मा.अध्यक्ष महोदय यांनी सदरचा प्रस्ताव M/s.Oracle यांचेकडून दि. २९.०५.२०२१ रोजीचे ई-मेलद्वारे प्राप्त झालेल्या सुधारीत प्रस्तावासह फेरसादर करणेबाबत निर्देशीत केलेले आहे.

M/s.Oracle यांनी दि. ३१.०५.२०२१ रोजीचे ई-मेलद्वारे त्यांनी Oracle Licenses चे नुतनीकरण तसेच आवश्यक Oracle Licenses खरेदीसाठी देऊ केलेल्या दरांची वैधता दि. ३१.०५.२०२१ रोजी संपुष्टात आली असल्याचे कळविले आहे. सदर ई-मेलचे उत्तरादाखल त्यांना दि. ०१.०६.२०२१ रोजीचे ई-मेलद्वारे त्यांचेमार्फत Oracle Licenses खरेदीस सहमती तसेच याकामीचे दर दि. १४.०५.२०२१ रोजीचे ई-मेलद्वारे संस्थानला प्राप्त झाले आहेत, त्यानुसार याबाबतची कार्यवाही संस्थानमार्फत प्राधान्याने चालू असून, यास आणखी काही अवधी लागू शकतो असे कळविलेले होते. त्यावर M/s.Oracle यांनी दि. ०४.०६.२०२१ रोजीचे ई-मेलद्वारे त्यांनी यापुर्वी सादर केलेला प्रस्तावाची वैधता दि.३१.०५.२०२१ अखेर संपुष्टात आलेली असुन, नविन प्रस्तावाबाबत ते पुढील आठवडयात संस्थानशी संपर्क करतील, असे कळविलेले आहे.

Oracle Database व Oracle ERP Licenses चे दि.०१.०५.२०१७ ते दि.३०.०४.२०२२ या कालावधीचे नुतनीकरण व आवश्यक नविन Oracle Licenses खरेदी करणेकामी M/s.Oracle यांनी कळविलेप्रमाणे त्यांचेमार्फत याकामी प्रस्ताव प्राप्त झालेनंतर त्यांचेबरोबर मा.तदर्थ समितीचे वतीने मा. मुख्य कार्यकारी अधिकारी महोदय यांचेमार्फत चर्चा/वाटाघाटी करुन त्यांना याकामी प्रचलीत पद्धतीने मा.उच्च न्यायालयाचे मान्यतेने कार्यादेश देणेस मान्यता मिळणेकामीचा फेरप्रस्ताव मा.तदर्थ समितीचे सभेसमोर सविनय सादर.

(कान्हूराज बगाटे, भा.प्र.से.)
मुख्य कार्यकारी अधिकारी,
श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी.

21/06/2021

IT-MEETING-210-2021

विषय क्र.- ८४



## मा.तदर्थ (Ad-hoc) समितीचे सभेपुढील विषय
## पाणी पुरवठा विभाग

**विषयः- वाढीव शिर्डी संस्थान, कोपरगांव नगरपालिका व शिर्डी नगरपंचायत संयुक्त पाणी पुरवठा योजना (निळवंडे धरण उद्भव धरुन) ता.राहाता, जि.अहमदनगर टप्पा-१ चे कामातील पाईपलाईन मार्गातील रस्त्यांची दुरुस्ती खर्चास मान्यता मिळणेबाबत.**

टिपणी,

श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था अधिनियम २००४ मधील तरतुद:- अधिनियमाचे कलम २१(१) अन्वये समितीपुढे विश्वस्तव्यवस्थेच्या निधीचा विनयोग पुढील सर्व किंवा त्यापैकी कोणत्याही प्रयोजनासाठी करणेची तरतुद आहे. त्यातील पोटकलम (क) अन्वये, मंदिराची व विश्वस्तव्यवस्थेच्या मालमत्तांची देखभाल, व्यवस्थापन व प्रशासन या प्रयोजनासाठी करण्यात येईल, अशी तरतुद आहे.
तसेच अधिनियमाचे कलम २१ (१) मधील पोटकलम (ग) अन्वये, भक्तांना देवतेच्या दर्शनासाठी व मंदिरात प्रार्थनेसाठी किंवा कोणतेही धार्मिक कार्य किंवा समारंभ पार पाडण्यासाठी सोयी व सुविधा पुरविणे, अशी तरतूद आहे.

मा. शासन निर्णय:-

१. महाराष्ट्र शासन, विधी व न्याय विभाग, शासन निर्णय क्रं.सासंवि-२०१५/१००७/प्र.क्र.१७७(भाग-१)/का.१६, दि.०७ फेब्रुवारी, २०१८ अन्वये मुख्य अभियंता (प्रभारी), महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, प्रादेशिक विभाग, नाशिक यांनी दि.२५/०१/२०१८ रोजी दिलेल्या तांत्रिक मान्यतेनुसार वाढीव श्री साईबाबा संस्थान, शिर्डी, नगरपंचायत शिर्डी आणि कोपरगांव नगरपालिका संयुक्त पाणी पुरवठा योजना, ता.राहाता, जि.अहमदनगर (निळवंडे धरण उद्भव घेऊन) योजनेस श्री साईबाबा समाधी शताब्दी महोत्सव, २०१७-१८ करीता सदर योजनेची निकड विचारात घेऊन ही योजना टप्पा क्रं.१ (शिर्डी परिसरातील करावयाची WTP, ESR, Distribution Network व पाईपलाईनचे काम करणे) – अंदाजे मुल्य रु.२७,१३,०३,९८०/- आणि टप्पा क्रं.२ (निळवंडे धरण ते मौजे कनकरी संस्थान जलशुध्दीकरण केंद्र, शिर्डी नगरपंचायत ते कोपरगांव नगरपरिषद जलशुध्दीकरण केंद्र पर्यंत पाईपलाईन टाकणे) अंदाजे मुल्य रु.२०५,५९,८९,८०४/- या दोन स्वतंत्र टप्प्यात राबविण्यात येईल. सदर अंदाजित रकमेवर escalation charge व त्यावरील एकुण ५% P.M.C. charge यांची गणना करुन अटी व शर्तीच्या अधिन राहून सदर योजनेसाठी एकुण रु.२६०.३९ कोटी इतक्या खर्चास सुधारित प्रशासकिय मान्यता देण्यात आलेली असून या योजनेसाठी महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, प्रादेशिक विभाग, नाशिक यांची प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार म्हणून नियुक्ती करुन मोजमाप नोंदणी शुल्क २% व प्रकल्प व्यवस्थापन शुल्क ३% अशी एकुण ५% इतकी फी देखील आदा करण्यास मान्यता देण्यात आलेली आहे.
२. मा.विधी व न्याय विभाग, शासन निर्णय क्रं.सासंवि-२०१५/१००७/का.१६, दि.२१ डिसेंबर, २०१८ अन्वये वाढीव शिर्डी संस्थान, कोपरगांव नगरपालिका व शिर्डी नगरपंचायत संयुक्त पाणी पुरवठा योजना (निळवंडे धरण उद्भव धरुन) ता.राहाता, जि.अहमदनगर टप्पा क्रं.-१ चे पात्र निविदाधारक ठेकेदार द इंडियन ह्युम पाईप कंपनी लि.पुणे यांना रु.२३,८१,००,०००/- (रु.तेवीस कोटी एक्याऐंशी लाख फक्त) इतक्या रकमेचा कार्यारंभ आदेश देण्यास व त्यावर अधिक ५% Contg व २% W.C. सह एकुण रु.२५,२२,२४,५७६.२५ इतक्या रकमेस मान्यता देण्यात आलेली आहे.

प्रकल्पाची माहिती:-

**टप्पा क्रं.-१ चे कामात खालीलप्रमाणे कामाचा अंतर्भाव आहे.**

Estimated Cost- २७.१३ कोटी.

१. १७ द.ल.लिटर क्षमतेच्या जलशुध्दीकरण केंद्राची उभारणी करणे.
२. ५०० mm व्यास शुध्द पाणी उर्ध्वनलिका डी आय के-९, लांबी- १०० मिटर.
३. आर.सी.सी. मुख्य संतुलीत जलकुंभ, क्षमता- १४,२५,००० लिटर, उंची- २५ मिटर.
४. आर.सी.सी. उंच जलकुंभ-
   अ) क्षमता- ६,६०,००० लिटर, उंची- १५ मिटर.
   ब) क्षमता- ७,६५,००० लिटर, उंची- १५ मिटर.
   क) क्षमता- ३,४०,००० लिटर, उंची- १५ मिटर.
   ड) आर.सी.सी. सम्प, क्षमता-२८०००लिटर-०२ नग.
५. ८०० mm ते १५० mm व्यास शुध्द पाणी गुरुत्ववाहिनी विविध भागासाठी डी आय के-७, एकुण लांबी- ९१८० मिटर.
६. अस्तित्वातील उंच संतुलित जलकुंभ, क्षमता- १०,००,००० लिटर दुरुस्ती कामे.

७. वितरण व्यवस्था-

अ) ३५० mm ते १०० mm व्यास पाईप- डीआय के-७, लांबी-५६१९ मिटर.

ब) ३५० mm ते ९० mm व्यास पाईप शुध्द पाणी सम्प पर्यंत वितरण व्यवस्थासाठी, लांबी-७२८२ मिटर.

८. ६ महिनेकरीता O & M व चाचणीकरीता कालावधी इत्यादी.

प्रस्तावना:-

वाढीव शिर्डी संस्थान, कोपरगांव नगरपालिका व शिर्डी नगरपंचायत संयुक्त पाणी पुरवठा योजना (निळवंडे धरण उद्भव धरुन) ता.राहाता, जि.अहमदनगर टप्पा क्रं.-१ चे कामासाठी ठेकेदार THE INDIAN HUME PIPE CO.LTD.,यांना जा.क्रं.एसएसएस/वशी/पाणी पुरवठा/४६६५/२०१८, दि.२२/१२/२०१८ अन्वये कार्यादेश देणेत आलेला आहे. त्यानुसार ठेकेदार यांचेकडून टप्पा क्रं.०१ चे काम सुरु आहे.

वाढीव शिर्डी संस्थान, कोपरगांव नगरपालिका व शिर्डी नगरपंचायत संयुक्त पाणी पुरवठा योजना (निळवंडे धरण उद्भव धरुन) ता.राहाता, जि.अहमदनगर टप्पा क्रं.०१ चे कामाचा आढावा घेणेसाठी दि.२१/०८/२०२० रोजी सकाळी ११:०० वाजता मा.मुख्य कार्यकारी अधिकारी महोदय यांचे समवेत उपविभागीय अधिकारी, शिर्डी, तहसिलदार, राहाता, मुख्याधिकारी, शिर्डी नगरपंचायत, उपविभागीय अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण उपविभाग कोपरगांव व टप्पा क्र.०१ कामाचे ठेकेदार यांचे समवेत बैठक आयोजित करणेत आलेली होती.

सदरहू बैठकित पाईपलाईन ज्या मार्गाने जाणार आहे, त्या मार्गातील शिर्डी नगरपंचायत हद्दीतील रस्त्याची खोदाई करावी लागणार आहे. याकरिता सदरहू मार्गातील रस्त्याची दुरुस्ती करावी लागणार आहे. यासाठी आवश्यक खर्चाचे इस्टीमेट तयार करुन, येणारे खर्चास मान्यता घेणेबाबतची कार्यवाही करुन घ्यावी असे निर्देश देण्यात आलेले होते. त्यास अनुसरुन उप अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण उपविभाग कोपरगांव यांचेकडून जा.क्रं./तांशा-१/२७२/२०२०, दि.२१/०९/२०२० रोजीचे पत्रान्वये शिर्डी नगरपंचायत हद्दीतुन पाईपलाईनचा मार्ग निश्चित करण्याच्या अनुषंगाने आदेशीत केल्याप्रमाणे दोन मार्गाचे पुर्न:स्थापन व पाईपच्या खर्चाचे अंदाजपत्रक सादर करण्यात आलेले आहेत.

उप अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण उपविभाग कोपरगांव यांचेकडून सादर केलेल्या अंदाजपत्राची पडताळणी केली असता, त्यामध्ये श्री साईबाबा दर्शन रांग प्रकल्प, श्री समाधी मंदिर, श्री साईबाबा हॉस्पिटल, शिर्डी बसस्थानक करीता येणा-या पाईपलाईनचे कामात होणारे रस्ता दुरुस्तीचे कामाचा समावेश नसल्याने यामध्ये या कामाचा समावेश करुन अंदाजपत्रक फेर सादर करणेसाठी उप अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण उपविभाग कोपरगांव यांना जा.नं.एसएसएस/वशी/ पाणी पुरवठा/१७९४/२०२०, दि.१२/१०/२०२० अन्वये पत्र देण्यात आलेले होते.

उप अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण उपविभाग कोपरगांव यांचेकडून जा.क्रं./तांशा-१/३०८/२०२०, दि.१५/१०/२०२० रोजीचे पत्रान्वये शिर्डी नगरपंचायत हद्दीतुन पाईपलाईनचा मार्ग निश्चित करण्याच्या अनुषंगाने आदेशीत केल्याप्रमाणे दोन मार्गाचे पुर्न:स्थापन व पाईपच्या खर्चाचे अंदाजपत्रक सादर करण्यात आलेले आहेत. (सोबत दि.१५/१०/२०२० रोजीचे पत्राची प्रत सादर आहे.)

**दोन्ही मार्गाचे पुर्न:स्थापन खर्चाचे अंदाजपत्रकाचा तपशिल खालीलप्रमाणे:-**

| A) | Rout – A Road Reinstating | Length | Unit | Rate | Amount |
|---|---|---|---|---|---|
| 1 | From MSEB sub station to Hotel Siddhant | 400.00 | MTR | 4445.00 | 17,78,000.00 |
| 2 | From Hotel Siddhant to Bhakta Niwas 500 Rooms. | 1700.00 | MTR | 4445.00 | 75,56,500.00 |
| 3 | From MSEB sub station to Existing ESR 10 lakhs cap. | 600.00 | MTR | 4445.00 | 26,67,000.00 |
| 4 | Existing ESR 10 lakhs cap. To Shri SaiBaba darshan rang, Samadhi Mandir, SaiBaba Hospital, Bus Stand and Other. | 5640.00 | MTR | 4445.00 | 2,50,69,800.00 |
| | **Total Length-** | **8340.00** | **MTR** | **Total Amount-** | **3,70,71,300.00** |

| B) | Rout – B Road Reinstating | Length | Unit | Rate | Amount |
|---|---|---|---|---|---|
| 1 | From MSEB sub station to Zhulelal Mandir. | 290.00 | MTR | 4445.00 | 12,89,050.00 |
| 2 | From Zhulelal Mandir to NH 60 (Ratnakar Bank). | 1400.00 | MTR | 4445.00 | 62,23,000.00 |
| 3 | NH 60 (Ratnakar Bank)to Bhakta Niwas Existing ESR. | 450.00 | MTR | 4445.00 | 20,00,250.00 |
| 4 | From Zhulelal Mandir to Existing ESR 10 lakhs cap. | 565.00 | MTR | 4445.00 | 25,11,425.00 |
| 5 | Existing ESR 10 lakhs cap. To Shri SaiBaba darshan rang, Samadhi Mandir, SaiBaba Hospital, Bus Stand and Other. | 5640.00 | MTR | 4445.00 | 2,50,69,800.00 |
| | **Total Length-** | **8340.00** | **MTR** | **Total Amount-** | **3,70,93,525.00** |

..3/-

टप्पा क्रं.०१ चे कामात टाकावयाच्या पाईपलाईन ज्या मार्गाने जाणार आहे, त्या मार्गातील रस्त्याची खोदाई करावी लागणार आहे. पाईपलाईन टाकलेनंतर सदरहू मार्गातील रस्त्याची दुरुस्ती करावी लागणार आहे. महाराष्ट्र जीवन प्राधिकरण विभाग यांचेकडून टप्पा क्रं.०१ चे कामाची निविदा तयार करतेवेळी सदरहू निविदेमध्ये या कामाचा समावेश करण्यात आलेला नसल्याने यासाठी आवश्यक खर्चाचे इस्टीमेट तयार करुन, येणारे खर्चास मान्यता घेणेबाबतची कार्यवाही करुन घ्यावी लागणार आहे.

उप अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण उपविभाग कोपरगांव यांचेकडून सादर केलेल्या दोन्ही मार्गाचे पुर्न:स्थापन खर्चाचे अंदाजपत्राची पडताळणी केली असता, **Rout – B** प्रमाणे दर्शविलेनुसार पाईपलाईनची अलायनमेंट निश्चित करणेत आलेली आहे.

उप अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण उपविभाग कोपरगांव यांचेकडून सादर केलेल्या दोन्ही मार्गाचे पुर्न:स्थापन खर्चाचे अंदाजपत्रकानुसार **Rout – B** पुर्न:स्थापन खर्चाचे अंदाजपत्राची रक्कम ३,७०,९३,५२५/- मात्र दर्शविणेत आलेली आहे. त्यानुसार शिर्डी नगरपंचायत व जागतिक बँक प्रकल्प विभाग (PWD) हद्दीतुन खालीप्रमाणे पाईपलाईन जात आहे.

| B) | ROUTE – B<br>ROAD IN POSSESSION OF SHIRDI NAGAR PANCHAYAT | Length | Unit |
|---|---|---|---|
| 1 | From MSEB sub station to Zhulelal Mandir. | 290.00 | MTR |
| 2 | From Zhulelal Mandir to RBL Bank | 1400.00 | MTR |
| 3 | From Existing ESR to Zhulelal Mandir. | 565.00 | MTR |
| 4 | From Existing ESR 10 lakhs cap. to Laxmi Nagar. | 895.00 | MTR |
| | **Total Length-** | **3150.00** | **MTR** |
| | **ROAD IN POSSESSION OF NATIONAL HIGHWAY AUTHORITY** | | |
| 1 | From Laxmi Nagar to Saibaba Bhaktaniwas 500 Rooms. | 1610.00 | MTR |
| | **Total Length-** | **1610.00** | **MTR** |

**Rout – B** प्रमाणे दर्शविलेनुसार पाईपलाईनची अलायनमेंट निश्चित केल्यास शिर्डी नगरपंचायत, शिर्डी यांचे हद्दीतून एकुण ३१५० मिटर व जागतिक बँक प्रकल्प विभाग (PWD) हद्दीतुन १६१० मिटर पाईपलाईन जात आहे.

सदरहु काम करणेस परवानगी मिळणेसाठी मुख्याधिकारी, शिर्डी नगरपंचायत, शिर्डी यांना जा.क्रं.एसएसएसटी/वशी/पाणी पुरवठा/२४३५/२०२०, दि.०१/१२/२०२० अन्वये व कार्यकारी अभियंता, जागतिक बँक प्रकल्प विभाग (PWD) यांना जा.क्रं.एसएसएसटी/वशी/पाणी पुरवठा/२४३४/२०२०, दि.०१/१२/२०२० अन्वये पत्र देण्यात आलेले होते.

**प्रस्ताव:-**

- यावर शिर्डी नगरपंचायत, शिर्डी यांचेकडून जा.क्रं./टे-०८/८३/२०२१, दि.११/०१/२०२१ रोजीचे पत्र प्राप्त झालेले आहे. सदरहू पत्रान्वये त्यांनी पाईपलाईनसाठी शिर्डी नगरपंचायतने नव्याने विकसीत केलेल्या रस्त्यास अंदाजे ३१५० मीटर लांब, २.५ मीटर रुंद व १.५ मीटर खोल खोदाई करावी लागणार आहे. त्यामुळे रस्त्याचे मोठया प्रमाणावर नुकसान होणार आहे.
  तरी टप्पा-१ चे अंतर्गत संस्थानकरीता पाईपलाईन टाकणेचे काम पुर्ण झालेवर संस्थानमार्फत रस्ता दुरुस्ती करुन दयावा. यासाठी रस्ता दुरुस्ती हमी पोटी सुरक्षा ठेव (अनामत रक्कम) रु.१,९१,३४,०९१/- नगरपंचायतकडे जमा करावी. सदर रस्त्यास संस्थानमार्फत पाईपलाईन टाकलेनंतर खोदाई केलेला रस्ता पुर्ववत दुरुस्ती केलेबाबत नगरपंचायतचे अभियंतामार्फत समक्ष पाहणी करुन सदर रस्ता पुर्ववत केला आहे. याबाबत खातरजमा झालेवर, आपण जमा केलेली सुरक्षा रक्कम (अनामत रक्कम) आपणास परत करणेत येईल. असे कळविलेले आहे. (सोबत शिर्डी नगरपंचायत, शिर्डी यांचे दि.११/०१/२०२१ रोजीचे पत्र जोडलेले आहे)
- कार्यकारी अभियंता, जागतिक बँक प्रकल्प विभाग, अहमदनगर यांचेकडून जा.क्रं.रेशा/इतिवृत्त/८२/सन २०२१, दि.१३/०१/२०२१ रोजीचे पत्र प्राप्त झालेले आहे. सदरहू पत्रान्वये त्यांनी पाईपलाईन टाकणेस परवानगी मिळणेकामी या कार्यालयात पुर्न:स्थापित शुल्क रु.५,६३,७५०/- व सिक्युरीटी डिपॉझिट शुल्क १,००,०००/- भरण्यात यावे. तसेच बँक गॅरंटी रक्कम रु.४०,२५०/- Executive Engineer, World Bank Project (P.W.) Division, Ahmednagar यांचे नांवे या कार्यालयाकडे जमा करावी. त्यांनतरच आपणास परवानगी देणेकामीची पुढील कार्यवाही करता येईल. असे कळविलेले आहे. (सोबत कार्यकारी अभियंता, जागतिक बँक प्रकल्प विभाग, अहमदनगर यांचे दि.१३/०१/२०२१ रोजीचे पत्र जोडलेले आहे). सदर नगर-मनमाड रस्ता हा संस्थानमार्फत दुरुस्त करावयाचा आहे.
- टप्पा क्रं.०१ चे कामात टाकावयाच्या पाईपलाईन ज्या मार्गाने जाणार आहे, त्या मार्गातील रस्त्याची खोदाई करावी लागणार आहे. पाईपलाईन टाकलेनंतर सदरहू मार्गातील रस्त्याची दुरुस्ती करावी लागणार आहे. महाराष्ट्र जीवन प्राधिकरण विभाग यांचेकडून टप्पा क्रं.०१ चे कामाची निविदा तयार करतेवेळी सदरहू निविदेमध्ये या कामाचा समावेश करण्यात आलेला नाही. टप्पा क्रं.०१ चे निविदेमध्ये या कामाचा उल्लेख नसल्याने हा खर्च वेगळा करावा लागेल.
  उप अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण उपविभाग कोपरगांव यांचेकडून सादर अंदाजपत्रकानुसार पाईपलाईन टाकावयाच्या मार्गाचे पुर्न:स्थापन खर्चाचे अंदाजपत्रकानुसार खर्चाची रक्कम रु. ३,७०,९३,५२५/- मात्र दर्शविणेत आलेली आहे.

तरी याबाबत खालील बाबींवर निर्णय होणे गरजेचे आहे.

- मुख्याधिकारी, शिर्डी नगरपंचायत, शिर्डी व कार्यकारी अभियंता, जागतिक बँक प्रकल्प विभाग (PWD) यांनी कळविलेनुसार पाईपलाईन मार्गाची दुरुस्ती संस्थानमार्फत करावी लागेल. याकामी मा.तदर्थ (Ad-hoc) समितीचे मान्यतेने सल्लागार नेमुन विहीत पध्दतीनुसार ई-निविदा प्रक्रिया राबवून या कामासाठी ठेकेदार यांची नेमणूक करावी लागेल.
- मुख्याधिकारी, शिर्डी नगरपंचायत, शिर्डी यांनी मागणी केलेनुसार संस्थानमार्फत रस्ता दुरुस्ती करणे, रस्ता दुरुस्ती हमी पोटी सुरक्षा ठेव (अनामत रक्कम) रु.१,९१,३४,०९१/- नगरपंचायतकडे जमा करणेचे कळविलेले आहे. तथापि जर रस्ता संस्थानमार्फत दुरुस्ती करावयाचा आहे तर सदरहू सुरक्षा ठेव रक्कम रु.१,९१,३४,०९१/- शिर्डी नगरपंचायत, शिर्डी कडे जमा करणेची आवश्यकता नाही, असे मत आहे. तसे मुख्याधिकारी, शिर्डी नगरपंचायत शिर्डी यांना कळविता येईल.
- कार्यकारी अभियंता, जागतिक बँक प्रकल्प विभाग, अहमदनगर यांनी कळविलेनुसार संस्थानमार्फत रस्ता दुरुस्ती करणे, पुर्न:स्थापित शुल्क रु.५,६३,७५०/- व सिक्युरीटी डिपॉझिट शुल्क १,००,०००/- तसेच बँक गॅरंटी रक्कम रु.४०,२५०/- Executive Engineer, World Bank Project (P.W.) Division, Ahmednagar यांचे नांवे जमा करणेस मान्यता मिळावी.
- उप अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, उपविभाग कोपरगांव यांचेकडून प्राप्त अंदाजपत्रकानुसार पाईपलाईन टाकावयाच्या मार्गाचे पुर्न:स्थापन खर्चाचे अंदाजपत्रकानुसार खर्चाची रक्कम रु. ३,७०,९३,५२५/- मात्र दर्शविणेत आलेली आहे. सदरहू पुर्न:स्थापन खर्चाचे अंदाजपत्रक रु. ३,७०,९३,५२५/- मात्रचे खर्चास व याकामी सल्लागार नेमुन विहीत पध्दतीने ई-निविदा प्रक्रिया राबविणेस, ई-निविदा सुचना वर्तमानपत्रात तसेच संस्थानचे संकेतस्थळावर प्रसिध्द करणेस मान्यता असावी.

तरी सदरहू प्रस्तावास मान्यता मिळणेस विनंती.

कान्हूराज बगाटे (भा.प्र.से)
**मुख्य कार्यकारी अधिकारी**
श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी.

विषय क्र.- ८५



## मा.तदर्थ (Ad.hoc) समितीचे सभेपुढे निर्णयार्थ सादर
## पाणी पुरवठा विभाग

टिपणी-

**विषय:-** सन २०२२-२०२३ करीता बारा महिन्याचे कालावधीसाठी पाणी पुरवठा विभागास पाणी शुध्दीकरणासाठी आवश्यक ब्लीचिंग पावडर, फेरीक ॲलम व क्लोरीन गॅस सिलेंडर खरेदी करणेस व त्यासाठी येणारे खर्चास मान्यता मिळणेबाबत...

सविनय सादर,

**श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी अधिनियम २००४ मधील तरतूद:-**

| अ.नं. | कलम/ तरतुद क्र. | कलम/ तरतुदीचे शीर्षक | पोटकलम/ उपकलम क्र. | तरतूद |
|---|---|---|---|---|
| ०१ | १७ | समितीची कर्तव्ये व अधिकार | १ | राज्य शासनाच्या कोणत्याही सर्वसाधारण किंवा विशेष आदेशास अधीन राहून संस्थान विश्वस्तव्यवस्थेच्या मालमत्तेची व कामकाजाची कार्यक्षमतेने व्यवस्था पाहणे, मंदिरामध्ये रुढी व प्रथेनुसार धार्मिक विधी पूजा-अर्चा, समारंभ व उत्सव आयोजित करण्यासाठी आणि पार पाडण्यासाठी योग्य ती व्यवस्था करणे, **भक्तगणांना आवश्यक त्या सोयी व सुविधा उपलब्ध करुन देणे** आणि या अधिनियमान्वये विश्वस्तव्यवस्थेचा कारभार ज्या प्रयोजनार्थ चालवावयाचा आहे, ती उद्दीष्टे साध्य करण्यासाठी विश्वस्तव्यवस्थेचे उत्पन्न कामी लावणे, ही समितीची कर्तव्ये असतील. |
| ०२ | १७ | समितीची कर्तव्ये व अधिकार | २ (झ) | सर्वसाधारणपणे, विश्वस्तव्यवस्थेची मालमत्ता व तिचे कामकाज यांचे योग्य प्रकारे व्यवस्थापन, देखभाल व प्रशासन करण्याच्या प्रयोजनांसाठी आवश्यक असतील अशा सर्व गोष्टी करील. |
| ०३ | १७ | समितीची कर्तव्ये व अधिकार | ६ | या अधिनियमाच्या तरतुदीस अधीन राहून, समितीला या अधिनियामाखालील आपली कर्तव्ये व कामे पार पाडण्यासाठी आवश्यक ते सर्व अधिकार असतील. |

**प्रस्तावना:-**

संस्थानकरीता श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था शिर्डी, कनकुरी व पिंपळवाडी या संयुक्त पाणी पुरवठा योजनेच्या मौजे कनकुरी हद्दीतील पाणी साठवण तलावातुन पाणी पुरवठा करणेत येत आहे. या ठिकाणी पाणी साठविणेसाठी चार साठवण तलावांची निर्मिती करणे आलेली असून, सदरहू चार साठवण तलावांची एकुण पाणी साठवण क्षमता ३११ एम.एल.(द.ल.लिटर) इतकी आहे. सदर साठवण तलावात जलसंपदा (इरिगेशन) विभागाकडुन गोदावरी/दारणा नदी, गोदावरी उजवा तट कालवा याव्दारे शासन मंजुरीनुसार पाणी पुरवठा आवर्तन देण्यात येत आहे. याबाबत नाशिक पाटबंधारे विभाग, नाशिक यांचेकडुन ५३.३२०५ एम.सी.एफ.टी वार्षिक पाणी साठा मंजुर आहे.

संस्थानचे मौजे कनकुरी, ता.राहाता येथे साठवण तलावालगत जलशुध्दीकरण केंद्र असून, साठवण तलावातील पाणी शुध्द करणेसाठी ब्लीचिंग पावडर (विक्रम ब्रॅन्ड, ग्रासिम मेक, आय.एस.आय मार्क, ३४% क्लोरीन उपलब्ध), फेरीक ॲलम (१६% ॲलोमिना फेरीक उपलब्ध) व क्लोरीन गॅस सिलेंडर यांची दैनंदिन आवश्यकता भासते.

सन २०२०-२०२१ करीता साठवण तलावातील पाणी शुध्दीकरणांसाठी आवश्यक ब्लीचिंग पावडर, फेरीक ॲलम व क्लोरीन गॅस सिलेंडर इ. साहित्य ई-निविदा मागवून खरेदी विभागामार्फत खरेदी करणेस व त्यासाठी येणारे अंदाजे **रु.२१,८७,५००/-** मात्रचे खर्चास मान्यता मिळणेसाठी प्रस्ताव मा.तदर्थ (Ad-hoc) समितीचे दि.१३/०६/२०२० रोजीचे सभेत प्रस्ताव सादर करणेत आलेला होता.

यावर मा.तदर्थ (Ad-hoc) समिती सभा दि. १३/०६/२०२०, निर्णय क्रं.३९९ खालीलप्रमाणे पारित करणेत आलेला होता. "... यावर सिवतर चचा होऊन, पाणी शुध्दीकरणासाठी माहे- सप्टेंबर -२०२० ते ऑगस्ट २०२१ या बारा महिन्याचे कालावधीसाठी आवश्यक ब्लीचिंग पावडर, फेरीक ॲलम व क्लोरीन गॅस सिलेंडर खरेदी करणेकामी विहीत पध्दतीने ई-निवीदा प्रक्रीया राबविणेस व याकामी येणा-या अंदाजे रक्कम रु.२१,८७,५००/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली.."

याबाबत मा.तदर्थ (Ad-hoc) समिती सभा दि.११/१२/२०२० रोजीचे सभेतील निर्णय क्र. ४७० अन्वये खालील दराने नमूद पुरवठाधारकांना एक वर्ष कालावधीसाठी पुरवठा आदेश देणेत आलेला आहे.

| अ.क्र | पुरवठादार | पुरवठा आदेश क्र. | मागणी | मंजूर दर |
|---|---|---|---|---|
| ०१ | मे. हितु जीतु एंटरप्रायजेस, मुंबई | खरेदी/३२६२/२०२१, दि.२५/०१/२०२१ | ३५ मे.टन | ब्लिचिंग पावडर रु.२६,०५०/- प्रती मे. टन (जी.एस.टी. सह) |
| ०२ | मे. यश केमिकल्स, नाशिक | खरेदी/३२१३/२०२१, दि.२१/०१/२०२१ | ५५ मे.टन | फेरीक ॲलम रु.७,८००/- प्रती मे. टन (जी.एस.टी. सह) |
| ०३ | मे. जी. एस. कमर्शियल कार्पोरेशन, नाशिक | खरेदी/३२२९/२०२१, दि.२२/०१/२०२१ | ५० सिलेंडर | रु.४,२५०/- प्रती सिलेंडर (जी.एस.टी. सह ) |

उपरोक्त नमूद पुरवठा कालावधी माहे-जानेवारी-२०२२ अखेर असुन त्यानंतर पुढील कालावधीसाठी नव्याने खरेदी प्रक्रिया राबवावी लागणार आहे.

पाणी शुध्दीकरणांसाठी आवश्यक ब्लिचींग पावडर, फेरीक ॲलम व क्लोरीन गॅस सिलेंडर करीता सन २०१८-१९ या वार्षिक टेंडरचे कालावधीत झालेल्या खर्चाचा तपशिल.

| अ. नं | तपशिल | ऑगस्ट -२०१८ सुरवातीची विभागाकडील शिल्लक | ऑगस्ट-२०१८ ते ऑगस्ट -२०१९ मागणी करण्यात आलेले मटेरीयल | एकुण | माहे ऑगस्ट - २०१९ अखेर खर्च | विभागाकडील शिल्लक ऑगस्ट - २०१९ अखेर |
|---|---|---|---|---|---|---|
| ०१ | ब्लिचींग पावडर | ०.५७५ मे.टन | ३४.७५० मे.टन | ३५.३२५ मे.टन | ३०.५५० मे.टन | ४.७७५ मे.टन |
| ०२ | फेरीक ॲलम | ३.०६० मे.टन | ५४.९२० मे.टन | ५७.९८० मे.टन | ४९.९६० मे.टन | ८.०२० मे.टन |
| ०३ | क्लोरीन गॅस सिलेंडर (प्रत्येकी १०० किलो वजन) | ०२ सिलेंडर | ५१ सिलेंडर | ५३ सिलेंडर | ४६ सिलेंडर | ०७ सिलेंडर |

पाणी शुध्दीकरणांसाठी आवश्यक ब्लिचींग पावडर, फेरीक ॲलम व क्लोरीन गॅस सिलेंडर करीता सन २०१९-२० या वार्षिक टेंडरचे कालावधीत झालेल्या खर्चाचा तपशिल.

| अ.नं | तपशिल | सप्टेंबर-२०१९ सुरवातीची विभागाकडील शिल्लक | सप्टेंबर-२०१९ पासुन नविन टेंडरचे मागणी करण्यात आलेले मटेरीयल | एकुण | खर्च | विभागाकडील शिल्लक |
|---|---|---|---|---|---|---|
| ०१ | ब्लिचींग पावडर | ४.७७५ मे.टन | ३४.००० मे.टन | ३८.७७५ मे.टन | ३७.९७५ मे.टन | ०.८००मे.टन (मार्च २०२१ अखेर) |
| ०२ | फेरीक ॲलम | ८.०२० मे.टन | ४८.८०० मे.टन | ५६.८२० मे.टन | ५५.४०० मे.टन | १.४२० मे.टन (फेब्रुवारी २०२१ अखेर) |
| ०३ | क्लोरीन गॅस सिलेंडर (प्रत्येकी १०० किलो वजन) | ०७ सिलेंडर | ४९ सिलेंडर | ५६ सिलेंडर | ५३ सिलेंडर | ०३ सिलेंडर (२४, जाने. २०२१ ) |

कनकुरी साठवण तलाव येथे पाणी शुध्दीकरणांसाठी आवश्यक ब्लिचींग पावडर, फेरीक ॲलम व क्लोरीन गॅस सिलेंडर करीता सन २०२१-२२ या वार्षिक टेंडरचे कालावधीत दि. ३० जुन, २०२१ अखेर झालेल्या खर्चाचा तपशिल खालीलप्रमाणे आहे.

| अ.नं | तपशिल | मागिल टेंडरचे विभागाकडील सुरवातीची शिल्लक | सन २०२१-२२ चे टेंडरचे मागणी करण्यात आलेले मटेरीयल | दि. ३० जुन, २०२१ अखेर खर्च | विभागाकडील शिल्लक ३०जुन, २०२१ अखेर | मागणी येणे बाकी (जाने-२०२२ अखेर वापर) |
|---|---|---|---|---|---|---|
| ०१ | ब्लीचिंग पावडर | ०.८०० मे.टन (०१ एप्रिल २०२१ ) | ७.५०० मे.टन | ६.१५० मे.टन | २.१५० मे.टन | २७.५०० मे.टन |
| ०२ | फेरीक ॲलम | १.४२० मे.टन (०१, मार्च २०२१ ) | २०.०००मे.टन | १२.५२० मे.टन | ८.९०० मे.टन | ३५.००० मे.टन |
| ०३ | क्लोरीन गॅस सिलेंडर (प्रत्येकी १०० किलो वजन) | ०३ सिलेंडर (२५, जाने. २०२१ ). | १६ सिलेंडर | १८ सिलेंडर | ०१ सिलेंडर | ३४ सिलेंडर |

माहे एप्रिल ते जुलै या कालावधीत जलसंपदा (पाटबंधारे) विभागाकडुन पुरविण्यात येणारे पाणी हे जादा प्रमाणात दुषित, गाळ मिश्रीत व पाण्याला वास येत असलेने या कालावधीत पाणी शुध्दीकरणांसाठी जादा प्रमाणात मटेरियलचा वापर करावा लागतो. सध्या कोरोनाचे प्रादुर्भावामुळे लॉकडाऊन असलेने पाणी शुध्दीकरणांसाठी मटेरियलचा वापर कमी प्रमाणात होत आहे, परंतु मंदिर सुरू झालेवर सदर मटेरियलचा वापर वाढवावा लागणार आहे. उपरोक्त नमूद पुरवठा कालावधी माहे-जानेवारी-२०२२ अखेर असुन त्यानंतर पुढील कालावधीसाठी नव्याने खरेदी प्रक्रिया राबवावी लागणार आहे.

3/-

**प्रस्ताव:-**

सन २०२२-२०२३ करीता १२ (बारा) महिन्यांचे कालावधीसाठी पाणी शुध्दीकरण करणेकामी आवश्यक ब्लीचिंग पावडर, फेरीक ॲलम व क्लोरीन गॅस सिलेंडर इ. मटेरियलचा तपशिल खालीलप्रमाणे आहे.

| अ.नं. | खरेदी करावयाच्या साहित्याचा तपशिल | आवश्यकता | अंदाजे दर (GST18%सह) | एकुण रक्कम |
|---|---|---|---|---|
| ०१ | ब्लीचिंग पावडर (विक्रम ब्रॅन्ड, ग्रासिम मेक, आय.एस.आय मार्क, ३४% क्लोरीन उपलब्ध) | ३५ मे.टन | रु.३४,५००/- प्रती मे.टन (सर्वसमावेशक दर) | १२,०७,५००/- |
| ०२ | फेरीक ॲलम (१६% ॲलोमिना फेरीक उपलब्ध) | ५५ मे.टन | रु. १२,००० /- प्रती मे.टन (सर्वसमावेशक दर) | ६,६०,०००/- |
| ०३ | क्लोरीन गॅस सिलेंडर (प्रत्येकी १०० किलो वजन) | ५० सिलेंडर | रु.६,५०० प्रती सिलेंडर (सर्वसमावेशक दर) | ३,२५,०००/- |
| | **(अक्षरी रुपये एकवीस लाख ब्यान्नव हजार पाचशे मात्र)** | | **एकुण रक्कम:-** | २१,९२,५००/- |

**विभागाचा अभिप्राय:-**

श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी अधिनियम २००४ नुसार वरील नमुद तरतुदीस अनुसरुन मा.व्यवस्थापन समितीची मान्यता घेवून खरेदी विभागामार्फत सन २०२२-२०२३ करीता १२ (बारा) महिन्यांचे कालावधीसाठी पाणी शुध्दीकरणांसाठी आवश्यक ब्लीचिंग पावडर, फेरीक ॲलम व क्लोरीन गॅस सिलेंडर खरेदी करणेसाठी ई-निविदा प्रक्रिया राबवून मटेरियल खरेदी करता येईल असे नम्र मत आहे.

वरील नमुद केलेनुसार पाणी शुध्दीकरणांसाठी आवश्यक मटेरियल खरेदी करणेसाठी अंदाजे **रु. २१,९२,५००/-**मात्र **(अक्षरी रुपये एकवीस लाख ब्यान्नव हजार पाचशे मात्र)** खर्च अपेक्षित आहे. तरी सदरचे साहित्य ई-निविदा मागवून विहित पध्दतीने खरेदी विभागामार्फत खरेदी करणेस व त्यासाठी येणारे अंदाजे **रु. २१,९२,५००/- (अक्षरी रुपये एकवीस लाख ब्यान्नव हजार पाचशे मात्र)** मात्रचे खर्चास मान्यता मिळणेसाठी निर्णय होणेस विनंती..

(कान्हुराज बगाटे, भा.प्र. से.)
**मुख्य कार्यकारी अधिकारी,**
श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिरडी

विषय क्र.- ९६

मा.तदर्थ समितीचे सभेपुढील विषय.
मंदिर विभाग.



**विषय –श्रींचे दर्शनासाठी येणारे मान्यवर व देणगीदार साईभक्त तसेच सेवानिवृत्त कर्मचा-यांचे सत्कारासाठी लागणा-या शॉल्स खरेदी विभागामार्फत खरेदी करणेबाबत...**

टिपणी.

**मा.व्यवस्थापन समितीचे दि.०८/०१/२०१९ रोजीचे सभेतील आयत्या वेळेचा विषय नं. १८, निर्णय** क्र.३३ - " यावर सविस्तर चर्चा होऊन, श्रींचे दर्शनासाठी येणारे व्हीआयपी व देणगीदार साईभक्तांचे सत्कारासाठी देणगीदार साईभक्त श्री.के.बालासारावणन, ईरोडे, मॅनेजिंग डायरेक्टर, साई लोगबाला (ओपीसी) प्रा.लि., ईरोडे, तामिळनाडू यांचेकडून श्री साईबाबांचा फोटो व श्री साईबाबा संस्थानचे नाव असलेल्या शॉल्स देणगी स्वरुपात स्विकारणेस, तसेच श्री.बालासारावणन यांना वर्षातून ५ ते ६ वेळा त्यांचे मागणीप्रमाणे आरतीचे सशुल्क पासेस प्राधान्याने उपलब्ध करुन देण्यास मान्यता देण्यात आली. "

प्रस्तावना -श्रींचे दर्शनासाठी जगभरातून मान्यवर व देणगीदार साईभक्त मोठया संख्येने शिर्डीत येत असतात. त्यांचे दर्शनाची व्यवस्था जनसंपर्क कार्यालयामार्फत करणेत येते. मान्यवर व देणगीदार साईभक्तांचा जनसंपर्क कार्यालय व वरिष्ठ अधिकारी यांचे निर्देशानुसार मंदिरात व्हीआयपी कक्षात मुर्ती व शॉलदेऊन यथोचित सत्कार करणेत येतो. (सध्यस्थितीत कोव्हीड-१९ मुळे मंदिरातील सत्कार बंद आहेत.) आता सध्या कोव्हिड-१९ मुळे देणगीदार व मान्यवर साईभक्तांचे सत्कार हे 'साईसभागृह हॉल' (0-नंबर) येथे वरीष्ठांचे हस्ते करण्यात येतात. तसेच संस्थानचे आस्थापनेवरील स्थायी कर्मचारी सेवानिवृत्त होत असतात. अशा सेवानिवृत्त होणा-या कर्मचा-यांचा आस्थापना विभागामार्फत मा.मुख्य व उपमुख्य कार्यकारी अधिकारी यांचे हस्ते श्रींची मुर्ती व शॉल देऊन सत्कार करणेत येतो.करीता सत्कारासाठी लागणा-या शॉल व मुर्ती मंदिर विभागामार्फत संबंधीत विभागांना पुरविण्यात येतात.

यापुर्वी समाधी मंदिर दर्शनार्थ खुले असताना (लॉकडाऊन होणेपुर्वीचे कालावधीत) देणगीदार,महत्वाचे व अतीमहत्वाचे मान्यवरव इ. साईभक्तयांचे सत्कारासाठी दैनंदिन खर्ची रजिष्टरनुसार साधारण सरासरी १५० ते २०० शॉल्स प्रती महिन्यास लागतात. सदरहू सत्कारासाठी लागणा-या शॉल्स साईभक्त श्री.के.बालासारावणन, ईरोडे, तामिळनाडु यांचेकडुन उपरोक्त संदर्भिय निर्णयानुसार देणगी स्वरुपात स्विकारणेत आल्या होत्या. देणगीदार यांनी सन २०१९ मध्ये एकूण २९८० नग शॉल्स (रु.२३०/-प्रती नग) व ३२०० नग पट्टे (रु.५५/- प्रती नग) देणगी स्वरुपात दिलेले आहे. आजतागायतपर्यंत सदरहू स्विकारण्यात आलेल्यादेणगी शॉल्स व पट्टे वापरणेत आलेल्या असून, आता मंदिर विभागाकडे देणगी शॉल्स शिल्लक राहिलेले नसून ११०० नग पट्टे शिल्लक आहेत.

त्यानुसार मान्यवरांचे सत्कारासाठी ई-निविदा प्रक्रीयेव्दारे खरेदी विभागामार्फत कार्यवाही होऊन एकूण २४०० नग शॉल खरेदी करणेबाबत प्रस्ताव सादर करणेत आला होता. परंतु सदरहू प्रस्तावावर मा.उप मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी " ५ लाख रु..चे आतील **खर्चाच्या शॉल घेणे योग्य राहील असे मत आहे "**, असे निर्देश दिले आहे.

उपरोक्त मा.वरीष्ठांचे निर्देशानुसार यापुर्वीच्या असलेल्या सत्कार शॉल्सचे नमुनानुसार आवश्यक शॉल्सचा तपशिल खालीलप्रमाणे -

| तपशिल | साईज | आवश्यक नग |
|---|---|---|
| शॉल –प्रिंटेड<br>(अल्ट्रा सॅटीन चमकदार पांढरे रंगाचे कापड, त्यावर डिजीटल प्रींटसह – श्रींचा फोटोसह) | ३६" x ८०" | २००० नग |

अभिप्राय – मा.वरीष्ठांचे निर्देशानुसार श्रींचे दर्शनासाठी येणारे मान्यवर व देणगीदार साईभक्त तसेच सेवानिवृत्त कर्मचा-यांचे सत्कारासाठी पुढील आर्थिक वर्ष सन २०२१-२०२२ करीता २००० नग शॉल्स खरेदी करता येईल. त्याअनुषंगाने एकूण २००० नगास अंदाजे रु.२५०/- याप्रमाणे एकूण रु.५,००,०००/- (अक्षरी रुपये पाच लाख मात्र) मात्र खर्च अपेक्षित आहे. तरी सन २०२१-२०२२ या वर्षाकरीता मान्यवरांचे सत्कारासाठी नमुद केलेप्रमाणे शॉल्स खरेदी करावयाचे झाल्यास ई-निविदा प्रक्रीयेव्दारे खरेदी विभागामार्फत कार्यवाही करता येईल तसेच आता तूर्त सध्या मान्यवरांचे सत्कारासाठी शिल्लक पट्टे वापरता येईल, असे नम्र मत आहे. याआधी इकडील विभागामार्फत शॉल खरेदी प्रस्तावास मान्यता घेऊन पुढील कार्यवाहीसाठी खरेदी विभागाकडे वर्ग करण्यात आला असता, त्यांनी सदरहू खर्चास मा.तदर्थ समितीची मान्यता घेऊन देण्यात यावा, असे कळविण्यात आलेले आहे.

**प्रस्ताव -तरी उपरोक्त प्रस्तावात नमुद केलेनुसार श्रींचे दर्शनासाठी येणारे मान्यवर व देणगीदार साईभक्त तसेच सेवानिवृत्त कर्मचा-यांचे सत्कारासाठी लागणा-या शॉल्स खरेदी विभागामार्फत खरेदी करणेस व त्याकामी येणारे अंदाजे एकूण रु. ५,००,०००/- (अक्षरी रुपये पाच लाख) मात्रचे खर्चास मान्यता मिळणेकामी निर्णयास्तव सविनय सादर.**

६/३/२१

(कान्हूराज बगाटे,भा.प्र.से.)
मुख्य कार्यकारी अधिकारी,
श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी.

विषय क्र.- ८७

मा.तदर्थ समितीचे सभेपुढील विषय

मंदिर विभाग.



टिपणी.

विषय – समाधी मंदिर गाभा-यातील श्रींचे समकालीन साईभक्तांचे खराब / जिर्ण झालेले फोटोंचे चावडी मंदिरातील फोटोप्रमाणे अत्याधुनिकरण, नुतनीकरण करणेकामी साईभक्त श्री.श्रीकांत किशोर जाधव, शिर्डी यांना विनामुल्य सेवा करण्याची संधी देणेस मान्यता मिळणेबाबत...

संदर्भ – १) मा.तदर्थ समितीचे दि.११/१२/२०२० रोजीचे सभेतील विषय नं.७०, निर्णय क्र.५२३

२) साईभक्त श्री.श्रीकांत किशोर जाधव, शिर्डी यांचा दि.२६/०२/२०२१ रोजीचा अर्ज.

मा.तदर्थ समितीचे दि.११/१२/२०२० रोजीचे सभेतील विषय नं.७०, निर्णय क्र.५२३ " यावर सविस्तर चर्चा होऊन, साईभक्त श्री.विनोद जाधव, मुंबई यांनी श्रींचे चावडी मंदिरातील खराब, जीर्ण झालेले देवी-देवतांचे फोटोंची कलर प्रिंट काढून वॉटरप्रुफ सनबोर्डवर आधुनिक पध्दतीने फोटो फ्रेम करुन ते देणगी स्वरुपात देण्यात तयार दर्शविलेली असल्याने सदर देवी-देवतांचे फोटो फ्रेम त्यांचेकडुन देणगी स्वरुपात स्विकारणेस व देणगीदार यांना आभारपत्र देणेस तसेच देणगीदार यांनी नव्याने आधुनिक पध्दतीने तयार करुन देणगी स्वरुपात दिलेले देवी-देवतांचे फोटो श्रींचे चावडी मंदिरात बसविणेस मान्यता देणेत आली. "

प्रस्तावना - उपरोक्त विषयांकीत संदर्भिय क्र.२ चे पत्रान्वये साईभक्त श्री.श्रीकांत किशोर जाधव, शिर्डी (मो.नं.९३२०४७४७९५) यांनी " सध्या आपले संस्थानचे सीसीटीव्ही विभागामध्ये Video Editing, Online Scrolling देखभाल / दुरुस्ती संबंधीत कामे तसेच प्रकाशने विभागाकरीता श्रींचे मंदिर व संस्थान परीसरातील QR code करीता Video Editing / Design संबंधीत असलेली कामे मी विनामुल्य केली आहे. सदरहू कामाची मुदत आता फेब्रुवारी मध्ये संपत आलेली आहे.

आता सध्या मंदिर विभागाचे चावडी मंदिरातील लावलेली देवी-देवतांचे फोटो खराब/जीर्ण झाल्याने ते आम्ही नव्याने अत्याधुनिक पध्दतीने नुतनीकरण करुन देणगी स्वरुपात दिलेली असून चावडी मंदिरात लावण्यात आलेली आहे. त्याच धर्तीवर समाधी मंदिर गाभा-यातील श्रींचे समकालीन साईभक्तांची लावलेली फोटो बरेच वर्ष झाल्याने खराब/ जीर्ण होत आलेली आहे. सदरहू फोटो चावडीतील फोटोप्रमाणे आधुनिकीकरण / नुतनीकरण करणेसाठी मी विनामुल्य सेवा देण्यास तयार आहे." अशी विनंती केलेली आहे.

विभागाचा अभिप्राय – अर्जदार श्री.श्रीकांत किशोर जाधव, शिर्डी यांनी संस्थानचे परीसरातील सर्व ठिकाणचे व्हिडीओ शुटींग, फोटोग्राफी संकलित करुन त्याची Documentry Film तयार करणेकामी तसेच प्रकाशने विभागाकरीता मंदिर व संस्थानचे विविध विभागातील QR code करीता video editing, Design संबंधीत कामेही करणेकामी अर्जदार यांनी विनामुल्य सेवा दिलेली आहे. फेब्रुवारी अखेर त्यांची मुदत संपलेली आहे.

तसेच संदर्भिय क्र.१ चे मा.तदर्थ समितीचे दि.११/१२/२०२० रोजीचे सभेतील निर्णय क्र.५२३ अन्वये सध्या श्रींचे चावडी मंदिरातील असलेले देव-देवीतांचे फोटो अत्याधुनिक पध्दतीने नुतनीकरण करुन आकर्षक बनविणेत येऊन श्री.जाधव यांनी देणगी स्वरुपात दिले असून ते चावडी मंदिरात बसविणेत आलेले आहे. मा.तदर्थ समितीचे निर्णयानुसार श्री.जाधव यांना जा.नं.एसएसएस/वशी-मंदिर/३३०४२०२१ दि.२८/०१/२०२१ अन्वये आभारपत्रही देणेत आलेले आहे.

तसेच चावडीतील फोटोंप्रमाणेच त्याच पध्दतीने समाधी मंदिर गाभा-यातील श्रींचे समकालीन भक्तांचे फोटो बरेच कालावधी झालेला असलेने खराब व जीर्ण झालेले आहे. चावडी मंदिरातील फोटोप्रमाणेच समाधी मंदिर गाभा-यातील फोटोंचे नुतनीकरण केल्यास ते आकर्षक दिसेल व फोटोंचे आयुष्यमानही वाढेल. त्याकामी श्री.श्रीकांत जाधव यांना फोटोग्राफी मध्ये अनुभव असलेने सीसीटीव्ही विभागाप्रमाणेच इकडील विभागाकडे ०२ महिने विनामुल्य सेवा करणेस परवानगी मिळाल्यास, त्यांचेमार्फत सदरचे फोटोंचे नुतनीकरण करुन घेता येईल, असे नम्र मत आहे.

त्यानुसार श्री.श्रीकांत जाधव यांचेकडून सदरहू समाधी मंदिरातील श्रींचे समकालीन साईभक्तांचे फोटोंचे नुतनीकरण करण्याचे काम विनामुल्य करणेस मान्यता मिळणेकामी इकडील विभागामार्फत प्रस्ताव सादर करणेत आला होता, सदरहू प्रस्तावावर मा.मुख्य कार्यकारी अधिकारी सो. यांनी " मा.व्यवस्थापन समितीचे समोर ठेवावे ", असे निर्देश दिलेले आहे.

प्रस्ताव –तरी अर्जदार श्री.श्रीकांत जाधव, शिर्डी यांनी केलेल्या विनंती नुसार चावडी मंदिरातील देव-देवीतांचे फोटोंचे नुतनीकरणा प्रमाणेच समाधी मंदिर गाभा-यातील असलेले श्रींचे समकालीन साईभक्तांचे जीर्ण व खराब झालेले फोटोंचे श्री.जाधव यांचेकडून विनामुल्य कलर प्रिंट काढून वॉटरप्रुफ सनबोर्डवर अत्याधुनिक, आकर्षक पध्दतीने फ्रेम करुन नुतनीकरण करणेस मान्यता मिळणेकामी सदरहू प्रस्तावावर निर्णय होणेस विनंती.

(कान्हूराज बगाटे, भा.प्र.से.)
मुख्य कार्यकारी अधिकारी,
श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी.

विषय क्र.- ८६



## मा.तदर्थ (Ad-hoc) समितीचे सभेपुढे निर्णयार्थ सादर
## विभागाचे नांव :- विदयुत विभाग

**विषय :- श्री साईनाथ रुग्णालयाचे वाढीव तिस-या मजल्याकरीता आणलेल्या केबल ऑक्सिजन प्लान्टकरीता वापरण्यात आलेल्या असल्याने आता वाढीव तिस-या मजल्यावरील इलेक्ट्रीकल लोडला सप्लाय देणेकरिता २४० स्क्वेअर एम.एम.ची इलेक्ट्रीकल केबल, पितळी फ्लॅंज टाईप केबल ग्लॅन्ड, अॅल्युमिनियम लग्जची खरेदी करणेकामी येणा-या खर्चास तसेच दरपत्रके मागविणे, संस्थानचे वेबसाईटवर दरपत्रक नोटीस प्रसारीत करणेबाबत ....**

**प्रस्तावना :-** अधिनियम २००४ मधील तरतूद क्र.२१-१ (क) नुसार समितीकडून विश्वस्तव्यवस्था निधीचा विनियोग पुढील सर्व किंवा त्यापैकी कोणत्याही एका प्रयोजनासाठी करण्यात येईल:-
(क). मंदिराची व विश्वस्तव्यवस्थेच्या मालमत्तांची देखभाल, व्यवस्थापन व प्रशासन.

शासन निर्णय परिच्छेद क्र. ३.२.३ मध्ये सुधारणा करुन दरपत्रकाच्या आधारे करण्यात येणा-या खरेदीची आर्थिक मर्यादा रु.३ लाखावरुन(रु. ३,००,०००/-) रु. १० लाखापर्यंत (रु. १०,००,०००/-) सर्व कर अंतर्भूत करुन वाढविण्याचा निर्णय घेतला आहे.

वरील अधिनियमास व शासन निर्णयास अनुसरुन खालीलप्रमाणे प्रस्ताव सादर करीत आहोत.

**प्रस्ताव :-** कोव्हिड-१९ या साथ रोगाचे रूग्णांना श्री साईनाथ रूग्णालयात पुढील उपचार देण्याचे ठरलेले असल्याने श्री साईनाथ रुग्णालयासाठी १२०० LPM क्षमतेचा ऑक्सिजन प्लान्ट तातडीने उभारण्याचे ठरले. वरील संदर्भीय पत्रानुसार श्री साईनाथ रुग्णालयामार्फत सदर प्लान्टचे २१० केडब्ल्यु इलेक्ट्रीक लोड असलेबाबत व त्याकरीता इलेक्ट्रीक केबल टाकून ऑक्सिजन प्लॅन्टला इलेक्ट्रीक सप्लाय देणेबाबत कळविणेत आले होते.

ऑक्सिजन प्लान्ट तातडीने चालू करावयाचा असल्याने त्याकरीता आवश्यक असलेली २४० स्क्वेअर एम.एम.ची केबल विद्युत विभागाचे सबस्टोअरला तसेच भांडार विभागाकडे शिल्लक नसल्याने श्री साईनाथ रुग्णालयाचे वाढीव तिस-या मजल्यामधील ICCU ऑपरेशन थिएटर व इतर इलेक्ट्रीक लोडसाठी सप्लाय देणेकरीता आणलेल्या केबलमधून २४० स्क्वेअर एम.एम.ची केबल घेऊन ऑक्सिजन प्लान्ट करीता तातडीने टाकून घेऊन इलेक्ट्रीक सप्लाय जोडण्यात आलेला आहे. आता श्री साईनाथ रुग्णालयामधील वाढीव तिस-या मजल्याचे कामही अंतिम टप्प्यात असल्याने तेथेही इलेक्ट्रीक केबल टाकून विद्युतपुरवठा करावा लागणार आहे. त्याकरीता सदरचे ठिकाणी २४० स्क्वेअर एम.एम.ची इलेक्ट्रीक केबल टाकून घ्यावी लागणार आहे. याकरीता आवश्यक असणारी इलेक्ट्रीकल केबल, कनेक्शनसाठी लग्ज, पितळी फ्लॅन्ज टाईप केबल ग्लॅन्ड खरेदी करावी लागणार आहे.

**मागणी :-** श्री साईनाथ रुग्णालयाचे वाढीव तिस-या मजल्यावरील इलेक्ट्रीकल लोडला सप्लाय देणेसाठी इलेक्ट्रीकल केबल, पितळी फ्लॅन्ज टाईप केबल ग्लॅन्ड, अॅल्युमिनियम लग्जची खरेदी ही दरपत्रके मागवुन करावी लागणार आहेत. सदर मटेरीयलचे दराकरीता बाहेरील दुकानदारांकडून ई-मेलव्दारे दरपत्रक घेऊन त्यांनी दिलेल्या दरांचे सरासरी प्रमाणे प्रती अॅटमच्या दरानुसार खर्चाचा तपशिल खालीलप्रमाणे तयार करण्यात आलेला आहे.

| Sr.No. | Description | Qty | Rate Rs | Amount Rs |
|---|---|---|---|---|
| 01) | Supplying XLPE armoured cable 3½ core 240 sq.mm.aluminium conductor with continuous 12.97 sq.mm.(8 SWG) G.I. earth wire complete erected with glands & lugs on wall/ trusses/pole or laid in provided trench/ pipe as per specification no. CB-LT/AL | 660 Mtrs. | 1149/- | 7,58,340/- |
| 02) | Supplying Flange type brass cable glands for 3½ core 240 sq.mm.for XLPE armoured cable as per specification no.CB-CL/3½ | 10 Nos. | 770/- | 7,700/- |
| 03) | Supplying crimping type aluminium lugs for cable 240 sq.mm.complete specification no.CB-CL/AL | 40 Nos. | 86/- | 3,440/- |
| | | | Total Rs :- | 7,69,480/- |

२/-

E/c Meeting-191





**विभागाचा अभिप्राय स्पष्ट / मत :-**

उपरोक्तप्रमाणे श्री साईनाथ रुग्णालयाचे वाढीव तिस-या मजल्याकरीता आणलेल्या केबल ऑक्सिजन प्लान्टकरीता वापरण्यात आलेल्या असल्याने आता वाढीव तिस-या मजल्यावरील इलेक्ट्रीकल लोडला सप्लाय देणेसाठी इलेक्ट्रीकल केबल, पितळी फ्लॅन्ज टाईप केबल ग्लॅन्ड, ॲल्युमिनियम लग्जची खरेदी करणेकामी येणा-या रक्कम रुपये ७,६९,४८०/- इतक्या खर्चास तसेच सदरची खरेदी करणेकरीता बाहेरील ठेकेदार यांना पोस्टाव्दारे दरपत्रके पाठविणेस तसेच ई-मेलव्दारे कळविणेस व खरेदीची नोटीस संस्थानचे संकेतस्थळावर प्रसिध्द करणेकामी व दरपत्रके प्राप्त झाल्यानंतर खरेदी समितीसमोर उघडणेस मान्यता मिळणेस विनंती.

12/06/21

(कान्हूराज बगाटे, भा.प्र.से.)
मुख्य कार्यकारी अधिकारी
श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी

10.6

विषय क्र.- ८९

# मा. तदर्थ (Ad-hoc) समितीचे सभेपुढे निर्णयार्थ सादर 324

## विभागाचे नांव :- विद्युत विभाग

विषय :- श्री साईबाबा संस्थानचे भोयरे पठार (सुपा) येथे उभारणेत आलेल्या २.५ मेगावॅट (१.२५ मेगावॅट x २) पवनचक्की यंत्रणेचे वीज विक्री करणेकरीता तसेच त्यासाठी दिनांक ०१-१२-२०२१ ते दिनांक ३०-११-२०२२ या एका वर्षाचे कालावधीकरीता महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनीशी वीज विक्री करारनामा करणेकरीता मान्यता मिळणेबाबत ....

प्रस्तावना :- श्री साईबाबा संस्थानने भोयरे पठार (सुपा) याठिकाणी सन-२००७ मध्ये अपारंपारिक उर्जा श्रोतापासून विद्युत निर्मिती करणेसाठी मे.सुझलॉन एनर्जी लि. यांचेमार्फत २.५ मेगावॅट (१.२५मेगावॅटx २) चा पवनचक्की प्रकल्प उभारलेला आहे.

**दिनांक १४ ऑगस्ट २००७ रोजी दुपारी १६.०० वाजता प्रकल्प चालू करून कार्यान्वित केलेला आहे. सदर प्रकल्प उभारणीकरीता एकुण रक्कम रुपये १५,३९,६४,८००/- इतक्या रक्कमेचा कार्यादेश देण्यात आला होता. परंतू प्रत्यक्षात रक्कम रु. १४,७८,६३,४२०/- इतका खर्च झालेला आहे. तसेच याव्यतिरिक्त मे. महाराष्ट्र ऊर्जा विकास अभिकरण (मेडा), पुणे यांना सल्लागार फी (२%) रक्कम रु. २९,५७,२६८/- इतकी व मे.मिटकॉन, पुणे यांना सल्लागार फी (२.५% + टॅक्सेस) रक्कम रु. ४१,५३,४८३/- इतकी आदा करण्यात आलेली आहे. आतापर्यंत या प्रकल्पातून जून-२०२१ पर्यंत रु.२७,०१,४१,१५१/- इतके उत्पन्न झालेले आहे.**

या प्रकल्पापासून निर्माण होणारी वीज महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनीला पुरविली जाते. याकामी श्री साईबाबा संस्थान व महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी यांचेमध्ये वीज विक्रीबाबत दिनांक १९-०४-२००८ रोजी करारनामा ( PPA) करणेत आलेला होता.

सदरच्या जुन्या करारनाम्याची मुदत दि. १४-०८-२००७ या तारखेपासून पुढे १३ वर्ष होती. त्यानुसार सदर करारनाम्याची मुदत ही दिनांक १३-०८-२०२० रोजी संपत असलेबाबत मे.सुझलॉन एनर्जी लि. यांनी दिनांक ०४-०५-२०२० रोजी ई-मेलद्वारे कळविलेले होते. तसेच त्यांनी पुढील पर्याय उपलब्ध असल्याचे कळविलेले होते.

०१). पर्याय क्र. ०१:- 3rd party-With this option the generator can sell the power to the consumer having contract demand of 1 MW & above.

०२). पर्याय क्र. ०२:- Captive - It is highly recommended that generator having power consumption requirements with contract demand of 1 MW and above should consider switching to self-use of the generated power.

०३). पर्याय क्र. ०३:- Sale to MSEDCL -You can sale Power to MSEDCL for short term i.e. period from 03 Months to 12 Months.

उपरोक्त प्रमाणे मे. सुझलॉन एनर्जी लि. यांनी तीन पर्याय असल्याचे कळविले होते.

०१). पर्याय क्र. ०१ - 3rd Party हा स्विकारण्याचे झाल्यास त्याकरीता कोणत्याही एक कनेक्शनचा (ग्राहकाचा) contract demand हा १ मेगावॅट किंवा त्यापेक्षा जास्त असणे गरजेचे आहे. परंतु संस्थानचे एकही कनेक्शनचा contract demand हा १ मेगावॅट किंवा त्यापेक्षा जास्त नाही. त्यामुळे हा पर्याय आपणांस लागू होत नाही.

०२). पर्याय क्र. ०२ – Captive हा स्विकारण्याचे झाल्यास त्याकरीता ग्राहकाचा कोणत्याही एक कनेक्शनचा (ग्राहकाचा) contract demand हा 1 मेगावॅट किंवा त्यापेक्षा जास्त असणे गरजेचे आहे. तेव्हा आपण ती विज स्वत:साठी वापरु शकतो. परंतु संस्थानचे एकही कनेक्शनचा contract demand हा 1 मेगावॅट किंवा त्यापेक्षा जास्त नाही. **त्यामुळे हा पर्याय सध्या आपणांस लागू होत नाही. ( परंतू हा पर्याय आपणासाठी मंदिर परिसरातील नविन दर्शनलाईन कॉम्प्लेक्स मधील सबस्टेशन चालू झाल्यानंतर उपलब्ध होऊ शकतो.)**

०३). पर्याय क्र. ०३ - Sale to MSEDCL सध्या आपणास लागू होऊ शकतो.

त्यामुळे पर्याय क्र. ०३ - Sale to MSEDCL ०३ महिने ते १२ महिनेकरीता वीज विक्री करणेचा पर्याय स्विकारणेस व त्याकामी महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनीचे संकेत स्थळावर जाऊन ऑनलाईन ॲप्लिकेशन करणेस व सध्याचा दर हा रुपये २.५२ प्रति युनिट इतका असून तो स्विकारणेस तसेच २.५ मेगावॅट (१.२५ मेगावॅट x २) पवनचक्की यंत्रणेचा वीज विक्रीचा (पीपीए) करारनामा करणेस मान्यता मिळणेकामी सादर करण्यात आलेल्या प्रस्तावावर मा.तदर्थ (Ad-hoc) समितीचा चक्रीय पध्दतीचा ठराव दिनांक १०-०८-२०२० रोजी विद्युत विभागास प्राप्त झालेला होता.

त्यानुसार मा.तदर्थ (Ad-hoc) समितीचे निर्णयानुसार दि. १२-०८-२०२० रोजी दि. ०१-०९-२०२० ते दिनांक ३०-११-२०२० या ०३ महिन्याचे कालावधीकरीता (Short Term Power Purchase Agreement) नव्याने करारनामा करण्यात आलेला होता.

मा.तदर्थ (Ad-hoc) समितीचे निर्णयानुसार दि.१२-०८-२०२० रोजी दिनांक ०१-०९-२०२० ते दिनांक ३०-११-२०२० या ०३ महिन्याचे कालावधीकरीता (Short Term Power Purchase Agreement) करण्यात आलेल्या करारनाम्याची मुदत ही दिनांक ३०-११-२०२० रोजी संपत असल्याने पुढील करारनामा करणेकामी विद्युत विभागाचे दिनांक १२-१०-२०२०रोजीचे टिपणी अन्वये खालीलप्रमाणे प्रस्ताव सादर करण्यात आलेला होता.

*[०१]. सध्या ०१).साईआश्रम भक्तनिवास सबस्टेशन ०२). साईआश्रम भक्तनिवास ए.सी.सबस्टेशन तसेच ०३). साईबाबा भक्तनिवासस्थान (५०० रुम) सबस्टेशन एकत्रिकरण करुन उपयोग होणार नाही असे वाटते. त्यामुळे सध्या विंडमिलपासून निर्माण होणारी वीज ही महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनीला विक्री करणे हाच योग्य पर्याय (पर्याय क्र.०३ Sale to MSEDCL) आहे, असे वाटते. तरीही याबाबत मा.तदर्थ (Ad-hoc) समितीचे निर्णयातील अ.क्र.०१ नुसार संस्थान पॅनेल वरील ॲडव्होकेट, श्री.संजय आर.चौकीदार यांचेकडून प्राप्त झालेल्या अहवालानुसार कन्सल्टंटची नेमणूक झाल्यास फायदे व तोटे याबाबत स्पष्ट अभिप्राय त्यांचेकडून मिळू शकेल व त्यावर पुढील निर्णय घेणे योग्य राहील असे वाटते.*

*[०२].पर्याय क्र. ०१ Captive Open Access साठी साईआश्रम भक्तनिवास सबस्टेशन, साईआश्रम भक्तनिवास ए.सी.सबस्टेशन तसेच साईबाबा भक्तनिवासस्थान (५०० रुम) सबस्टेशन एकत्रिकरणासाठी खालीलप्रमाणे खर्च करावा लागणारा आहे.*

| अ.क्र. | खर्चाचा तपशील | एकुण खर्च |
|---|---|---|
| ०१) | एकत्रिकरणाचा खर्च | रु. ५६,६२,८७३/- |
| ०२) | महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनीचे सिक्युरिटी डिपॉझिट | रु. ६० ते ७५ लाख |
| ०३) | नविन 0.2 S Meter व 0.2 S C.T. बसविणे. | रु. १५,००,०००/- |
| | एकुण होणारा अंदाजे खर्च- | रु. १.३१ कोटी ते १.४६ कोटी |

*उपरोक्तप्रमाणे Captive Open Access साठी साईआश्रम भक्तनिवास सबस्टेशन, साईआश्रम भक्तनिवास ए.सी.सबस्टेशन तसेच साईबाबा भक्तनिवासस्थान (५०० रुम) सबस्टेशन एकत्रिकरणासाठी अंदाजे रक्कम रु. १.३१ कोटी ते १.४६ कोटी इतका अतिरिक्त खर्च करावा किंवा कसे ?*

*तसेच उपरोक्त एकत्रिकरणात व येणा-या खर्चास मा.तदर्थ (Ad-hoc) समितीची जर मान्यता मिळाली तर त्यानंतर शासन व मा. उच्च न्यायालय, औरंगाबाद यांची मान्यता घ्यावी लागणार आहे. व या एकत्रिकरणाच्या व पुढील सर्व कार्यवाहीसाठी साधारण ९ ते १० महिन्याचा कालावधी लागण्याची शक्यता आहे.*

***[०३]. साईआश्रम भक्तनिवास सबस्टेशन, साईआश्रम भक्तनिवास ए.सी.सबस्टेशन तसेच साईबाबा भक्तनिवासस्थान (५०० रुम) सबस्टेशन एकत्रिकरणाऐवजी सध्या नविन दर्शनलाईनच्या प्रकल्पाचे बांधकाम प्रगतीपथावर असून प्रकल्पाचे काम पूर्ण होण्यास ०६ ते ०८ महिन्याचा कालावधी लागणार आहे. या प्रकल्पाकरीता तसेच मंदिर परिसराकरीता आवश्यक असणारा वीज वापराचा लोड हा ३००० केव्हीए क्षमतेचा असून सदरचा लोड महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनीकडून मंजूर करुन घेण्यात आलेला असून याकरीता आवश्यक असणारे महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनीचे चार्जेस भरण्यात आलेले आहे. सदरचा प्रकल्प सुरु झाल्यानंतर मंदिर परिसरातील सबस्टेशनचा वापर हा पुर्ण क्षमतेने होणार असल्याने महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनीच्या परिपत्रकातील मुद्दा क्र.३.८ तसेच मुद्दा क्र.१५.१ नुसार कोणतीही पेनल्टी संस्थानला लागणार नाही अथवा करारनामा रद्द होऊ शकणार नाही.***

***त्यामुळे सध्या वींडमील पासून निर्माण होणा-या वीज विक्रीचा करारनामा ०९ ते १२ महिन्याचा कालावधी वाढवून घेतल्यास विंडमील पासून निर्माण होणारी वीज ही Captive Open Access व्दारे संस्थानला थेट वापरता येईल. तसेच मंदिर परिसरातील सबस्टेशनचा वीज वापर हा दर्शनलाईन प्रकल्प सुरु झाल्यानंतर पुर्ण क्षमतेने वापरता येणार असल्याने वींडमील पासून निर्माण होणारे सर्वच्या सर्व युनिट हे मंदिर परिसरातील सबस्टेशनच्या वीज बीलातून वजा होऊ शकेल. त्यामुळे वींडमील पासून निर्माण होणारे वीजेचे कोणतेही अरिरिक्त युनिट शिल्लक राहणार नाही अथवा कोणतीही पेनल्टी संस्थानला लागणार नाही किंवा करारनामा रद्द होऊ शकणार नाही. त्यामुळे साईआश्रम भक्तनिवास सबस्टेशन, साईआश्रम भक्तनिवास ए.सी.सबस्टेशन तसेच साईबाबा भक्तनिवासस्थान (५०० रुम) सबस्टेशन एकत्रिकरणासाठी अंदाजे रक्कम रु. १.३१ कोटी ते १.४६ कोटी इतका अतिरिक्त खर्च करावा लागणार नाही.***

३/-

*[०४]. त्यामुळे नविन दर्शनलाईन प्रकल्पासह मंदिर परिसरातील सबस्टेशन हे पुर्ण क्षमतेने ०६ ते ०८ महिन्याच्या कालावधीत चालू होणार असल्याने सदर सबस्टेशन चालू झाल्यानंतर त्याच्या लोडवर पुढील करारनामा करणेकरीता त्यानंतर २ ते ३ महिन्याचा कालावधी लागणार आहे. त्यामुळे आता ३ महिन्यांकरीता केलेल्या करारनाम्याची मुदत दि.३०-११-२०२० रोजी संपल्यानंतर करावा लागणारा पुढील करारनामा हा पुढील १ वर्षाकरीता म्हणजेच दिनांक ०१-१२-२०२० ते दि.३०-११-२०२१ पर्यंत करणेकरीता सदरील करारनाम्याचे अॅप्लीकेशन १ महिना अगोदर ३१ ऑक्टोबर, २०२० चे अगोदर करणे आवश्यक आहे. तसे याबाबत महावितरण कंपनीच्या Online Application For RE Short Term Power Purchase या Online Portal वर Terms & Conditions मध्ये नमूद करण्यात आले आहे. त्यानुसार सदर Application हे ३० दिवस अगोदर करावे लागणार आहे.*

उपरोक्तप्रमाणे विद्युत विभागामार्फत सादर करण्यात आलेल्या ०१ ते ०४ मुद्यावर विचार विनिमय होऊन दिनांक १२-१०-२०२० रोजी मा.तदर्थ (Ad-hoc) समितीने पर्याय क्र.०३ व ०४ यास चक्रीय पध्दतीने मंजुरी दिलेली आहे.

दिनांक १२-१०-२०२१ रोजी मिळालेले मान्यतेनुसार पर्याय क्र.०४ करीता दिनांक ०१-१२-२०२० ते दिनांक ३०-११-२०२१ पर्यंत ०१ वर्षाकरीता प्रति युनिट रु. २.५२ इतक्या दराने वीज विक्री करणेसाठी विद्युत विभागाचे दिनांक २२-१०-२०२० रोजीचे टिपणी अन्वये दिनांक २३-१०-२०२० रोजी ऑनलाईन अप्लीकेशन करण्यात येऊन दिनांक ०१-१२-२०२० ते दिनांक ३०-११-२०२१ या ०१ वर्षाचे कालावधीकरीता नव्याने करारनामा करण्यात आलेला आहे. आता सदरच्या करारनाम्याची मुदत दिनांक ३०-११-२०२१ रोजी संपणार आहे.

**तसेच दिनांक १२-१०-२०२० रोजी मा.तदर्थ (Ad-hoc) समितीने मंजुर केलेल्या पर्याय क्र.०३ नुसार कार्यवाही करणेकरीता प्रस्तावित नविन दर्शनलाईनच्या प्रकल्पाचे काम पुर्ण झालेले नाही.**

**त्यामुळे नविन दर्शनलाईन प्रकल्पासह मंदिर परिसरातील सबस्टेशन हे पुर्ण क्षमतेने ०६ ते ०८ महिन्याच्या कालावधीत चालू होणार असल्याने व सदर सबस्टेशन चालू झाल्यानंतर Captive Open Access साठी पुढील करारनामा करणेकरीता त्यानंतर २ ते ३ महिन्याचा कालावधी लागणार असल्याने दिनांक ०१-१२-२०२० ते दिनांक ३०-११-२०२१ या कालावधीत एक वर्षासाठी करण्यात आलेल्या करारनाम्याची मुदत संपल्यानंतर पुन्हा एक वर्षासाठी म्हणजेच दिनांक ०१-१२-२०२१ ते दिनांक ३०-११-२०२२ या कालावधीकरीता पुढील करारनामा करणे गरजेचे आहे.**

**मागणी** :- याकरीता सदरील करारनाम्याचे अॅप्लीकेशन १ महिना अगोदर म्हणजेच ३१ ऑक्टोबर, २०२१ रोजीचे अगोदर करणे आवश्यक असल्याचे महावितरण कंपनीच्या Online Application For RE Short Term Power Purchase या Online Portal वर Terms & Conditions मध्ये नमूद करण्यात आले आहे. त्यानुसार सदर Application हे ३० दिवस अगोदर करणेकामी तसेच दिनांक ०१-१२-२०२१ ते दिनांक ३०-११-२०२२ या एका वर्षाचे कालावधीकरीता वीज विक्री करणेचा पर्याय स्विकारणेस व त्याकामी महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनीचे संकेत स्थळावर जाऊन ऑनलाईन अॅप्लिकेशन करणेस व सध्याचा दर हा रुपये २.५२ प्रति युनिट इतका असून तो स्विकारणेस तसेच २.५ मेगावॅट (१.२५ मेगावॅट x २) पवनचक्की यंत्रणेचा वीज विक्रीचा (पीपीए) करारनामा करणेकामी मान्यता मिळणेस विनंती.

(कान्हूराज बगाटे, भा.प्र.से.)
**मुख्य कार्यकारी अधिकारी**
श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी

विषय क्र.- ६०



**मा. तदर्थ समितीचे पुढील विषय**

**विषय- शिर्डी नगरपंचायत हद्दीतील रस्त्यांच्या दैनंदिन स्वच्छता कामांचा सन २०२०-२१ चे पाहणी समिती मार्फत केलेल्या आकस्मित पहाणी अहवालाबाबत.**

**संदर्भ-** १) मा. व्यवस्थापन समिती सभा दि. १३/१२/२०१८, विषय नं. ७, निर्णय क्र. ७३४

२) जा.नं.एसएसएसटी/लेखा-अनुदान/३५१९/२०१९ दि. ०२/०३/२०१९

३) जा.नं.एसएसएसटी/लेखा-अनुदान/२८९६/२०२० दि. २३/०३/२०२०

४) मा.तदर्थ समिती सभा दि. ११/०५/२०२०, विषय नं.४५, निर्णय क्र. २७९

५) जा.नं.एसएसएसटी/लेखा-अनुदान/१३७/२०२१ दि. २२/०४/२०२१

• **श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी अधिनियम -२००४ मधिल तरतुद-**

अधिनियमाच्या कलम २१ मधिल पोटकलम (१) च्या खंड (ग) अन्वये भक्तांना देवतेच्या दर्शनासाठी व मंदिर प्रार्थनेसाठी किंवा कोणतेही धार्मिक कार्य किंवा समारंभ पार पाडणेसाठी सोयी व सुविधा पुरविणे अशी तरतुद आहे.

• **प्रास्ताविक**

**मा. व्यवस्थापन समितीच्या सभेच्या दि. १३/१२/२०१८ रोजीच्या सभेतील –**

**विषय नं. ७ - शिर्डी नगरपंचायत, शिर्डी हद्दी अंतर्गत येणा-या परिसरातील दैनंदिन स्वच्छता विषयक साफसफाईची कामे ठोक पध्दतीने करण्यासाठी शिर्डी नगरपंचायतीस रक्कम रुपये ४२,५१,५९९/- प्रमाणे प्रतिमहा अर्थसहाय्य मंजुरीचे शासन निर्णयाचे अवलोकन होणेबाबत.**

**निर्णय क्र. ७३४** – यावर सविस्तर चर्चा होऊन, विधी व न्याय विभागाकडील शासन निर्णय क्र.सासवि-१०१८/१७९/प्र.क्र.२०/का.१६ दि.०७ एप्रिल २०१८ मध्ये शासन शुध्दीपत्रक क्र. सासंवि-१०१८//१७९/प्र.क्र.२० का.१६ दि. २२/११/२०१८, अन्वये शिर्डी नगरपंचायतीच्या हद्दी अंतर्गत येणा-या परिसरातील दैनंदिन स्वच्छता विषयक साफसफाईची कामे ठोक पध्दतीने करण्यासाठी श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था शिर्डी यांच्याकडून शिर्डी नगरपंचायत,शिर्डी यांना दि. ०१/१२/२०१७ पासून दरमहा ४२,५१,५९९/- इतका निधी पुढील पाच वर्षासाठी अनुदान स्वरुपात देण्यास मान्यता देण्यात आली.

तसेच शिर्डी नगरपंचायतीस दि. ०१/१२/२०१७ ते ०३/१०/२०१८ या ११ महिने कालावधीत रक्कम रु. ३०,००,०००/- प्रतिमहा या प्रमाणे ३,३०,००,०००/- रुपये वितरीत करण्यात आलेले आहेत. शासनाचे दि. २२/११/२०१८ चे शुध्दी पत्रकानुसार दि. ०१/१२/२०१७ ते ३/१०/२०१८ या ११ महिने कालावधीतील फरकाची रक्कम रु. १,३७,५८९/- मात्रशिर्डी नगरपंचायत शिर्डी यांना अदा करणेस मान्यता देण्यात आली. सदरची कार्यवाही दि. ०१/०१/२०१९ नंतर करावी.

तथापि सदर अनुदानाचा विनियोग योग्य पध्दतीने होत आहे किंवा नाही, नगरपंचायतीने काढलेल्या निविदेतील अटी शर्ती प्रमाणे व कामाच्या व्याप्तीप्रमाणे ( Scope of Work) कार्यवाही ठेकेदाराकडून केली जाते किंवा नाही, तसेच शहरात होणा-या स्वच्छतेबाबत नागरिकांचे अभिप्राय घेणेसाठी संस्थानच्या प्रशासकीय अधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली कर्मचा-यांसह एक समिति करण्यात यावी. या समितीने सदर कामाचे दरमहा परिक्षण करावे व त्याबाबतचा सविस्तर अहवाल प्रत्येक तिमाहीस व्यवस्थापन समितीचे सभेस सादर करावा.

श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था शिर्डी यांचेकडून शिर्डी नगरपंचायतीस, शिर्डी नगरपंचायत हद्दीतील रस्त्यांच्या दैनंदिन स्वच्छतेची कामे करण्यासाठी दरमहा रु. ४२,५१,५९९/- इतके अनुदान देण्यात येत असते, स्वच्छता कामी शिर्डी नगरपंचायतीने नेमलेल्या ठेकेदारामार्फत होणारी साफसफाईची कामे करारनाम्यातील अटी शर्तीनुसार होतात किंवा कसे ? याबाबत आकस्मित पाहणी करण्यासाठी संस्थानचे प्रशासकीय अधिकारी यांचे अध्यक्षतेखाली समिती स्थापन करण्याचा निर्णय झाला आहे. त्यानुसार संदर्भ क्र.१ अन्वये समिती गठीत करण्यात आली आहे.

सदर समिती शिर्डी नगरपंचायत हद्दी अंतर्गत येणा-या नगरमनमाड रोड, हॉटेल कलासाई ते हॉटेल शांताई रोड, पालखी रोड, पिंपळवाडी रोड, दत्त नगर, माऊली नगर, एच.पी.गॅस रोड ,हॉटेल सन अॅड सन रोड, हॉटेल गणपती पॅलेस, हॉटेल सेंट लॉरेन्स रोड, बाजार तळ व परिसर, संभाजीनगर, कालिकानगर, बिरेगांव रोड, सातभाई मळा रोड, पानमळा रोड, शिर्डी विमानतळ रोड, श्री रामनगर, पाण्याची टाकी कनकुरी रोड, प्रसादालयासमोरील रिंगरोड, लक्ष्मीनगर नाला, इ. रस्त्यांच्या दैनंदिन स्वच्छता विषयक कामांची संदर्भ क्र. १ अन्वये गठीत करण्यात आलेल्या समितीकडून दरमहा आकस्मिक पाहणी करण्यात येऊन, पाहणी अहवाल व्यवस्थपनास सादर करण्यात येतो. यापुर्वी उपरोक्त संदर्भ क्र. ४ मा.तदर्थ समिती सभा दि. ११/०५/२०२०, विषय नं.४५, निर्णय क्र. २७९ नुसार मार्च २०२० पर्यंत मा.तदर्थ समितीसमोर अवलोकनार्थ सादर करण्यात आलेले आहेत. तसेच माहे एप्रिल २०२० ते मार्च २०२१ या कालावधीतील पाहणी अहवाल लेखाशखा अनुदान विभागाकडे सादर करण्यात आले असून संदर्भ क्र. ५ नुसार मा. तदर्थ समितीचे पुढे चक्रीय पध्दतीने तात्काळ सादर करणेबाबत कळविण्यात आलेले आहे.

**शिर्डी नगरपंचायत हद्दी अंतर्गत येणा-या स्वच्छता कामांची पाहणी अहवाल प्रत्येक महिन्यास लेखाशाखा अनुदान विभागास खालील प्रमाणे सादर करण्यात आलेला आहे.**

| अ.नं. | शिर्डी नगरपंचायत हद्दी अंतर्गत स्वच्छतेच्या कामांची आकस्मिक पाहणी समितीने समक्ष पाहणी केलेली महिना | | लेखाशाखा विभागास पाहणी अहवाल सादर करण्यात आलेली तारीख |
|---|---|---|---|
| | महिना | दिनांक | |
| १ | एप्रिल २०२० | दि. ०१/०५/२०२० | दि. ०२/०५/२०२० |
| २ | मे २०२० | दि. ०२/०६/२०२० | दि. १६/०६/२०२० |
| ३ | जुन २०२० | दि. २०/०७/२०२० | दि. २१/०७/२०२० |
| ४ | जुलै २०२० | दि. ०४/०८/२०२० | दि. १२/०८/२०२० |
| ५ | ऑगस्ट २०२० | दि. ०५/०९/२०२० | दि. ०८/०९/२०२० |
| ६ | सप्टेंबर २०२० | दि. ०३/१०/२०२० | दि. २१/१०/२०२० |
| ७ | ऑक्टोबर २०२० | दि. ०५/११/२०२० | दि. ०४/१२/२०२० |
| ८ | नोव्हेंबर २०२० | दि. ०४/१२/२०२० | दि. १४/१२/२०२० |
| ९ | डिसेंबर २०२० | दि. ०४/०१/२०२१ | दि. ०९/०१/२०२१ |
| १० | जानेवारी २०२१ | दि. ०८/०२/२०२१ | दि. १७/०२/२०२१ |
| ११ | फेब्रुवारी २०२१ | दि. ०४/०३/२०२१ | दि. ०२/०४/२०२१ |
| १२ | मार्च २०२१ | दि. ०६/०४/२०२१ | दि. १९/०४/२०२१ |

उपरोक्त नमुद केलेल्या पाहणी समितीचे अहवाला सोबत नगरपंचायत ठेकेदार कंपनी यांचेकडून वेळोवळी प्राप्त झालेले कर्मचा-यांचे बायोमॅट्रीक पंचींग हजेरी रिपोर्ट, कर्मचा-यांचा पी.एफ. भरणा केलेले चलनांच्या प्रती, शिर्डी नगरपंचायत हद्दीत किटकनाशक कार्बोलिक (जंतुनाशक) पावडर, औषधांची फवारणी व धुर फवारणी, केल्याबाबतचे रहिवाशांचे अभिप्राय, स्वच्छता कामांसाठी लागणा-या साहित्यांच्या खरेदीच्या बीलांच्या प्रती, त्याचप्रमाणे घंटागाडीव्दारे ओला व सुका कचरा नियमितपणे घेऊन जाण्यात येत असलेबाबत नागरिकांच्या अभिप्राय नोंद वहिच्या झेरॉक्स प्रती अहवाला सोबत जोडून लेखाशाखा अनुदान विभागास सादर केलेले आहेत.

सदर पाहणी समितीने वेळोवेळी प्रत्येक महिन्यात वस्तुस्थितीदर्शक अहवाल नियमितपणे आवश्यक प्राप्त अभिलेखांसह माहे एप्रिल २०२० ते मार्च २०२१ पर्यंत लेखाशाखा – अनुदान विभागास पुढील कार्यवाहीसाठी सादर करण्यात आलेले आहेत.

सदर विषयाची नोंद घेण्यासाठी मा. तदर्थ समितीचे पुढे सादर.

11/6/21

(कान्हूराज बगाटे, भा.प्र.से.)
मुख्य कार्यकारी अधिकारी
श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी.

MEETING-2021-2021

विषय क्र.- ७९

**मा. तदर्थ समितीचे सभेपुढील विषय**

329

**विषय- संस्थान इमारती व परिसरातील दैनंदिन साफसफाई करुन निघणारा प्लॅस्टीक कचरा विक्री करणेबाबत.**

**संदर्भ – १) ग्लोबल पॉलीमर्स, चिखली, ता. हवेली जि. पुणे यांचे दि. ०४/०४/२०२१ रोजीचे पत्र.**
**२) आरोग्य विभागाकडील दि. ०९/०४/२०२१रोजीची मंजुर टिपणी.**
**३) मा. मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे कक्षात दि. ०८/०५/२०२१ रोजी झालेल्या सभेचे इतिवृत्त.**

संस्थान इमारती व परिसरातील दैनंदिंन साफसफाई करुन निघणा-या प्लॅस्टीकचा पुर्नवापर / विक्री दराबाबत ग्लोबल पॉलीमर्स, चिखली यांचे प्रतिनिधीशी चर्चा करणेकामी दि. ०८/०५/२०२१ रोजी दुपारी १३.१५ वा. मा. मुख्य कार्यकारी अधिकारी साहेब यांचे कक्षात मिटींग आयोजित करण्यात आली होती. सदर मिटींगचे वेळी खालील अधिकारी /कर्मचारी उपस्थित होते.

१) श्री. कान्हूराज बगाटे- मुख्य कार्यकारी अधिकारी
२) श्री. रविंद्र ठाकरे- उप मुख्य कार्यकारी अधिकारी
३) श्री. प्रताप कोते- प्र.अधिक्षक, आरोग्य विभाग
४) श्री. प्रताप थोरात - प्रतिनिधी , ग्लोबल पॉलीमर्स, चिखली

संस्थान इमारती व परिसर दैनंदिन साफसफाई करुन निघणा-या घनकच-यामध्ये प्लॅस्टीकचे प्रमाण जास्त आहे. सदरचा घनकचरा सर्व्हे नं. १८२ मध्ये खड्डे करुन डपिंग डेपोवर साठविण्यात येत आहे. सदरचा कच-यावर कोणतीही प्रक्रीया न होता सध्या कचरा खड्डयांमध्ये टाकून त्यावर मातीचा थर देऊन बुजून टाकण्यात येत आहे. त्यामुळे भविष्यात सदर जागेचा वापर करावयाचा झाल्यास प्लॅस्टीक कच-याचे विल्हेवाट लावण्याचा प्रश्न निर्माण होऊ शकतो. गर्दीचे कालावधीत सुमारे २ ते २.५ टन सुका कचरा निघतो. त्यामध्ये प्लॅस्टीक बाटल्या, दुध पिशवी, सलाईनचे बॉटल, इत्यादी विक्री होणारे प्लॅस्टीक वगळता, सध्या विक्री न होणारे प्लॅस्टीक ( पॉलीथीन बॅग, खाद्यपदार्थांचे पाऊच, इतर विभागाकडील पॅकींगचे प्लॅस्टीक व इतर ) सुमारे दैनंदिन १५ ते २० किलो ग्रॅम प्रमाण असते. म्हणजेच महिन्याला सुमारे ४०० ते ६०० किलो ग्रॅम इतके प्लॅस्टीक निघते, साधारणपणे वार्षिक ५ ते ६ टन इतका प्लॅस्टीक कचरा विक्री करुन संस्थानला विक्रीतून रु. १० ते १२ हजाराचे वार्षिक उत्पन्न मिळून उर्वरीत कुजणा-या कच-याचा संस्थानचे बगीचा विभागासाठी खत म्हणून उपयोग होईल. तसेच कचरा डेपोसाठी भविष्यात संस्थानची किंमती जागा अडकुण पडणार नाही.

ग्लोबल पॉलीमर्स, चिखली यांचे दि.०४/०४/२०२१ रोजीचे विनंती पत्र व आरोग्य विभागाकडील दि. ०९/०४/२०२१ रोजीचे मंजुर टिपणीनुसार दि.०८/०५/२०२१ रोजी संस्थान इमारती व परिसरातील दैनंदिन साफसफाई करुन निघाण-या प्लॅस्टीकचा पुर्नवापर करणे व विक्री दराबाबत चर्चा करणेकामी बोलविण्यात आलेले होते. त्यानुसार मा.मुख्य कार्यकारी अधिकारी सो यांचे कक्षात खालील मुद्दयांवर चर्चा करुन निर्णय घेण्यात आला आहे.

ग्लोबल पॉलीमर्स, चिखली यांनी दि.०४/०४/२०२१ रोजीचे पत्रामध्ये खालीलप्रमाणे दोन प्रस्ताव संस्थानकडे सादर केले आहेत.

१) संस्थान मार्फत प्लॅस्टीक मटेरीयल वर्गीकरण करुन व गठ्ठे बांधुन दिल्यास ०३ रुपये प्रति किलो ग्रॅम या प्रमाणे (रु. ३००० प्रति टन) संस्थानास मोबदला देण्यात येईल.
२) शिर्डी संस्थान डेपो ठिकाणी आमचे कामगार लावून मटेरियल वेगळे करुन गठ्ठे बांधून घेतले तर रु. १.५/- प्रति किलो ग्रॅम म्हणजे ( १५०० रुपये प्रति टन) या प्रमाणे संस्थानास मोबदला देण्यात येईल.

**उपरोक्त प्रस्तावाबाबत दि. ०८/०५/२०२१ रोजी मा. मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी ग्लोबल पॉलीमर्स, चिखली यांचे प्रतिनिधी श्री. प्रताप थोरात यांचेशी सविनय चर्चा करुन त्यांनी त्यांचे कामगार लावून प्लॅस्टीक मटेरीयलचे वर्गीकरण करुन गठ्ठे बांधुन वाहतुक व इतर सर्व समावेशक खर्चासह रु. ०२.०० प्रति किलो ग्रॅम (रुपये २०००/- प्रति टन) दर त्यांनी मान्य केले आहेत.**

**विभागाचा अभिप्राय-** संस्थान इमारती व परिसरातील दैनंदिन साफसफाई करुन निघणा-या प्लॅस्टीक कचरा ग्लोबल पॉलीमर्स, चिखली यांना पुर्नवापर करणेसाठी दिल्यास उर्वरीत कुजणा-या कच-याचे संस्थानचे बगीचा

विभागामार्फत खत तयार करुन संस्थानचे बगीच्यांसाठी वापर करता येईल. भविष्यात पर्यायी संस्थानच्या बगीचा विभागासाठी खत उपलब्ध होऊन संस्थानचा अर्थिक फायदा होईल. तसेच कचरा डेपोसाठी संस्थानची जागा, कर्मचारी व वेळ वाचेल. तसेच संस्थाना प्लॅस्टीक कचरा विक्री पासून अर्थिक उत्पन्न मिळून शेजारील शेतक-यांच्या शेतामध्ये उडणा-या प्लॅस्टीक कच-याबाबत तक्रारी येणार नाही, असे नम्र मत आहे.

**करीता,**

अ) संस्थान इमारती व परिसरातील दैनंदिन साफसफाई करुन निघणा-या तसेच संस्थानमार्फत विक्री न होणा-या प्लॅस्टीकचा पुर्नवापर करणेकामी वेळोवेळी जमा होणारा प्लॅस्टीक कचरा ग्लोबल पॉलीमर्स, चिखली यांना सशुल्क रु. **०२.०० प्रति किलो ग्रॅम (रुपये २०००/- प्रति टन)** दराने प्रायोगिक तत्वावर ११ महिने कालवाधी करीता देणेस व सदरील रक्कम लेखाशाखेत जमा करणेस,

ब) प्रस्तावित कामाचा करारनामा विधी विभागामार्फत संस्थानचे कायदेशीर सल्लागार यांचेकडून करणेस,

क) ग्लोबल पॉलीमर्स, चिखली यांना वर्कऑर्डर देणेस,

तरी उपरोक्त **अ, ब,** व **क** बाबत निर्णयार्थ मा. तदर्थ **(Ad-hoc)** समितीचे सभेपुढे सादर.

16/6/17

(कान्हूराज बगाटे,भा.प्र.से.)
मुख्य कार्यकारी अधिकारी
श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी.

ERPND - 179

10/06/21

विषय क्र.- 62

**मा.तदर्थ(Ad-hoc) समितीचे सभेपुढील विषय**

**बगीचा विभाग**

331

टिपणी -

**विषय - गोवंश संवर्धनार्थ गाय हा राष्ट्रीय प्राणी (कामधेनू) म्हणून ठराव करणेबाबत.**

प्रास्ताविक -

श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी हे जागतिक किर्तीचे देवस्थान असल्याने श्री साईबाबांच्या दर्शनासाठी वर्षभर लाखो साईभक्त येत असतात. संस्थानमार्फत गोशाळा प्रकल्प सुरु करणेबाबत कार्यवाही चालू आहे. परंतु आता समाजात मोठया प्रमाणात गोवंशाची हत्या होत असलेचे निर्दशनास आलेले आहे.

गाय ही हिंदूंकरता अत्यंत पवित्र आहे. गाईचे दूध, गोमूत्र, शेण, तूप, दही व त्यापासून बनलेले पदार्थ यांत औषधी गुण असल्याचे आयुर्वेदात सांगितले आहे.त्याला पंचगव्य असे म्हणतात. स्मरणशक्ती वाढवायला गायीचे दूध उत्तम आहे. गाईचे शेणाने सारविलेल्या घरात कीटक कमी आढळतात. गाईच्या दुधात २१ प्रकारची ॲमिनो आम्ले, ११ प्रकारचे फॅटी आम्ले, ६ प्रकारची जीवनसत्त्वे, २५ प्रकारची धातुजन्य तत्त्वे, २ प्रकारची साखर, ४ प्रकारचे फॉस्फरस व ११ प्रकारची नायट्रोजन तत्त्वे आढळून येतात.

जगभरात दुधाच्या शुद्धतेसाठी आदर्श असलेल्या भारतीय दुधाळू संपदेला ग्रहण लागले आहे. देशी गायींच्या अनेक जाती लुप्त होण्याच्या मार्गावर आहेत. सिंथेटिक दुधाचा वापर, हिरव्या चाऱ्याची कमतरता आणि पशूवध यांमुळे त्यांच्या पोषणाची गंगा आटत चालली आहे. दुध वाढवण्याच्या लोभापायी भारतीय आणि विदेशी जातींचे गोवंश यांच्यात क्रॉस ब्रीड करण्यात येत आहे. त्यामुळे अमृतावरच अन्याय होत आहे. न्युझीलंडमध्ये प्राध्यापक डॉ. वुडफोर्ड यांनी त्यांच्या शोधपत्रात स्पष्ट केले आहे की, भारताच्या सर्व गायींमध्ये बीटा कॅसिन -२ आढळून येते, ज्यात शरीरस्वास्थ्य आणि बुद्धीवर्धक सर्वच गुणधर्म आहेत. त्यात अनेक रोगांना समूळ नष्ट करण्याची क्षमता वैज्ञानिक आधारे सिद्ध झाली आहे.

भारतीय वंशाच्या गायीचे पालन, पोषण, संवर्धन करणे गरजेचे आहे.

**संस्थान अधिनियम ठराव यानुसार छाननी, शासन निर्देश, तांत्रिक, कायदेशिर तसेच आर्थिक विषय इ.**

**छाननी करुन अनुमान -**

सदरचा विषय धोरणात्मक स्वरुपाचा आहे.

**मागणी -**

**भारतात देशी गायींविषयी उदासीनता !**

१. पश्चिम उत्तरप्रदेशमध्ये गाय आणि म्हशी यांच्या तुलनेत गायींची संख्या ६० टक्के आहे, जी काळानुसार अल्प होत आहे.

२. पशूपालनाविषयी उदासीनता आणि अंदाधुंद गोहत्या यांमुळे देशात देशी गायी अल्प होत आहेत.

३. जगात सर्वोत्तम जातीच्या गिर गायीची संख्या सौराष्ट्रात १० सहस्रांहूनही अल्प आहे; परंतु ब्राझिलमध्ये या गायी सर्वाधिक आहेत.

४. अनेक कृषी विद्यापिठांमध्ये साहीवाल, गिर, थारपारकर, अंगोल आणि राठी यांसह उत्तम जातीच्या गायींचे विभाग चालू करण्यात आले आहेत; परंतु विदेशी अनुदानासाठी क्रॉस ब्रीडला प्रोत्साहन देण्यात येत आहे.

५. जगभरात २५० गायींच्या जातीमध्ये ३२ जाती भारतीय गोवंशांच्या आहेत.

**गोवंश रक्षणासाठी करावयाच्या उपाययोजना**

१. प्रत्येक घरी निदान एका गायीचे पालन करणे, ते शक्य नसल्यास गोशाळेतील एखाद्या गायीच्या पालन-पोषणाचा व्यय करणे

२. पंचगव्यापासून निर्माण झालेल्या स्वास्थ्यवर्धक लाभदायी असे दंतमंजन, साबण, उटणे, धूप, मच्छर निरोधक उदबत्ती अशा उत्पादनांचा नित्य वापर करणे

३. घरामध्ये गायीचेच दूध, दही, ताक आणि तूप यांचा वापर करणे

४. घरामध्ये आजारपणाच्या काळात स्वस्त, सुलभ आणि दोष निर्माण न करणाऱ्या पंचगव्य औषधींचा उपयोग करणे.

५. लक्षावधी गोवंशाच्या मृत्यूचे कारण बनत असलेल्या प्लास्टिक पिशव्या न वापरणे

६. गोवंश हत्या करून निर्माण होत असलेली उत्पादने समजून घेऊन त्यांच्या वापराच्या विरोधात जनजागरण करणे, उदा. चामड्यापासून बनवलेल्या चपला, बूट, कोट, पर्स, सुटकेस, पट्टे, गालीचे, फर्निचर कव्हर्स, क्रिकेट बॉल, फूटबॉल, कलात्मक मूर्ती, गोमांस आणि चरबीपासून निर्माण केलेले तूप, आईस्क्रीम, चॉकलेट, टूथपेस्ट आणि पावडर, काही साबण, कोल्ड क्रीम, लिपस्टीक, परफ्यूम,नेलपॉलिश, शाम्पू, सिंथेटिक दूध इत्यादी

७. गोहत्या करून निर्माण होत असलेली औषधे, उदा. इन्शुलिन, विविध कॅल्शिअम पूरक औषधींच्या वापरास विरोध करणे

८. सेंद्रिय खत वापरून निर्माण केल्या गेलेल्या खाद्यांन्नाचाच वापर करणे

९. संकटात सापडलेल्या आणि कत्तलखान्याकडे जात असलेल्या गोवंशाला वाचवण्यासाठी साहाय्य करणे.

**गोरक्षणासाठी कसे प्रयत्न कराल**

१. गोवंशाच्या बेकायदेशीर वाहतुकीवर लक्ष ठेवा.

२. गोवंशाची होणारी बेकायदेशीर वाहतूक वैध मार्गाने रोखा.

३. 'गोवंश कत्तलीसाठीच नेला जात आहे', असे गाऱ्हाणे प्रविष्ट करा.

४. आरक्षकांना गोरक्षणाचा कायदा माहिती नसतो. त्यांना तो समजावून सांगा. त्याची प्रत त्यांना द्या. त्यासाठी आधी गोरक्षणाचा कायदा समजून घ्या.

५. ज्या हिंदूंकडे जागा असेल, त्यांनी एकतरी गाय पाळण्याचा प्रयत्न करावा.

६. 'गाय वाचली, तरच हिंदु वाचेल', असे सर्वत्र फलक लावावेत.

**विभागाचा अभिप्राय -**

उपरोक्तप्रमाणे गोवंशाच्या होत असणा-या कत्तलीमुळे देशी गायींच्या अनेक जाती लुप्त होण्याच्या मार्गावर आहेत. अशी कत्तल थांबविणे आवश्यक आहे. यासाठी गोवंश वाचविण्यासाठी प्रयत्न करणा-या संस्थाना श्री साईबाबा संस्थानमार्फत गोवंश संवर्धनार्थ गाय हा राष्ट्रीय प्राणी (कामधेनू) म्हणून ठराव करणेबाबतचा विषय मा.तदर्थ (Ad-hoc) समितीचे सभेपुढे निर्णयार्थ सविनय सादर.

11/6/21

(कान्हूराज बगाटे, भा.प्र.से.)
**मुख्य कार्यकारी अधिकारी**
श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी

विषय क्र.- ६३

**मा. तदर्थ (Ad-hoc) समितीचे सभेपुढे निर्णयार्थ सादर**

**बगीचा विभाग**



**टिपणी -**

**विषय - मंदिरातुन निघणारे हार व फुलांचे निर्माल्याबाबत.**

**अधिनियम २००४ मधील तरतूद -**

अधिनियम २००४ मध्ये १४(२) (ग) समितीच्या अधिकाऱ्याचे अधिकार व कर्तव्य या बाबत असून त्या प्रमाणे "नाशवंत अर्पण वस्तुंची लिलावाद्वारे किंवा अन्य प्रकारे, विल्हेवाट लावण्याचे आणि त्यांचे उत्पन्न विश्वस्त व्यवस्थेच्या निधीमध्ये जमा करणे." अशी तरतूद प्रस्तूत कलमा मध्ये नमुद केलेली आहे.

**प्रस्तावना -**

अधिनियम २००४ मध्ये १४(२) (ग) मधील तरतुदी नुसार मंदिरातुन निघणारे हार व फुलांचे निर्माल्याची लिलाव करुन विल्हेवाट लावता येईल व त्याचे उत्पन्न संस्थानच्या निधी मध्ये जमा करता येईल. तसेच दि.०९/०३/२०१७ रोजीच्या मा. व्यवस्थापन समिती सभेतील निर्णय क्रं.२२१ अन्वये, श्रींचे मंदिरातुन निघणाऱ्या निर्माल्यापासुन बचतगटांमार्फत सुगंधीत द्रव्ये / साई आगरबत्ती तयार करणेत यावी व त्या वस्तु बचतगटाकडुन संस्थानने खरेदी करुन विक्रीसाठी ठेवणेबाबत असे ठरलेले आहे. त्यानुसार दि.३०/०६/२०१७ रोजीच्या पत्रानुसार इकोनिर्मिती इन्फ्रस्ट्रक्चर ॲण्ड सर्व्हीसेस व जनसेवा फाऊंडेशन बचत गट यांनी मंदिरातुन निघणारे हार व फुलांचे निर्माल्य मिळणेबाबत एकत्रीत प्रस्ताव सादर केलेला होता. दि. २५/०७/२०१७ रोजीचे मा. व्यवस्थापन समिती सभेतील निर्णय क्रं.५३० अन्वये सदर निर्माल्य जनसेवा फाऊंडेशन बचत गट व इकोनिर्मिती इन्फ्रस्ट्रक्चर यांचे प्रकल्पास ०३ वर्षासाठी विनामुल्य देऊन त्याबदल्यात सदर बचत गट हे अगरबत्ती विक्रीतुन मिळणाऱ्या प्रतिमाह उत्पन्नाच्या १०% रक्कम संस्थानला जमा करतील असे ठरले त्यानुसार दि. १०/१०/२०१७ रोजी करारनामा करुन घेणेत आलेला आहे. जनसेवा फाऊंडेशन बचत गट व इकोनिर्मिती इन्फ्रस्ट्रक्चर यांनी दि. ०९/११/२०१७ पासुन मंदीरातील निर्माल्य उचलेले आहे. मंदीरातुन सरासरी दररोज दीड ते दोन टन निर्माल्य निघते. जनसेवा फाऊंडेशन यांना देणेत येणा-या निर्माल्याचा कालावधी माहे ऑक्टोबर - २०२० अखेर संपलेला आहे.

महाराष्ट्र शासनाचे विधी व न्याय विभागाचे क्र.सासंवि - १०१७/१४७८/प्र. क्र. १६०/ का. १६ दिनांक १८/०९/२०१७ रोजीच्या पत्रान्वये नाशवंत अर्पण वस्तूंची लिलावाद्वारे किंवा अन्यप्रकारे विल्हेवाट लावण्याचे आणि त्यांचे उत्पन्न विश्वस्तव्यवस्थेच्या निधीमध्ये जमा करण्याचे अधिकार मुख्य कार्यकारी अधिकारी, श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी यांना आहेत. मंदिरातून निघणारे हार व फुलांची विल्हेवाट लावणेबाबतच्या प्रस्तावाला शासनाची मान्यतेची अवश्यकता नसुन या प्रस्तावाबाबत निर्णय घेण्यासाठी मुख्य कार्यकारी अधिकारी श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी सक्षम आहेत. यास्तव प्रस्तुत प्रकरणी आपल्या स्तरावर उचित निर्णय घेण्यात यावा असे सुचविलेले आहे.

त्यानुसार मंदिरातून निघणारे हार व फुलांच्या निर्माल्याची योग्य प्रकारे विल्हेवाट लावणे आवश्यक आहे.

**संस्थान अधिनियम ठराव/या नुसार छाननी,शासन,निर्देश, तांत्रिक कायदेशिर तसेच अर्थिक विषय इ.छाननी करुन अनुमान -** सदरचा विषय धोरणात्मक स्वरूपाचा आहे.

**मागणी -**

दिनांक २५/०७/२०१७ रोजीच्या मा. व्यवस्थापन समिती सभेतील निर्णय क्रं.५३० अन्वये मंदिरातून निघणारे हार व फुलांचे निर्माल्य जनसेवा फाऊंडेशन बचत गट व इकोनिर्मिती इन्फ्रस्ट्रक्चर यांचे प्रकल्पास ०३ वर्षासाठी विनामुल्य देऊन त्याबदल्यात सदर बचत गट हे अगरबत्ती विक्रीतुन मिळणाऱ्या प्रतिमाह उत्पन्नाच्या १०% रक्कम संस्थानला जमा करतील असे ठरले त्यानुसार अगरबत्ती विक्रीतून खालीलप्रमाणे रक्कम संस्थानला जमा करणेत आलेली आहे.

| अ.न | कालावधी | संस्थानला मिळणारे १०% उत्पन्न |
|---|---|---|
| ०१ | १८ मार्च - २०१८ ते ३१ मार्च -२०१८ | २२,३०५/- |
| ०२ | एप्रिल - २०१८ ते मार्च - २०१९ | ९,७७,६१०/- |
| ०३ | एप्रिल - २०१९ ते मार्च - २०२० | ५, ८४,०९५ /- |

सदर जनसेवा फाउंडेशन, लोणी यांचे मंदिरातून हार व फुले उचलणेबाबतचा कालावधी माह ऑक्टोबर - २०२० अखेर संपलेला आहे. तसेच कोरोना विषाणूच्या प्रादुर्भावामुळे लॉकडाऊन असलेकारणाने दिनांक १७ मार्च २०२० पासून समाधी मंदिर साईभक्तांना दर्शनासाठी बंद करणेत आलेले असून तदनंतर मंदिरात व हार व फुले नेणेस मनाई करणेत आलेली असलेमुळे मंदिरातून निघणारे हार व फुलांचे निर्माल्य बंद झालेले आहे.

परंतु सध्या कोरोना विषाणूंचा प्रादुर्भाव कमी होत असून सर्वत्र अनलॉक होत असलेमुळे समाधी मंदिर भाविकांना दर्शनासाठी खुले झाल्यानंतर मंदिरातून निघणारे हार व फुलांचे निर्माल्याची योग्य प्रकारे विल्हेवाट लावणे आवश्यक आहे.

श्रींचे समाधी मंदिरातुन निघणारे हार व फुलांचे निर्माल्याची विल्हेवाट लावणेकामी परिसरातील बचत गट किंवा निर्माल्यावर प्रकिया करणाऱ्या इतर संस्थांकडून दरपत्रके मागवून त्यांना पुढील ०५ वर्षांसाठी उच्चत्तम दराने विक्री करता येईल व त्यापासुन मिळणारे उत्पन्न संस्थानच्या निधीमध्ये जमा करता येईल असे मंत आहे.

**विभागाचा अभिप्राय -**

श्रींचे समाधी मंदिरातुन निघणारे हार व फुलांचे निर्माल्याचे पावित्र्य कायम ठेऊन योग्य प्रकारे विल्हेवाट लावणेकामी परिसरातील बचत गट किंवा निर्माल्यावर प्रकिया करणाऱ्या इतर संस्थांकडून निवीदा मागवून पुढील ०५ वर्ष कालावधीसाठी उच्चतम दराने विक्री करता येईल. सदर निर्माल्याची विक्री करणेकामी संस्थानचे अधिकृत संकेतस्थळावर तसेच जनसंपर्क विभागामार्फत विविध वर्तमानपत्रात जाहीरात प्रसिध्द करणेस व याकामी निवीदा प्रक्रिया राबविणेबाबतचा विषय मा. तदर्थ (Ad -hoc) समिती सभेपुढे निर्णयार्थ सविनय सादर.

५/७/२१

(कान्हूराज बगाटे, भा.प्र.से.)
**मुख्य कार्यकारी अधिकारी**
श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी

ERP No-292

विषय क्र.- ७४



मा. तदर्थ (Ad-hoc) समितीचे सभेपुढील विषय

जनसंपर्क विभाग

मान्यतेस सविनय सादर,

**विषयः- पर्यटन विषयक प्रसिध्दीकरीता साईबाबा समाधीमंदीर व परीसराचे फोटोग्राफ व चित्रिकरण करण्यास परवानगी बाबत...**

संदर्भः- १. महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळ प्रादेशिक कार्यालय, नाशिक यांचे दि. १० जून २०२१ रोजीचे जनसंपर्क कार्यालयाकडे दि.१५ जून २०२१ रोजी प्राप्त झालेले पत्र व त्यावरील मा. मुख्य कार्यकारी अधिकारी साहेब यांचे निर्देश.

२. महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळ, पर्यटक निवास, शिर्डी यांचे दि. ११ जून २०२१ रोजीचे जनसंपर्क कार्यालयाकडे दि.१५ जून २०२१ रोजी प्राप्त झालेले पत्र व त्यावरील मा. मुख्य कार्यकारी अधिकारी साहेब यांचे निर्देश.

**अधिनियम २००४ मधील तरतूद** – महाराष्ट्रशासनाने पुनर्घटीत केलेल्या श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी) चे अधिनियमात " समितीची कर्तव्य व अधिकार " या शिर्षकाखाली अधिनियिम नंबर १७ (१) मध्ये राज्य शासनाच्या कोणत्याही सर्वसाधारण किंवा विशेष आदेशास अधीन राहून संस्थान विश्वस्तव्यवस्थेच्या मालमत्तेची व कामकाजाची कार्यक्षमतेने व्यवस्था पाहणे, मंदिरामध्ये रुढी व प्रथेनुसार धार्मिक विधी पूजा-अर्चा, समारंभ व उत्सव आयोजित करण्यासाठी आणि पार पाडण्यासाठी योग्य ती व्यवस्था करणे, भक्तगणांना आवश्यक त्या सोयी व सुविधा उपलब्ध करुन देणे आणि या अधिनियमान्वये विश्वस्तव्यवस्थेचा कारभार ज्या प्रयोजनार्थ चालवावयाचा आहे, ती उद्दिष्टे साध्य करण्यासाठी विश्वस्तव्यवस्थेचे उत्पन्न कामी लावणे, ही समितीची कर्तव्य असतील." अशी तरतूद करण्यात आलेली आहे.

**व्यवस्थापन समितीचा ठराव क्रमांक** – मा.व्यवस्थापन मंडळाचे दिनांक २१.१०.२००४ व दिनांक ०८.०२.२००५ रोजीचे सभेतील निर्णय क्र.५२ व ७६ मध्ये दुरचित्रवाहिन्यांचे प्रतिनिधींना-

**०१. कमी गर्दीचे वेळी चित्रिकरण दुपारनंतर सर्वसाधारण एक तास.**

**०२. गुरुवार, रविवार व गर्दीचे दिवशी आतील चित्रिकरणास शक्यतो परवानगी देवू नये.**

**०३. चित्रिकरण करतांना भक्तांचे दर्शनात कुठलाही अडथळा येवू नये.**

अशा प्रकारे निर्णय झालेले आहेत. तसेच-

**तदर्थ (Ad-hoc) समितीचा ठराव क्रमांक-** मा. तदर्थ (Ad-hoc) समितीचे दिनांक ०४.१२.२०१९ रोजीचे सभेतील विषय नं. ५५ श्री साईबाबा संस्थान मंदिर परिसरामध्ये ड्रोन कॅमे-याने व शुटींग कॅमे-याने श्री साईबाबांची गाणी व भजन रेकॉर्डींग परवानगी बाबत निर्णय क्र.५३४ अन्वये साई भक्तांच्या सुरक्षेच्या दृष्टीकोनातुन प्रस्ताव अमान्य करण्यात आलेला आहे.

**प्रस्ताविक** – श्री साईबाबा संस्थानचे वतीने वर्षभरात साजरे होणारे उत्सवाचे प्रचार व प्रसाराकरीता विविध दुरचित्रवाहीन्यांना तसेच इतर वेळेस दुरचित्रवाहीन्यांच्या मागणीनुसार वृत्तसंकलना करीता मा.व्यवस्थापन समितीच्या निर्णयास अधिन राहुन परवानगी देण्यात येते.

तरी उपरोक्त संदर्भीय पत्रान्वये महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळ प्रादेशिक कार्यालय, नाशिक यांनी महाराष्ट्रातील विविध पर्यटनस्थळे, धार्मिक तिर्थक्षेत्र यांचा पर्यटनाचा विकास होण्यासाठी या महामंडळामार्फत संकेतस्थळावर प्रसिध्दी देण्यात येते. त्यादृष्टिने म.प.वि. महामंडळाचे कार्य अग्रेसर आहे. महाराष्ट्रातील विविध पर्यटनस्थळे, तिर्थक्षेत्र यांचे फोटोग्राफी व व्हिडीओ शुटींगचे काम मे. सनजित कम्युनिकेशन्स प्रा.लि. हे करत आहे. नाशिक प्रादेशिक कार्यालयातंर्गत येणारे तिर्थक्षेत्र व पर्यटनस्थळांचे फोटोग्राफी व व्हिडीओ शुटींगचे काम दि. १५.०६.२०२१ ते दि. १५.०७.२०२१ कालावधीमध्ये पूर्ण करावयाचे आहे. त्यामध्ये शिर्डी हे मोठे सर्व धर्मिय तिर्थक्षेत्र येत असून, महामंडळाच्या वेबसाईटवरील प्रसिध्दीसाठी साईबाबा समाधी मंदीर परीसरामध्ये मे. सनजित कम्युनिकेशन्स प्रा.लि. या संस्थेचे (एकूण १५ व्यक्तींची टिम) विविध कॅमेरे ड्रोनच्या सहाय्याने फोटोग्राफी व व्हिडीओ शुटींग करण्याची परवानगी मिळणेस तसेच फोटोग्राफी व व्हिडीओ शुटींगच्यावेळी महामंडळातील २ अधिकारी प्रत्यक्ष उपस्थित राहतील. सदर फोटोग्राफी व व्हिडीओ शुटींगसाठी आम्ही आपल्या कार्यालयाकडून दिलेल्या सूचनांचे काटेकोर पालन करण्यास कटिबध आहोत. असे कळविले आहे. याबाबत महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळ, पर्यटक निवास, शिर्डी यांचेही पत्र प्राप्त झाले आहे.

त्यांनी कळविल्यानुसार ड्रोनच्या सहाय्याने फोटोग्राफी व व्हिडीओ शुटींग करण्याचे परवाणगीबाबत यापूर्वी सीसीटीव्ही विभाग व संरक्षण विभाग यांनी अभिप्राय दिलेले असुन ते खालील प्रमाणे.

**सीसीटीव्ही विभाग अभिप्राय**- डॉक्युमेन्टरी तयार करणेकामी मंदिराचे आतील व बाहेरील बाजुचे शुटींग ड्रोन कॅमे-याद्वारे करणेकामी परवानगी मिळणेबाबत मा. विश्वस्त ॲड मोहन जयकर सो. यांचे प्रतिनीधी श्री.अशित ठाकुर, मुंबई यांनी देखील कळविलेले होते. परंतु त्यांना देखील परवानगी देण्यात आलेली नाही.

**संरक्षण विभाग अभिप्राय**- श्री साई मंदिर परिसरात यापुर्वी ड्रोनद्वारे शुटींग घेण्याची परवानगी देण्यात आलेली नाही. तसेच मंदिर व भाविकांचे सुरक्षेच्या दृष्टीकोणातून यापुढील काळात ड्रोनद्वारे शुटींग घेण्याची परवानगी देण्यात येऊ नये, असे नम्र मत आहे. आजपावेतो सदर शुटींगची परवानगी फक्त टी. व्ही. चॅनल्सना जनसंपर्क विभागाकडून दिलेली आहे. त्यानुसार टी. व्ही. चॅनेल असेल तर देण्यात यावी.

**विभागाचा अभिप्राय/स्पष्ट मत** – श्री साईबाबा संस्थानच्या वतीने वर्षभरात साजरे करण्यात येणा-या उत्सवासाठी जनसंपर्क विभागामार्फत श्री साईबाबांच्या प्रचार व प्रसाराकरीता फक्त दुरचित्रवाहीन्यांनाच त्यांच्या मागणीनुसार मा.व्यवस्थापन समितीच्या निर्णयास अधिन राहुन प्रशासकीय मान्यतेने परवानगी देण्यात येते. आजपावेतो शुटींगची परवानगी फक्त टी. व्ही. चॅनल्सना जनसंपर्क विभागाकडून दिलेली आहे. तसेच सीसीटीव्ही विभाग व संरक्षण विभाग यांचे अभिप्राय नुसार मंदिर व भाविकांचे सुरक्षेच्या दृष्टीकोणातून यापुढील काळात ड्रोनद्वारे शुटींग घेण्याची परवानगी देण्यात येऊ नये. तसेच यापुर्वी मा. तदर्थ (Ad-hoc) समितीचे दिनांक ०४.१२.२०१९ रोजीचे सभेतील विषय नं. ५५ श्री साईबाबा संस्थान मंदिर परिसरामध्ये ड्रोन कॅमे-याने व शुटींग कॅमे-योने श्री साईबाबांची गाणी व भजन रेकॉर्डींग परवानगी बाबत निर्णय क्र.५३४ अन्वये साई भक्तांच्या सुरक्षेच्या दृष्टीकोनातुन प्रस्ताव अमान्य करण्यात आलेला आहे.

मात्र श्री साईबाबांच्या प्रचार व प्रसाराकरीता समाधी मंदिरातील व परिसरातील संस्थानच्या कॅमे-याने केलेले चित्रिकरण त्यांना देता येईल असे नम्र मत आहे.

तरी महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळ, नाशिक यांचे संदर्भीय पत्रान्वये शिर्डी हे मोठे सर्व धर्मिय तिर्थक्षेत्र येत असून, महामंडळाच्या वेबसाईटवरील प्रसिध्दीसाठी साईबाबा समाधी मंदीर परीसरामध्ये मे. सनजित कम्युनिकेशन्स प्रा.लि. या संस्थेचे (एकूण १५ व्यक्तींची टिम) विविध कॅमेरे ड्रोनच्या सहाय्याने फोटोग्राफी व व्हिडीओ शुटींग करण्याची परवानगी मिळावी ही विनंती केलेली आहे. याबाबत संरक्षण विभाग व सीसीटीव्ही विभाग यांचे वरील प्रमाणे अभिप्राय प्राप्त झालेले आहे. तरी मे. सनजित कम्युनिकेशन्स प्रा.लि. यांना ड्रोनच्या सहाय्याने फोटोग्राफी व व्हिडीओ शुटींग करण्याची परवानगी द्यावी किंवा कशी याबाबतचा प्रस्ताव मा. तदर्थ (Ad-hoc) समितीचे समोर निर्णयार्थ सादर .

18/6/21

( कान्हुराज बगाटे, भा.प्र.से.)
मुख्य कार्यकारी अधिकारी
श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी

विषय क्र.- ६.५

**मा.तदर्थ (Ad-hoc) समिती सभेपुढील विषय.**

**(संरक्षण विभाग)**



**विषयः- श्री साईबाबा संस्थान मंदिर परीसरामध्ये ड्रोन कॅमे-याने व शुटींग कॅमे-याने शुटींग करणेस बंदि असलेबाबतचे आशयाचे फलक मंदिर परीसरामध्ये लावणेस मान्यता मिळणेबाबत...**

उपरोक्त विषयान्वये सादर करण्यात येते की,सिसिटीव्ही विभाग कायम कर्मचारी श्री मनोज वैदय यांचा दि.१९/०२/२०२१ रोजीचा दूरध्वणी संदेश नुसार,दि.१९/०२/२०२१ रोजी दुपारी ठिक .३.३० वाजता सी.सी.टी.व्ही,विभाग कायम कर्मचारी श्री मनोज वैदय यांनी संरक्षण कार्यालय येथे दूरध्वणी व्दारे कळविले की,आज रोजी सकाळी ९.२० ते १० वाजेच्या दरम्यान व्दारकामाई मंदिरासमोरील खुले नाटयगृह समोर अनोळखी इसमाने ड्रोन कॅमे-याचे सहाय्याने सदर परिसराचे चित्रीकरण केले असल्याचे कळविले.

श्री आण्णासाहेब दाभाडे कायम कर्मचारी यांचा दि.१९/०२/२०२१ रोजीचे घटनेचा लेखी अहवाल नुसार त्यांची १२ ते ०८ डयुटी चालू असतानी डयुटी काळात ३.३० वाजता सीसीटिव्ही विभाग कर्मचारी श्री मनोज वैदय यांच्या फोन वरील मेसेज नुसार मी समक्ष सी.सी.टिव्ही कंट्रोल रूम येथे जावुन प्रत्यक्ष घटनेचे सी.सी.टि.व्ही फुटेज पहाणी केली असता,सदर इसम हा सकाळी ९.२० वाजता खुलेनाटयगृह येथिल कर्तव्यावर असलेले साईमंदिर सुरक्षा पोलीस कर्मचारी यांचे जवळ जावुन चर्चा करतो व त्याचे जवळील असलेली बॅग सदर पोलीस कर्मचारी यांचे जवळ ठेवुन बॅगमधून ड्रोन कॅमेरा काढून नाटयगृह समोरून,सदर परिसराचे ड्रोन कॅमे-याचे सहाय्याने ९.२० ते ९.३० वा.चे दरम्यान चित्रीकरण करून पुंन्हा आपली बॅग पोलीस कर्मचारी यांचे जवळून घेवुन मारूती मंदिराकडे जात असल्याचे सीसी.टिव्ही फुटेज मध्ये निदर्शनास येत आहे.

तथापी सदर घटनेबाबद सुरक्षा निरीक्षक संजय पाटणी यांना कळविले,तसेच साईमंदिर सुरक्षा पोलीस उपनिरीक्षक श्री लाड यांचे निदर्शनास आणून दिली.असता श्री लाड यांनी समक्ष सीसी.टिव्ही फुटेज मध्ये कैद झालेले चित्रीकरण तपासले व सदर घटनेबाबत वरिष्ठानां कळवितो असे सांगितले.

**तसेच** श्री भगवान सि.रजपुत कायम कर्मचारी संरक्षण विभाग यांचा दि.१९/०२/२०२१ रोजी खुले नाटयगृह परिसरात घडलेल्या घटनेबाबत लेखी खुलासा दि.१९/०२/२०२१ रोजी सकाळी ०४ ते १२ डयुटी चावडी व्दारकामाई परिसरात करत असता,अनोळखी व्यक्तीने व्दारकामाई समोर ड्रोन कॅमे-याचे सहाय्याने छायाचित्रण केलेले आहे.अशी माहिती आम्हांला मिळाली परंतु सदर पॉईंटवर गेलो असता कुणीही इसम आढळून आला नाही.असे नमुद केले आहे.

**त्याचप्रमाणे** श्री बाळासाहेब आवारे कंत्राटी सुरक्षा गार्ड साईप्रसाद परिसर यांचा दि.१९/०२/२०२१ रोजी घडलेल्या घटनेबाबत लेखी खुलासा दि.१९/०२/२०२१ रोजी माझी डयुटी ०४ ते १२ गेट नं.०४ ते चावडी परिसर पेट्रोलींग डयुटी होती .पेट्रोलिंगच्या दरम्यान सदर परीसरात विक्रेते,फेरिवाले,भिक्षेकरी आणि इतर अनधिकृत व्यक्तिंना येण्यास मज्जाव करतो.तसेच भक्तांनी विचारलेल्या प्रश्नांना नम्रपणे माहीती देणे.

सदर दिवशी ०९.३० वाजेच्या दरम्यान कुणी अनोळखी व्यक्तीने व्दारकामाई परीसराचे ड्रोन कॅमे-याने छायाचित्रण केले अशी माहीती आंम्हाला मिळाली.सदर वेळेत आंम्ही गेट नं.०४ कडून व्दारकामाई परीसराकडे येतच होतो.त्यामुळे सदर इसम आंम्हास तेथे आढळून आलेला नाही. असे नमुद केले आहे.

सदर कालावधीतील CCTV फुटेज पहाणी केली असता उक्त घटनेचे गांर्भिर्य तसेच साईमंदिराची सुरक्षा लक्षात घेता सदर ठिकाणी कर्तव्यावर असलेले पोलीस कर्मचारी यांनी सदर इसमास ड्रोन कॅमे-याचे सहाय्याने केलेले चित्रीकरण करणेस अटकाव करणे आवश्यक होते परंतु पोलीस कर्मचारी यांनी तसे केल्याचे निदर्शनास येत नाही,करीता सदर घटनेची पुंन्हा पुनरावृ-ती होवु नये करिता संस्थानचे सर्व सुरक्षा कर्मचारी यांना रोलकॉलचे वेळी समज/सुचना देता येईल तसेच साईमंदिर परिसरात कर्तव्यावर असलेले सर्व पोलीस कर्मचारी यांना रोलकॉलचे वेळी डयुटी काळात सतर्क राहाणे तसेच संस्थान परिसराचे चित्राकरण करणेकामी संस्थानची पुर्व परवानगीचे पत्र असल्याशिवाव मंदिर व परिसराचे कोणीही बाहेरील व्यक्ती ड्रोन कॅमे-या मार्फत चित्रीकरण करणार नाही तसेच कोणताही अनुचितप्रकार घडणार नाही.तसेच सदर दिवशी साईमंदिर परीसरामध्ये ड्रोन कॅमे-याव्दारे चित्रीकरण करणा-या इसमाबाबत चौकशी होवून पुढील उचीत कार्यवाही करीता पोलीस निरीक्षक साईमंदिर सुरक्षा यांना पत्राने कळविलेले आहे.

त्यानुसार-सदर गुन्हयातील आरोपी याने दिनांक १९/०२/२०२१ रोजी दुपारी १३.०० वाचे सुमारास साईबाबा मंदिर परीसरात ड्रोन उडविले असल्याने शिर्डी पोलीस स्टेशन गुंन्हा रजीस्टर नंबर ७७/२०२० भा.द.वि.कलम १८८.२८७ प्रमाणे दिनांक २२/०२/२०२१ रोजी दाखल झालेला आहे.

**प्रस्ताव -** त्यासअनुसरून साईमंदिर परीसरामध्ये भविष्यात असे प्रकार घडूनये तसेच साईमंदिर व साईभक्तांचे सुरक्षेच्या दृष्टीने महत्वाची बाब असल्याने श्रींचे दर्शनार्थी साईभक्तांची वाढती गर्दी,देशात घडणारे घातपात लक्षात घेता मंदिर व मंदिर सुरक्षा तसेच साईभक्तांची सुरक्षितता ही बाब अतिशय संवेदनशिल आहे सुरक्षा हा विषय धोरणात्मक बाब असून या अगोदर संस्थानास विनावी धमकी देणारे पत्र आणि देशातील काही मंदिरात हिंसाचाराचा देण्यात आलेला इशारा या अनुषांगाने श्री साईबाबा संस्थान मंदिर परीसरामध्ये ड्रोन कॅमे-याने व शुटींग कॅमे-याने शुटींग करणेस बंदी असलेबाबतचे अशयाचे फलक मंदिर परीसरामध्ये लावणेस मान्यता मिळणेबाबत.

**विभागाचा अभिप्राय /स्पष्ट मत** – यापूर्वी जनसंपर्क विभागामार्फत श्री पांडुरंग डी भिगारदिवे ,रा.मुंबई श्रीवैभव जय मातादी फिल्म प्रोडक्शन मुंबई यांचे दि.२९/०७/२०१९ रोजीचे प्राप्त पत्रानुसार दि.३१/०७/२०१९ रोजी श्री साईबाबा संस्थान मंदिर परीसरामध्ये ड्रोन कॅमे-याने शुटींग करणेस परवानगी बाबत प्रस्ताव दि.०४/१२/२०१९ रोजी झालेल्या तदर्थ (Ad-hoc)समितीचे सभेतील विषय नं.५५ श्री साईबाबा संस्थान मंदिर परिसरामध्ये ड्रोन कॅमे-याने व शुटींग कॅमे-याने श्री साईबाबांची गाणी व भजन रेकॉर्डीगची परवानगी बाबत.झालेला **निर्णय क्र.५३४ यावर सविस्तर चर्चा होऊन ,साई भक्तांच्या सुरक्षेच्या दृष्टीकोणतुन सदरचा प्रस्ताव अमान्य करण्यात आला.**

श्री साईमंदिर परीसरात यापुर्वी ड्रोनकॅमेराव्दारे शुटींग घेण्यासाठी परवानगी देण्यात आलेली नाही.तसेच श्रींचे मंदिर व साईभक्तांची सुरक्षितता लक्षात घेता संस्थान परिसराची माहिती गोपनिय ठेवणे आवश्यक आहे. ड्रोनकॅमेराद्वारे शुटींग घेणे हे सुरक्षिततेच्या दृष्टीने योग्य नाही.

तरी साईमंदिर व साईभक्तांचे सुरक्षेच्या दृष्टीने साईमंदिर परीसरामध्ये श्री साईबाबा संस्थान मंदिर परीसरामध्ये ड्रोन कॅमे-याने व शुटींग कॅमे-याने शुटींग करणेस बंदी असलेबाबतचे आशयाचे फलक मंदिर परीसरामध्ये लावणेस मान्यता देणेस मान्येतेकरीता प्रस्ताव मा.तदर्थ समिती (Ad-hoc) पुढे सादर .

(कान्हुराज बगाटे,भा.प्र.से)
मुख्य कार्यकारी अधिकारी,
श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिर्डी.

SEC - meeting 443-220

ERP-279

339

**विषय क्र.- ६**

खरेदी विभाग

"मा.तदर्थ समितीचे सभेपुढे निर्णयार्थ सादर"

विषयः- संस्थानचे स्थायी कर्मचाऱ्यांना गणवेश भत्ता देणेबाबत...

मा. व्यवस्थापन समितीचे दि.२५.०२.२०१७ चे सभेत निर्णय क्रं. ७४ अन्वये संस्थान स्थायी कर्मचारी यांना सुटींग- शर्टींग व शिलाईसह गणवेश जोड देणेकामी रु. ५४,९७,५९६/- चे खर्चास मान्यता मिळाली होती.

तथापी सदर प्रस्ताव दि. १८.१२.२०१७ रोजी प्राप्त झाला होता.त्यावर दि. १४.०२.२०१८ रोजी खरेदी विभागाकडून प्रस्ताव सादर केला होता. तथापी सदर कापड खरेदी ई-निविदेसाठी येणा-या अडचणींबाबत मा. उप जिल्हाधिकारी महोदय यांचेशी दि.०५.०३.२०१८ रोजी झालेले चर्चेत नाशिक महानगरपालिकेकडून कापडाचे तांत्रिक स्पेसिफीकेशन घेण्याचे ठरले होते. त्यानुसार प्राप्त झालेले स्पेसिफीकेशन नुसार दि. १३.०३.२०१८ रोजी प्रथम ई-निविदा प्रस्ताव तयार केला होता. त्यास मान्यता मिळून दि. १२.०४.२०१८ ते दि.०३.०५.२०१८ या कालावधीत प्रथम ई-निविदा प्रक्रीया करण्यात आली होती. तथापी सदर निविदेतील न्युनतम निविदाकार मे. महाराष्ट्र राज्य यंत्रमाग महामंडळ मर्यादित, मुंबई यांचे कापडाचे काही लॅब रिपोर्ट निविदेतील तांत्रिक स्पेसिफीकेशनशी न जुळल्यामुळे दि. ३०.०१.२०१९ चे मा. व्यवस्थापन समितीचे सभेत निर्णय क्रं. ३७४ अन्वये गणवेश कापड खरेदीसाठी फेर ई-निविदा प्रक्रीया करण्याचा निर्णय झाला होता.

त्यानंतर कापडाचे तांत्रिक स्पेसिफीकेशन पुन्हा तपासून ई-निविदा प्रक्रीया करण्याचे निर्देश झाले होते. त्यानुसार स्पेसिफीकेशन Textile Committee Lab, Mumbai यांचेकडून तपासून पुन्हा दुस-यांदा दि.२५.११.२०१९ ते दि. १०.१२.२०१९ या कालावधीत फेर ई-निविदा प्रक्रीया करण्यात आली होती. यामध्ये १० items पैकी २ items चे दर चुकल्याचे मे. खादी ग्रामोद्योग समिती, नवी दिल्ली यांनी कळविल्यामुळे निर्णय क्रं. ११६ दि. २४.०२.२०२० नुसार पुन्हा २ items साठी तिस-यांदा दि. १९.०३.२०२० ते दि. ३१.०३.२०२० या कालावधीत फेर ई-निविदा प्रक्रीया करण्यात आली.

दुस-यांदा फेर ई-निविदा प्रक्रीयेमध्ये मे. आशा, नासिक यांचे दर १० items साठी तर मे. सोनल टेक्स, मुंबई यांचे १ item साठी न्युनतम होते. तर तिस-यांदा केलेल्या निविदाप्रक्रीयेमध्ये मे. श्रध्दा सुनिल गिते, अकोले यांचे दर २ items साठी न्युनतम होते.

सदर तीनही न्युनतम दरधारकांकडून ते न्युनतम असणा-या कापडांचे नमुने घेण्यात आले होते. सदर कापडांच्या नमुन्यांपैकी मे. आशा, नासिक व मे.सोनल टेक्स, नासिक यांचे नमुने दि.०८.१०.२०२० रोजी मा. मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे कक्षात सादर केले होते. त्यावेळी मा. मुख्य कार्यकारी अधिकारी, मा. उपमुख्य कार्यकारी अधिकारी, मा. मुख्यलेखाधिकारी, प्र. अधीक्षक, सामान्यप्रशासन, प्र. अधीक्षक, खरेदी हे उपस्थित होते. सदर बैठकीत मे. आशा, नासिक यांनी सादर केलेले गणवेश कापडाचे नमुने संबंधित विभागांचे प्रतिनिधींना दाखवून अंतिम करण्याचे ठरले होते. परंतु सदर बैठकीत गणवेश कापडाचे दर्जाबाबत चर्चा होऊन नमुना दाखल केलेले कापड हे हलक्या दर्जाचे असलेमुळे ते खरेदी करणे उचित होणार नाही. तसेच हे कापड खरेदी करुन गणवेश शिवल्यास कापड चांगले दर्जाचे नसलेमुळे कापड व शिलाई दोन्ही खर्च वाया जाईल अशी परिस्थिती असलेमुळे मा. मुख्य कार्यकारी अधिकारी महोदय यांनी संस्थान कर्मचा-यांना जे गणवेश द्यावयाचे आहेत. ते चांगल्या दर्जाचे असावेत असे निर्देशित करुन रेमंड सारख्या कंपनीचे कापडाचे गणवेश देणेबाबत सूचना केल्या होत्या.

वरील सुचनेस अनुसरुन रेमंड कंपनीशी संपर्क साधला असता त्यांनी नासिक येथील अधिकृत विक्रेते मे. चंपालाल & कंपनी, यांचे प्रो.प्रा. श्री.निलेश जाजू यांना शिर्डी येथे पाठविले होते. त्यांनी कापडाचे नमुने सादर केले होते. त्यानुसार खर्चाचा अंदाज येण्यासाठी त्यांना Estimate देण्यास सांगितले होते. त्यांनी १३९३ कर्मचा-यांना गणवेश कापड व शिलाईसह रक्कम रु. ४३,२४,९७७/- चे Estimate सादर केले होते. त्यानंतर रेमंड कंपनीने त्यांचे ठाणे येथील अधिकृत विक्रेते मे. कुबेर एंटरप्रायजेस, यांचे प्रो.प्रा. श्री.संजय शिंदे यांना शिर्डी येथे पाठविले होते. त्यांनी ही कापडाचे नमुने सादर केले होते. त्यामुळे मे. कुबेर एंटरप्रायजेस, ठाणे यांनाही खर्चाचा अंदाज येण्यासाठी Estimate देण्यास सांगितले होते.

मे. कुबेर एंटरप्रायजेस, ठाणे यांनी रक्कम रु. ६६,२७,४३४/- चे प्रथम Estimate सादर केले होते. तथापी ते जरा जास्त वाटत असल्यामुळे पुन्हा सुधारित Estimate देण्यास कळविण्यात आले होते. त्यानुसार त्यांनी दि.०३.०६.२०२१ रोजी सुधारित केलेले रक्कम रु. ५९,८५,८४९/- इतक्या रकमेचे Estimate सादर केले आहे. तथापी संस्थानला एखाद्या विक्रेत्याकडून थेट कापड खरेदी व शिलाईचे काम करुन घेता येणार नाही. तसेच वरील नमूद केलेप्रमाणे ३ वेळेस निविदा प्रक्रीया करुन ही समाधानकारक गणवेश कापड उपलब्ध होत नाही ही वस्तुस्थिती आहे. तसेच गणवेश शिलाई करुन घेणेचा मागील अनुभव विचारात घेता ते ही समाधानकारक होत नाही. त्यामुळे कर्मचा-यांना वर्ग वाईज गणवेशाचा ड्रेस कोड निश्चित करुन तसेच कापडाचा दर्जा ठरवून देऊन गणवेश जोड खरेदीकामी गणवेश भत्ता देण्याचे

वरील चर्चेत ठरले आहे. सदर गणवेश दर्जा व गणवेश वर्ग निहाय ड्रेस कोड ठरवून दिल्यामुळे त्या दर्जाप्रमाणे कर्मचारी त्यांचे पसंतीप्रमाणे बाजारातुन कापड खरेदी करून वर्गनिहाय ड्रेस कोड प्रमाणे गणवेश कोणाकडून ही शिवून घेतील. संस्थानने ठरवून दिल्याप्रमाणे कर्मचा-यांनी खरेदी करावयाच्या कापडाचा दर्जा व ड्रेस कोड यानुसार खरेदी करणे कर्मचा-यांवर बंधनकारक राहील. कमी दर्जाचे व ड्रेस कोड प्रमाणे नसलेला गणवेश ग्राह्य धरला जाणार नाही. त्यामुळे गणवेशाचा दर्जा व शिलाईही उत्तम होईल. तसेच कापड चांगले दर्जाचे घेतलेमुळे त्याचे life वाढेल. मागील गणवेश खरेदी व गणवेश शिलाईचा अनुभव विचारात घेता गणवेश भत्ता देण्याची बाब प्रायोगिक तत्त्वावर करणे उचित होईल असे वाटते.

ज्या संस्थान कर्मचा-यांना ड्रेस द्यावयाचे आहेत त्यांचा सविस्तर तपशील खालीलप्रमाणे:-

| अ.नं | अधिकारी कर्मचारी तपशील | संख्या | ड्रेस कोड |
|---|---|---|---|
| १ | उप कार्यकारी अभियंता, विद्युत विद्युत पर्यवेक्षक, जनसंपर्क अधिकारी, सहाय्यक अभियंता, कृषी अधिकारी, प्र. लेखाधिकारी, अधीक्षक, प्र.अधीक्षक, वरीष्ठ लिपीक- वरिष्ठ लेखापाल, साईलीला सहाय्यक संपादक, तांत्रिक सहाय्यक, कनिष्ठ अभियंता, उप अभियंता | ५१ | फुल शर्ट व पॅन्ट |
| २ | लिपीक टंकलेखक | १७१ | फुल शर्ट व पॅन्ट |
| ३ | सुरक्षा निरीक्षक व पहारेकरी | १३७ | रेग्युलर खाकी सुरक्षा ड्रेस |
| ४ | सफाई कर्मचारी | १३३ | हाफ सफारी |
| ५ | तांत्रीक कर्मचारी व नवीन आलेले फायर सेप्टी कर्मचारी | १३७ | फुल शर्ट व पॅन्ट |
| ६ | फायर सेप्टी विभागातील कर्मचारी | २३ | फुल शर्ट व पॅन्ट |
| ७ | मदतनीस/शिपाई | ६५१ | हाफ सफारी |
| ८ | वॉर्डबॉय / मदतनीस | ८९ | हाफ सफारी |
| ९ | प्र. फायर सेफ्टी ऑफीसर | १ | शर्ट व पॅन्ट |
| | एकूण कर्मचारी संख्या | १३९३ | |

महाराष्ट्र शासनाचे महसूल व वन विभागाने शासन निर्णय क्रमांक एफएसटी-०९/१६/प्र.क्र./४१५/फ-४ दि. ०३.११.२०१६ अन्वये वन विभागातील कर्मचा-यांना गणवेश व त्यासोबतच्या २५ बाबींसाठी वार्षिक रु. ५,१६७/- प्रमाणे गणवेश भत्ता व अनुशंगिक साहित्य खरेदीसाठी देण्यासाठी शासन मान्यता देण्यात आलेली आहे.

तसेच गृह विभागाकडील एमव्हीडी-०४१६/प्र.क्र.१८७/परि-४ दि. २७.०८.२०१८ अन्वये मोटार वाहन विभागातील सहायक मोटार वाहन निरीक्षक/मोटार वाहन निरीक्षक/सहा. प्रादेशिक परिवहन अधिकारी व उपप्रादेशिक परिवहन अधिकारी यांना गणवेश भत्त्यासाठी रुपये ५,०००/- देण्यास मान्यता देण्यात आलेली आहे.

सर्वसाधारण शर्ट व पॅण्ट म्हणजेच १ ड्रेस शिलाईसाठी बाजारात अंदाजे रु.८०० ते ९००/- चे दरम्यान शिलाईचा भाव चालू आहे. त्याप्रमाणे २ ड्रेससाठी अंदाजे रु.१६०० ते १८००/- शिलाई व सध्या कापडाचे बाजारभाव रु. ३,००० ते ३,२००/- मध्ये ०२ ड्रेस साठी कापड अशी मिळून रक्कम रु. ५,०००/- संस्थान कर्मचा-यांना आदा करणेबाबतही वरील चर्चेत ठरले आहे.

वरील शासन निर्णयांच्या धर्तीवर संस्थानकडून संस्थानच्या कर्मचा-यांना चांगले दोन गणवेश उपलब्ध होणेसाठी प्रती अधिकारी/ कर्मचारी रुपये ५,०००/- गणवेश भत्ता म्हणून प्रायोगिक तत्वावर आदा करावी. यासाठी संस्थानच्या खरेदी समितीकडून कापडाचे वरील ड्रेस कोड ठरवून देता येतील व त्याप्रमाणे कापड संस्थानच्या कर्मचा-यांना खरेदी करणेबाबत व संस्थानकडून दिलेले ड्रेसकोड प्रमाणे शिवून घेणेस सुचित करता येईल.

तसेच कापड खरेदीचे दुस-या निविदेतील Specification प्रमाणे मे. आशा, नासिक आणि मे. सोनल टेक्स, मुंबई आणि तिस-या निविदेतील मे. श्रध्दा सुनिल गिते, अकोला यांनी दिलेले कापडाचे नमुने प्रथम दर्शनी समाधानकारक वाटत नसल्यामुळे त्यांना दिलेले इरादापत्र रद्द करावे लागेल. त्यांचे कापडाचे नमुने त्यांना परत करुन, सदर दोन्ही ही ई-निविदा प्रक्रीया रद्द करुन त्यांची सुरक्षा अनामत रक्कम परत करावी लागेल. तसेच पेटीकोट कापडासाठी पुन्हा दरपत्रके मागविता येतील.

गणवेश भत्ता कर्मचा-यांना देणे ही बाब सामान्यप्रशासन विभागाशी संबंधित असल्याने वरील १३९३ कर्मचा-यांना द्यावयाचे गणवेश भत्याची रक्कम अदा करणेची उचित कार्यवाही सामान्य प्रशासन विभागामार्फत करता येईल , गणवेश भत्ता अदा केल्यानंतर ६० ते ९० दिवसांत गणवेश शिवून घेण्याचे बंधन कर्मचा-यांवर ठेवता येईल. कर्मचा-यांनी ड्रेस शिवून घेतले की नाही? याबाबतची जबाबदारी संबंधित विभाग प्रमुखांवर सोपविता येईल. ज्याविभागातील कर्मचा-यांचे ड्रेस शिवून होतील त्याबाबत विभाग

6/2017

प्रमुखांनी खात्री करुन सामान्य प्रशासन विभागाकडे याबाबतचा पूर्तता अहवाल सादर करणेस कळविता येईल. तसेच सामान्य प्रशासन विभागामार्फत या बाबीवर वेळोवेळी पाठ पुरावा करुन नियंत्रण ठेवता येईल.

वरील प्रमाणे १३९३ कर्मचा-यांना गणवेश जोडसाठी गणवेश भत्ता म्हणून रक्कम रु. ५,०००/- प्रमाणे एकूण रु.६९,६५,०००/- (अक्षरी रु. एकोणसत्तर लाख पासष्ट हजार मात्र) खर्च येणार आहे. सदर रक्कम ही रु. पन्नास लाखांपेक्षा जास्त असल्यामुळे मा. तदर्थ समितीची मान्यता मिळाल्यास याकामी मा. उच्च न्यायालयाची ही मान्यता घ्यावी लागेल असे वाटते.

मा. तदर्थ समितीची रविवार दि. १८.०७.२०२१ रोजी संस्थानचे सभेपुढील विषयांबाबत आढावा बैठक झाली. या बैठकीमध्ये संस्थान कर्मचा-यांना गणवेश भत्ता देणेंचे विषयाबाबत चर्चा होऊन मागील वेळेस संस्थानचे गणवेश खरेदी केले होते. त्याकामी किती खर्च झाला होता. याबाबतची माहिती सदर टिपणीमध्ये समाविष्ट करणेबाबत निर्देश झाले होते. त्यास अनुसरुन मागील वेळेस सन २०१४-१५ मध्ये गणवेश कापड खरेदीकामी रु. २७,०१,३५०/- व गणवेश शिलाईकामी रु. ९,०३,५९५/- असा मिळून एकूण रु.३६,०५,१२५/- (अक्षरी रुपये छत्तीस लाख पाच हजार एकशे पंचवीस मात्र)इतका खर्च झाला होता.

वरील वस्तुस्थिती विचारात घेता,

१. संस्थान कायम कर्मचा-यांना वरील महसूल व वन विभागाचे शासन निर्णय क्रमांक एफएसटी-०९/१६/प्र.क्र./४१५/फ-४ दि. ०३.११.२०१६ आणि गृह विभागाकडील एमव्हीडी-०४१६/प्र.क्र.१८७/परि-४ दि. २७.०८.२०१८ अन्वये शासन निर्णयाच्या धर्तीवर दोन गणवेश जोडसाठी प्रायोगिक तत्त्वावर गणवेश भत्ता म्हणून प्रत्येक अधिकारी/ कर्मचारी यांना सामान्य प्रशासन विभागामार्फत कार्यालयीन उचित पूर्तता करुन प्रती कर्मचारी रक्कम रु. ५,०००/- पगारात आदा करणेस व याकामी गणवेश भत्त्यासाठी एकूण येणारे रक्कम रुपये ६९,६५,०००/- मात्रचे खर्चास मान्यता मिळणेस
२. संस्थान कर्मचा-यांना गणवेश खरेदीसाठी कापडाचे नमुने व ड्रेस कोड खरेदी समितीकडून निश्चित करुन देणेस
३. मे. आशा, नासिक आणि मे. सोनल टेक्स, मुंबई आणि मे. श्रध्दा सुनिल गिते, अकोला यांना दिलेले इरादापत्र व दोन्ही ही ई-निविदा प्रक्रीया रद्द करुन त्यांची संस्थानकडे जमा असलेली सुरक्षा अनामत रक्कम परत करणेस
४. पेटीकोट कापडासाठी पुन्हा दरपत्रके मागविणेस
५. सदर खर्चाचे मान्यता मिळणेकामी मा. उच्च न्यायालयाची परवानगी घेणेसाठी विधी विभागामार्फत **Civil Application** दाखल करणेकामी उचित कार्यवाही करणेस

तरी वरील अ.नं. १ ते ५ प्रमाणे प्रस्तावावर निर्णय होणेसाठी सदरचा विषय मा. तदर्थ समितीसमोर सादर.

(कान्हूराज बगाटे, भा.प्र.से)
मुख्य कार्यकारी अधिकारी
श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी

२३/७/२०२१

विषय क्र.- ७८

# मा.तदर्थ (Ad-hoc) समिती सभेपुढील विषयाची टिपणी

श्री साई प्रसादालय विभाग

342

टिप्पणी,

**विषय: श्री साई प्रसादालयातील माहे एप्रिल-२०२० ते मार्च-२०२१ अखेर खादयतेल, वनस्पती तुप, शुद्ध तूप व काजूचे रिकामे डब्यांचा अहवाल...**

**अधिनियम २००४ मधील तरतूद :** अधिनियम २००४ कलम १७ (४) नुसार निरुपयोगी वस्तुंची विल्हेवाट लावणे.

**प्रास्ताविक :-** श्रींचे साईभक्तांना संस्थानचे साईप्रसादालयामध्ये प्रसादभोजनाची सुविधा पुरविली जाते. प्रसादभोजनामध्ये चपाती, पुरी, भाजी, बर्फी इ.पदार्थ दिले जात असून सदरील पदार्थ बनविण्यासाठी खाद्यतेल, गावरान तूप, वनस्पती तूपाचा वापर होत असतो. त्यासाठी १५ किग्रॅ. पत्र्याच्या डब्याचा वापर होत असून मध्यवर्ती भांडार कडून माल पुरवठा होतो व रिकामे झालेल्या डब्यांची अभिलेख कक्षामार्फत विक्री केली जाते.

मा.व्यवस्थापन समिती सभा दि.१७/०७/२०१४ मधील निर्णय क्र.५९२ अन्वये तेला-तूपाचे एकुण डबे, रिकामे झालेले डबे तसेच रिकामे डबे कोठे वापरण्यात आले त्याच्या नोंदी ठेवणेत येऊन, त्याचा मासिक अहवाल मा.कार्यकारी अधिकारी यांचे समोर व वार्षिक अहवाल मा. त्रिसदस्य समितीसमोर सादर करणेत यावा असे ठरलेले आहे. त्यानुसार त्रैमासिक अहवाल वेळोवेळी मा.कार्यकारी अधिकारी यांचेसमोर सादर करणेत येत आहे.

श्री साईप्रसादालय वापरणेत येणारे खाद्यतेल, वनस्पती तूपाचे व प्रसादलाडू विभागाकडील गावरान तूप व काजूचे रिकामे झालेले डबे हे अभिलेख कक्षामार्फत विक्री करण्यात येतात. याव्यतिरीक्त संस्थानमधील स्वच्छता, मंदिर आदी इतर विभागांना वापराकामी व प्रसादालयाचे गिरण्यासाठी काही डबे वापरले जातात.

प्रसादालयासाठी खरेदी करणेत आलेल्या व विक्री तसेच इतर विभागास वापरणेत आलेल्या रिकाम्या डब्यांचा दि.०१ एप्रिल २०२० ते ३१ मार्च २०२१ अखेर ताळमेळाचा तपशिल खालीलप्रमाणे-

| तपशिल | खरेदी व मागील शिल्लक एकुण डबे | | | विक्री/वापरणेत आलेले डबे (०१ एप्रिल २० ते ३१ मार्च २१) | | एकुण खर्च डबे | ३१ मार्च २०२१ रोजी शिल्लक रिकामे डबे |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | ३१ मार्च २०२० रोजी शिल्लक रिकामे डबे | संस्थानसाठी खरेदी करणेत आलेले तेल,तूप व काजूचे डबे (मध्यवर्ती भांडार विभागामार्फत) आवक | एकुण जमा | स्वच्छता, मंदिर, लाडू विभागा साठी वापरणेत/ देणेत आलेले डबे | अभिलेख कक्षामार्फत विक्री करणेत आलेले डबे | | |
| खाद्यतेल | २९९७ | ४५१२ | ७५०९ | ०८ | ७३७० | ७३७८ | १३१ |
| वनस्पती तूप | ८२७ | ४६६ | १२९३ | ३० | १११० | ११४० | १५३ |
| काजू डबे | ०२ | ३३ | ३५ | ३३ | -- | ३३ | ०२ |
| गावरान तूप | ०५ | ७७२ | ७७७ | ७१४ | -- | ७१४ | ६३ |
| **एकुण** | **३८३१** | **५७८३** | **९६१४** | **७८५** | **८४८०** | **९२६५** | **३४९** |

मागील पानावर

उपरोक्त प्रमाणे प्रसादालयात वापरणेत आलेले खादयतेल व वनस्पती तूपाचे ३८ रिकामे डबे हे आरोग्य विभाग व मंदिर विभागास वापरासाठी देणेत आलेले असून काजू डबे व शुद्ध तूपाचे डबे हे लाडू विभागाकडे विक्रीसाठी जमा करणेत आलेले आहे.

| अभिलेख कक्षामार्फत विक्री करणेत आलेले एकुण डबे - | अभिलेख कक्षामार्फत विक्री करणेत आलेल्या रिकाम्या डब्यांची रक्कम- |
|---|---|
| ७३७० + १११० = ८४८० डबे | रु. २,६७,६७६/- |

**विभागाचा अभिप्राय/स्पष्ट मत :-** उपरोक्त प्रमाणे माहे एप्रिल-२०२० ते मार्च-२०२१ अखेर खरेदी विभागामार्फत खरेदी करणेत आलेल्या खादयतेल, वनस्पती तूप, शुद्ध तूप व काजूचे रिकामे डबे अभिलेख कक्षामार्फत विक्री करणे व दैनंदिन वापरणेसाठी देण्यात आलेल्या रिकाम्या डब्यांच्या अहवालाची नोंद घेणेकामी उपरोक्त विषयाची टिप्पणी मा.तदर्थ (Ad-hoc) समिती सभेपुढे निर्णयार्थ सादर.

(रविंद्र ठाकरे)
प्र.मुख्य कार्यकारी अधिकारी
श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिर्डी

विषय क्र.- ७१८

मा. तदर्थ (Ad-hoc) समितीचे सभेपुढील विषयाची टिपणी

श्री साई प्रसादालय विभाग

344

टिप्पणी,

**विषय :- सन २०२०-२०२१ या आर्थिक वर्षातील श्री साई प्रसादालयातील धान्य-कडधान्य व किराणा मालाचे घट-तुटीबाबतचा अवलोकनार्थ अहवाल..**

संदर्भ :-१) महाराष्ट्र शासन, अन्न नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग, मुंबई यांचा शासन निर्णय क्र.गोतुनि/१०९९/१२३६/प्र.क्र.८४०/ना.पु.१६-ब दि.३० नोव्हेंबर, १९९९.

२) मा.व्यवस्थापन समिती सभा दि.०२.०५.२००७ मधील निर्णय क्र.४०५.

३) मा.व्यवस्थापन समिती सभा दि.०७.०७.२००८ मधील निर्णय क्र.५६०.

४) द्रि फुड ऑफ कार्पोरेशन ऑफ इंडीया यांचे संदर्भ क्र.STK/RL/Misc./NZ/11/Vol.III/581 दि.१२.१२.२०१२ चे परिपत्रक.

**अधिनियम २००४ मधील तरतुद :** सन २००४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १४ भाग-४ मध्ये महाराष्ट्र विधान मंडळाचे अधिनियम व राज्यपालांनी प्रस्तावित केलेले अध्यादेश व केलेले विनीयम मधील २१ (१ घ) नुसार भक्तांना जेवण पुरविणे आणि अन्नछत्र चालविणे.

**प्रस्ताविक :** श्री साई प्रसादालयातील प्रसाद-भोजनासाठी लागणारा किराणा माल, धान्य-कडधान्य डाळी इत्यादी माल डिस्टोनर मशिनद्वारे व मनुष्यबळाकरवी साफ करण्यात येतो. गहू, हरबरा दाळ, अखंड मिरची, अखंड हळद, अखंड धने दळल्यानंतर काही प्रमाणात घट येते. त्याचप्रमाणे दळण-कांडन व साफ केल्यानंतर काही प्रमाणात कचरा, खडे, मातेरे निघते. तसेच वातावरणातील बदलामुळेही कडधान्याच्या वजनात घट येते.

प्रसादालयातील किराणा मालाचे घट-तुटीच्या संदर्भातील माहिती खालीलप्रमाणे-

१. संदर्भ क्र.१ मधील **महाराष्ट्र शासनाचे निर्णयानुसार, मुद्दा क्र.१ मध्ये शासकीय गोदामातील धान्य तुटीचे मूल्य निर्लेखित करण्याबाबतच्या आदेशामध्ये शासनाने तुटीची कोणतीही अनुज्ञेय मर्यादा निश्चित केलेली नसून प्रत्येक प्रकरणी गुणवत्तेच्या आधारेच तूट निर्लेखित करणे आवश्यक असल्याचे नमुद केलेले आहे.**

२. प्रसादालयाकडील किराणा मालाचे घट-तुटीबाबत अंतर्गत लेखापरीक्षक यांचे सुचनेनुसार शासकीय संस्था आदीकडून माहिती घेऊन नियमावली तयार करणेत यावी असा निर्णय झालेला असल्याने शासकीय संस्थेकडून माहिती घेऊन श्री लोंगाणी यांचे मार्गदर्शनाने नियमावली करुन घट-तुट दर्शविण्याची कार्यवाही करणेस संदर्भ क्र.२ अन्वये मान्यता मिळालेली होती. त्यानंतर शासकीय संस्था, इतर देवस्थान, सरकारी कारागृह, मिलीटरी कॅम्प, सरकारी अन्नधान्य महामंडळ अशा १० संस्थाना पत्र पाठवून त्यांचेकडे असलेली धान्य कडधान्य व किराणा मालाचे घट-तुटीची पध्दती लिखीत स्वरुपात मागविणेत आलेनंतर नियमावली बनविणेत आलेली होती. त्यास संदर्भ क्र.३ अन्वये मा.व्यवस्थापन समितीचे सभेत मान्यता मिळालेली आहे. सोबत मान्य झालेल्या नियमावलीचे **परिशिष्ट 'अ'** म्हणून सादर केलेले आहे. तेंव्हापासून प्रचलीत नियमावलीप्रमाणे आजतागायत प्रसादालयातील मालाची घट-तुटीची कार्यवाही चालू आहे.

३. संदर्भ क्र.४ मधील **दि फुड कार्पोरेशन ऑफ इंडीया, न्यु दिल्ली** यांचे परिपत्रकामध्ये मध्यवर्ती गहू व तांदुळ साठयामधील घट व तुटीबाबतचे परिपत्रकामध्ये तांदुळाचे घटीबाबत उदाहरण दिलेले असून त्यात For subsequent driage i.e. from 14% moisture level to below, the allowance @ 0.7% for every 1% driage has been allowed असा उल्लेख केलेला आहे. शासनाचे फुड सेफटी ॲक्ट मधील नियमाचा विचार करता प्रसादालयात आलेला मालाचे दळण-कांडन आदीनंतर अल्पशः प्रमाणात घट आलेली आहे.

पान २ वर..

४. **शासनाचे फुड सेफ्टी अॅण्ड स्टॅण्डर्ड अॅक्ट २००६, रुल्स २०११, रेग्युलेशन २०११** मधील नियम २.४.६ मध्ये विविध किराणा मालामध्ये गहू, तांदुळ, कडधान्य, डाळी, मसाला आदी मालास १०% ते १६% आद्रता (Moisture) व इतर वस्तु, बारीक दगड, काडीकचरा आदीस १% (Foreign Matter/Extraneous Matter) प्रमाण शासनाने निश्चीत केलेले आहे. त्याबाबतचे सोबत **परिशिष्ट 'ब'** म्हणून सादर केलेले आहे. हवेतील आद्रता अथवा इतर बाबीमुळे मालाचे वजन कमी होऊ शकते.

५. **सन २०२०-२०२१ मधील घट-तुटीची रक्कम-** मध्यवर्ती भांडार विभागाकडून प्राप्त झालेल्या व प्रसादभोजनासाठी वापरणेत आलेल्या किराणा मालाचे दळण-कांडण आदीमुळे काही प्रमाणात घट आढळून-आलेली आहे. त्यानुसार एकुण खरेदी करणेत आलेला अथवा मध्यवर्ती भांडार विभागाकडून घेणेत आलेला माल, प्रत्यक्ष वापरणेत आलेला माल, त्यात निघालेली घट-तुट, घट-तुटीचे प्रमाण व एकुण रकमेबाबतचा तपशिल सोबतचे **परिशिष्ट 'क'** म्हणून सोबत सादर केलेला आहे.

**विभागाचा अभिप्राय/स्पष्ट मत :-** मा.व्यवस्थापन समिती सभा दि.०७.०७.२००८ मधील निर्णय क्र.५६० मध्ये लेखापरिक्षकांची मान्य झालेल्या नियमावलीतील घट-तुटीचा विचार करता, सन २०२०-२०२१ या आर्थिक वर्षामध्ये श्री साई प्रसादालयातील धान्य, कडधान्य व किराणा मालातील प्रत्यक्ष आलेली घट-तुट ही संस्थानने निश्चित केलेल्या प्रमाणापेक्षा कमी आहे.

तरी उपरोक्त संदर्भ व परिशिष्टाचे अवलोकन करता, प्रसादालयातील धान्य व कडधान्य किराणा मालातील प्रत्यक्ष आलेली घट तुट ही संस्थानने निश्चित केलेल्या प्रमाणापेक्षा कमी आहे. करीता सन २०२०-२०२१ या आर्थिक वर्षामधील श्री साई प्रसादालयातील धान्य, कडधान्य व किराणा माल घट-तुटीची वस्तुनिष्ठ अहवालाची टिपणी मा.तदर्थ (Ad-hoc) समिती सभेपुढे अवलोकनार्थ सादर.

(रविंद्र ठाकरे)
प्र.मुख्य कार्यकारी अधिकारी
श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी

परिशिष्ट 'अ'

## ..किराणा मालाचे घट-तुटीबाबतची नियमावली..

मा.व्यवस्थापन समिती सभा दि.०२.०५.२००७ मधील निर्णय क्र.४०५ अन्वये शासकीय संस्था, इतर देवस्थान, सरकारी कारागृह, मिलीटरी कॅम्प, सरकारी अन्नधान्य महामंडळ अशा १० संस्थाना पत्र पाठवून त्यांचेकडे असलेली धान्य कडधान्य व किराणा मालाचे घट-तुटीची पध्दती लिखीत स्वरुपात माहिती मागविणेत आली होती.

त्यानूसार धान्य कडधान्य व किराणा मालाचे घट-तुटीबाबत खालील तीन शासकीय व धार्मिक देवस्थानांकडून धान्य कडधान्य व किराणा मालाचे प्रचलीत घट-तुटीबाबत माहीती प्राप्त झालेली होती. त्याचा तपशिल खालीलप्रमाणे-

| अ.नं. | संस्थेचे नांव | तपशिल (प्रति क्विंटल घट-तुट) |
|---|---|---|
| ०१. | येरवडा मध्यवर्ती कारागृह, पुणे | ज्वारी-४%, बाजरी-५%, गहू-५%, तांदूळ-२%, सर्व प्रकारच्या डाळी-२%, फळभाजी-५%, पालेभाजी-१०%, ज.लाकूड/कोळसा-५% |
| ०२. | मध्यवर्ती कारागृह, नासिकरोड | साखर व वन.तुप या खाद्यतेलास घट नाही मात्र कडधान्य व डाळी-२% |
| ०३. | गजानन महाराज संस्थान, शेगांव | प्रती क्विंटल ३% ते ५% एवढी घट-तुट दर्शविलेली आहे. |

उपरोक्त सदर पध्दतीचा विचार करुन मा.श्री अभय शास्त्री (सी.ए.), मा.श्री.ए.जी.लोंगाणी, (सी.ए.) हे संस्थानचे अंतर्गत लेखापरिक्षक व मुख्य लेखाधिकारी यांनी संस्थानची घट-तुटीबाबतची खालील नियमावली बनविणेत आलेली आहे.

**१) सन २००७ -२००८ मध्ये प्रसादालयात प्रत्यक्ष आलेली घट-तुट इतर देवस्थान व संस्था यांचेकडील प्रचिलत घट- तुटीचे प्रमाण पाहता आपलेकडील आलेली सरासरी घट-तुट योग्य असून इतरांचे तुलनेने कमी असलेने दर सहा महिन्यानंतर प्रस्तावित घट-तुट नांवे टाकणेत यावी.**

**२) दर सहा महिण्यानंतर प्रत्यक्ष मालाचा साठा व रजिष्टरप्रमाणे दिसणारा मालाचा साठा याची पडताळणी करावी.**

**३) दर सहा महिण्यानंतर प्रत्यक्ष शिल्लक माल व रजिष्टरप्रमाणे दिसणारा साठा याची तपासणी केल्यानंतर तपासणी अंती आलेली घट-तुट प्रस्तावित सरासरी पेक्षा कमी आढळल्यास त्याबाबतचा वस्तुनिष्ठ अहवाल मा. व्यवस्थापन समिती समोर अवलोकनार्थ सादर करावा. मात्र प्रस्तावित सरासरी पेक्षा आलेली घट-तुट जादा असेल तर त्यास मा.व्यवस्थापन समितीची मान्यता घ्यावी.**

## परिशिष्ट 'ब'

### अन्न सुरक्षा आणि मानके अधिनियम अधिनियम २००६, नियम २०११

| अ.नं. | मालाचा तपशिल | As per Food Saftey & Standards Act 2006, Rules 2011, Regulations, 2011 | | | As per Board Resolution | Actual Losses in Store 2020-2021 |
|---|---|---|---|---|---|---|
| | | Section | आद्रता (Moisture) | इतर वस्तु (Extraneous Matter) | घट-तुटीचे प्रमाण | घट-तुटीचे प्रमाण |
| | | | टक्केवारीमध्ये | टक्केवारीमध्ये | टक्केवारीमध्ये | टक्केवारीमध्ये |
| ०१ | गहु | 2.4.6 (2) | 14% | 1% | 3% | 2.13% |
| ०२ | तांदूळ | 2.4.6 (5) | 16% | 1% | 1% | 0.04% |
| ०३ | तुरदाळ | 2.4.6 (10) | 14% | 1% | 1% | 0.01% |
| ०४ | हरबरा दाळ | 2.4.6 (13) | 16% | 1% | 2% | 0.03% |
| ०५ | गुळ | 2.8.4 (1) | 10% | 2% | 1% | 0.07% |
| ०६ | शेंगदाणे | 2.3.47 (1) | 7% | -- | 1% | 0.47% |
| ०७ | अखंड मिरची | 2.9.3 (1) | 11% | 1% | 4% | 3.06% |
| ०८ | अखंड हळद | 2.9.18 (1) | 12% | 1% | 4% | 2.65% |
| ०९ | मोहरी | 2.9.13 (1) | 10% | 2% | 2% | 1.58% |
| १० | जिरे | 2.9.8 (1) | 10% | 3% | 2% | 0.37% |
| ११ | अखंड मसाला | 2.9.20 | -- | 5% | 2.25% | 1.15% |
| १२ | अखंड धने | 2.9.7 (1) | 9% | 1% | 2.50% | 0.32% |
| १३ | खोबरेवाटी | -- | -- | -- | 1% | 0.22% |
| १४ | मैदा | 2.4.2 (1) | 14% | -- | 0.50% | 0.01% |
| १५ | मुग आख्खा | 2.4.6 (8) | 14% | 1% | 1% | 0.22% |
| १६ | मठ आख्खा | 2.4.6 (15) | 16% | 1% | 1% | 0.06% |
| १७ | कच्चे पोहे | -- | ---- | -- | 1% | 0.44% |
| १८ | हिरवी विलायची | | | | 1% | 0.79% |
| १९ | सुंठ (अखंड) | 2.9.11 (1) | 12% | 1% | 5.25% | 5.05% |

## परिशिष्ट 'क'

माहे एप्रिल २०२० ते मार्च २०२१ अखेर किराणा मालाची खरेदी,वापर, घट तुट व त्यानुसार होणारी घट तुटीची रक्कम

| अ.नं. | मालाचा तपशिल | एकुण खरेदी | दि.०१/०४/२०ते दि.३१/०३/२०२१ अखेर प्रत्यक्ष खर्च झालेला माल | मान्य झालेल्या घट-तुटीचे प्रमाण | प्रत्यक्ष घट-तुटीचे प्रमाण | दि.०१/०४/२० ते दि.३१/०३/२०२१ अखेर प्रत्यक्ष आलेली घट-तुट | दर | रक्कम |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | किलो/ग्रॅम | किलो/ग्रॅम | टक्केवारीमध्ये | टक्केवारीमध्ये | किलो/ग्रॅम | रु. पै. | रु. पै. |
| ०१ | गहु | ४१६८१३.००० | ३१०५६९.००० | ३ | २.१३ | ६६२७.००० | २१.६१ | १,४३,२०९.४७ |
| ०२ | तांदूळ | २०६८५८.००० | १४७३९२.००० | १ | ०.०४ | ५८.००० | २९.९१ | १,७३४.७८ |
| ०३ | तुरदाळ | ४१३९६.५०० | २३९२४.५०० | १ | ०.०१ | ३.००० | ८९.०० | २६७.०० |
| ०४ | हरबरा दाळ | २८७८६.५८६ | १७१३०.२८६ | २ | ०.०३ | ५.००० | ६३.६३ | ३१८.१५ |
| ०५ | गुळ | १४८४४.७९० | ९४१५.९९० | १ | ०.०७ | ७.००० | ३३.८० | २३६.६० |
| ०६ | शेंगदाणे | २००९६.५०० | १२७८१.००० | १ | ०.४७ | ६०.००० | ९८.७० | ५,९२२.०० |
| ०७ | अखंड मिरची | ११९६९.६०० | ३६०५.५०० | ४ | ३.०६ | ११०.५०० | ९९.०० | १०,९३९.५० |
| ०८ | अखंड हळद | १२३३३.९५० | २३७८.६०० | ४ | २.६५ | ६३.१५० | ८४.९० | ५,३६१.४३ |
| ०९ | मोहरी | २९०५.९०० | ११११.४५० | २ | १.५८ | १७.५५० | ५१.०० | ८९५.०५ |
| १० | जिरे | ३३३६.७०० | १६९८.७०० | २ | ०.३७ | ६.३०० | १६८.०० | १०५८.४० |
| ११ | अखंड मसाला | १६००.६५० | ६११.८०० | २.२५ | १.१५ | ७.०५० | ३८४.८६ | २,७१३.२६ |
| १२ | अखंड धने | ६३९७.४०० | ३४३७.६०० | २.५० | ०.३२ | १०.९०० | ७०.५० | ७६८.४५ |
| १३ | खोबरेवाटी | ६५५२.८०० | ४६९९.००० | १ | ०.२२ | १०.३०० | १४४.०० | १,४८३.२० |

348

| अ.नं. | मालाचा तपशिल | एकुण खरेदी | दि.०१/०४/१९ ते दि.३१/०३/२०२० अखेर प्रत्यक्ष खर्च झालेला माल | मान्य झालेल्या घट-तुटीचे प्रमाण | प्रत्यक्ष घट-तुटीचे प्रमाण | दि.०१/०४/१९ ते दि.३१/०३/२०२० अखेर प्रत्यक्ष आलेली घट-तुट | दर | रक्कम |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | किलो/ग्रॅम | किलो/ग्रॅम | टक्केवारीमध्ये | टक्केवारीमध्ये | किलो/ग्रॅम | रु. पै. | रु. पै. |
| १४ | मैदा | १६९२९.००० | ८९८०.००० | ०.५० | ०.०१ | १.००० | २४.४५ | २४.४५ |
| १५ | मुग आख्खा | ३०२९३.२५० | १४९६०.२५० | १ | ०.२२ | ३३.००० | ८०.९८ | २,६७२.३४ |
| १६ | मठ आख्खा | २५३१४.५०० | १६३८०.५०० | १ | ०.०६ | १०.००० | ७५.०५ | ७५०.५० |
| १७ | कच्चे पोहे | २९४०.५०० | १०२८.००० | १ | ०.४४ | ४.५०० | ३५.०० | १५७.५० |
| १८ | हिरवी विलायची | २४.०७५ | ६.३५० | १ | ०.७९ | ०.०५० | १६११.०० | ८०.५५ |
| १९ | सुंठ (अखंड) | २१०.६८० | ६६.८२५ | ५.२५ | ५.०५ | ३.३७५ | २७३.०० | ९२१.३७ |
| | | | | | | | एकुण रक्कम रु. | १,७९,५१४.०० |

(अक्षरी रक्कम रुपये- एक लाख एकोंणऐंशी हजार पाचशे चौदा मात्र)

विषय क्र.- ७८

# मा. तदर्थ (Ad-hoc) समितीचे सभेपुढे विचारार्थ सादर

350

## विभाग- श्री साईबाबा इं. मि. स्कुल, शिर्डी

टिपणी:-

विषय – शाळामधील संरचनात्मक बदल व सुधारित निकषांच्या आधारे माध्यमिक विभागासाठी आवश्यक लागणारे शिक्षक मानधन तत्वावर (११ महिने कालावधी) भरणेस मान्यता मिळणेबाबत.....

**सन २००५ चा महाराष्ट्र अधिनियम क्र.४ मधील तरतूद –सन २००४ चा महाराष्ट्र अधिनियम क्र.४ (भाग ४) दि. १७** ऑगस्ट २००४ रोजी राज्यपालांनी संमती दिलेला महाराष्ट्र विधानमंडळाचा प्रसिध्द केलेला अधिनियमा मधील १७ (२ ढ) नुसार सर्व प्रकारच्या धर्मनिरपेक्ष शिक्षणास चालना देईल किंवा तसे करण्यास साहाय्य करील, तसेच शिर्डी येथे वा अन्य ठिकाणी,शैक्षणिक संस्था स्थापन करील.

प्रास्ताविक:- उपरोक्त संदर्भीय क्र. १ शासन निर्णयानुसार बालकांच्या मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार -२००९ च्या अनुषंगाने सर्व व्यवस्थापनाच्या ( स्थानिक स्वराज्य संस्था, शासकीय, खाजगी अनुदानीत, अंशतः अनुदानित इ. सर्व ) नवीन शाळा सुरु करणे, वर्ग जोडणे त्यानुषंगाने शाळांमधील संरचनात्मक बदल करणे आणि संचमान्यतेचे सुधारित निकष विहित करणेबाबतच्या आदेशान्वये –

**२.३ माध्यमिक शाळा ( इयत्ता ९ वी ते १० वी)**

२.३.२ सध्या अस्तित्वात असलेल्या शाळांमध्ये इयत्ता ९ वी व १० वी चे दोनही वर्ग मिळून ४० पेक्षा अधिक विद्यार्थी असल्यास एकूण ३ शिक्षक ( १ भाषा, १ विज्ञान/ गणित, १ समाजशास्त्र) शिक्षक अनुज्ञेय राहतील.

२.३.३ नववी किंवा दहावी कोणत्याही वर्गामध्ये ६० पेक्षा अधिक विद्यार्थी असल्यास एक शिक्षकांचे पद अनुज्ञेय होईल व चाळीशीच्या पटीने विद्यार्थी संख्येस १ शिक्षक अनुज्ञेय राहील.

**२.२ उच्च प्राथमिक शाळा ( इयत्ता ५ वी ते ७ वी किंवा ६ वी ते ८ वी )**

२.२.२ सध्या अस्तित्वात असलेल्या अन्य शाळांमध्ये तीनही वर्ग मिळून ३६ पेक्षा अधिक विद्यार्थी असल्यास एकूण ३ शिक्षक (१ विज्ञान / गणित, १ भाषा, १ समाजशास्त्र) शिक्षक अनुज्ञेय राहतील.

२.२.३ विद्यार्थी संख्या १०५ पेक्षा अधिक झाल्यास ३५ च्या पटीमध्ये १ अतिरिक्त शिक्षक अनुज्ञेय राहील. मात्र प्रत्येक शिक्षकासाठी एक वर्ग खोली असणे आवश्यक आहे. अन्यथा जादा शिक्षक पद मंजूर करु नये.

शासनाच्या उपरोक्त आदेशानुसार श्री साईबाबा इंग्लिश मिडीयम स्कुल, शिर्डी शैक्षणिक वर्ष २०२०-२१ मध्ये इयत्ता ८ वी ते १० वी माध्यमिक शाळा असून एकूण ६३९ विद्यार्थी शिक्षण घेत आहेत. प्राथमिक शाळा ही सकाळचे सत्रात दुपारी १२.३० ते सायं. ०५.३० या वेळेत भरविण्यात येत आहे.

मा. व्यवस्थापन समितीची दि. ०६/०६/२०१९ रोजीचे सभेत विषय नं. ४० अन्वये सन २०१८-१९ चे शिक्षक संच मान्यतेनुसार माध्यमिक विभागासाठी आवश्यक लागणारे सहा. शिक्षक हे कंत्राटी/ आऊटसोर्स पद्धतीने घेण्यास मान्यता मिळणेकामी प्रस्ताव ठेवण्यात आला होता. **निर्णय क्रमांक २९६ अन्वये , " यावर सविस्तर चर्चा होऊन, मा. शिक्षण अधिकारी यांचेकडील मंजूर संच मान्यतेनुसार संस्थानचे कामगार विभागाकडील शैक्षणिक पात्रतेनुसार पात्र उमेदवारांची मुलाखत घेऊन पात्र कंत्राटी कर्मच-यांची सेवा श्री साईबाबा इंग्लिश मिडीयम स्कुलकडे अध्यापन करणेकामी तात्पुरत्या स्वरुपात वर्ग करणेस तसेच बी. ए. बी. एड. इंग्रजी स्पेशल विषय असलेले ०२ शिक्षक व बी. ए. बी. एड. हिंदी स्पेशल विषय असलेला ०१ शिक्षक असे एकूण ०३ शिक्षक बाह्ययंत्रणेमार्फत कंत्राटी पद्धतीने ११ महिने कालावधीसाठी घेण्यास मान्यता देण्यात आली. "**

परंतू संस्थानचे शाळेकरीता यापुर्वी मंजूर असलेल्या आकृतीबंधात सदरचे शिक्षक पदांची मंजूरी नसल्याने व आकृतीबंधाचे मान्यतेचे बाहेर जाऊन पदे भरती करता येत नसल्याने सदरचे पदे भरण्यात आलेली नाही. तथापि मा. वरिष्ठांचे सूचनेनुसार संस्थाचे इतर विभागात काम करणारे व आवश्यक लागणा-या शैक्षणिक अर्हतेनुसार जे कंत्राटी कर्मचारी उपलब्ध झाले त्यांची कागदपत्रे पडताळणी करुन प्रशासकीय मान्यतेने तात्पुरते श्री साईबाबा इंग्लिश मिडीयम स्कुल विभागाकडे त्यांची सेवा वर्ग करण्यात आली व त्यांना अध्यापनाचे कामकाज सोपविण्यात आले. तरीही इतर वर्गांना शिकविणेकामी शिक्षक कमी पडल्याने ५ वर्ग तुकडीचे एकत्रीकरण करुन ४ वर्ग तुकडी करण्यात आल्या. त्यामुळे विद्यार्थ्यांना अध्यापना करण्यात व वैयक्तीक लक्ष देण्यास अनंत अडचणी आल्यात.

पान नं. २ वर....

१) शैक्षणिक वर्ष २०२१-२२ मध्ये आर. टी. ई. अधिनियमानुसार इयत्ता ९ वी व १० वी प्रति वर्ग ६० **विद्यार्थी** याप्रमाणे एकूण ५०९ विद्यार्थ्यांचे एकूण १० वर्ग कार्यरत होत असून एकूण १४ सहा. शिक्षक अध्यापनासाठी गरजेचे आहे. इयत्ता ९ वी व १० वीच्या एकूण ५०९ विद्यार्थ्यांना सध्या **एकूण १०** वर्गखोल्या उपलब्ध असल्याने या १० वर्गखोल्यात हे विद्यार्थी बसविण्यात येणार आहेत. आपल्या शाळेच्या संच मान्येतेमध्ये इयत्ता ९ वी व इयत्ता १० वी चे वर्ग हे माध्यमिक शाळा विभागात मध्ये मोडतात. या वर्गांना अध्यापन हे तासिका पद्धतीचे असल्याने **एकूण १० वर्गांना शिकविणेकामी एकूण १४ शिक्षक असणे गरजेचे आहे.** आजमितीस इयत्ता ९ वी व इयत्ता १० वी चे वर्ग अध्यापन करणेकामी **एकूण ०७ शिक्षक उपलब्ध असून, ०७ शिक्षक भरणे** अत्यंत गरजेचे आहे. **सदरचे वर्ग भरविणेकामी वर्गखोल्यां उपलब्ध आहेत.**

२ ) शैक्षणिक वर्ष २०२१-२२ मध्ये आर. टी. ई. अधिनियमानुसार इयत्ता ८ वी प्रति वर्ग ३५ विद्यार्थी याप्रमाणे ०६ वर्ग कार्यरत होत असून एकूण ०६ सहा. शिक्षक अध्यापानासाठी गरजेचे आहे. सन २०२०-२१ मध्ये इयत्ता ८ वीच्या एकूण २४९ विद्यार्थ्यांना बसविणेकामी सध्या **एकूण** ०६ वर्गखोल्या उपलब्ध असल्याने या ०६ वर्गखोल्यात हे विद्यार्थी बसविण्यात येणार आहेत. आपल्या शाळेच्या संच मान्येतेमध्ये इयत्ता ८ वी चे वर्ग हे माध्यमिक विभागात मध्ये मोडतात. या वर्गांना अध्यापन हे तासिका पद्धतीचे असल्याने **एकूण ०६ वर्गांना शिकविणेकामी एकूण ०७ शिक्षक असणे गरजेचे आहे.** आजमितीस इयत्ता ८ वी चे वर्ग अध्यापन करणेकामी **एकूण ०६ शिक्षक उपलब्ध असून, ०१ शिक्षक भरणे** अत्यंत गरजेचे आहे. **सदरचे वर्ग भरविणेकामी वर्गखोल्यां उपलब्ध आहेत.**

**विभागाची मागणी:-**

**उ) माध्यमिक विभाग - शाळेचा मंजूर आकृतीबंध व २०१८-१९ शिक्षक संच मान्यता मंजूर शिक्षक पदे ---**

| अ.नं. | पदाचा तपशिल | सन २००९ ते २०१७ सुधारित आकृती बंध मंजूर पदे | शै.वर्ष २०१८-१९ मंजूर शिक्षकसंच मान्यता पदे | २००९ आकृती बंधात मंजूर असलेले पदे | सध्या असलेले कंत्राटी शिक्षक पदे १९-२० | एकूण कायम/ कंत्राटी शिक्षक पदे १९-२० | इ. ८ वी ते १०वी एकूण विद्यार्थी संख्या २१-२२ | नियमानुसार एकूण आवश्यक पदे २१-२२ | एकूण रिक्त पदे २१-२२ |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ०१ | मुख्याध्यापक | ०१ | ०१ | ०१ | ०० | ०१ | --- | ०१ | ०० |
| ०२ | पदवीधर इ. ९ वी ते १०वी | ०४ | ०८ | ०५ | ०२ | ०७ | ५०९ | १४ | ०७ |
| ०३ | पदवीधर इ. ८ वी | ०४ | ०४ | ०२ | ०४ | ०६ | २४९ | ०७ | ०१ |
| ०४ | संगणक शिक्षक | ०१ | -- | ०१ | -- | ०१ | --- | ०१ | ०० |
| | एकूण | १० | १३ | ०९ | ०६ | १५ | ६३९ | २३ | ०८ |

ब) **आर.टी.ई.अधिनियमानुसार** अहमदनगर जिल्हा परिषद यांचेकडून एकूण शालेय विद्यार्थी संख्येनुसार माध्यमिक विभागासाठी आवश्यक लागणारे सहाय्यक शिक्षकांची सन २०१६-१७, २०१७ -१८ व २०१८- १९ ची शिक्षक संच मान्यता मिळालेली आहे. सदर संच मान्यतेनुसार एकुण १३ स्थायी पदांना मान्यता देण्यात आलेली आहे.

मात्र सद्यस्थितीत श्री साईबाबा इंग्लिश मिडीयम स्कुल, शिर्डी विभागाकडील माध्यमिक विभागाकडे ०९ स्थायी व ०६ कंत्राटी असे एकुण १५ सहाय्यक शिक्षक कार्यरत आहेत. म्हणजेच सन २०२१-२२ या वर्षी शासन निर्णयाआधारे आवश्यक शिक्षक पदे २३ वजा एकूण कार्यरत शिक्षक पदे १५ = ८ पदे रिक्त आहेत . शैक्षणिक वर्ष २०२१-२२ करीता आवश्यक शिक्षक पदे सदर शासन निर्णयाचे आधारे निश्चित केलेली आहे. तरी एकूण शालेय विद्यार्थी संख्येनुसार माध्यमिक विभागासाठी नवीन शिक्षक पदे भरती करावी लागणार आहे. सदर नवीन शिक्षक भरती मंजूर पदांचा संस्थानचे नवीन आकृतीबंधात समावेश करण्यात येत असून संबधित विभागाकडे नवीन आकृतीबंधा बाबत कळविण्यात आलेले आहे. **. सन २०१९-२० व सन २०२०-२१ ची संच मान्यता अद्यापावेतो मिळालेली नाही.**

क) सन २०२१-२२ शैक्षणिक वर्षात नैसर्गिक विदयार्थी संख्या वाढीनुसार विभागाकडे वर्ग खोल्यां उपलब्ध असून विद्यार्थी संख्या विचारात घेता व विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होऊ नये याकरीता शिक्षक भरती करावी लागणार आहे. सदरचे पदे भरतीकामी जाहिरात देऊन भरती करावी लागणार आहे असे नम्र मत आहे.

सन २०२१-२२ शैक्षणिक वर्षात विद्यार्थ्यांना अध्यापनासाठी उपलब्ध वर्ग खोल्यानुसार किमान **शैक्षणिक अर्हता - बी.ए.बी.एड. (इंग्रजी/भूगोल) ०२ , बी.ए.बी.एड. ( इंग्रजी/इतिहास) ०२, बी.ए.बी.एड. (हिंदी)०१, बी.ए.बी.एड. (मराठी ) ०१, बी.ए.बी.एड. (हिंदी/संस्कृत) ०१, बी.एस्सी.बी.एड(विज्ञान/गणित) ०१, (टी.ई.टी पात्र व शिक्षण इंग्रजी माध्यमात झालेले असल्यास प्राधान्य)** असे एकूण ०८ शिक्षक पदे एकत्रित मानधनावर ११ महिने कालावधी करीता भरती करणे गरजेचे आहे.

पान नं. ३ वर....

**संस्थान अधिनियम /ठराव यानुसार छाननी करुन अनुमान:-** शालेय विद्यार्थी अध्यापन करणे ही महत्वाची बाब विचारात घेता नवीन शिक्षक भरती करणे अत्यंत गरजेचे आहे.

**विभागाची अभिप्राय :-** उपरोक्त प्रास्ताविकात नमुद केलेनुसार श्री साईबाबा इंग्लिश मिडीयम स्कुल माध्यमिक विभाग करीता आवश्यक लागणारे शिक्षक पदे ही ११ महिन्याचे कालावधीपुरते एकत्रित मासिक मानधनावर शैक्षणिक वर्ष २०२१-२२ करीता भरता येतील. सदर शिक्षकांना कुशल कंत्राटी कर्मचारी यांच्या प्रमाणे मासिक वेतन देता येईल. सदर शिक्षक भरतीबाबतची सर्व कार्यवाही ( उदा. वर्तमानपत्रात जाहिरात देणे, मुलाखती घेणे, कार्यादेश देणे ) संस्थानच्या सामान्य प्रशासन विभाग (आस्थापना विभाग) मार्फत करता येईल असे नम्र मत आहे.

**तरी शाळामधील संरचनात्मक बदल व सुधारित निकषांच्या आधारे माध्यमिक विभागासाठी आवश्यकतेनुसार** सन २०२१-२२ शैक्षणिक वर्ष करीता, **शैक्षणिक अर्हता -बी.ए.बी.एड. (इंग्रजी/भूगोल) ०२, बी.ए.बी.एड. ( इंग्रजी/इतिहास) ०२, बी.ए.बी.एड. (हिंदी)०१, बी.ए.बी.एड. (मराठी ) ०१, बी.ए.बी.एड. (हिंदी/संस्कृत) ०१, बी.एस्सी.बी.एड(विज्ञान/गणित) ०१ (टी.ई.टी पात्र व शिक्षण इंग्रजी माध्यमात झालेले असल्यास प्राधान्य) असे एकूण ०८ शिक्षक** एकत्रित मानधनावर (११ महिने कालावधी) करीता भरती करणेकामी **निर्णयार्थ तथा मान्यतेस्तव सादर,**

10/7/21

( कान्हूराज बगाटे , भा.प्र.से.)
**मुख्य कार्यकारी अधिकारी**
श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी

विषय क्र.- ८०

# मा. तदर्थ (Ad-hoc) समितीचे सभेपुढे विचारार्थ सादर
# विभाग- श्री साईबाबा इं. मि. स्कुल, शिर्डी

353

दि. २२/०६/२०२१

विषय – प्राथमिक विभागासाठी शाळा संच मान्यतेनुसार आवश्यक शिक्षक मानधन तत्वावर (११ महिने) घेण्यास मान्यता मिळणेबाबत.....

संदर्भ – १) शालेय शिक्षण व क्रीडा विभाग शासन निर्णय क्र, एसएसएन-२०१५/प्र.क्र.१६/१५/टीएनटी-२ मंत्रालय विस्तार भवन, मुंबई ४०० ०३२ दिनांक २८ ऑगस्ट, २०१५

२) प्राथमिक विभाग जिल्हा परिषद अ. नगर यांचेकडून दि. १०/०५/२०१९ रोजीची प्रत.

३)मा.व्यवस्थापन समिती दि.०२/०२/२०१८ रोजीची सभा निर्णय क्रमांक ९४

४) मा. व्यवस्थापन समितीची दि./ ०६/०६/२०१९ रोजीची सभा निर्णय क्रमांक २९६

सेवेशी सादर,

**सन २००५ चा महाराष्ट्र अधिनियम क्र.४ मधील तरतूद** –सन २००४ चा महाराष्ट्र अधिनियम क्र.४ (भाग ४) दि. १७ ऑगस्ट २००४ रोजी राज्यपालांनी संमती दिलेला महाराष्ट्र विधानमंडळाचा प्रसिध्द केलेला अधिनियमा मधील १७ (२ ढ) नुसार सर्व प्रकारच्या धर्मनिरपेक्ष शिक्षणास चालना देईल किंवा तसे करण्यास साहाय्य करील, तसेच शिर्डी येथे वा अन्य ठिकाणी,शैक्षणिक संस्था स्थापन करील.

**प्रास्ताविक:-** उपरोक्त संदर्भीय क्र. १ शासन निर्णयानुसार बालकांच्या मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार -२००९ च्या अनुषंगाने सर्व व्यवस्थापनाच्या ( स्थानिक स्वराज्य संस्था, शासकीय, खाजगी अनुदानीत, अंशतः अनुदानित इ. सर्व ) नवीन शाळा सुरु करणे, वर्ग जोडणे त्यानुषंगाने शाळांमधील संरचनात्मक बदल करणे आणि संचमान्यतेचे सुधारित निकष विहित करणेबाबतच्या आदेशान्वये –

**उच्च प्राथमिक विभाग:-**

**२.२ उच्च प्राथमिक शाळा ( इयत्ता ५ वी ते ७ वी किंवा ६ वी ते ८ वी )**

२.२.२ सध्या अस्तित्वात असलेल्या अन्य शाळांमध्ये तीनही वर्ग मिळून ३६ पेक्षा अधिक विद्यार्थी असल्यास एकूण ३ शिक्षक (१ विज्ञान / गणित, १ भाषा, १ समाजशास्त्र) शिक्षक अनुज्ञेय राहतील.

२.२.३ विद्यार्थी संख्या १०५ पेक्षा अधिक झाल्यास ३५ च्या पटीमध्ये १ अतिरिक्त शिक्षक अनुज्ञेय राहील. मात्र प्रत्येक शिक्षकासाठी एक वर्ग खोली असणे आवश्यक आहे. अन्यथा जादा शिक्षक पद मंजूर करु नये.

**प्राथमिक विभाग:-**

**२.१ प्राथमिक शाळा ( इयत्ता १ ली ४ थी किंवा इयत्ता १ ली ते ५ वी. )**

२.१.१ शाळेमधील सर्व विद्यार्थी मिळून ६० पर्यंत २ शिक्षक, त्यानंतर वाढ होणा-या प्रत्येक ३० विद्यार्थ्यांमागे ०१ अतिरिक्त शिक्षक.

शासनाच्या उपरोक्त आदेशानुसार श्री साईबाबा इंग्लिश मिडीयम स्कुल, शिर्डी शैक्षणिक वर्ष २०२०-२१ मध्ये इयत्ता १ ली ते ७ वी प्राथमिक शाळा असून एकूण १७२१ विद्यार्थी शिक्षण घेत आहेत. प्राथमिक शाळा ही सकाळचे सत्रात सकाळी ०७.१५ ते दुपारी १२.१५ या वेळेत भरविण्यात येत आहे.

मा.व्यवस्थापन समिती दि.०२/०२/२०१८ रोजीचे सभेत विषय नं.२० अन्वये शैक्षणिक संकुलातील आकृतीबंध शिक्षणाधिकारी/शिक्षण उपसंचालकांकडून मंजूर करण्यात येणा-या शिक्षक संचाप्रमाणे करण्यास मान्यता मिळणेबाबत प्रस्ताव ठेवण्यात आला होता. त्यानुसार **निर्णय क्रमांक ९४ अन्वये यावर सविस्तर चर्चा होऊन, शैक्षणिक संकुलाकडील आकृतीबंध शिक्षणाधिकारी/शिक्षण उपसंचालकांकडून मंजूर करण्यात येणा-या शिक्षण संचाप्रमाणे करण्यास मान्यता देण्यात आली. परंतू याकामी विधी व न्याय विभाग,महाराष्ट्र शासन यांची पूर्वपरवानगीसाठी प्रस्ताव सादर करण्यात यावा,असे ठरले.**

मा. व्यवस्थापन समिती दि. ०६/०६/२०१९ रोजीचे सभेत विषय नं. ३९ अन्वये सन २०१८-१९ चे शिक्षक संच मान्यतेनुसार प्राथमिक विभागासाठी आवश्यक लागणारे सहा. शिक्षक हे कंत्राटी/ आऊटसोर्स पद्धतीने घेण्यास मान्यता मिळणेकामी प्रस्ताव ठेवण्यात आला होता. **निर्णय क्रमांक २९६ अन्वये , " यावर सविस्तर चर्चा होऊन, मा. शिक्षण अधिकारी यांचेकडील मंजूर संच मान्यतेनुसार प्राथमिक विभागासाठी शैक्षणिक वर्ष २०१९-२० मध्ये शैक्षणिक अर्हता - एस.एस.सी. / एच. एस. सी. डी.एड (इंग्रजी माध्यम) असलेले एकूण ४ तसेच बी. एस्सी. बी.एड – १, बी. ए. बी. एड. -२ ( हिंदी, मराठी) असे एकूण ७ शिक्षक बाह्ययंत्रणेमार्फत कंत्राटी पद्धतीने ११ महिने कालावधीसाठी घेण्यास मान्यता देण्यात आली. "**

परंतू संस्थानचे शाळेकरीता यापुर्वी मंजूर असलेल्या आकृतींबंधात सदरचे शिक्षक पदांची मंजूरी नसल्याने व आकृतीबंधाचे मान्यतेचे बाहेर जाऊन पदे भरती करता येत नसल्याने सदरचे पदे भरण्यात आलेली नाही. तथापि मा. वरिष्ठांचे सूचनेनुसार संस्थाचे इतर विभागात काम करणारे व आवश्यक लागणा-या शैक्षणिक अर्हतेनुसार जे कंत्राटी कर्मचारी उपलब्ध झाले त्यांची कागदपत्रे पडताळणी करुन प्रशासकीय मान्यतेने तात्पुरते श्री साईबाबा इंग्लिश मिडीयम स्कुल विभागाकडे त्यांची सेवा वर्ग करण्यात आली व त्यांना अध्यापनाचे कामकाज सोपविण्यात आले. तरीही इतर वर्गांना शिकविणेकामी शिक्षक वर्ग कमी पडल्याने ५ वर्ग तुकडीचे एकत्रीकरण करुन ४ वर्ग तुकडी करण्यात आल्या. त्यामुळे विद्यार्थ्यांना अध्यापना करण्यात व वैयक्तीक लक्ष देण्यास अनंत अडचणी आल्यात.

१ ) शैक्षणिक वर्ष २०२१-२२ मध्ये आर. टी. ई. अधिनियमानुसार इयत्ता ६ वी व ७ वी प्रति वर्ग ३५ विद्यार्थी याप्रमाणे १४ वर्ग कार्यरत होत असून एकूण १४ सहा. शिक्षक अध्यापनासाठी गरजेचे आहे. इयत्ता ६ वी व ७ वीच्या एकूण ४८४ विद्यार्थ्यांना सध्या एकूण १० वर्गखोल्या उपलब्ध असल्याने या १० वर्गखोल्यात हे विद्यार्थी बसविण्यात येणार आहेत. आपल्या शाळेच्या संच

मान्येतेमध्ये इयत्ता ६ वी व इ. ७ वी चे वर्ग हे उच्च प्राथमिक विभागात मध्ये मोडतात. या वर्गांना अध्यापन हे तासिका पद्धतीचे असल्याने एकूण १० वर्गांना शिकविणेकामी एकूण १४ शिक्षक असणे गरजेचे आहे. आजमितीस उच्चप्राथमिक विभागाकडे अध्यापन करणेकामी एकूण १३ शिक्षक उपलब्ध असून, ०१ शिक्षक भरणे अत्यंत गरजेचे आहे. **सदर १० वर्ग भरविणेकामी वर्गखोल्यां उपलब्ध आहेत.**

१ ) शैक्षणिक वर्ष २०२१-२२ मध्ये आर. टी. ई. अधिनियमानुसार इयत्ता १ ली ते ५ वी प्रति वर्ग ३० विद्यार्थी याप्रमाणे ४१ वर्ग कार्यरत होत असून ४१ सहा. शिक्षक अध्यापानासाठी गरजेचे आहे. सन २०२१-२२ मध्ये इयत्ता १ ली ते ५ वीच्या एकूण १२३४ विद्यार्थ्यांना बसविणेकामी सध्या **एकूण** २५ वर्गखोल्या उपलब्ध असल्याने या २५ वर्गखोल्यात हे विद्यार्थी बसविण्यात येणार आहेत. आपल्या शाळेच्या संच मान्येतेमध्ये इयत्ता १ ली ते इयत्ता ५ वी चे वर्ग हे प्राथमिक विभागात मध्ये मोडतात. या वर्गांना अध्यापन हे १ वर्ग ०१ शिक्षक ही पद्धती असल्याने एकूण २५ वर्गांना शिकविणेकामी एकूण २५ शिक्षक असणे गरजेचे आहे. आजमितीस प्राथमिक विभागाकडे अध्यापन करणेकामी एकूण २४ शिक्षक उपलब्ध आहेत, **परंतू त्यापैकी माहे ३० जून२०२० अखेर ०१ सहा. शिक्षक सेवानिवृत्त झाले आहेत, सदरची जागा रिक्त असल्याने सदर वर्गाला शिकविणेकामी शिक्षकाची अडचण भासणार आहे. तसेच माहे जून २०२१ पासून नवीन शैक्षणिक वर्ष सुरु होत असल्याने ०१ शिक्षक भरणे अत्यंत गरजेचा आहे. सदरचे २५ वर्ग भरविणेकामी वर्गखोल्यां उपलब्ध आहेत.**

विभागाची मागणी:-

ई) प्राथमिक विभाग - शाळेचा मंजूर आकृतीबंध व २०१८-१९ शिक्षक संच मान्यता मंजूर शिक्षक पदे ---

| अ.नं. | पदाचा तपशिल | सन २००९ ते २०१७ सुधारित आकृती बंध मंजूर पदे | शै.वर्ष २०१८-१९ शिक्षक संच मान्यता पदे | सध्या कार्यरत शिक्षक पदे कायम | सध्या कार्यरत शिक्षक पदे कंत्राटी | एकूण कार्यरत शिक्षक संख्या | इ. १ली ते ७ वी एकूण विद्यार्थी संख्या सन-२०२१-२२ | विद्यार्थी संख्ये नुसार आवश्यक पदे | एकूण रिक्त पदे | आवश्यक शिक्षक संख्या |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | मुख्याध्यापक | ०१ | ०१ | ०१ | ०० | ०१ | --- | ०१ | ०० | ०० |
| २ | उपमुख्याध्यापक | ०० | ०१ | ०० | ०० | ०० | --- | ०१ | ०१ | ०० |
| ३ | पर्यवेक्षक | ०० | ०२ | ०० | ०० | ०० | --- | ०२ | ०२ | ०० |
| ४ | पदवीधर ६ वी ते ७ वी | ०४ | १५ | १० | ०३ | १३ | ४८४ | १४ | ०१ | ०१ |
| ५ | अ पदवीधर १ ली ते ५ वी | १८ | ४२ | ११ | ११ | २२ | १२३४ | ४१ | १९ | ०१ |
| ६ | संगणक शिक्षक | ०१ | -- | ०१ | ०१ | ०२ | --- | ०० | ०० | |
| | एकूण | २४ | ६१ | २३ | १५ | ३८ | १७१८ | ५९ | २३ | ०२ |

ब) **आर.टी.ई.अधिनियमानुसार** अहमदनगर जिल्हा परिषद यांचेकडून एकूण शालेय विद्यार्थी संख्येनुसार प्राथमिक विभागासाठी आवश्यक लागणारे सहाय्यक शिक्षकांची सन २०१६-१७, २०१७ -१८ व २०१८- १९ ची शिक्षक संच मान्यता मिळालेली आहे. सदर संच मान्यतेनुसार एकुण ६१ स्थायी पदांना मान्यता देण्यात आलेली आहे.

मात्र सद्यस्थितीत श्री साईबाबा इंग्लिश मिडीयम स्कुल, शिर्डी विभागाकडील प्राथमिक विभागाकडे २३ स्थायी व १५ कंत्राटी असे एकुण ३८ सहाय्यक शिक्षक कार्यरत आहेत. म्हणजेच शिक्षक संच मान्यतेनुसार एकूण मंजूर पदे ६१ वजा एकूण कार्यरत पदे ३९ = एकूण संच मान्यतेनुसार २३ पदे रिक्त आहेत. शैक्षणिक वर्ष २०२१-२२ करीता आवश्यक शिक्षक पदे सदर शासन निर्णयाचे आधारे निश्चित केलेली आहे. तरी एकूण शालेय विद्यार्थी संख्येनुसार प्राथमिक विभागासाठी नवीन शिक्षक पदे भरती करावी लागणार आहे. सदर नवीन शिक्षक भरती मंजूर पदांचा संस्थानचे नवीन आकृतीबंधात समावेश करण्यात येत असून संबधित विभागाकडे नवीन आकृतीबंधा बाबत कळविण्यात आलेले आहे. **सन २०१९-२० ची संच मान्यता अद्यापावेतो मिळालेली नाही.**

क) सन २०२१-२२ शैक्षणिक वर्षात विभागाकडील उपलब्ध वर्ग खोल्यांची संख्या विचारात घेता व विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होऊ नये याकरीता नवीन शिक्षक भरती करावी लागणार आहे. तसेच इंग्रजी माध्यम असल्याने प्रत्येक पालकाला असे वाटते की, आपल्या मुलाकडे वैयक्तीक लक्ष द्यावे, परंतू विद्यार्थी संख्या मोठयाप्रमाणावर असल्याने वैयक्तीक लक्ष देता येत नाही त्यामुळे काही पालकांचा प्रशासनावर नाराजीचा सुर असतो. सदरचे नवीन रिक्त पदे भरणेकामी वर्तमानपत्रात जाहिरात देऊन भरती करावी लागणार

पान नं.३ वर...

आहे असे नम्र मत आहे. **शैक्षणिक अर्हता -** एच.एस.सी.डी.एड., ( इंग्रजी माध्यम) टी.ई.टी.पात्र – एकूण ०२ शिक्षक पदे एकत्रित मानधनावर (११ महिने कालावधी) करीता भरती करणे गरजेचे आहे.

**संस्थान अधिनियम /ठराव यानुसार छाननी करुन अनुमान:-** शालेय विद्यार्थी अध्यापन करणे ही महत्वाची बाब विचारात घेता नवीन शिक्षक भरती करणे अत्यंत गरजेचे आहे.

**विभागाची अभिप्राय/ स्पष्ट मत:-**

उपरोक्त प्रास्ताविकात नमुद केलेनुसार मा.व्यवस्थापन समिती दि.०२/०२/२०१८ रोजीची सभा निर्णय क्रमांक ९४ अन्वये व इकडील विभागाकडील वस्तूस्थितीचे अवलोकन होऊन, शै.वर्ष सन २०२१-२२ करिता श्री साईबाबा इंग्लिश मिडीयम स्कुल प्राथमिक विभागात शिक्षण विभागाने मंजुर केलेल्या शिक्षक संचमान्यतेनुसार आवश्यक लागणारे शिक्षक पदे हे ११ महिन्याचे कालावधीपुरते एकत्रित मासिक मानधनावर भरता येतील. सदर शिक्षकांना कुशल कंत्राटी कर्मचारी यांच्या प्रमाणे मासिक वेतन देता येईल.सदर शिक्षक भरतीबाबतची सर्व कार्यवाही ( उदा. वर्तमानपत्रात जाहिरात देणे, मुलाखती घेणे, कार्यादेश देणे ) संस्थानच्या सामान्य प्रशासन विभाग (आस्थापना विभाग) मार्फत करता येईल असे नम्र मत आहे.

तरी सन २०२१-२२ शैक्षणिक वर्ष करीता **शैक्षणिक अर्हता - एच.एस.सी.डी.एड., ( इंग्रजी माध्यम) टी.ई.टी पात्र – एकूण ०२ पदे** एकत्रित मानधनावर (११ महिने कालावधी) करीता भरती करणेकामी सदरचा प्रस्ताव मा. तदर्थ (Ad-hoc) समितीचे निर्णयार्थ तथा मान्यतेस्तव सादर.

( कान्हूराज बगाटे,भा. प्र. से. )
**मुख्य कार्यकारी अधिकारी**
श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी

विषय क्र.- ६९

## मा.तदर्थ (Ad-Hoc) समिती सभेसमोर निर्णयार्थ सादर



खरेदी विभाग, श्री साईबाबा हॉस्पिटल

**विषय:- श्री साईनाथ रूग्णालयात नव्याने तयार करण्यात आलेल्या तिस-या मजल्याकरीता मशिनरी/ उपकरणे/ फर्निचर तसेच लिनन खरेदी करणेस व त्याकामी येणा-या अंदाजे रु.२,०२,६०,८३६/- मात्रचे खर्चास प्रशासकीय मान्यता मिळणेबाबत.**

टिपणी;

श्री साईबाबा व श्री साईनाथ रुग्णालयामध्ये रुग्णांच्या संख्येत दिवसेंदिवस मोठया प्रमाणात वाढ होत असून तेथील मुलभूत सोयी-सुविधा फारच कमी पडत असल्यामुळे तत्कालीन मा.तदर्थ समितीचे दिनांक ०४.०२.२०१४ रोजीचे सभेतील निर्णय क्र.८५ अन्वये, श्री साईबाबा व श्री साईनाथ रुग्णालयाच्या आवश्यक सुविधांमध्ये व बेडचे संख्येत वाढ करणेस मान्यता मिळालेली असून, त्यानंतर मा.व्यवस्थापन समितीचे दिनांक २५.०२.२०१७ रोजीचे सभेतील निर्णय क्र.३८ अन्वये, श्री साईनाथ रुग्णालयाच्या दोन्ही इमारतींवर वाढीव एका मजल्याचे बांधकाम करणेसाठी विहीत पध्दतीने ई-निविदा मागविणेस व त्याकामी येणा-या सर्वसमावेशक खर्चास मान्यता देण्यात आलेली होती.

त्यानुसार रुग्णांच्या सोयीसाठी श्री साईनाथ रुग्णालयामधील बेडच्या संख्येत वाढ करणेकामी श्री साईनाथ रुग्णालयाच्या दोन्ही इमारतीवरील वाढीव मजल्याचे काम अंतीम टप्प्यात असून तेथे Medical ICCU -11 Bed, Deluxe Room 4 Bed, FMW-25 Bed, MMW-25 Bed, Male Ortho-20 Bed, Female Ortho-20 Bed, Ortho O.T.-02 Bed, Conference Hall-01 व 08 Doctor room तयार करण्यात आलेले आहे. यास अनुसरुन श्री साईनाथ रुग्णालयाने वाढीव तिस-या मजल्याकरीता आवश्यक असणा-या मशिनरी/ उपकरणे/ फर्निचर तसेच लिनन खरेदीची मागणी इकडील विभागाकडे केलेली आहे.

सदर साहित्य खरेदी करणेकामी येणारा अंदाजे खर्च निश्चित करणेसाठी बायोमेडीकल विभागामार्फत पुरवठाधारकांकडून ई-मेल व्दारे अंदाजे खर्चाचे दरपत्रक मागविण्यात आलेले होते. त्यानुसार पुरवठाधारकांनी ई-मेलद्वारे खालीलप्रमाणे दर दिलेले आहेत.

०१) Machinery/Equipment

| S. N. | Item Description | Qty. | Rate per Unit in Rs. | LAMC for Next 5 Years after Warranty Period | Rate per Unit in Rs. | LAMC for Next 5 Years after Warranty Period | Average Rate Per in Rs. | | Total Amount in Rs. Machine + Warranty 1 year + LAMC |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | | Machine Cost in Rs. | LAMC Price in Rs. | |
| 1 | Boyles Machine with Ventilator | 2 | Envision Biomedical Company, Pune | | Pioneer Healthcare & Consultant, Aurangabad | | | | |
| | | | 1019200/- | 327782/- | 865000/- | 94400/- | 942100/- | 211091/- | 2306382/- |
| 2 | Cautery Machine | 2 | Pioneer Healthcare & Consultant, Aurangabad | | Ethicon | | | | |
| | | | 600000/- | 70800/- | 878825/- | 231476/- | 739412.50 | 151138/- | 1781101/- |
| 3 | Fully Auto Autoclave Machine (18KW) | 2 | Vida Life Science, Pune | | Soul Sterile Industry, Ahmedabad | | | | |
| | | | 767000/- | 180371/- | 436600/- | 186583/- | 601800/- | 183477/- | 1570554/- |
| 4 | Battery Operated Drill Machine | 1 | MDE, Pune | | Manman, Pune | | | | |
| | | | 420000/- | - | 501630/- | - | 460815/- | | 460815/- |
| 5 | Multipara Monitor with IBP,ETCO2 | 2 | Global Medicare System, Nashik | | Envision Biomedical Company, Pune | | | | |
| | | | 273000/- | 84449/- | 324800/- | 104458/- | 298900/- | 94454/- | 786708/- |
| 6 | Biphasic Defibrillator | 2 | Envision Biomedical Company, Pune | | Pioneer Healthcare & Consultant, Auarngabad | | | | |
| | | | 280000/- | 90049/- | 210000/- | 26550/- | 245000/- | 58300/- | 606600/- |
| 7 | Ultrasonic Cleaner | 1 | Periclave, Mumbai | | Precision Medicare Services, Kopargaon | | | | |
| | | | 328040/- | - | 153400/- | - | 240720/- | - | 240720/- |

| S. No | Item Description | Qty. | Rate per Unit in Rs. | LAMC for Next 5 Years after Warranty Period | Rate per Unit in Rs. | LAMC for Next 5 Years after Warranty Period | Average Rate Per in Rs. Machine Cost in Rs. | Average Rate Per in Rs. LAMC Price in Rs. | Total Amount in Rs. Machine + Warranty 1 year + LAMC |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 8 | Multipara Monitor 5 para (Ortho O.T-2+Deluxe Ward-4) | 6 | Global Medicare System, Nashik | | Envision Biomedical Company, Pune | | | | |
| | | | 168000/- | 54029/- | 173600/- | 55830/- | 170800/- | 54929.50 | 1354377/- |
| 9 | Minor OT Operation Table simple | 1 | Precision Medicare Services, Kopargaon | | Penta Medilab Tech. Chemical, Tamilnadu | | | | |
| | | | 212400/- | - | 224000/- | - | 218200/- | - | 218200/- |
| 10 | 10 KVA Online UPS | 1 | Power Gun Systems Pvt.Ltd., Thane | | New Tejas Electronics, Ahmednagar | | | | |
| | | | 178016/- | 29500/- | 138900/- | 26550/- | 158458/- | 28025/- | 186483/- |
| 11 | Electric Power Drill system with accessories | 2 | Manman,Pune | | MDE, Pune | | | | |
| | | | 132797/- | | 171203/- | | 152000/- | | 304000/- |
| 12 | 12 Channel ECG Machine | 1 | Precision Medicare Services, Kopargaon | | Gandhi Enterprises, Ahmednagar | | | | |
| | | | 123200/- | 32450/- | 93000/- | 29395/- | 108100/- | 30922.50 | 139022/- |
| 13 | Patient Warmer with Blanket | 4 | Global Medicare System, Nashik | | Pioneer Healthcare & Consultant, Aurangabad | | | | |
| | | | 134400/- | 43224/- | 125950/- | 17700/- | 130175/- | 30462/- | 642548/- |
| 14 | Tourniquett Machine with accessories | 2 | MDE, Pune | | Collateral Medical Pvt.Ltd., Mumbai | | | | |
| | | | 86968/- | - | 62421/- | - | 74695/- | - | 149390/- |
| 15 | Pulse Oximeter | 1 | Hemodiaz Life Science Ltd, Delhi | | Precision Medicare Services, Kopargaon | | | | |
| | | | 31360/- | 8260/- | 35000/- | 29500/- | 33180/- | 18880/- | 52060/- |
| 16 | Syringe Pumps (Ortho O.T-7+Deluxe Ward-8) | 15 | Global Medicare System, Nashik | | Plenum Tech Pvt.Ltd., Nagpur | | | | |
| | | | 29120/- | 9365/- | 28000/- | 9004/- | 28560/- | 9184.50 | 137767.50 |
| 17 | Electric Suction Machine (Ortho O.T-3+Deluxe Ward-3) | 6 | Pravara Life Care Services, Loni | | Precision Medicare Services, Kopargaon | | | | |
| | | | 24780/- | - | 28000/- | - | 26390/- | - | 158340/- |
| 18 | Plaster cutter | 1 | MDE, Pune | | Manman,Pune | | | | |
| | | | 21056/- | - | 9000/- | - | 15028/- | - | 15028/- |
| 19 | Fumigation Machine | 2 | United Service, Mumbai | | Pravara Life Care Services, Loni | | | | |
| | | | 9086/- | - | 14160/- | - | 11623/- | - | 23246/- |
| 20 | Central Suction Trolly | 2 | United Service, Mumbai | | Pravara Life Care Services, Loni | | | | |
| | | | 7670/- | | 12320/- | | 9995/- | | 19990/- |
| 21 | Instrument sterilizer | 1 | Technotech Instrument, Kerala | | Iinnotech, Gujrat | | | | |
| | | | 4760/- | | 2800/- | | 3780/- | | 3780/- |
| 22 | Needle Destoyer | 1 | United Service, Mumbai | | Pravara Life Care Services, Loni | | | | |
| | | | 1623/- | | 1770/- | | 1696/- | | 1696.50 |
| 23 | Nebulizer | 2 | United Service, Mumbai | | Precision Medicare Services, Kopargaon | | | | |
| | | | 1363/- | | 1012/- | | 1188/- | | 2376/- |
| 24 | Shadowless Lamp 2-Dome (LED) | 2 | Vishal Surgical, Equipment co Pvt.Ltd., Mumbai | | Steries (India) Pvt Ltd., Thane | | | | |
| | | | 1232000/- | 88500/- | 1665436/- | 193912/- | 1448718/- | 141206/- | 3179848/- |
| 25 | C-Arm II TV system | 1 | Siemens Healthineers, | | Pioneer Healthcare & Consultant, Aurangabad | | | | |
| | | | 3363000/- | 612341/- | 3200000/- | 586089/- | 3281500/- | 599215/- | 3880715/- |
| | | | | | | | | Total Amt in Rs. | 18221747/- |

S.P.JADHAV.13

०२) **Furniture**

| S. N. | Description | Total Qty. | Shree Impex, Shriram pur | S. Comfort Seating Systems, Pune | Rajneel Distributors, Nashik | Total Amt. in Rs. | Rate per (Average Amt.) | Total Amt. in Rs. |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | Full Fowler Beds with Attach IV Stand - Overall approx dimension: Length 2170mm x Width 1000mm Optional Accessories for ICU Beds: Full Length Collapsible side Railings with SS Tube & MS Frame (Pair), Collapsible side Railings with SS Tube & MS Brackets(Pair), Swing Away Type SS Tube Railings (Pair), Swing Away Type MS Tube Railings (pair), Urine Bag Holder (MS EPC), Chart Holder (MS EPC), PU Foam Mattress – Four Sections | 4 | 10650/- | 8850/- | 10136.20 | 29636.20 | 9878.73 | 39514.93 |
| 2 | Linen Trolley with cover - Linen Trolley without cloth in MS with powder coating. | 20 | 4500/- | 6844/- | 8690.70 | 20034.70 | 6678.23 | 133564.67 |
| 3 | Revolving chair full back rest with side arm with wheel - high back chair for main person. Leather chair with different colour, appropriate for home use, office use etc.: Solid wood with plywood inside structure. Multifunctional mechanism. Tower shape 5 star crome base with dual-wheel casters. Pneumatic seat height adjustment. Armrest: PU paddles armrest. Back can be adjusted. Headrest adjustable. High density, Environmental and harmless sponge, Use top grade metal. Skilfully handwork, modern design. | 15 | 9500/- | | 7670/- | 17170/- | 8585/- | 128775/- |
| 4 | Revolving Chair half back rest with side arm with wheel<br>* With PU Soft handle with metal Strips inside back attach arm rest.<br>* With 50 density moulded foam at seat and back 15mm hot press commercial ply at seat and back.<br>*Tilt Mechanism with front locking<br>* Class three gas lift.<br>* Metal powder coated base<br>* Nylon wheels. | 20 | 3000/- | 7080/- | 6490/- | 16570/- | 5523.33 | 110466.67 |
| 5 | Office Tables – Office Table with Square Tubular Frame 3 Drawer with in one Side & Box with on Shelf on other. Size 60"x 30" | 15 | 6350/- | 8850/- | 6549/- | 21749/- | 7249.67 | 108745/- |
| 6 | Cupboard – SS Cupboard 6 Feet Cupboard Stainless Steel – Size 1981mm x 914mm x 483mm. Gauge of Steel 18 with four Compartment. | 10 | | 21500/- | 12980/- | 34480/- | 172840/- | 172400/- |
| 7 | Iron plain bed- Overall Size: 1880 mm L x 830mm W x 570mm H<br>. Pre-treated and epoxy powder coated<br>.CRCA steel bed | 20 | 4560/- | 4130/- | 4130/- | 12820/- | 4273.33 | 85466.67 |

| S. N. | Description | Total Qty. | Shree Impex, Shriram pur | S. Comfort Seating Systems, Pune | Rajneel Distributors, Nashik | Total Amt. In Rs. | Rate per (Average Amt.) | Total Amt. in Rs. |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 8 | Crash cart trolley with Alcon box - overall dimensions (mm)-690(L)x385(W)x1080/1700 (H)Features – • 6 Polymer Drawers with 6 colours medicine Bins• shelves with SS Top, Monitor Stand with I.V. Stand Rod • O2 Holder with Wooden Pad• Cardiac Message Pad Hook, Epoxy Powder Coated• 100mm Wheels, 4 Pieces (2 With Brake) | 6 | 16750/- | | 16048/- | 32798/- | 16399/- | 98394/- |
| 9 | Bed side Locker with Stainless Steel top wheels with Braked-Bed side Locker-Overall Dimensions (MM)-410 (L)x410(W) x830(H) Features-18mm pre-laminated sheet with PVC2 Drawers 500mm wheels in Legs | 50 | 4318/- | 4130/- | 5310/- | 13758/- | 4586/- | 229300/- |
| 10 | Cardiac Table Overall approx. size:1120mm L x 450mm W x 965mmH.MS tubular framework mounted on four twin wheel, non-rusting castors, 50mm dia. Top 760mml x450mm W made of laminated board. Pre-treated and powder coated. Supplied in kdc. | 20 | 6867/- | | 6612.72 | 13479.72 | 6739.86 | 134797.20 |
| 11 | Patients Stretcher-Overall size: 2080mm L x 610mm W x 840mm H . Pretreated and epoxy powder coated base frame with removable top . Available in stainless steel top & complete stainless steel . 100mm diameter Diagonal wheels with brake | 5 | 5310/- | - | 4130/- | 9440/- | 4720/- | 23600/- |
| 12 | Folding Wheel Chair - Overall size : 680mm L x 1040mm W x 890mm H Seat size : 510mm L x 410mm W x 460mm H . Chrome plated, CRCA tubular framework with cushion and armrest . 200 mm front wheels & 610mm back wheels | 5 | | 5900/- | 6490/- | 12390/- | 6195/- | 30975/- |
| 13 | IV Stand : Heavy MS pipe Base, with stainless steel 8mm bar, with knob, fully epoxy powder coated. | 20 | 2138/- | 2596/- | | 4734/- | 2367/- | 47340/- |
| | | | | | | | Total Amt. in Rs. | 1343339/- |

०३) Linen :

| S. N. | Description | Qty. | Sai Apurv Super stocist, Yeola | Gurukrupa Dresses, Rahuri | Kalika Dress Wear, Manmad | Total Amt. in Rs. | Rate per in Rs. (Average Amt.) | Total Amt. in Rs. |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | Bedsheet | 500 | 275/- | 295/- | 285/- | 855/- | 285/- | 142500/- |
| 2 | Pillow Cover | 200 | 85/- | 95/- | 100/- | 280/- | 93.33 | 18666.67 |
| 3 | Napkin | 50 | 50/- | 60/- | 55/- | 165/- | 55/- | 2750/- |
| 4 | Patient Dress (Male) | 200 | 350/- | 375/- | 365/- | 1090/- | 363.33 | 72666.66 |
| 5 | Patient Dress (Female) | 200 | 350/- | 375/- | 365/- | 1090/- | 363.33 | 72666.66 |
| 6 | Staff Dress (Medium/ Large) | 200 | 400/- | 425/- | 415/- | 1240/- | 413.33 | 82666.66 |
| 7 | Doctor Dress (Medium/ Large) | 100 | 400/- | 425/- | 415/- | 1240/- | 413.33 | 41333.33 |
| 8 | Green Cloth | 500 | 90/- | 95/- | 100/- | 285/- | 95/- | 47500/- |
| 9 | Blue Cloth | 500 | 85/- | 100/- | 90/- | 275/- | 92/- | 46000/- |
| 10 | Pillow | 200 | 360/- | 380/- | 370/- | 1110/- | 370/- | 74000/- |
| 11 | Curtain Cloth | 1000 | 90/- | 100/- | 95/- | 285/- | 95/- | 95000/- |
| | | | | | | | Total Amt. in Rs. | 695750.00 |

सोबत दिलेल्या दरपत्रकाच्या तक्त्यानुसार मशिनरी/ उपकरणे/ फर्निचर तसेच लिनन खरेदीकामी एकूण रु.२,०२,६०,८३६/- (अक्षरी रक्कम रु.दोन कोटी दोन लाख साठ हजार आठशे छत्तीस) मात्र खर्च अपेक्षित आहे.

**संस्थान अधिनियम / ठराव यानुसार छाननी, शासन निर्देश, तांत्रिक, कायदेशीर तसेच आर्थिक विषय इ. छाननी करुन अनुमान:-**

१) अधिनियमातील समितीचे कर्तव्ये व अधिकार क्र. १७-२ (ण)अन्वये मानवजातीच्या कल्याण करणा-या किंवा मानवाला आपत्तीमध्ये साहाय्य करणा-या अन्य कोणत्याही उदात्त कार्यास चालना देईल असा आहे. त्यानुसार संस्थानतर्फे दोन धर्मदाय रुग्णालये चालविण्यात येतात.

२) शासकीय विभागानी करावयाच्या कार्यालयीन खरेदीसाठी कार्यपध्दतीची नियमावली नुसार शासन निर्णय क्र. भांखंस– २०१४/ प्र.क्र. ८२/ भाग– ३/ उद्योग– ४, दि. १ डिसेंबर २०१६ अन्वये परिच्छेद ३.२.– नियमपुस्तिकेनुसार खुली स्पर्धात्मक निविदा प्रक्रिया पार पाडण्यासाठी ज्या निविदांचे अंदाजित मुल्य रू.३,००,०००/- पेक्षा जास्त आहे अशा सर्व निविदा ई-निविदा पध्दतीने काढण्यात याव्यात. संबंधित विभागांना रु.५ हजार पर्यंतच्या किंमतीच्या वस्तु निविदा/ दरपत्रके न मागविता थेट जागेवर खरेदी करण्याची मुभा देण्यात आली आहे. अशा वस्तुंची एकुण खरेदी त्या त्या अर्थिक वर्षात रुपये ५०,०००/- पेक्षा जास्त नसावी.

**विभागाचा अभिप्राय/ स्पष्ट मत:-**

श्री साईनाथ रुग्णालयाच्या दोन्ही इमारतीवर करण्यात आलेल्या वाढीव मजल्याचे काम अंतीम टप्प्यात असून तेथे रुग्णांच्या सोयीचे दृष्टीने आवश्यक असणारे मशिनरी/ उपकरणे/ फर्निचर तसेच लिनन खरेदीकामी एकत्रित रु.२,०२,६०,८३६/- (अक्षरी रक्कम रु.दोन कोटी दोन लाख साठ हजार आठशे छत्तीस) मात्र खर्च आवश्यक आहे. परंतु प्रत्येक आयटेमवाईज खर्चाची रक्कम ही रु.५०,००,०००/- मात्रपेक्षा कमी येत असल्यामुळे मा.औरंगाबाद खंडपीठाची मान्यता घेणे आवश्यक असणार नाही, सबब प्रत्येक आयटेमवाईज ई-निविदा प्रसिध्द करणेस मान्यता मिळावी, तसेच ज्या मशिनरी/ उपकरणे/ फर्निचर व लिनन या साहित्यांची खरेदीकामी येणारी अंदाजे खर्चाची रक्कम रु.३,००,०००/- मात्रपेक्षा कमी आहे, असे साहित्य कोटेशन मागवून खरेदी करता येईल, असे नम्र मत आहे.

श्री साईनाथ रुग्णालयाच्या दोन्ही इमारतीवर करण्यात आलेल्या वाढीव मजल्याचे काम अंतीम टप्प्यात असून तेथे रुग्णांच्या सोयीचे दृष्टीने आवश्यक असणारे मशिनरी/ उपकरणे/ फर्निचर/ लिनन तातडीने खरेदीकामी खालील बाबींस मान्यता मिळावी, ही विनंती.

(०१) महाराष्ट्र शासनाचे खरेदी नियमावलीस अनुसरुन, प्रस्तावित साहित्यांपैकी ज्या साहित्यांची अंदाजे खर्चाची रक्कम प्रत्येकी रुपये तीन लाखपेक्षा जास्त आहे, असे साहित्य विहित पध्दतीने स्वतंत्र ई-निविदा मागवून खरेदी करणेस मान्यता असावी.

(०२) महाराष्ट्र शासनाचे खरेदी नियमावलीस अनुसरुन, प्रस्तावित साहित्यांपैकी ज्या साहित्यांची खरेदीकामी येणारी अंदाजे खर्चाची रक्कम प्रत्येकी रुपये तीन लाख मात्रपेक्षा कमी आहे, असे साहित्य विहीत पध्दतीने आयटेमवाईज कोटेशन मागवून खरेदी करणेस मान्यता असावी.

(०३) सदरहू खरेदीकामी मोठया प्रमाणात प्रसिध्दी मिळणेसाठी महाराष्ट्र राज्यातील जास्त खपाच्या मराठी, हिंदी व इंग्रजी वर्तमानपत्रात तसेच बाहेरील राज्यातील जादा खपाच्या हिंदी व इंग्रजी वर्तमानपत्रामध्ये ई-निविदेची/ कोटेशनची जाहिरात देण्यात येऊन, महाराष्ट्र शासनाच्या खरेदी नियमावलीनुसार सर्व प्रक्रिया राबविणेस मान्यता असावी.

(०४) प्रस्तावित मशिनरी/ उपकरणे/ फर्निचर/ लिनन खरेदीकामी येणा-या एकत्रित अंदाजे रक्कम रु.२,०२,६०,८३६/- (अक्षरी रक्कम रु.दोन कोटी दोन लाख साठ हजार आठशे छत्तीस) मात्रचे खर्चास मान्यता असावी.

तरी श्री साईनाथ रुग्णालयाच्या दोन्ही इमारतींवरील नव्याने करण्यात आलेल्या वाढीव मजल्यामध्ये रुग्णांच्या सोयी-सुविधांसाठी विविध वार्ड/ विभाग सुरु करणेकामी आवश्यक असणा-या मशिनरी/ उपकरणे/ फर्निचर/ लिनन इ.ची खरेदी करणेकामी उपरोक्त ०१ ते ०४ मुद्यास मंजुरी मिळणेस्तव सदरचा प्रस्ताव मा. तदर्थ समितीच्या सभेसमोर सादर.

(कान्हूराज बगाटे, भा.प्र.से.)
मुख्यकार्यकारी अधिकारी
श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी

विषय क्र.- ८२



मा तदर्थ (Ad-hoc) समितीचे सभेसमोरील विषय
विभागाचे नाव - श्री साईबाबा हॉस्पिटल

विषय- श्री साईबाबा व श्री साईनाथ रूग्णालयात कंत्राटी पध्दतीने तात्पुरत्या स्वरूपात नेमणूक केलेल्या वैद्यकीय अधिका-यांना त्यांचे संबंधीत पदासाठी सातव्या वेतन आयोगात मंजुर वेतनश्रेणीनुसार मुळ वेतन व सध्याचे महागाई भत्यानुसार होणारे सुरवातीचे वेतनाइतके एकत्रित मासिक मानधन देणेबाबत . . . .

टिपणी-

आकृतीबंधातील अटी-शर्ती क्र. ३ – "सदर पदांवर नव्याने नियुक्ती करताना समितीने सदर पदाची आवश्यकता व अर्हता याबाबत विस्तृत प्रसिद्धी देऊन सदर पदांवर स्पर्धात्मक परीक्षा घेऊन नियुक्ती करावी." तसेच अट शर्त क्र. ८ मध्ये "समितीने शक्यतो आकृतीबंधातील पदे ही एकत्रित मानधनावर किंवा कंत्राटी पद्धतीने भरावी जेणेकरुन व्यवस्थापन निधीवर भार पडणार नाही" असे नमुद आहे.

मा व्यवस्थापन समिती ठराव क्र-

१) मा व्यवस्थापन समिती दि. ०५/१०/२०१८ रोजीचे सभेतील निर्णय क्र ६०८.

श्री साईबाबा हॉस्पिटल व श्री साईनाथ रूग्णालयात कंत्राटी पध्दतीने तात्पुरत्या स्वरूपात नेमणूक केलेल्या वैद्यकीय अधिका-यांना त्यांचे संबंधीत पदासाठी मंजुर आकृतीबंधामध्ये नमुद असलेल्या वेतश्रेणीनुसार व सध्याचे महागाई भत्यानुसार एकत्रित मानधन देण्यास मान्यता देण्यात आली.

२) मा व्यवस्थापन समिती दि. ०४/१२/२०१९ रोजीचे सभेतील निर्णय क्र ५६८.

यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईबाबा हॉस्पिटल व श्री साईनाथ रूग्णालयातील कंत्राटी पध्दतीने तात्पुरत्या स्वरूपात नेमणूक केलेल्या वैद्यकीय अधिका-यांना त्यांचे संबंधीत पदासाठी सातव्या वेतन आयोगात मंजुर वेतनश्रेणीनुसार मुळ वेतन व सध्याचे महागाई भत्यानुसार मासिक एकत्रित मानधन देणेबाबत सखोल अभ्यास करून सविस्तर प्रस्ताव तदर्थ (Ad-hoc) समितीचे, सभेसमोर सादर करावा, असे ठरले.

प्रस्तावना-

श्री साईबाबा हॉस्पिटल व श्री साईनाथ रूग्णालयात कंत्राटी पध्दतीने तात्पुरत्या स्वरूपात नेमणूक केलेल्या वैद्यकीय अधिका-यांना त्यांचे संबंधीत पदासाठी मंजुर आकृतीबंधामध्ये नमुद असलेल्या (सहाव्या वेतन आयोगानुसार) वेतश्रेणीनुसार व सध्याचे महागाई भत्यानुसार एकत्रित मानधन देण्याबाबतचा प्रस्ताव मा व्यवस्थापन समिती दि. ०५/१०/२०१८ रोजीचे सभेत सादर करणेत आला होता त्यावर निर्णय क्र ६०८ नुसार, श्री साईबाबा हॉस्पिटल व श्री साईनाथ रूग्णालयात कंत्राटी पध्दतीने तात्पुरत्या स्वरूपात नेमणूक केलेल्या वैद्यकीय अधिका-यांना त्यांचे संबंधीत पदासाठी मंजुर आकृतीबंधामध्ये नमुद असलेल्या वेतश्रेणीनुसार व सध्याचे महागाई भत्यानुसार एकत्रित मानधन देण्यास मान्यता देण्यात आली. त्यानुसार दि. ०१/११/२०१८ पासुन मासिक देय मानधन संबंधीत वैद्यकीय अधिका-यांना अदा करणेबाबत दि. ०७/११/२०१८ रोजी आदेश पारीत करणेत आलेला आहे.

श्री साईबाबा हॉस्पिटल व श्री साईनाथ रूग्णालयाकरीता आवश्यक वैद्यकीय अधिका-यांची रिक्त पदे कंत्राटी पध्दतीने तात्पुरत्या स्वरूपात ११ महिने कालावधीसाठी भरणेकामी सन २०१८ ते २०२० मध्ये खालीलप्रमाणे जाहीरात प्रसिध्द करून वॉक इन इंटरव्युव्ह घेणेत आल्या आहेत.

| अ नं | जाहिरात दिनांक | वॉक इन इंटरव्युव्ह दिनांक | जाहीरात केलेले पदे | नेमणूक |
|---|---|---|---|---|
| १ | १५/०२/२०१८ | १३/०३/२०१८ | ३५ | १३ |
| २ | ०८/०८/२०१८ | १४/०८/२०१८ | ५४ | १४ |
| ३ | ०१/०१/२०१९ | ११/०१/२०१९ | ६१ | ३० |
| ४ | २३/०७/२०१९ | ०२/०८/२०१९ | ५२ | ११ |
| ५ | २१/१०/२०२० | १०/११/२०२० | ४१ | १३ |

उपरोक्त तक्त्यात नमुद केलेप्रमाणे वेळोवेळी जाहीरात देऊन आवश्यक संख्येने वैद्यकीय अधिकारी रूग्णालयास मिळालेले नाहीत.

मा व्यवस्थापन समिती दि. ०४/०७/२०१९ रोजीचे सभेतील निर्णय क्र ३७१ नुसार, संस्थान आस्थापनेवरील कायम (स्थायी) कर्मचा-यांना महाराष्ट्र नागरी सेवा सुधारीत वेतन नियम, २०१९ म्हणजेच सातवा वेतन आयोग त्यातील तरतुदीसह व इतर अनुषंगीक बाबीसह दि. ०१/०१/२०१६ पासून पुर्वलक्षी प्रभावाने लागु करणेस मान्यता देणेत आलेली आहे. ०१ जूलै २०१९ चे वेतन सातव्या वेतन आयोगानुसार अदा करणेत आलेले आहे. सहाव्या वेतन आयोगानुसार ज्या दराने व्यवसाय रोध भत्ता देण्यात येत होता त्याच दराने सध्या व्यवसाय रोध भत्ता अदा करणेत येत आहे.

सध्या स्थायी पदावर कार्यरत वैद्यकीय अधिकारी व कंत्राटी पध्दतीने ११ महिने कालावधीसाठी कार्यरत वैद्यकीय अधिकारी यांचे कामाचे स्वरूप सारखेच आहे. मात्र सध्या स्थायी पदावर कार्यरत असलेले वैद्यकीय अधिकारी यांना सातव्या वेतन आयोगानुसार वेतन देण्यात येत असुन त्यांना एच.आर.ए., टी.ए., इत्यादी भत्ते व नियमित वार्षीक वेतनवाढ देण्यात येत आहे. तथापि, कंत्राटी पध्दतीने ११ महिने कालावधीसाठी कार्यरत वैद्यकीय अधिकारी यांना वार्षीक वेतनवाढ देण्यात येत नसुन सध्या सहाव्या वेतन आयोगानुसार होणारे वेतनाइतके (जवळपासचे) मासिक मानधन देण्यात येत असल्याने त्यांचे वेतनात बरीच तफावत आहे.

कंत्राटी वैद्यकीय अधिका-यांनाही सातव्या वेतन आयोगानुसार होणारे वेतनाइतके (जवळपासचे) मासिक मानधन देणे आवश्यक आहे.

श्री साईबाबा व श्री साईनाथ रूग्णालयामध्ये कंत्राटी पध्दतीने तात्पुरत्या स्वरूपात ११ महिने कालावधीकरीता खालीलप्रमाणे वैद्यकीय अधिकारी कार्यरत असुन सध्या त्यांना त्यांचे नावासमोर दर्शविलेप्रमाणे एकत्रित मासिक मानधन देण्यात येत आहे.

| अ नं | वैद्यकीय अधिका-यांचे नाव पदनाम व रूग्णालय | सध्याचे मानधन |
|---|---|---|
| ०१ | ०२ | ०३ |
| १ | डॉ श्रीकांत मधुकर नागरे<br>सिनीअर रेडीओलॉजीस्ट, श्री साईबाबा हॉस्पिटल | रू. ६९,००० |
| २ | डॉ राजेंद्र उत्तमराव बिडगर<br>आर्थोपेडीक सर्जन, श्री साईबाबा हॉस्पिटल | रू. ६९,००० |
| ३ | डॉ प्रसाद रामभाऊ उंबरकर<br>न्युरोसर्जन, श्री साईबाबा हॉस्पिटल | रू. ६९,००० |
| ४ | डॉ विक्रांत विश्वास खैरनार<br>मानसोपचार तज्ञ, श्री साईबाबा हॉस्पिटल | रू. ६९,००० |
| ५ | डॉ गगन सुरेंद्रकुमार शर्मा<br>इंटरव्हेशनल कार्डीओलॉजीस्ट, श्री साईबाबा हॉस्पिटल | रू. ६९,००० |
| ६ | डॉ संदीप नारायणराव देवरे<br>इंटरव्हेशनल कार्डीओलॉजीस्ट, श्री साईबाबा हॉस्पिटल | रू. ६९,००० |

| अ नं | वैद्यकीय अधिका-यांचे नाव पदनाम व रूग्णालय | सध्याचे मानधन |
|---|---|---|
| ०१ | ०२ | ०३ |
| ७ | डॉ नितीन दशरथ ठाकरे<br>कार्डीयाक सर्जन, श्री साईबाबा हॉस्पिटल | रू. ६९,००० |
| ८ | डॉ विद्या मनोहर बोराडे<br>जनरल सर्जन, श्री साईबाबा हॉस्पिटल | रू. ६९,००० |
| ९ | डॉ विजय मुरलिधर थोरात<br>जनरल सर्जन, श्री साईबाबा हॉस्पिटल<br>दि.०४/०५/२०२१ अखेरपासून राजीनामा मंजूर | रू. ६९,००० |
| १० | डॉ शिरीष शशिकांत शेळके<br>ईएनटी सर्जन, श्री साईनाथ रूग्णालय | रू. ६९,००० |
| ११ | डॉ अमित दिपक नाईकवाडे<br>मेडीकल ऑफीसर (आर्थोपेडीक सर्जन), श्री साईनाथ रूग्णालय | रू. ६९,००० |
| १२ | डॉ विशाल धनाजी पटेल<br>मेडीकल ऑफीसर (आर्थोपेडीक सर्जन), श्री साईनाथ रूग्णालय | रू. ६९,००० |
| १३ | डॉ शोभना तुकाराम कोल्हे<br>मेडीकल ऑफीसर (ईएनटी सर्जरी), श्री साईनाथ रूग्णालय | रू. ६९,००० |
| १४ | डॉ शिल्पा दशरथ सोनावणे<br>वरीष्ठ शरीरविकृती शास्त्रज्ञ, श्री साईबाबा हॉस्पिटल | रू. ६९,००० |
| १५ | डॉ प्रिती हिरालाल दोशी<br>स्त्री रोग तज्ञ, श्री साईनाथ रूग्णालय | रू. ६९,००० |
| १६ | डॉ मुकुंद अर्जुन चौधरी<br>न्युरोसर्जन, श्री साईबाबा हॉस्पिटल | रू. ६९,००० |
| १७ | डॉ गायत्रीलक्ष्मी बापुराव नागपुरे<br>सिनीअर ॲनेस्थेसियालॉजीस्ट, श्री साईबाबा हॉस्पिटल | रू. ६९,००० |
| १८ | डॉ अनंतकुमार किशोर भांगे<br>पेडीयाट्रीशियन, श्री साईनाथ रूग्णालय | रू. ६९,००० |
| १९ | डॉ उज्वला लक्ष्मण शिरसाठ<br>पेडीयाट्रीशियन, श्री साईनाथ रूग्णालय | रू. ६९,००० |
| २० | डॉ पोर्णीमा रामराव शेळके<br>वैद्यकीय अधिकारी (दंतरोग), श्री साईबाबा हॉस्पिटल | रू. ५७,००० |
| २१ | डॉ सचिन श्रीहरी यादव<br>ज्युनिअर ॲनेस्थेसियालॉजीस्ट, श्री साईबाबा हॉस्पिटल<br>दि. २४/०२/२०२१ अखेर पासून राजीनामा मंजूर. | रू. ५७,००० |
| २२ | डॉ रोहित राजेंद्र सप्रे<br>ज्युनिअर मायक्रोबायोलॉजीस्ट, श्री साईबाबा हॉस्पिटल | रू. ५७,००० |
| २३ | डॉ स्वप्नाली राम चव्हाण<br>आरएमओ, श्री साईबाबा हॉस्पिटल | रू. ५७,००० |
| २४ | डॉ स्वाधीन किसनराव गाडेकर<br>आरएमओ, श्री साईबाबा हॉस्पिटल<br>दि.०६/०३/२०२१ रोजी नेमणूक संपुष्टात आली. | रू. ५७,००० |
| २५ | डॉ अंजली पदमाकर सोनवणे<br>आरएमओ, श्री साईबाबा हॉस्पिटल | रू. ५७,००० |

| अ नं | वैद्यकीय अधिका-यांचे नाव पदनाम व रूग्णालय | सध्याचे मानधन |
|---|---|---|
| ०१ | ०२ | ०३ |
| २६ | डॉ कल्याणी साहेबराव शिंदे<br>निवासी वैद्यकीय अधिकारी, श्री साईबाबा हॉस्पिटल<br>दि.१९/०६/२०२१ रोजी नेमणूक संपुष्टात आली. | रू. ५७,००० |
| २७ | डॉ प्राची सुनिल जाधव<br>आरएमओ, श्री साईबाबा हॉस्पिटल<br>दि. ०१/०३/२०२१ पासून राजीनामा मंजूर | रू. ५७,००० |
| २८ | डॉ प्रियंका अनंत राऊत<br>आरएमओ, श्री साईबाबा हॉस्पिटल | रू. ५७,००० |
| २९ | डॉ वृषाली सोमनाथ धोंडे<br>आरएमओ, श्री साईबाबा हॉस्पिटल<br>दि. ०१/०३/२०२१ पासून राजीनामा मंजूर | रू. ५७,००० |
| ३० | डॉ अनुराधा भगवत चिंधे<br>आरएमओ, श्री साईबाबा हॉस्पिटल | रू. ५७,००० |
| ३१ | डॉ राहुल दत्तात्रय डोंगरे<br>ज्युनिअर पॅथोलॉजीस्ट, श्री साईनाथ रूग्णालय<br>दि.०६/०३/२०२१ रोजी नेमणूक संपुष्टात आली. | रू. ५७,००० |
| ३२ | डॉ उज्वला भाऊसाहेब काळे<br>मेडीकल ऑफीसर (दंत तज्ञ), श्री साईनाथ रूग्णालय | रू. ५७,००० |
| ३३ | डॉ देविदास लक्ष्मण लव्हाटे<br>आरएमओ, श्री साईनाथ रूग्णालय<br>दि. १२/०२/२०२१ अखेर पासून राजीनामा मंजूर | रू. ५७,००० |
| ३४ | डॉ अभिषेक जयराम खोडे<br>होमिओपॅथी तज्ञ, श्री साईनाथ रूग्णालय | रू. ५७,००० |

उपरोक्त वैद्यकीय अधिकारी यांना वेळोवेळी घेणेत आलेल्या मा व्यवस्थापन समितीचे निर्णयानुसार आकृतीबंधामध्ये संबंधीत पदाचे मंजुर वेतनश्रेणीनुसार (बेसिक+ग्रेड पे+एनपीए) होणारे सुरवातीचे वेतनाएवढे मानधन अ.नं. ०१ ते १९ वैद्यकीय अधिका-यांना सहाव्या वेतन आयोगानुसार वेतनबॅन्ड रू.१५६००-३९१००, ग्रेड पे रू. ६६०० व अ.नं. २० ते ३४ वैद्यकीय अधिका-यांना वेतनबॅन्ड रू.१५६००-३९१०० ग्रेड पे रू. ५४०० या वेतनश्रेणीनुसार होणारे वेतनाईतके मासिक एकत्रित मानधन (तक्ता अ मधील स्तंभ क्र ६ मध्ये नमुद केलेनुसार) देणेत येत आहे. (तसेच साईबाबा हॉस्पिटल व श्री साईनाथ रूग्णालयातील तज्ञ वैद्यकीय अधिका-यांना संस्थान नियमानुसार प्रोत्साहन भत्ता देण्यात येतो).

तक्ता अ

| पे बॅन्ड ग्रेड पे | बेसिक | ग्रेड पे | एन पी ए (ग्रेड पे +मुळ वेतनx३५%) | डीए (ग्रेड पे +मुळ वेतनx१३९%) | एकुण वेतन | सध्याचे एकत्रित मानधन |
|---|---|---|---|---|---|---|
| ०१ | ०२ | ०३ | ०४ | ०५ | ०६ | ०७ |
| रू. १५६००-३९१०० ग्रेड पे रू. ६६०० | १८७५० | ६६०० | ८८७३ | ३५२३७ | रू.६९,४६० | रू.६९,००० |
| रू. १५६००-३९१०० ग्रेड पे रू. ५४०० | १५६०० | ५४०० | ७३५० | २९१९० | रू.५७,५४० | रू.५७,००० |

उपरोक्त वैद्यकीय अधिका-यांना नेमणेत आलेल्या पदांचे मंजुर वेतनश्रेणीनुसार सातव्या वेतन आयोगानुसार मुळ वेतन व सध्याचे महागाई भत्त्यानुसार होणारे एकत्रित मासिक मानधन खालील **तक्ता ब** मधील स्तंभ क्र ०९ मध्ये नमुद केलेप्रमाणे होत आहे.

**तक्ता ब**

| सहाव्या वेतन आयोगातील पे बॅन्ड ग्रेड पे | उपरोक्त तक्त्यातील ११ महिने करीता वैद्यकीय अधिकारी संख्या | सातव्या वेतन आयोगातील सुधारीत | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | वेतनस्तर | बेसिक | ग्रेड पे | एन पी ए | डीए (१७%) | एकुण वेतन | मासिक देय एकत्रित मानधन | एकुण वैद्यकीय अधिकारी मासिक देय वेतन |
| ०१ | ०२ | ०३ | ०४ | ०५ | ०६ | ०७ | ०८ | ०९ | १० |
| रू. १५६००-३९१०० ग्रेड पे रू. ६६०० | १९ | एस-२३ (६७७००-२०८७००) | ६७,७०० | ० | ८,८७३ | ११,५०९ | ८८,०८२ | ८८,००० | १६,७२,००० |
| रू. १५६००-३९१०० रू. ५४०० | १५ | एस-२० (५६१००-१७७५००) | ५६,१०० | ० | ७,३५० | ९,५३७ | ७२,९८७ | ७२,९०० | १०,९३,५०० |

कोरोना विषाणुचा प्रादुर्भाव रोखणेकरिता प्रतिबंधात्मक उपाययोजना करणेकामी महाराष्ट्र शासनाचे सुचनेनुसार श्री साईबाबा संस्थानमार्फत संस्थात्मक विलगीकरण, साईआश्रम फेज २ येथे कोव्हीड केअर सेंटर (CCC) व डेडिकेटेड कोवीड हेल्थ सेंटर (DCHC) तसेच DCH सुरु करणेत आले असुन त्या ठिकाणी श्री साईबाबा व श्री साईनाथ रूग्णालयातील वैद्यकीय अधिकारी, परीचारीका, वॉर्डबॉय, वॉर्डआया, स्वच्छता कर्मचारी पुरविणेत येत आहेत. कोव्हीड सेंटरला ड्युटी केल्यानंतर सदर कर्मचा-यास नियमानुसार क्वारंटाईन रहावे लागते. यामुळे वैद्यकीय अधिका-यांची रूग्णालयास अत्यंत आवश्यकता आहे. मात्र कमी वेतनावर वैद्यकीय अधिकारी ग्रामिण भागात काम करण्यास उत्साही नसतात. वैद्यकीय अधिकारी शासनाच्या वेतनाप्रमाणे वेतनाची अपेक्षा करतात. तक्ता ब मधील स्तंभ क्र ९ मध्ये नमुद वेतन दिल्यास आवश्यक वैद्यकीय अधिकारी मिळण्यास उपयोग होईल, असे नम्र मत आहे.

तरी, उपरोक्त प्रस्तावात नेमणुक केलेल्या सध्या कार्यरत वैद्यकीय अधिका-यांना तसेच येथून पुढे नव्याने नेमणूक करण्यात येणा-या वैद्यकीय अधिका-यांना त्यांचे संबंधीत पदासाठी सातव्या वेतन आयोगात मंजुर वेतनस्तरानुसार मुळ वेतन, एनपीए व सध्याचे महागाई भत्यानुसार होणारे उपरोक्त स्तंभ क्र ०९ मध्ये दर्शविलेले एकत्रित मानधन दि.०१/०१/२०२१ पासुन देणेबाबत निर्णय होणेस विनंती. सदरची पदे ही अस्थायी (११ महिने कालावधीकरीता) असल्याने त्यांना दि.०१/०१/२०२१ पुर्वीचा कोणताही फरक देय होणार नाही. तसेच येथून पुढे महागाई भत्त्यामध्ये होणा-या वाढीनुसार वैद्यकीय अधिका-यांचे मानधनात मा मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे मान्यतेने वाढ करणेबाबत निर्णय होणेस विनंती.

निर्णयास्तव सादर.

(कान्हुराज बगाटे, भा.प्र.से.)
मुख्य कार्यकारी अधिकारी
श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी.

९६१

विषय क्र.- ८३

**मा. तदर्थ समितीचे सभेसमोरील विषय**

**विभागाचे नाव - श्री साईबाबा हॉस्पिटल**



**विषय: डॉ. हरिष हुकुमचंद बजाज व डॉ. गौरव सरदारीलाल वर्मा, हृदयविकार तज्ञ (निलंबीत), श्री साईबाबा हॉस्पिटल यांचे खाते चौकशी अहवालाबाबत..**

**मा. व्यवस्थापन समिती सभेतील निर्णय-**

-दि. ०३/०८/२०१४ रोजीचे सभेतील निर्णय क्र. ६०६- नुसार यावर सविस्तर चर्चा होऊन, उपरोक्त अहवालाची नोंद घेऊन यावर समितीने खालीलप्रमाणे निर्णय घेतला

Dr. R.V. Rao In-charge Medical Director is hereby appointed as an Enquiry officer to enquire into the allegations against Dr. Harish Bajaj and Dr. Gaurav Verma.

At first instance, Dr. R.V. Rao, Enquiry Officer shall issue show cause notice about irregularities, lapses and misconduct prima facie committed by Dr. Harish Bajaj and Dr. Gaurav Verma.

After receipt of the eply from the Droctors conderned, within reasonable period, Dr. R.V. Rao shall proceed to conduct further inquiry, if the charges are not accepted, by framing appropriate charges etc. under delegated authority of the Managing Committee, till enquiry is completed and final report to the Managing Committee about findings of facts in respect of charges against the Doctors is submitted, within one month.

-दि. ०६/११/२०१४ रोजीचे सभेतील निर्णय क्र. ९८३- Upon considering the articles of charges and statement of imputations, there appears to be grave misconducts committed by Dr. Harish Bajaj and Dr. Gaurav Verma, prima facie. By now the enquiry is underway and Enquiry Officer was authorized to serve the notice vis-à-vis to serve charge sheet.

The charge sheet is now served on the delinquents. The committee bereby resolves, condidering the nature of enquiry, seriousness of the charges, dereliction of duties and misconduct, prima facie committed by Dr. Harish Bajaj and Dr. Gaurav Verma, both the delinquent-doctors should be kept under suspension till further orders. During suspension period they will be entitled for subsistence allowance as per rules. During suspension period their headquarters shall be Shirdi.

The committee's decision shall be implemented through the Executive Officer Shri Rajendra Jadhav, who is responsible to serve suspension order immediately on both the doctors and report the compliance to the Committee.

The Enquiry Officer to continue the further enquiry and submit his final report, as early as possible.

-दि. २८/०५/२०१५ रोजीचे सभेतील निर्णय क्र. १५६- यावर सविस्तर चर्चा होऊन, डॉ. हरिष हुकुमचंद बजाज व डॉ. गौरव सरदारीलाल वर्मा, इंटरव्हेशनल कार्डीओलॉजिस्ट यांचे खाते चौकशीकामी निवृत्त प्रधान जिल्हा न्यायाधिश श्री. जे. एल. देशपांडे पुणे यांची चौकशी अधिकारी म्हणून नेमणूक करणेकामी पत्र देऊन, त्यांना विचारणा करणेत यावी.

-दि. २४/०६/२०१५ रोजीचे सभेतील निर्णय क्र. १९२ – उपरोक्त प्रस्तावावर सविस्तर चर्चा होऊन, मा. श्री. जे. एल. देशपांडे, निवृत्त जिल्हा न्यायाधिश,पुणे यांनी केलेली विनंती मान्य करणेत येऊन, सदरहूकामी त्यांना तात्काळ नेमणूक आदेश देण्यात यावा. तसेच त्यांनी मागणी केलेला आवश्यक कक्ष, कर्मचारी वर्ग व संगणक/ स्टेशनरी, याबाबी पुरविणेस व सदरहू चौकशीकामी येणा-या रु. ५०,०००/- मात्र वाढीव खर्चास मान्यता देण्यात आली.

-दि. २८/१२/२०१५ रोजीचे सभेतील निर्णय क्र. ६६४ – उपरोक्त प्रस्तावावर सविस्तर चर्चा होऊन, प्रस्तावासोबत सादर केलेल्या परिशिष्टाचे अवलोकन करता, ॲड. सी. जे. बोरुडे, अहमदनगर यांचा या क्षेत्रातील प्रदिर्घ अनुभव विचारात घेता, डॉ. हरिष बजाज व डॉ. गौरव वर्मा, श्री साईबाबा हॉस्पिटल यांचे खाते निहाय चौकशीकामी सादरकर्ते अधिकारी म्हणून त्यांची नेमणूक करण्यात यावी. तसेच त्यांना दयावयाचे मानधन कार्यकारी अधिकारी यांनी निश्चीत करुन त्यास समितीची मान्यता घेण्यात यावी असे ठरले.

**प्रस्तावना -**

डॉ. बजाज व डॉ. वर्मा हे कार्डीओलॉजीस्ट अनुक्रमे दि. ०९/०४/२००७ व दि. ०२/०२/२००९ पासून संस्थान सेवेत आहेत. त्यांनी कॅथलॅबमध्ये रुग्णांसाठी वापरण्यात येणारे स्टेंट, बलून व इतर साहित्याचा वापर करणेकरीता बेकायदेशीररीत्या विविध कंपन्यांकडून पैसे घेतले आहेत. तसेच रुग्णाच्या प्रोसिजर्स व औषधोपचारामध्ये अनियमितता, निष्काळजीपणा केलेला आहे. अशा व इतर अनेक तक्रारी आल्याने मा. व्यवस्थापन मंडळाचे दि. ०३/०८/२०१४ रोजीचे सभेतील निर्णय क्र. ६०६ अन्वये डॉ. बजाज व डॉ. वर्मा यांना दि. २०/०८/२०१४ रोजी कारणे दाखवा नोटीस बजावली. त्यांना नोटीस बाबत लेखी खुलासा सादर करणेकामी नैसर्गिक न्याय तत्वाचे नियमानुसार योग्य ती संधी दिली होती परंतु त्यांनी लेखी खुलासा सादर केला नाही. दि. ०६/११/२०१४ रोजी डॉ. बजाज व डॉ. वर्मा यांचेवर रीतसर आरोपपत्र बजावले आहे. त्यानंतर मा. व्यवस्थापन मंडळाचे दि. ०६/११/२०१४ रोजीचे सभेतील निर्णय क्र. ९८३ अन्वये डॉ. हरिष बजाज व डॉ. गौरव वर्मा यांना दि. ०८/११/२०१४ पासून त्याचे चौकशीकामी संस्थान सेवेतून तात्पुरते सेवा निलंबीत

करण्यात आले आहे. निलंबन कालावधीत नियमाप्रमाणे त्यांना निलंबन भत्ता अदा केला जात होता परंतू निलंबन आदेशातील अटी-शर्तींनुसार डॉ. बजाज व डॉ. वर्मा निलंबन कालावधीत उपस्थिती नोंदवत नाही तसेच वरिष्ठांच्या परवानगीशिवाय विनापरवानगी मुख्यालय सोडून जातात असे निदर्शनास आले आहे, त्यामुळे निलंबन भत्ता अदा केला जात नाही.

खाते चौकशी कामी श्री. जे. एल. देशपांडे साहेब., पुणे, सेवा निवृत्त जिल्हा प्रधान न्यायाधिश यांची दि. २४/०६/२०१५ रोजीचे मा. व्यवस्थापन समितीचे सभेमध्ये खाते चौकशी अधिकारी म्हणून नेमणूक करण्यात आलेली आहे. तसेच संस्थानचे वतीने श्री. सी. जे. बोरूडे, ॲडव्होकेट, अहमदनगर यांची सादरकर्ते अधिकारी म्हणून नेमणूक करण्यात आली आहे. तसेच ॲडव्होकेट श्री. सी. जे. बोरूडे यांना या खातेचौकशी कामकाजामध्ये सहाय्य करणेकरीता वैद्यकिय संचालक, श्री साईबाबा हॉस्पिटल यांची नेमणुक करणेत आली. डॉ. बजाज व डॉ. वर्मा यांनी निलंबन आदेशाविरुध्द मा. मुंबई उच्च न्यायालयाचे खंडपीठ, औरंगाबाद यांचे समोर अनुक्रमे रिट पिटीशन क्र. १००५५/२०१४ व १००६०/२०१४ दाखल केलेले आहे. सदरच्या रिट पिटीशनमध्ये मा. न्यायालयासमोर संस्थानचे म्हणणे प्रतिज्ञापत्राव्दारे सादर केलेले आहे. सदर पिटीशनमध्ये त्यांनी खालीलप्रमाणे मागणी केली आहे.

A) For a writ of certiorari Order direction in the nature of certiorari or any other appropriate writ or direction, calling for the record and proceedings of the impugned Order Exhibit-"F" dated 07.11.2014 No.SSST/SSSH/467/2014, Passed by respondent No.3 suspending the petitioner and after examining the legality, validity and propriety thereof the impugned Order Exhibit-"F" dated 07.11.2014 No.SSST/SSSH/467/2014, passed by respondent No.3 be quashed and set-aside.

B) Pending hearing and the final disposal of the present Writ Petition, the implementation, execution and operation of the empugned Order Exhibit-"G" dated 07.11.2014 No. SSST/ SSSH/ 467/2014, passed by respondent No.3 by stayed

C) Pending hearing and the final disposal of the present Writ Petition, while proceeding with the enquiry against the petitioner, the panel of three Expert Senior Intervantional Cardiologist from Maharashtra be appointed for conducting the Departmental enquiry against the petitioner instead of respondent No.4, out of which the petitioner be permitted to assign one of the name of Senior Intervantional Cardiologist

D) Pending hearing and the४ final disposal of the present Writ Petition, the appropriate directions be issued against the respondents to provide the documents as applied by the petitioner by their communication dated 23rd August 2014, as early as possible before proceeding the actual Departmental enquiry against the petitioner by giving fair opportunity

E) Ad interim order in terms of prayer clause 'B','C','D'.

F) Pass such other orders which are necessary in the facts and circumstances of the case in favour of the petitioner.

त्यानंतर डॉ. बजाज व डॉ. वर्मा यांनी मा. उच्च न्यायालयाचे खंडपीठ, औरंगाबाद यांचेसमोर खाते चौकशी विरोधात रिट पिटीशन क्र. ५४४१/२०१६ दाखल केले आहे. त्यात खाते चौकशीस स्थगिती मिळावी अशी विनंती केली आहे. सादर केलेले आहे. सदर पिटीशनमध्ये त्यांनी खालीलप्रमाणे मागणी केली आहे.

A) Admit the petition;

B) Quash and set aside the ambiguous and illegal Orders dated 27-3-2016 (Exh-M) and 23-04-2016 (Exh-R) passed by the Enquiry Officer;

C) Direct the Respondent to decide Applications dated 29-04-2016 and 23-04-2016 (Exh. U&V) about the applicability of the law governing the disciplinary action initiated against the Petitioners;

D) Direct the Pespondent to give fair opportunity of adequate and reasonable time for defending the allegation in accordance with Law;

E) Stay the further proceeding of the domestic enquiry till decision and disposal of Application dated 29-04-2016 and 23-04-2016 (Exh-U&V) addressed to the Respondent;

F) Grant interim relief in terms of Prayer Clause(f); and,

G) Allow the Petition in the above terms.

उपरोक्त रिट पिटीशन १००५५/२०१४, १००६०/२०१४ व ५४४१/२०१६ मध्ये मा. उच्च न्यायालय, औरंगाबाद यांनी दि. २३/०६/२०१६ रोजी खालीलप्रमाणे निकाल राखुन ठेवलेला आहे.

Heard learned Counsel for the parties at length.

2 The learned Counsel for respondent in Writ petition No.5441 of 2016 has tendered across the Bar the affidavit-in-reply. The same is taken on record.

3 Reserved for judgment.

दरम्यानच्या काळात कोपरगाव येथील समाजसेवक श्री. संजय भास्करराव काळे यांनी मा. मुंबई उच्च न्यायालयाचे खंडपीठ, औरंगाबाद यांचेसमोर क्रिमीनल रिट पिटीशन क्र. ६३६/२०१५ दाखल केले होते. त्यात मा. पोलीस अधिक्षक, अहमदनगर, मा. पोलीस निरीक्षक, शिर्डी, श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी, डॉ. हरिष बजाज व डॉ. गौरव वर्मा यांना प्रतिवादी केले आहे. मा. त्रिसदस्य समितीसमोर दि. ०२/०२/२०१६ रोजीचे सभेतील निर्णय क्र. १३ नुसार दि. २९/०३/२०१६ रोजी संस्थानचे वतीने डॉ. विजय बाळकृष्ण पाटील, तत्कालीन प्र. वैद्यकीय संचालक, श्री साईबाबा हॉस्पिटल, शिर्डी यांनी शिर्डी पोलीस

स्टेशन, शिर्डी येथे डॉ. हरिष हुकुमचंद बजाज व डॉ. गौरव सरदारीलाल वर्मा यांचेवर एफ.आय.आर. दाखल करणेत आला असून भारतीय दंड विधान कलम ४०८ अन्वये त्यांचेवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

सदरचे केसमध्ये जामिन मिळणेकामी डॉ. बजाज व डॉ. वर्मा यांनी मा. उच्च न्यायालयाचे खंडपीठ, औरंगाबाद यांचेसमोर अनुक्रमे क्रिमीनल ॲप्लीकेशन नं २५४२/२०१६ व २५४५/२०१६ दाखल केले होते. त्यात मा. न्यायालयाने डॉ. बजाज व डॉ. वर्मा यांना जामीनासाठी ०४ आठवडे मुदतवाढ दिलेली आहे. त्यानंतर सदर निर्णयाविरुध्द डॉ. बजाज व डॉ. वर्मा यांनी मा. सर्वोच्च न्यायालय, दिल्ली येथे SLP(Crl) No. ००६६६९-००६६७०/२०१६ दि. २८/०८/२०१६ रोजी दाखल केले होते.

त्यात मा. सर्वोच्च न्यायालय, दिल्ली यांनी दि.२१/०७/२०१७ रोजी खालीलप्रमाणे निकाल दिला आहे.

**ORDER**

We make it clear that the petitioners shall cooperate with tha investigation.

In the meantion, interim protection granted by the High Court shall continue tor seven weeks.

Learned counsel for the respondent - State shall file the updated status report before the next date of hearing

Having heard Mr. Kapil Sibal, learned senior counsel appearing for the petitioners and Mr. Katneshwarkar, learned counsel appearing for the State of Maharashtra, we are inclined to direct that the interim order passed by this Court on 3.10.2016 shall remain in vogur. The investigating authority shall proceed in accordanc with law and the petitioners shall fully cooperate with the investigation. That apart, they shall abide by the terms and conditions imposed under Section 438(2) of the Code of Criminal Procedure.

दि. ०६/१२/२०१७ रोजीचे पत्रान्वये पोलीस निरीक्षक स्था.गु.शा., अहमदनगर यांनी शिर्डी पोलीस स्टेशन गुरनं. कलम ६४/२०१६ भादविक. ४०८, ४०९ या गुन्ह्याचे तपासाचे अनुषंगाने महत्वाची माहिती मिळणेबाबत पत्र दिले असुन सदर पत्रात शिर्डी पोलीस स्टेशन गुरनं. ६४/२०१६ भादविक. ४०८, ४०९ याप्रमाणे दाखल गुन्ह्यातील फिर्यादी डॉ. विजय बाळकृष्ण पाटील, वय - ४२ वर्षे, धंदा – नोकरी, साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी रा. १/५ साई सहवास, ५०० रुम मागे, शिर्डी, ता. राहाता, जि. अहमदनगर, यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन वरीलप्रमाणे गुन्हा रजिस्टरी दाखल झालेला असुन सदर गुन्ह्याचा तपास आम्ही करत आहोत.

सदर गुन्ह्यातील आरोपी नामे १. डॉ. गौरव सरदारीलाल वर्मा , २. डॉ. हरिष हुकूमचंद बजाज दोघे रा. शिर्डी, ता. राहाता, जि. अहमदनगर यांचेविरुद्ध संस्थानने त्यांना सेवानिलंबीत करुन निवृत्त न्यायाधीशांमार्फत विभागीय चौकशी करण्यात आलेली आहे. सदर गुन्ह्याचे तपासाचे दृष्टीने सदर चौकशीचे अहवालाची आवश्यकता असल्याने सदर चौकशी अहवाल त्वरीत मिळणेस विनंती केली होती.

उपरोक्त पत्राच्या अनुषंगाने डॉ.बजाज व डॉ.वर्मा यांचे खाते चौकशीचे कामकाज पुर्ण झाले असुन श्री.जे.एल.देशपांडे, खाते चौकशी अधिकारी यांनी बंद लिफाफ्यामध्ये दि. १८/०७/२०१७ रोजी खाते चौकशी अहवाल सादर केलेला आहे. डॉ. हरिष बजाज व डॉ. गौरव वर्मा ह्दयविकार तज्ञ यांना सेकंड शो कॉज नोटीस देऊन सोबत सदरच्या अहवाल देता येईल. त्यांचा खुलासा आलेनंतर मा. व्यवस्थापन समिती सभेमध्ये सादर केल्यानंतर खातेचौकशी अहवालाची नक्कल प्रत पोलीस निरीक्षक, स्था.गु.शा., अहमदनगर यांना देता येईल, अशी दि. २८/१२/२०१७ रोजी टिपणी सादर केली होती. परंतू चौकशी अहवालाबाबत निर्णय न घेता चौकशी अहवालाची प्रत पोलीस निरीक्षक स्था.गु.शा., अहमदनगर यांना देणेबाबत सुचना करण्यात आली. त्यानुसार दि.१०/०३/२०१८ चे पत्रान्वये पोलीस निरीक्षक, स्थानिक गुन्हे शाखा, पोलीस अधिक्षक कार्यालय, अहमदनगर यांना चौकशी अहवालाची प्रत देण्यात आलेली आहे.

तसेच दि. १६/०८/२०१७ रोजी विधी व न्याय विभाग, मंत्रालय मुंबई यांना निलंबीत डॉ. बजाज व डॉ. वर्मा यांचे विरुध्दच्या फौजदारी गुन्हयात चौकशी सुरु असून अद्याप चार्जशिट दाखल झालेले नाही. ही वस्तुस्थिती विचारात घेता या दोनही डॉक्टरांच्या सेवा पुढील ४ ते ५ वर्ष उपलब्ध होणार नाहीत. तसेच दोन्ही डॉक्टर्स निलंबित असल्याने त्यांचे पदावर नियमीत भरती करता येत नाही. त्यामुळे मा. उच्च न्यायालयाच्या दि. १०/०४/२०१५ रोजीच्या निर्णयानुसरचार हदयविकास तज्ञांची नियुक्ती करणेस तदर्थ समितीची मान्यता मिळावी, असा प्रस्ताव सादर करणेत आला होता. सदरचे प्रस्तावास अनुसरुन शासननिर्णय दि. ०८ मे २०१८ रोजी श्री साईबाबा रुग्णालयासाठी ह्दय विकार तज्ञ संवर्गातील ०२ काल्पनिक पदे भरण्यास मंजूरी देण्यात आलेली आहे.

श्री संजय भास्कर काळे, कोपरगाव यांचे क्रिमीनल रिट पिटीशन ६३६/२०१६ मधील मागणीनुसार डॉ. बजाज व डॉ. वर्मा यांचेविरुध्द शिर्डी पोलीस स्टेशन येथे गुरनं. ६४/२०१६ भादवि क. ४०८, ४०९ याप्रमाणे दाखल गुन्ह्यामध्ये चार्जशिट दाखल झालेले नाही.

तरी श्री संजय काळे, कोपरगाव यांनी दि. २९/०८/२०२० रोजीचे पत्रात- प्रधान जिल्हा न्यायाधीशांनी केलेली निलंबनाची कारवाई सेवा निवृत्त् जिल्हा न्यायाधीशांनी अयोग्य ठरवून त्यांना निर्दोष जाहीर केले असल्यास डॉक्टरांना दोषमुक्त करणे जरुरी आहे. पण जर ते डॉक्टर दोषी अढळले असतील तर संस्थानने त्यांचेवर दोष सिध्द झाल्यामुळे सक्त कारवाई करुन पोलीसांकडे गुन्हा दाखल करावा.

आपणास विनम्र आवाहन आहे. आपणाकडून ही न्यायदानाची प्रक्रिया पुर्ण करुन कारवाई साठी मा. उच्च न्यायालयाकडून निर्देश प्राप्त करुन घेऊन कारवाई करावी. सदर अहवालास आज तीन वर्षे होऊन गेल्याने मुळ तक्रारदार हया नात्याने आपणाकडे न्यायाची भिक्षा मागत आहे.

सदर प्रकरणात डॉक्टर दोषी नसल्यास त्यांना दोष मुक्तीचा दाखला देऊन सेवेत रुजू करुन घ्यावे. निपक्ष न्यायाची तसेच त्वरित अहवाल वाचन व्हावे. अशी मागणी केली आहे.

मॅन्युअल ऑफ डिपार्टमेंटल इन्क्वायरीज (विभागीय चौकशी पुस्तिका) या पुस्तिकेतील प्रकरण चार- खटला भरणे त्यातील

**४.२- फौजदारी कार्यवाहीच्या तुलनेत विभागीय कारवाई-** संबंधित कर्मचा-यावर प्रथम शिस्तभंगाची कारवाई करण्याची व नंतर फौजदारी खटला भरण्याची शासनास मोकळीक आहे. अथवा शासन प्रथम फौजदारी खटला भरुन आणि त्याच्या निर्णयाची वाट पाहून दोषसिध्दी निश्चीत झाल्यानंतर वर्तणुकीच्या आधारावर शिक्षा करण्याबाबत कार्यवाही करु शकेल. शासन तिसरा पर्याय म्हणून एकाचवेळी फौजदारी कार्यवाहीबरोबर विभागीय कारवाई करण्यास प्रारंभ करु शकेल. प्रत्येक प्रकरणात प्रथम फौजदारी कार्यवाही करण्याचे बंधन शासनावर नाही, ही कायदेशीर परिस्थिती आहे. परंतु, विभागीय प्राधिका-यांनी विभागीय कारवाई सुरु करण्यापूर्वी खटला दाखल करणे व निर्णयाची प्रतीक्षा करणे उचित ठरेल. याचा आणखी एक फायदा असा की, शासकीय कर्मचारी फौजदारी दोषारोपात प्रत्यक्ष सिध्दापराधी ठरल्यानंतर त्याच्यावर विभागीय कारवाई करण्याची आवश्यकताच राहणार नाही. म्हणून प्रत्येक व्यक्तीगत प्रकरणातील सर्व संबध्द बाबी लक्षात घेतल्या पाहिजेत आणि फौजदारी खटल्याबरोबरच शिस्तभंगविषयक कार्यवाही करावयाची असेल तर जाणीवपूर्वक दृष्टीकोन स्वीकारणे आवश्यक आहे. एखाद्या प्रकरणात गंभीर स्वरुपाचे दोषारोप असतील आणि त्यास सबळ पुरावा असेल, तर विभागीय कार्यवाहीही चालू ठेवावी म्हणजे लोकसेवकाच्या गैरवर्तणुकीबद्दल त्वरित निष्कर्ष काढता येईल आणि त्याची पुढील सेवा चालू ठेवण्याबाबतही अंतिम निर्णय घेता येईल. खटला चालू असतानाच विभागीय चौकशीही चालू करावी किंवा कसे या प्रश्नाचा विचार करण्यासाठी सर्वात चांगली वेळ म्हणजे खटला भरण्यास मंजुरी देण्यात येते, ती होय.त्या टप्प्यावर सर्व दस्तऐवज उपलब्ध असतात आणि मुळ दस्तऐवजाच्या फोटो-स्टॅट प्रती किंवा मूळ प्रती चौकशी करणा-या प्राधिका-यासमोर ठेवणे, हे कठीण काम नाही. दोषारोपित अधिका-याने एकदा मूळ कागदपत्रे मान्य केल्यानंतर चौकशी करणा-या अधिका-याने आणि / किंवा दोषारोपित अधिका-याने यथोचितरित्या साक्षांकित केलेल्या दस्तऐवजाच्या फोटो-स्टॅट प्रतीपुढील विभागीय कार्यवाहीच्या प्रक्रियेच्या वेळी वापरात आणता येतील. कारण न्यायालयीन कार्यवाहीच्या वेळी मूळ प्रती आवश्यक असतात. आणखी असे की, अपील न्यायालयाच्या निर्णयासाठी शासनाने वाट पाहण्याची आवश्यकता नाही. याबाबतीत संविधानाच्या अनुच्छेद ३११ च्या खंड (२) दुस-या परंतुकान्वये निर्बंध घालण्यात आलेला नाही. परिणामी, शासनाने विभागीय कार्यवाही सुरु करणे समर्थनीय ठरेल आणि केवळ ट्रायल कोर्टात सिध्दापराध ठरलेल्या कर्मचा-यास त्याच्या वर्तणुकीच्या आधारावर शिक्षा करता येईल. तथापि, जेथे अपील न्यायालयाकडून ट्रायल न्यायालयातील अपराधसिध्दी रद्द ठरवण्यात आली असेल तर केलेल्या शिक्षेचा प्रभाव ताबडतोब कमी होईल आणि परिस्थितीचे पुनर्विलोकन करणे शासनावर बंधनकारक असेल.

डॉ.बजाज व डॉ.वर्मा यांचे खाते चौकशीचे कामकाज पुर्ण झाले असुन श्री.जे.एल.देशपांडे, खाते चौकशी अधिकारी यांनी बंद लिफाफ्यामध्ये दि. १८/०७/२०१७ रोजी खाते चौकशी अहवाल सादर केलेला आहे. डॉ. बजाज व डॉ. वर्मा यांचे विरुध्दच्या फौजदारी गुन्हयात चौकशी सुरु असून अद्याप चार्जशिट दाखल झालेले नाही.

डॉ. बजाज व डॉ. वर्मा यांचेवर दाखल केलेली फिर्याद व खाते निहाय चौकशीमध्ये असलेले आरोप, त्या सोबत दाखल केलेली कागदपत्रे आणि स्वरुप सारखेच आहेत.

विभागीय चौकशी पुस्तिका मधील प्रकरण चार- खटला भरणे त्यातील ४.२ नुसार डॉ. बजाज व डॉ. वर्मा यांचेविरुध्द दाखल केलेल्या एफ. आय. आरचा निर्णय झालेनंतर त्यानुसार पुढील कार्यवाही करता येईल. उपरोक्त कार्यवाही पूर्ण झालेनंतर श्री संजय काळे यांना कळविता येईल तोपर्यंत श्री काळे यांचा दि. २९/०८/२०२० रोजीचा अर्ज नस्तीबंद करण्यात आला.

श्री. जे. एल. देशपांडे, निवृत्त जिल्हा न्यायाधिश, खाते चौकशी अधिकारी यांनी सादर केलेल्या अहवालामध्ये त्यांनी खालीलप्रमाणे निष्कर्ष काढलेले आहेत.

| Point of determination | Answers |
|---|---|
| **01.** Whether it is proved by management that both the CSE's committed various acts alleged in the charge sheet and statements of imputations in the respective inquiries proved against them, with object to earn undue monetary advantage by way of extracting commission from various supplier companies / distributors ? | Yes |
| **02.** Whether it is proved by management that both the CSE's violated and committed breach of managing committee resolution no. 02 decision no. 343 Dt. 17/04/2013 followed by circular Dt. 18/04/2013 in the matter of proportionate use of stents in the cardiology procedures conducted by them? | Yes. |
| **03.** Is it proved by management that both the CSE's involved themselves in unethical practice of operating clinical registry without obtaining or suggesting to take due permission from competent authority and without following prescribed procedure and used stents and other material of a particular i.e. Heart Beat Intervention Pvt. Ltd. During such clinical registry operated at the hospital? | Yes. |
| **04.** Is it proved by management that both the CSE's instead of making use of stent required in cardiology procedure in equal proportion, used stents of a particular company name heart Beat Intervention Pvt. Ltd. more in proportion to earn under monetory benefit / commission from the said company? | Yes. |
| **05.** Whether it is proved that by management that, both the CSE's acting as a cardiologist at Hospital, mis-used their position by preferring Drug Coated Stents with object to earn undue monitory benefit instead of using low cost stents of other companies / brands and caused financial loss to Sansthan as well as Government? | Yes. |
| **06.** Is it proved by management that CSE Dr. Bajaj appointed unauthorized person giving him access with official record with object to acquire more number of patients and to earn more financial benefit? | Yes. |
| **07.** Is it proved by management that both the CSE's kept their patients unattended and subjected some of them to premature discharge to accommodate more number of patients and there by floated standard norms and professional ethics? | No |
| **08.** Is it proved by management that both the CSE's used to pressurize or exercise undue influence on the seller companies to make sale of their products like Stent, Balloons etc. at higher prices and not to reduce the prices by way of permissible discounts? | No |
| **09.** Is it proved by management that both the CSE's made indiscriminate use of stents by implanting the same to patient irrespective of its requirement to a particular patient with object to increase use of stents and to earn more commission from the concerned company? | No |

विभागाचा अभिप्राय:-

डॉ.बजाज व डॉ.वर्मा यांचे खाते चौकशीचे कामकाज पुर्ण झाले असुन श्री.जे.एल.देशपांडे, खाते चौकशी अधिकारी यांनी बंद लिफाफ्यामध्ये दि. १८/०७/२०१७ रोजी खाते चौकशी अहवाल सादर केलेला आहे. डॉ. बजाज व डॉ. वर्मा यांचे विरुध्दच्या फौजदारी गुन्हयात चौकशी सुरु असून अद्याप चार्जशिट दाखल झालेले नाही.

डॉ. बजाज व डॉ. वर्मा यांचेवर दाखल केलेली फिर्याद व खाते निहाय चौकशीमध्ये असलेले आरोप, त्या सोबत दाखल केलेली कागदपत्रे आणि स्वरुप सारखेच असल्याने एफ. आय. आर. वरील निर्णयानुसार डॉ. बजाज व डॉ. वर्मा यांचेवर कार्यवाही करणे प्रस्तावित असल्याने चौकशी अहवालावर निर्णय घेतलेला नाही.

तरी डॉ. बजाज व डॉ. वर्मा यांचे विरुध्दच्या फौजदारी गुन्हयात चौकशी सुरु असून अद्याप चार्जशिट दाखल झालेले नाही. सदर चार्जशिट दाखल होणेस किती कालावधी लागू शकतो हे निश्चीत नाही. त्यामुळे डॉ. हरिष हुकुमचंद बजाज व डॉ. गौरव सरदारीलाल वर्मा यांचे खाते चौकशीत श्री. जे. एल. देशपांडे, निवृत्त जिल्हा न्यायाधिश, खाते चौकशी अधिकारी यांनी सादर केलेल्या सोबतचे चौकशी अहवालाबाबत निर्णय होणेस विनंती.

19/6/21

(कान्हूराज बगाटे, भा.प्र.से.)
मुख्य कार्यकारी अधिकारी,
श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी

18/6/21

296

विषय क्र.- ८४

मा तदर्थ (Ad-hoc) समितीसमोर विषय
विभागाचे नाव - श्री साईबाबा हॉस्पिटल

विषय- रूग्णालय प्रशासक (Hospital Administrator) पद तात्पुरत्या स्वरूपात ११ महिने कालावधीकरीता जाहीरातीद्वारे भरणेबाबत . . .

टिपणी -
अधिनियम कलम २००४ तरतुद-

कलम १३(४) मधील समितीस संस्थान विश्वस्तव्यवस्थेचा कारभार कार्यक्षमतेने चालविणेसाठी आणि या अधिनियमान्वये तिची कर्तव्ये व कामे पार पाडण्यासाठी आवश्यक वाटतील अशा अधिका-यांची (कार्यकारी अधिका-यांव्यतिरिक्त) व कर्मचा-याची नेमणूक करता येईल.

परंतु ज्या अधिका-याला किंवा कर्मचा-याला दरमहा दोन हजार रुपयांहून अधिक वेतन देण्यात येत असेल किंवा द्यावयाचे असेल, अशा कोणत्याही अधिका-यांची किंवा कर्मचा-याची नेमणूक, समितीकडून, असे पद राज्य शासनाने मान्य केलेल्या कर्मचारी आकृतीबंधानुसार मंजूर करण्यात येईपर्यंत केली जाणार नाही. श्री साईबाबा संस्थानचे रूग्णालयासाठी मंजुर असलेल्या दि. ०७/०८/२००९ रोजीचे आकृतीबंधातील अटी-शर्ती क्र. ३ –"सदर पदांवर नव्याने नियुक्ती करताना समितीने सदर पदाची आवश्यकता व अर्हता याबाबत विस्तृत प्रसिद्धी देऊन सदर पदांवर स्पर्धात्मक परीक्षा घेऊन नियुक्ती करावी." तसेच अट शर्त क्र. ८ मध्ये "समितीने शक्यतो आकृतीबंधातील पदे ही एकत्रित मानधनावर किंवा कंत्राटी पद्धतीने भरावी जेणेकरुन व्यवस्थापन निधीवर भार पडणार नाही" असे नमुद आहे.

प्रस्तावना-

कोव्हीड १९ महामारी व इलाज करणेकरीता श्री साईबाबा संस्थानचे श्री साईबाबा हॉस्पिटल हे अतिरिक्त डिस्ट्रीक्ट कोव्हीड हॉस्पिटल मा जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष जिल्हा व्यवस्थापन प्राधिकरण अहमदनगर यांनी घोषीत केले आहे. श्री साईनाथ रूग्णालयामध्ये देखील कोव्हीड १९ चे रूग्णांवर ईलाज करणेकरीता मोठ्या प्रमाणात उपाययोजना सुरू करणेत आल्या असुन ऑक्सीजन प्लॅंट व आरटीपीसीआर लॅबचे उदघाटन मा मुख्यमंत्री यांचेहस्ते ऑनलाईन करणेत आले आहे. सध्या श्री साईबाबा व श्री साईनाथ रूग्णालयात त्या अनुषंगाने मोठ्या प्रमाणावर प्रशासकीय कामकाज वाढलेले आहे. श्री साईबाबा व श्री साईनाथ रूग्णालयाचे आकृतीबंधामध्ये वर्ग १ दर्जाचे रूग्णालय प्रशासक पद मंजूर नाही. दोन्ही रूग्णालयासाठी कोव्हीड १९ या साथ रोगाच्या व्यवस्थापनाकरीता प्रशासकीय कामकाजाकरीता रूग्णालय प्रशासक या पदाची अत्यंत आवश्यकता आहे. सदरचे ११ महिने कालावधीकरीता भरता येईल. सदर पदाकरीता पात्रता खालीलप्रमाणे जाहीरातीमध्ये नमुद करता येईल.

१. मान्यताप्राप्त विद्यापीठातील कोणत्याही वैद्यकीय शाखेचा पदवीधर.
२. डी एच ए / एम एच ए मान्यताप्राप्त विद्यापीठातून केलेल्या उमेदवारांना प्राधान्य.
३. किमान १० वर्ष रूग्णालय प्रशासकीय कामाचा अनुभव आवश्यक.
४. रू.६६,०००/- मासिक एकत्रित मानधन.
५. शासन नियमाप्रमाणे वयोमर्यादा राहील. वयामध्ये अनुभवानुसार शिथीलता देण्याचे अधिकार संस्थान प्रशासनास राहतील.

विभागाचा अभिप्राय -

दोन्ही रूग्णालयासाठी कोव्हीड १९ या साथ रोगाच्या व्यवस्थापनाकरीता प्रशासकीय कामकाजाकरीता प्रशासक वर्ग १ दर्जाचे पदाची आवश्यकता आहे.

तरी उपरोक्त रूग्णालय प्रशासक (Hospital Administrator) पद ११ महिने कालावधीकरीता जाहीरातीद्वारे रू.६६,०००/- प्रतीमहा एकत्रित मानधनावर घेणेकरीता निर्णय होणेस विनंती.

निर्णयास्तव सादर.

कान्हूराज बगाटे (भा.प्र.से.)
मुख्य कार्यकारी अधिकारी
श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी.

विषय क्र.- ८५

# मा.तदर्थ (Ad-Hoc) समिती सभेसमोर सादर



खरेदी विभाग, श्री साईबाबा हॉस्पिटल

**विषय :- श्री साईबाबा हॉस्पिटलमधील प्रयोगशाळा या विभागाकरीता जुने Fully Automatic Biochemistry Analyser परत (Buyback) करून नविन Fully Automatic Biochemistry Analyser खरेदी करणेबाबत ...**

**अधिनियम २००४ मधील तरतूद :- १७ (२) ण**

**व्यवस्थापन समितीचा ठराव क्र. :- नवीन प्रस्ताव**

**प्रास्ताविक :-**

श्री साईबाबा हॉस्पिटलमधील प्रयोगशाळा विभागाने सन २०१३ मध्ये Fully Automatic Biochemistry Analyser (Model Nanolab 240 Sr. No. SI30T240CS2220) मशिन रक्कम रू.१०३५५००/- इतक्या रक्कमेत खरेदी करण्यात आले होते. सदर मशिनचा दि.२८/०७/२०१६ रोजी Warranty period संपलेला आहे. Fully Automatic Biochemistry Analyser मशिनवर दिवसाला ९०० ते १००० टेस्टप्रमाणे १ वर्षासाठी अंदाजे ३,६०,००० इतक्या टेस्ट करण्यात आलेल्या आहेत. सदर Fully Automatic Biochemistry Analyser ची दि.३१/०३/२०२१ अखेर घसारा किंमत रक्कम रू.१,०३,६६७/- इतकी येत आहे. प्रयोगशाळा विभागात सध्या एक Fully Automatic Biochemistry Analyser मशीन कार्यरत आहे. सदर मशिनवर रक्त – लघवीच्या विविध तपासण्या केल्या जातात. परंतु रूग्णांच्या संख्येत वाढ झाल्यामुळे एकाच मशिनवर ताण पडतो त्यामुळे त्यांनी नविन Fully Automatic Biochemistry Analyser ची मागणी केली आहे.

नविन Fully Automatic Biochemistry Analyser खरेदीकामी अंदाजे रक्कमेसाठी बायोमेडीकल विभागाने पुरवठाधारकांना ई-मेल केलेले होते. त्यास अनूसरून त्यांनी ई-मेल अन्वये खालीलप्रमाणे दरपत्रक दिलेले आहे-

| Sr. No. | Item Description | Qty. | M/s. Siemens Healthineers, Mumbai | | M/s. Sysmex India Pvt.Ltd., Mumbai | | Average Rate Per In Rs. | | Total Amount In Rs.+Warranty 5 year+next 5 year LAMC |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | Machine Cost In Rs (5 Years Warranty) | CMC for Next 5 Years after Warranty Period | Machine Cost in Rs (5 Years Warranty) | CMC for Next 5 Years after Warranty Period | Machine Cost in Rs. (5 Years Warranty) | GMC Price In Rs. | |
| 1 | Fully Automatic Biochemistry Analyser | 1 | 2360000/- | 1180000/- | 2596000/- | 1062000/- | 2478000/- | 1121000/- | 3599000/- |
| | Total Amt. in Rs. | | | | | | | | 3599000/- |

वरीलप्रमाणे दरानुसार उपरोक्त Fully Automatic Biochemistry Analyser खरेदीकामी रु.३५,९९,०००/- (अक्षरी रक्कम–पस्तीस लाख नव्व्यान्नव हजार मात्र) इतका खर्च अपेक्षित आहे.

**मागणी** – श्री साईबाबा हॉस्पिटलमधील प्रयोगशाळा या विभागाने मागणीपत्रकान्वये ०१ नग नविन Fully Automatic Biochemistry Analyser ची मागणी केलेली आहे.

**संस्थान अधिनियम / ठराव यानुसार छाननी, शासन निर्देश, तांत्रिक, कायदेशीर तसेच आर्थिक विषय इ. छाननी करुन अनुमान:-**

१) अधिनियमातील समितीचे कर्तव्ये व अधिकार क्र. १७-२ (ण)अन्वये मानवजातीच्या कल्याण करणा-या किंवा मानवाला आपत्तीमध्ये साहाय्य करणा-या अन्य कोणत्याही उदात्त कार्यास चालना देईल असा आहे. त्यानुसार संस्थानतर्फे दोन धर्मदाय रुग्णालये चालविण्यात येतात.

२) शासकीय विभागानी करावयाच्या कार्यालयीन खरेदीसाठी कार्यपध्दतीची नियमावली नुसार शासन निर्णय क्र. भांखस – २०१४ / प्र.क्र. ८२ / भाग – ३ / उद्योग – ४, दि. ३० ऑक्टोबर २०१५ अन्वये परिच्छेद ३.२. –नियमपुस्तिकेनुसार खुली स्पर्धात्मक निविदा प्रक्रिया पार पाडण्यासाठी ज्या निविदांचे अंदाजित मुल्य रु.३,००,०००/- पेक्षा जास्त आहे अशा सर्व निविदा ई-निविदा पध्दतीने काढण्यात याव्यात. संबंधित विभागांना रु.५ हजार पर्यंतच्या किंमतीच्या वस्तु निविदा/ दरपत्रके न मागविता थेट जागेवर खरेदी करण्याची मुभा देण्यात आली आहे. अशा वस्तुंची एकुण खरेदी त्या त्या अर्थिक वर्षात रुपये ५०,०००/- पेक्षा जास्त नसावी.

३) जुन्या Fully Automatic Biochemistry Analyser ची घसारा वजा जाता ची दि.३१/०३/२०२१ अखेर घसारा किंमत रक्कम रू.१,०३,६६७/- इतकी होत आहे. सदरची रक्कम ही रू.५०,०००/- पेक्षा जास्त असल्यामुळे संस्थान अधिनियम २००४, मधील कलम नं १७ (४) अन्वये सदरचे खरेदीपुर्वी शासनाची पूर्वमान्यता घ्यावी लागणार आहे.

**विभागाचा अभिप्राय / स्पष्ट मत:-**

श्री साईबाबा हॉस्पिटलमधील प्रयोगशाळा या विभागाने मागणीपत्रकान्वये ०१ नग नविन Fully Automatic Biochemistry Analyser ची मागणी केलेली आहे. प्रयोगशाळा विभागात सध्या एक Fully Automatic Biochemistry Analyser मशीन कार्यरत आहे. सदर मशिनवर रक्त – लघवीच्या विविध तपासण्या केल्या जातात. परंतु रूग्णांच्या संख्येत वाढ झाल्यामुळे एकाच मशिनवर ताण पडतो त्यामुळे त्यांनी नविन Fully Automatic Biochemistry Analyser ची मागणी केली आहे. जुन्या Fully Automatic Biochemistry Analyser ची दि.३१/०३/२०२१ अखेर घसारा किंमत रक्कम रू.१,०३,६६७/- इतकी येत आहे. त्यामुळे त्यांचे मागणीनुसार ०१ नग नविन Fully Automatic Biochemistry Analyser विहीत पध्दतीने ई-निविदा मागवून खरेदी करून देण्यास हरकत नाही असे नम्र मत आहे.

श्री साईबाबा हॉस्पिटलमधील प्रयोगशाळा या विभागाकरीता एक नग नविन Fully Automatic Biochemistry Analyser विहित पध्दतीने ई-निविदा मागवून खरेदीस व याकामी येणा-या अंदाजे रु.३५,९९,०००/- ( Machine cost – 2478000/- + CMC - 1121000/-) चे खर्चास व जुन्या Fully Automatic Biochemistry Analyser ची घसारा किंमत रू.१,०३,६६७/- इतकी म्हणजेच ५०,०००/- पेक्षा जास्त येत असल्यामुळे Buyback करणेकामी शासनाची पूर्वमान्यता घेणेकामीचा प्रस्ताव तदर्थ समितीच्या सभेसमोर सादर.

(कान्हूराज बगाटे,भा.प्र.से.)
मुख्य कार्यकारी अधिकारी,
श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी

ESH - Meeting - 226 2021

विषय क्र.- ८८

377

## मा. तदर्थ समिती सभेसमोर मान्यतेस्तव सादर

खरेदी विभाग, श्री साईबाबा हॉस्पिटल शिर्डी

**विषय :- Corona Virus (Covid-19) या संसर्गजन्य रोगाच्या रक्ताच्या तपासण्या करणेकामी लॅबोरॅटरी किट्स खरेदी करणेबाबत ...**

टिपणी,

सध्या जगभरात थैमान घातलेल्या कोरोना विषाणु (कोविड १९) च्या विषाणूचा प्रादुर्भाव झपाट्याने वाढत चाललेला आहे. सदर साथीचा प्रादुर्भाव रोखण्याकरीता श्री साईबाबा संस्थानमार्फत साईधर्मशाळा तसेच श्री साईबाबा हॉस्पीटल येथे खालील इमारतीत कोविड सेंटर सुरु करण्यात आलेले आहेत.

| अ.नं | इमारत क्र | दिनांक पासुन सुरु | बेड संख्या | कोविड अधिगृहण इमारत |
|---|---|---|---|---|
| ०१ | इमारत B | ०४/०६/२०२० | २८० | Dedicated Covid Health Center (DCHC) |
| ०२ | इमारत E | ११/०९/२०२० | ७० | Dedicated Covid Health Center (DCHC) with Oxygen |
| ०३ | इमारत F | ०४/०६/२०२० | २८० | Corona Care Center (CCC) |
| ०४ | श्री साईबाबा हॉस्पीटल | १५/०४/२०२१ | १४० | Additional Dedicated Covid Hospital (DCH) |

सदर सेंटरमध्ये मे - २०२१ पर्यंत एकुण ६९०० रुग्णांवर कोविड उपचार करण्यात आले आहेत. सदर सेंटरकरीता लागणारे आवश्यक मनुष्यबळ, औषधे व तपासण्या (लॅब, एक्स रे, एच.आर.टी.सी.) साईबाबा संस्थानमार्फत मोफत पुरविण्यात येतात. याशिवाय संशयित रुग्णांकरीता आवश्यक असणा-या Rapid Antigen तसेच RTPCR या तपासण्या केल्या जात आहेत.

मा. जिल्हाधिकारी महोदय यांनी दिलेल्या आदेशानुसार कोरोना रुग्णांची वाढती संख्या विचारात घेता श्री साईबाबा हॉस्पीटल येथे सुसज्ज अद्यावत Dedicated Covid Hospital (DCH) संपूर्ण मनुष्यबळ, वैद्यकीय सुविधेसह दि.१५/०४/२०२१ पासुन सुरु करण्यात आलेले आहे. तसेच श्री साईनाथ रुग्णालय येथेही कोव्हिड हॉस्पिटल सुरु करणेत येत आहे.

कोविड रुग्णांवर संस्थानमार्फत मोफत उपचार करण्यात येत असल्यामुळे रुग्णालयात सदरहू उपचाराकरीता लागणारे मटेरीयल उपलब्ध ठेवावे लागणार आहे. त्या अनुशंगाने दि.२०/०४/२०२१ रोजी मा.उच्च न्यायालय, खंडपीठ औरंगाबाद यांनी खालीलप्रमाणे आदेश दिलेले आहेत.

"Civil Application No.4598 Dtd.20/04/2021 – Order D. Considering the need of the time, the Sansthan is permitted to purchase the medicines required for treating Covid-19 patients from the private suppliers without tender. This order is restricted only for purchase of required medicines for Covid-19 patients."

वरीलप्रमाणे मा.उच्च न्यायालय, खंडपीठ औरंगाबाद यांचे आदेशानुसार रुग्णालयाकरीता कोव्हिड -१९ रुग्णांवर उपचार करण्यासाठी श्री साईबाबा हॉस्पिटलचे प्रयोगशाळा विभागाने डी.पी.क्र.३३५६ दि.२१/०५/२०२१ अन्वये व श्री साईनाथ रुग्णालयाने डी.पी.क्र.१०५१ दि.२१/०५/२०२१ खालीलप्रमाणे लॅबोरॅटरी किट्सची मागणी केलेली असून सदरकामी पुरवठाधारकांकडून अंदाजे खर्च प्रस्तावित करणेसाठी ई-मेलव्दारे दरपत्रक मागविण्यात आलेले असून त्याचा तपशिल पुढीलप्रमाणे -

पान नं.२/-

| Sr. No. | Name of Material | Qty. | R.R. Diagnostic, Dhule | Universal Chemicals, Nashik | Transasia Biomedicals Ltd., Mumbai | Arihant Diagnostics, Mumbai | Average Rate Per in Rs. | Total Amt.in Rs. |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | Sr.LDH 20ml (System Pack) | 05 Kits | 920.00 | 600.00 | 1034.55 | 828.80 | 845.84 | 4229.18 |
| 2 | Di-Dimer 16ml (System Pack) | 20 Kits | 29028.57 | 10900.00 | 41348.57 | - | 27092.38 | 541847.62 |
| 3 | Quantitativ CRP 50ml System Pack | 25 Kits | 1880.00 | 2250.00 | 3950.00 | 4032.00 | 3028.00 | 75700.00 |
| 4 | Ferritin System Pack 44.4 ML | 8 Kits | - | - | 25209.00 | 18648.00 | 21928.50 | 175428.00 |
| | | | | | | | Total in Rs. | 797204.80 |

वरीलप्रमाणे आवश्यक असणारे लॅबोरॅटरी किट्स खरेदीकामी प्राप्त दरपत्रकानुसार अंदाजे पुर्णांकित रक्कम रु.७,९७,२०५/- इतका खर्च अपेक्षित आहे.

खरेदीसाठीची तरतूद - (१) उद्योग उर्जा आणि कामगार विभाग, महाराष्ट्र शासन यांचा शासन निर्णय क्र.भांखस-२०१४/ प्रक्र८२/ भाग-३/ उद्योग-४, दिनांक ०१.१२.२०१६ मधील नियम क्र.४.२, "दरपत्रक प्रक्रिया व ४.५ तातडीचा आदेश खरेदी प्रक्रिया" नुसार खरेदीचे मुल्य कितीही असले तरी, तातडीच्या खरेदी आदेशाच्या प्रक्रियेमध्ये दरपत्रकासाठी विनंती, या पध्दतीचा स्विकार देकार मागविणेसाठी करण्यात येईल. स्पर्धा होण्यासाठी कमीत-कमी ३ दरपत्रकाची आवश्यकता असेल.

२) शासकीय विभागानी करावयाच्या कार्यालयीन खरेदीसाठी कार्यपध्दतीची नियमावली नुसार शासन निर्णय क्र. भांखस– २०१४/ प्र.क्र. ८२/ भाग– ३/ उद्योग– ४, दि. १ डिसेंबर २०१६ अन्वये परिच्छेद ३.२.३.– रू.३,००,०००/- पर्यंत असेल तेव्हा पेक्षा दरपत्रके मागवून खरेदी करण्याची खरेदीदार विभागांना मुभा देण्यात आली होती. परंतु नविन सुधारित शासन नियमावलीनुसार शासन निर्णय क्र.भाखंस- २०२१/ प्र.क्र. ८/ उद्योग– ७ मे, २०२१ अन्वये परिच्छेद ३.२.३. "दरपत्रकाच्या आधारे करण्यात येणा-या खरेदीची आर्थिक मर्यादा रु.३ लाखावरुन (रु.३,००,०००/-) रु.१० लाखापर्यंत (रु.१०,००,०००/-) व त्यापुढील खरेदीसाठी ई-निविदा पध्दतीचा अवलंब करणे अनिवार्य करण्यात येत आहे. एका आर्थिक वर्षात एकाच वस्तुच्या दरपत्रकाच्या माध्यमातून करण्यात आलेल्या खरेदीचे एकूण मुल्य रु.१० लाखापेक्षा (रु.१०,००,०००/-) जास्त नसावे."

विभागाचा अभिप्राय -

उपरोक्त लॅबोरॅटरी किट्स हे यापुर्वी दैनंदिन रुग्णांच्या तपासण्या करण्याकरीता वापरण्यात येत नव्हत्या, त्यामुळे वार्षिक औषधे खरेदीमध्ये समाविष्ठ नाही, फक्त कोविड रुग्णांकरीताच प्रामुख्याने या तपासण्या कराव्या लागत असल्यामुळे व तशी मागणी आलेमुळे खरेदी करणे आवश्यक आहे. सदरहू खरेदीची प्रक्रिया तातडीची असल्याने शासकीय खरेदी नियमावलीतील ४.२ व ४.५ नुसार एक आठवडयाची (७ दिवस) मुदत देऊन, संस्थानचे अधिकृत संकेतस्थळावर कोटेशन मागणीपत्र देऊन पुरवठाधारकांकडून सिलबंद दरपत्रके प्राप्त करता येतील.

तरी मा.मुंबई उच्च न्यायालय खंडपीठ औरंगाबाद यांचे दि.२०/०४/२०२१ रोजीचे आदेशानुसार श्री साईबाबा संस्थानमार्फत चालविण्यात येणा-या कोविड सेंटर व कोविड हॉस्पिटलकरीता उपरोक्त लॅबोरॅटरी किट्स तातडीने खरेदी करणेकामी संस्थानचे अधिकृत संकेतस्थळावर कोटेशन मागणीपत्र देणेस व याकामी येणा-या अंदाजे रु.७,९७,२०५/- (अक्षरी रुपये– सात लाख सत्यान्नव हजार दोनशे पाच मात्र) चे खर्चास मान्यता असावी.

२८/६/२१

(कान्हूराज बगाटे, भा.प्र.से.)
मुख्य कार्यकारी अधिकारी,
श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी

१४१

विषय क्र.- ८७

**मा तदर्थ (Ad-hoc) समिती समोरील विषय**
**विभागाचे नाव - श्री साईबाबा हॉस्पिटल**

**विषय - श्री साईबाबा संस्थानचे रूग्णालयासाठी बॉन्डेड ग्रॅज्युएट व पोस्ट ग्रॅज्युएट उमेदवारांची नेमणूक करणेबाबत . . .**

**टिपणी-**

संतश्रेष्ठ श्री साईबाबा हे अहमदनगर जिल्ह्यातल्या शिर्डी या गावात साधरणत: १८५६ च्या सुमारास आले. इ.सं. १९१८ पर्यंत म्हणजे त्यांच्या महानिर्वाणापर्यंत त्यांचे शिर्डी येथेच वास्तव्य होते. या प्रदीर्घ कालखंडात साईबाबांनी मानवतेची शिकवण देऊन असंख्य भक्तांना सन्मार्गाला लावले. श्री साईबाबांचा मुख्य भर हा आरोग्य सेवेवर होता. त्यांनी अनेक भक्तांचे असाध्य रोग बरे केले असुन रूग्णसेवा हिच ईश्वरसेवा हे त्यांचे ब्रीद होते. साईबाबांचा रूग्णसेवेचा हा वारसा चालवण्यासाठी श्री साईसंस्थानने सन १९४४ मध्ये साईनाथ छाया या नावाने होमिओपॅथीक दवाखाना सुरू केला याच दवाखान्याचे पुढे म्हणजे सन १९६४ साली श्री साईनाथ हॉस्पिटलमध्ये रूपांतर करण्यात आले आता तेथे ३०० खाटांची सुसज्ज व्यवस्था आहे. त्यानंतर अतिप्रगत उपचारासाठी संस्थानने श्री साईबाबा हॉस्पिटल या सुपरस्पेशालिटी दर्जाच्या हॉस्पिटलची सन २००६ साली स्थापना केली असुन त्यामध्ये सध्या २५० खाटांची सुसज्ज व्यवस्था आहे.

श्री साईनाथ रूग्णालय हे दि.०१/०१/२०१७ पासून समाजातील सर्व स्तरातील रूग्णांना मोफत करणेत आले आहे. सदर रूग्णालयात ॲलॉपॅथी, होमिओपॅथी व आयुर्वेदिक, इ. विभाग कार्यरत आहेत. फक्त १०रू. केसपेपर दर आकारणी करून रूग्णालयातील संपूर्ण उपचार औषधांसहीत मोफत आहेत. सदर हॉस्पिटलमध्ये मेडीसीन, सर्जरी, आर्थे, गायनिक, पिडीयाट्रीक, ईएनटी व ऑफ्थल विभाग कार्यरत आहेत.

श्री साईबाबा रूग्णालयात महात्मा ज्योतीबा फुले जन आरोग्य योजना तसेच पंतप्रधान जन आरोग्य योजना कार्यान्वीत असून प्रामुख्याने रूग्ण सदर योजनेतून उपचार घेत आहेत.

श्री साईबाबा सुपरस्पेशालिटी हॉस्पिटलमध्ये महाराष्ट्रातील इतर जिल्ह्यामधुन तसेच इतर सर्व राज्यातुनही रूग्ण येत असतात. याठिकाणी कार्डीयाक, न्युरो, युरो, आर्थो इत्यादी विभाग चालु असुन येथे वरीष्ठ सुपरस्पेशालिटी डॉक्टर्स तसेच इतर कर्मचारी काम करत आहेत.

त्यामुळे श्री साईबाबा संस्थानचे दोन्ही हॉस्पिटलमध्ये वेगवेगळया उपचारासाठी रूग्णांचा कायमच ओघ चालु असतो.

श्री साईबाबा व श्री साईनाथ रूग्णालयातील ओपीडी, आयपीडी व इतर तपासणी रूग्णसंख्या खालीलप्रमाणे आहे.

| अ नं | तपशिल | श्री साईबाबा हॉस्पिटल | | | श्री साईनाथ रूग्णालय | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | २०१७-२०१८ | २०१८-२०१९ | २०१९-२०२० | २०१७-२०१८ | २०१८-२०१९ | २०१९-२०२० |
| १ | ओपीडी | १६२९२७ | १७२९१८ | १९०१०५ | ३४०४५७ | ३६१९६७ | ३८३२६५ |
| २ | आयपीडी | १३२६७ | १२४०९ | १२८४४ | १५९४५ | १५६२३ | १६६५६ |
| ३ | इनव्हेस्टीगेशन | ४३१७१५ | ४६१८६८ | ४४०३९८ | ३८९३०४ | ३६९८६९ | ३८६३०९ |

तसेच श्री साईबाबा संस्थानकडून कोरोना कालावधीत कोवीड सेंटर सीसीसी, डीसीएचसी व डीसीएच सुरू केले आहे.

सदर ठिकाणी एकुण १० मे २०२१ पर्यंत ६९०० कोव्हीड रूग्णांवर उपचार करणेत आले असून रूग्णांना औषधे, लॅब तपासण्या तसेच सी टी स्कॅन (एचआरसीटी) तपासणी मोफत सवलत संस्थानमार्फत देणेत आली आहे.

वैद्यकीय अधिकारी उपलब्धतेसाठी वेळोवेळी जाहीरात प्रसिध्द करण्यात येते. जाहिरात प्रसिध्द करूनही भरतीसाठी कमी प्रतिसाद मिळतो. सबब वैद्यकीय अधिकारी उपलब्ध होत नाहीत.

सध्या संस्थान रूग्णालयातील आवश्यक रिक्त पदे खालीलप्रमाणे आहेत.

| अ.नं. | पदनाम | मंजुर पदे | | रिक्त पदे | |
|---|---|---|---|---|---|
| | | साईबाबा | साईनाथ | साईबाबा | साईनाथ |
| १ | Interventional Cardiologist<br>ह्दयविकार तज्ञ | ०२ | ०० | ०० | ०० |
| २ | Neurologist<br>मेंदू विकार उपचार तज्ञ | ०२ | ०० | ०२ | ०० |
| ३ | Nephrologist<br>मुत्रपिंड विकार उपचार तज्ञ | ०२ | ०० | ०२ | ०० |
| ४ | Medical Oncologist<br>कर्करोग तज्ञ | ०१ | ०० | ०१ | ०० |
| ५ | Haematologist<br>रक्तविकार तज्ञ | ०१ | ०० | ०१ | ०० |
| ६ | Gastroenterologist<br>गॅस्ट्रोएंट्रोलॉजीस्ट | ०१ | ०० | ०१ | ०० |
| ७ | Endocrinologist<br>एंन्डोक्रीनोलॉजीस्ट | ०१ | ०० | ०१ | ०० |
| ८ | Neurosurgeon<br>मेंदूशल्य विशारद | ०२ | ०० | ०० | ०० |
| ९ | Urosurgeon<br>मुत्रपिंड विकार शस्त्रक्रिया तज्ञ | ०२ | ०० | ०२ | ०० |
| १० | Oncosurgeon<br>कर्करोग शलय चिकित्सक | ०१ | ०० | ०१ | ०० |
| ११ | Plastic Surgeon<br>व्रणोपचार शस्त्रक्रिया तज्ञ | ०१ | ०० | ०१ | ०० |
| १२ | General Surgeon<br>शल्य चिकित्सक | ०४ | ०२ | ०१ | ०१ |
| १३ | Orthopaedic Surgeon<br>आस्थीरोग शस्त्रक्रिया तज्ञ | ०३ | ०२ | ०२ | ०० |
| १४ | Senior Anesthesiologist<br>वरीष्ठ भुलतज्ञ | ०६ | ०१ | ०४ | ०१ |
| १५ | Junior Anesthesiologist<br>कनिष्ठ भुलतज्ञ | ०९ | ०३ | ०८ | ०१ |
| १६ | Senior Intensivist<br>वरिष्ठ अतिदक्षता तज्ञ | ०३ | ०० | ०२ | ०० |
| १७ | Junior Intensivist<br>कनिष्ठ अतिदक्षता तज्ञ | ०६ | ०० | ०४ | ०० |
| १८ | Senior Radiologist<br>वरिष्ठ क्ष किरण शास्त्रज्ञ | ०२ | ०१ | ०० | ०० |
| १९ | Junior Radiologist<br>कनिष्ठ क्ष किरण शास्त्रज्ञ | ०२ | ०० | ०१ | ०० |
| २० | Senior Pathologist<br>वरीष्ठ शरीर विकृती शास्त्रज्ञ | ०२ | ०१ | ०१ | ०० |
| २१ | Senior Micorbiologist<br>सिनीअर मायक्रोबायोलॉजीस्ट | ०१ | ०० | ०१ | ०० |
| २२ | Junior Micorbiologist<br>ज्युनिअर मायक्रोबायोलॉजीस्ट | ०१ | ०० | ०० | ०० |
| २३ | Physician<br>वैद्यकीय उपचार तज्ञ | ०४ | ०२ | ०२ | ०१ |
| २४ | Paedatrician<br>बालरोग तज्ञ | ०३ | ०१ | ०२ | ०० |

| अ.नं. | पदनाम | मंजुर पदे | | रिक्त पदे | |
|---|---|---|---|---|---|
| | | साईबाबा | साईनाथ | साईबाबा | साईनाथ |
| २५ | Paedatric Surgeon<br>बालरोग शस्त्रक्रीया तज्ञ | ०१ | ०० | ०१ | ०० |
| २६ | Gynaecologists<br>स्त्रीरोग तज्ञ | ०४ | ०१ | ०२ | ०० |
| २७ | Ophthalmalogist<br>नेत्र विकार तज्ञ | ०३ | ०१ | ०२ | ०१ |
| २८ | Psychiatrist<br>मानसोउपचार तज्ञ | ०१ | ०० | ०० | ०० |
| २९ | Histopathologist<br>उतीविकृती शास्त्रज्ञ | ०१ | ०० | ०० | ०० |
| ३० | Clinical Assistants<br>तपासणी सहाय्यक | १० | ०० | ०९ | ०० |
| ३१ | Medical Officer (ENT Surgery)<br>कान, नाक, घसा तज्ञ | ०२ | ०१ | ०० | ०० |
| ३२ | Dentist<br>दंतरोग तज्ञ | ०२ | ०२ | ०० | ०० |
| ३३ | Medical Officer (Sonologist)<br>मेडीकल ऑफीसर (सोनोलॉजीस्ट) | ०० | ०१ | ०० | ०१ |
| ३४ | CMO<br>अपघात कक्ष अधिकारी | ०६ | ०६ | ०६ | ०२ |
| ३५ | RMO<br>निवासी वैद्यकीय अधिकारी | ४० | १६ | ०९ | ०७ |

यावर पर्याय म्हणुन व्हिजीटींग पध्दतीने तसेच कंत्राटी पध्दतीने तात्पुरत्या स्वरूपात बरेचशे वैद्यकीय अधिकारी काम करत आहेत.

महाराष्ट्रातील निरनिराळ्या वैद्यकीय महाविद्यालयातील बॉन्डेड ग्रॅज्युएट व पोस्ट ग्रॅज्युएट उमेदवारांना श्री साईबाबा संस्थानमार्फत चालणा-या रूग्णालयांमध्ये संधी दिल्यास त्यांना पुरेसा अनुभव मिळेल त्यामुळे ग्रामीण भागातील रूग्णांची तसेच श्री साईबाबांचीही सेवा करणेची संधी त्यांना प्राप्त होईल.

सबब, संचालक, वैद्यकीय शिक्षण, मुंबई यांना खाली नमुद केलेल्याप्रमाणे विनंतीचा विचार करणेकरीता त्याप्रमाणे संबंधीतांना आदेश होणेकरीता प्रस्ताव दिला आहे.

१) बॉन्डेड ग्रॅज्युएट व पोस्ट ग्रॅज्युएट उमेदवारांची नियुक्ती संस्थानचे रूग्णालयांमध्ये करणे.
२) बॉन्डेड ग्रॅज्युएट व पोस्ट ग्रॅज्युएट उमेदवारांची नेमणूक करणेसाठी संस्थानच्या रूग्णालयांना अधिकृत केंद्र म्हणून मान्यता देणे. उपरोक्तकामी श्री साईबाबा संस्थानमार्फत सर्व बॉन्डेड ग्रॅज्युएट व पोस्ट ग्रॅज्युएट उमेदवारांना शासन नियमाप्रमाणे स्टायपेंड देता येईल तसेच राहण्याची सोय करता येईल.

शासननिर्णय क्रमांक मवैअ-१०५४/प्र.क्र.२४१/भाग-२/सेवा-३ दि.१३/०६/२०१९ रोजीचे शासननिर्णयानुसार एम.बी.बी.एस वैद्यकीय अधिकारी यांना रू.५५,०००/- व विशेषज्ञ वैद्यकीय अधिकारी यांना रू.६५,०००/- मानधन (स्टायपेंड) देता येईल तसेच राहण्याची सोय संस्थानमार्फत करणेत येईल असा उपरोक्तप्रमाणे प्रस्ताव संचालक, वैद्यकीय शिक्षण, मुंबई यांना देणेत आल्याबाबतची नोंद घेणेस विनंती.

17/6/21

(कान्हूराज बगाटे, भा.प्र.से.)
मुख्य कार्यकारी अधिकारी
श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी.

विषय क्र.- ९९/३५

## मा.तदर्थ (Ad-hoc) समिती सभेपुढे निर्णयार्थ सादर



### खरेदी विभाग, श्री साईबाबा हॉस्पिटल

**विषय-संस्थान कर्मचारी व त्यांचेवर अवलंबीतांचा वैद्यकीय बिलाचा परतावा रक्कम रु.१४,०१,९६८/- मात्र अदा करणेस मंजुरी मिळणेबाबत...,**

टिपणी,

व्यवस्थापन समितीचा ठराव क्र. – १) जा. नं. एसएसएस-वशी रुग्णालय ५८२-९७ दि. १६/०१/१९९९. २) मा. व्यवस्थापन समिती सभा दि. ०९/१०/२०१६ निर्णय क्र. ६९० (६) अन्वये रु. २०,०००/- पर्यंत मा. कार्यकारी अधिकारी यांचे अधिकारात तर त्यावरील खर्चाची बिले ही मा. व्यवस्थापन समितीचे सभेच्या मान्यतेने अदा करावी.

प्रास्ताविक – खालील संस्थान कर्मचा-यांची वार्षिक रु. २०,०००/- पर्यंतची खर्चाची मर्यादा संपल्यामुळे रु. २०,०००/- पेक्षा जास्त खर्चाचे बिले परतावा मिळणेकामी सादर केलेले आहेत. मागणी – पुढील तक्यात नमुद केलेल्या कर्मचा-यांचे बिले परतावा मिळणेबाबत विनंती अर्ज.

| अ.नं. | कर्मचा-याचे नाव | कर्मचा-याशी नाते | आजाराचे नाव | डॉक्टरांचे नाव | रुग्णालयाचे नाव | एकूण मागणी रक्कम | एकूण देय रक्कम | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | अ. संस्थान रुग्णालयात उपचार घेतलेले - | | | | | | | |
| १. | राजेश रमणलाल वाकडे विभाग–साईबाबा हॉस्पि. हुद्दा-सिनियर बायो.इंजिनिअर | स्वत: पत्नी | HTN Diabetes उच्च रक्तदाब मधुमेह | डॉ.बच्छाव डॉ. जाधवर | श्री साईबाबा हॉस्पिटल | ४२०८.०० | ४२०८.०० | ६१०२६.०० |
| २. | ज्योतिलाल भिका जाधव विभाग-आय.टी.आय हुद्दा- सहा.भांडारपाल | स्वत: | HTN Diabetes उच्च रक्तदाब मधुमेह | डॉ.पोरवाल | श्री साईनाथ हॉस्पिटल | ९१७८.०० | ६५०६.०० | ३३७६८.०० |
| ३. | संगिता एकनाथ वैद्य विभाग-साईनाथ हॉस्पि. हुद्दा- प्रयोगशाळा सहाय्यक | पती | Diabetes मधुमेह | डॉ.इंगळे | श्री साईबाबा हॉस्पिटल | ५३८८.०० | ५३८८.०० | १७७३६.०० |
| ४. | अभयकुमार शांताराम दुनाखे विभाग –आय.टी.आय हुद्दा-निर्देशक | पत्नी | Ca कर्करोग | डॉ. बो-हाडे | श्री साईबाबा हॉस्पिटल | २४९०.०० | २४९०.०० | ४४०६४.०० |
| ५. | प्रदिप विश्वनाथ त्रिभुवन विभाग-प्रसादालय हुद्दा-मदतनीस | स्वत: | HTN Diabetes उच्च रक्तदाब मधुमेह | डॉ.पोरवाल | श्री साईनाथ हॉस्पिटल | ६२८४.०० | ६२८४.०० | १७२१७.०० |
| ६. | अण्णासाहेब गोवर्धन कुदळे विभाग-भक्तनिवास हुद्दा-मदतनीस | स्वत: | Diabetes मधुमेह | डॉ.पोरवाल | श्री साईनाथ हॉस्पिटल | ७२४२.०० | ७२४२.०० | १९५०३.०० |
| ७. | वाल्मिक बापुराव धरम विभाग-सी.सी.टीव्ही हुद्दा-मदतनीस | स्वत: | HTN उच्च रक्तदाब | डॉ.देवरे | श्री साईबाबा हॉस्पिटल | २१२३६.०० | १६१२३.०० | ३५३५१.०० |
| ८. | शोभा गेणू गाडेकर विभाग-साईबाबा हॉस्पि. हुद्दा-सोशल वर्कर | पती | Covid RTPCR Positive | डॉ.जाधवर | श्री साईबाबा हॉस्पिटल | २१४४७.०० | २१२८७.०० | ४३९०.०० |

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ९. | सविता चांगदेव वर्पे<br>विभाग-साईबाबा हॉस्पि.<br>हुद्दा-स्टाफ नर्स | आई | DM/HTN /Nephropathy Pain abdominal | डॉ.जाधवर | श्री साईबाबा हॉस्पिटल | २२७६८.०० | २०५४२.०० | २२२६७.० |
| १० | सुनिल रायभान शिंदे<br>विभाग-अग्निशामक<br>हुद्दा-मदतनीस | आई | Covid RTPCR Positive | डॉ.ढाकणे | श्री साईबाबा हॉस्पिटल | २०१६६.०० | २०१६६.०० | ०० |
| ११ | विष्णू दगडू थोरात<br>विभाग-प्रसादालय<br>हुद्दा-प्रभारी अधिक्षक | स्वत: | Chromic Hepatitis with middle liver biosphy | डॉ. ढाकणे | श्री साईबाबा हॉस्पिटल | ६८०७.०० | ६५३९.०० | १४४७०.० |
| | | | | | अ एकूण रक्कम रु. | १२७२१४.०० | ११६७७५.०० | |
| | ब. संस्थानच्या रुग्णालयात उपचार होऊ शकत नसल्याने संस्थान मान्य यादीतील बाहेरील हॉस्पिटलमध्ये रेफर केलेले | | | | | | | |
| १२. | भागवत सुर्यभान धामणे<br>विभाग-लिपिक टंकलेखक<br>हुद्दा-सामान्य प्रशासन | आई | Squamoss cell carinorm vaginal valult with local intinise | डॉ.राम नाईक | सेठ नंदलाल नंदलाल धूत हॉस्पिटल, औरंगाबाद | ५५३५९.०० | ४८५७९.०० | ०० |
| १३. | रुकसाना साजिद खान<br>विभाग-साईनाथ हॉस्पि.<br>हुद्दा-परिचारिका | स्वत: | Temp with CRT | डॉ.देवरे | रुबी हॉल क्लिनिक, पुणे | २६०३७४.०० | २४१३९५.०० | २५६५६.० |
| १४. | जोरी नितिन विजय<br>विभाग-लेखाशाखा<br>हुद्दा-लिपिक टंकलेखक | वडील | With acute kidney injury with tuber culous maxiningities with multiple myecloma | डॉ.बागडे | सहयाद्री हॉस्पिटल, नासिक | १०३६१९५.०० | ९९५२१९.०० | ०० |
| | | | | | ब एकूण रक्कम रु. | १३५१९२८.०० | १२८५१९३.०० | |
| | | | | | अ+ब एकूण रक्कम रु. | १४७९१४२.०० | १४०१९६८.०० | |

सदर बिलांची संस्थान वैद्यकीय देखभाल नियमावली सन १९९९ अन्वये छाननी केली असून देय होणारी एकूण रक्कम रु.१४,०१,९६८-/-मात्र आहे.

**विभागाचा अभिप्राय / स्पष्ट मत –**

नियमावली प्रमाणे छाननी केली असुन तसेच रुग्णांना संस्थान मान्य यादीतील हॉस्पिटलमध्ये पुढील उपचाराकरीता पाठविण्यात आले होते व काही ठिकाणी निकडीच्या प्रसंगी बाहेरील हॉस्पिटलमध्ये उपचार घेतले आहेत. सबब सदर रक्कम अदा करण्यास हरकत नाही,असे मत आहे.

तरी उपरोक्त १४ कर्मचा-यांना स्वत: व त्यांचेवर अवलंबित व्यक्ती(रुग्ण १५) यांचे वैद्यकीय उपचारापोटी आलेल्या खर्चाच्या उपरोक्त तक्त्यामध्ये त्यांचे नावासमोर दर्शविलेल्या देय होत असलेल्या रकमेचा परतावा त्यांना अदा करणेस व त्याकामी येणा-या रु. १४,०१,९६८/-मात्र रकमेच्या खर्चास मान्यता मिळणेस्तव सदरहू प्रस्ताव मा.तदर्थ समिती सभेसमोर सविनय सादर.

5/7/2

(कान्हूराज बगाटे,भा.प्र.से.)
मुख्य कार्यकारी अधिकारी,
श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिर्डी

BRPN7 - 236
D-M-18-19-Ja Cha. –

विषय क्र.- ८८/ब



## मा.तदर्थ (Ad-hoc) समिती सभेपुढे निर्णयार्थ सादर

खरेदी विभाग, श्री साईबाबा हॉस्पिटल

**विषय संस्थान कर्मचारी व त्यांचेवर अवलंबीतांचा वैद्यकीय बिलाचा परतावा रक्कम रु.१४,६९,४२९/- मात्र अदा करणेस मंजुरी मिळणेबाबत...,**

टिपणी,

व्यवस्थापन समितीचा ठराव क्र. – १) जा. नं. एसएसएस-वशी रुग्णालय ५८२-९७ दि. १६/०१/१९९९. २) मा. व्यवस्थापन समिती सभा दि. ०९/१०/२०१६ निर्णय क्र. ६९० (६) अन्वये रु. २०,०००/- पर्यंत मा. कार्यकारी अधिकारी यांचे अधिकारात तर त्यावरील खर्चाची बिले ही मा. व्यवस्थापन समितीचे सभेच्या मान्यतेने अदा करावी.

प्रास्ताविक – खालील संस्थान कर्मचा-यांची वार्षिक रु. २०,०००/- पर्यंतची खर्चाची मर्यादा संपल्यामुळे रु. २०,०००/- पेक्षा जास्त खर्चाचे बिले परतावा मिळणेकामी सादर केलेले आहेत.

मागणी – पुढील तक्यात नमुद केलेल्या कर्मचा-यांचे बिले परतावा मिळणेबाबत विनंती अर्ज.

| अ.नं. | कर्मचा-याचे नाव | कर्मचा-याशी नाते | आजाराचे नाव | डॉक्टरांचे नाव | रुग्णालयाचे नाव | एकूण मागणी रक्कम | एकूण देय रक्कम | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | **अ. संस्थान रुग्णालयात उपचार घेतलेले -** | | | | | | | |
| १. | प्रदिप विश्वनाथ त्रिभुवन<br>विभाग- प्रसादालय<br>हुद्दा-मदतनीस | स्वत: | HTN<br>Diabetes<br>उच्च रक्तदाब<br>मधुमेह | डॉ.पोरवाल | श्री साईनाथ हॉस्पिटल | ६९८६.०० | ६९८६.०० | १७२१७.०० |
| २. | सुनिता बाळासाहेब एरंडे<br>विभाग-साईबाबा हॉस्पि.<br>हुददा-परिचारिका | स्वत: | Diabetes<br>मधुमेह | डॉ.इंगळे<br>डॉ.बागडे | श्री साईबाबा हॉस्पिटल | २४८८.०० | २४८८.०० | १९९६७.०० |
| ३. | जगन्नाथ रामनाथ शेलार<br>विभाग-साईबाबा हॉस्पि.<br>हुद्दा-स्टाफ नर्स | स्वत: | Covid 19<br>RTPCR Positive | डॉ.ढाकणे | श्री साईबाबा हॉस्पिटल | २५४६४.०० | २५४६४.०० | १८९४४.०० |
| ४. | दिगंबर अनंत सलगरकर<br>विभाग-साईनाथ हॉस्पि.<br>हुद्दा-स्टाफ नर्स | स्वत: | Covid 19<br>RTPCR Positive | डॉ.जाधवर | श्री साईबाबा हॉस्पिटल | ३७७००.०० | ३७४६७.०० | २९६०.०० |
| ५. | संध्या विनायक जाधव<br>विभाग-साईबाबा हॉस्पि.<br>हुद्दा-स्टाफ नर्स | पती | HTN Diabetes<br>उच्च रक्तदाब /<br>मधुमेह | डॉ.जाधवर | श्री साईबाबा हॉस्पिटल | ८९५४.०० | ८९५४.०० | २२७६१.०० |
| ६. | लक्ष्मण सदाशिव चव्हाण<br>विभाग-भक्तनिवास ५००रुम<br>हुद्दा-माजी अधिक्षक<br>(सेवानिवृत्त कर्मचारी) | पत्नी | Diabetes<br>मधुमेह | डॉ.पोरवाल | श्री साईनाथ हॉस्पिटल | ६०८४.०० | ६०८४.०० | १९८७४.०० |
| | | | | | **अ एकूण रक्कम रु.** | ८७६७६.०० | ८७४४३.०० | |
| | **ब. संस्थान रुग्णालयात उपचार न झालेले संस्थान मान्य यादीत रेफर केलेले** | | | | | | | |
| ७. | सुभाष मल्हारी बंदावणे<br>विभाग-ध्वनिक्षेपण<br>हुद्दा-विद्युत पर्यवेक्षक | मुलगा | Kidney Transplant | डॉ.जाधवर | सहयाद्री हॉसिपटल नासिक | १५८१७६.०० | १५७५७६.०० | १३७५९१.०० |

पान नं-२ वर

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ८. | कल्पना रघुनाथ मुसमाडे<br>विभाग-साईनाथ हॉस्पि.<br>हुद्दा-स्टाफ नर्स | पती | Covid 19<br>RTPCR<br>Positive | डॉ.पोरवाल | रुबी हॉल क्लिनिक, पुणे | ८०१५२८.०० | ७५७८४८.०० | १५६०६.०० |
| ९ | नवनाथ साहेबराव मते<br>विभाग-पाणीपुरवठा<br>हुद्दा-लिपिक | स्वत: | Phaeochromo atomy | डॉ.जाधवर | रुबी हॉल क्लिनिक, पुणे | २४१६०.०० | २४१६०.०० | |
| | | | | | ब एकूण रक्कम रु. | ९८३८६४.०० | ९३९५८४.०० | |
| | क. संस्थान रुग्णालयात उपचार घेतलेले रेफर केलेले तातडीने खाजगी रुग्णालयात गेलेले | | | | | | | |
| १० | संजया सतिष वाणी<br>विभाग–साईनाथ हॉस्पि.<br>हुद्दा-सिस्टर इनचार्ज | मुलगी | Fever with Cytopenia | डॉ.प्रितेश | प्रितेश जुनागडे हॉस्पिटल, नासिक | ९४१८.०० | ७५३४.०० | ११३८३.०० |
| | | | | | क एकूण रक्कम रु. | ९४१८.०० | ७५३४.०० | |
| | ड. संस्थान रुग्णालयात उपचार न घेतलेले रेफर केलेले ,निकडीच्या प्रसंगी खाजगी रुग्णालयात उपचार घेतलेले | | | | | | | |
| ११. | जगन्नाथ देवराम डांगे<br>विभाग–साईबाबा हॉस्पि.<br>हुद्दा- डायलेसिस टेक्निशियन | स्वत: | Covid 19<br>RTPCR<br>Positive | डॉ.सचिन बागडे | असिअन नोबेल हॉस्पिटल, अहमदनगर | ३०४९५९.०० | २४३९६८.०० | ५०९४९७.०० |
| १२. | किरण सुनिल साळवे विभाग-साईबाबा हॉस्पि.<br>हुद्दा-स्टाफ नर्स | स्वत: | Covid 19<br>RTPCR<br>Positive | डॉ.सचिन बागडे | होली फॅमिली हॉस्पि.मुंबई | ९१७५८.०० | ३७९९५.०० | ९१७९.०० |
| १३. | पुनम लक्ष्मीकांत पोतदार<br>विभाग-साईबाबा हॉस्पि.<br>हुद्दा-स्टाफ नर्स | स्वत: | Covid 19<br>RTPCR<br>Positive | डॉ.सचिन बागडे | एस.एम.बी.टी.हॉस्पिटल घोटी | ३७४०४.०० | २९९२३.०० | ०० |
| | | | | | ड एकूण रक्कम रु. | ४३४१२१.०० | ३११८८६.०० | |
| | इ. संस्थान रुग्णालयात उपचार न घेतलेले रेफर न केलेले ,निकडीच्या प्रसंगी खाजगी रुग्णालयात उपचार घेतलेले | | | | | | | |
| १४ | निलेश बाळकृष्ण रावस<br>विभाग-साईबाबा हॉस्पि.<br>हुद्दा-स्टाफ नर्स | आई वडिल | Covid 19<br>RTPCR<br>Positive | डॉ.पूजा सावंत | डॉ.विखे पाटील मेमोरियल हॉस्पि. अहमदनगर | ३९८४६.०० | ३३०६३.०० | १७९१४.०० |
| १५. | गोरक्षनाथ रायभान नलगे<br>विभाग-विधी विभाग<br>हुद्दा-विधी अधिकारी | वडिल | Covid 19<br>RTPCR<br>Positive | डॉ.पुजा कसबा | धन्वंतरी मल्टीस्पेशालिटी हॉस्पिटल, संगमनेर | ११८१९९.०० | ८९९१९.०० | ०० |
| | | | | | इ एकूण रक्कम रु. | १५८०४५.०० | १२२९८२.०० | |
| | | | | | अ+ब+क+ड+इ एकूण रक्कम रु. | १६७३१२४.०० | १४६९४२९.०० | |

सदर बिलांची संस्थान वैद्यकीय देखभाल नियमावली सन १९९९ अन्वये छाननी केली असून देय होणारी एकूण रक्कम रु.१४,६९,४२९-/-मात्र आहे.

विभागाचा अभिप्राय / स्पष्ट मत –

नियमावली प्रमाणे छाननी केली असुन तसेच रुग्णांना संस्थान मान्य यादीतील हॉस्पिटलमध्ये पुढील उपचाराकरीता पाठविण्यात आले होते व काही ठिकाणी निकडीच्या प्रसंगी बाहेरील हॉस्पिटलमध्ये उपचार घेतले आहेत. सबब सदर रक्कम अदा करण्यास हरकत नाही,असे मत आहे.

पान नं-३ वर

तरी उपरोक्त १५ कर्मचा-यांना स्वत: व त्यांचेवर अवलंबित व्यक्ती(रुग्ण १६) यांचे वैद्यकीय उपचारापोटी आलेल्या खर्चाच्या उपरोक्त तक्त्यामध्ये त्यांचे नावासमोर दर्शविलेल्या देय होत असलेल्या रकमेचा परतावा त्यांना अदा करणेस व त्याकामी येणा-या रु. १४,६९,४२९/-मात्र रकमेच्या खर्चास मान्यता मिळणेस्तव सदरहू प्रस्ताव मा.तदर्थ समिती सभेसमोर सविनय सादर.

5/7/24

(कान्हूराज बगाटे)
मुख्य कार्यकारी अधिकारी,
श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिर्डी

विषय क्र.- ८८/क

## मा.तदर्थ (Ad-hoc) समिती सभेपुढे निर्णयार्थ सादर



खरेदी विभाग, श्री साईबाबा हॉस्पिटल

**विषय संस्थान कर्मचारी व त्यांचेवर अवलंबीतांचा वैद्यकीय बिलाचा परतावा रक्कम रु.९,७०,१६७/- मात्र अदा करणेस मंजुरी मिळणेबाबत...,**

टिपणी,

**व्यवस्थापन समितीचा ठराव क्र. –** १) जा. नं. एसएसएस-वशी रुग्णालय ५८२-९७ दि. १६/०१/१९९९. २) मा. व्यवस्थापन समिती सभा दि. ०९/१०/२०१६ निर्णय क्र. ६९० (६) अन्वये रु. २०,०००/- पर्यंत मा. कार्यकारी अधिकारी यांचे अधिकारात तर त्यावरील खर्चाची बिले ही मा. व्यवस्थापन समितीचे सभेच्या मान्यतेने अदा करावी.

प्रास्ताविक – खालील संस्थान कर्मचा-यांची वार्षिक रु. २०,०००/- पर्यंतची खर्चाची मर्यादा संपल्यामुळे रु. २०,०००/- पेक्षा जास्त खर्चाचे बिले परतावा मिळणेकामी सादर केलेले आहेत. मागणी – पुढील तक्यात नमुद केलेल्या कर्मचा-यांचे बिले परतावा मिळणेबाबत विनंती अर्ज.

| अ.नं. | कर्मचा-याचे नाव | कर्मचा-याशी नाते | आजाराचे नाव | डॉक्टरांचे नाव | रुग्णालयाचे नाव | एकूण मागणी रक्कम | एकूण देय रक्कम |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | **अ. संस्थान रुग्णालयात उपचार घेतलेले -** | | | | | | |
| १. | अभयकुमार शांताराम दुनाखे<br>विभाग –आय.टी.आय<br>हुद्दा-निर्देशक | पत्नी | Ca<br>कर्करोग | डॉ.बो-हाडे | श्री साईबाबा हॉस्पिटल | २४९०.०० | २४९०.०० |
| २. | विजय गणपत रोहमारे<br>विभाग- विद्युत<br>हुद्दा- उप कार्यकारी अभियंता | स्वत: | Hyper Tension<br>उच्च रक्तदाब | डॉ.देवरे | श्री साईबाबा हॉस्पिटल | १८४६.०० | १३६९.०० |
| ३. | आण्णासाहेब गोवर्धन कुदळे<br>विभाग- भक्तनिवास<br>हुद्दा- मदतनीस | स्वत: | Diabetes<br>मधुमेह | डॉ.पोरवाल | श्री साईनाथ हॉस्पिटल | १४३६०.०० | १४३६०.०० |
| ४. | नवनाथ साहेबराव जाधव<br>विभाग- बगीचा<br>हुद्दा-मदतनीस | आई | पटकी झटके येणे मेंदूचा आजार | डॉ.उंबरकर | श्री साईबाबा हॉस्पिटल | २०१२.०० | २०१२.०० |
| ५. | ज्योतिलाल भिका जाधव<br>विभाग- आय.टी.आय<br>हुद्दा-सहा.भांडारपाल | स्वत: | HTN<br>उच्च रक्तदाब | डॉ.पोरवाल | श्री साईबाबा हॉस्पिटल | ७०४०.०० | ७०४०.०० |
| ६. | सुभाष श्रीराम शामकुंवर<br>विभाग-साईबाबा हॉस्पि.<br>हुददा-आर.एम.ओ | स्वत: | कोविड-१९RT PCR Positive | डॉ.जाधवर | श्री साईबाबा हॉस्पिटल | २२०२९.०० | २०४४०.०० |
| ७ | राजेश रमणलाल वाकडे<br>विभाग-साईबाबा हॉस्पि.<br>हुददा-सि.बायो.इंजिनिअर | आई<br>स्वत: | HTN उच्च रक्तदाब<br>आतडयाच्या सुजेने होणारा अल्सर | डॉ.जाधवर | श्री साईबाबा हॉस्पिटल | ४६९१६.०० | ४६९१६.०० |
| | | | | | अ एकूण रक्कम रु. | ९६६९३.०० | ९४६२७.०० |
| | **ब. संस्थान रुग्णालयात उपचार न झालेले संस्थान मान्य यादीत रेफर केलेले** | | | | | | |
| ८. | सुभाष मल्हारी बंदावणे<br>विभाग-ध्वनिक्षेपण<br>हुददा- विद्युत पर्यवेक्षक | मुलगा | Chromic Renual failure<br>किडनी आजार | डॉ.जाधवर | रुबी हॉल क्लिनिक, पुणे | ३१७११.०० | ३१७११.०० |
| | | | | | ब एकूण रक्कम रु. | ३१७११.०० | ३१७११.०० |

पान नं-२ वर

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | **क.संस्थान रुग्णालयात उपचार न घेतलेले रेफर केलेले निकडीच्या प्रसंगी खाजगी रुग्णालयात उपचार घेतलेले** | | | | | | |
| ९. | सचिन वसंत देशमुख<br>विभाग-साईबाबा हॉस्पि.<br>हुददा-आर.एम.ओ. | स्वत:<br>मुलगा | Covid -19<br>RTPCR Positive | डॉ.कनसे | नोबेल हॉस्पिटल, अहमदनगर | १९६६०९.०० | १०६५८३.०० |
| १०. | देठे स्वप्ना प्रल्हाद<br>विभाग-साईबाबा हॉस्पि.<br>हुददा-स्टाफ नर्स | स्वत: | Covid -19<br>RTPCR Positive | डॉ.कनसे | नोबेल हॉस्पिटल, अहमदनगर | १०१३९३.०० | ६५४१८.०० |
| ११. | संतोष कुमार मराठे<br>विभाग-साईबाबा हॉस्पि.<br>हुददा-भुलतज्ञ | स्वत:<br>पत्नी | Covid -19<br>RTPCR Positive | डॉ.दिपक गिरी | रेजिंग मेडीकेअर हॉस्पिटल खराडी पुणे | ११६१३७.०० | ९२९०९.०० |
| | **क एकूण रक्कम रु.** | | | | | ४१४१३९.०० | २६४९१०.०० |
| | **ड.संस्थान रुग्णालयात उपचार घेतलेले रेफर केलेले निकडीच्या प्रसंगी खाजगी रुग्णालयात उपचार घेतलेले** | | | | | | |
| १२. | अरुण गणपत जाधव<br>विभाग-विदयुत विभाग<br>हुददा-तारतंत्री | आई | Covid -19<br>RTPCR Positive | डॉ.संदिप सांगळे | संजीवन हॉस्पिटल, संगमनेर | १६५४५३.०० | १२८७६२.०० |
| १३. | सुधाकर मारुती कुलकर्णी<br>विभाग-लेखाशाखा<br>हुददा-लिपिक | स्वत:<br>पत्नी | Covid -19<br>RTPCR Positive | डॉ.प्रशांत सिनारे | सिनारे हॉस्पिटल, अहमदनगर | २०७५०५.०० | १६२९६४.०० |
| १४. | शमा शौकत शेख<br>विभाग-साई प्रसादालय<br>हुददा-मदतनीस | सासू | Covid -19<br>RTPCR Positive | डॉ.शाहनवाज (दानिश) खान | सेवा हॉस्पिटल, संगमनेर | १२६५३५.०० | ९६६२०.०० |
| १५. | गौतम सुखदेव शेजवळ<br>विभाग-साईनाथ हॉस्पि.<br>हुददा-मदतनीस | स्वत: | Obstretive Uropates | डॉ.देशमुख | देशमुख हॉस्पिटल, शिर्डी | २५४२७.०० | १८९९८.०० |
| १६. | रोहिदास कचेश्वर मोकळ<br>विभाग-मदतनीस<br>हुददा-मदतनीस | पती | R/C/O<br>Phychiatric disorder | डॉ.पाटील | वोकार्ड हॉस्पिटल, नासिक | २२८२२९.०० | १७१५७५.०० |
| | **ड एकूण रक्कम रु.** | | | | | ७५३१४९.०० | ५७८९१९.०० |
| | **अ+ब+क+ड एकूण रक्कम रु.** | | | | | १२९५६९२.०० | ९७०१६७.०० |

सदर बिलांची संस्थान वैद्यकीय देखभाल नियमावली सन १९९९ अन्वये छाननी केली असून देय होणारी एकूण रक्कम रु.९,७०,१६७-/-मात्र आहे.

**विभागाचा अभिप्राय / स्पष्ट मत –**

नियमावली प्रमाणे छाननी केली असुन तसेच रुग्णांना संस्थान मान्य यादीतील हॉस्पिटलमध्ये पुढील उपचाराकरीता पाठविण्यात आले होते व काही ठिकाणी निकडीच्या प्रसंगी बाहेरील हॉस्पिटलमध्ये उपचार घेतले आहेत. सबब सदर रक्कम अदा करण्यास हरकत नाही,असे मत आहे.

तरी उपरोक्त १६ कर्मचा-यांना स्वत: व त्यांचेवर अवलंबित व्यक्ती (रुग्ण २०) यांचे वैद्यकीय उपचारापोटी आलेल्या खर्चाच्या उपरोक्त तक्त्यामध्ये त्यांचे नावासमोर दर्शविलेल्या देय होत असलेल्या रकमेचा परतावा त्यांना अदा करणेस व त्याकामी येणा-या रु. ९,७०,१६७/-मात्र रकमेच्या खर्चास मान्यता मिळणेस्तव सदरहू प्रस्ताव मा.तदर्थ समिती सभेसमोर सविनय सादर.

10/7/2021

SSH-Meeting-243

(कान्हूराज बगाटे)
मुख्य कार्यकारी अधिकारी,
श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिर्डी

विषय क्र.- ८८



मा. व्यवस्थापनसमितीचेसभेपुढेनिर्णयार्थसादर
विभाग – श्री साईबाबा हॉस्पिटल, शिर्डी

**विषयः- श्री साईबाबा हॉस्पिटल व श्री साईनाथ रक्तपेढीमध्ये एप्रिल २०२१ महिन्यात वैद्यकिय बिलात देण्यात आलेली सवलत रक्कम रु.३१,०७,००१/- ची नोंद घेऊन खर्चास मान्यता मिळणेबाबत..**

टिपणी,

श्री साईबाबा हॉस्पिटलमध्ये गरीब व गरजु रुग्णांना वैद्यकिय बिलात सवलत देण्या संबंधित मा.व्य.स.निर्णय क्र.५१९/दि.२४.०७.२०११ संमत झाला आहे. वैद्यकिय बिलात सवलत देण्याचे अधिकार उप.वै.संचालक/वै.संचालक यांना देण्यात आलेले आहेत त्यांचे गैर हजेरीत वै.प्रशासक/जनसंपर्क अधिकारी यांना अधिकार सुपुर्त करण्यात येऊन रुग्णांना मासिक वैद्यकिय बिलात सवलत देण्यात येते.

सोशल वर्कर हे रुग्णांची आर्थिक परिस्थीती जाणून घेतात व आवश्यक कागदपत्रांसह सवलत मंजुरी करीता प्रस्तावीत करतात.अशा प्रकारे हॉस्पिटलमध्ये वैद्यकिय बिलात सवलत देण्याकरीता स्वतंत्र विभाग कार्यरत आहे. निर्णय क्र.५६४/२६.०६.२०१४ अन्वये प्रत्येक महिन्यात देण्यात आलेल्या वैद्यकिय सवलतीस मा.कार्यकारी अधिकारी यांची मान्यता घेण्यात येऊन आर्थिक वर्षाच्या शेवटी एकत्रित अहवाल मा.व्य.स.चे सभे समोर नोंद घेण्यासाठी सादर करण्यात यावा असे ठरले आहे. माहे सप्टेंबर २०१७ मध्ये देण्यात आलेल्या वैद्यकिय सवलतीस मान्यतेचे प्रस्तावावर मा. मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी दर महा मा.व्य.समिती सभेसमोर सादर करण्यास शेरा दिला आहे. त्याप्रमाणे माहे **एप्रिल २०२१** मध्ये श्री साईबाबा हॉस्पिटलला ओपीडी रुग्ण **६,९१० व ४८८** आयपीडी रुग्णांपैकी **९४७** ओपीडी व **२००** आयपीडी रुग्णांना वैद्यकिय बिलात एकुण **रु.२९,८५,३०१/-** इतकी सवलत देण्यात आली व श्री साईनाथ रक्तपेढीमध्ये गरीब व गरजु रुग्णांना वैद्यकीय बिलात सवलत देण्या संबंधीत मा.व्य.स.निर्णय क्रं.३४६/दि.१८-१९.०८.२००१ संमत झाला आहे, जा.नं.एसएसएस/एसएसएच/३३१/२०१७ दि.३०.०३.२०१७ आदेश. दि.०६.०३.२०१० ची सिकल सेल आजाराच्या रुग्णांना मोफत रक्त देणेबाबत टिपणी प्रमाणे एकुण **११६** रुग्णाना **रु.१,२१,७००/-** इतकी मोफत/सवलत देण्यात आली आहे. सवलत/मोफतचे विवरण खालील प्रमाणे-

**(अ) श्री साईबाबा हॉस्पिटल**

| अ.नं. | रुग्णांची गटवारी | लाभार्थी संख्या | एकुण बिल रक्कम | बिलापोटी मिळालेली रक्कम | बिलात दिलेली सवलत |
|---|---|---|---|---|---|
| १ | गरीब/दारिद्रय रेषेखालील रुग्णांना दिलेली सवलत रक्कम | ७४ | ४,४९,७०३/- | - | ४,४९,७०३/- |
| २ | आर्थिक दुष्टया दुर्बल घटकातील रुग्णांना दिलेली सवलत रक्कम | १४२ | ६,५८,८८७/- | २,६७,०२८/- | ३,९१,८५९/- |
| ३ | सकृत दर्शनी गरीब रुग्णांना दिलेली सवलत रक्कम | ४ | ७,३००/- | - | ७,३००/- |
| ४ | कुत्रा, साप, माकड चावलेले रुग्ण, साई भक्त, साध्वी कन्या कुमारी, आश्रम, डायलेसिस, हिमोफिलीया, शालेय पोशन आरोग्ययोजना इ. | ३८१ | १९,२६,१४९/- | ९,९४,९५०/- | ९,३१,१९९/- |
| ५ | महात्मा फुले आरोग्या योजना आरोग्य योजना आयपीडी रुग्णांना दिलेली सवलत | १०१ | ७१,०५,९८०/- | ६३,१३,२४५/- | ७,९२,७३५/- |
| ६ | महात्मा फुले आरोग्या योजना ओपीडी रुग्णांना दिलेली सवलत | ४४५ | ४,१२,५०५/- | - - | ४,१२,५०५/- |
| | एकुण | १,१४७ | १,०५,६०,५२४/- | ७५,७५,२२३/- | २९,८५,३०१/- |

SSH-MEETING-239-2021



(ब) श्री साईनाथ रक्तपेढी

| अ.नं. | रुग्णांची गटवारी | लाभार्थी संख्या | एकुण बिल रक्कम | बिलापोटी मिळालेली रक्कम | बिलात दिलेली सवलत |
|---|---|---|---|---|---|
| १ | थॅलॅसिमिया | २६ | २९,०००/- | - | २९,०००/- |
| २ | हिमोफिलीया | ० | - | - | - |
| ३ | सिकल सेल ॲनेमीया फ्रि | ० | - | - | - |
| ४ | ऑदर ब्लड डिसऑर्डर | ३ | ४,०००/- | | ४,०००/- |
| ५ | फ्रि डन बाय एमएडी/एमएस | १ | १,२००/- | - | १,२००/- |
| ६ | व्हॉलंटरीब्लड डोनेशन फ्रि | २८ | ३,१००/- | - | ३,१००/- |
| ७ | महात्मा फुले आरोग्या योजना | २६ | ४३,०००/- | - | ४३,०००/- |
| ८ | संस्थान एम्प्लॉयी फ्रि | ३ | ४,८००/- | - | ४,८००/- |
| ९ | कॉन्ट्रक्ट एम्प्लॉयी फ्रि | ० | - | - | - |
| १० | श्री साईनाथ हॉस्पिटल फ्रि | २९ | ३६,६००/- | - | ३६,६००/- |
| | एकुण | ११६ | १,२१,७००/- | - | १,२१,७००/- |
| | एकुण अ+ब | १,२६३ | १,०६,८२,२२४/- | ७५,७५,२२३/- | ३१,०७,००१/- |

**प्रस्ताव-** उपरोक्त प्रमाणे श्री साईबाबा हॉस्पिटल व श्री साईनाथ रक्तपेढीमध्ये **एप्रिल २०२१** मध्ये वैद्यकिय बिलात सोशल वर्कर विभागामार्फत विहित पध्दतीने देण्यात आलेली सवलत रक्कम **रु.३१,०७,००१/-** ची नोंद घेऊन दिलेल्या सवलतीस मान्यतेसाठी सदरचा प्रस्ताव मा.तदर्थ (Ad-Hoc) समितीचे सभेसमोर निर्णयास्तव सादर.

5/7/21

(कान्हूराज बगाटे ,भा.प्र.से)
**मुख्यकार्यकारी अधिकारी**
श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिर्डी

विषय क्र.- ८०



मा. व्यवस्थापनसमितीचेसभेपुढेनिर्णयार्थसादर
विभाग – श्री साईबाबा हॉस्पिटल, शिर्डी

**विषयः- श्री साईबाबा हॉस्पिटल व श्री साईनाथ रक्तपेढीमध्ये मे २०२१ महिन्यात वैद्यकिय बिलात देण्यात आलेली सवलत रक्कम रु.१२,४४,०४१/- ची नोंद घेऊन खर्चास मान्यता मिळणेबाबत..**

टिपणी,

श्री साईबाबा हॉस्पिटलमध्ये गरीब व गरजु रुग्णांना वैद्यकिय बिलात सवलत देण्या संबंधित मा.व्य.स.निर्णय क्र.५१९/दि.२४.०७.२०११ संमत झाला आहे. वैद्यकिय बिलात सवलत देण्याचे अधिकार उप.वै.संचालक/वै.संचालक यांना देण्यात आलेले आहेत त्यांचे गैर हजेरीत वै.प्रशासक/जनसंपर्क अधिकारी यांना अधिकार सुपुर्त करण्यात येऊन रुग्णांना मासिक वैद्यकिय बिलात सवलत देण्यात येते.

मा.उच्च न्यायालय यांचे रिट पिटीशन (पी.आय.एल) नं.३१३२/मधील दि.१७/०८/२००६ अन्वये समाजातील गरीब रुग्णांना वैद्यकिय बिलामध्ये सवलत देण्यासाठी योजना (स्किम) केलेली आहे. त्यामध्ये सुध्दा गरीब व गरजु (इंडिजेंट) रुग्णांसाठी १० % खाटा पूर्ण सवलतीच्या दरात व दुर्बल घटकातील १० % खाटा ५०% सवलतीच्या दरात राखीव ठेवुन बिल आकारणी करण्यास सूचविले आहे. त्याचप्रमाणे सोशल वर्कर हे रुग्णांची आर्थिक परिस्थीती जाणून घेतात व आवश्यक कागदपत्रांसह सवलत मंजुरी करीता प्रस्तावीत करतात.अशा प्रकारे हॉस्पिटलमध्ये वैद्यकिय बिलात सवलत देण्याकरीता स्वतंत्र विभाग कार्यरत आहे. निर्णय क्र.५६४/२६.०६.२०१४ अन्वये प्रत्येक महिन्यात देण्यात आलेल्या वैद्यकिय सवलतीस मा.कार्यकारी अधिकारी यांची मान्यता घेण्यात येऊन आर्थिक वर्षाच्या शेवटी एकत्रित अहवाल मा.व्य.स.चे सभे समोर नोंद घेण्यासाठी सादर करण्यात यावा असे ठरले आहे. माहे सप्टेंबर २०१७ मध्ये देण्यात आलेल्या वैद्यकिय सवलतीस मान्यतेचे प्रस्तावावर मा. मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी दर महा मा.व्य.समिती सभेसमोर सादर करण्यास शेरा दिला आहे. त्याप्रमाणे माहे **मे २०२१** मध्ये श्री साईबाबा हॉस्पिटलला ओपीडी रुग्ण **३,६५२ व ५२२** आयपीडी रुग्णांपैकी **३९१** ओपीडी व **५६** आयपीडी रुग्णांना वैद्यकिय बिलात एकुण **रु.११,०९,९४१/-** इतकी सवलत देण्यात आली व श्री साईनाथ रक्तपेढीमध्ये गरीब व गरजु रुग्णांना वैद्यकीय बिलात सवलत देण्या संबंधीत मा.व्य.स.निर्णय क्रं.३४६/दि.१८-१९.०८.२००१ संमत झाला आहे, जा.नं.एसएसएस/एसएसएच/३३१/२०१७ दि.३०.०३.२०१७ आदेश. दि.०६.०३.२०१० ची सिकल सेल आजाराच्या रुग्णांना मोफत रक्त देणेबाबत टिपणी प्रमाणे एकुण ९१ रुग्णाना **रु.१,३४,१००/-** इतकी मोफत/सवलत देण्यात आली आहे. सवलत/मोफतचे विवरण खालील प्रमाणे-

**(अ) श्री साईबाबा हॉस्पिटल**

| अ.नं. | रुग्णांची गटवारी | लाभार्थी संख्या | एकुण बिल रक्कम | बिलापोटी मिळालेली रक्कम | बिलात दिलेली सवलत |
|---|---|---|---|---|---|
| १ | गरीब/दारिद्रय रेषेखालील रुग्णांना दिलेली सवलत रक्कम | २६ | २,११,२८२/- | - | २,११,२८२/- |
| २ | आर्थिक दृष्टया दुर्बल घटकातील रुग्णांना दिलेली सवलत रक्कम | ५५ | १,९२,४१०/- | ८४,७४९/- | १,०७,६६१/- |
| ३ | सकृत दर्शनी गरीब रुग्णांना दिलेली सवलत रक्कम | ३ | १३,३६९/- | ४,०००/- | ९,३६९/- |
| ४ | कुत्रा, साप, माकड चावलेले रुग्ण, साई भक्त, साध्वी कन्या कुमारी, आश्रम, डायलेसिस, हिमोफिलीया, शालेय पोशन आरोग्ययोजना इ. | २१६ | ७,३१,५१७/- | २,०८,७४८/- | ५,२२,७६९/- |
| ५ | महात्मा फुले आरोग्या योजना आरोग्य योजना आयपीडी रुग्णांना दिलेली सवलत | २४ | १२,०९,६००/- | १०,०९,७५०/- | १,९९,८५०/- |
| ६ | महात्मा फुले आरोग्या योजना ओपीडी रुग्णांना दिलेली सवलत | १२३ | ५९,०१०/- | - | ५९,०१०/- |
| | एकुण | ४४७ | २४,१७,१८८/- | १३,०७,२४७/- | ११,०९,९४१/- |

SSBH-MEETING-245-2021

388



(ब) श्री साईनाथ रक्तपेढी

| अ.नं. | रुग्णांची गटवारी | लाभार्थी संख्या | एकुण बिल रक्कम | बिलापोटी मिळालेली रक्कम | बिलात दिलेली सवलत |
|---|---|---|---|---|---|
| १ | थॅलेसिमिया | ४८ | ८०,६००/- | - | ८०,६००/- |
| २ | हिमोफिलीया | ० | - | - | - |
| ३ | सिकल सेल अॅनेमीया फ्रि | ० | - | - | - |
| ४ | ऑदर ब्लड डिसऑर्डर | १ | ८००/- | | ८००/- |
| ५ | फ्रि डन बाय एमएडी/एमएस | २ | १,८००/- | - | १,८००/- |
| ६ | व्हॉलंटरीब्लड डोनेशन फ्रि | १६ | २,२००/- | - | २,२००/- |
| ७ | महात्मा फुले आरोग्या योजना | १४ | ३७,३००/- | - | ३७,३००/- |
| ८ | संस्थान एम्प्लॉयी फ्रि | २ | २,४००/- | - | २,४००/- |
| ९ | कॉन्ट्रक्ट एम्प्लॉयी फ्रि | ० | - | - | - |
| १० | श्री साईनाथ हॉस्पिटल फ्रि | ८ | ९,०००/- | - | ९,०००/- |
| | एकुण | ९१ | १,३४,१००/- | - | १,३४,१००/- |
| | एकुण अ+ब | ५३८ | २५,५१,२८८/- | १३,०७,२४७/- | १२,४४,०४१/- |

**प्रस्ताव**- उपरोक्त प्रमाणे श्री साईबाबा हॉस्पिटल व श्री साईनाथ रक्तपेढीमध्ये **मे २०२१** मध्ये वैद्यकिय बिलात सोशल वर्कर विभागामार्फत विहित पध्दतीने देण्यात आलेली सवलत रक्कम रु.१२,४४,०४१/- (एकुण सवलत अक्षरी रुपये बारा लाख चौव्वेचाळीस हजार एक्केचाळीस मात्र) ची नोंद घेऊन दिलेल्या सवलतीस मान्यतेसाठी सदरचा प्रस्ताव मा.तदर्थ (Ad-Hoc) समितीचे सभेसमोर निर्णयास्तव सादर.

10/7/21

(कान्हूराज बगाटे ,भा.प्र.से)
**मुख्यकार्यकारी अधिकारी**
श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिर्डी

विषय क्र.- ८१



## मा.तदर्थ (Ad-hoc) समिती सभेपुढे मान्यतेसाठी सादर

श्री साईबाबा हॉस्पिटल, शिर्डी

**विषय:- श्री साईबाबा व श्री साईनाथ रुग्णालयाकरीता ५० नग Ventilator खरेदी करणेबाबत.**

टिपणी,

श्री साईबाबा व श्री साईनाथ रुग्णालयाने मागणीपत्रकान्वये Ventilator (Adult, Paediatric, C-PAP, High Flow Nasal Oxygen) ची मागणी केलेली आहे.

रुग्णालयामध्ये दाखल झालेल्या ज्या रुग्णांना नैसर्गिकरित्या श्वासोच्छवास करणेस त्रास होतो अथवा अशक्य होते, त्यांना सदर व्हेंटीलेटरद्वारे कृत्रिम श्वासोच्छवास पुरविला जातो. त्यासाठी प्रौढ रुग्णांसाठी Adult Ventilator व बाल रुग्णांसाठी Pediatric Ventilator चा वापर केला जातो. तसेच सध्या कोविड-१९ या साथरोगाच्या रुग्णांना ऑक्सिजनची मोठया प्रमाणात आवश्यकता असते. त्यासाठी हायफ्लो ऑक्सिजन थेरपी करिता High Flow Nasal Oxygen व C-PAP ची सुविधा असलेले Ventilator वापरले जातात.

त्यानुसार श्री साईबाबा व श्री साईनाथ रुग्णालयाकरिता एकूण ५० नग Ventilator ची मागणी आलेली असून सदरहू Ventilator खरेदीकामी अंदाजे रक्कम निश्चित करणेसाठी बायोमेडीकल विभागाने काही पुरवठाधारकांना ई-मेल केलेले होते. त्यानुसार त्यांनी ई-मेल अन्वये दिलेले दरपत्रकाचा तपशील खालीलप्रमाणे:-

| Sr. No. | Item Description | Qty. | Rate per in Rs. | CAMC for Next 5 Years after Warranty Period | Rate per in Rs. | CAMC for Next 5 Years after Warranty Period | Machine Cost in Rs. | CAMC Price in Rs. | Total Amount of Machine.+ Warranty1 year+CAMC |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | Ventilator Adult | 15 | India Medtronic Pvt. Ltd. | | R.S. Enterprises, Pune | | Average Rate Per in Rs. | | |
| | | | 1120000/- | 358687/- | 1176000/- | 619500/- | 1148000/- | 489093.50 | 24556402.00 |
| 2 | Ventilator Paediatric | 10 | India Medtronic Pvt. Ltd. | | R.S. Enterprises, Pune | | Average Rate Per in Rs. | | |
| | | | 1120000/- | 358687/- | 1176000/- | 619500/- | 1148000/- | 489093.5 | 16370935.00 |
| 3 | High Flow Nasal Oxygen | 15 | Drager India Pvt. Ltd. | | World Class Healthcare, Pune | | Average Rate Per in Rs. | | |
| | | | 408606/- | 168750/- | 475000/- | 354000/- | 441803/- | 261375 | 10547670/- |
| 4 | CPAP Machine | 10 | R.S. Enterprises, Pune | | Resmed, New Delhi | | Average Rate Per in Rs. | | |
| | | | Machine cost | CAMC | Machine cost | CMC | Average Rate Per in Rs. | | |
| | | | 173600/- | 324500/- | 75000/- | 24133.36 | 124300/- | 174317/- | 2986170/- |
| | | | | | | | Total Amt in Rs. | | 54461177.00 |

उपरोक्त दरपत्रकाच्या तक्त्यानुसार मशिनरी व उपकरणे खरेदीकामी पुर्णांकित रक्कम रु.५,४४,६१,१७७/- (अक्षरी रक्कम रु.पाच कोटी चव्वेचाळीस लाख एकसष्ठ हजार एकशे सत्याहत्तर मात्र) इतका खर्च अपेक्षित आहे.

**संस्थान अधिनियम / ठराव यानुसार छाननी, शासन निर्देश, तांत्रिक, कायदेशीर तसेच आर्थिक विषय इ. छाननी करुन अनुमान:-**

१) अधिनियमातील समितीचे कर्तव्ये व अधिकार क्र.१७-२ (ण)अन्वये मानवजातीच्या कल्याण करणा-या किंवा मानवाला आपत्तीमध्ये साहाय्य करणा-या अन्य कोणत्याही उदात्त कार्यास चालना देईल असा आहे. त्यानुसार संस्थानतर्फे दोन धर्मदाय रुग्णालये चालविण्यात येतात.

२) शासकीय विभागानी करावयाच्या कार्यालयीन खरेदीसाठी कार्यपध्दतीची नियमावली नुसार शासन निर्णय क्र. भांखस – २०१४ / प्र.क्र. ८२ / भाग – ३ / उद्योग – ४, दि. १ डिसेंबर २०१६ अन्वये परिच्छेद ३.२.३–रू. ३ लाखापर्यंत असेल तेंव्हा दरपत्रके मागवून खरेदी करण्याची खरेदीदार विभागांना मुभा देण्यात आली होती परंतु, नविन सुधारीत शासन नियमावली नुसार शासन निर्णय क्र.भांखस– २०२१/ प्र.क्र. ८/ उद्योग– ७ मे,

242/21



२०२१ अन्वये परिच्छेद ३.२.३– "दरपत्रकाच्या आधारे करण्यात येणा-या खरेदीची आर्थिक मर्यादा रू.३ लाखावरून (रू.३,००,०००/-) रू. १० लाखापर्यंत (रू. १०,००,०००/-) व त्यापुढील खरेदीसाठी ई-निविदा पध्दतीचा अवलंब करणे अनिवार्य करण्यात येत आहे."

३) नविन Ventilator– Adult, Ventilator –Paediatric, C-PAP व High Flow Nasal Oxygen खरेदीकामी अंदाजे खर्च हा ५०,००,०००/- पेक्षा जास्त येत असल्यामुळे मा. उच्च न्यायालयाचे, औरंगाबाद खंडपीठाची मान्यता घ्यावी लागणार आहे.

**विभागाचा अभिप्राय/ स्पष्ट मत:-**

रुग्णालयामध्ये दाखल झालेल्या ज्या रुग्णांना नैसर्गिकरित्या श्वासोच्छ्वास करणेस त्रास होतो अथवा अशक्य होते, त्यांना सदर व्हेंटीलेटरद्वारे कृत्रिम श्वासोच्छवास पुरविला जातो. त्यासाठी प्रौढ रुग्णांसाठी Adult Ventilator व बाल रुग्णांसाठी Pediatric Ventilator चा वापर केला जातो. तसेच सध्या कोविड-१९ या साथरोगाच्या रुग्णांना ऑक्सिजनची मोठया प्रमाणात आवश्यकता असते. त्यासाठी हायफ्लो ऑक्सिजन थेरपी करिता High Flow Nasal Oxygen व C-PAP ची सुविधा असलेले Ventilator वापरले जातात. सदरहू Ventilator खरेदी करणेकामी पुर्णांकित रक्कम रु.५,४४,६१,१७७/- (अक्षरी रक्कम रु.पाच कोटी चव्वेचाळीस लाख एकसष्ठ हजार एकशे सत्त्याहत्तर मात्र) खर्च अपेक्षीत असून याकामी येणारा खर्च रु.५० लाख मात्रपेक्षा अधीक असल्यामुळे त्यास मा.मुंबई उच्च न्यायालय खंडपीठ औरंगाबाद याची मान्यता घेणे आवश्यक राहील व मा.खंडपीठाच्या मान्यतेनंतर विहीत पध्दतीने ई-निविदा प्रक्रिया राबविणेत येऊन खरेदी करता येईल, असे मत आहे.

तरी श्री साईबाबा व साईनाथ रूग्णालयाकरीता Ventilator– Adult, Ventilator– Paediatric, C-PAP व High Flow Nasal Oxygen विहित पध्दतीने ई-निविदा मागवून खरेदी करणेस व याकामी येणा-या अंदाजे रक्कम रु.५,४४,६१,१७७/- (अक्षरी रक्कम रु.पाच कोटी चव्वेचाळीस लाख एकसष्ठ हजार एकशे सत्त्याहत्तर मात्र) तसेच याकामी मा.औरंगाबाद खंडपीठाची मान्यता घेणेकामीचा प्रस्ताव तदर्थ समितीच्या सभेसमोर सादर.

5/7/21

(कान्हूराज बगाटे, भा.प्र.से.)
मुख्यकार्यकारी अधिकारी
श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी

01/07/21

विषय क्र.- ८२



## :मा. व्यवस्थापन समितीचे तदर्थ समितीपुढील विषय:

## विभाग- श्री साईबाबा हॉस्पिटल

**विषय- महात्मा ज्योतिबा फुले जन आरोग्य योजनेअंतर्गत रूग्णांच्या प्रत्यक्ष उपचारापोटी प्राथमिक मंजूरी आदेशापेक्षा विमा कंपनीकडून कमी मिळालेल्या रकमेस वैद्यकीय सवलत म्हणून नावे टाकण्यास मान्यता मिळणेबाबत..**

संदर्भ- १. दि.२९/०७/२०१२ रोजीच्या मा.व्यवस्थापन समिती सभेतील विषय क्रं.०३ निर्णय क्रं.६४७
२. दि.७/३/२०१८ रोजीच्या मा.व्यवस्थापन समिती सभेतील विषय क्रं.६० निर्णय क्रं. १९८
३. दि.४/१२/२०१९ रोजीच्या मा.व्यवस्थापन समिती सभेतील विषय क्रं.८६ निर्णय क्रं. ५६५
४. जा.नं.एसएसएसटी/एसएसबीएच/वित्त-१८ दि.७ मे २०२१ चे वित्त विभागाचे पत्र
५. राजीव गांधी जीवनदायी आरोग्य योजनच्या दि. २५/३/२०१५ रोजीच्या गाईडलाइन्स

**प्रास्तविक-** श्री साईबाबा हॉस्पिटलमध्ये महाराष्ट्र शासनाची राजीव गांधी जीवनदायी आरोग्य योजना दि. १४ फेब्रूवारी २०१३ पासून चालू आहे. दि. १ जून २०१७ पासून राज्य शासनाने या योजनेच्या नावात बदल करून महात्मा ज्योतिबा फुले जन आरोग्य योजना असे नामकरण केलेले आहे. तसेच १ फेब्रूवारी २०२१ पासून महात्मा 'ज्योतिबा' फुले ऐवजी **महात्मा ज्योतिराव फुले जन आरोग्य योजना** असा पुन्हा नावांत बदल करण्यात आलेला आहे. रूग्णालयातून रूग्ण डिसचार्ज झाल्यांनंतर ११ दिवसांनंतर प्राथमिक मंजूरी आदेशाप्रमाणे विमा कंपनीस ऑनलाइन बीले सादर करण्यात येतात. विमा कंपनीकडून सदर बीलांची रूग्णावर करण्यात आलेल्या उपचारांच्या रिपोर्टवरून व शस्त्रक्रियेच्या फोटोवरून शहानिशा करण्यात येते. तसेच बीले अदा करण्यापूर्वी योजनेच्या नियम व गाइडलाइन्सनुसार प्राथमिक मंजूर रकमेत कपात करून देय बीलाची रक्कम रूग्णालयाच्या बॅंक खात्यात आरटीजीएस पध्दतीने जमा करण्यात येते.

सदर योजनेच्या काही पॅकेजमध्ये प्राथमिक मंजूरी आदेशापेक्षा कमी रक्कम प्राप्त होण्याची कारणे ही संस्थान रूग्णालय व रा.गां.जी.आ.यो. किंवा महात्मा ज्योतीबा फुले जन आरोग्य योजना यांच्यात झालेल्या एमओयू व योजनेच्या गाइडलाइन्सप्रमाणे आहेत.

१. उपचार/ शस्त्रक्रियेनंतर रूग्णाची प्रकृती समाधानकारक नसल्यास नातेवाईक रूग्णास इतरत्र घेवून जातात, अशा परिस्थितीत रूग्णास डॉक्टरांच्या सल्लयाविरूदध् (**Dama**) डिसचार्ज दयावा लागतो, अशा रूग्णांच्या मंजूर पॅकेजच्या ७५% इतकीच रक्कम विमा कंपनीकडून अदा केली जाते, उर्वरीत २५% रक्कम रूग्णालय त्या रूग्णाकडून योजनेच्या नियमाप्रमाणे वसूल करू शकत नाही.
२. एखादया रूग्णाच्या शस्त्रक्रियेनंतर २४ तासांचे आंत रूग्णाचे निधन (**Death**) झाल्यास मंजूर पॅकेजच्या ७५% इतकीच रक्कम विमा कंपनीकडून अदा केली जाते.
३. ऑर्थो प्रोसिजर्समध्ये एकत्रित फ्रॅक्चर्सचे पॅकेज असते, रूग्णाचे प्रत्यक्ष ऑपरेशन करतांना किती फ्रॅक्चर्स ऑपरेट केलेले आहेत, याबाबतची खात्री करून फक्त ऑपरेट केलेल्या फ्रॅक्चर्सनूसार रक्कम विमा कंपनीकडून अदा केली जाते.
४. मेडिसिन पॅकेजअंतर्गत रूग्णालयात दाखल असणा-या उपचार करतांना योजनेच्या मंजूरीपासून डिसचार्जपर्यंतचा कालावधीच देय रकमेसाठी ग्राहय धरला जातो. म्हणून पॅकेजच्या नियमाप्रमाणे प्रतिदिवसानुसार लागू होणारी रक्कम विमा कंपनीकडून अदा केली जाते.(उदा. एखादया रूग्णासाठी मंजूर पॅकेज १५ दिवसांचे असेल, परंतू त्याला ५ दिवसांत डिसचार्ज केलेले आहे, तर त्या रूग्णाचे फक्त ५ दिवसांची रक्कम मिळते.)
५. हॉस्पिटलमध्ये रूग्णावर एकाच वेळी दोन पॅकेजअंतर्गत उपचार किंवा दोन शस्त्रक्रिया केलेल्या असतील, अशा रूग्णाच्या बीलांची रक्कम अदा करतांना पहिल्या पॅकेजची रक्कम १००% व त्यापूढील कोणत्याही दुस-या पॅकेजची रक्कम ५०% प्रमाणे विमा कंपनीकडून अदा केली जाते.

राजीव गांधी जीवनदायी आरोग्य योजना व महात्मा ज्योतिबा फुले जन आरोग्य योजनेकडे ऑनलाइन पध्दतीने सादर केलेल्या फाइलच्या दि. १४/०२/२०१३ ते दि. ३०/११/२०१७ पर्यंच्या प्राथमिक मंजूरी आदेशापेक्षा कमी प्राप्त झालेल्या रकमेस संदर्भ क्र.२ नुसार तसेच संदर्भ क्रं. ३ नुसार ०१/१२/२०१७ ते दि. ३१/०३/२०१९ पर्यंतच्या कमी आलेल्या रकमेस मा.व्यवस्थापन समितीची मंजूरी घेण्यात आलेली आहे. तरी आता संदर्भ क्र. ४ प्रमाणे दि. ०१/०४/२०१९ ते ३१/०३/२०२१ अखेरपर्यंतच्या कमी आलेल्या रकमेस वैदयकीय सवलत म्हणून नावे टाकणेकरिता मा. व्यवस्थापन समितीची मान्यता घेणे आवश्यक आहे.

सद्यस्थिती-

परिशिष्ट- अ

| कालावधी | कमी रक्कम प्राप्त झालेल्या रूग्णांची संख्या | प्राथमिक मंजूरी आदेशाप्रमाणे येणे असलेली रक्कम | विमा कंपनीकडून प्रत्यक्ष प्राप्त झालेली रक्कम | प्रत्यक्षात वसूल झालेली रक्कम | एकूण कमी आलेली रक्कम |
|---|---|---|---|---|---|
| ०१/०४/२०१९ ते ३१/०३/२०२१ | २६ | २२,८२,०३१ | १६,३७,३०० | १३,६१५ | ६,३१,११६ |

सोबत Annexure-A जोडलेले आहे.

विभागाचा अभिप्राय –

राजीव गांधी जीवनदायी आरोग्य योजनेकडे (महात्मा ज्योतिबा फुले जन आरोग्य योजना) त्यांचेसोबत संस्थान रूग्णालयाने केलेल्या एमओयू व गाइडलाइन्सनुसार रूग्णालयास कमी प्राप्त झालेली रक्कम ही विमा कंपनीने गाइडलाइन्समध्ये नमूद केल्याप्रमाणे कपात केलेली आहे. त्यामूळे विमा कंपनीकडून यापूढे ही रक्कम प्राप्त होणार नसल्याने लेखापरिक्षणाच्या दृष्टीने सदरची रक्कम संस्थान वैदयकीय सवलत म्हणून नावे टाकण्यास मा. व्यवस्थापन समितीची मंजूरी घ्यावी लागणार आहे, असे नम्र मत आहे.

मागणी-

वित्त विभागाच्या संदर्भ क्र.४ च्या पत्राप्रमाणे दि.०१/०४/२०१९ ते दि. ३१/०३/२०२१ पर्यंतच्या कालावधीतील २६ रूग्णांच्या कमी प्राप्त झालेल्या रू. ६,३१,११६/- रकमेस परिशिष्ट- अ प्रमाणे वित्त विभागामार्फत वैदयकीय सवलत म्हणून नावे टाकण्यास मंजूरी मिळणेकामी सदरचा विषय मा.व्यवस्थापन समिती तथा तदर्थ सभेपूढे निर्णयार्थ सादर.

10/7/21

(कान्हूराज बगाटे भा.प्र.से.)
मुख्य कार्यकारी अधिकारी
श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी

ARP No. 246
Dated. 14/7/21

विषय क्र.- e3

मा तदर्थ (Ad-hoc) समितीचे सभेसमोरील विषय
विभागाचे नाव - श्री साईबाबा हॉस्पिटल

विषय - दि.१५/०५/२०२१ रोजीचे मुलाखतीद्वारे वैद्यकीय संचालक पदासाठी निवड समितीने निवड केलेल्या उमेदवारांस नेमणूक देणेबाबत . . .

टिपणी -

प्रस्तावना -

श्री साईबाबा व श्री साईनाथ रुग्णालयातील आवश्यक रिक्त पदे भरणेबाबतचा मा. तदर्थ (Ad-hoc) समिती सभेसमोर चक्रीय पध्दतीने अनुक्रमे दि.२९/०१/२०२१, दि.२३/०२/२०२१ व दि.१३/०३/२०२१ रोजी सादर केलेल्या प्रस्तावावर अनुक्रमे दि.०१/०२/२०२१, दि.०१/०३/२०२१ व दि.२३/०३/२०२१ निर्णय झालेले आहेत. सदर निर्णयास अनुसरून दि.०६/०४/२०२१ रोजी वर्तमानपत्रामध्ये व संस्थानचे संकेतस्थळावर जाहीरात प्रसिध्द करून १० दिवसाचे आत अर्ज करणेसाठी कालावधी दिला होता. तसेच, उपरोक्त संदर्भीय मा तदर्थ (Ad-hoc) समितीचे झालेले निर्णयानुसार मा मुंबई उच्च न्यायालयाचे खंडपीठ औरंगाबाद येथील सिव्हील ॲप्लीकेशन नं.४६८४/२०२१ वरील दि.२०/०४/२०२१ रोजी खालीलप्रमाणे मंजुरी आदेश दिला आहे.

The Sansthan is permitted to appoint qualified doctors on contract basis as per circulatory resolution dated 23.02.2021 for eleven (11) months. The said task be performed immediately on priority basis.

सिव्हील ॲप्लीकेशनमधील आदेशास अनुसरून उमेदवारांना दि. २७/०४/२०२१ रोजी मुलाखतीसाठी हजर राहणेबाबत दुरध्वनीद्वारे, ई-मेल द्वारे कळविले होते. सदर जाहीरातीस अनुसरून प्राप्त अर्जदारांच्या दि.२७/०४/२०२१ रोजी निवड समितीसमोर मुलाखती घेऊन निवड समितीने निवड केलेल्या उमेदवारांना दि.२९/०७/२०२१ रोजी नेमणूक आदेश दिले आहेत.

सदर पदांपैकी रिक्त राहीलेल्या तज्ञ वैद्यकीय अधिकारी, आरएमओ, सीएमओ इ. पदांची २९/०४/२०२१ रोजीचे मंजुर टिपणीस अनुसरून दि.०१/०५/२०२१ रोजी वर्तमानपत्रामध्ये व संस्थानचे संकेतस्थळावर जाहीरात प्रसिध्द करणेत आली होती. सदर जाहीरातीमध्ये ७ दिवसाचे आत अर्ज करणेसाठी कालावधी दिला होता. सदर जाहीरातीस अनुसरून प्राप्त अर्जदारांच्या दि.१५/०५/२०२१ रोजी निवड समितीसमोर मुलाखतीसाठी बोलविणेत आले होते.

तसेच वैद्यकीय संचालक, निवासी वैद्यकीय संचालक, वैद्यकीय अधिक्षक, वैद्यकीय प्रशासक व इतर पदांकरीता सध्या कोरोनाचा प्रादुर्भाव मोठ्या प्रमाणात असल्याने गर्दी टाळणेकरीता त्यांच्या मुलाखती दुस-या टप्प्यात घेणेचे ठरले. सदर वैद्यकीय संचालक, उपवैद्यकीय संचालक, वैद्यकीय अधिक्षक व वैद्यकीय प्रशासक या पदाकरीता प्राप्त अर्जदार उमेदवारांनाही दि.१५/०५/२०२१ रोजी मुलाखतीकरीता बोलविणेत आले होते.

| अ.नं. | पदाचे नाव | जाहीरात केलेली पद संख्या |
|---|---|---|
| SAIBABA HOSPITAL | | |
| १ | Medical Director | १ |
| २ | Resident Dy Medical Director | १ |
| ३ | Medical Administrator | १ |

| अ.नं. | पदाचे नाव | जाहीरात केलेली पद संख्या |
|---|---|---|
| ४ | Neurologist | २ |
| ५ | Gastroenterologist | १ |
| ६ | Junior Radiologist | २ |
| ७ | Casualty Medical Officer | ६ |
| ८ | R M O | ५ |
| | SAINATH HOSPITAL | |
| १ | Medical Superintendent | १ |
| २ | Medical Officer (Physician) | १ |
| ३ | Chief Blood Transfusion Officer | १ |
| ४ | Medical Officer (Ophthalmologist) | १ |
| ५ | Blood Transfusion Officer | १ |
| ६ | Medical Officer (Sonologist) | १ |
| ७ | Junior Anesthesiologists | १ |
| ८ | Casualty Medical Officer (CMO) | १ |
| ९ | Resident Medical Officer (RMO) | ३ |

उपरोक्त पदांकरीता मुलाखती निवड समिती १) मा. श्री कान्हूराज बगाटे, मुख्य कार्यकारी अधिकारी, (भा.प्र.से.) २) मा. श्री भानुदास पालवे साहेब, सदस्य, तदर्थ समिती तथा अप्पर आयुक्त नाशिक विभाग, नाशिक (ऑनलाईन झुम मिटींगद्वारे उपस्थित) ३) डॉ गोकुळ घोगरे, जिल्हा शल्य चिकीत्सक यांचे प्रतिनिधी ४) डॉ प्रितम वडगावे, प्र वैद्यकीय संचालक ५) डॉ मैथिली पितांबरे, प्र वैद्यकीय अधिक्षिका यांचे समितीसमोर दि.१५/०५/२०२१ रोजी मुलाखती घेणेत आल्या.

वैद्यकीय संचालक या पदाची पात्रता व मानधन खालीलप्रमाणे आहे.

| Required Qualification | Fixed Honorarium Per month |
|---|---|
| 1) Age not more than 45 yrs, age relaxation of 5yrs to candidate from reserve category. Upper limit of age will be relaxed for candidate with exceptional qualification & experience. 2) MBBS, MD/ MS from recognized university. 3) DHA / MHA / M Phil in Hospital Administration from recognized university will be preferred 4) MS-CIT 5) MMC / MCI registration with renewal is mandatory 6) Experience of Hospital Administration as Medical Director / Dy Medical Director/ Medical Administrator/ Medical Superintendent/civil surgeon in minimum 300 bedded hospital for 7 years. 7) Age limit will be relaxed for persons who is ex-employee of Govt/ Semi. Govt. experience. 8) Preference will be given to the candidates who have exceptional qualification or experience or both. | 105100 + Incentive as per Sansthan rule |

वैद्यकीय संचालक, श्री साईबाबा रूग्णालय या पदाकरीता ६ उमेदवारांना मुलाखतीकरीता बोलविणेत आले होते. यापैकी ०१ उमेदवार गैरहजर असल्याने उर्वरित ५ उमेदवारांच्या मुलाखती घेणेत आल्या. त्यापैकी.

अ नं १ चे उमेदवार डॉ योगेश कांतीलाल शिंदे यांची मुळ शैक्षणिक पात्रता बी.ए.एम.एस. असुन वैद्यकीय संचालक या पदाकरीता आवश्यक असलेली मुळ शैक्षणिक पात्रता नसल्याने या पदावर नेमणूकीकरीता निवड करणेत आली नाही.

अ.नं.२ डॉ योगेश बाळकृष्ण गेठे हे सध्या संस्थानचे रूग्णालयात ई.एन.टी सर्जन या पदावर स्थायी पध्दतीने कार्यरत असुन त्यांनी वैद्यकीय संचालक या पदावर स्थायी स्वरूपात नेमणूक देणेत येत असल्यास काम करणेची ईच्छा दर्शविली असुन ११ महिने कालावधीकरीता काम करणेस तयार नसलेचे मुलाखतीमध्ये सांगितले. त्यामुळे त्यांचा या पदावर नेमणूकीकरीता निवड करणेत आली नाही.

अ.नं. ३ श्री चेतन बापुराव नागपुरे हे मुलाखतीकरीता गैरहजर होते. तसेच त्यांची शैक्षणिक पात्रता बी.ई. एम.बी.ए. असल्याने या पदाकरीता आवश्यक असलेली मुळ शैक्षणिक पात्रता नसल्याने पदावर नेमणूकीकरीता निवड करणेत आली नाही.

अ.नं. ४ डॉ संध्या सतिष खडसे यांचेकडे आवश्यक पात्रता आहे. परंतु त्यांचे वय ६२ वर्ष आहे. परंतु त्यांचे अनुभव व पात्रता विचारात घेता त्यांची या पदाकरीता मा तदर्थ समितीच्या मंजुरीस अधीन राहुन निवड करणेत आली.

अ.नं. ५ डॉ संभाजी डांगे यांचेकडे आवश्यक पात्रता आहे. परंतु त्यांचे वय ६१ वर्ष आहे. त्यांची या पदावर नेमणूकीकरीता विचार करणेत आला नाही.

अ.नं. ६ डॉ दिपक नाईकवाडे यांचेकडे आवश्यक पात्रता आहे. परंतु त्यांचे वय ६२ वर्ष आहे. त्यांची या पदावर नेमणूकीकरीता निवड करणेत आली नाही.

उपरोक्त अ.नं. ४ डॉ संध्या सतिष खडसे यांची निवड समितीने मा तदर्थ (Ad-hoc) समितीचे मान्यतेस अधिन राहुन वैद्यकीय संचालक या पदावर नेमणूकीसाठी शिफारस केलेली आहे. त्यांची जन्मतारीख दि.०४/०१/१९५९ असुन वय ६२ वर्षे आहे.

डॉ संध्या सतिष खडसे यांची पात्रता व अनुभव खालीलप्रमाणे आहे.

पात्रता - एम बी बी एस, एम डी (बालरोग), एफ आय ए पी (फेलोशिप)

अनुभव –

| अ नं | पदाचे नाव | संस्थेचे नाव | कालावधी |
|---|---|---|---|
| १ | असिस्टंट प्रोफेसर (बालरोग) | श्री व्हीएनजीसी यवतमाळ | दि.०३/०६/१९९३ ते १८/०२/१९९९ (५ वर्ष ८ महिने) |
| २ | असोसिएट प्रोफेसर (बालरोग) | श्री व्हीएनजीसी यवतमाळ | दि.१९/०२/१९९९ ते २९/१०/२००३ (४ वर्ष २ महिने) |
| ३ | प्रोफेसर पेडीयाट्रीक्स व बालरोग विभाग प्रमुख | ग्रॅन्ड मेडीकल कॉलेज मुंबई | दि.३०/१०/२००३ ते १२/०५/२०१७ (१३ वर्ष ६ महिने) |
| ४ | अधिष्ठाता | आरजीएमसी,ठाणे महानगरपालीका | दि.३०/०५/२०१७ ते ०८/०१/२०२० (२ वर्ष ७ महिने) |
| ५ | प्रो व्हाईस चान्सलर | निम्स युनिर्व्हर्सिटी जयपुर | दि.१५/०१/२०२० ते ११/११/२०२० (९ महिने) |

रिक्त पदे भरणेकामी प्रसिध्द केलेल्या जाहीरातीमध्ये वैद्यकीय संचालक या पदासाठी वयोमर्यादा ४५ वर्षे बी.जे. मेडीकल डीन यांनी तयार करून दिलेप्रमाणे जाहीरातीत नमुद केले आहे. तसेच कोणत्याही पदासाठी उमेदवार कमी असतील व अनुभव जाहिरातीत नमुद केलेप्रमाणे नसल्यास सदर पदासाठी उपस्थित उमेदवारांकरीता निकष व अनुभव शिथील करण्यात येवुन त्याखालील वेतनश्रेणी / ग्रेड पे (एकत्रित वेतन) देणेत येईल बी.जे. मेडीकल डीन यांनी तयार करून दिलेप्रमाणे जाहीरातीत नमुद केले आहे. तसेच

मा व्यवस्थापन समितीचे दि. ०४ मे १९९१ रोजीचे सभेतील निर्णय क्र ०३ नुसार मंजूर करणेत आलेले संस्थान नोकरांचे सेवानियम जा.नं.एसएसएस/वशी१/९४१९/ १९९१ दि. ०६/०९/१९९१ चे आदेशान्वये अंमलात आणणेत आलेले आहेत. या इंग्रजी भाषेतील सेवानियमात कर्मचा-यांच्या सेवानिवृत्तीविषयी खालीलप्रमाणे तरतुद आहे.

"Clause No.07:

AGE OF RETIRMENT : The Age of retirement at superannuation of the employee shall be 60 years".

वरील सेवानियमानुसार, कर्मचा-यांचे सेवानिवृत्तीचे वय ६० वर्षे निश्चिती केलेले आहे.

महाराष्ट्र शासन, सार्वजनिक आरोग्य विभागाने दि.३१ मे २०२१ रोजी शासननिर्णय पारीत केला असुन त्यामध्ये खालीलप्रमाणे नमुद आहे.

*प्रस्तावना -*

*राज्याच्या सार्वजनिक आरोग्य विभागाकडून सामान्य रूग्णालये, उपजिल्हा रूग्णालये, ग्रामीण रूग्णालये राज्य कामगार विमा रूग्णालये यामधून रूग्णांना आरोग्य सुविधा पुरविण्यात येतात. तथापि, सदर रूग्णालयातील वैद्यकीय अधिकारी व वरिष्ठ अधिका-यांच्या कमतरतेमुळे रूग्णांना वेळेत योग्य आरोग्य सुविधा पुरविण्यात अडचणी निर्माण होत आहेत. वैद्यकीय अधिकारी तसेच विशेषज्ञ पदासाठी प्रयत्न करून देखील पुरेशा प्रमाणात वैद्यकीय अधिकारी उपलब्ध होत नाहीत वा उपलब्ध झाल्यासही पसंतीच्या ठिकाणी पदस्थापना न मिळाल्यास सेवेत रूजू न होण्याचे प्रमाण मोठ्या प्रमाणात आहे. परिणामी आरोग्य सेवेतील पदे मोठ्या प्रमाणात रिक्त राहत असून त्याचा राज्यातील रूग्णसेवेवर विपरित परिणाम होत आहे. त्याअनुषंगाने शासन निर्णय दि. २९.०८.२०१८ अन्वये महाराष्ट्र वैद्यकीय व आरोग्य सेवा, गट-अ मधील वैद्यकीय अधिकारी व राज्य कामगार विमा योजनेंतर्गत महाराष्ट्र वैद्यकीय विमा सेवा, गट अ मधील वैद्यकीय अधिकारी व वरिष्ठ पदावरील अधिका-यांचे सेवानिवृत्तीचे वय ५८ वर्षावरून ६० वर्षापर्यंत वाढविण्याचा शासनाने निर्णय घेतला आहे. सदर निर्णय दि.३१/०५/२०१८ पासून पूर्वलक्षी प्रभावाने पाच वर्षासाठी (दि.३१/०५/२०२३ पर्यंत) लागू करण्यात आला आहे.*

*२. तसेच, महाराष्ट्र वैद्यकीय व आरोग्य सेवा, गट-अ व राज्य कामगार विमा योजनेतील महाराष्ट्र वैद्यकीय विमा सेवा, गट-अ मधील वैद्यकीय अधिकारी तसेच जिल्हा शल्यचिकित्सक, विशेषज्ञ संवर्गातील जे थेट रूग्णसेवा देतात अशा अधिका-यांचे सेवानिवृत्तीचे वय दि.३१/०५/२०१९ पासून पूर्वलक्षी प्रभावाने दोन वर्षासाठी (दि.३१/०५/२०२१ पर्यंत) ६० वरून ६२ वर्षापर्यंत वाढविण्याबाबतचा निर्णय दि.०१/०७/२०१९ च्या शासन निर्णयान्वये व दि.२६/११/२०१९ च्या शुध्दीपत्रकान्वये मा मंत्रीमंडळाच्या मान्यतेच्या अधीन राहून घेण्यात आला आहे. सदर शासन निर्णयाची मुदत दि.३१/०५/२०२१ रोजी संपुष्टात येत आहे.*

*३. सध्या राज्यात कोरोना साथरोग संसर्गाचा प्रादुर्भाव वेगाने वाढत असून, त्याच बरोबर नजीकच्या कालावधीत तिसरी लाट येणार असण्याची शक्यता आहे. यास्तव त्यावर नियंत्रण मिळविण्याच्या दृष्टीने उपाययोजना करणे व त्याची अंमलबजावणी करण्यासाठी वैद्यकीय अधिकारी तसेच वरिष्ठ अधिका-यांची विभागास नितांत आवश्यकता आहे. तसेच महाराष्ट्र वैद्यकीय व आरोग्य सेवा, गट-अ मधील विविध संवर्गातील ११३ अधिकारी दि.३१/०५/२०२१ अखेर सेवानिवृत्त होत आहेत. इतक्या मोठ्या प्रमाणात एकाच वेळी अधिकारी सेवानिवृत्त होत असल्याने, आरोग्य सेवेवर होणारा परिणाम व कोव्हिड – १९ चा वाढता प्रदुर्भाव विचारात घेता, आरोग्य सेवा आयुक्तालयातंर्गत महाराष्ट्र वैद्यकीय व आरोग्य सेवा, गट-अ मधील वैद्यकीय अधिकारी (वेतन मॅट्रीक्स मधील वेतन स्तर एस-२०: ५६१००-१७७५००) व वरीष्ठ पदावरील (वेतन मॅट्रीक्स मधील वेतनस्तर एस-२३: ६७७००-२०८७०० व त्यावरील) अधिकारी तसेच राज्य कामगार विमा योजनेतील महाराष्ट्र वैद्यकीय विमा सेवा, गट-अ (वेतन मॅट्रीक्स मधील वेतन स्तर एस-२०: ५६१००-१७७५००) व वरिष्ठ पदावरील अधिका-यांचे सेवानिवृत्तीचे वय कोव्हिड - १९ च्या पार्श्वभूमीवर वाढविण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.*

*शासन निर्णय :-*

*सार्वजनिक आरोग्य विभागाच्या अधिपत्याखालील आरोग्य सेवा आयुक्तालयातंर्गत महाराष्ट्र वैद्यकीय व आरोग्य सेवा, गट-अ मधील वैद्यकीय अधिकारी (वेतन मॅट्रीक्स मधील वेतन स्तर एस - २०: ५६१००-१७७५००) व वरिष्ठ पदावरील (वेतन मॅट्रीक्स मधील वेतनस्तर एस - २३: ६७७००-२०८७०० व त्यावरील) सर्व अधिकारी तसेच राज्य कामगार विमा योजनेतर्गत महाराष्ट्र वैद्यकीय विमा सेवा, गट - अ (वेतन मॅट्रीक्स मधील वेतन स्तर एस - २०: ५६१००-१७७५००) व वरिष्ठ पदावरील सर्व कार्यरत अधिकारी यांचे सेवानिवृत्तीचे वय एक वर्षासाठी ६२ वर्षापर्यंत वाढविण्यात येत आहे. सदर शासन निर्णय हा दि.३१/०५/२०२१ पासून दि.३१/०५/२०२२ पर्यंत अंमलात राहील.*

*२. सदर शासन निर्णय मा. मंत्रिमंडळाची कार्योत्तर मान्यता मिळण्याच्या अधीन राहून निर्गमित करण्यात येत आहे.*

विभागाचा स्पष्ट अभिप्राय-

कोव्हीड १९ चे पार्श्वभुमीवर डॉक्टरांची संख्याच कमी असल्याने वैद्यकीय संचालक या पदावर उमेदवार उपलब्ध होत नाहीत म्हणून शासनाने दि.३१/०५/२०२१ रोजीचे शासननिर्णयाद्वारे सेवानिवृत्तीचे वय वाढविण्याचा निर्णय घेतलेला आहे. म्हणजे ६२ वर्षापर्यंत सेवानिवृत्तीचे वय वाढविणेचे धर्तीवर एक वर्षाकरीता अनुभवी व्यक्तीस संधी देण्याचा विचार करता येईल असे मत आहे.

डॉ संध्या सतिष खडसे यांची निवड समितीने वैद्यकीय संचालक या पदावर नेमणूकीसाठी शिफारस केली असल्याने डॉ खडसे यांची वैद्यकीय संचालक या पदावर दि.३१/०५/२०२१ रोजीचे शासननिर्णयाचे धर्तीवर एक वर्ष कालावधीकरीता नेमणूक करणेबाबत निर्णय होणेस विनंती.

निर्णयास्तव सादर.

19/7/21

(कान्हूराज बगाटे, भा.प्र.से.)
मुख्य कार्यकारी अधिकारी
श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी.

12/6/21

विषय क्र.- ९४



**मा. तदर्थ (Ad.Hoc) समितीचे सभेपुढील विषय,**

विभागः- श्री साईनाथ (धर्मादाय) रुग्णालय, शिर्डी (वैद्यकिय आर्थिक अनुदान विभाग)

**टिपणी-**

**विषयः** – दि. ०१ एप्रिल २०२० ते दि.३१ मार्च २०२१ अखेर / कालावधीत वाटप करणेत आलेली अनुदान रक्कम व रुग्ण संख्या यांची नोंद घेणेबाबत...

मान्यतेस्तव सविनय सादर,

**अधिनिय २००४ मधील तरतुद :-** कलम १७ (१) व १७ (२) (ण ) मानवजातीचे कल्याण करणा-या किंवा मानवाला आपत्तीमध्ये सहाय्य करणा-या अन्य कोणत्याही उदातत कार्यास चालना देईल.

**व्यवस्थापन समितीचा ठराव क्र:-** १) मा.व्यवस्थापन समिति सभा दि.२४/०७/२०११ विषय नं.१४, निर्णय क्र.५८१.
२) मा.व्यवस्थापन समिती सभा दि.१९/१२/२०२०विषयनं.१२, निर्णय क्र.५४७.

**प्रास्तविक :-**

उपरोक्त विषयाकिंत संदर्भान्वये, श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था शिर्डी. यांचे मार्फत गरीब व गरजु रुग्णांना त्यांचे वैद्यकिय,उपचाराकरीता रुग्ण उपचार घेत असलेल्या रुग्णालयाचे नावे वैद्यकीय आर्थिक अनुदान देण्यात येते. त्यासाठी संस्थानने मा.व्यवस्थापन समितीचे सभा दि.२४/०७/२०११ विषय नं.१४, निर्णय क्र.५८१.अन्वये, स्वतंत्र नियमावली तयार केलेली होती. यास शासन निर्णय क्र.सासंवि-२००५/३७६/(७६)-का सोळा,विधी व न्याय विभाग,मंत्रालय,मुंबई. दि.५ मे २००६.अन्वये शासन मान्यता होती.

आता शासन निर्णय क्र.सासंवि-१०१८/१६१४/प्र.क्र.२०९/का.१६ मंत्रालय,मुंबई - ४०० ०३२, दि.२२ ऑगस्ट, २०१९ व शासन शुध्दिपत्रक क्र.सासंवि-१०१८/१६१४/प्र.क्र.२०९/का.१६ मंत्रालय,मुंबई - ४०० ०३२, दि.०१ फेब्रुवारी, २०२०. अन्वये सुधारीत नियमावलीस मान्यता मिळालेली असुन मा.व्यवस्थापन समिती सभा दि.१९/१२/२०२० विषय नं.१२, निर्णय क्र.५४७.अन्वये, दि.२९/०१/२०२१ पासुन सुधारीत नियमावली लागु करणेत आलेली आहे.

**नियमावली :-**

श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी यांचेमार्फत वैद्यकीय आर्थिक अनुदान हे केवळ, भारतातील सरकारी जिल्हा परिषद वा म्युनिसिपल रुग्णालय, सार्वजनिक धर्मदाय न्यासाने चालविलेले रुग्णालय, सार्वजनिक लिमिटेड कंपनी (Public Limited Company) यांनी चालविलेले अगर सहकारी संस्था (Co Operative Society) यांनी चालविलेले रुग्णालय यातील उपचार / शस्त्रक्रियेवरील खर्चा पोटी खर्चाच्या १५% अगर रुपये २५,०००/- पैकी जी कमी पुर्णाकिंत रक्कम असेल तेवढी रक्कम, पॅनलवरील ८१ रुग्णालयांना रुग्णाचे नावे प्रचलित नियमावलीतील खालील आठ आजारांकरीता देण्यात येत होते.

१) ह्दयशस्त्रक्रिया व नंतरचे उपचार
२) किडनी डायलेसिस, प्रत्यारोपन व नंतरचे उपचार
३) मेंदुची शस्त्रक्रिया व नंतरचे उपचार
४) कर्करोगासंबधी उपचार, शस्त्रक्रिया व नंतरचे उपचार
५) रक्तासंबधीचे आजार (उदा.हिमोफेलिया)
६) जी.बी.एस.(Guillain Barre Syndrome)
७) मणका शस्त्रक्रिया व नंतरचे उपचार
८) कॉक्लीअर इंम्प्लांट

आता दि.२९/०१/२०२१ पासुन सुधारीत नियमावली लागु करणेत आलेली असुन, वैद्यकीय आर्थिक अनुदान हे केवळ, भारतातील सरकारी जिल्हा परिषद वा म्युनिसिपल रुग्णालय, सार्वजनिक धर्मदाय न्यासाने चालविलेले रुग्णालय, सार्वजनिक लिमिटेड कंपनी (Public Limited Company) यांनी चालविलेले अगर सहकारी संस्था (Co Operative Society) यांनी चालविलेले रुग्णालय यातील उपचार / शस्त्रक्रियेवरील खर्चा पोटी खर्चाच्या २५% अगर रुपये ५०,०००/- पैकी जी कमी पुर्णाकिंत रक्कम असेल तेवढी रक्कम, पॅनलवरील ८१ रुग्णालयांना रुग्णाचे नावे सुधारीत नियमावलीतील पुढिल पाच आजारांकरीता देण्यात येते.

१) कर्करोगासंबधी उपचार, शस्त्रक्रिया व नंतरचे उपचार
२) रक्तासंबंधी आजार
३) जी.बी.एस (Gullian Barre Sundrome)
४) कॉक्लीअर इंम्प्लांट
५) सर्व प्रकारच्या ट्रान्सप्लॅन्ट (Transplant), शस्त्रक्रिया व नंतरचे उपचार

पान.क्र.२ वर

(पान.क्र.२...)

त्यास अनुसरुन दि.१ एप्रिल-२०२० ते दि.३१ मार्च २०२१ अखेर/कालावधीत मासिक दिलेले वैद्यकिय आर्थिक अनुदान लाभार्थी रुग्ण संख्या व रक्कम खालील प्रमाणे आहे.

| अ.नं. | महिना | लाभार्थी रुग्ण संख्या | अनुदान वाटप रक्कम | मंजुर बजेट |
|---|---|---|---|---|
| १ | ०१ एप्रिल -२०२० | ०१ | २५,०००/- | ७,००,००,०००/- |
| २ | मे -२०२० | ०३ | ७५,०००/- | |
| ३ | जुन – २०२० | ०५ | १,२५,०००/- | |
| ४ | जुलै -२०२० | १० | २,३०,०००/- | |
| ५ | ऑगस्ट -२०२० | १३ | ३,०७,५००/- | |
| ६ | सप्टेंबर -२०२० | १२ | २,८२,५००/- | |
| ७ | ऑक्टोंबर -२०२० | २१ | ५,०७,१६८/- | |
| ८ | नोव्हेंबर -२०२० | १७ | ४,०६,५००/- | |
| ९ | डिसेंबर -२०२० | २९ | ७,०२,५००/- | |
| १० | जानेवारी -२०२१ | ३६ | ८,९०,७५०/- | |
| ११ | फेब्रुवारी -२०२१ | ०१ (विशेष बाब) | २५,०००/- | |
| १२ | ३१ मार्च -२०२१ | ११ | ५,५०,०००/- | |
| | एकुण | १५९ | ४१,२६,९१८/- | |

दि.१ एप्रिल२०२० ते दि.३१ मार्च २०२१ अखेर १५९ रुग्णांना रक्कम रु.४१,२६,९१८/- वैद्यकिय आर्थिक अनुदान देणेत आलेले आहे.त्याबाबतचा रुग्णालयनिहाय तपशिल खालीलप्रमाणे.

| अ.क्र. | रुग्णालयाचे नाव | रुग्ण संख्या | अनुदान रक्कम (रुपये) |
|---|---|---|---|
| ०१) | आनंदऋषीजी हॉस्पिटल अॅन्ड हार्टकेअर सेंटर,अहमदनगर. | ०१ | २५,०००/- |
| ०२) | अश्विनी सहकारी रुग्णालय आणि संशोधन केंद्र नियमित, सोलापूर. | ०२ | ३४,०००/- |
| ०३) | बालाजी हॉस्पीटल अॅण्ड डायग्नोस्टिक सेंटर, मुंबई. | ०५ | १,२५,०००/- |
| ०४) | बॉम्बे हॉस्पीटल अॅण्ड मेडिकल रिसर्च सेंटर, मुंबई. | ०२ | ५०,०००/- |
| ०५) | कार्डिनल ग्रेसिएस मेमोरिअल ट्रस्ट , वसई. | ०१ | २५,०००/- |
| ०६) | डिन बी वाय एल नायर चॅरिटेबल हॉस्पिटल, मुंबई. | ०१ | २५,०००/- |
| ०७) | डॉ.हेडगेवार रुग्णालय, औरंगाबाद. | ०३ | ७५,०००/- |
| ०८) | हॉली स्पिरीट हॉस्पिटल, मुंबई. | ०२ | ५०,०००/- |
| ०९) | जसलोक हॉस्पिटल अॅन्ड रिसर्च सेंटर, मुंबई . | ०२ | ७५,०००/- |
| १०) | जहॉगीर हॉस्पिटल , पुणे. | १३ | ३,२२,५००/- |
| ११) | के एल ई एस हॉस्पिटल अॅन्ड मेडिकल रिसर्च सेंटर, बेळगांव, कर्नाटक. | ०१ | २५,०००/- |
| १२) | कमलनयन बजाज हॉस्पिटल, औरंगाबाद. | ०१ | २५,०००/- |
| १३) | किंग एडवर्ड मेमोरिअल हॉस्पिटल ( के ई एम ), पुणे. | २३ | ६,२५,०००/- |
| १४) | कोंकण मित्र मंडळ मेडिकल ट्रस्ट, सह्याद्री स्पेशालीटी हॉस्पिटल, पुणे. | १५ | ४,४९,६६८/- |
| १५) | कृष्णा हॉस्पिटल अॅन्ड मेडिकल रिसर्च सेंटर, कराड. | ०२ | ४७,५००/- |
| १६) | महात्मा गांधी मिशन मेडिकल सेंटर अॅन्ड रिसर्च इन्स्टिट्युट, औरंगाबाद. | २३ | ६,७५,०००/- |
| १७) | मुलजीभाई पटेल युरोलॉजिकल हॉस्पिटल, नदियाड, गुजरात. | २१ | ५,१५,०००/- |
| १८) | नामको चॅरिटेबल ट्रस्ट कॅन्सर हॉस्पिटल, नाशिक. | ०१ | २५,०००/- |
| १९) | नर्गिस दत्त मेमोरिअल कॅन्सर हॉस्पिटल, बार्शी. | ०४ | १,५०,०००/- |
| २०) | पी डी हिंदुजा नॅशनल हॉस्पिटल अॅन्ड मेडिकल रिसर्च सेंटर, मुंबई. | ०२ | ५०,०००/- |
| २१) | पुणा हॉस्पिटल अॅन्ड रिसर्च सेंटर पुणे. | ०२ | ५०,०००/- |
| २२) | आर टी भोईटे स्मृती आरोग्य प्रतिष्ठाण गिरीराज हॉस्पिटल, पुणे . | ०२ | ५०,०००/- |
| २३) | शेठ नंदलाल धुत हॉस्पिटल, औरंगाबाद. | ०१ | २५,०००/- |
| २४) | श्री सिध्देश्वर कॅन्सर हॉस्पिटल अॅन्ड रिसर्च सेंटर, सोलापूर. | ०८ | १,८०,०००/- |
| २५) | श्री मार्कण्डेय सोलापूर सहकारी रुग्णालय, सोलापूर. | १६ | ३,१३,२५०/- |
| २६) | श्री सिध्दीविनायक गणपती कॅन्सर हॉस्पिटल, मिरज. | ०३ | ६५,०००/- |
| २७) | टाटा मेमोरिअल हॉस्पिटल, मुंबई. | ०१ | २५,०००/- |
| २८) | मिडे पॉईंट हॉस्पिटल प्रा.लि. पुणे. ( विशेष बाब ) | ०१ | २५,०००/- |
| | एकुण | १५९ | ४१,२६,९१८/- |

पान.क्र.३ वर

मा.व्यवस्थापन समिती सभा दि.१९/१२/२०२० विषय नं.१३, निर्णय क्र.५४८. यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री प्रकाश आनंदराव गायकवाड यांना कॅन्सर आजार असुन तो संस्थान नियमावलीत मान्यता प्राप्त आजार आहे.मात्र उपचार घेत असलेले रुग्णालय मान्यताप्राप्त यादीतील नाही.मात्र आजार मान्यताप्राप्त यादीत असल्याने एक विशेष बाब म्हणुन संस्थानमार्फत आर्थिक अनुदान रक्कम रु.२५,०००/- मात्र उपलब्ध करुन देण्यास मान्यता देण्यात आली.तसेच या निर्णयाचा संदर्भ इतर अशा प्रकारच्या प्रकरणांना लागु करण्यात येऊ नये, असे ठरले. या निर्णयान्वये प्रकाश आनंदराव गायकवाड उपचार घेत असलेल्या रुग्णालयाचे नावे प्रशासकीय मान्येतेने वित्त विभागामार्फत रक्कम रु.२५,०००/- मात्र आरटीजीएस द्वारे उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे.

तसेच **आर्थिक वर्ष दि.०१ एप्रिल २०२० ते ३१ मार्च २०२१ अखेर** रुग्णाने रुग्णालय बदलल्याने / रुग्ण उपचारासाठी दाखल न झाल्याने / शस्त्रक्रिया रद्द झाल्याने / रुग्ण मयत झाल्याने / जीवनदायी अंतर्गत उपचार पुर्ण झाल्याने / काही रक्कम उपचारासाठी वापरुन **उर्वरीत ९० रुग्णांची रक्कम रु.१५,०१,३७०/- मात्र संस्थानखाती जमा झालेली आहे.**

उपरोक्त तक्त्यात नमुद रुग्णालयाचे नावे आर्थिक वर्ष दि.०१ एप्रिल २०२० ते ३१ मार्च २०२१ अखेर १५८ रुग्णांसाठी रक्कम रु.४१,०१,९१८/- व विशेष बाब म्हणुन ०१ रुग्णास रक्कम रु.२५,०००/- असे एकुण **१५९ रुग्णांना रुक्कम रु.४१,२६,९१८/-मात्र** वैद्यकीय आर्थिक अनुदान देण्यात आलेले आहे.

**प्रस्ताव:-**

श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था शिर्डी यांचे मार्फत दि.०१ एप्रिल २०२० ते ३१ मार्च २०२१ अखेर गरीब व गरजु रुग्णांना त्यांचे वैद्यकिय, उपचाराकरीता रुग्ण उपचार घेत असलेल्या रुग्णालयाचे नावे, देण्यात आलेल्या,वैद्यकीय आर्थिक अनुदानाच्या रक्कमेची, रुग्णांची परत आलेल्या रक्कमेची व विशेष बाब म्हणुन उपलब्ध करुन देण्यात आलेल्या रक्कमेची नोंद घेणेचा प्रस्ताव, **मा. तदर्थ (Ad Hoc) समितीचे** सभेसमोर निर्णयार्थ सादर .

22/06/21

कान्हुराज बगाटे (भा.प्र.से.)
**मुख्य कार्यकारी अधिकारी**
**श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी.**

मिटिंग विषय फाईल -१६७-१६९

SSH MEETING - 221 - 2021

## मा. तदर्थ (Ad.Hoc) समितीचे सभेपुढील विषय,

विभाग:- श्री साईनाथ रुग्णालय, शिर्डी (वैद्यकिय आर्थिक अनुदान विभाग)

**टिपणी-**

**विषय:-** एम.आय.टी.हॉस्पिटल (धर्मादाय) ॲण्ड रिसर्च इन्स्टीटयुट, औरंगाबाद या रुग्णालयाचा संस्थानचे वैद्यकीय आर्थिक अनुदान देणेचे यादीत समावेश करणेबाबत...

मान्यतेस्तव सविनय सादर,

**अधिनियम २००४ मधील तरतुद :-** कलम १७ (१) व १७ (२) (ण ) मानवजातीचे कल्याण करणा-या किंवा मानवाला आपत्तीमध्ये सहाय्य करणा-या अन्य कोणत्याही उदात्त कार्यास चालना देईल.

**व्यवस्थापन समितीचा ठराव क्र:-** दि.१९/१२/२०२० रोजीचे मा.तदर्थ (Ad-hoc) समितीचे सभेतील विषय नं.१२ निर्णय क्र.५४७.

**प्रास्तविक :-**

उपरोक्त विषयी, श्री साईबाबा संस्थानने वैद्यकीय आर्थिक अनुदान देणेकामी स्वतंत्र नियमावली तयार केलेली असुन, यास महाराष्ट्र शासनाची मान्यता आहे. श्री साईबाबा संस्थान यांचेमार्फत नियम क्र.३ अनुदान हे केवळ भारतातील सरकारी जिल्हा परिषद वा महानगरपालिका रुग्णालय, सार्वजनिक धर्मदाय न्यासाने चालविलेले रुग्णालय, सार्वजनिक लिमिटेड कंपनी (Public Limited Company) यांनी चालविलेले अगर सहकारी संस्था (Co Operative Society) अथवा शासकीय वैद्यकीय महाविद्यालय यांनी चालविलेले रुग्णालय यातील उपचार / शस्त्रक्रियेवरील खर्चा पोटी देण्यात येईल. परंतु अशा रुग्णालयाची नोंद संस्थानच्या अनुदान यादीत असणे आवश्यक असते.

उपरोक्त विषयी ग्रामौद्योगीक शिक्षण मंडळ (जी.एस.मंडळ) यांचे एम.आय.टी.हॉस्पिटल (धर्मादाय) ॲण्ड रिसर्च इन्स्टीटयुट, औरंगाबाद यांनी संदर्भ क्र.१ चे अर्जान्वये, एम.आय.टी.हॉस्पिटल (धर्मादाय) ॲण्ड रिसर्च इन्स्टीटयुट, औरंगाबाद या रुग्णालयाचा समावेश श्री साईबाबा संस्थानच्या वैद्यकीय आर्थिक अनुदान देणेचे रुग्णालयाच्या यादीत करणेस विनंती केलेली होती. याबाबत सदर रुग्णालयास जा.नं.एसएसएस/एसएसएच/अनुदान/२४०७/२०२०, दि.०७/०३/२०२० चे पत्रान्वये, रुग्णालयाचा समावेश श्री साईबाबा संस्थानच्या वैद्यकीय आर्थिक अनुदान देण्याचे यादीत करावयाचा झाल्यास संस्थान नियमावलीप्रमाणे, खालील कागदपत्रे सादर करणेस कळविण्यात आले होते.

१) मा.धर्मदाय आयुक्त यांचे कार्यालयात रजिस्टर ट्रस्ट असल्याबाबत नोंदणी प्रमाणपत्रची झेरॉक्स प्रत.
२) ट्रस्ट नियमावली. (Trust Byelaws)
३) आयकर ८० जी, १२ ए प्रमाणपत्राची झेरॉक्स प्रत.
४) मागील तीन वर्षाचे ऑडीट रिपोर्ट.
५) रुग्णालयात कोणकोणत्या आजारावरील शस्त्रक्रिया / उपचार केले जातात याबाबतची माहिती. (दरपत्रकासह) .
६) रुग्णालय हे धर्मदाय असलेबाबतचे हमी पत्र. (रुग्णालयाचे लेटरहेडवर नोंदणी क्रमांकासह.)
७) रुग्णालयास शासनाचे महात्मा ज्योतिबा फुले जन आरोग्य योजनेची मान्यता आहे किंवा कसे ? याबाबत रुग्णालय प्रमुखाचे प्रमाणपत्र.
८) रुग्णालय हे धर्मदाय संस्थेच्या स्वमालकीचे आहे किंवा करारावर अथवा भाडेतत्वावर चालविणेस घेतलेले आहे.

**विभागाचा अभिप्राय-**

प्रास्तविकात नमुद केलेप्रमाणे कागदपत्रांची मागणी इकडील कार्यालयाकडुन करणेत आली होती त्यास अनुसरुन एम.आय.टी.हॉस्पिटल (धर्मादाय) ॲण्ड रिसर्च इन्स्टीटयुट, औरंगाबाद यांनी दि.१५/०७/२०२० रोजीचे पत्रान्वये, खालील कागदपत्रे सादर केलेली आहे.

| अ.क्र | सुधारीत नियमावलीप्रमाणे रुग्णालयाने सादर करावयाची कागदपत्रे | नियमावलीप्रमाणे सादर केलेली आहे किंवा नाही. |
|---|---|---|
| १) | मा. धर्मदाय आयुक्त यांचे कार्यालयात रजिस्टर ट्रस्ट असल्याबाबत नोंदणी प्रमाणपत्रची झेरॉक्स प्रत. | मुंबई सार्वजनिक विश्वस्तव्यवस्था अधिनियम -१९५० या अन्वये औरंगाबाद प्रदेश औरंगाबाद येथील सार्वजनिक विश्वस्तव्यवस्था नोंदणी कार्यालयात नोंद केलेली आहे.<br>१) विश्वस्त व्यवस्थेचे नाव – ग्रामौद्योगिक शिक्षण मंडळ, वैजापुर, ता.वैजापुर, जि.औरंगाबाद.<br>२) सार्वजनिक विश्वस्त व्यवस्थांच्या नोंदणी पुस्तकातील क्र. एफ- ४२९, ( औरंगाबाद ) श्री आनंदराव भगवंतराव देशमुख यांचे नावे दि.१३/०३/ १९७६ रोजी दिले. |

(पान क्र.२ वर)

| अ.क्र. | सुधारीत नियमावलीप्रमाणे रुग्णालयाने सादर करावयाची कागदपत्रे | नियमावलीप्रमाणे सादर केलेली आहे किंवा नाही. |
|---|---|---|
| २) | ट्रस्ट नियमावली. (Trust Byelaws) | ट्रस्ट नियमावलीमध्ये संस्थेचे नाव, संस्थेचे नोंदणी कार्यालय, संस्थेची उद्दिष्टे कार्यक्षेत्र, ट्रस्ट नियम व अटी, कार्यकारी मंडळ, संस्थेचे हिशेबी वर्ष, सभासद व त्यांची वर्गणी ,सभासद नोंदणी रजिस्टर व त्यांची पात्रता, त्यांची निवडणुक, त्यांचे पदाधिकारी, बॅंकेचे खाते, मालमत्तेची मालकी, विश्वस्त निधी, संस्थेची सर्वसाधारण सभा, संस्थेची नियमावली, उद्दिष्टे यांत करावयाचे बदल, सोसा.प्रमुखाचे अधिकार, संस्थेचे वर्गीकरण व इतर अनुशांगीक माहीती या सर्वाचा उल्लेख केलेला आहे. |
| ३) | आयकर ८० जी, १२ ए प्रमाणपत्राची झेरॉक्स प्रत. | ABD/CIT/TECH/80G/GSM/98/12/2010-11<br>NAME AND ADDRESS – GRAMAUDYOGIK SHIKSHAN MANDAL, MIT, COMPLEX, BEED BYPASS ROAD, SATARA ROAD, AURANGABAD,<br>PAN NO.- AAATG 2943 C<br>CERTIFICATE SECTION 80 G OF THE I.T.ACT 1961.<br>REGISTRATION U/S 12A OF THE INCOME TAX ACT - 1961 Date – 01/04/2001. |
| ४) | मागील तीन वर्षाचे ऑडीट रिपोर्ट. | सन २०१६-२०१७, २०१७-२०१८, २०१८-२०१९ या तीन वर्षाचे ऑडीट रिपोर्ट सादर केलेले आहेत. |
| ५) | रुग्णालयात कोणकोणत्या आजारावरील शस्त्रक्रिया / उपचार केले जातात याबाबतची माहिती. (दरपत्रकासह). | एम आय टी रुग्णालयामध्ये ई एन टी , सर्जिकल गॅस्ट्रोएन्ट्रोलॉजी, गायनीक, ओगी, आर्थोपेडीक, जॉईन्ट रिप्लेसमेंट, न्युरोलॉजी, ऑप्थलमोलॉजी, कार्डीओलॉजी ॲन्ड कार्डीयाक सर्जरी, नॉन सर्जिकल प्रोसेजर, कॅन्सर प्रोसेजेस, तसेच इतर डे केअर, मायनर इंटर्मिडेट, मेजर-सुप्रा मेजर, हाय एन्ड सर्जरी, यावर शस्त्रक्रिया / उपचार केले जातात तसेच असिस्टंट सर्जन, ॲनस्थेटिस्ट चार्जस, शस्त्रक्रिया खर्च असे कागदपत्रावरुन दिसुन येते. |
| ६) | रुग्णालय हे धर्मदाय असलेबाबतचे हमी पत्र. (रुग्णालयाचे लेटरहेडवर नोंदणी क्रमांकासह.) | एम आय टी रुग्णालय हे ग्रामौद्योगीक शिक्षण मंडळ (जी.एस.मंडळ) यांचे असुन, मुंबई सार्वजनिक विश्वस्तव्यवस्था अधिनियम -१९५० या अन्वये औरंगाबाद प्रदेश औरंगाबाद येथील सार्वजनिक विश्वस्तव्यवस्था नोंदणी कार्यालयात नोंद केलेली आहे. नोंदणी क्रमांक . अेजीडी- २/७६ आहे. सार्वजनिक विश्वस्त व्यवस्थांच्या नोंदणी पुस्तकातील क्र. एफ- ४२९, ( औरंगाबाद ) श्री आनंदराव भगवंतराव देशमुख यांचे नावे दि.१३/०३/ १९७६ रोजी दिले असे दिसुन येते. सोबत विश्वस्त यादी दिलेली नसुन, फक्त प्रेसिडेंट, व्हाईस प्रेसिडेंट, जनरल सेक्रेटरी, जॉईन्ट सेक्रेटरी, ट्रेसुरर, चिफ एक्झेक्युटीव्ह असा उल्लेख केलेला आहे. |
| ७) | रुग्णालयास शासनाचे महात्मा ज्योतिबा फुल जन आरोग्य योजनेची मान्यता आहे किंवा कसे ? याबाबत रुग्णालय प्रमुखाचे प्रमाणपत्र. | रुग्णालयाने शासनाचे महात्मा ज्योतिबा फुले जन आरोग्य योजनेची मान्यता घेतलेली आहे. त्याबाबत दि.२६/०२/२०२१ रोजी डॉ.राजेन्द्र प्रधान (चिफ मेडिकल ॲडमिनिस्ट्रेटर) यांचे पत्र आपल्याला प्राप्त झालेले आहे. |
| ८) | रुग्णालय हे धर्मदाय संस्थेच्या स्वमालकीचे आहे किंवा करारावर अथवा भाडेतत्वावर चालविणेस घेतलेले आहे, याबाबतचे पत्र. | एम.आय.टी.हॉस्पिटल (धर्मदाय) ॲण्ड रिसर्च इन्स्टीटयुट, औरंगाबाद हे ग्रामौद्योगीक शिक्षण मंडळ (जी.एस.मंडळ) यांचेमार्फत चालविले जात आहे., रुग्णालय चालविण्यासाठीची जागा ही ९० वर्ष कराराच्या वार्षीक रु.१००/- मात्र च्या भाडेतत्वावर घेतलेली आहे. असे सोबतचे कागदपत्र रु.२० चे स्टॅम्प पेपरवरील उल्लेखावरुन दिसुन येते. सिडको नं.००२२७३ सिटी ॲन्ड इंडस्ट्रीयल डेव्हेलोपमेंट कार्पोरेशन ऑफ महाराष्ट्र लि. न्यु औरंगाबाद, प्रोजेक्ट पोसेशन स्लिप यावर प्लॉट नं.१४४, सेक्टर एन-४/ एफ, १५४८.४३ स्केअर मि. असा उल्लेख केलेला आहे. |

उपरोक्त कागदपत्रे अ.नं.३ व ४ वित्त विभागाने व इतर कागदपत्रे अनुदान विभागाने नियमावलीप्रमाणे तपासली असता, रुग्णालयास शासनाचे राजीव गांधी जीवनदायी आरोग्य योजनेची (महात्मा ज्योतिबा फुले जन आरोग्य योजना) मान्यता आहे किंवा कसे ? याबाबतचे पत्र सादर केलेले नसल्याने त्यांना जा.नं.एसएसएस/एसएसएच/अनुदान/५७९/२०२० दि.२१/०८/२०२० रोजीचे पत्रान्वये, जीवनदायी योजनेचे पत्र सादर करणेस कळविणेत आले होते. त्यांनी दि.२६/०२/२०२१ रोजीचे पत्रान्वये, शासनाचे राजीव गांधी जीवनदायी आरोग्य योजनची (महात्मा ज्योतिबा फुले जन आरोग्य योजना) मान्यता आहे किंवा कसे ? याबातचे पत्र सादर केलेले आहे. श्री साईबाबा संस्थानने वैद्यकीय आर्थिक अनुदान देणेकामी स्वतंत्र नियमावली तयार केलेली असुन, यास महाराष्ट्र राज्य शासनाची मान्यता आहे.

(पान क्र.३ वर)

एम.आय.टी.हॉस्पिटल (धर्मादाय) ॲण्ड रिसर्च इन्स्टीटयुट, औरंगाबाद हे ग्रामौद्योगीक शिक्षण मंडळ (जी.एस.मंडळ) वैजापूर,ता.वैजापूर जि.औरंगाबाद यांचे असुन, हे मुंबई सार्वजनिक विश्वस्तव्यवस्था अधिनियम, १९५० (सन १९५० चा मुंबई अधिनियम क्र.२९ ) अन्वये, औरंगाबाद प्रदेश, औरंगाबाद येथील सार्वजनिक विश्वस्तव्यवस्था नोंदणी पुस्तकातील क्र.एफ -४२९ (औरंगाबाद) दि.१३/०३/१९७६ अन्वये, सार्वजनिक धर्मदाय न्यासाने चालविलेले रुग्णालय आहे. सुधारित नियमावलीतील नियम क्र.१६ अन्वये, बरोबर आहे. तरी सदर रुग्णालय संस्थान पॅनलवर घेण्यास हरकत नाही.

प्रस्ताव-

तरी विभागाच्या अभिप्रायात नमुद केलेप्रमाणे एम.आय.टी.हॉस्पिटल (धर्मादाय) ॲण्ड रिसर्च इन्स्टीटयुट, औरंगाबाद यांनी सर्व कागदपत्रांची पुर्तता केलेली असुन, सदर रुग्णालयाचा वैद्यकीय आर्थिक अनुदान देणेचे यादीत समावेश करणेबाबतचा प्रस्ताव सदरचा प्रस्ताव मा.तदर्थ (Ad-Hoc) समितीचे सभेत निर्णयार्थ सादर.

29/3/21

(कान्हूराज बगाटे, भा.प्र.से.)
मुख्य कार्यकारी अधिकारी
श्री.साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी.

हॉस्पीटल पावीत नाव समाविष्ट फाईल-१३-१५

SSH-MEETING-222-2021

विषय क्र.- ९६



मा. तदर्थ (Ad. Hoc) समितीचे सभेपुढील विषय
श्री साईनाथ रुग्णालय, शिरडी

टिपणी

विषय – श्री साईबाबा संस्थानमार्फत श्री साईनाथ रुग्णालय येथे डेडिकेटेड कोविड हेल्थ सेंटर (DCHC) सुरु करणेबाबत...

प्रास्तविक - सध्या जगभरात थैमान घातलेल्या कोरोना विषाणु (कोविड १९) च्या विषाणूचा प्रादुर्भाव झपाट्याने वाढत चाललेला आहे. सदर साथीचा प्रादुर्भाव रोखण्याकरीता श्री साईबाबा संस्थानमार्फत साईधर्मशाळा तसेच श्री साईबाबा हॉस्पीटल येथे खालील इमारतीत कोविड सेंटर सुरु करण्यात आलेले आहेत.

| अ.नं | इमारत क्र | दिनांक पासुन सुरु | बेड संख्या | कोविड अधिगृहण इमारत |
|---|---|---|---|---|
| ०१ | इमारत B | ०४/०६/२०२० | २८० | Dedicated Covid Health Center (DCHC) |
| ०२ | इमारत E | ११/०९/२०२० | ६० | Dedicated Covid Health Center (DCHC) with Oxygen |
| ०३ | इमारत F | ०४/०६/२०२० | २८० | Corona Care Center (CCC) |
| ०४ | श्री साईबाबा हॉस्पीटल | १५/०४/२०२१ | १४२ | Additional Dedicated Covid Hospital (DCH) |

सदर सेंटरमध्ये एप्रिल २०२१ पर्यंत एकुण ६९०० रुग्णांवर कोविड उपचार करण्यात आले आहेत. सदर सेंटरकरीता लागणारे आवश्यक मनुष्यबळ, औषधे व तपासण्या (लॅब, एक्स रे, एच.आर. सी.टी.) श्री साईबाबा संस्थानमार्फत मोफत देणेत येत आहेत.

मा. तहसीलदार तथा इंसिडेंट कमांडर, राहाता यांनी कोरोना रुग्णांची वाढती संख्या विचारात घेता श्री साईनाथ रुग्णालय शिर्डी येथे मोफत सेवेचे सुसज्ज ३०० खाटांचे अद्ययावत DCHC संपूर्ण मनुष्यबळ, वैद्यकीय सुविधेसह तात्काळ कार्यान्वीत करण्यात यावे व याबाबत नोडल अधिकारी नियुक्त करुन त्यांच्या मोबाईल क्रमांकासह इतर सविस्तर माहिती जिल्हा व तालुका प्रशासनास उपलब्ध करुन देण्यात यावी, अशी विनंती केलेली आहे.

विभागाचा अभिप्राय - राहाता तालुक्यात सद्यस्थितीमध्ये कोरोना विषाणूचा प्रादुर्भाव असुन कोरोना बाधितांची संख्येमध्ये वारंवार वाढ होत आहे. त्यामुळे कोरोना बाधित व्यक्तींव्दारे कोरोनाचा प्रसार रोखणेकामी श्री साईनाथ रुग्णालयामध्ये Dedicated Covid Health Center कार्यान्वित करणे आवश्यक आहे.

सध्या कोविड सेंटर हे श्री साईआश्रम धर्मशाळा इमारतीत सुरु आहे. मा.जिल्हाधिकारी महोदय, अहमदनगर यांनी श्री साईबाबा हॉस्पीटल येथे कोविड हॉस्पीटल सुरु करणेकामी मा.प्र.मुख्य कार्यकारी अधिकारी यांना समक्ष दिलेले निर्देश तसेच मा. तहसीलदार यांचे दि.११/०४/२०२१ चे पत्रास अनुसरुन, दि.१५/०४/२०२१ पासुन श्री साईबाबा हॉस्पीटलमध्ये एकुण १४० बेड ऑक्सीजन तसेच व्हेंनटीलेटर सह कोविड हॉस्पीटल सुरु करणेत आलेले आहे.

श्री साईनाथ रुग्णालयामध्ये Dedicated Covid Health Center सुरु करण्यासाठी ऑक्सीजन प्लांट कार्यान्वित झालेनंतर खाली नमुद केलेल्या विभागांकडुन त्यांचे नावांसमोर दर्शविल्याप्रमाणे कार्यवाही करुन घ्यावी लागेल.

| अ.नं | विभाग | कार्यवाही |
|---|---|---|
| ०१ | श्री साईप्रसादालय विभाग | श्री साईनाथ रुग्णालय येथील Dedicated Covid Health Center मध्ये ३०० रुग्ण व स्टाफ करीता सकाळी नाष्टा व दोन वेळ भोजन मोफत व्यवस्था करणेबाबत. ( अंदाजे ३०० व्यक्तींकरीता ) |
| ०२ | कॅंटीन विभाग | श्री साईनाथ रुग्णालय येथील Covid Hospital मध्ये ३०० रुग्ण व स्टाफ करीता सकाळी व संध्याकाळी दोन वेळा चहा, दुध मोफत व्यवस्था करणेबाबत. (अंदाजे ३०० व्यक्तींकरीता) |

(कृ.मा.प)

| अ.नं | विभाग | कार्यवाही |
|---|---|---|
| ०३ | आरोग्य विभाग | १) श्री साईनाथ रुग्णालय येथील Covid Hospital मध्ये स्वच्छता करणेकामी चार शिफटमध्ये स्वतंत्र कर्मचारी नेमणेबाबत.<br>२) श्री साईनाथ रुग्णालय येथील Covid Hospital इमारतीचा परिसर देखील स्वच्छ ठेवणेकामी आवश्यक ते मटेरियल पुरविणेबाबत. |
| ०४ | वाहन विभाग | १) श्री साईबाबा हॉस्पीटल व श्री साईनाथ रुग्णालय येथे कोरोना रुग्णांना ने – आण करणेकरीता वाहन चालकासहित अॅम्बुलन्स ठेवणेबाबत.<br>२) तसेच श्री साईआश्रम निवासस्थान येथे वास्तव्यास असणा-या कर्मचा-यांना श्री साईबाबा हॉस्पीटल व श्री साईनाथ रुग्णालय येथे ने आण करणेकामी वाहन उपलब्ध ठेवणे. |
| ०५ | पाणी पुरवठा विभाग | १) श्री साईनाथ रुग्णालय येथे वॉश बेसिन, संडास, बाथरुमसाठी सुरळीत पाणी पुरवठा करणेबाबत.<br>२) तसेच तिस-या मजल्यावरील बाथरुम, बेसीन यांचे पाण्याचे व ड्रेनेज पाईपलाईन जोडणी तात्काळ करणेबाबत. |
| ०६ | मेकॅनिकल विभाग | श्री साईनाथ रुग्णालय येथे पिण्याच्या पाण्याकरीता वॉटर कुलर अद्ययावत ठेवणेबाबत. |
| ०७ | साईआश्रम निवासस्थान | साईआश्रम निवासस्थान येथील इमारत B व C मधील एकुण २५६ रुमस पूर्वीपासुन राखून ठेवलेल्या आहेत ते तसेच राखीव ठेवणेबाबत. |
| ०८ | संरक्षण विभाग | १) श्री साईनाथ रुग्णालयामध्ये ठेवणेत आलेल्या रुग्णांवर निरीक्षण करणेबाबत.<br>२) सदरहु परिसराजवळील बाहेरील लोकांमध्ये कोरोना विषाणु प्रादुर्भाव रोखणेकामी आस – पासचे क्षेत्र रिकामे करणेबाबत.<br>३) श्री साईनाथ रुग्णालयाच्या बाजुने आवश्यकते प्रमाणे बॅरिकेडींग करणेबाबत.<br>४) प्रति शिफ्ट प्रत्यक्ष पहाणी करुन आवश्यकतेनुसार सुरक्षारक्षक उपलब्ध ठेवणेबाबत.<br>५) कोरोना रुग्णांचा प्रादुर्भाव रोखणेकामी नातेवाईकांचा सेंटर मध्ये आत प्रवेश करणेवर निर्बंध घालणे. |
| ०९ | विद्युत विभाग | १) श्री साईनाथ रुग्णालयामध्ये लाईट व फॅनचे मेंटेनन्स करणेबाबत.<br>२) श्री साईनाथ रुग्णालयामध्ये आवश्यकता भासलेस व अतिरिक्त विद्युत पॉईट काढुन देणेबाबत.<br>३) नवीन तिस-या मजल्याची विदयुत जोडणी प्रत्यक्ष पाहुन मोकळया वायर जोडुन घेणे. |
| १० | औषध खरेदी विभाग, श्री साईबाबा हॉस्पीटल व सबस्टोअर व मेडीकल स्टोअस श्री साईनाथ रुग्णालय | श्री साईनाथ रुग्णालय येथे सर्व औषधे व वैद्यकिय उपकरणे तसेच पी.पी.ई. किट, एन ९५ मास्क व Pulse Oxymeter तातडीने खरेदी करुन उपलब्ध करुन देणेबाबत. |
| ११ | बायोमेडीकल वेस्ट विभाग, श्री साईबाबा हॉस्पीटल | श्री साईनाथ रुग्णालयामधील कच-याची योग्य ती नियमाप्रमाणे विल्हेवाट लावणेकामी प्रत्येक शिफ्ट करीता मनुष्यबळ पुरविणेबाबत व बायोमेडीकल कच-याची विल्हेवाट लावणेचे नियोजन करणेबाबत. |
| १२ | बायोमेडीकल विभाग, श्री साईबाबा हॉस्पीटल | श्री साईनाथ रुग्णालय येथे आवश्यकतेनुसार योग्य ते वैद्यकीय उपकरणे तसेच ऑक्सीजन सुविधा सुरळीत पुरवठा करणेबाबत. |
| १३ | साईनाथ रुग्णालय अधिसेविका कार्यालय | १) श्री साईनाथ हॉस्पीटल मधील डॉक्टर्स, नर्स व इतर कर्मचारी यांना मा. तहसीलदार, राहाता यांचेकडुन आलेल्या वेळापत्रकाप्रमाणे कामकाजाच्या ठिकाणी हजर ठेवणेबाबत.<br>२) सदर केंद्रामध्ये लागणारे वैद्यकीय उपकरणे व आवश्यक तो औषधसाठा तसेच पी.पी.ई किट, एन ९५ मास्क उपलब्ध ठेवणेबाबत. |
| १४ | फोकस फॅसिलिटी लि. | १) श्री साईनाथ रुग्णालय येथील Dedicated Covid Health Center मध्ये स्वच्छता करणेकामी आवश्यकतेनुसार कर्मचारी नेमणे बाबत.<br>२) श्री साईनाथ रुग्णालय येथील Dedicated Covid Health Center मध्ये इमारतीचा परिसर देखील स्वच्छ ठेवणेकामी आवश्यक ते मटेरियल पुरविणेबाबत. |

(पान क्र. ०३ वर...)

| अ.नं | विभाग | कार्यवाही |
|---|---|---|
| १५ | श्री साईबाबा हॉस्पीटल | श्री साईनाथ रुग्णालयात ज्या तपासण्या होत नाहीत त्या तपासण्या श्री साईबाबा हॉस्पीटलमध्ये (औषधे, २ डी इको, रेडीओलॉजी,लॅब इ.) करणेबाबत. |

मा.अध्यक्ष साहेब, तदर्थ समिती, श्री साईबाबा संस्थान शिर्डी यांचे जा.नं.स्वीस /२६/२०२१, अन्वये सदरहु विषय हा चक्रीय पदधतीने सादर करण्याची कुठलीही तातडी भासत नाही व या विषयावर तदर्थ समितीच्या नियमित बैठकीत सखोल चर्चा होणे आवश्यक दिसते करिता तथापि सदरहु विषय परत पाठवत आहे ते तदर्थ समितीच्या पुढील नियमित बैठकीत ठेवण्यात यावेत, असे पत्रान्वये आदेशीत केलेले आहे.

प्रस्ताव - तरी विभागाच्या अभिप्रायात नमुद केले प्रमाणे संबंधित विभागाकडुन जो पर्यंत श्री साईनाथ रुग्णालय येथील Dedicated Covid Health Center सुरु आहे तो पर्यंत सदरची कार्यवाही होणेस व कोवीड रुग्णांना मोफत सेवा देणेस (औषधे, तपासण्या, लॅब, एक्स – रे, HRCT, चहा, जेवण, निवास इ.) मान्यता असावी. तसेच ज्या तपासण्या श्री साईनाथ रुग्णालयात होत नाहीत परंतु श्री साईबाबा रुग्णालयात होतात अशा तपासण्या देखील मोफत करणेकामी सदरचा प्रस्ताव मा. तदर्थ (Ad. Hoc) समितीचे सभेसमोर निर्णयास्तव सादर.

२१.०६.२१

(कान्हूराज बगाटे, भा.प्र.से.)
**मुख्य कार्यकारी अधिकारी,**
श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी

२१/०६/२१

मा. तदर्थ समिती सभेसमोरील विषय
श्री साईनाथ रुग्णालय, शिरडी



टिपणी –

विषय – **श्री साईनाथ रुग्णालयात माहे ऑक्टोबर २०२० ते मार्च २०२१ अखेर वैद्यकीय बिलात देण्यात आलेली सवलत रक्कम रु.३,२७,१२,८९५/- च्या खर्चास नोंद घेणेस मान्यता मिळणेबाबत...**

- **अधिनियम २००४ मधील तरतुद** – कलम १७(२)(ण) मानव जातीचे कल्याण करणा-या किंवा मानवाला आपत्तीमध्ये सहाय्य करणा-या अन्य कोणत्याही उदात्त कार्यास चालना देईल.
- **मा. व्यवस्थापन समितीचे सभेतील निर्णय –**

१) **मा. व्यवस्थापन समितीचे दि. २२/१२/२०१६ रोजीच्या सभेतील निर्णय क्र. ९४४.**

श्री साईनाथ रुग्णालय हे धर्मदाय रुग्णालय म्हणुन संस्थानमार्फत चालविले जात असुन त्याचा जास्तीत जास्त फायदा गोरगरीब रुग्णांना होत आहे. यासाठी प्रस्तावात नमुद केलेल्या चिकन गुनिया व गोचिडताप या तपासण्या श्री साईनाथ रुग्णामध्ये मोफत करण्यात याव्यात, असे ठरले.

याचवेळी अशीही चर्चा करणेत आली की, श्री साईबाबांनी त्यांच्या हयातीमध्ये स्वतःच्या हाताने अनेक रुग्णांची सेवा सुश्रुषा करुन त्यांच्या व्याधी ब-या केलेल्या आहेत. श्री साईबाबांनी सुरु केलेले हे रुग्णसेवेचे कार्य संस्थान व्यवस्थापनाने अविरतपणे पुढे सुरु ठेवलेले आहे. हे रुग्णसेवेचे कार्य असेच पुढे चालू ठेवून त्याची व्याप्ती वाढविणेकरीता दि. ०१ जानेवारी २०१७ पासुन श्री साईनाथ रुग्णालयामध्ये होत असलेले सर्व प्रकारचे वैद्यकीय उपचार सर्वांसाठी मोफत करणेत यावे. याबाबतचा धोरणात्मक निर्णय आजचे सभेत घेण्यात आला. तसेच श्री साईनाथ रुग्णालयामध्ये रुग्णांकडुन प्रवेशासाठी फक्त रु.१०/- मात्र पुर्वीप्रमाणेच आकारणेत यावे, असे ठरले.

२) **मा. व्यवस्थापन समितीचे दि. २५/०२/२०१७ रोजीच्या सभेतील निर्णय क्र. ०६**

श्री साईनाथ रुग्णालयामध्ये होत असलेले वैद्यकीय उपचार दि. ०१/०१/२०१७ पासुन सर्वांसाठी मोफत करणेत आलेले असुन त्यासाठी प्रस्तावित केलेल्या नियमावली मधील अ.नं. ०३,०४,०५ व ०६ या मुद्दयास मान्यता देण्यात आली.

श्री साईनाथ रुग्णालयामध्ये मोफत वैद्यकीय सेवा मिळत असल्यामुळे खाजगी वैद्यकीय व्यावसायिक त्यांचेकडील रुग्णांना वैद्यकीय चाचण्या करण्यासाठी श्री साईनाथ रुग्णालयात पाठवितात, अशा प्रकारच्या चाचण्या करण्यात येऊ नये व याबाबत रुग्णांना कळविण्यासाठी तेथे फलक लावण्यात यावा.

श्री साईनाथ रुग्णालयामध्ये गोर गरीब रुग्ण उपचार घेत असतात, याकरीता मोफत उपचार करणेसाठी आर्थिक निकष लावणेत येऊ नये. रुग्ण, रुग्णालयामध्ये दाखल झाल्यानंतर आवश्यकतेप्रमाणे उपचार घेऊ शकेल व जादा मनुष्यबळ वापरणेऐवजी आवश्यक त्या ठिकाणी नवीन सॉफ्टवेअर विकसीत करणेत यावे. तसेच संस्थान रक्तपेढीमध्ये रक्त अथवा रक्तघटक उपलब्ध नसल्यास इतर रक्तपेढयांकडे रक्ताची मागणी करण्यात यावी, रक्त अथवा रक्तघटकांअभावी रुग्णांची गैरसोय होऊ देऊ नये. याकरीता इतर रक्तपेढयांबरोबर MOU करणेत यावा व रक्तदात्यांची यादीही बनविणेत येऊन, दि. ०१ मार्च २०१७ पासुन रुग्णांना रक्त व रक्त घटक मोफत उपलब्ध करुन देण्यात यावे, असा धोरणात्मक निर्णय घेण्यात आला.

(कृ.मा.प.)

तसेच श्री साईनाथ रुग्णालयामध्ये राजीवगांधी जीवनदायी आरोग्य योजना राबविणेत यावी व केसपेपर विभागामध्ये काऊंटरची संख्या वाढविणेत यावी, असे ठरले.

३) **मा. व्यवस्थापन समितीचे दि. ०१/११/२०१८ रोजीच्या सभेतील निर्णय क्र. ६१२**

शासनाच्या सार्वजनिक आरोग्य विभागाच्या परिपत्रकाप्रमाणे शासकीय रुग्णालयामधुन देण्यात येणा-या तपासणी व त्याबाबतच्या रुग्णशुल्काबाबतचे सेवाआकारामध्ये आकारण्यात येणा-या शुल्क दरामध्ये दर दोन वर्षांनी १५ ते २० टक्के वाढ करणेत येईल असे नमुद केलेले आहे. याअनुषंगाने श्री साईनाथ रुग्णालयातील दर निश्चीत झालेनंतर दर दोन वर्षांनी १० टक्के वाढ करणेस मान्यता देण्यात आली.

या ऐवजी खालीलप्रमाणे निर्णय करण्यात आले.

श्री साईबाबा रुग्णालयातील सद्यस्थितीला लागु असणारे दर जसेच्या तसे श्री साईनाथ रुग्णालयात लागु करणेत यावेत, व जे उपचार, शस्त्रक्रिया श्री साईबाबा रुग्णालयात होत नाहीत परंतु शासकीय रुग्णालयात होत आहेत. अशा उपचारांचे दर शासनाच्या दराप्रमाणे घेण्यात यावे. तसेच शासनाच्या सार्वजनिक आरोग्य विभागाच्या परिपत्रकाप्रमाणे शासकीय रुग्णालयामधुन देण्यात येणा-या तपासणी व त्याबाबतच्या रुग्णशुल्काबाबतचे सेवाआकारामध्ये आकारण्यात येणा-या शुल्क दरामध्ये दर दोन वर्षांनी १५ ते २० टक्के वाढ करणेत येईल असे नमुद केलेले आहे. याअनुषंगाने श्री साईनाथ रुग्णालयातील दर निश्चीत झालेनंतर दर दोन वर्षांनी १० टक्के वाढ करणेस मान्यता देण्यात आली.

- **प्रास्तविक** – श्री साईबाबांच्या शिकवणुकीस अनुसरुन गरीब व गरजु रुग्णांना दि. ०१/०१/२०१७ रोजी पासुन श्री साईनाथ रुग्णालय संपुर्णपणे मोफत उपचार सुरु केलेले आहे.

- **विभागाचा अभिप्राय -**

श्री साईनाथ रुग्णालयात माहे. ऑक्टोबर २०२० ते मार्च २०२१ अखेर सर्व घटकातील रुग्णांना मोफत तपासणी, शस्त्रक्रिया व औषधांसाठी रक्कम रु. ३,२७,१२,८९५/- मात्र खर्च झालेला आहे त्याचे विवरण खालील प्रमाणे आहे.

- **अंर्तरुग्णांवर झालेला खर्च** –

| अ.नं | महिना | एकुण रुग्ण संख्या | जनरल रुग्णांपोटी झालेला खर्च | संस्थान कायम कर्मचारीपोटी झालेला खर्च | संस्थान कंत्राटी कर्मचारीपोटी झालेला खर्च | एकुण रुपये |
|---|---|---|---|---|---|---|
| ०१ | ऑक्टोबर २०२० | ४६८ | १५,४६,८३६/- | ३९,७०८/- | ४९,७१८/- | १६,३६,२६२/- |
| ०२ | नोव्हेंबर २०२० | ४५४ | १७,७६,९५६/- | ४१,०८४/- | ३२,०७५/- | १८,५०,११५/- |
| ०३ | डिसेंबर २०२० | ७९० | ३०,०२,४७८/- | ५०,६०६/- | ३९,०२४/- | ३०,९२,१०८/- |
| ०४ | जानेवारी २०२१ | ९११ | ३५,२७,६१०/- | ६०,८५९/- | ५१,४३१/- | ३६,३९,९००/- |
| ०५ | फेब्रुवारी २०२१ | ८६० | ३९,४७,४२४/- | ४९,१७८/- | १९,६६५/- | ४०,१६,२६७/- |
| ०६ | मार्च २०२१ | ८५० | ३८,०९,२३१/- | ४९,०३३/- | ३५,१७९/- | ३८,९३,४४३/- |
| | | | | | एकुण रक्कम रुपये | १,८१,२८,०९५/- |

(पान क्र. ०३ वर...)

- बाह्यरुग्णांवर झालेला खर्च -

| अ.नं | महिना | एकुण रुग्ण संख्या | जनरल रुग्णांपोटी झालेला खर्च | संस्थान कायम कर्मचारीपोटी झालेला खर्च | संस्थान कंत्राटी कर्मचारीपोटी झालेला खर्च | एकुण रुपये |
|---|---|---|---|---|---|---|
| ०१ | ऑक्टोबर २०२० | ११,९२३ | ७,००,५७७/- | ८९,७१९/- | ७०,८४८/- | ८,६१,१४४/- |
| ०२ | नोव्हेंबर २०२० | १२,३८७ | ७,०६,१३५/- | ८५,२०२/- | ५९,६६२/- | ८,५०,९९९/- |
| ०३ | डिसेंबर २०२० | १४,२३९ | १०,८८,३२७/- | ७१,०९८/- | ६३,११६/- | १२,२२,५४१/- |
| ०४ | जानेवारी २०२१ | १२,३८७ | ११,२४,७९९/- | ६९,८४२/- | ७६,६८३/- | १२,७१,३२४/- |
| ०५ | फेब्रुवारी २०२१ | १८,५२४ | ११,३६,५६०/- | ६०,३७७/- | ६१,९८७/- | १२,५८,९२४/- |
| ०६ | मार्च २०२१ | १८,१४३ | ११,०९,०५२/- | १,०७,०६०/- | ८४,८८८/- | १३,०१,०००/- |
| | | | | | एकुण रक्कम रुपये | ६७,६५,९३२/- |

- औषधांवरील झालेला एकुण खर्च –

| अ.नं | महिना | एकुण रुपये |
|---|---|---|
| ०१ | ऑक्टोबर २०२० | १०,६२,१०८/- |
| ०२ | नोव्हेंबर २०२० | ६,७८,३०१/- |
| ०३ | डिसेंबर २०२० | १३,२३,९५८/- |
| ०४ | जानेवारी २०२१ | १५,४०,२९१/- |
| ०५ | फेब्रुवारी २०२१ | १४,७१,६६९/- |
| ०६ | मार्च २०२१ | १७,४२,५४१/- |
| एकुण रक्कम रुपये | | ७८,१८,८६८/- |

- एकुण खर्च रक्कम विवरण –

| अ. नं | महिना | अंतरुगण संख्या | अंतरुग्णांवर झालेला खर्च रक्कम रुपये | बाह्यरुग्ण संख्या | बाह्यरुग्णांवर झालेला खर्च रक्कम रुपये | औषधांवर खर्च झालेला एकुण रक्कम रुपये | एकुण रुग्ण संख्या (३+५) | एकुण रुपये (४+६+७ = ९) |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ |
| ०१ | ऑक्टोबर २०२० | ४६८ | १६,३६,२६२/- | ११,९२३ | ८,६१,१४४/- | १०,६२,१०८/- | १२,३९१ | ३५,५९,५१४/- |
| ०२ | नोव्हेंबर २०२० | ४५४ | १८,५०,११५/- | १२,३८७ | ८,५०,९९९/- | ६,७८,३०१/- | १२,८४१ | ३३,७९,४१५/- |
| ०३ | डिसेंबर २०२० | ७९० | ३०,९२,१०८/- | १४,२३९ | १२,२२,५४१/- | १३,२३,९५८/- | १५,०२९ | ५६,३८,६०७/- |
| ०४ | जानेवारी २०२१ | ९११ | ३६,३९,९००/- | १२,३८७ | १२,७१,३२४/- | १५,४०,२९१/- | १३,२९८ | ६४,५१,५१५/- |
| ०५ | फेब्रुवारी २०२१ | ८६० | ४०,१६,२६७/- | १८,५२४ | १२,५८,९२४/- | १४,७१,६६९/- | १९,३८४ | ६७,४६,८६०/- |
| ०६ | मार्च २०२१ | ८५० | ३८,९३,४४३/- | १८,१४३ | १३,०१,०००/- | १७,४२,५४१/- | १८,९९३ | ६९,३६,९८४/- |
| | | | | | | एकुण | ९१,९३६ | ३,२७,१२,८९५/- |

उपरोक्तप्रमाणे झालेल्या खर्चाची नोंद घेण्यासाठी सदरचा प्रस्ताव मा. तदर्थ समिती समोर ठेवता येईल, असे नम्र मत आहे. (सोबत उपरोक्त खर्च रक्कम रु.३,२७,१२,८९५/- चे विवरण सादर केले आहे.)

(पान क्र. ०४ वर...)

मा. अध्यक्ष साहेब, तदर्थ समिती, श्री साईबाबा संस्थान शिर्डी यांचे जा.नं.स्वीस/२६/२०२१ दि. १७/०६/२०२१ अन्वये सदरहु विषय हा चक्रीय पद्धतीने सादर करण्यांची कुठलीही तातडी भासत नाही व या विषयावर तदर्थ समितीच्या नियमित बैठकीत सखोल चर्चा होणे आवश्यक दिसते करिता तथापि सदरहु विषय परत पाठवत आहे ते तदर्थ समितीच्या पुढील नियमित बैठकीत ठेवण्यात यावेत; असे पत्रान्वये आदेशीत केलेले आहे.

- **प्रस्ताव -** तरी विभागाच्या अभिप्रायामध्ये नमुद केल्याप्रमाणे माहे. ऑक्टोबर २०२० ते मार्च २०२१ या कालावधीत श्री साईनाथ रुग्णालयात एकुण रुग्ण संख्या ९१,९३६ वर रक्कम रु.३,२७,१२,८९५/- (अक्षरी रक्कम रुपये तीन कोटी सत्तावीस लाख बारा हजार आठशे पंच्याण्णव मात्र) इतक्या रक्कमेचे वैद्यकीय उपचार व औषधांवरील झालेल्या खर्चाची नोंद घेणेकामी सदरचा प्रस्ताव मा. तदर्थ (Ad. Hoc) समितीचे सभेसमोर निर्णयार्थ तसेच मा. तदर्थ समितीची मान्यता मिळालेनंतर सदरचा विषय मा. उच्च न्यायालय खंडपीठ, औरंगाबाद यांचे समोर मान्यतेकरीता सादर.

26/6/21

(कान्हूराज बगाटे, भा.प्र.से.)
**मुख्य कार्यकारी अधिकारी,**
श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी

SSH- meeting - 227 - 2021

MEETING-247-2020

विषय क्र.- ८८

मा. तदर्थ समिती सभेपुढील विषय

**आरोग्य विभाग**

416

**विषय – स्वच्छता साहित्य खरेदीबाबत.**

**मान्यतेस्तव सादर,**

आरोग्य विभागामार्फत समाधी मंदिर, मंदिर परिसर, संस्थान परिसर, काही भक्तनिवासस्थाने व कर्मचारी / अधिकारी निवासस्थाने इ. परिसरातील साफ सफाई नियमित केली जाते. साफसफाईचे कामासाठी स्वच्छता साहित्याची नेहमीच गरज असते. यासाठी आवश्यक लागणा-या स्वच्छता साहित्याची खरेदी वारंवार करणेपेक्षा विहीत पध्दतीने वार्षिक खरेदी करण्यात येते.

यापुर्वी आपण सन २०१७ – २०१८ या वर्षामध्ये वार्षीक स्वच्छता साहित्य रु.१९,२१,९२६/-इतके रक्कमेचे खरेदी विभागामार्फत खरेदी केले होते.

सदर साहित्य शिल्लक असलेमुळे सन २०१८-२०१९ व २०१९-२०२० या कालावधीमध्ये वार्षीक खरेदी करण्यात आलेली नाही. परंतु आवश्यकतेनुसार काही साहित्य आरोग्य विभागामार्फत कोटेशन्स मागवुन मा. मुख्य कार्यकारी अधिकारी साहेब यांचे मान्यतेने रु. ८,९०५४८/- इतक्या रक्कमेचे खरेदी करण्यात आले होते. असे एकुण रु. २८,१२,४७४/- रक्कमेचे स्वच्छता साहित्य खरेदी करण्यात आले होते. सदर उर्वरीत स्वच्छता साहित्यांपैकी अंदाजे माहे फेब्रुवारी २०२१ पर्यंत पुरेल इतके साहित्य शिल्लक आहे. (शिल्लक असलेले साहित्यांची यादी सोबत परिशिष्ट 'ब' मध्ये जोडलेली आहे) तो पर्यंत सन २०२१-२०२२ या कालावधीसाठी लागणारे स्वच्छता साहित्यांची खरेदी प्रक्रिया खरेदी विभागामार्फत पुर्ण होईल.

आरोग्य विभागासाठी सन २०२१-२०२२ करिता दैनंदिन साफसफाईचे कामासाठी आवश्यक असणा-या साहित्यांची यादी सोबत परिशिष्ठ 'अ' मध्ये जोडली आहे. परिशिष्ठातील 'अ' मधील अ. नं. ०१ ते १८ नुसार साहित्य खरेदीकामी रुपये- २०,०२,९०५/- (अक्षरी- रु. वीस लाख दोन हजार नऊशे पाच मात्र) खर्च अपेक्षित आहे.

सन २०२०-२१ या आर्थिक वर्षासाठी स्वच्छता साहित्य खरेदीसाठी मंजूर अंदाजपत्रक रुपये- ४५,००,०००/- तरतुद असुन त्यापैकी रुपये -४०,००,०००/- स्वच्छता साहित्य खरेदीकामी खरेदी विभागाकडे वर्ग करण्यात आले आहे. सदरचे साहित्य, खरेदी विभागामार्फत विहित पध्दतीने ई-निविदा मागवून खरेदी कार्यवाही करता येईल असे नम्र मत आहे.

सध्या कोरोना साथीचे रोगाचा प्रार्दुभाव रोखणेकामी मंदिर परिसर व दर्शन रांग येथील साफसफाई स्वच्छता साहित्य जास्त प्रमाणात लागणार असल्यामुळे सोबतचे परिशिष्ठ ' अ ' मधील यादीप्रमाणे स्वच्छता साहित्य खरेदी करणेसाठी येणा-या **अंदाजे रुपये- २०,०२,९०५/- (अक्षरी- रु. वीस लाख दोन हजार नऊशे पाच मात्र)** चे खर्चास व खरेदी विभागामार्फत विहित पध्दतीने ई-निविदा मागवून आवश्यक साहित्य खरेदी करणेस मान्यता मिळणेकामी मा. तदर्थ समितीचे सभेपुढे निर्णयार्थ सादर.

8/12/2020

(कान्हूराज बगाटे, भा.प्र.से)
मुख्य कार्यकारी अधिकारी
श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी

**सोबत-**१) परिशिष्ट ' अ '
२) परिशिष्ट ' ब '

परिशिष्ट " अ "

आरोग्य विभागास सन २०२१-२०२२ या वर्षा करिता साफसाफाई कामी खालील प्रमाणे स्वच्छता साहित्याची आवश्यकता आहे.

| अ.नं. | साहित्याचा तपशिल | साईज / वर्णन | मेक/ब्रँड/घटक | मागणी परिमाण/संख्या | मगनलाल देवशंकर, नाशिक | दिग्विजय एन्टरप्रायजेस, नाशिक | वर्धमान नॉव्हेल्टीज, नाशिक | ओम साई ट्रेडर्स,शिर्डी | अदाजे दर (सरासरी) | अंदाजे रक्कम |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ७ | ८ | ९ | १० | ११ | १२ | १३ |
| १ | सेंटेड फिनेल | पाण्याशी डायल्यूशन रेशो १:१०० कोरे (प्युअर) | घटक प्रती लिटर<br>पाईन ऑईल Aग्रेड ६५० ग्रॅम<br>टर्किड ऑईल(TRO 75%)३५० ग्रॅम | ३००० लिटर | २२०/-प्र.लि. | १७५/-प्र.लि. | १८०-प्र.लि. | ११०/-प्र.लि. | १७१/- | ५१३०००/- |
| २ | लिक्वीड सोप | कोणत्याही रंगाचे | घटक प्रती लिटर<br>ॲसीड स्लरी (८०%) १०० ग्रॅम<br>कॉस्टीक सोडा<br>(४०%कॉस्टीक लाय द्रावण) २० ग्रॅम | ३००० लिटर | १००/-प्र. .लि.. | ८५/- प्र.लि. | ९०/- प्र.लि. | ६०/- प्र.लि. | ८४/- | २५२०००/- |
| ३ | बी.एच.सी. पर्यायी पावडर/ फॉलीडॉल पावडर | २५ किलोची बॅग | Fenvalrate – 0.4 %<br>आयएसआय मार्क असलेली | २००० किलो | ४६/- प्र.कि. | ३०/- प्र.कि. | ४०/- प्र.कि. | ६०/- प्र.कि. | ४४/- | ८८०००/- |
| ४ | ब्लिचिंग पावडर | २५ किलोची बॅग | आयएसआय मार्क असलेली | १००० किलो | ४५/-प्र.कि. | ३५/- प्र.कि. | ४२/- प्र.कि. | ४५/- प्र.कि. | ४२/- | ४२०००/- |
| ५ | रबरी वायफर स्टील दांड्यासहीत | २"-३" रुंदी व १८" लांब,दांडे ५ फुट लांबीचे | चांगल्या प्रतीचे लवचिक रबर असलेले | २०० नग | ३२०/- प्र.नग | २५०/- प्र.नग | ३००/- प्र.नग | १६०/- प्र.नग | २५८/- | ५१६००/- |
| ६ | किटकनाशक औषध (किटकनाशक फवारणी कामी ) | ०५ लिटरचे पॅकींग | Diachloro-EC 76 %<br>आयएसआय मार्क असलेले | २५ लिटर | २२७५/-प्र.लि. | २२२५/- प्र.लि. | २२५०/- प्र.लि. | ३५०/- प्र.लि. | १७७५/- | ४४३७५/- |
| ७ | डस्टपॅन (कचरा गोळा करणेकामी ) | स्टॅंडर्ड साईज, दोन फुट लांब दांडी, झाकण असलेले | चांगल्या प्रतीचे फायबर | १०० नग | ६००/- प्र.नग | ५५०/- प्र.नग | ५७५/- प्र.नग | ७५०/- प्र.नग | ६१९/- | ६१९००/- |
| ८ | वॉश बेशीन / टॉयलेट क्लिनर (Toilet cleaners) (वॉश बेशीन / संडास भांडेचे डाग काढणे कामी) | ०५ लिटरचे पॅकींग | Harpic/Tanaz/<br>Dr. Ideal/Super Shine/<br>Any Other Company | १००० लिटर | ९०/- प्र.लि. | ८०/-प्र.लि. | ८५/-प्र.लि. | ५०/-प्र.लि. | ७६/- | ७६०००/- |
| ९ | लिक्वीड (फरशीवरील सर्व प्रकारचे डाग काढणेकामी ) | ०५ लिटरचे पॅकींग | Taski / Ecolab / Schevron<br>Any Other Company | ३०० लिटर | २२५/- प्र.लि. | १५०/- प्र.लि. | २००/- प्र.लि | ८०/- प्र.लि. | १६४/- | ४९२००/- |
| १० | All purpose cleaners तेलकट डाग काढणेसाठी | ०५ लिटर पॅकींग | Taski / Ecolab / Schevron<br>Any Other Company | ३०० लिटर | १७५/- प्र.लि. | १००/- प्र.लि. | २२५/- प्र.लि. | १५०/- प्र.लि. | १३८/- | ४१४००/- |
| ११ | नायलॉन ब्रश- लांबदांडीचे (टॉयलेट साफ करणे कामी) | स्टॅंडर्ड | चांगल्या प्रतीचे | १०० नग | १७५/- प्र.न. | ९०/- प्र.नग | १२५/- प्र.नग | ६०/- प्र.नग | ११३/- | ११३००/- |
| | | | | | | | | | एकूण रुपये - | १२,३०,७७५/- |

| अ.नं. | साहित्याचा तपशिल | साईज / वर्णन | मेक/ब्रँड/घटक | मागणी परिमाण/संख्या | मगनलाल देवशंकर, नाशिक | दिग्विजय एन्टरप्रायजेस, नाशिक | वर्धमान नॉव्हेल्टज, नाशिक | ओम साई ट्रेडर्स,शिर्डी | अदाजे दर (सरासरी) | अंदाजे रक्कम |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | २ | ३ | ४ | ७ | ८ | ९ | १० | ११ | १२ | १३ |
| | | | | | | | | मागील पानावरील बेरीज... | | |
| १२ | नायलॉन ब्रश- लहान (डाग घासणे कामी) | स्टॅंडर्ड | चांगल्या प्रतीचे | १०० नग | १२५/- प्र.न | ५०/- प्र.नग | १००/- प्र.नग | ३०/- प्र.नग | ७६/- | ७६००/- |
| १३ | चोक रिमुव्हर | स्टॅंडर्ड | चांगल्या प्रतीचे | १०० नग | १५०/- प्र.नग | ५०/- प्र.नग | १२०/- प्र.नग | ६०/- प्र.नग | ९५/- | ९५००/- |
| १४ | खराटे | प्रत्येकी ५०० ग्रॅम वजनाचे, खुंटी नसलेले, लांब काड्याचे, मजबूत बांधणीचे व साळलेले | चांगल्या प्रतीचे | ३००० नग | ५८/- प्र.नग | ५०/- प्र.नग | ५२/- प्र.नग | ६०/- प्र.नग | ५५/- | १६५०००/- |
| १५ | कुंचे | प्रत्येकी ५०० ग्रॅम वजनाचे, स्पेशल लांब काड्याचे, खुंटी नसलेले, मजबूत बांधणीचे | चांगल्या प्रतीचे | ३००० नग | १५०/- प्र.नग | ९०/- प्र.नग | १२०/- प्र.नग | ८०/- प्र.नग | ११०/- | ३३००००/- |
| १६ | रबरी मॅट काळया रंगाची | साईज - लांबी ४ फुट, रुंदी २.५ फुट, व उंची पाऊण इंच (गोल छिंद्राचे) | चांगल्या प्रतीचे | २०० नग | १६५०/- प्र.नग | १०००/-प्र.नग. | १५००/-प्र.नग. | ३५०/-प्र.नग. | ११२५/- | २२५०००/- |
| १७ | लिक्वीड पॉलिश पितळी अक्षरे साफ करणे कामी | २०० ml. पॅकींग असलेले | चांगल्या प्रतीचे ब्रासो/धारा/पितांबरी किंवा इतर कंपनीचे | ०५ लिटर | १६००/- प्र.लि. | १४५०/-प्र.लि. | १५७५/-प्र.लि. | १०००/-प्र.लि. | १४०६/- | ७०३०/- |
| १८ | सेन्टेड डांबर गोळी | ०१ किलो पॅकिंग | चांगल्या प्रतीच्या | १०० किलो | ३००/- प्र.कि. | २५०/-प्र.कि. | २७०/-प्र.कि. | ३००/-प्र.कि. | २८०/- | २८०००/- |
| | | | | | | | | | एकूण रुपये - | २०,०२,९०५/- |

8/12/2020

(कान्हूराज बगाटे, भा.प्र.से)
मुख्य कार्यकारी अधिकारी
श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी

आरोग्य विभाग
दि.२३/११/२०२०

परिशिष्ट " ब "

आरोग्य विभागाकडील सन २०१७-२०१८ या वर्षाचे स्वच्छता साहित्य खरेदी, खर्च व शिल्लक बाबत माहिती खालील प्रमाणे-

| अ.नं. | साहित्याचे नांव | खरेदी प्रमाण | खर्च | विभागाकडील शिल्लक |
|---|---|---|---|---|
| ०१ | खराटे | ४००० नग | ३०५५ नग | ९४५ नग |
| ०२ | कुंचे | ४००० नग | ३०५० नग | ९५० नग |
| ०३ | सेंटेड फिनेल | ३००० लिटर | २५५४ लिटर | ४४६ लिटर |
| ०४ | लिक्वीड सोप | ३००० लिटर | २६९३ लिटर | ३०७ लिटर |
| ०५ | वॉश पावडर | ७०२० किलो | २२६० किलो | ४७६० किलो |
| ०६ | बी.एच.सी. पवाडर | ४००० किलो | २८३५ किलो | ११६५ किलो |
| ०७ | ब्लिचिंग पावडर | २००० किलो | १०५५ किलो | ९४५ किलो |
| ०८ | रबरी वायफर | ४०० नग | २३० नग | १७० नग |
| ०९ | नुआन किटकनाशक औषध | २५ लिटर | २३ लिटर | ०२ लिटर |
| १० | डस्ट पॅन | १०० नग | ९६ नग | ०४ नग |
| ११ | टॉयलेट /बेसीन क्लिनर | १००० लिटर | ५८२ लिटर | ४१८ लिटर |
| १२ | ऑल परपज क्लिनर | ५०० लिटर | ३६९ लिटर | १३१ लिटर |
| १३ | नायलॉन ब्रश (लांब दांडी ) | १५० नग | २२ नग | १२८ नग |
| १४ | टॉयलेट ब्रश (लहान) | १०० नग | ३७ नग | ६३ नग |
| १५ | रबरी मॅट (काळया रंगाची) | २०० नग | १५० नग | ५० नग |
| १६ | चोक रिमुव्हर | १०० नग | ८६ नग | १४ नग |

23/11
(प्रताप कोते)
प्र.अधिक्षक
(अतिरिक्त कार्यभार)
23/11

लेखाशाखा,
मा.तदर्थ समितीच्या सभेपुढील विषय

**विषयः- संस्थानमधील स्थायी कर्मचा-यांसाठी लागु करण्यात आलेल्या सवलतपात्र गृहकर्ज व्याज सवलत योजनेच्या अट क्र.१२ मध्ये सुधारणा करणेबाबत...**

टिपणीः-

प्रस्तावना- साधारणतः सन १९९६-९७ या काळात संस्थानकडे उपलब्ध असणा-या निवासस्थानांची संख्या खुपच कमी होती. तसेच संस्थानकडे निवासस्थाने बांधणेकामी पुरेशी जागाही उपलब्ध नसल्याकारणाने बाहेर गावावरुन संस्थानमध्ये नोकरीसाठी आलेल्या कर्मचा-यांची खुप हाल होत असत. तसेच कर्मचा-यांच्या संस्थान निवासस्थानासाठी (Staff Quarter) वाढत्या मागण्या लक्षात घेता, संस्थानमार्फत गृहकर्ज घेणा-या कर्मचा-यांना व्याजाच्या दरात सवलत दिल्यास कर्मचा-यांना घर मिळेल. तसेच कर्मचारी संस्थानकडे निवासस्थानची मागणीही करणार नाही, अशा स्वरुपाची संस्थान कायम कर्मचा-यांसाठी कल्याणकारी योजना तत्कालीन मा.अध्यक्ष तसेच मा.कार्यकारी आधिकारी यांनी प्रस्तावीत केली. तसेच गृहकर्ज व्याज सवलत योजनेत वेळोवेळी बदल करण्यात येऊन, संस्थान कर्मचाऱ्यांना वैयक्तिक गृहबांधणी कर्जाच्या व्याजातील संस्थानच्या अनुदानरुपी सहभागामध्ये ५० % पर्यंत वाढ *(व्याजाच्या रकमेत संस्थान हिस्सा ५० % व कर्मचारी हिस्सा ५०%)* करणेबाबतचा प्रस्ताव मान्य करण्यात आला. त्याअनुषंगाने संस्थानच्या कायम कर्मचा-यांनी हौसिंग सोसायटी अंतर्गत, तसेच वैयक्तीक गृहकर्ज योजनेअंतर्गत वेळोवेळी विविध बॅंकाकडून गृहकर्ज घेतलेले असुन, आजपर्यंत साधारणतः ४३० कर्मचा-यांनी या योजनेचा लाभ घेतलेला आहे.

त्याअनुषंगाने, दिनांक १४.११.२०१७ रोजी झालेल्या मा.व्यवस्थापन समितीचे सभेतील निर्णय क्र.९६७ अन्वये, संस्थान कर्मचा-यांसाठी सवलतपात्र गृहकर्जाच्या पुर्वीच्या नियम व अटीत बदल करुन सुधारीत नियम व अटींस मान्यता देण्यात आली. सुधारीत नियमावली पुढीलप्रमाणे -

१) या योजनेअंतर्गत राष्ट्रीयीकृत बॅंकेकडून घेतलेल्या कर्जासाठी वेळोवेळी लागु असलेल्या व्याजाच्या रक्कमेच्या ५०% रक्कम संस्थानकडून अनुदान म्हणून थेट बॅंकेला कर्मचा-याच्या मासिक हप्त्याच्या वसुलीसोबत आदा करण्यात येईल.
२) सदर कर्मचारी हा संस्थानचा कायम कर्मचारी असावा व त्याची सेवा ही किमान ५ वर्ष झालेली असावी.
३) गृहकर्जासाठी द्यावयाचा जामीनदार हा संस्थानचा कायम कर्मचारी असावा व त्याचीही सेवा ५ वर्ष पुर्ण झाली असली पाहिजे.
४) कर्जदाराकडुन गृहकर्जाची परतफेड झाली नाही तर त्याला संस्थानकडून देय असलेल्या रक्कमेतून वसूल करुन बॅंकेस भरण्यात येईल त्यातून परतफेड झाली नाही तर जामिनदाराकडून वसूल करण्यात येईल.
५) ज्या कर्मचा-याचे सध्या स्वतःचे नांवे घर नाही त्यालाच या योजनेचा लाभ घेता येईल.
६) ज्या कर्मचा-यांना गृहकर्ज व्याज सवलत योजनेचा लाभ घ्यायचा आहे त्यांचे स्वतःचे नांवावर (७/१२ उतारा) जागा असेल तरच त्याला व्याजाची सवलत देता येईल. इतरांकडून घेतलेले संमतीपत्र चालणार नाही.
७) संस्थान कर्मचा-यांस गृहकर्जावर व्याजाची सवलत ही त्याच्या पगाराच्या *(Pay in Pay Band+Grade pay+DA)* ४० पट किंवा जास्तीत जास्त रु.10 लाख यापैकी जी रक्कम कमी असेल ती रक्कम बॅंकेडून घेणेकामी हमी देण्यात येईल.
८) संपुर्ण सेवाकालावधीत एका कर्मचा-यास या योजनेचा एकदाच लाभ घेता येईल. पती व पत्नी दोघेही सेवेत असतील तर त्यापैकी एकालाच (विहीत मर्यादेतच) घरबांधणी /खरेदीकामी या योजनेचा लाभ घेता येईल.
९) गृहकर्ज व्याज सवलत योजना मंजुर करण्याकरीता घर/फ्लॅट अर्जदा-याच्या स्वतःच्या नावावर असणे आवश्यक राहिल व ते महाराष्ट्रात कोठेही असले तरी या योजनेचा लाभ घेता येईल.
१०)दि.१ मे, २००१ रोजी किंवा त्यानंतर दोनपेक्षा अधिक अपत्ये असणा-या अर्जदारास (दुस-या वेळेस जुळया अपत्यांचा अपवाद वगळता) या योजनेचा लाभ घेता येणार नाही.
११) गृहकर्ज व्याज सवलत योजना मंजुरीच्या आदेशाची त्याचप्रमाणे गृहकर्ज वसुली पुर्ण झाल्यानंतर सक्षम प्राधिका-याच्या प्रमाणपत्राच्या आधारे दोन्ही बाबींची नोंद सेवा पुस्तकात घेण्यात येईल.
१२) कर्मचारी/अधिका-याने संस्थानकडून गृहकर्ज व्याज सवलत योजनेचा लाभ घेतल्यानंतर मंजुरी दिनांकापासून ६ महिन्यात घराचे काम सुरु करणे आवश्यक आहे. कमाल १८ महिन्यात बांधकाम पुर्ण करणे आवश्यक राहिल. १८ महिने किंवा घराचे/फ्लॅटचे बांधकाम/ताबा मिळविण्याचा दिनांक यापैकी जे आगोदर घडेल त्या दिनांकापासून

संस्थानचे निवासस्थान खाली करुन द्यावे लागेल. अन्यथा संबंधीत कर्मचा-यावर पुढीलप्रमाणे दंडात्मक कारवाई करणेत येईल.

अ) जर कर्मचारी संस्थान निवासस्थानात राहत असेल तर संस्थान घराचे बाजार मुल्यानुसार भाडे वसुल करण्यात येईल.

आ) सदर कर्मचा-याने गृहकर्ज संदर्भातील अटी व शर्तीचे पालन न केल्यास किंवा त्यात कोणत्याही प्रकारची कसूर झाल्यास संस्थानने दिलेली व्याजाची सवलत प्रचलित व्याजदरापेक्षा २.७५ प्रतिशत जास्त दराने दंडनीय व्याजाची आकारणी करुन ती रक्कम त्याचे वेतनातून समान हप्त्यामध्ये वसूल करण्यात येईल.

१३) काही योग्य कारणामुळे घर बांधणीस विलंब झाल्यास/होत असल्यास सदर कारणे नमूद करुन घर बांधणीसाठी १८ महिन्यापेक्षा जास्त लागणा-या कालावधीस विशेष बाब म्हणून मुदतवाढ देणेबाबत निर्णय गृहकर्ज व्याज सवलती मंजुर करण्यास सक्षम कमिटिस राहिल. मात्र अशी वाढ करणे संस्थानवर बंधनकारक राहणार नाही.

१४) संपुर्ण गृहकर्जाची परतफेड होईपर्यंत घराची/फ्लॅटची मालमत्ता तारण ठेऊन त्यावर कर्ज उभारणी करता येणार नाही अथवा विक्री करता येणार नाही.

१५) संस्थान संमतीशिवाय गृहकर्ज बँकेकडून परस्पर घेतले असेल तर त्यांना व्याजाचीसवलत देण्यात येणार नाही. अशा प्रकरणात गृहकर्जाचा हप्ता वसूल करुन बँकेत भरणा करण्याचे बंधन संस्थानवर राहणार नाही.

१६) गृहकर्ज व्याज सवलतीचा लाभ घेतलेल्या अधिकारी/कर्मचा-याला सेवा समाप्तीपर्यंत संस्थानची संमती घेतल्या-शिवाय घर/सदनिकेची विक्री करता येणार नाही, किंवा अन्यप्रकारे मालमत्तेची विल्हेवाट लावता येणार नाही.

१७) गृहकर्जधारक अनधिकृत रजेवर राहिल्यास, अथवा इतर अन्य कोणत्याही कारणास्तव त्याच्या कर्तव्यापासून दूर राहिला तरीही गृहकर्जाच्या मासिक हप्ता बँकेस नियमित परतफेड करण्यास संबंधित कर्मचारी स्वतः जबाबदार राहील. कर्ज हप्ता भरणा केल्याचे चलन सादर केल्यानंतरच संस्थान स्वहिस्स्याची व्याजाची रक्कम भरणा करेल. विलंब आकारास कर्मचारी जबाबदार राहिल.

१८) गृहकर्ज व्याज सवलत योजना मंजुर झाल्याच्या दिनांकापासुन किमान १५ वर्ष किंवा सेवानिवृत्ती यापैकी जी घटना आगोदर घडेल त्या कालावधीपर्यंत संस्थानमध्ये सेवा करणे बंधनकारक राहिल. अगोदर राजीनामा दिल्यास किंवा सेवा सोडून गेल्यास, संस्थानने आदा केलेल्या व्याजाच्या रक्कमेची पुर्ण वसुली त्याचे रजा वेतन, ग्रॅच्युटीद्वारे मिळणा-या रक्कमेतून वसुल करण्याचा अधिकार संस्थानला राहील.

१९) या योजनेचा लाभ घेणारा कर्मचारी मयत झाल्यास त्याच्या वारसांना देय असलेल्या कुठल्याही रक्कमेतून त्यावेळेस शिल्लक असलेल्या कर्जाची एकुण (व्याजासह) रक्कम सदर गृहकर्ज पुरविणा-या बँकेस वर्ग करुन त्याचे कर्जखाती भरण्यात येईल.

२०) या योजनेअंतर्गत भाग घेणा-या कर्मचा-यांनी फक्त राष्ट्रीयीकृत बॅकेकडूनच गृहकर्ज घेण्याचा प्रस्ताव संस्थानकडे सादर करावा. इतर बँकां/संस्थेकडून घेतलेल्या गृहकर्जास संस्थान हमी देणार नाही.

२१) या योजनेअंतर्गत गृहकर्ज पुरविणा-या राष्ट्रीयीकृत बँकेस, तसेच संस्थानला आवश्यक असणा-या सर्व कागदपत्रांची पुर्तता करुन देण्याची जबाबदारी संबंधीत कर्मचा-याची राहिल.

२२) संबंधीत राष्ट्रीयीकृत बँकांच्या धोरणानुसार गृहकर्ज व्याजासाठी असणारा प्रचलीत व्याजदरानुसार गृहकर्जावरील व्याजाची सवलत परिगणित करण्यात येईल.

२३) गृहकर्ज व्याज सवलतीचा लाभ मिळविण्यासाठी कर्मचा-याला खालील कागदपत्रे संस्थानकडे सादर करावे लागतील.

१. अर्ज. २.प्रतिज्ञापत्र (१००रु.स्टॅम्पवर). ३. जामिनदाराचे संमतीपत्र. ४. संस्थान सेवेत पाच वर्षे सेवा झाल्याचा आस्थापनेचा दाखला. ५. स्वत:चे नांवे तसेच पत्नीच्या नांवे घर नसल्याचा नगरपंचायत/ग्रामपंचायतचा दाखला. ६. जर जुने वीट माती पत्र्याचे घर असेल तर ते मोडून त्याजागी नवीन घर बांधणेबाबतचे प्रतिज्ञापत्र. ७. स्वत:चे नांवे 7/12 चा उतारा. ८. प्लॅन (मुख्याधिकारी /ग्रामसेवकाची सही असलेला). ९. इस्टिमेट. १०. बांधकाम परवाना. ११. नवीन घर खरेदी करावयाचे असल्यास इसार पावती/साठेखताची प्रत. १२. रेशन कार्डची झेरॉक्स. १३. कर्मचारी सोसायटी निरंक दाखला १४. मागील महिन्याची पगारस्लीप.

२४) गृहकर्ज व्याज सवलत मंजुर करण्याचे अधिकार "गृहकर्ज व्याज सवलत योजना" समितीस राहतील व त्या समितीचे खालील सदस्य असतील.

१. मुख्य कार्यकारी अधिकारी, २. उपकार्यकारी अधिकारी, ३. मुख्य लेखाधिकारी, ४. सर्व प्रशासकीय अधिकारी.

उपरोक्त नियमावलीस शासनाची मान्यता मिळणेकामी, इकडील जा.क्र.एसएसएसटी/लेखा/२३०१/२०१८, दि.०९/०८/२०१८ अन्वये, शासनास पाठविण्यात आली होती. परंतु, शासनाने क्र.संकीर्ण-१०१८/१३७८/प्र.क्र.१५०/

का.१६, विधी व न्याय, मंत्रालय, मुंबई, दि-२७/११/२०१९ रोजीचे पत्रान्वये सदर योजनेस स्थगिती दिलेली आहे. त्यामुळे सदर पत्रास अनुसरुन नव्याने गृहकर्ज घेणा-या कर्मचा-यांची प्रकरणे स्थगित ठेवण्यात आलेली आहेत.

उपरोक्त निर्णय क्र.९६७ अन्वये, मान्यता मिळालेल्या सुधारीत नियमावलीतील अट क्र.१२ मध्ये संदिग्धता असल्याने, त्यामध्ये काही सुधारणा करणे गरजेचे आहे. काही कर्मचा-यांनी अहमदनगर, पुणे येथे फ्लॅट घेतलेला असून ते सेवानिवृत्तीनंतर त्यांच्या घराचा वापर करणार असून, त्यांनी सध्या संस्थान निवासस्थान मिळावे म्हणून अर्जाद्वारे मागणी केलेली आहे. तथापि, संस्थान नियमावलीतील अट क्र.१२ पुढीलप्रमाणे आहे.

**अट क्र.१२.** कर्मचारी /अधिका-याने संस्थानकडून गृहकर्ज व्याज सवलत योजनेचा लाभ घेतल्यानंतर मंजुरी दिनांकापासून ६ महिन्यात घराचे काम सुरु करणे आवश्यक आहे. कमाल १८ महिन्यात बांधकाम पुर्ण करणे आवश्यक राहिल. १८ महिने किंवा घराचे/फ्लॅटचे बांधकाम/ताबा मिळविण्याचा दिनांक यापैकी जे आगोदर घडेल त्या दिनांकापासून संस्थानचे निवासस्थान खाली करुन द्यावे लागेल. अन्यथा संबंधीत कर्मचा-यावर पुढीलप्रमाणे दंडात्मक कारवाई करणेत येईल.

अ) जर कर्मचारी संस्थान निवासस्थानात राहत असेल तर संस्थान घराचे बाजार मुल्यानुसार भाडे वसुल करण्यात येईल.

आ) सदर कर्मचा-याने गृहकर्ज संदर्भातील अटी व शर्तीचे पालन न केल्यास किंवा त्यात कोणत्याही प्रकारची कसूर झाल्यास संस्थानने दिलेली व्याजाची सवलत प्रचलित व्याजदरापेक्षा २.७५ प्रतिशत जास्त दराने दंडनीय व्याजाची आकारणी करुन ती रक्कम त्याचे वेतनातून समान हप्त्यामध्ये वसूल करण्यात येईल.

तथापि, सदर अटीमध्ये संदिग्धता असल्याने, प्रत्यक्षात कार्यवाही करतांना अडचणी येत आहेत, तसेच शासनाच्या नियमावलीत अशी तरतुद नसल्यामुळे, सदर अट ही शासनाच्या नियमात येत नाही. त्यामुळे उपरोक्त अट क्र.१२ मध्ये पुढीलप्रमाणे सुधारणा करणे गरजेचे आहे.

**सुधारीत अट क्र.१२.** कर्मचारी /अधिका-याने संस्थानकडून गृहकर्ज व्याज सवलत योजनेचा लाभ घेतल्यानंतर मंजुरी दिनांकापासून ६ महिन्यात घराचे काम सुरु करणे आवश्यक आहे. कमाल १८ महिन्यात बांधकाम पुर्ण करणे आवश्यक राहिल. १८ महिने किंवा घराचे/फ्लॅटचे बांधकाम/ताबा मिळविण्याचा दिनांक यापैकी जे आगोदर घडेल त्या दिनांकापासून संस्थानचे निवासस्थान खाली करुन द्यावे लागेल. अन्यथा संबंधीत कर्मचा-यावर पुढीलप्रमाणे दंडात्मक कारवाई करणेत येईल.

अ) जर कर्मचारी संस्थान निवासस्थानात राहत असेल तर संस्थान घराचे बाजार मुल्यानुसार भाडे वसुल करण्यात येईल.

आ) सदर कर्मचा-याने गृहकर्ज संदर्भातील अटी व शर्तीचे पालन न केल्यास किंवा त्यात कोणत्याही प्रकारची कसूर झाल्यास संस्थानने दिलेली व्याजाची सवलत प्रचलित व्याजदरापेक्षा २.७५ प्रतिशत जास्त दराने दंडनीय व्याजाची आकारणी करुन ती रक्कम त्याचे वेतनातून समान हप्त्यामध्ये वसूल करण्यात येईल.

तथापि, १५ किमी त्रिज्येच्या क्षेत्राबाहेर स्वमालकीचे घर/फ्लॅट बांधणारा/खरेदी करणार कर्मचारी वरील नमूद 'अ' व 'आ' नुसार कारवाईस पात्र असणार नाही. सदरची अट ही, सुधारीत नियमावली लागू होण्यापुर्वी जी नियमावली होती तीच्यामध्ये पण अंतर्भुत होती.

तरी गृहकर्ज व्याज सवलत योजनेच्या नियमावलीतील अट क्र.१२ मध्ये उपरोक्तप्रमाणे प्रस्तावित केल्यानुसार पुर्वलक्षी प्रभावाने सुधारणा करणेस, तसेच सदर योजना ही, यापुर्वी या योजनेत भाग घेतलेल्या संस्थानच्या स्थायी कर्मचा-यांना लागु करणेकरीता, सदरचा प्रस्ताव योग्य त्या निर्णयास्तव मा.तदर्थ समितीच्या सभेपुढे सविनय सादर.

22/07/21

(कान्हूराज बगाटे, भा.प्र.से.)
मुख्य कार्यकारी अधिकारी,
श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी.

विषय क्र.- 900

मा.तदर्थ समितीचे निर्णयार्थ
मालमत्ता विभाग



विषय - संस्थान निधीतून शिर्डी नगरपंचायत हद्दीतील प्रथम प्राधान्य गटातील एकुण ११ रस्त्यांपैकी एलएक्यु/एसआर/०७/२००७ या भूसंपादन प्रकरणात मा.उपविभागीय अधिकारी,श्रीरामपूर भाग,श्रीरामपूर यांनी घोषित केलेला अंतिम निवाडा दि.३१/०१/२०११ चे भूसंपादन प्रकरणी संबंधित जमीन मालक यांनी कलम १८ खाली कोर्टात दाखल केलेल्या भूसंदर्भ दाव्याच्या निकालाच्या आधारे वाढीव नुकसान भरपाईची रक्कम मुख्याधिकारी,शिर्डी नगरपंचायत,शिर्डी यांचेमार्फत मा.उपविभागीय अधिकारी,शिर्डी भाग,शिर्डी यांना अदा करणेबाबत मुख्याधिकारी, शिर्डी नगरपंचायत,शिर्डी यांचेकडील पत्र क्रं.न.प/टे-०८/९२१/२०२१ दि.२५/०५/२०२१.

टिपणी

**अधिनियमातील तरतूद**– श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,(शिर्डी) अधिनियम २००४ चे कलम २१ (२) अन्वये पोटकलम (१) आणि (१क) मध्ये निर्दिष्ट केलेल्या प्रयोजनांसाठी पुरेशा तरतुदी केल्यानंतर विश्वस्तव्यवस्थेच्या निधीत शिल्लक राहीली असल्यास अशा शिल्लक रकमेचा विश्वस्तव्यवस्थेच्या वितरणयोग्य उत्पन्नाच्या तीस टक्क्यांपेक्षा अधिक नसेल एवढा भाग, समितीस वेळोवेळी पुढील सर्व किंवा कोणत्याही प्रयोजनासाठी वापरता व खर्च करता येईल.

(दोन) स्थानिक नागरी सेवा व सुविधा यांच्यामध्ये सुधारणा व वाढ होण्यासाठी व परिणामी संस्थानच्या सोयींमध्ये वाढ होण्यासाठी शिर्डी नगरपंचायतीस सहाय्य करण्यासाठी,अशी तरतूद आहे.

**प्रस्तावना**:- शिर्डी शहरातील साईभक्तांना प्रामुख्याने उपयोग होईल अशी विकास कामे हाती घेवून पुर्ण करणेसाठी संस्थान व्यवस्थापन समिती शिर्डी नगरपंचायतीस नेहमी मदत करीत असते. शिर्डी नगरपंचायत हद्दीतील २५ रस्ते भूसंपादन व विकसित करणेकामी श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिर्डी, शिर्डी नगरपंचायत,शिर्डी व महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ यांचेमध्ये त्रिपक्षीय करार दि.१५/१०/२००६ रोजी झाला होता व त्यानुसार रस्ते विकसन व रस्ते भूसंपादन कामासाठी सर्व खर्च श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिर्डी यांनी करावा, असे ठरले. सदर करारानुसार महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ यांचेमार्फत ०५ रस्ते विकसनाचे काम सन २०१२ मध्ये पुर्ण झालेले आहे. उर्वरीत ०६ रस्ते संस्थानमार्फत विकसित करणेत आलेले असल्याने सध्या फक्त शिर्डी नगरपंचायत,शिर्डी व श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिर्डी यांचे दरम्यान करारानुसार कार्यवाही चालू आहे.

उक्त करारात ठरलेनुसार शिर्डी नगरपंचायतमार्फत प्रथम प्राधान्य गटातील ११ रस्त्यापैकी भूसंपादनाची आवश्यकता असलेल्या ०९ रस्त्यांचे भूसंपादन करणे,सेवा वाहिन्या स्थलांतरीत करणे,अतिक्रमणे हटविणे इ.कामे करणेत आलेली आहेत व महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ आणि श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिर्डी यांचेमार्फत रस्ते विकसनाचे काम करण्यात आले.

प्रस्तुत ११ रस्त्यांपैकी शिर्डी मंजूर विकास योजनेतील नगर–मनमाड रस्ता (लक्ष्मीनगर जवळून जाणारा रस्ता ) सर्वे क्रं.९ पर्यंत १८.० मीटर रुंदीच्या रस्त्याच्या प्रयोजनासाठी मौजे शिर्डी,ता.राहाता येथील जमीनीचे एलएक्यु/एसआर.नं/०७/२००७ या भूसंपादन प्रकरणान्वये तत्कालीन मा.उपविभागीय अधिकारी,श्रीरामपूर भाग,श्रीरामपूर तथा भूसंपादन अधिकारी यांनी दि.३१/०१/२०११ अन्वये अंतिम निवाडा घोषित करुन भूसंपादन केले आहे. सदर निवाडयामध्ये समाविष्ट असलेल्या खालील जमीन मालकांनी मा.उपविभागीय अधिकारी,श्रीरामपूर भाग,श्रीरामपूर यांनी एलएक्यु/एसआर/०७/२००७ या भूसंपादन प्रकरणात अंतिम निवाडयान्वये मंजूर केलेल्या रकमा मान्य नसलेने भूसंदर्भ दावे प्रथमत: मा.दिवाणी न्यायाधीश,वरिष्ठ स्तर,कोपरगांव यांचेकडेस दाखल केले होते. परंतु मा.जिल्हा न्यायालय,अहमदनगर यांचेकडील आदेश क्रं.TW3828/19 अन्वये खालील तक्त्यात नमुद असलेले सर्व भूसंदर्भ दावे मे.दिवाणी न्यायालय,वरिष्ठ स्तर,राहाता यांचेकडेस वर्ग केले आहेत. त्यानुसार संबंधित दाव्यामध्ये मे.कोर्टाने आदेश पारित केलेले आहेत. त्याचा सविस्तर तपशिल खालीलप्रमाणे आहे.

**परिशिष्ट अ**

| अ.क्र. | जमीन मालकाचे नांव | संपादित स.नं. | संपादित क्षेत्र चौमी. | मा.दिवाणी न्यायालयाचे नांव | मा.न्यायालयाकडील एल.आर.ए नं. | मे.दिवाणी न्यायाधीश,वरिष्ट स्तर,राहाता यांनी भूसंदर्भ दाव्यात पारित केलेले आदेश दिनांक |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | मदनबाई मोहनलाल लोढा व इ ४ | ६/८४ | ४५०.०० | मे.दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर, राहाता | ३२/२०१२ | ०५/०३/२०२१ |
| २ | निवृत्ती शामराव शिंदे | ४/८० | ६५०.०० | मे.दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर, राहाता | ३३/२०१२ | ३०/०१/२०२१ |
| ३ | मिनाबेन रविंद्र वेद | ४/२९ | ५१५.०० | मे.दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर, राहाता | ३४/२०१२ | २७/०१/२०२१ |
| ४ | निता टुर्सॲण्ड ट्रॅव्हल्स करिता | ५/३ | ३२१.०० | मे.दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर, राहाता | ३५/२०१२ | २७/०१/२०२१ |

| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ |
|---|---|---|---|---|---|---|
| ५ | विशाल कांतीलाल जैन | ५/२४ ५/२५ | ५०.०० | मे.दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर, राहाता | ३६/२०१२ | २८/०१/२०२१ |
| ६ | चंपालाल झुंबरलाल लोढा | ६/१०० | २३६.५ | मे.दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर, राहाता | ३७/२०१२ | २८/०१/२०२१ |
| ७ | चांदमल झुंबरलाल लोढा | ६/९९ | २२०.०० | मे.दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर, राहाता | ३८/२०१२ | २९/०१/२०२१ |
| ८ | विशाल कांतीलाल जैन | ५/२३/१ | १४१०.०० | मे.दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर, राहाता | ३९/२०१२ | २९/०१/२०२१ |

उक्त तक्त्यातील रकाना नं. ०२ मध्ये नमुद विविध जमीन मालकांचे एल.आर.ए (भूसंदर्भ दाव्यात) रकाना नं.०७ मध्ये नमुद दिनांकाना वाढीव नुकसान भरपाईची रक्कम संबंधितांना अदा करणेबाबत मे.दिवाणी न्यायाधीश,वरिष्ठ स्तर,राहाता यांनी आदेश निर्गमीत केलेले आहेत. सदर आदेशाप्रमाणे वाढीव नुकसान भरपाईची रक्कम मुख्याधिकारी,शिर्डी नगरपंचायत,शिर्डी यांनी मा.उपविभागीय अधिकारी,शिर्डी भाग,शिर्डी तथा भूसंपादन अधिकारी यांचेकडून दि.३१/०५/२०२१ अखेर परिगणीत करुन निश्चित करुन घेतली आहे. त्याचा सविस्तर तपशिल खालीलप्रमाणे आहे.

**परिशिष्ट ब**

| अ.क्र. | जमीन मालकाचे नांव | मा.दिवाणी न्यायालयाकडील एल.आर.ए.नं. | मा.दिवाणी न्यायाधीश,वरिष्ठ स्तर,राहाता यांचेकडील आदेशाच्या अधिन राहून मा.उपविभागीय अधिकारी, शिर्डी भाग,शिर्डी, तथा भूसंपादन अधिकारी यांनी दि.३१/०५/२०२१ अखेर परिगणीत करुन निश्चित करुन दिलेली एकुण रक्कम रु (संबंधितांना प्रत्यक्ष अदा करावयाची रक्कम) |
|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ |
| १ | मदनबाई मोहनलाल लोढा व इ ४ | ३२/२०१२ | १०,२६,०९०/- |
| २ | निवृत्ती शामराव शिंदे | ३३/२०१२ | २४,६५,३२९/- |
| ३ | मिनाबेन रविंद्र वेद | ३४/२०१२ | १७,४५,८६५/- |
| ४ | निता टुर्सॲण्ड ट्रॅव्हल्स करिता | ३५/२०१२ | ९,६३,०८४/- |
| ५ | विशाल कांतीलाल जैन | ३६/२०१२ | १,५०,०१३/- |
| ६ | चंपालाल झुंबरलाल लोढा | ३७/२०१२ | ७,०९,५६२/- |
| ७ | चांदमल झुंबरलाल लोढा | ३८/२०१२ | ६,६०,०५८/- |
| ८ | विशाल कांतीलाल जैन | ३९/२०१२ | ५८,६६,३३३/- |
| | | **एकुण रक्कम रु** | **१,३५,८६,३३६/-** |

उक्त **परिशिष्ट ब** मधील तक्त्यातील रकाना नं.०४ मध्ये नमुद केलेली रक्कम ही मे.दिवाणी न्यायाधीश,वरिष्ठ स्तर,राहाता यांनी पारित केलेल्या आदेशाच्या अधिन राहून मुख्याधिकारी,शिर्डी नगरपंचायत,शिर्डी यांनी मा.उपविभागीय अधिकारी,शिर्डी भाग शिर्डी तथा भूसंपादन अधिकारी यांचेकडून परिगणित करुन घेतली असून त्याबाबतचा निवाडा मा.उपविभागीय अधिकारी,शिर्डी भाग शिर्डी यांनी त्यांचेकडील आदेश क्रं.का.वि/भूस/६/१३६/२०२१, दि.०७/०४/२०२१ अन्वये घोषित केला आहे. उक्त भूसंदर्भ दाव्यात एकुण रक्कम **रु.१,३५,८६,३३६/- (रु.एक कोटी पस्तीस लाख शहाऐंशी हजार तीनशे छत्तीस मात्र)** इतकी शिर्डी नगरपंचायत मार्फत उपविभागीय अधिकारी,शिर्डी भाग,शिर्डी यांचेकडेस जमा करणे आवश्यक आहे. सदर रक्कम मे.कोर्टाचे आदेशानुसार अर्जदारांना मुदतीत अदा न केल्यास १५% व्याज सुरु राहील व देय रकमेमध्ये मोठ्या प्रमाणात वाढ होण्याची शक्यता नाकारता येत नाही. उपरोक्त ०८ भुसंदर्भ दाव्यांमध्ये संस्थानला प्रतिवादीपणात सामील करण्यात आलेले नाही. तथापि त्रिपक्षीय करारनाम्यानुसार वाढीव नुकसान भरपाई देणे संस्थानवर बंधनकारक आहे.

**विभागाचा अभिप्राय:-** दि.१५/१०/२००६ रोजी महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ,शिर्डी नगरपंचायत शिर्डी, व श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिर्डी यांचेत झालेल्या त्रिपक्षीय करारानुसार २५ रस्ते विकसन व भूसंपादनाकामी आवश्यक असणारा निधी श्री साईबाबा संस्थान विश्वस्व्यवस्था,शिर्डी यांनी उपलब्ध करुन द्यावा,असे ठरले आहे. उक्त ०८ भूसंदर्भ दाव्यात संस्थानला प्रतिवादीपणात सामिल केलेले नाही परंतु त्रिपक्षीय करारनाम्यानुसार संस्थानला उपरोक्त ०८ भूसंदर्भ दाव्यात वाढीव नुकसान भरपाईची रक्कम संबंधितांना अदा करणे संस्थानला बंधनकारक आहे. सदर करारनाम्यानुसार तसेच मा.दिवाणी न्यायाधीश,वरिष्ठ स्तर, राहाता यांनी दि.३१/०१/२०२१ रोजी वाढीव नुकसान भरपाईची रक्कम संबंधितांना अदा करणेबाबत दिलेला आदेश विचारात घेवून उक्त प्रस्तावात नमुद केलेली दि.३१/०५/२०२१ अखेर होणारी व्याजासह नुकसान भरपाईची वाढीव रक्कम

**रु.१,३५,८६,३३६/- (रु.एक कोटी पस्तीस लाख शहाऐंशी हजार तीनशे छत्तीस मात्र)** इतकी संबंधितांना अदा करणेकामी मुख्याधिकारी,शिर्डी नगरपंचायत,शिर्डी यांचेमार्फत उपविभागीय अधिकारी,शिर्डी भाग,शिर्डी यांना अदा करता येतील.

तथापि शिर्डी विकास योजनेतील रस्त्यासाठी भुसंपादन निवाडयामध्ये घोषित केलेली नुकसान भरपाईची रक्कम मान्य नसल्याने भुसंपादन कायदा १८९४ चे कलम १८ खाली मा.न्यायालयाच्या निर्णयानुसार वाढीव नुकसान भरपाईची रक्कम संबंधीत जमीन मालक श्री.दिपक गोपाळराव गांधी व इतर ४ यांना अदा करणेसंदर्भात संस्थानचे मा.तदर्थ समितीचे दि.१९/१२/२०२० रोजीच्या सभेपुढे विषय क्रं.३६ निर्णयार्थ सादर करणेत आला होता. या प्रस्तावावर सविस्तर चर्चा होवून निर्णय क्रं.५७१ नुसार सदर निर्णयाचे बाबतीत २x२ अशी समसमान मत विभागणी झाल्याने मा.उच्च न्यायालय,मुंबई,खंडपीठ,औरंगाबाद यांचेकडे सिव्हील ॲप्लिकेशन दाखल करुन निर्णयासाठी प्रस्तावित करण्यात यावे,असे ठरले. त्यानुसार मा.उच्च न्यायालय,मुंबई,खंडपीठ, औरंगाबाद येथे सिव्हील ॲप्लिकेशन दाखल करणेकामी संस्थानचे मालमत्ता विभागाकडील दि.१७/०२/२०२१ रोजीच्या पत्रान्वये संस्थानचे विधी विभागास कळविणेत आलेले आहे. त्यानुसार कार्यवाही चालू आहे.

**प्रस्ताव -** संस्थान निधीतून शिर्डी नगरपंचायत हद्दीतील प्रथम प्राधान्य गटातील एकुण ११ रस्त्यांपैकी एलएक्यु/एसआर/०७/ २००७ या भूसंपादन प्रकरणात मा.उपविभागीय अधिकारी,श्रीरामपूर भाग,श्रीरामपूर यांनी घोषित केलेला अंतिम निवाडा दि.३१/०१/२०११ चे भूसंपादन प्रकरणी संबंधित जमीन मालक यांनी कलम १८ खाली कोर्टात दाखल केलेल्या ०८ भूसंदर्भ दाव्याच्या निकालाच्या आधारे वाढीव नुकसान भरपाईची रक्कम रु.१,३५,८६,३३६/- इतकी मुख्याधिकारी,शिर्डी नगरपंचायत शिर्डी यांचेमार्फत मा.उपविभागीय अधिकारी,शिर्डी भाग,शिर्डी यांना अदा करणेच्या निर्णयार्थ सादर.

22/07/21

(कान्हूराज बगाटे,भा.प्र.से)
मुख्य कार्यकारी अधिकारी,
श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी

विषय क्र.- ९०९

मा.तदर्थ समितीचे निर्णयार्थ

मालमत्ता विभाग



विषय – शिर्डी विकास योजना पालखी रस्ता ९.० मी. रुंदीकरण संबंधीत भुसंपादन एलएक्युएसआर नं.२१/२००३ दि.२५/११/२००३ यामध्ये मा.दिवाणी न्यायाधीश,वरिष्ठ स्तर,राहाता यांचे कोर्टात लॅण्ड रेफरन्स नं.(भुसंपादन निर्देश अर्ज) ४/२००४ व ५/२००४ मध्ये वाढीव नुकसान भरपाईची रक्कम अदा करणेबाबत.

टिपणी -

**अधिनियमातील तरतुद** – श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,(शिर्डी) अधिनियम २००४ चे कलम २१(२) अन्वये पोटकलम (१) आणि (१क) मध्ये निर्दिष्ट केलेल्या प्रयोजनासाठी पुरेशा तरतुदी केल्यानंतर विश्वस्तव्यवस्थेच्या निधीत शिल्लक राहीली असल्यास अशा शिल्लक रकमेचा विश्वस्तव्यवस्थेच्या वितरणयोग्य उत्पन्नाच्या तीस टक्क्यापेक्षा अधिक नसेल एवढा भाग समितीस वेळोवेळी पुढील सर्व किंवा कोणत्याही प्रयोजनांसाठी वापरता व खर्च येईल.

(दोन) स्थानिक नागरी सेवा व सुविधा यांच्यामध्ये सुधारणा व वाढ होण्यासाठी व परिणामी संस्थानच्या सोयीमध्ये वाढ होण्यासाठी शिर्डी नगरपंचायतीस सहाय्य करण्यासाठी,अशी तरतुद आहे.

**प्रस्तावना -**

**प्रकरणाची पुर्वपिठीका-** शिर्डी विकास योजनेतील ९.० मीटर पालखी रस्ता रुंदीकरण या प्रयोजनासाठी भुसंपादन निवाडा मा.उपविभागीय अधिकारी,श्रीरामपूर भाग,श्रीरामपूर यांनी एलएक्युएसआर नं.२१/२००३ दि.२५/११/२००३ अन्वये घोषित करण्यात आलेला आहे. सदर निवाडयातील संपादित केलेल्या मिळकतीचे ताबे दि.०८/०५/२००४ रोजी घेण्यात आलेले आहेत.

शिर्डी विकास योजनेतील ९.० मीटर पालखी रस्ता रुंदीकरणासाठी मौजे शिर्डी येथील मुळ जमीन मालक संपत धोंडीराम पारख यांचे मालकीचे नगर भूमापन क्रं.७६ मधील २६ चौमी. इतके क्षेत्र रस्त्यासाठी संपादीत झाले असून संपादीत क्षेत्राचा निवाडा क्रं.२१/२००३ दि.२५/११/२००३ रोजी भूसंपादन अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी, श्रीरामपूर भाग,श्रीरामपूर यांनी घोषित केलेला आहे. प्रस्तुत निवाडयात घोषित केलेली नुकसान भरपाईची रक्कम मान्य नसलेने मुळ जमीन मालक यांचे कायदेशीर वारस संदिप संपत पारख व इतर २ आणि शिवचंद धोंडीराम पारख यांनी कलम १८ खाली मा.दिवाणी न्यायाधीश,वरिष्ठ स्तर,राहाता यांचे न्यायालयात लॅण्ड रेफरन्स नं.०४/२००४ दाखल केला होता.

तसेच मौजे शिर्डी येथील जमीन मालक रमेश पदाजी कोते यांचे मालकीचे नगर भूमापन क्रं.२८४ मधील क्षेत्र २१.७५ चौ.मीटर इतके क्षेत्र पालखी रस्त्यासाठी संपादन करण्यात आलेले आहे. सदर क्षेत्राचा निवाडा क्रं.२१/२००३ दि.२५/११/२००३ रोजी भूसंपादन अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी,श्रीरामपूर भाग,श्रीरामपूर यांनी घोषित केलेला आहे. प्रस्तुत निवाडयात घोषित केलेली नुकसान भरपाईची रक्कम मान्य नसलेने मुळ जमीन मालक रमेश पदाजी कोते यांनी वाढीव नुकसान भरपाईसाठी कलम १८ खाली मा.दिवाणी दिवाणी न्यायाधीश वरिष्ठ स्तर,राहाता यांचे न्यायालयात लॅण्ड रेफरन्स नं.०५/२००४ दाखल केला होता.

संबंधीत जमीन मालक यांनी संपादित जमीनीचा वाढीव मोबदला मिळणेकामी भुसंपादन कायदा १८९४ चे कलम १८ प्रमाणे दाखल केलेल्या लॅण्ड रेफरन्स नं.४/२००४ व ५/२००४ मध्ये मा.दिवाणी न्यायाधीश,वरिष्ठ स्तर, राहाता यांचे न्यायालयात उक्त दावे दाखल केलेले होते. सदर दाव्यांचा अंतिम निर्णय मा.न्यायालयाने दि.०५/०३/२०२१ रोजी पारित केलेले आहेत. उक्त दोन्हीही भुसंदर्भ न्यायालयाने मंजूर केलेले आहेत.

मा.न्यायालयाच्या निर्णयाप्रमाणे वाढीव नुकसान भरपाईची रक्कम संबंधीत जमीन मालक यांना अदा करणेसाठी मुख्याधिकारी,शिर्डी नगरपंचायत,शिर्डी यांनी त्यांचेकडील पत्र जा.नं.नंप/टे-०८/९२१/२०२१ दि.२५/०५/२०२१ अन्वये इकडेस कळविले की, शिर्डी विकास योजनेतील पालखी रस्ता रुंदीकरण एलएक्युएसआर/२१/२००३ निवाडा घोषित दि.२५/११/२००३ निवाडयाच्या अनुषंगाने लॅण्ड रेफरन्स नं.४/२००४ श्री.संदिप संपत पारख व इतर आणि लॅण्ड रेफरन्स नं.५/२००४ श्री.रमेश पदाजी कोते यांनी मे.कोर्टात भुसंदर्भ दाखल केलेले होते. सदर दाव्यामध्ये मा.न्यायालय,वरिष्ठ स्तर, राहाता यांनी अंतिम निर्णय पारित करुन वाढीव नुकसान भरपाईच्या रकमा वादी/अर्जदार यांना अदा करण्याबाबत आदेश केलेले आहेत. त्याप्रमाणे मा.उपविभागीय अधिकारी,शिर्डी भाग,शिर्डी यांनी भुसंपादन कायदा १८९४ चे कलम २८ नुसार त्यांचेकडील आदेश क्रं.का.वि.भुस/६/१३६/२०२१ दि.०७/०४/२०२१ नुसार संबंधीत जमीन मालक यांना अदा करावयाच्या वाढीव नुकसान भरपाईच्या रकमा परिगणीत करुन दिलेल्या आहेत. त्याप्रमाणे निधी उपलब्ध होणेबाबत नगरपंचायत,शिर्डी यांनी कळविले आहे.

मुख्याधिकारी,शिर्डी नगरपंचायत शिर्डी यांचे दि.२५/०५/२०२१ च्या पत्रासोबत निधी उपलब्ध करुन देण्यासाठी सादर केलेल्या मा.उपविभागीय अधिकारी,शिर्डी भाग,शिर्डी यांचे दि.०७/०४/२०२१ च्या कलम २८ खाली निर्गत केलेल्या आदेशाचे अवलोकन केले असता लॅण्ड रेफरन्स नं.४/२००४ संपत धोंडीराम पारख (मयत) तर्फे वारस संदिप संपत पारख व इतर मध्ये कोर्टाचे आदेश दि.०५/०३/२०२१ प्रमाणे मा.उपविभागीय अधिकारी,शिर्डी भाग,शिर्डी यांनी दि.३१/०५/२०२१ अखेर वाढीव नुकसान भरपाई व्याजासह परिगणीत करुन रक्कम रु.१,७९,२६८/- कळविली आहे. तसेच लॅण्ड रेफरन्स नं.५/२००४ मध्ये वाढीव नुकसान भरपाईची व्याजासह नुकसान भरपाई रक्कम परिगणीत करुन रक्कम रु.१,९१,८८४/- कळविली आहे. दोन्हीही रकमा मिळून एकुण एकंदर रु.३,७१,१५२/-(अक्षरी रु.तीन लाख एकाहत्तर हजार एकशे बावन्न मात्र) जमा करणेबाबत मुख्याधिकारी,

277/2021

 427

शिर्डी नगरपंचायत,शिर्डी यांचेमार्फत मा.उपविभागीय अधिकारी,शिर्डी भाग,शिर्डी यांचेकडेस जमा करणेबाबत संदर्भीय पत्रान्वये कळविलेले आहे.

मुख्याधिकारी,शिर्डी नगरपंचायत,शिर्डी यांनी त्यांचे दि.२५/०४/२०२१ च्या पत्रान्वये वाढीव नुकसान भरपाईची रक्कम रु.३,७१,१५२/- ही दि.३१/०५/२०२१ पर्यंत या दिनांकावर आधारीत व्याजासह मा.उपविभागीय अधिकारी, शिर्डी भाग,शिर्डी यांनी परिगणीत करुन दिलेली आहे. याबाबतचा प्रस्ताव निर्णयार्थ मा.तदर्थ समितीसमोर सादर करणे आवश्यक आहे. या प्रक्रियेस कालावधी लागणार असल्याने हा कालावधी माहे जुलै २०२१ अखेर अपेक्षित धरल्यास माहे जुन व जुलै २०२१ या दोन महिन्यांचे व्याज संबंधीतांना अदा करावे लागेल. दोन महिन्याचे १५% प्रमाणे व्याज परिगणीत करुन लॅण्ड रेफरन्स नं.४/२००४ मध्ये रु.१,८०,५५७/- इतके व लॅण्ड रेफरन्स नं.५/२००४ मध्ये रु.१,९३,२६४/- असे दोन्हीही लॅण्ड रेफरन्सचा व्याजासह वाढीव मोबदला एकुण रक्कम रु.३,७३,८२१/- होत आहे.

एलएक्युएसआर नं.२१/२००३ निवाडा घोषित दि.२५/११/२००३ चे अनुषंगाने लॅण्ड रेफरन्स नं.२/२००४ भिकचंद कचरदास संकलेचा यांचा वाढीव नुकसान भरपाई मिळणेबाबत भुसंपादन कायदा १८९४ चे कलम १८ खाली दाखल होता. त्याचा दि.१६/०३/२०२० रोजी मे.दिवाणी न्यायाधीश,वरिष्ठ स्तर,राहाता यांनी आदेश पारीत केलेला आहे. त्याप्रमाणे उक्त भुसंपादन एलएक्युएसआर २१/२००३ या निवाडयामध्ये संस्थानने भुसंपादन अधिकारी यांचेकडेस रक्कम रु.१,३७,४६,११२/- इतकी जमा केलेली असून त्यापैकी रक्कम रु.१,२८,६१,६७२/- इतकी खर्च झालेली असून माहे डिसेंबर २०२० अखेर रक्कम रु.८,८४,४४०/- इतकी भुसंपादन अधिकारी यांचे PLA Account (स्विय प्रबंजी लेखा) या खात्यात जमा असल्याने लॅण्ड रेफरन्स नं.२/२००४ श्री.भिकचंद कचरदास संकलेचा यांचे प्रकरणात मे.कोर्टाचे आदेशाप्रमाणे मा.उपविभागीय अधिकारी,शिर्डी भाग,शिर्डी यांनी वाढीव नुकसान भरपाई मोबदला परिगणीत करुन येणारी रक्कम रु.२,११,८२३/- इतकी भुसंपादन अधिकारी यांचे PLA Account (स्विय प्रबंजी लेखा) खात्यात जमा असलेल्या रक्कम रु.८,८४,४४०/- या रकमेतून समायोजित करता येईल असेबाबतचा प्रस्ताव मा.तदर्थ समितीचे सभेपुढे मान्यतेसाठी तथा निर्णयार्थ दि.०७/१२/२०२० रोजीचे सभेपुढे सादर करण्यात आला होता. त्याप्रमाणे दि.१९/१२/२०२० रोजीचे सभेतील विषय नं.३५ निर्णय क्रं.५७० प्रमाणे संबंधीत लॅण्ड रेफरन्स नं.२/२००४ मध्ये भुसंपादन अधिकारी यांचे PLA Account (स्विय प्रबंजी लेखा) खात्यावर एलएक्युएसआर नं.२१/२००३ या निवाडयाची जमा रक्कम रु.८,८४,४४०/- जमा रकमेतून मा.न्यायालयाचे आदेशाप्रमाणे वाढीव मोबदला रक्कम रु.२,११,८२३/- समायोजित करता येईल, असेबाबत निर्णय झालेला आहे. त्याप्रमाणे कार्यवाही देखील झालेली आहे.

**विभागाचा अभिप्राय** - एलएक्युएसआर २१/२००३ च्या निवाडयात मंजूर केलेली रक्कम मान्य नसलेने भुसंपादन कायदा १८९४ चे कलम १८ नुसार दाखल भुसंपादन निर्देशन अर्ज क्रं.४/२००४ संपत धोंडीराम पारख (मयत) तर्फे वारस संदिप संपत पारख व इतर यांची जुलै २०२१ अखेर व्याजासह रक्कम परिगणीत करुन त्यांना देय असलेला वाढीव मोबदला रक्कम रु.१,८०,५५७/- व लॅण्ड रेफरन्स नं.५/२००४ रमेश पदाजी कोते यांना जुलै २०२१ अखेर व्याजासह परिगणीत करुन आलेली रक्कम रु.१,९३,२६४/- या दोन्हीही लॅण्ड रेफरन्सची माहे जुलै २०२१ अखेर व्याजासह एकूण देय रक्कम रु.३,७३,८२१/- इतकी होत असून भुसंपादन अधिकारी यांचे PLA Account (स्विय प्रबंजी लेखा) खात्यात निवाडा क्रं.२१/२००३ मध्ये माहे मार्च २०२१ अखेर जमा असलेली रक्कम रु.६,९२,५५६/- या रकमेतून उक्त दोन्ही भूसंदर्भाची माहे जुलै २०२१ अखेर परिगणना करुन येत असलेली रक्कम रु.३,७३,८२१/- समायोजित करता येईल व तसे मुख्याधिकारी,शिर्डी नगरपंचायत,शिर्डी व भुसंपादन अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी,शिर्डी भाग,शिर्डी यांना कळविता येईल.

**प्रस्ताव** - मा.तदर्थ समितीचे सभेतील विषय नं.३५ निर्णय क्रं.५७० चे अनुषंगाने एलएक्युएसआर २१/२००३ च्या निवाडयात मंजूर केलेली रक्कम मान्य नसलेने भुसंपादन कायदा १८९४ चे कलम १८ नुसार दाखल भुसंपादन निर्देशन अर्ज क्रं.४/२००४ संपत धोंडीराम पारख (मयत) तर्फे वारस संदिप संपत पारख व इतर यांची जुलै २०२१ अखेर व्याजासह रक्कम परिगणीत करुन त्यांना देय असलेला वाढीव मोबदला रक्कम रु.१,८०,५५७/- व लॅण्ड रेफरन्स नं.५/२००४ रमेश पदाजी कोते यांना जुलै २०२१ अखेर व्याजासह परिगणीत करुन आलेली रक्कम रु.१,९३,२६४/- या दोन्हीही लॅण्ड रेफरन्सची माहे जुलै २०२१ अखेर व्याजासह एकूण देय रक्कम रु.३,७३,८२१/- इतकी होत असून भुसंपादन अधिकारी यांचे PLA Account (स्विय प्रबंजी लेखा) खात्यात निवाडा क्रं.२१/२००३ मध्ये माहे मार्च २०२१ अखेर जमा असलेली रक्कम रु.६,९२,५५६/- या रकमेतून उक्त दोन्ही भूसंदर्भाची माहे जुलै २०२१ अखेर परिगणना करुन येत असलेली रक्कम रु.३,७३,८२१/- समायोजित करणेच्या व तसे मुख्याधिकारी,शिर्डी नगरपंचायत,शिर्डी व भुसंपादन अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी,शिर्डी भाग,शिर्डी यांना कळविणेच्या निर्णयार्थ सादर.

20/07/21

(कान्हूराज बगाटे,भा.प्र.से.)
मुख्य कार्यकारी अधिकारी,
श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिर्डी

विषय क्र.- ९०२



## मा.तदर्थ (Ad-hoc) समितीचे सभेपुढील विषय
## रुग्णालये विभाग

**विषय :- रुग्णालये विभागात वार्षीक औषध खरेदीमध्ये खरेदी व्यवस्थापक यांच्या अनियमित व आक्षेपार्ह कामकाजाची विभागीय चौकशी होणेबाबत...**

टिपणी :-

श्री साईनाथ रुग्णालय व साईबाबा सुपर स्पेशालिटी हॉस्पीटल या दोन्ही रुग्णालयांसाठी आवश्यक असणारी औषधे, स्टेशनरी व इतर खरेदी करण्याची जबाबदारी खरेदी व्यवस्थापक, रुग्णालये विभाग यांची आहे. रुग्णालयामध्ये रुग्णांना सर्व वॉर्ड, ओटी, सब स्टोअर, लॅब, ब्लड बॅंक या सर्व ठिकाणी मोठया प्रमाणावर औषध साठयाची उपलब्धता नसल्याची बाब निदर्शनास आली. रुग्णालये खरेदी विभागामार्फत मध्यवर्ती औषध भांडारात औषध साठा टंचाई असलेबाबत संशय निर्माण झाला.

त्यास अनुसरुन जा.क्र.एसएसएस/वशी-मुकाअ/१८८५ दि.०९.०१.२०२१ अन्वये औषध खरेदीबाबत तपासणी समिती गठीत करण्यात आली होती. तपासणी कार्यवाही चालू असतांनाच खरेदी व्यवस्थापक सदर कार्यालयीन तपासणीस सशयास्पदरितीने सामोरे जात असल्याचे निदर्शनास आले. कागदपत्रे उपलब्ध करुन देण्यास टाळाटाळ करु लागले. अंतिमतः तर तपासणी पथकातील एका सदस्यावर तपासणीकरीता आक्षेप घेण्याचे पत्रसुद्धा त्यांनी दिले. तपासणीकरीता आवश्यक असलेले मध्यवर्ती औषध भांडाराचे रेकॉर्ड व खरेदी विभागाचे रेकॉर्ड या दोन्हींवर त्यांचे नियंत्रण असल्याचे तपासणी समितीचे निदर्शनास आले. सदर तपासणी समितीचा अहवाल व खरेदी विभाग व मध्यवर्ती औषध भांडार तसेच सर्व वॉर्ड, ओटी, सब स्टोअर, लॅब यांची मागणीपत्रे यावरुन संस्थान मध्यवर्ती औषध भांडारात मोठया प्रमाणावर औषध साठा टंचाई असलेबाबत निदर्शनास आले. संस्थान प्रशासन गोर-गरीब रुग्णांकरीता मोफत व सवलतीच्या दरात औषधे उपलब्ध करुन देण्याकरीता वार्षीक रु.५० ते ६० कोटीची खर्च तरतुद मंजुर करते. तथापि, प्रत्यक्षात यापैकी साधारणतः २० ते ३० टक्केच खरेदी व मोठया प्रमाणावर अखर्चित रक्कम शिल्लक राहते व स्टोअरमध्ये पुरेसा साठा न ठेवल्याने रुग्णालयात गोर-गरीब रुग्णांची गैरसोय होते, त्यांना बाहेरील खाजगी औषध दुकानांमधून महागडया दराने औषधे खरेदी करावी लागतात. सामान्यतः जीवनरक्षक बाब असल्याने सदर खर्च पुढे ढकलताही येत नाही व टाळताही येत नाही व गोर-गरीब रुग्णांची मोठी कोंडी होते, असे दि.२०.०२.२०२१ रोजीच्या प्राथमिक तपासणी अहवालावरुन दिसून आले आहे.

**खरेदी व्यवस्थापक यांना वेळोवेळी दिलेल्या कारणे दाखवा नोटीसा व खुलासे** :-

१) सदर बाबत दि.२५.०२.२०२१ रोजीचे दैनिक सकाळ वृत्तपत्रात, दि.२७.०२.२०२१ रोजीचे दैनिक लोकमंथन व इतर स्थानिक वृत्तपत्रांमध्ये औषध खरेदी संदर्भात टिकात्मक बातमी प्रसिद्ध झाली. या संबंधीत खरेदी व्यवस्थापक श्री.कुणाल आभाळे यांना जा.क्र.एसएसएस/एसएसबीएच/६४ दि.०५.०३.२०२१ अन्वये **खुलासा मागविण्यात आला होता**. तसेच दि.२७.०२.२०२१ रोजी लोकमंथन, अहमदनगर आवृत्तीमध्ये खरेदी व्यवस्थापक यांचेबरोबर काही माहिती अधिकार कार्यकर्ते व पुर्वी मेडीकल रिप्रेझेंटेटीव्ह म्हणून एकाच कंपनीत काम करत असल्याचे व संस्थानचे खरेदी विभागामध्ये खरेदी व्यवस्थापक म्हणून कार्यरत राहीला. त्यातून खाजगी दुकानांची विक्री वाढवत राहीला, अशी बातमी प्रसिद्ध झाली. संस्थान रुग्णालयामध्ये कृत्रिम औषधटंचाई निर्माण करुन बाहेरील औषध दुकानांचा मोठया प्रमाणावर खप वाढवून अवैध आर्थिक व्यवहार होत असलेबाबत संशयास पुष्टी मिळून खरा असलेबाबत शक्यता निर्माण झाली..

२) जा.नं.एसएसएस/एसएसबीएच/एचआर/१४३ दि.१२.०२.२०२१ अन्वये, विनापरवानगी गैरहजर राहत असलेबाबत खुलासा नोटीस देण्यात आली आहे.

३) जा.नं.एसएसएस/एसएसबीएच/एचआर/१६५ दि.१९.०६.२०२१ अन्वये, तक्रारदार श्री.दिगंबर हरीभाऊ कोते यांनी तक्रार अर्ज केला आहे. त्याबाबत खुलासा नोटीस देण्यात आली आहे.

४) जा.नं.एसएसएस/एसएसबीएच/एचआर/२०९ दि.०७.०७.२०२१ अन्वये, श्री साईबाबा हॉस्पीटल येथे खरेदी व्यवस्थापक म्हणून कार्यरत असतांना कर्तव्यात केलेला कसुर व शंकास्पद कामकाज व झालेल्या अनियमितता याबाबत खुलासा नोटीस देण्यात आली आहे – त्याकरीता ०७ दिवस कालावधी देण्यात आला होता. तथापि, दि.०९.०७.२०२१ रोजी त्यांनी ६० दिवसांची मुदत

मिळणेबाबत मागणी केली. जा.नं.एसएसएस/एसएसबीएच/एचआर/२३६ दि.१४.०७.२०२१ अन्वये खुलासा करणेकामी आणखी ०७ दिवस मुदतवाढ देण्यात आली. सदर मुदतवाढ पत्रावर श्री.आभाळे यांनी *"मी दि.१३.०४.२०२१ रोजी खुलाशाकामी मागणी केलेले सर्व कागदपत्र मिळालेनंतर ७ ते १० दिवसांचे आत खुलासा देण्यासाठी आवश्यक ते प्रयत्न करेल तरी सर्व कागदपत्रे मिळावी"* असा शेरा देऊन मुदतवाढ पत्र घेतले आहे - दि.२१.०७.२०२१ पर्यंत – अद्याप खुलासा प्राप्त नाही. तसेच त्यांना कागदपत्रे स्वतः पाहण्यास मुभा दिलेली आहे.

५) जा.नं.एसएसएस/वशी-मुकाअ/७२१/२०२१ दि.१३.०७.२०२१ अन्वये, "सन २०२०-२१ खरेदी आदेशात सुमारे ७६६ औषधे व सर्जिकल साहित्य यांचा साठा शिल्लक नसतांना वार्षीक खरेदी आदेशामध्ये पहिल्या टप्प्यात त्यांची मागणी केली नसलेबाबत" बाबत ०७ दिवसांचे आत कारणे दाखवा नोटीस. अद्याप खुलासा प्राप्त नाही.

६) जा.नं.एसएसएस/एसएसबीएच/एचआर/२५३ दि.१७.०७.२०२१ अन्वये, "खरेदी व्यवस्थापक म्हणून कार्यरत असतांना २०१५-१६ ते २०२०-२१ कालावधीत ३११० औषधांचा साठा निरंक असतांना खरेदी आदेशामध्ये पहिल्या टप्प्यात औषधे मागविली नाही" बाबत ०७ दिवसांचे आत कारणे दाखवा नोटीस. अद्याप खुलासा प्राप्त नाही.

खरेदी व्यवस्थापक यांनी दि.२९.०४.२०२१ रोजी खुलासा सादर केला असून त्यांनी सादर केलेला खुलासा असमाधानकारक आहे.

अशाप्रकारे खरेदी व्यवस्थापक श्री.कुणाल बबनराव आभाळे यांना अनियमित कामकाजाबाबत ०७ कारणे दाखवा नोटीसा दिल्या असून पैकी त्यांनी एक नोटीसचा खुलासा केला असुन उर्वरीत नोटीसांचा खुलासा केलेला नाही. बाबत, सर्व अनुषंगीक दप्तराची मागणी केली असून त्यानंतर ०७ ते १० दिवसांत खुलासा देण्यासाठी आवश्यक ते प्रयत्न करणार असलेबाबत त्यांनी मुदतवाढ पत्रावर हस्ताक्षरात लिहुन दिले आहे. यावरुन त्यांना देण्यात आलेल्या ०७ नोटीसांपैकी एका नोटीसचा खुलासा केला आहे, तोही असमाधानकारक असून उर्वरीत ०६ नोटीसांचा त्यांनी खुलासा केला नसून ते स्पष्टीकरणात्मक खुलासा देण्यास टाळाटाळ करण्याचे दिसत आहे.

सदर खरेदी व्यवस्थापक श्री.कुणाल बबनराव आभाळे यांची शैक्षणिक पात्रता व कामाचा अनुभव इ. नसतांनाही त्यांची नियुक्ती झालेबाबत मा.उच्च न्यायालय औरंगाबाद खंडपीठात जनहीत याचिका क्र.३१३३९/२०१६ दि.०६.१०.२०१६ दाखल झाली होती. मा.व्य.स. निर्णय क्र.६६१/दि.१९.०९.२०१६ अन्वये एका उप वैद्यकीय संचालकास जनहीत याचिका औरंगाबाद खंडपीठात दाखल असल्याने खंडपीठाचा आदेश होईपावेतो त्यांना कायम करण्यास तूर्त निर्णय घेता येणार नाही व सदरहू प्रस्ताव पुढील सभेमध्ये फेर सादर करावा असा ठराव झाला होता. ठीक अशाच प्रकारची जनहीत याचिका या खरेदी व्यवस्थापक यांचे विरुद्ध **दि.०६.१०.२०१६** रोजी मा.उच्च न्यायालय औरंगाबाद खंडपीठात दाखल असतांना खरेदी व्यवस्थापकाला संस्थान सेवेत कायम करण्यात आले.

शासननियुक्त वैधानिक लेखापरिक्षणात खरेदी व्यवस्थापक यांच्या नियुक्ती संबंधीत शैक्षणिक पात्रता व अनुभव यावर आक्षेपही नोंदविण्यात आलेला आहे. बाबत, वैधानिक लेखापरिक्षक यांना सदर आक्षेपाबाबत संस्थानमार्फत पुनःश्च पत्रव्यवहार करुन विचारणा करण्यात आली होती. तथापि, त्यानंतरही शासननियुक्त वैधानिक लेखापरिक्षकांनी त्यांचा आक्षेप कायम ठेवल्याचा पत्रव्यवहार दिसून आला आहे. अशाप्रकारे या खरेदी व्यवस्थापकाची वादग्रस्त नियुक्ती, त्यांचे नियुक्तीबाबत मा.उच्च न्यायालय औरंगाबाद खंडपीठात दाखल असलेली जनहीत याचिका, शासननियुक्त वैधानिक लेखापरिक्षक यांचा खरेदी व्यवस्थापक यांचे नियुक्तीवर असलेला आक्षेप, यासह सध्या या खरेदी व्यवस्थापकाचे संशयास्पद व अनियमित कामकाज, औषध भांडारात आवश्यक औषध साठा उपलब्ध करुन देण्याऐवजी बाहेरील खाजगी औषध दुकानांचा खप वाढविण्याचे व गोर-गरीब रुग्णांना वेठीस धरणे अशा अनेक अवैध बाबी समोर येत आहे.

तसेच खरेदी व्यवस्थापकांना देण्यात आलेल्या कारणे दाखवा नोटीसा व नोटीसांना करण्यात आलेला खुलासा व त्या खुलाशास अनुसरुन माहिती अधिकार कार्यकर्ते अखर्चित उत्पन्न, संस्थानला त्यावर भरावा लागलेला आयकर इ. तथापि, हा आरोप इतर विभागांवर न करता फक्त औषध खरेदीबाबतच कसे? अशाप्रकारचे वेठीस धरण्याची माहिती अधिकारातील त्यांची पत्रे, मा. शासनास ते करत असलेले पत्रव्यवहार यावरुन सदर खरेदी व्यवस्थापक श्री.कुणाल बबनराव आभाळे यांचे माहिती अधिकार कार्यकर्ते यांचेशी संबंध

असल्याचेही दिसून येते व त्याप्रमाणे ते संस्थानमध्ये औषध खरेदी व्यवहार करत असलेबाबत व संस्थानमध्ये असलेल्या दस्तऐवजांवरुन संशस्पाद व अनियमित असलेबाबत दिसून येत आहे.

तरी यापुढे खरेदी व्यवस्थापक श्री.कुणाल बबनराव आभाळे यांचेमार्फत होत असलेले अनियमित कामकाज व रुग्णांची त्यामुळे होणारी गैरसोय थांबण्यासाठी त्यांची विभागीय चौकशी प्रस्तावित करण्यात येत आहे. दि.०९.०१.२०२१ रोजी गठीत करण्यात आलेल्या तपासणी समितीने दि.२०.०२.२०२१ रोजी प्राथमिक तपासणी अहवाल सादर केला आहे. त्यासंबंधीत कारणे दाखवा नोटीसांचा खुलासा केलेला नाही. त्याव्यतिरिक्त त्यांना देण्यात आलेल्या कारणे दाखवा नोटीसांचा त्यांनी खुलासा केलेला नाही. त्याकरीता कागदपत्रांची मागणी केली असून त्यानंतर ते खुलासा देण्याचा प्रयत्न करणार असलेबाबतचा त्यांचा पावित्रा या सर्वांचा विचार करता त्यांची विभागीय चौकशी प्रस्तावित करण्यात येत असून खरेदी विभागातील कागदपत्रे, मध्यवर्ती औषध भांडारातील कागदपत्रे या सर्वांचे अवलोकन करता व त्यांना देण्यात आलेल्या कारणे दाखवा नोटीसा यावरुन खरेदी व्यवस्थापक यांचेवर खालीलप्रमाणे गंभीर आरोप आहेत :-

१) तपासणीकरीता गठीत करण्यात आलेल्या समितीच्या प्राथमिक तपासणी अहवालामध्ये औषध भांडारात औषध/साहित्य साठा नोंदीकरीता वापरण्यात येणा-या संगणक प्रणालीमध्ये साठा नमुना तपासणी केली असता साधारणतः ४१७ ते ११३८ दिवसांपर्यंत औषध भांडारात औषध साठा शिल्लक नसल्याचे व तो उपलब्ध करुन दिला नसल्याचे निदर्शनास आले आहे.

२) रुग्णालयातील सर्व वॉर्ड, ओटी, सब स्टोअर, लॅब इ. सर्व विभागांच्या मागणीपत्रांची नमुना पद्धतीने तपासणी केली असता एकुण ५५१ मागणीपत्रांपैकी ५०० मागणीपत्रांची औषध साठा शिल्लक नसल्याने त्या मागणीपत्रांची पुर्णपणे पर्तता झालेली नसल्याचे दिसुन आले आहे.

३) रुग्णालयातील गोर-गरीब रुग्णांना डॉक्टरांनी सुचविलेली औषधे ही बाब जीवनरक्षक असल्याने व कोणत्याही परिस्थतीत त्याला पर्याय नसल्याने गोर-गरीब रुग्णांची कोंडी झाली व त्यांना सदर औषधे बाहेरील खाजगी औषध दुकानांमधून महागडया दराने खरेदी करावी लागली.

४) गठीत करण्यात आलेल्या तपासणी समितीच्या प्राथमिक तपासणी अहवालात वर्षनिहाय अंदाजपत्रकीय तरतुद व वर्षनिहाय प्रत्यक्ष खरेदी करण्यात आलेली औषधे/सर्जिकल साहित्य व आवश्यकता असूनही औषधे खरेदी न केल्याने शिल्लक राहीलेली अखर्चित रक्कम नमुद केली आहे, ती खालीलप्रमाणे :-

| आर्थिक वर्ष | मंजुर अंदाजपत्रकीय तरतुद रु. | प्रत्यक्ष खरेदी खर्च रु. | अखर्चित रक्कम रु. |
|---|---|---|---|
| २०१५-१६ | ५५,००,००,००० | १९,६८,००,००० | ३५,३२,००,००० |
| २०१६-१७ | ६०,००,००,००० | १६,३७,००,००० | ४३,६३,००,००० |
| २०१७-१८ | ५५,००,००,००० | १८,३२,००,००० | ३६,६८,००,००० |
| २०१८-१९ | ६०,००,००,००० | २१,७५,००,००० | ३८,२५,००,००० |
| २०१९-२० | ५०,००,००,००० | २१,१५,००,००० | २८,८५,००,००० |
| २०२०-२१ | ४०,००,००,००० | ५,४०,४७,००० | ३४,५९,५३,००० |
| एकुण :- | ३२०,००,००,००० | १०२,६७,४७,००० | २१७,३२,५३,००० |

यावरुन संस्थान प्रशासन गोर-गरीब रुग्णांना जीवनरक्षक औषधांकरीता खर्च मंजुर करत आहे. तथापि, खरेदी व्यवस्थापकाच्या संशयीत कारभारामुळे गोर-गरीब रुग्णांची गैरसोय होऊन त्यांना सदर सेवेपासून वंचित ठवले जात आहे, असे दिसते.

५) वार्षीक अंदाजपत्रकीय तरतुद असतांना व सर्व वॉर्ड, ओटी, सब स्टोअर यांची मागणी असतांना मागील ०६ वर्षांमध्ये साधारणतः रु.२१७ कोटी रक्कम अखर्चित राहीली आहे. रुग्णांना बाहेरील औषध दुकानांमधुन महागडया दराने औषधे खरेदी करावी लागली आहेत कारण मागणीपत्रांची औषध भांडार पुर्तताच करु शकलेले नाही.

६) संस्थानला आयकर कायद्यामध्ये शिल्लक अखर्चित रकमेवर आयकर आकारणीची तरतुद आहे. रुग्णांना औषधे व साहित्य या जीवनरक्षक बाबींची गरज असतांना औषध खरेदी झालेली नाही. त्यामुळे अखर्चित उत्पन्नाचा विनियोग झालेला नाही. इतर बाबींशी तुलना करता इतर खर्च जीवनरक्षक बाबीत येत नाही त्यामुळे इतर प्रशासकीय पुर्तता झाल्यानंतर खर्च केला जातो. तथापि, औषध खरेदीकरीता करण्यात आलेली खर्चाची तरतुद अकार्यक्षम खरेदी धोरणामुळे शिल्लक राहीली आहे.

७) वार्षीक खरेदी आदेशातील अटी-शर्तीस अनुसरुन खरेदी व्यवस्थापकाने औषधे, सर्जिकल साहित्य खरेदी करणे आवश्यक होते तथापि, खरेदी व्यवस्थापक यांनी त्याचे पालन केले नाही.

८) खरेदी विभागातील आकडेवारीवरुन असे निदर्शनास येते की, L1 (Lowest 1) यांना खरेदी आदेश देण्यात आले. त्यांनी पुरवठा वेळेत केला नाही. त्यामुळे L2 (Lowest 2) यांचेकडुन खरेदी केल्याचे निदर्शनास आले आहे. त्यामुळे काही कालावधीकरीता रुग्णालयातील रुग्णांना औषध साठा उपलब्ध झाला नाही. या कालावधीत रुग्णांची गैरसोय होऊन बाहेरील खाजगी औषध दुकानांमधुन महागडया दराने औषधे खरेदी करावी लागली.

| आर्थिक वर्ष | L2 कडून खरेदी |
|---|---|
| २०१५-१६ | ८६,१८,४५१ |
| २०१७-१८ | ६८,००,६५० |
| २०१८-१९ | ८१,६०,५५९ |

L1 ला पुरवठा आदेश देण्यात येऊन L2 कडून खरेदी करण्यात आली आहे. सदर बाब सातत्याने वर्षानुवर्षे केल्याचे निदर्शनास येते. यावरुन सर्रास अशाप्रकारे अनियमित काम झाले आहे. L1 ने पुरवठा केला नाही म्हणून त्यांचेवर शिस्तभंग व दंडात्मक कार्यवाही खरेदी नियमावलीप्रमाणे केलेली दिसत नाही.

९) सन २०१५ ते जुलै २०१८ पर्यंत खरेदी संदर्भात पुरवठादारांना देण्यात आलेले ई-मेल संगणक प्रणालीतून डीलिट करण्यात आलेले आहेत, याचा खुलासा व कारणीमीमांसा होत नाही. सदर ई-मेल हे खरेदी व्यवस्थापक यांनी दिलेले असूनही सदरचा मुलभूत डाटा मिळत नाही अथवा डीलीट होण्याची/करण्याची कारणीमीमांसा कळून येत नाही. त्याबाबतचा खुलासा त्यांनी केलेला नाही.

१०) औषध खरेदी प्रक्रिया ही नियमितपणे राबवून रुग्णालयाला आवश्यक औषधे खरेदी करण्याची जबाबदारी खरेदी व्यवस्थापकाची असते. तथापि, सदर प्रक्रिया जाणीवपूर्वक वर्षानुवर्षे रेंगाळत ठेवण्यात येऊन वर्षनिहाय खरेदी झालेली नाही. प्रशासकीय पुर्तता करुन खरेदी कार्यपद्धती राबविण्यात खरेदी व्यवस्थापक यांनी टाळाटाळ केल्याचे मागील वर्षांच्या निविदा कार्यपद्धतीवरुन दिसते.

११) निविदा कार्यपद्धती असूनही असे निदर्शनास येते की, काही ठराविक पुरवठाधारकच निविदा कार्यपद्धतीमध्ये भाग घेतात व वर्षानुवर्षे त्यांचेकडुन खरेदी झाल्याचे दिसुन येते. यावरुन औषध खरेदी बाबत खुल्या बाजारपेठेत सर्वांना आवाहन करुन जास्तीत जास्त पुरवठाधारकांना निविदा पद्धतीमध्ये भाग घेण्याकरीता प्रवृत्त केलेले नाही. वर्षानुवर्षे विशिष्ठ पुरवठाधारकच पुरवठा आदेश घेत असल्याचे दिसुन येते.

१२) निविदा कार्यपद्धती वेळेत न राबविणे, वरिष्ठांकडे वेळेत प्रस्ताव सादर न करणे त्यामुळे वर्षनिहाय निविदा कार्यपद्धती अवलंबलेली नाही, असे दिसते.

१३) डॉक्टरांनी पुढील वर्षाकरीता कळविलेल्या संभाव्य औषध मागणी व्यतिरिक्त औषधांची मागणी केल्यास सदर बाब वैद्यकीय संचालकांच्या निदर्शनास आणून देऊन त्यावर नियंत्रण ठेवणे व आवश्यकतेप्रमाणे वार्षीक अंदाजपत्रकीय तरतुद याचा वापर करणे आवश्यक होते. तथापि, खरेदी व्यवस्थापक यांनी त्यांच्या कर्तव्यात कसुर केला आहे.

१४) सन २०२०-२१ करीता देण्यात आलेल्या खरेदी आदेशांमध्ये एकुण १५८ L-1 पुरवठादारांना खरेदी आदेश देण्यात आले. तथापि, औषधांचा पुरवठा होत नसल्याने पुरवठादारांची आढावा बैठक घेतली.

त्यामध्ये असे निदर्शनास आले की, ९६३ औषधे/साहित्य आपण पहिल्या टप्प्यामध्ये मागविलेले नाही. औषध भांडारात सदर औषधांचा साठा तपासणी केली असता ७६६ औषधांचा शुन्य साठा असल्याचे निदर्शनास आले. खरेदी व्यवस्थापक यांचेमार्फत रुग्णालयात वार्षीक खरेदी कार्यपद्धती अवलंबण्यात आली होती. तथापि, औषधांचा साठा शिल्लक नसतांनासुद्धा खरेदी व्यवस्थापक यांनी पुरवठादारांकडुन पहिल्या टप्प्यात औषधे मागविलेली नाहीत.

१५) अशाप्रकारे मागील वर्षांचा आढावा घेतला असता असे निदर्शनास आले की, वार्षीक खरेदी कार्यपद्धती अवलंबून देखील खरेदी आदेश देतांना मात्र खरेदी व्यवस्थापक साधारणतः एकुण ३१९० औषधे/साहित्य पहिल्या टप्प्यात मागविली नाहीत.

| अ.नं. | आर्थिक वर्ष | एकुण पुरवठाधारक | खरेदीचे आदेशाचेवेळी औषध साठा निरंक नग संख्या |
|---|---|---|---|
| १ | २०१५-१६ | १३१ पुरवठाधारक | ८४८ औषधांचा निरंक मागणी |
| २ | २०१७-१८ | १०२ पुरवठाधारक<br>५२८ कोटेशनधारक | १०९६ औषधांचा निरंक मागणी |
| ३ | २०१८-१९ | २१० पुरवठाधारक | ४८० औषधांचा निरंक मागणी |
| ४ | २०२०-२१ | १५८ पुरवठाधारक | ७६६ औषधांचा निरंक मागणी |

अशाप्रकारे संस्थान प्रशासन रुग्णालयात गोर-गरीब रुग्णांना औषधे उपलब्ध करुन देण्याकरीता वार्षीक साधारणतः रु.५५ ते ६० कोटी रककम मंजुर करते. तथापि, खरेदी व्यवस्थापक यांचेकडून वार्षीक साधारणतः रु.२१ कोटीं पर्यंतच खरेदी केली जाते व कृत्रीम औषध टंचाई निर्माण केली गेली असे वॉर्ड, ओटी, इतर विभागांच्या मागणीपत्रांची औषध भांडाराकडून पुर्तता झाली नाही या आकडेवारीवरुन रुग्णालयाबाहेरील औषध दुकानांचा खप वाढविण्याच्या उद्देशाने औषध खरेदीचे कामकाज खरेदी विभागाकडून झाल्याची गंभीर बाब समोर आलेली आहे. औषधे/सर्जिकल साहित्य इत्यादी खरेदीबाबत अनियमित व आक्षेपार्ह कामकाजाबाबत :-

अ) खरेदी व्यवस्थापक श्री.कुणाल बबनराव आभाळे यांची सखोल विभागीय चौकशी करणे.

ब) चौकशी कामकाजात खरेदी व्यवस्थापक यांचा दबाव खरेदी विभाग व भांडार विभागातील कर्मचारी/अधिकारी व संभाव्य साक्षीदार यांच्यावर दबाव येणार नाही यादृष्टीने विभागीय चौकशी कालावधीत त्यांना सेवा निलंबित करणे.

उपरोक्त "अ" व "ब" कार्यपद्धतीस अनुक्रमे मान्यता मिळणेकामी सदरचा प्रस्ताव मा.तदर्थ (Ad-hoc) समितीचे सभेपुढे चक्रीय पद्धतीने निर्णयार्थ सादर.

२२/०७/२१

(कान्हूराज बगाटे, भा.प्र.से.)
**मुख्य कार्यकारी अधिकारी**
श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी

विषय क्र.- १०३

मा. व्यवस्थापनसमितीचेसभेपुढेनिर्णयार्थसादर

विभाग – श्री साईबाबा हॉस्पिटल, शिर्डी

**विषयः- श्री साईबाबा हॉस्पिटल व श्री साईनाथ रक्तपेढीमध्ये जुन २०२१ महिन्यात वैद्यकिय बिलात देण्यात आलेली सवलत रक्कम रु.२६,४४,९२५/- ची नोंद घेऊन खर्चास मान्यता मिळणेबाबत..**

टिपणी,

श्री साईबाबा हॉस्पिटलमध्ये गरीब व गरजु रुग्णांना वैद्यकिय बिलात सवलत देण्या संबंधित मा.व्य.स.निर्णय क्र.५१९/दि.२४.०७.२०११ संमत झाला आहे. वैद्यकिय बिलात सवलत देण्याचे अधिकार उप.वै.संचालक/वै.संचालक यांना देण्यात आलेले आहेत त्यांचे गैर हजेरीत वै.प्रशासक/जनसंपर्क अधिकारी यांना अधिकार सुपुर्त करण्यात येऊन रुग्णांना मासिक वैद्यकिय बिलात सवलत देण्यात येते.

मा.उच्च न्यायालय यांचे रिट पिटीशन (पी.आय.एल) नं.३१३२/मधील दि.१७/०८/२००६ अन्वये समाजातील गरीब रुग्णांना वैद्यकिय बिलामध्ये सवलत देण्यासाठी योजना (स्किम) केलेली आहे. त्यामध्ये सुध्दा गरीब व गरजु (इंडिजेंट) रुग्णांसाठी १० % खाटा पूर्ण सवलतीच्या दरात व दुर्बल घटकातील १० % खाटा ५०% सवलतीच्या दरात राखीव ठेवुन बिल आकारणी करण्यास सूचविले आहे. त्याचप्रमाणे सोशल वर्कर हे रुग्णांची आर्थिक परिस्थीती जाणून घेतात व आवश्यक कागदपत्रांसह सवलत मंजुरी करीता प्रस्तावीत करतात.अशा प्रकारे हॉस्पिटलमध्ये वैद्यकिय बिलात सवलत देण्याकरीता स्वतंत्र विभाग कार्यरत आहे. निर्णय क्र.५६४/२६.०६.२०१४ अन्वये प्रत्येक महिन्यात देण्यात आलेल्या वैद्यकिय सवलतीस मा.कार्यकारी अधिकारी यांची मान्यता घेण्यात येऊन आर्थिक वर्षाच्या शेवटी एकत्रित अहवाल मा.व्य.स.चे सभे समोर नोंद घेण्यासाठी सादर करण्यात यावा असे ठरले आहे. माहे सप्टेंबर २०१७ मध्ये देण्यात आलेल्या वैद्यकिय सवलतीस मान्यतेचे प्रस्तावावर मा. मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी दर महा मा.व्य.समिती सभेसमोर सादर करण्यास शेरा दिला आहे. त्याप्रमाणे माहे **जुन २०२१** मध्ये श्री साईबाबा हॉस्पिटलला ओपीडी रुग्ण **५,३१० व ४४६** आयपीडी रुग्णांपैकी **१,०८२** ओपीडी व **१५८** आयपीडी रुग्णांना वैद्यकिय बिलात एकुण **रु.२५,०९,८२५/-** इतकी सवलत देण्यात आली व श्री साईनाथ रक्तपेढीमध्ये गरीब व गरजु रुग्णांना वैद्यकीय बिलात सवलत देण्या संबंधीत मा.व्य.स.निर्णय क्रं.३४६/दि.१८-१९.०८.२००१ संमत झाला आहे, जा.नं.एसएसएस/एसएसएच/३३१/२०१७ दि.३०.०३.२०१७ आदेश. दि.०६.०३.२०१० ची सिकल सेल आजाराच्या रुग्णांना मोफत रक्त देणेबाबत टिपणी प्रमाणे एकुण **१४२** रुणाना **रु.१,३५,१००/-** इतकी मोफत/सवलत देण्यात आली आहे. सवलत/मोफतचे विवरण खालील प्रमाणे-

**(अ) श्री साईबाबा हॉस्पिटल**

| अ.नं. | रुग्णांची गटवारी | लाभार्थी संख्या | एकुण बिल रक्कम | बिलापोटी मिळालेली रक्कम | बिलात दिलेली सवलत |
|---|---|---|---|---|---|
| १ | गरीब/दारिद्रय रेषेखालील रुग्णांना दिलेली सवलत रक्कम | ५९ | ३,८०,६६३/- | - | ३,८०,६६३/- |
| २ | आर्थिक दृष्टया दुर्बल घटकातील रुग्णांना दिलेली सवलत रक्कम | ६७ | २,५१,४३६/- | १,०६,३९९/- | १,४५,०३७/- |
| ३ | सकृत दर्शनी गरीब रुग्णांना दिलेली सवलत रक्कम | ६ | २७,८४८/- | ६,१००/- | २१,७४८/- |
| ४ | कुत्रा, साप, माकड चावलेले रुग्ण, साई भक्त, साध्वी कन्या कुमारी, आश्रम, डायलेसिस, हिमोफिलीया, शालेय पोशन आरोग्ययोजना इ. | ३३५ | ११,२०,९०५/- | ५,९७,७६३/- | ५,२३,१४२/- |
| ५ | महात्मा फुले आरोग्या योजना आरोग्य योजना आयपीडी रुग्णांना दिलेली सवलत | ९९ | ६१,७४,९८९/- | ५३,९६,२६४/- | ७,७८,७२५/- |
| ६ | महात्मा फुले आरोग्या योजना ओपीडी रुग्णांना दिलेली सवलत | ६७४ | ६,६०,५१०/- | - | ६,६०,५१०/- |
| | एकुण | १,२४० | ८६,१६,३५१/- | ६१,०६,५२६/- | २५,०९,८२५/- |

SSH-MEETING-273-2021.



(ब) श्री साईनाथ रक्तपेढी

| अ.नं. | रुग्णांची गटवारी | लाभार्थी संख्या | एकुण बिल रक्कम | बिलापोटी मिळालेली रक्कम | बिलात दिलेली सवलत |
|---|---|---|---|---|---|
| १ | थॅलॅसिमिया | ४० | ५१,२००/- | - | ५१,२००/- |
| २ | हिमोफिलीया | ० | - | - | - |
| ३ | सिकल सेल ॲनेमीया फ्रि | ० | - | - | - |
| ४ | ऑदर ब्लड डिसऑर्डर | ३ | ४,८००/- | | ४,८००/- |
| ५ | फ्रि डन बाय एमएडी/एमएस | २ | ३,४००/- | - | ३,४००/- |
| ६ | व्हॉलंटरीब्लड डोनेशन फ्रि | ४७ | ४,८००/- | - | ४,८००/- |
| ७ | महात्मा फुले आरोग्या योजना | ३ | ४,०००/- | - | ४,०००/- |
| ८ | संस्थान एम्प्लॉयी फ्रि | १ | १,२००/- | - | १,२००/- |
| ९ | कॉन्ट्रक्ट एम्प्लॉयी फ्रि | १ | ६००/- | - | ६००/- |
| १० | श्री साईनाथ हॉस्पिटल फ्रि | ४५ | ६५,१००/- | - | ६५,१००/- |
| | **एकुण** | १४२ | **१,३५,१००/-** | - | **१,३५,१००/-** |
| | **एकुण अ+ब** | **१,३८२** | **८७,५१,४५१/-** | **६१,०६,५२६/-** | **२६,४४,९२५/-** |

**प्रस्ताव-** उपरोक्त प्रमाणे श्री साईबाबा हॉस्पिटल व श्री साईनाथ रक्तपेढीमध्ये **जुन २०२१** मध्ये वैद्यकिय बिलात सोशल वर्कर विभागामार्फत विहित पध्दतीने देण्यात आलेली सवलत रक्कम **रु.२६,४४,९२५/-** (एकुण सवलत अक्षरी रुपये सव्हीस लाख चौव्वेचाळीस हजार नऊशे पंचवीस मात्र) ची नोंद घेऊन दिलेल्या सवलतीस मान्यतेसाठी सदरचा प्रस्ताव मा.तदर्थ (Ad-Hoc) समितीचे सभेसमोर निर्णयास्तव सादर.

16/7/21

(कान्हूराज बगाटे ,भा.प्र.से)
**मुख्यकार्यकारी अधिकारी**
श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिर्डी

विषय क्र.- १०४



# मा. तदर्थ (Ad-hoc) समिती सभेपुढील विषय
## बांधकाम विभाग

विषय:- मंदिर परिसरातील श्री गुरुस्थान मंदिराचे नतूनीकरणकरणेसाठी मान्यता मिळणेबाबत...

टिपणी -

**श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी अधिनियम २००४ मधील तरतुद :-**

१) अधिनियमाचे कलम २१ (१) अन्वये समितीकडून विश्वस्तव्यवस्था निधीचा विनियोग पुढील सर्व किंवा त्यापैकी कोणत्याही प्रयोजनांसाठी करणेबाबत तरतुद आहे. त्यातील पोटकलम कलम २१ (क) अन्वये मंदिराची व विश्वस्तव्यवस्थेच्या मालमत्तांची देखभाल, व्यवस्थापन व प्रशासन या प्रयोजनांसाठी करण्यात येईल अशी तरतुद आहे.

२) अधिनियमाचे कलम १४ पोटकलम (२) च्या खंड (ख) अन्वये, मा.मुख्य कार्यकारी अधिकारी यांना बांधकामासाठी किंवा मालाच्या पुरवठयासाठी निविदा मागविण्याचे आणि जेव्हा अशा निविदेची रक्कम अथवा मुल्य पाच लाख रुपयांहून अधिक नसेल तेव्हा त्या निविदा स्विकारण्याचे अधिकारी असतील, अशी तरतूद आहे.

**प्रस्तावना:-** शिर्डी ग्रामस्थानी मा. मुख्य कार्यकारी अधिकारी यांना अग्रेशित केलेल्या दि.०७/०६/२०२१ रोजीचे पत्रान्वये "साईबाबांच्या आगमनाची स्मृती असलेले निंबवृक्षाचे झाड नष्ट होवू नये म्हणून काही वर्षापुर्वी या झाडालगतचे जुने मंदिर काढून नवीन लहान मंदिर उभारण्यात आले आहे. शास्त्रानुसार मंदिरात बसून पुजा करावी लागते. सध्याचे मंदिर अतीशय लहान असून उंब-याच्या बाहेर बसून पुजा केली जाते, अशी पुजा शास्त्रसंमत नसते. शिवाय मंदिरातील मुर्ती व प्रतिमांवर थेट, उन, वारा पाऊस पडतो. त्यामुळे येथे किमान दहा बाय दहा फुट क्षेत्रफळाचे मंदिर असणे आवश्यक आहे. साईनगरीतील साईबाबांशी संबधित सर्व मंदिरे उदा. समाधी मंदिर, चावडी मंदिर, गुरुस्थान मंदिर, द्वारकामाई मंदिर जुन्या काळात शिर्डीकरांच्या मदतीने पण बाहेरील भाविकांने बांधले आहे. गुरुस्थान मंदिर नव्याने उभारतांना ते शिर्डीकरांनी उभारावे, त्यात साईनगरीतील गरीबातील गरीबाचा एक रुपया तरी असावा, जेणेकरुन साईबाबांशी शिर्डीकरांचे भावनिक नाते अधिक दृढ होईल असे आम्हाला वाटते. त्यादृष्टीने संस्थानने या मंदिराचा जुन्या शैलीचा व समाधी मंदिराला साजेस आराखडा बनवावा, या मंदिरासाठी शिर्डीकर निधी उभारतील, तरी संस्थानने ग्रामस्थांच्या भावनांचा विचार करुन ही संधी उपलब्ध करुन द्यावी अशी प्रार्थना आहे."

मंदिर विभागाकडील दिनांक २२/०६/२०२१ रोजीचे टिपणीअन्वये साईबाबांच्या आगमनाची स्मृती असलेले निंबवृक्षाचे झाड नष्ट होवू नये म्हणून काही वर्षापुर्वी या झाडालगतचे जुने मंदिर काढून नवीन लहान मंदिर उभारण्यात आले आहे. शास्त्रानुसार मंदिरात बसून पुजा करावी लागते. सध्याचे मंदिर अतीशय लहान असून उंब-याच्या बाहेर बसून पुजा केली जाते, अशी पुजा शास्त्रसंमत नसते. शिवाय मंदिरातील मुर्ती व प्रतिमांवर थेट, उन, वारा पाऊस पडतो. त्यामुळे येथे किमान दहा बाय दहा फुट क्षेत्रफळाचे मंदिर असणे आवश्यक आहे. गुरुस्थान मंदिर नव्याने उभारतांना ते शिर्डीकरांनी उभारावे, त्यात साईनगरीतील गरीबातील गरीबाचा एक रुपया तरी असावा, जेणेकरुन साईबाबांशी शिर्डीकरांचे भावनिक नाते अधिक दृढ होईल असे आम्हाला वाटते. त्यादृष्टीने संस्थानने या मंदिराचा जुन्या शैलीचा व समाधी मंदिराला साजेस आराखडा बनवावा, या मंदिरासाठी शिर्डीकर निधी उभारतील, तरी संस्थानने ग्रामस्थांच्या भावनांचा विचार करुन ही संधी उपलब्ध करुन द्यावी अशी प्रार्थना आहे."

याबाबत मंदिर विभागाने उपरोक्त संदर्भिय मंजूर टिपणीन्वये शिर्डी ग्रामस्थांनी केलेल्या विनंती अर्जानुसार गुरुस्थान मंदिराचे पुर्नजिवन करणेकामी मंदिर निर्माणाबाबत संस्थानचे मंदिर परिसरात समक्ष जागेची पाहणी करुन मंदिरांचा आराखडा तयार करणे इ. कामी पुढील कार्यवाही बांधकाम विभागामार्फत करणेस मान्यता घेतलेली आहे. सोबत सदर टिपणी अवलोकनार्थ जोडली आहे.

सध्याचे मंदिर अतीशय लहान असल्याने मंदिरातील मुर्ती व प्रतिमांवर थेट, उन, वारा पाऊस पडतो. त्यामुळे येथे किमान दहा बाय दहा फुट क्षेत्रफळाचें मंदिर असणे आवश्यक आहे. गुरुस्थान मंदिराचे नूतनीकरण करणेबाबत मा. मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी समक्ष पाहणीचे वेळी निर्देश दिले आहेत. याकामी आर्किटेक्ट श्री बालन, तामीळनाडू यांनी समक्ष पहाणी करुन त्यांनी त्यानुसार गुरुस्थान मंदिर दगडी बांधकामामध्ये करावयाचे बांधकामाचा आराखडा तयार करुन दिला आहे. याकामी खर्चाचे सविस्तर अंदाजपत्रक हे त्याचेकडून तयार करुन घेता येईल.

पान नंबर २ वर

**प्रस्ताव-** तरी समाधी मंदिर परिसरातील गुरुस्थान मंदिराचे नूतनीकरण करणेसाठी आर्किटेक्ट बालम, तामीळनाडू यांची नेमणुक करणेसाठी व त्यांचेकडून मंदिराचा नकाक्षा व खर्चाचे अंदाजपत्रक मागिवणेकामी तसेच शिर्डी नगरपंचायत, शिर्डी यांची परवानगी घेऊन गुरुस्थान मंदिराचे बांधकाम करणेकामी येणारा खर्च हा देणगीदार साईभक्त यांचेमार्फत करणेस किंवा सदरहु खर्च हा संस्थान निधीतून करणेकामी मान्यता मिळणेस विनंती.

23/7/2021

(कान्हूराज बगाटे, भा. प्र. से.)
मुख्य कार्यकारी अधिकारी
श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी

23.7

विषय क्र.- ९०५



# मा. तदर्थ (Ad-hoc) समिती सभेपुढील विषय
## बांधकाम विभाग

विषय:- मंदिर परिसरातील श्री दत्त मंदिर व नंदादीप नतूनीकरणकरणेसाठी मान्यता मिळणेबाबत...

टिपणी-

**श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी अधिनियम २००४ मधील तरतुद :-**

१. अधिनियमाचे कलम २१ (१) अन्वये समितीकडून विश्वस्तव्यवस्था निधीचा विनियोग पुढील सर्व किंवा त्यापैकी कोणत्याही प्रयोजनांसाठी करणेबाबत तरतुद आहे. त्यातील पोटकलम कलम २१ (क) अन्वये मंदिराची व विश्वस्तव्यवस्थेच्या मालमत्तांची देखभाल, व्यवस्थापन व प्रशासन या प्रयोजनांसाठी करण्यात येईल अशी तरतुद आहे.

२. अधिनियमाचे कलम १४ पोटकलम (२) च्या खंड (ख) अन्वये, मा.मुख्य कार्यकारी अधिकारी यांना बांधकामासाठी किंवा मालाच्या पुरवठयासाठी निविदा मागविण्याचे आणि जेव्हा अशा निविदेची रक्कम अथवा मुल्य पाच लाख रुपयांहून अधिक नसेल तेव्हा त्या निविदा स्विकारण्याचे अधिकारी असतील, अशी तरतूद आहे.

**प्रस्तावना:-** मंदिर विभागाकडील दिनांक २२/०७/२०२१ रोजीचे पत्रान्वये "श्री साईबाबा फेरफटका मारण्यासाठी गावच्या लेंडी (छोटा ओढा) परीसरात जात असत. तीच जागा कै. मोरेश्वर प्रधानयांनी खरेदी करुन संस्थानला अर्पन केली. कालांतराने साईबाबा संस्थान तर्फे त्याठिकाणी विविध झाडे लावून बाग निर्माण करण्यात आली आणि त्याचे नांव प्रधान लेंडिबाग असे पडले. बाबा ज्यावेळेस लोंडिबागेत जात असत तेथील पिंपळवृक्षाच्या खाली काही वेळ बसत असत व कधी कधी येथील विहिरावर स्नान करीत असत. त्या पिंपळवृक्षाच्या खाली बाबांनी स्वतः दीप लावलेला आहे. तोच नंदादीप या नांवाने ओळखला जात आहे. आज तागायत तो दीप प्रज्वलित आहे. त्यात तेल-वात टाकून प्रज्वलित ठेवला जातो. कालांतराने औदुंबर वृक्षांच्या खाली छोटेसे दत्त मंदिर बांधण्यात आलेले होते. त्याचा जिर्णोध्दार अंदाजे सन १९८०-८१ चे दरम्यान करण्यात येऊन आजचे दत्त मंदिर उभारण्यात आले. तसेच जुनी छोटी मुर्ती बाबांच्या वस्तु संग्रहायामध्ये ठेवण्यात आलेली आहे. व नविन मोठी मुर्ती स्थापन करण्यात आलेली होती. ती मुर्ती सुध्दा भंग पावल्यामुळे नविन मुर्तीची प्रतिष्ठापना दि.३०/११/२०११ ते दि.०१/१२/२०११ या दिवशी करण्यात आली.

आजचे मंदिर पुजा-अर्चा करण्याचे दृष्टीने खुप छोटे आहे. तरी त्याचा जिर्णोध्दार करुन ते मोठे करण्यात यावे असे नम्र मत आहे."

मंदिर परिसरात समक्ष जागेची पाहणी करुन मंदिरांचा आराखडा तयार करणे इ. कामी पुढील कार्यवाही बांधकाम विभागामार्फत करणेस दिनांक २२/०७/२०२१ रोजीचे पत्राने कळविले आहे.

सध्याचे मंदिर अतीशय लहान असल्याने मंदिरातील प्रतिमांवर थेट, उन, वारा पाऊस पडतो. त्यामुळे येथे किमान दहा बाय दहा फुट क्षेत्रफळाचे मंदिर तसेच दोन्ही मंदिराचे मध्ये सभामंडप असणे आवश्यक आहे. जेणे करुन दत्त जयंती उत्सवाचे दरम्यान साईभक्त हे पालखी घेऊन येत असतात भजनचा कार्यक्रम देखील अयोजीत केला जातो. तसेच सदरहु भाग हा खाली असल्याने पावसाळयात तेथे मोठया प्रमाणात पाणी साचते त्यामुळे भक्तांना दर्शन घेणे अडचणीचे होते. करीता दत्त मंदीराचे नूतनीकरण करुन साईज वाढविता येईल.

पान नंबर २ वर

**प्रस्ताव-** तरी दत्त मंदिर व नंदादीपाचे मंदिराचे नूतनीकरण आर्किटेक्टची नेमणुक करुन त्यांचेकडून मंदिराचा नकाक्षा व खर्चाचे अंदाजपत्रक मागविता येतील. तसेच शिर्डी नगरपंचायत, शिर्डी यांची परवानगी घेऊन दत्त मंदिर व नंददीप मंदिराचे बांधकाम करणेकामी येणारा खर्च हा देणगीदार साईभक्त यांचेमार्फत करणेस किंवा सदरहु खर्च हा संस्थान निधीतून करणेकामी मान्यता मिळणेस विनंती.

२३/७/२१

(कान्हूराज बगाटे, भा. प्र. से.)
**मुख्य कार्यकारी अधिकारी**
श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी

# श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी

शिर्डी : पोस्ट : ४२३ १०९, ता.राहाता, जि.अहमदनगर

दुरध्वनी +९१-२४२३-२५८५०० फॅक्स +९१-२४२३-२५८ ७७०


**ई-मेल व्दारे**

जा.नं.एसएसएस/ वशी-०४/ 1498 /२०२१

दिनांक- 2 AUG 2021

**प्रति,**

१. मा.श्री.सुधाकर यार्लगड्डा,
अध्यक्ष, तदर्थ समिती (Ad-hoc), श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी.
तथा प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश, अहमदनगर.

२. मा.श्री.भानुदास पालवे,
सदस्य, तदर्थ समिती (Ad-hoc), श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी.
तथा अपर महसुल विभागीय आयुक्त, नाशिक विभाग,नाशिक,

३. मा.श्रीमती गीता प्र.बनकर,
सदस्या, तदर्थ समिती (Ad-hoc), श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी.
तथा सहा.धर्मादाय आयुक्त, अहमदनगर

**विषय- तदर्थ (Ad-hoc) समिती सभेबाबत.**

**महोदय/महोदया,**

दि.३१.०७.२०२१ रोजीचे सभेतील विषय नं.६२ ते १०३ हे वेळेअभावी प्रलंबित राहिल्याने पुढील दिनांकास सर्वसंमतीने तारीख व वेळ निश्चित करुन अजेंडयानुसार घेण्यात यावेत, असे सर्वानुमते ठरले असुन त्याकरीता स्वतंत्ररित्या नोटीस काढण्याची आवश्यकता नाही. असेही ठरले आहे. त्यानुसार सदर विषयावर चर्चा करणेसाठी तदर्थ (Ad-hoc) **समितीची सभा शुक्रवार दि.०६.०८.२०२१ रोजी सकाळी ११.०० वाजता संस्थानचे साईनिवास अतिथीगृहामध्ये आयोजीत करण्यात आलेली आहे.**

अजेंडयावरील विषय नं.६२ ते १०३ या विषयाव्यतिरिक्त सोबतचे यादीतील विषय चर्चेसाठी घेण्यात येतील. सदर विषयांच्या टिपण्या सोबत जोडल्या आहेत.

(रविंद्र ठाकरे)
उपमुख्य कार्यकारी अधिकारी,
श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी.

विषय क्र.- ०९



## मा. तदर्थ समितीचे सभेपुढील विषय

लेखाशाखा अनुदान

**विषय:- महाराष्ट्र राज्यात पावसामुळे उद्भवलेल्या नैसर्गिक आपत्तीग्रस्तांच्या मदतीसाठी "मुख्यमंत्री सहाय्यता निधी" मध्ये रक्कम रु. ५ कोटी मात्र अर्थसहाय्य देणेच्या प्रस्तावास मान्यता मिळणेबाबत..**

**प्रस्तावना :-**

महाराष्ट्र राज्यामध्ये मोठयाप्रमाणात अतिवृष्ट्री झालेने भीषण पुरपरिस्थिती निर्माण झालेली आहे. त्याचा मोठा फटका पश्चिम महाराष्ट्र, कोकण किनारपट्टीसह राज्यातील इतर जिल्हयाला बसला असून सर्वत्र पूरपरिस्थती निर्माण झाली आहे. राज्यातील पूरग्रस्ताभागातील जनजीवन विस्कळीत झाले असून, काही गांवाचा संपर्क तुटून, परिस्थिती अतिशय बिकट बनली आहे. लाखो नागरिक बेघर झाले असून अनेक गांवेही ऊध्वस्त झाले आहेत. मोठयाप्रमाणात मानव व वित्तहानी झालेली आहे. महाराष्ट्र राज्यावर ही मोठी नैसर्गीक आपत्ती ओढावली आहे.

महाराष्ट्र शासनाने, या परिस्थितीचा मुकाबला करण्यासाठी उपाययोजना सुरू केल्या आहेत. या परिस्थितीतून राज्याला बाहेर काढण्यासाठी मोठया प्रमाणावर अर्थसहाय्याची आवश्यकता लागणार आहे. आपले कर्तव्य समजून व माणुसकीच्या संवेदनांना साद देऊन राज्यातील या आपत्तीग्रस्तांसाठी मदत देणेबाबत मानवतेच्या दृष्टीकोनातून महाराष्ट्र राज्यातील पुरग्रस्तांसाठी मदत करणे आपले कर्तव्य आहे.

**अर्थसहाय्य करणेबाबत संस्थान अधिनियमातील तरतुद:-**

श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डीने अधिनियम २००४ कलम १७ मधील (२)(ण) "मानव जातीचे कल्याण करणा-या किंवा आपत्तीमध्ये सहाय्य करणा-या कोणत्याही उदात्त कार्यास चालना देईल." अशी तरतूद आहे. या तरतूदीन्वये देशांत किंवा इतर राज्यात आलेल्या प्रत्येक आपत्तीच्या वेळी नेहमीच अर्थसहाय्य केलेले आहे.

**मा. अध्यक्ष,तदर्थ समिती यांचे निर्देश :-**

**१) नैसर्गिक आपत्तीचे प्रसंगी सहाय्य अनुदान/देणगी देण्यासंदर्भात समितीने काही नियमावली/मार्गदर्शक तत्वे तयार केली आहेत काय? आणि असल्यास किती अनुदान देणगी देता येईल.**

श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डीचा कारभार संस्थान अधिनियम २००४ अन्वये चालत असून अधिनियमात खालीलप्रमाणे तरतूद आहे. श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डीने अधिनियम २००४ कलम १७ मधील (२)(ण) "मानव जातीचे कल्याण करणा-या किंवा आपत्तीमध्ये सहाय्य करणा-या कोणत्याही उदात्त कार्यास चालना देईल."

२१ (१) पोट-कलम (१) च्या तरतूदींना अधिन राहून, विश्वस्तव्यवस्थेस, राज्य शासनाच्या पूर्व मंजूरीने आणि राज्य शासनाकडून राजपत्रात प्रसिद्ध केलेल्या आदेशाद्वारे विनिर्दिष्ट करण्यात येईल अशा कमाल मर्यादेच्या आणि अशा अटी व शर्तीच्या अधीन राहून, भक्तांच्या सोयीसाठी बस वाहनतळ, रेल्वे स्थानक व विमानतळ आणि तत्सम पायाभूत सुविधा यासारख्या पायाभूत सुविधा पुरविण्यासाठी किंवा त्या वाढविण्यासाठी शासकीय विभागांना, शासकीय महामंडळांना, शासकीय कंपन्यांना किंवा शासकीय उपक्रमांना सहाय्यक अनुदान देता येईल.

संस्थान अधिनियम २००४ कलम २१ (२) पोट कलमे (१) आणि (१क) मध्ये निर्दिष्ट केलेल्या प्रयोजनांसाठी पुरेशा तरतुदी केल्यानंतर, विश्वस्तव्यस्थेच्या निधीत शिल्लक राहीली असल्यास अशा शिल्लक रक्कमेचा विश्वस्तव्यवस्थेच्या वितरणयोग्य उत्पन्नाच्या तीस टक्यांपेक्षा अधिक नसेल एवढा भाग, समितीस वेळोवेळी पुढील सर्व किंवा कोणत्याही प्रयोजनासाठी वापरता व खर्च करता येईल:-

(एक) राज्य शासनाच्या पुर्व मंजुरीने, एखाद्या नोंदणीकृत सार्वजनिक विश्वस्तव्यवस्था किंवा नोंदणीकृत सोसायटी यांच्याकडून कोणतीही शैक्षणिक संस्था, क्रिडा अकादमी वा संस्था, सार्वजनिक वाचनालय, रुग्णालय, दवाखाना, निराश्रित अथवा शारीरिक दृष्टया विकलांग व्यक्तीसांठी आधारगृह किंवा इतर धर्मादाय वा धार्मिक संस्था यांची स्थापना व देखभाल करवून घेण्यासाठी अथवा कला वा साहित्य क्षेत्राशी संबंधित असलेली एखादी नोंदणीकृत सार्वजनिक विश्वस्तव्यवस्था किंवा नोंदणीकृत सोसायटी यांच्याकडून अन्य कोणत्याही बिगर वाणिज्यिक सांस्कृतिक संघटनेची स्थापना व देखभाल करवून घेण्यासाठी; किंवा

(दोन) स्थानिक नागरी सेवा व सुविधा यांचेमध्ये सुधारणा व वाढ होण्यासाठी परिणामी संस्थानांच्या सोयींमध्ये वाढ होण्यासाठी शिर्डी नगरपंचायतीला सहाय्य करण्यासाठी: अर्थसहाय्य देणेबाबत अधिनियमात तरतूद आहे.

परंतु, राज्य शासन, या पोटकलमाच्या प्रयोजनार्थ, मुंबई उच्च न्यायालयाच्या पूर्वमान्यतेने नियुक्त केलेल्या मुंबई उच्च न्यायालयाच्या निवृत्त न्यायधीशाच्या अध्यक्षतेखाली, असा अध्यक्ष आणि समितीच्या सदस्यांनी त्यांच्यामधून निवडून दिलेले इतर दोन सदस्य अशा एकूण तीन सदस्यांची मिळून बनलेली एक छाननी समिती स्थापन करील; आणि या छाननी समितीचा कालावधी समितीचे कालावधीबरोबर संपेल; परंतु, आणखी असे की, छाननी समिती आपले सभांचे आयोजन करण्यासाठी व कामकाज पहाण्यासाठी आणि, या अधिनियमाखालील

आपली कार्ये पार पाडण्यासाठी विनियम तयार करील तसेच संस्थान विश्वस्तव्यवस्थेकडून वित्तीय सहाय्य मिळविण्यासाठी, या अधिनियमाखाली, विविध नोंदणीकृत सार्वजनिक धर्मादाय विश्वस्तसंस्थाकडून समितीला प्राप्त झालेल्या अर्जाची शिफारस करण्यासाठी मानके निर्धारीत करण्याच्या दृष्टीने, मुंबई उच्च न्यायालयाने, केवल आर. सेमलानी यांच्या प्रकरणामधील रिट विनंतीअर्ज क्रं. २००३ चा २७६४ यामध्ये दिलेले निर्देश आणि मार्गदर्शक तत्वे यांना अनुरूप अशी, मार्गदर्शक तत्वे तयार करून ती प्रकाशीत करील, अशी तरतूद आहे.

**अधिनियम कलम २१ (२) (एक) (दोन) मधील संस्था व नमुद बाबींकरिता अनुदान वितरीत करण्यासाठी उपरोक्त नमूद छाननी समितीची आवश्यकता असते. त्यासाठी छाननी समितीने स्वत:ची नियमावली तयार केलेली आहे.**

**मात्र सद्यस्थितीत छाननी समिती अस्तित्वात नाही. तसेच आता मुख्यमंत्री सहाय्यता निधीला द्यावयाचे अनुदानाचे प्रकरण अधिनियमातील कलम २१ (२) (एक) (दोन) मधील नमूद तरतूदीमध्ये बसत नाही. त्यामुळे त्याला छाननी समितीच्या शिफारसीची आवश्यकता नाही. म्हणून छाननी समितीची नियमावली त्यास लागू होणार नाही.**

**सदर प्रस्ताव हा अधिनियमातील कलम १७ (२)(ण) अन्वये प्रस्तावित करण्यात आलेला आहे. यापूर्वीही याच तरतूदीन्वये मुख्यमंत्री सहाय्यता निधीस मा. तदर्थ समिती व उच्च न्यायालय, खंडपीठ औरंगाबाद, तसेच विधी व न्याय विभाग, महाराष्ट्र शासन यांचे मान्यतेने अनुदान वितरीत केलेले आहे.**

**२) अंदाजपत्रकात किती तरतूद करण्यात आलेली आहे? शिल्लक किती आहे किंवा कोणत्या निधीतून सदर तरतूद खर्ची घालण्यात येईल.**

अंदाजपत्रकात अनुदान वितरणासाठी रक्कम रू.२५.७० कोटीची तरतूद करण्यात आलेली आहे. ( नगरपंचायत अनुदान रु.५.६० कोटी, लेखाशाखा - रु.७ कोटी, बांधकाम विभाग रु. १३कोटी, अन्नपाकिटे रु. १० लक्ष) करण्यात आलेली आहे. मात्र सदरहू अनुदान अद्यापपावेतो वितरत करण्यात आलेले नाही.

संस्थानचे अंदाजपत्रक मा. व्यवस्थापन समिती/सध्या तदर्थ समिती मंजूर करते. त्यामुळे अंदापत्रकात नमूद नसलेल्या बाबींवर खर्च करण्यास समितीने निर्णय घेतल्यास सुधारीत अंदाजपत्रकात त्याची तरतूद दर्शविण्यात येते. दि. ३१.०३.२०२१ अखेर संस्थानकडे रु. २२३७ कोटी रुपयांच्या ठेवी आहेत. संस्थानचे अंदाजपत्रक ११५६ कोटी रुपयांचे आहे. संस्थानकडे रक्कम रु.१०८१ शिल्लक आहे.

<u>विभागाचा अभिप्राय:-</u>

१) मा. उच्च न्यायालय, खंडपीठ औरंगाबाद यांनी दि. ३०.०१.२०१९ रोजी "Shri Sai Baba Sasthan Trust, shall not disburse an amount of the Trust for other purposes than routine expense" असे आदेश दिलेले आहेत त्यामुळे सदरहू प्रस्तावास मा. उच्च न्यायालय, खंडपीठ यांची मान्यता घेऊन विधी व न्याय विभाग महाराष्ट्र शासन यांचे मान्यता घेण्यात येईल.

२) सन २०२१-२२ चे अंदाजपत्रकात नमूद अनुदान वितरणाचे तरतुदीवर अद्यापपावेतो खर्च करण्यात आलेले नाही. त्यामुळे सद्यपरिस्थितीत अंदापत्रकातील नमूद बाबींतून नैसर्गिक आपत्तीस मदत करता येईल व आवश्यकतेप्रमाणे सुधारीत अंदाजपत्रकात याबाबत तरतूद करता येईल.

३) सदरहू प्रस्तावास मा. तदर्थ समितीने मान्यता दिल्यास मा.उच्च न्यायालयाचे औरंगाबाद खंडपीठामध्ये सिव्हील ॲप्लीकेशन दाखल करण्यात येईल. मा.उच्च न्यायालयाची मान्यता मिळाल्यानंतर महाराष्ट्र शासनाचे पुर्व मान्यतेने सदरचा निधी "मुख्यमंत्री सहाय्यता निधी" महाराष्ट्र राज्य मध्ये धनादेश अथवा RTGS द्वारे रक्कम आदा करता येईल.

**प्रस्ताव:- महाराष्ट्र राज्यात पावसामुळे उद्धवलेल्या नैसर्गिक आपत्तीग्रस्तांच्या मदतीसाठी "मुख्यमंत्री सहाय्यता निधी" मध्ये रक्कम रु. ५ कोटी मात्र अर्थसहाय्य देणेकरिता मान्यता मिळणेसाठी प्रस्ताव मा. तदर्थ समितीपुढे निर्णयार्थ सविनय सादर.**

२८/७/२१

(कान्हूराज बगाटे, भा.प्र.से.)
**मुख्य कार्यकारी अधिकारी**
श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिर्डी

विषय क्र.- 02

लेखाशाखा

मा.तदर्थ समितीचे सभेपुढील विषय.

**विषय:-संस्थानमधील कायम कर्मचा-यांना द्यावयाच्या ग्रॅच्युईटी (उपदान) रकमेची कमाल मर्यादा रक्कम रु.२० लाख मात्र करणेबाबत...**

**प्रस्तावना:**श्री साईबाबा संस्थानमधील कायम कर्मचारी सेवानिवृत्त झाल्यास, राजीनामा दिल्यास, किंवा तो कर्मचारी सेवानिवृत्त होण्यापुर्वीच अकस्मात मयत झाल्यास त्या कर्मचा-याला त्याच्या सेवानिवृत्तीपर्यंतची उपदानाची रक्कम **The Payment of Gratuity Act, 1972** च्या कायद्यातील तरतुदीनुसार देण्यात येते. दि.२९ मार्च, २०१८ चे राजपत्र व श्रम आणि रोजगार मंत्रालय, नवी दिल्ली यांचेकडील दि.२९ मार्च, २०१८ च्या अधिसुचनेनुसार, The Payment of Gratuity (Amendment) Act 2018 (No.12 of 2018) अंमलात आणलेला असुन, त्या अन्वये दि.२९ मार्च, २०१८ पासून सेवानिवृत्त होणा-या कर्मचा-यास देय होणा-या ग्रॅच्युईटी रक्कमेची कमाल मर्यादा रु.१० लाखावरुन रु.२० लाखापर्यंत वाढविण्यात आलेली आहे.

उपरोक्तप्रमाणे कमाल मर्यादा संस्थान कर्मचा-यांना लागु करणेकरीता, दि.१३/१२/२०१८ रोजी झालेल्या मा.व्यवस्थापन समितीच्या सभेतील निर्णय क्र.७३१ अन्वये पुढीलप्रमाणे निर्णय झालेला आहे. *"The Payment of Gratuity Act, 1972 मध्ये झालेल्या सुधारणेप्रमाणे कर्मचा-यांना द्यावी लागणारी उपदानाच्या (ग्रॅच्युईटी) देय रकमेची कमाल मर्यादा रक्कम रु.२० लक्ष पावेतो वाढविण्यात आलेली असल्याने, दि.२९, मार्च, २०१८ नंतर संस्थान सेवेतून सेवानिवृत्त होणा-या कर्मचा-यांना या कायद्यानुसार ग्रॅच्युईटी रक्कम आदा करणेस मान्यता देण्यात आली व त्याप्रमाणे शासनास कळविण्यात यावे असे ठरले."*.

उपरोक्त निर्णयानुसार दि.०१/०१/२०१९ रोजीच्या पत्रान्वये शासनास कळविले असता, शासनाने क्र.सासंवि-१०१९/प्र.क्र.१३/का-१६, विधी व न्याय, मंत्रालय, मुंबई दि.०९/०७/२०२० रोजीच्या पत्रान्वये, वित्त विभाग शासन निर्णय क्रमांक:सेनिवे-२०१९/प्र.क्र.५८/सेवा-४, दि.०१.०३.२०१९ च्या परिच्छेद ६ मध्ये नमूद तरतुदीनुसार आवश्यक ती कार्यवाही करणेबाबत कळविण्यात आले. सदर निर्णयाप्रमाणे उपदानाची कमाल मर्यादा रु.१४ लक्ष पर्यंत आहे.

त्या अनुषंगाने सदरचा प्रस्ताव दि.२८/०८/२०२० रोजी झालेल्या मा.तदर्थ समितीच्या सभेपुढे निर्णयार्थ सादर केला असता, त्यावर निर्णय क्र.४२४ अन्वये, पुढीलप्रमाणे निर्णय झालेला आहे, *"महाराष्ट्र शासनाने पत्र क्र.माआअ-१०१९/प्र.क्र.१३/का-१६, दि.०९ जुलै, २०२० चे पत्रान्वये उपदानाची रक्कम २० लक्ष पर्यंत वाढविण्याचा संस्थानने महाराष्ट्र शासनाला पाठविलेला प्रस्ताव अमान्य केलेला असल्याने सदरहु शासन निर्णयाचे विरोधात जावून उपदानाच्या रकमेत अशी वाढ करता येणार नाही, असे समितीने एकमताने ठरवले. सबब, सदरचा प्रस्ताव सर्वानुमते मान्य करण्यात आला. सदरचा निर्णय हा धोरणात्मक असल्याने मा.उच्च न्यायालयात, सिव्हील अॅप्लीकेशन करुन मान्यता घेण्यात यावी"* असे ठरले. त्या अनुषंगाने, याबाबत संस्थानचे वकील अॅड.श्री बजाज साहेब यांचेमार्फत सिव्हील अॅप्लीकेशन दाखल करण्यात आलेले आहे. तोपर्यंत माहे मार्च-२०२० ते आजतागायत सेवानिवृत्त, राजीनामा, मयत झालेल्या कर्मचा-यांना महाराष्ट्र शासन निर्णयाप्रमाणे उपदानाची कमाल मर्यादा रु.१४ लाख मात्र पर्यंत आदा करण्यात आलेले आहेत.

तद्नंतर, दि.११.१२.२०२० रोजी शिर्डी येथे झालेल्या, मा.तदर्थ समितीच्या सभेसमोर दि.२८/०८/२०२० रोजीचे मा.तदर्थ समितीच्या सभेतील इतिवृत्त वाचून कायम करतांना निर्णय क्र.४२४ अन्वये पुढीलप्रमाणे निर्णय झालेला आहे. *"संस्थानमधील कायम कर्मचा-यांना कोर्ट रिसिव्हरच्या काळापासून म्हणजे, दि.१६.०४.१९६६ पासून The Payment of Gratuity Act, 1972 मधील तरतुदीनुसार उपदान अदा करण्यात येते. संस्थानने त्यासाठी एल.आय.सी.सोबत एक योजना तयार करून त्यामध्ये दरवर्षी अंशदान जमा करण्यात येते. जमा रकमेवार एल.आय.सी.व्याजही देते. मयत कर्मचा-याच्या वारसांना कर्मचा-यांची उर्वरीत सेवा गृहीत धरुन उपदान अदा करण्यात येते. संस्थान कर्मचारी हे शासकीय कर्मचारी नाहीत. त्यामुळे त्यांना राज्य शासनाने कळविल्यानुसार शासन निर्णय क्रमांक:सेनिवे-२०१९/प्र.क्र.५८/सेवा-४, दि.०१.०३.२०१९ च्या परिच्छेद ६ प्रमाणे रु.१४ लक्ष पर्यंत उपदान लागु करणे ही बाब शासनाच्या व मा.उच्च न्यायालयाच्या निदर्शनास आणणे गरजेचे वाटते. त्यामुळे संस्थान कर्मचा-यांना फायदेशीर असल्याने The Payment of Gratuity Act, 1972 नुसार रु.२० लक्ष पर्यंत उपदान अदा करण्याची शिफारस करण्यात येत*

*आहे. मा.उच्च न्यायालय, मुंबई खंडपीठ औरंगाबाद येथे सिव्हील ॲप्लीकेशन दाखल करावे व विधी व न्याय विभागाकडे समितीचे निर्णयानुसार सुधारीत प्रस्ताव सादर करण्यात यावा, असे ठरले.*

*तसेच या प्रक्रियेस कालावधी लागणार असल्याने दरम्यानचे काळात सेवानिवृत्त होणा-या कर्मचा-यांना राज्य शासनाने कळविल्यानुसार शासन निर्णय क्रमांक:सेनिवे-२०१९/प्र.क्र.५८/सेवा-४, दि.०१.०३.२०१९ च्या परिच्छेद ६ प्रमाणे रु.१४ लक्ष पर्यंत उपदान अदा करण्यात यावे, असे ठरले."*

उपरोक्त निर्णयानुसार सध्या सेवानिवृत्त कर्मचा-यांना शासन निर्णय क्रमांक:सेनिवे-२०१९/प्र.क्र.५८/सेवा-४, दि.०१.०३.२०१९ च्या परिच्छेद ६ प्रमाणे रु.१४ लक्ष पर्यंत उपदान अदा करण्यात येत आहे.

तथापि, आता दि.२० जुलै, २०२१ रोजीच्या पत्रान्वये, महाराष्ट्र शासनाने सेवानिवृत्त कर्मचा-यांना उपदान अदा करणेबाबत खालीलप्रमाणे कळविले आहे.

१.दि.०९/०७/२०२० रोजीचे शासन पत्र याद्वारे अधिक्रमीत करण्यात येत आहे.

२.The Payment of Gratuity Act, १९७२ मधील कलम ४ च्या उपकलम (३) मध्ये The Payment of Gratuity Act, १९७२ (Amendment) Act, २०१८ (Act No.१२ of २०१८) अन्वये झालेल्या दुरुस्तीनुसार केंद्र शासनाच्या श्रम व रोजगार मंत्रालयाने दि.२९ मार्च, २०१८ रोजी निर्गमित केलेल्या अधिसुचनेतील तरतुदीनुसार श्री साईबाबा संस्थान, शिर्डी येथील कायम अधिकारी/कर्मचारी यांना उपदान अदा करता येईल.

**विभागाचा अभिप्राय:-**

१) The Payment of Gratuity Act, 1972 मधील तरतुदीमध्ये, दि.२९ मार्च, २०१८ पासुन झालेल्या सुधारणेप्रमाणे संस्थान कर्मचा-यांना द्यावी लागणारी उपदानाच्या (ग्रॅच्युईटी) देय रकमेची कमाल मर्यादा रक्कम रु.२० लक्ष पर्यंत वाढवावी लागेल.

२) उपरोक्त दि.२० जुलै, २०२१ रोजीच्या शासन पत्राअन्वये, संस्थान कर्मचा-यांना द्यावयाच्या उपदान रकमेसाठी यापुर्वी झालेल्या दि.२८.०८.२०२० व दि.११.१२.२०२० सभेतील निर्णय क्र.४२४ अधिक्रमीत करावे लागतील.

३) मा.उच्च न्यायालय, मुंबई खंडपीठ औरंगाबाद येथे यापूर्वी संस्थान कर्मचा-यांच्या उपदानाकरीता C.A. दाखल करणेबाबतची कार्यवाही रद्द करावी लागेल.

**प्रस्ताव:** उपरोक्त अ.क्र.१ ते ३ मध्ये प्रस्तावीत केल्याप्रमाणे कार्यवाही करणेस मान्यता मिळणेकामी सदरचा प्रस्ताव मा.तदर्थ समितीचे सभेपुढे निर्णयार्थ सविनय सादर.

(कान्हुराज बगाटे, भा.प्र.से.)
**मुख्य कार्यकारी अधिकारी-तथा-अध्यक्ष,**
ग्रुप ग्रॅच्युईटी स्कीम, श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी

**मा.तदर्थ समितीचे सभेपुढे निर्णयार्थ**
(सामान्य प्रशासन विभाग)

---

दि.३० जुलै, २०२१

**विषय - श्री अनिल कचरु कोते व इतर संस्थान आस्थापनेवरील कंत्राटी कर्मचारी यांनी दाखल केलेल्या रिट पिटीशन क्र. ६२२४/२०२० मधील मा.उच्च न्यायालयाचे दि.३.७.२०२१ रोजीचे निकालपत्राबाबत..**

**टिपणी -**

**(अ) विषयाची पूर्वपीठीका -**

**(अ-१)** मा. विधी व न्याय विभाग, महाराष्ट्र शासन यांचेकडील दिनांक ०७ ऑगष्ट, २००९ रोजीचे शासन निर्णयानुसार, श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डीचे आस्थापनेवरील पदांचे आकृतीबंधास, म्हणजेच एकूण ४८२६ पदांना (स्थायी २९०८ पदे + अस्थायी १९१८ पदे) अटी-शर्तीस अधिन राहुन मान्यता दिलेली आहे. तदनंतर शासन निर्णयानुसार मंजूर आकृतीबंधात वाढीव पदांची मान्यता विचारात घेतां, सध्या एकूण ४८३८ (४८२६+०२+१०) पदांचा आकृतीबंध मंजूर असून, यामध्ये स्थायी पदे २९२० (२९०८+१२) + कंत्राटी पदे १९१८ यांचा समावेश आहे.

**(अ-२)** मा. व्यवस्थापन समितीचे दिनांक १९ नोव्हेंबर, २०११ रोजीचे सभेतील निर्णय क्रमांक ७६५ (२३) अन्वये दिनांक ०८ डिसेंबर, २०११ रोजीचे प्रस्तावाव्दारे, संस्थानमध्ये माहे डिसेंबर, २००० पूर्वीचे तसेच सन २००१ ते माहे डिसेंबर, २००५ अखेर पर्यन्त या कालावधीत कॉन्ट्रॅक्टर्समार्फत कंत्राटी पध्दतीने कामावर असलेल्या व सध्या काम करत असलेल्या अकुशल - ८११ व कुशल - १०५ अशा एकूण ९१६ कंत्राटी कामगारांना संस्थान सेवेत नियमित नेमणूका देणेस मान्यता मिळणेसाठी प्रस्ताव मा.विधी व न्याय विभाग यांचेकडे सादर करणेत आलेला होता. या प्रस्तावाचे अनुषंगाने, मा. विधी व न्याय विभाग, महाराष्ट्र शासन यांनी शासन निर्णय क्रमांक सासंवि-२०१३ / २२ / प्र.क्र.७० / का.१६, दिनांक १७ सप्टेंबर, २०१९ अन्वये शासन निर्णय पारित केलेला आहे.

**(अ-३)** मा. शासनाने दिनांक १७ सप्टेंबर, २०१९ रोजी " श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी यांच्या आस्थापनेवरील कंत्राटी कर्मचा-यांना एकत्रित मासिक वेतन मंजूर करण्याबाबत " या शीर्षाखाली पारित केलेल्या शासन निर्णयात खालीलप्रमाणे नमूद करणेत आलेले आहे -

> *" .. ..श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी येथे सन २००१ ते २००४ या कालावधीत कंत्राटी पध्दतीने कामावर असलेल्या व सध्या कार्यरत असलेल्या ६३५ कर्मचा-यापैकी कुशल कर्मचा-यांना दरमहा रु. ५,९१३/- (रु. पाच हजार नऊशे तेरा फक्त) व अकुशल कर्मचा-यांना दरमहा रु. ५,११३/- (रु. पाच हजार एकशे तेरा फक्त) इतके मासिक एकत्रित वेतन किंवा किमान वेतन कायद्यानुसार अनुज्ञेय वेतन यापैकी जे जास्त असेल ते वेतन देणेस मंजुरी देऊन शासनाच्या दि.०७.०८.२००९ रोजीच्या शासन निर्णयान्वये मंजूर केलेल्या आकृतीबंधातील कंत्राटी पदावर नियुक्ती देण्यास श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी), अधिनियम, २००४ मधील कलम १३ (४) व त्याखालील परंतुकास अनुसरुन तसेच पुढील अटीस अधीन राहून श्री साईबाबा संस्थानच्या व्यवस्थापन निधीतून अदा करण्यास या शासन निर्णयान्वये मान्यता देण्यात येत आहे.*
>
> *उपरोक्तप्रमाणे एकत्रित मासिक वेतन मंजूर करण्यात येत असले तरी, संबंधित कर्मचा-याचा संस्थानच्या नोकरीत दर्जा (Status)हा कंत्राटी कर्मचारी म्हणून राहील. त्यास श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी यांच्याकडे कायमस्वरुपी नोकरी मागण्याचा हक्क असणार नाही. "*

**(अ-४) उपरोक्त शासन निर्णयास अनुसरून,** कामगार विभागाकडील दिनांक २३ मे, २०१९ रोजीचे टिपणी-वजा-पत्रासोबत प्राप्त झालेल्या ६३५ कर्मचा-यांचे यादीनुसार, त्यामध्ये समाविष्ट असणारे कंत्राटी कर्मचा-यांचे सन २००१ ते सन २००४ (दिनांक २२ ऑगष्ट, २००४ अखेर हजर असलेले) मधील हजर दिवसांची तसेच त्यांनी सादर केलेल्या कागदपत्रांची पडताळणी करुन जा.नं.एसएसएस/ साप्रशा/ आस्था / २२०० /(०१ ते ६३५) /२०१९, दिनांक ०२ जानेवारी, २०२० अन्वये ५९८ कंत्राटी कर्मचारी यांना नियुक्ती आदेश देण्यात आलेले आहेत. त्यानुसार ५९८ कंत्राटी कर्मचारी कामावर हजर झालेले आहेत.

**(ब)** मा. प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश, अहमदनगर तथा सदस्य, मा. तदर्थ समिती (सध्या अध्यक्ष, मा. तदर्थ समिती, श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी) यांनी दिनांक ०६ जानेवारी, २०२० अन्वये उपरोक्त परिच्छेदांत नमूद केलेल्या कार्यवाहीबाबतची वस्तुःस्थिती मा. तदर्थ समितीचे सभेपुढे सादर करणेबाबत कळविलेले होते. तसेच, मा. तदर्थ समितीचे दिनांक १५ फेब्रुवारी, २०२० रोजीचे सभेतील निर्णय क्रमांक १०० अन्वये परिच्छेदांत नमूद केलेल्या कार्यवाहीबाबत मा. तदर्थ समितीपुढे मा. मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी सविस्तर माहिती द्यावी, असा निर्णय घेणेत आलेला होता.

त्यानुसार, उपरोक्त परिच्छेदांत नमुद केलेल्या कार्यवाहीचा सविस्तर प्रस्ताव खाली नमूद केलेप्रमाणे मा. तदर्थ समितीचे सभेपुढे वेळोवेळी सादर करणेत आलेला आहे.

०१. मा. तदर्थ समिती सभा दिनांक २४ फेब्रुवारी, २०२० / निर्णय क्रमांक १५८
०२. मा. तदर्थ समिती सभा दिनांक ०४ मार्च, २०२० / निर्णय क्रमांक १६४
०३. मा. तदर्थ समिती सभा दिनांक २७ मार्च, २०२० / निर्णय क्रमांक २०३
०४. मा. तदर्थ समिती सभा दिनांक ११ मे, २०२० / निर्णय क्रमांक २३५ व २३६
०५. मा. तदर्थ समिती सभा दिनांक ०९ जून, २०२० / निर्णय क्रमांक ३०९
०६. मा. तदर्थ समिती सभा दिनांक १३ जुलै, २०२० / निर्णय क्रमांक ३६०
०७. मा. तदर्थ समिती सभा दिनांक २८ ऑगष्ट, २०२०

तथापी, ५९८ कंत्राटी कर्मचारी यांचे नेमणूकीबाबत मा. तदर्थ समितीचे **दिनांक १३ जुलै,२०२०** रोजीचे सभेतील **निर्णय क्रमांक ३६०** मध्ये खालीलप्रमाणे नमूद आहे –

*" .. .. समितीचे सदस्य १) मा. श्री. श्रीकांत ल. आणेकर, प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश, अहमदनगर, २) मा. श्री. दिलीप स्वामी, अपर महसुल विभागीय आयुक्त, नाशिक विभाग, नाशिक ३) मा. श्रीमती गीता बनकर, सहा. धर्मादाय आयुक्त, अहमदनगर यांनी चर्चेअंती खालील निर्णय घेतला.*

*This subject was discussed in detail and each member has expressed views.*

*This committee, while deciding Subject 1, 2, 43 and 63 on the agenda of the Ad-hoc Committee Meeting dt. 11.05.2020, has thoroughly examined the entire record of the Trust, the scheme of the Shree Sai Baba Sansthan Trust (Shirdi) Act, 2004 and the powers of the Chief Executive Officer to appoint employees.*

*This Committee has already found that the then Chief Executive Officer could not have appointed employees directly on the Sansthan on contract basis because such power is vested with the Committee constituted under section 13(4) of the Shree Sai Baba Sansthan Trust (Shirdi) Act, 2004. Since such appointment on contract basis is a policy decision, it ought to have been presented before the Ad-hoc Committee, constituted by Hon'ble High Court.*

*This Committee has also found that the Sansthan has failed to follow the Government Resolution dt. 07.08.2009, more particularly the terms and conditions under which the said staffing pattern (आकृतीबंध) was approved. The Committee has also found that while issuing Government Resolution dt. 17.09.2019, the Government has called upon the Sansthan to follow Government Resolution dt.07.08.2009 of which the reference is found at serial no. 2 under the caption " वाचा."*

*It is not the case of Sansthan before this Committee that Committee has followed Government Resolution dt. 07.08.2009 by preparing service rules, qualification of entry, promotion etc. In fact Committee has been constituted for preparation of such rules and even this Ad-hoc Committee has given extention to the said Committee to complete the remaining work. In the above background, therefore, the appointment orders issued by the then Chief Executive Officer (Shri. Deepak Muglikar) is a piece of paper and cannot be termed as an order under the authority of the Committee as invisaged under section 13(4) of the Act.*

*Some of the members of this Committee tried to suggest that ex-post facto approval could be granted to the said order. However, on thorough examination of this proposal, the Committee is unanimous in refusing to grant such ex-post facto approval, more particularly when Government Resolution dt. 07.08.2009 has not been followed by the Trust. In addition to it, giving such ex-post facto sanction for such acts would be protecting the illegality and therefore, should not be approved at the hands of Ad-hoc Committee.*

*Consequently, the Ad-hoc Committee has unanimously resolved to cancel and setaside all the appointment orders issued to 598 employees with effect from 31st July, 2020.This is in the light of the fact that due to Covid-19 situation the Committee has resolved to pay exgratia amount i.e. 50% of the salary to those 598 employees who were earlier working through the contractor.Therefore, the said employees are not likely to be financially affected.*

*The Committee has also resolved to extend liberty to the Sansthan to submit proposal in this regard as per their choice after due study of various Government Resolutions issued by the Government.*

*समिती सदस्य तथा मुख्य कार्यकारी अधिकारी मा. श्री. अरुण डोंगरे, (भा.प्र.से.) यांनी त्यांचे वस्तुस्थितीवर आधारीत खालील मत मांडले.*

*राज्य शासनाचे विधी व न्याय विभागाचे शासन निर्णय दि. १७.०९.२०१९ अन्वये ठेकेदाराचे आस्थापनेवरील एकुण ६३५ कर्मचा-यांना संस्थान आस्थापनेवर कंत्राटी कर्मचारी म्हणून नेमणूकीस मान्यता दिलेली आहे.*

*उपरोक्त शासन निर्णयान्वये तत्कालीन मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी सद्यस्थितीत पात्र ५९८ कर्मचा-यांना संस्थान आस्थापनेवर कंत्राटी स्वरुपात दि. ०२.०१.२०२० रोजी नेमणूक दिलेली आहे. सदर नेमणूक ही शासन निर्णयाचे निर्देशानुसार करण्यात आली आहे. तरी सदर आदेशांना कार्योत्तर मान्यता देणे योग्य राहील."*

तसेच, ५९८ कंत्राटी कर्मचारी यांचे नेमणूकीबाबत **दि. २८ ऑगष्ट, २०२० रोजीचे सभेतील निर्णय क्र. ४२१** पुढीलप्रमाणे पारीत करणेत आलेला आहे-

" दिनांक १३.०७.२०२० रोजी शिर्डी येथे झालेल्या मा. तदर्थ (Ad-hoc) समित सभेच्या इतिवृत्ताच्या प्रती सर्व मा. सदस्यांना सभेत पुरविण्यात आल्या होत्या. त्याची नोंद घेऊन, सदरहू इतिवृत्त वाचून कायम करतांना खालील प्रमाणे दुरुस्त्या करण्यात आल्या व त्यास मान्यता देण्यात आली.

निर्णय क्र. ३६०- सदस्य सचिव श्री. बगाटे साहेब यांनी दि. १३.०७.२०२० चे विषय क्र. ६ निर्णय क्र. ३६० बाबत सदरचा निर्णय कायम करण्यापुर्वी मुद्दा उपस्थित केला व त्याकामी त्यांचे मत लिहून घेण्याची विनंती केली. पुर्वी तो निर्णय होतांना पूर्वीचे मुख्य कार्यकारी अधिकारी श्री. डोंगरे यांनी रेकॉर्डवर जे मुद्दे मांडले होते. तेच मुद्दे पुन्हा मांडतांना समिती सदस्य सचिव / मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी याबाबत खालील प्रमाणे मत मांडले.

सन १९ नोव्हेंबर, २०११ रोजी तत्कालीन व्यवस्थापन समितीने कंत्राटदारामार्फत संस्थान सेवेत कार्यरत असलेल्या ९१६ कंत्राटी कर्मचा-यांना नियमीत नेमणूका देण्यास मान्यता देण्यात आली होती. व तो प्रस्ताव शासनास सादर केलेला होता. सदर ९१६ कंत्राटी कामगारांपैकी २२ ऑगष्ट, २००४ पुर्वी कंत्राटदारामार्फत संस्थान सेवेत असलेल्या ६३५ कंत्राटी कमगारांना पात्र ठरविण्यात आले. व त्यानुसार शासनाने दि. १७.०९.२०१९ रोजी शासन निर्णय पारित करुन त्यास मान्यता दिलेली आहे. सदर शासन निर्णयाची संस्थान प्रशासनाने अंमलबजावणी करुन ५९८ कायम कंत्राटी स्वरुपात नेमणूक दि. ०२ जानेवारी, २०२० रोजी दिली आहे. सदर कार्यवाही ही, तात्कालीन व्यवस्थापन समितीच्या व शासन मान्यतेने केलेली आहे, असे मत मांडले.

५९८ कर्मचा-यांना राज्य शासनाचे विधी व न्याय विभागाचे शासन निर्णय दि. १७.०९.२०१९ अन्वये ठेकेदाराचे आस्थापनेवरील एकूण ६३५ कर्मचा-यांना संस्थान आस्थापनेवर कंत्राटी कर्मचारी म्हणून नेमणुकीस मान्यता दिलेली आहे. व या शासन निर्णयान्वये तात्कालीन मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी या ५९८ कर्मचा-यांना संस्थान आस्थापनेवर कंत्राटी स्वरुपात दि. २०.०१.२०२० रोजी नेमणूक दिलेली असल्याने त्यास कार्योत्तर मान्यता द्यावी असे प्रतिपादन केले.

त्यावर तदर्थ समितीचे अध्यक्ष, श्री. आणेकर साहेब व सदस्य श्री. स्वामी साहेब यांनी असे प्रतिपादन केले की, **सदरचा निर्णय हा संपूर्ण विषयाचा अभ्यास करुन 3 X 1 अशा मताधिक्याने मंजूर करण्यात आलेला असल्याने त्यात बदल करण्याचा प्रश्न येत नाही. सबब सदरचा निर्णय मताधिक्याने कायम करण्यात आला."**

**तथापि**, दिनांक १३ जुलै, २०२० रोजीचे सभेतील निर्णय क्रमांक ३६० व दिनांक २८ ऑगष्ट, २०२० रोजीचे सभेतील निर्णय क्र. ४२१ नुसार कार्यवाही करणेसाठी दिनांक १९ नोव्हेंबर, २०२० रोजी टिपणी / प्रस्ताव सादर करणेत येऊन संस्थान आस्थापनेवर घेणेत आलेल्या ५९८ कायम कंत्राटी कर्मचारी यांना जा.नं.एसएसएस/ साप्रशा/ आस्था / २२०० /(०१ ते ६३५) / २०१९ दिनांक ०२ जानेवारी, २०२० अन्वये देणेत आलेले आदेश रद्द करुन त्यांच्या सेवा दिनांक ०१ नोव्हेंबर, २०२० पासून संबंधित ठेकेदार यांचेकडे वर्ग करणेत जा.क्र. एसएसएस/ साप्रशा/ आस्था / १५१९/ २०२० दिनांक २१ नोव्हेंबर, २०२० अन्वये आदेश पारित करणेत आलेले होते.

**(क) तथापि, दरम्यान** श्री. अनिल कचरु कोते व इतर यांनी मा. उच्च न्यायालय मुंबई, खंडपीठ औरंगाबाद येथे रिट पिटीशन क्र. ६२२४/२०२० दि. १०/९/२०२० रोजी दाखल केले. सदर रिट पिटीशन मध्ये श्री अनिल कोते व इतर यांनी मा. तदर्थ समितीचे दिनांक १३/०७/२०२० रोजीच्या सभेतील निर्णय क्र. ३६० रद्द करणेस तसेच त्यावर कोणतीही कार्यवाही न करणेबाबत विनंती केलेली आहे. सदर प्रकरण मा. उच्च न्यायालय मुंबई, खंडपीठ औरंगाबाद येथे सध्या न्यायप्रविष्ठ आहे. या प्रकरणामध्ये संस्थानने आपले प्रतिज्ञापत्राव्दारे म्हणणे दि. ०४/११/२०२० रोजी मा. उच्च न्यायालयात सादर केले आहे. महाराष्ट्र शासनानेही सदर प्रकरणामध्ये प्रतिज्ञापत्राव्दारे आपले म्हणणे दाखल केलेले आहे. सदर प्रकरण मा. उच्च न्यायालयामध्ये न्यायप्रविष्ठ असतांना मा. तदर्थ समितीच्या दिनांक १३/०७/२०२० रोजीचे सभेतील निर्णय क्र. ३६० यावर अंमलबजावणी करावयाची झाल्यास सदर प्रकरणी महाराष्ट्र शासनाकडून दाखल करण्यात आलेली भूमिका तसेच संस्थानकडून दाखल करण्यात आलेले परिच्छेद निहाय शेरे आणि दाखल करण्यात आलेले प्रमाणपत्र यात सुसंगती असणे आवश्यक आहे. तत्कालीन मा. व्यवस्थापन समितीने निर्णय घेऊन त्याआधारे विधी व न्याय विभाग, महाराष्ट्र शासन यांनी शासन निर्णय क्र. सांसवि- २०१३/२२/प्र.क्र.७०/का.१६, मंत्रालय मुंबई, दिनांक १७/०९/२०२० नुसार आदेश

पारित केलेले आहे. सदर शासनाचे निर्णयाचे आधारे सदर कर्मचा-यांना दिनांक ०२/०१/२०२० पासून संस्थान आस्थापनेवर कंत्राटी कर्मचारी म्हणून घेण्यात आलेले आहे.

मात्र, तदर्थ (Ad-hoc) समितीचे ठरावांची अंमलबजावणी करतांना वरील पार्श्वभूमीवर परस्पर विरोधी भूमिका नसावी अशी सर्वसाधारण प्रशासकीय निकड लक्षात घेऊन दि. २१ नोव्हेंबर, २०२० चे आदेशाची अंमलबजावणी करतांना प्रशासकीय अडचण निर्माण झालेली आहे. संस्थानस्तरावर तदर्थ (Ad-hoc) समितीचे निर्णय आणि शासन निर्णय हे परस्पर पुरक ठरत नाहीत. सबब तदर्थ (Ad-hoc) समितीचा निर्णय अंमलबजावणी करण्यास्तव शासन स्तरावरुन याबाबत मार्गदर्शन होणेसाठी जा.क्र.एसएसएस/ वशी-विधी/ २२९०/ २०२० दि. २१/११/२०२० अन्वये विनंती करणेत आलेली आहे. तसेच याबाबत मा. अध्यक्ष, तदर्थ समिती यांनी मार्गदर्शन मिळणेबाबत विनंती केलेली आहे. तथापी सदर प्रकरणी मा.महाराष्ट्र शासन व मा.अध्यक्ष, तदर्थ समिती यांचेकडून कुठलेही मार्गदर्शन प्राप्त झालेले नाही. तथापी, मा.न्यायालयाने दि.२३ नोव्हेंबर, २०२० व दि.१.१२.२०२० रोजीचे सुनावणीदरम्यान ५९८ संस्थान कंत्राटी कर्मचारी यांचेबाबत संस्थानने कुठलीही कार्यवाही करू नये, अशी तोंडी निर्देश दिलेले आहेत.

**(ड) आता,** श्री अनिल कचरु कोते व इतर यांनी दाखल केलेल्या रिट पिटीशन क्र. ६२२४/२०२० मध्ये दिनांक ०३/०७/२०२१ रोजी मा. उच्च न्यायालय मुंबई, खंडपीठ, औरंगाबाद यांनी खालीलप्रमाणे निर्णय दिलेला असून तो सोबत माहितीस्तव सादर करीत आहोत. सदर निर्णयातील मुद्दा क्र. १९, २० व २१ खालीलप्रमाणे-

19. In view of the above, we hold that the petitioners and the 598 persons are entitled to be appointed if eligible as per the Government Resolution dated 17.09.2019 on the consolidated salary as fixed in the said Government Resolution for 11 months on contractual basis certainly with the condition that they will not be entitled to claim permanency and regularization. The petitioners seeking benefit of the Government Resolution dated 17.09.2019 cannot travel beyond the terms and conditions of the said Government Resolution.

20. In the light of the above, though we hold that the erstwhile Chief Executive Officer could not have issued the appointment orders to the 598 persons and the Adhoc committee's resolution was not illegal, considering that the Government had partially accepted the resolution of the Sansthan while issuing Government Resolution dated 17.09.2019 and considering overall scenario of the matter as discussed supra, we direct that these 598 persons issued with the appointment orders by the Chief Executive Officer on 02.01.2020 be continued as contractual employees without any claim for permanency and regularization and as per the terms and conditions of the Government Resolution dated 17.09.2019 on the consolidated salary fixed by the Government under its Resolution dated 17.09.2019 and to that effect the impugned resolution by the Adhoc committee dated 13.07.2020 would not be operative.

21. Rule accordingly made absolute in above terms. No costs.

तथापी, उपरोक्त मा.उच्च न्यायालयाचे दिनांक ०३/०७/२०२१ रोजीचे निकालास अनुसरून, सामान्य प्रशासन विभागाचे दिनांक ०७ जुलै, २०२१ रोजीचे मंजूर टिपणीनुसार जा.क्र.एसएसएस/ साप्रशा / आस्था / ६८७/ २०२१, दिनांक ०९/०७/२०२१ नुसार संस्थान आस्थापनेवरील ५९८ कंत्राटी कर्मचारी यांना दिनांक १० जुलै, २०२१ पासून ०५ दिवसांचा सेवा खंड करण्यात आलेला आहे. तसेच, महाराष्ट्र शासनाचे विधी व न्याय विभाग शासन निर्णय क्रमांक सासंवि-२०१३ /२२/ प्र.क्र. ७०/ का.१६ दिनांक दि. १७/०९/२०१९ रोजीचे शासन निर्णयानुसार तसेच मा. विधी व न्याय विभाग, महाराष्ट्र शासन, शासन निर्णय क्रमांक सासंवि-२००९ /४३३/ (३७/०९) का. सोळा, दिनांक ०७ ऑगस्ट, २००९ रोजीचे शासन निर्णयातील तरतूदीनुसार ५९८ कर्मचारी यांचेपैकी ०६ कर्मचारी मयत / सेवानिवृत्ती यामुळे कमी झालेले आहेत. उर्वरित ५९२ कंत्राटी कर्मचारी यांना दिनांक १५/०७/२०२१ पासून पुढील ११ महिन्यांचे कालावधीसाठी आहे त्याच अटी शर्तीवर नव्याने संस्थान आस्थापनेवर कंत्राटी पध्दतीने नेमणूका देण्यात आलेल्या आहेत.

श्री अनिल कचरु कोते व इतर संस्थान आस्थापनेवरील कंत्राटी कर्मचारी यांनी दाखल केलेल्या रिट पिटीशन क्र. ६२२४/२०२० मध्ये मा. उच्च न्यायालय, मुंबई, खंडपीठ औरंगाबाद यांनी दिनांक ०३/०७/२०२१ रोजी दिलेला निकाल मा.तदर्थ समितीचे सभेपुढे अवलोकनार्थ सादर.

**(कान्हूराज बगाटे, भा.प्र.से.)**
**मुख्य कार्यकारी अधिकारी**
श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी

सामान्य प्रशासन विभाग
श्री साईबाबा संस्थान विश्वस्त व्यवस्था,शिर्डी
08 JUL 2021
आवक नं.- 4887

IN THE HIGH COURT OF JUDICATURE AT BOMBAY
BENCH AT AURANGABAD

WRIT PETITION NO. 6224 OF 2020

1. Anil s/o Kacharu Kote
Age : 42 years, Occ. Service

2. Ajay s/o Appasaheb Kote
Age : 37 years, Occ. Service

3. Nilesh s/o Bhujangrao Salunke
Age : 45 years, Occ. Service

4. Mahesh s/o Madhukar Tak
Age : 40 years, Occ. Service

5. Sarjerao s/o Machindra Gore
Age : 40 years, Occ. Service

6. Jagdish s/o Suresh Bhosle
Age : 35 years, Occ. Service

7. Deepak s/o Shivaji Turkane
Age : 38 years, Occ. Service

8. Vilas s/o Sharad Dange
Age : 35 years, Occ. Service

9. Subhash s/o Annasaheb Barwant
Age : 35 years, Occ. Service

10. Dilip s/o Yosef Kolge
Age : 40 years, Occ. Service

11. Sanjay s/o Rajaram Shinde
Age : 40 years, Occ. Service

12. Deelip s/o Prasad Jang Bahadur Singh
Age : 50 years, Occ. Service

13. Arjun s/o Madhavrao Thore
Age : 38 years, Occ. Service

14. Deepak s/o Dnyandeo Jagtap
Age : 40 years, Occ. Service

15. Nilesh s/o Ashok Supekar
Age : 39 years, Occ. Service

16. Sachin s/o Madhukar Bhalerao
Age : 37 years, Occ. Service

All R/o. Shirdi, Tq. Rahata
District : Ahmednagar .. Petitioners

**Versus**

1. The State of Maharashtra
Through the Principal Secretary for
Law and Judiciary Department
Mantralaya, Mumbai

2. Shree Saibaba Sansthan Trust, Shirdi
Through its Chief Executive Officer
Having its office at
Saibaba Sansthan Complex, Shirdi
Tq. Rahata, District Ahmednagar .. Respondents

Mr. V. D. Hon, Senior Advocate a/w Mr. Ashwin V. Hon, Advocate for the Petitioners.
Mr. D. R. Kale, In-charge G. P. for Respondent No. 1.
Mr. A. S. Bajaj, Advocate for Respondent No. 2.

CORAM : S. V. GANGAPURWALA &
SHRIKANT D. KULKARNI, JJ.

Date on which reserved for judgment : 08.06.2021.

Date on which judgment pronounced : 03.07.2021.

Judgment (*Per S. V GANGAPURWALA, J.*) :-

Rule. Rule made returnable forthwith. With the consent of parties taken up for final hearing.

2. The petitioners are employed at respondent No. 2 through contractors. The present writ petition is filed with the following reliefs.

> B) Issue a writ of certiorari or writ in the nature of certiorari to quash and set aside the Resolution dated 13.07.2020 (Exhibit "H") and the consequential order dated 02.09.2020 (Exhibit "I") passed by the Adhoc committee of Shree Saibaba Sanasthan Trust, Shirdi.
>
> C) Issue a writ of mandamus or writ in the nature of mandamus to the respondents to continue the petitioners and similarly placed 582 employees mentioned in the list annexed at Exhibit "A" to the petition, in service of Shree Saibaba Sansthan Trust, Shirdi in accordance with the Government Resolution dated 17.09.2019 of the State Government and that their services be not terminated and/or discontinued.

3. Under the Government Resolution dated 17.09.2019 the Government of Maharashtra directed that the skilled and unskilled employees under employment on contract basis for the period 2001 to 2004 of Shree Saibaba Sansthan Vishwast and working shall be appointed on consolidated salary of Rs. 5,913/- and Rs. 5,113/- respectively or on minimum wages whichever is more on the

sanctioned post as per the staffing pattern sanctioned under the Government Resolution dated 07.08.2009. It was further clarified by the Government in the said resolution that their status would be as contractual employees and they will not be entitled to seek permanency. Pursuant to the said Government Resolution the then Chief Executive Officer issued appointment orders to 598 employees. The Adhoc committee of the Trust under resolution dated 13.07.2020 decided to cancel the appointment orders. On the basis of the resolution passed by the Adhoc committee of respondent No. 2 the communication was issued on 02.09.2020 to take steps pursuant to the decision of the Adhoc committee. The resolution dated 13.07.2020 of the Adhoc committee and the consequential order dated 02.09.2020 is assailed in the present writ petition.

4. Mr. Hon, learned senior counsel for the petitioners submits that the petitioners and 582 similarly placed employees are working with the Sansthan for approximately 16-20 years on contract basis. The regular committee of Sansthan had taken into consideration the services rendered by such employees and passed resolution on 19.11.2011 for absorbing the services of employees on regular establishment. The proposal was submitted to the Government for necessary approval on 08.12.2011. Though the proposal was submitted

on 08.12.2011 there was no response by the Government. The reminders were sent by the Sansthan on 27.01.2014 and 07.11.2015 requesting the State Government to consider the proposal for taking such employees on regular establishment. The State Government ultimately on 17.09.2019 passed a resolution approving the proposal of the Sansthan for taking 635 employees serving on contract basis to be accommodated on regular establishment. The Government has also fixed pay for their regular establishment under the said Government Resolution. The Sansthan through its Chief Executive Officer issued appointment orders to the petitioners and similarly placed employees on 02.01.2020 thereby confirming their services with the Sansthan as per the conditions mentioned in the Government Resolution dated 17.09.2019. After lapse of six months the Adhoc committee appointed by this Court held a meeting on 13.07.2020 and the subject of appointing the petitioners and such other 598 employees was considered. The committee passed the resolution on the same day to discontinue the services of the petitioners and similarly placed 598 employees. The Adhoc committee set aside the appointment orders issued to 598 employees with effect from 31.07.2020. The committee also took a decision to deduct 50% salary of 598 employees who were earlier working through the contractor. This act of the Adhoc committee is contrary to the provisions of law. The Adhoc committee

has overstepped its jurisdiction and power. The Adhoc committee could not have travelled beyond the Government Resolution dated 17.09.2019. On 02.09.2020 the Sansthan passed order of payment of their pay scale from August 2020. The Sansthan has deducted 50% of the amount from the salary of the petitioners and similarly placed employees. The services of the petitioners are regularized as per the Government Resolution dated 17.09.2019. The said Government Resolution is issued pursuant to the proposal of the Sansthan. The said proposal is submitted by regularly constituted committee. The Adhoc committee has not performed this function in accordance with Section 16 of Shree Saibaba Sansthan Trust (Shirdi) Act, 2004 (hereinafter referred as 'Trust Act'). The resolution dated 13.07.2020 is contrary to the Trust Act. The Adhoc committee could not have discontinued the services of the petitioners. The petitioners would suffer irreparably as they would be jobless. They are working for almost 16-20 years.

5. Mr. Bajaj, learned counsel for the respondent No. 2 submits that the petitioners are not Class III and Class IV employees as contended by them. The respondent No. 2 had appointed contractors who provide workers. The petitioners are working through the contractors. The classification as suggested by the petitioners as Class III and Class IV is not correct. The Sansthan has categorized them as skilled workers and

unskilled workers. It is true that on 19.11.2011 the proposal was submitted for taking the services of these employees who are working through the contractors since many years with the Sansthan on regular establishment and for that purpose proposal was submitted to the Government for approval. Pursuant to the said proposal the State Government on 17.09.2019 passed a resolution for taking 635 employees working through contractors from 2001 to 2004 and presently in employment as employees of the Sansthan directly on contract basis on fixed pay of Rs. 5913/- per month to skilled workers and Rs. 5113/- per month to unskilled workers or as per the Minimum Wages Act whichever is more. It was in pursuance to the Government Resolution dated 17.09.2019 the then Chief Executive Officer issued appointment orders dated 02.01.2020 to 598 employees on contract basis for 11 months only. The Adhoc committee by majority decision of three members ultimately on the opinion formed, resolved to cancel and set aside all the appointment orders issued to 598 employees with effect from 31.07.2020. It was further resolved to pay ex-gratia amount i.e. as salary to those 598 employees who were earlier working through contractors considering the Covid-19 situation. The contention of the petitioners that by virtue of Section 16 of the Trust Act their services are protected and that their services cannot be terminated is not correct.

6. The learned in-charge Government Pleader supports the stand of the petitioners and submits that on 17.09.2019 the Government has issued resolution regarding 635 contractual employees. The said Government Resolution was issued upon the proposal of the management committee of respondent No. 2 Sansthan. The Adhoc committee overstepped its jurisdiction. The Adhoc committee could not have passed the impugned resolution dated 13.07.2020. The same is beyond its powers, unjustified and invalid.

7. We have considered the submissions canvassed by the learned counsel for respective parties.

8. The Sansthan, at present is not functioning through validly constituted committee. The Adhoc committee has been constituted by this Court under its order dated 09.10.2019 in the Public Interest Litigation No. 120 of 2019 and the affairs of the Trust are looked into by the Adhoc committee. The chairman of the Adhoc committee is the Principal District and Session Judge, Ahmednagar.

9. It appears that the regular committee in the year 2011 passed the resolution for regularizing services of the persons working through contractors since many years. The said proposal was forwarded to the Government. Subsequently, reminders were also issued and eventually

on 17.09.2019 the Government of Maharashtra issued the Government Resolution. Under the said Government Resolution the Government passed an order for appointing 635 skilled and unskilled employees on contractual basis as per the staffing pattern sanctioned under the Government Resolution dated 17.08.2009 on payment of Rs. 5913/- per month to skilled workers and Rs. 5113/- per month to unskilled workers or as per the Minimum Wages Act whichever is more. It is further clarified in the said Government Resolution that their appointment would remain on contractual basis. They will be termed as contractual employees and shall not be entitled to claim permanency. It further appears that under the Government Resolution dated 17.08.2009 the staffing pattern has been sanctioned.

10. It further appears that in furtherance of the Government Resolution dated 17.09.2019 the Chief Executive Officer of respondent No. 2 issued appointment orders to 598 such contractual employees. At the relevant time when the appointment orders were issued by the Chief Executive Officer to such 598 employees the regular committee was not functioning and the Adhoc committee constituted by this Court was managing the affairs of the Sansthan. The Chief Executive Officer could not have on its own issued appointment orders to 598 employees without the concurrence of the committee. The Chief Executive Officer

functioning at the relevant time exceeded its authority in directly issuing appointment orders to these 598 employees without consultation and concurrence of the Adhoc committee.

11. The Adhoc committee in its meeting dated 13.07.2020 passed the resolution to discontinue the services of such 598 employees appointed by the Chief Executive Officer. The relevant minutes of the meeting and resolution No. 360 dated 13.07.2020 is as under :

> " .. .. *The Ad-hoc Member PDJ & District Session Judge, Ahmednagar Shri. Anekar, Addl. Commissioner Shri. Deelip Swami and Asstt. Charity Commissioner Smt. Geeta Bankar had taken following decision after due discussion.*
>
> *This subject was discussed in detail and each member has expressed views.*
>
> *This committee, while deciding Subject 1, 2, 43 and 63 on the agenda of the Ad-hoc Committee Meeting dt. 11.05.2020, has thoroughly examined the entire record of the Trust, the scheme of the Shree Sai Baba Sansthan Trust (Shirdi) Act, 2004 and the powers of the Chief Executive Officer to appoint employees.*
>
> *This Committee has already found that the then Chief Executive Officer could not ave appointed employees directly on the Sansthan on contract basis because such power is vested with the Committee constituted under Section 13(4) of the Shree Sai Baba Sansthan Trust (Shirdi) Act, 2004. Since such appointment on contract basis is a policy decision, it ought to have been presented before the Ad-hoc Committee, constituted by Hon'ble High Court.*

*This Committee has also found that the Sansthan has failed to follow the Government Resolution dt. 07.08.2009, more particularly the terms and conditions under which the said staffing pattern (आकृतीबंध) was approved. The Committee has also found that while issuing Government Resolution dt. 17.09.2019, the Government has called upon the Sansthan to follow Government Resolution dt. 07.08.2009 of which the reference is found at serial no. 2 under the caption "वाचा."*

*It is not the case of Sansthan before this Committee that Committee has followed Government Resolution dt. 07.08.2009 by preparing service rules, qualification of entry, promotion etc. In fact Committee has been constituted for preparation of such rules and even this Ad-hoc Committee has given extension to the said Committee to complete the remaining work. <u>In the above background, therefore, the appointment orders issued by the then Chief Executive Officer (Shri. Deepak Muglikar) is a piece of paper and cannot be termed as an order under the authority of the Committee as invisaged under section 13(4) of the Act.</u>*

*Some of the members of this Committee tried to suggest that ex-post facto approval could be granted to the said order. However, on thorough examination of this proposal, the Committee is unanimous in refusing to grant such ex-post facto approval, more particularly when Government Resolution dt. 07.08.2009 has not been followed by the Trust. In addition to it, giving such ex-post facto sanction for such acts would be protecting the illegality and therefore, should not be approved at the hands of Ad-hoc Committee.*

*<u>Consequently, the Ad-hoc Committee has unanimously resolved to cancel and set aside all the appointment orders issued to 598 employees with effect from 31st July, 2020.</u> This is in the light of the fact that due to Covid-19 situation the*

*Committee has resolved to pay exgratia amount i.e. 50% of the salary to those 598 employees who were earlier working through the contractor. Therefore, the said employees are not likely to be financially affected.*

*The Committee has also resolved to extend liberty to the Sansthan to submit proposal in this regard as per their choice after due study of various Government Resolutions issued by the Government.*

*The Committee Member & CEO Shri. Arun Dongre (IAS) has expressed his factual views as below :*

*As per GR dated 17.09.2019 of L&J Deptt. Govt. of Maharashtra, the persons working on the establishment of contractor 635 employee are allowed to be taken on Sansthan establishment.*

*As per the GR 598 eligible employees are taken from the establishment of Contractors to Sansthan establishment by an order of CEO dated 02.01.2020. The appointment was given as per GR hence post facto sanction by Ad-hoc committee should be given."*

12. It appears that the Adhoc committee was of the view that the Government Resolution dated 07.08.2009 has not been followed and in the Government Resolution dated 17.09.2019 the Government has called upon the Sansthan to follow the Government Resolution dated 07.08.2009. The Adhoc committee was of the opinion that the rules are not framed. Unless the rules are framed as required under Government Resolution dated 07.08.2009 the appointment order could not have been issued by the Chief Executive Officer.

13. Under the Government Resolution dated 07.08.2009 the Government had sanctioned staffing pattern subject to the terms and conditions enumerated in the said Government Resolutions. The Government directed the managing committee of the Sansthan to prepare the service rules for the various posts and obtain sanctioned staffing pattern from the Government and before appointing any person on the post, the rules shall be scrupulously followed. The service rules contemplated under the Government Resolution dated 07.08.2009 seeks to provide for a qualification, responsibilities and duties of each post. The promotional channel is to be fixed. The pay scale of each post shall be fixed in the rules. The Government further directed that 2908 posts shall be permanent and about 1918 posts shall be filled in on contractual basis. The appointments shall be for 11 months and shall be renewed every year.

14. We have asked the learned counsel for the petitioners and the respondents that whether the appointment of these 598 persons made by the Chief Executive Officer under the appointment order dated 02.01.2020 were on post sanctioned as per the Government Resolution dated 07.08.2009. The learned counsel were unanimous that the appointments of these 598 persons were on sanctioned post as per the Government Resolution dated 07.08.2009.

15. We are also apprised that, the recruitment rules are not sanctioned or finalized by the Government. The Adhoc committee is appointed by this Court. In such a scenario, the Chief Executive Officer could not have without the concurrence and consultation of the Adhoc committee directly issued appointment orders to these 598 employees certainly the then Chief Executive Officer exceeded his authority.

16. The apprehension of the Adhoc committee may be justifiable. Back door entry is not the legal way of entering into employment. It needs to be considered that respondent No. 2 through its managing committee had passed resolution to regularize such employees working since 2001 and sent the proposal for sanction/approval. The Government did not accept the said proposal in its entirety. Under the Government Resolution dated 17.09.2019 directed to appoint those employees on contractual basis without claim of permanency or regularization and on consolidated salary.

17. It is also not disputed by the respondents that the petitioners and similarly situated 598 employees to whom the appointment orders are issued were working from 2001 to 2004 through the contractors with the Sansthan. The Government Resolution dated 17.09.2019 is issued basically to accommodate the employees working from 2001 to 2004

on contractual basis with the Sansthan, as they are working for almost 16-20 years.

18. It appears that to ameliorate the condition of contractual employees working since 2001, the resolution was passed by the management committee of the Sansthan in the year 2011 for regularizing the services of such employees. Under the Government Resolution dated 17.09.2019 the Government instead of regularizing their services and/or making them permanent issued directions to appoint them on contractual basis as employees of Sansthan for 11 months and these persons would not be entitled to claim permanency or regularization. As these persons appointed would remain on contractual basis and on consolidated salary, certainly, they would not be entitled for any promotional cadre. Their salaries are also fixed under the Government Resolution dated 17.09.2019. In view of that, non framing of service rules would not be an impediment for appointing these persons on contractual basis. The Government probably had taken into consideration the long standing services rendered by these persons through the contractors with the Sansthan and appointed them on a fixed consolidated salary.

19. In view of the above, we hold that the petitioners and the 598 persons are entitled to be appointed if eligible as per the Government

Resolution dated 17.09.2019 on the consolidated salary as fixed in the said Government Resolution for 11 months on contractual basis certainly with the condition that they will not be entitled to claim permanency and regularization. The petitioners seeking benefit of the Government Resolution dated 17.09.2019 cannot travel beyond the terms and conditions of the said Government Resolution.

20. In the light of the above, though we hold that the erstwhile Chief Executive Officer could not have issued the appointment orders to the 598 persons and the Adhoc committee's resolution was not illegal, considering that the Government had partially accepted the resolution of the Sansthan while issuing Government Resolution dated 17.09.2019 and considering overall scenario of the matter as discussed supra, we direct that these 598 persons issued with the appointment orders by the Chief Executive Officer on 02.01.2020 be continued as contractual employees without any claim for permanency and regularization and as per the terms and conditions of the Government Resolution dated 17.09.2019 on the consolidated salary fixed by the Government under its Resolution dated 17.09.2019 and to that effect the impugned resolution by the Adhoc committee dated 13.07.2020 would not be operative.

21. Rule accordingly made absolute in above terms. No costs.

( SHRIKANT D. KULKARNI )
JUDGE

( S. V. GANGAPURWALA )
JUDGE

P.S.B.

सामान्य प्रशासन विभाग
वर्कशिट नं.- ७९७
विभागाकडे दाखल तारीख
टपाल प्रकार -
कार्यवाहीसाठी देणेचे
विभाग प्रमुख/अधिक्षक

मा. तदर्थ समितीचे सभेपुढील विषय
(सामान्य प्रशासन विभाग)

**विषय :- कर्मचारी निवासस्थान वापरास मुदतवाढ मिळणेबाबत कै. मोहन जगन्नाथ यादव यांचे वारस श्रीमती सुरेखा मोहन यादव यांचा दि.२७/०७/२०२१ रोजीचे विनंती अर्ज.**

टिपणी,

अ) **कै. मोहन जगन्नाथ यादव, जनसंपर्क अधिकारी, जनसंपर्क विभाग** यांना सेवाकालावधीत संस्थानचे साईनगर कर्मचारी वसाहतीतील **साईस्मरण ०३/०६** हे निवासस्थान तात्पुरत्या कालावधीसाठी सेवा निवासस्थान म्हणून निवासासाठी उपलब्ध करुन देणेत आलेले होते. तथापीं, मोहन यादव यांचे दि.२६/०९/२०२० रोजी निधन झाल्याने, त्यांचे वारस पत्नी श्रीमती सुरेखा मोहन यादव यांनी सदर संस्थानचे निवासस्थानात राहणेसाठी वेळोवेळी मुदतवाढ मिळणेबाबत केलेल्या विनंती अर्ज सादर केले आहे.

महाराष्ट्र शासनाचे सार्वजनिक बांधकाम विभागाकडील दिजून १५., २०१५ रोजीचे शासन निर्णयानुसार व मा.रोजीचे सभेतील निर्णय क्र २०१७/०६/१५.पन समितीचे दिवस्थाव्य.४६४ मधील तरतूदीनुसार घटनेच्या दिनांकापासून पहिल्या तीन महिन्यापर्यंत नियमित दराने व त्यापुढील कालावधीचे शासन निर्णयामध्ये नमूद अनुज्ञप्ती शुल्क दराने अथवा संस्थान निश्चित करेल त्या चालू बाजारभाव दराने भाडे वसुलीचे अटीवर वरील ०३ महिने कालावधीसह जास्तीत जास्त ०६ महिने कालावधीसाठी संस्थान निवासस्थानामध्ये राहणेस मुदतवाढ देणेची तरतुद आहे.

सदर तरतुदीनुसार, श्रीमती यादव यांना संस्थानचे निवासस्थानामध्ये राहणेसाठी खालील प्रमाणे मुदतवाढ देणेत आलेली आहे.

| अ.नं. | अर्जाची दिनांक | मुदतवाढ कालावधी | मुदतवाढ कालावधी | शेरा |
|---|---|---|---|---|
| ०१ | १९/१०/२०२० | जा.नं.एसएसएस/साप्रशा/आस्था/ १३६७/२०२० दि.३०/१०/२०२० रोजीचे पत्राने दि.२६/०९/२०२० ते २६/१२/२०२० अखेर. | ०३ महिने | नियमित दराने. |
| ०२ | ३०/११/२०२० | जा.नं.एसएसएस/साप्रशा/आस्था/२६३०/२०२१दि.१२/१२/२०२० रोजीचे पत्राने दि.२६/१२/२०२० ते दि.२६/०३/२०२१ अखेर. | ०३ महिने | दंडनीय दराने |

ब) त्यानंतर अनुज्ञेय कालावधीनंतर श्रीमती यादव यांनी दि.१६/०३/२०२१ रोजीचे अर्जाने निवासस्थानात राहणेसाठी पुन्हा मुदतवाढ मिळणेबाबत केलेल्या विनंती अर्जास अनुसरुन सार्वजनिक बांधकाम विभाग, शासन निर्णय क्रमांक: संकीर्ण -2013 /प्र.क्र.96/मिव्य-2,मंत्रालय, मुंबई-400 032 दि.15 जून, 2015 चे **१० (ब) नुसार** शासकीय अधिकारी / कर्मचारी यांचे सेवेत असतांना **निधन** झाल्यास आणि सदरहू शासन निर्णयातील अनुक्रमांक ७ नुसार शासकीय निवासस्थान ताब्यात ठेवण्यास संबंधीत कार्यकारी अभियंता यांनी परवानगी दिली असल्यास, सदर कालावधीतही मृत कर्मचारी यांच्या कुटूंबियांची प्रयत्न करुन सुध्दा पर्यायी निवासस्थानाची व्यवस्था न झाल्यास, सदर कालावधी संपण्याआधी अर्जदाराकडून संबंधित कार्यकारी अभियंता यांना पुढील कालावधीसाठी निवासस्थान ताब्यात ठेवण्यासाठी अर्ज प्राप्त झाल्यास, शासन निर्णय, वित्त विभाग, क्रमांकः घभाव-२०१०/प्र.क्र.४/सेवा-५, दिनांक ११ एप्रिल, २०११ व त्यामध्ये वेळोवेळी होणा-या सुधारणानुसार, त्याला आकारल्या जाऊ शकणा-या **अनुज्ञप्ती शुल्काच्या दुप्पट दराने अनुज्ञप्ती शुल्काची आकारणी करुन, शासन निर्णयातील अनुक्रमांक ७ मध्ये नमूद केलेल्या कालावधीसह कमाल ९ महिन्याच्या कालावधी पर्यंत किंवा त्याच्या कुटूंबियास पर्यायी निवासस्थान मिळेपर्यंत, यापैकी ते आधी घडेल तोपर्यंत शासकीय निवासस्थान ताब्यात ठेवण्यास सवलत अनुज्ञेय असेल**, अशी तरतुद आहे.

वरील तरतुदीनुसार मा. तदर्थ समितीचे सभेपुढे चक्रीय पध्दतीने मान्यता मिळणेसाठी इकडील दि. १६/०४/२०२१ रोजी प्रस्ताव मान्यतेस्तव सादर केला असता, त्यावर खालीलप्रमाणे निर्णय दिलेला आहे.

***" विशेष बाब म्हणून प्रस्ताव मंजूर - अनुज्ञप्ती शुल्काच्या दुप्पट दराने अनुज्ञप्ती शुल्काची आकारणी करुन, शासन निर्णयातील अ.क्र.७ मध्ये नमूद केलेल्या कालावधीसह कमाल ९ महिन्यांच्या कालावधी पर्यंत किंवा तत्पुर्वी त्यांना पर्यायी निवासस्थान मिळाल्यास तो पर्यंत, यापैकी जे आधी होईल तो पर्यंत अनुज्ञेय" असा निर्णय दिलेला आहे.***

मा. तदर्थ समितीने उपरोक्त निर्णयानुसार श्रीमती यादव यांना इकडील जा.नं.एसएसएस/साप्रशा/२९४/२०२१ दि.२२ एप्रिल, २०२१ रोजीचे पत्राने अनुज्ञेय कालावधीनंतर ०३ महिन्यासाठी दि.२६/०३/२०२१ ते दि.२६/०६/२०२१ अखेर पर्यंत निवासस्थानाचे एकूण क्षेत्रफळ ६५० चौ. फुट x रु.१५/- प्रती चौ. फुट या अनुज्ञप्ती शुल्काच्या दुप्पट दराने येणारे एकूण रु.१९,५००/- दरमहा भाडे व प्रत्यक्ष मिटर रिडींगप्रमाणे येणारे विद्युत बील वसुलीचे अटीवर मुदतवाढ देणेत आली होती.

**क)** सदरची देणेत आलेली मुदतवाढ दि.२६/०६/२०२१ अखेर संपुष्टात आली असून, श्रीमती यादव यांनी पुन्हा दि.०१/०७/२०२१ रोजी प्राप्त अर्जाने, *"माझे पती कै. मोहन जगन्नाथ यादव हे साईबाबा संस्थानमध्ये जनसंपर्क अधिकारी या पदावर कार्यरत असतांना संस्थानने आम्हाला साईनगर Building A-3 मध्ये flat क्र.०६ हे निवासस्थान राहणेसाठी दिलेला होता परंतू माझे पतीचा आकस्मिक मृत्यू झाल्यामुळे आमचेसाठी दुसरे घर घेणे अशक्य असून, माझे मुलीचे लग्न करायचे असून, मुलाचे शिक्षण (MBA Tech.3 rd Year) चालू आहे. या सर्व कालावधीत पुढील ३ महिन्यांसाठी त्याच flat मध्ये रहाण्यासाठी परवानगी मिळावी ही नम्र विनंती."*

पुढील पानावर...

श्रीमती यादव यांचे वरील विनंती अर्जास अनुसरुन त्यांना मुदतवाढ देणे अनुज्ञेय होत नसल्याचे कारणास्तव, संस्थानचे निवासस्थान खाली करुन देणेबाबत संबंधीतास' पत्र देणेकामी दि.१९/०७/२०२१ अन्वये प्रशासकीय मान्यतेसाठी सादर केलेल्या टिपणीवरील मा. मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी दिलेल्या निर्देशानुसार श्रीमती यादव यांना सुनावणीस बोलविणेत आले होते. श्रीमती यादव यांचे वतीने त्यांचा मुलगा यश यादव हे दि.२७/०७/२०२१ रोजी समक्ष उपस्थीतीत होते. त्यावेळी त्यांनी दिलेल्या माहीतीनुसार व केलेल्या विनंती नुसार त्यांना दि.३१ ऑक्टोबर, २०२१ अखेर मुदतवाढ देणेबाबत मा. मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी अनुमती दिलेली आहे. त्यानुसार श्रीमती यादव यांनी दि.२७/०७/२०२१ रोजीचे अर्जाने दि.३१ ऑक्टोबर, २०२१ अखेर पर्यंत संस्थानचे साईस्मरण ०३/०६ या निवासस्थानात राहणेसाठी मुदतवाढ मिळणेबाबत विनंती केली आहे.

तरी, श्रीमती यादव यांचे दि.२७/०७/२०२१ रोजीचे विनंती अर्जास अनुसरुन त्यांना संस्थानचे **साईस्मरण ०३/०६** या निवासस्थानात अनुज्ञेय कालावधीनंतर राहण्यासाठी म्हणजेच **दि.२७/०६/२०२१ ते दि.३१/१०/२०२१ अखेरपर्यंत** मुदतवाढ देणेकामी उपरोक्त **परिच्छेद ब** पॅरा २ मध्ये नमूद मा. तदर्थ समितीचे निर्णयानुसार निवासस्थानाचे एकूण क्षेत्रफळ ६५० चौ. फुट x रु.१५/- प्रती चौ. फुट या अनुज्ञप्ती शुल्काच्या दुप्पट दराने येणारे एकूण **रु.१९,५००/-** दरमहा भाडे व प्रत्यक्ष मिटर रिडींगप्रमाणे येणारे विद्युत बील वसुलीचे अटीवर मुदतवाढ देणेस मान्यता मिळणेस विनंती.

२९/७/२१

(कान्हूराज बगाटे, भा.प्र.से.)
**मुख्य कार्यकारी अधिकारी,**
श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिर्डी

विषय क्र.- ०५



**मा. तदर्थ (Ad-hoc) समितीचे सभेपूढे अवलोकनार्थ सादर**
**मागासवर्ग कक्ष**

**विषयः- शासन निर्णय व परिपत्रके यांचे वाचन ..**

**टिपणी,**

महाराष्ट्र शासनाचे विधी व न्याय विभागाकडून श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी यांचे कामकाजा संबंधीत शासन निर्णय, परिपत्रके व इतर पत्र प्राप्त होतात. सदर पत्रांची एकत्रित रित्या मागासवर्ग कक्षाकडे नोंद घेऊन सदर पत्रावर उचित कार्यवाहीसाठी संबंधीत विभागाकडे पाठविण्यात येते. सदर शासन पत्रावर संबंधीत विभागाने काय कार्यवाही केली आहे त्याबाबतचा अहवाल प्रत्येक महिन्यास वरिष्ठांकडे सादर करण्यात येतो.

मा. व्यवस्थापन समितीचे दि.०२/०५/२०१८ चे सभेत आयत्या वेळचा विषय क्र.१७, निर्णय क्र.३४६ " संस्थानचे कामकाजासंबंधी शासनाचे निर्णय,परिपत्रके वेळोवेळी समितीचे बैठकीत सर्व समिती सदस्यांना बैठकीच्या अजेंडयासोबत देण्यात यावी व सदर शासन निर्णय, परिपत्रके यांचे वाचन असा विषय अजेंडयामध्ये समाविष्ट करण्यात यावा."असा झालेला आहे.

उपरोक्त मा.व्यवस्थापन समितीचे निर्णयानुसार महाराष्ट्र शासनाचे विधी व न्याय विभागाकडून श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी यांचे कामकाजासंदर्भात खालीलप्रमाणे प्राप्त झालेली पत्रे सोबत सादर केलेली आहेत.

| अ.क्र. | शासन पत्र क्र. व दिनांक | प्राप्त दिनांक | विषय |
|---|---|---|---|
| ०१ | शासन निर्णय क्र.सासंवि-१०२१/२५६/ प्र.क्र.७७/का.१६ दि.०४/०५/२०२१ | १९/०७/२०२१ | श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी यांचेमार्फत शिर्डी नगरपंचायतीच्या जागेवर एक गॅस क्रिमॅटोरियम उभारण्यास व ते शिर्डी नगरपंचायतीकडे हस्तांतरीत करण्यास मान्यता देणे .. |
| ०२ | क्र.सासंवि-१०१९/४१/प्र.क्र.१३/का.१६ विधी व न्याय विभाग दि.२०/०७/२०२१ | २३/०७/२०२१ | श्री साईबाबा संस्थानमध्ये कायम कर्मचा-यांना द्यावयाच्या उपदानाच्या (Gratuity) रकमेची कमाल मर्यादा दि.२९/०३/२०१८ पासून सेवानिवृत्त होणा-या कायम अधिकारी / कर्मचारी यांच्याबाबतीत रु. १० लाखावरुन रु. २० लाख करणेबाबत .. |

मा.व्यवस्थापन समितीचे दि.०२/०५/२०१८ चे सभेत आयत्या वेळचा विषय क्र.१७ ,निर्णय क्र.३४६ निर्णयानुसार उपरोक्त दोन पत्रे मा. तदर्थ (Ad-hoc) समितीचे सभेपूढे अवलोकनार्थ सविनय सादर

२१/७/२१

( कान्हूराज बगाटे, भाप्रसे )
**मुख्य कार्यकारी अधिकारी**
**श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिर्डी**

आवक कक्ष
श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी
19 JUL 2021
आवक नं.-5413

श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था शिर्डी यांचेमार्फत शिर्डी नगर-पंचायतीच्या जागेवर एक गॅस क्रिमॅटोरियम उभारण्यास व ते शिर्डी नगरपंचायतीकडे हस्तांतरीत करण्यास मान्यता देणे...

**महाराष्ट्र शासन**
विधि व न्याय विभाग
शासन निर्णय क्रमांक सासवि-१०२१/२५६/प्र.क्र. ७७/का.१६
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
दिनांक : ४ मे, २०२१.

वाचा : १) मुख्य कार्यकारी अधिकारी, श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी यांचे पत्र क्र.एसएसएस/वशी /मेकॅनिकल/२९०/२०२१, दिनांक २१/०४/२०२१.

२) जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष, जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण, अहदमनगर यांचे पत्र क्र आव्यमपु/कार्या१९३१/१५८१/२०२०,दि.१/१०/२०२०

३) मुख्याधिकारी, शिर्डी नगरपंचायत, शिर्डी यांचे पत्र क्र.जा.क्रं.नप/टे-०२/१५३०/२०२०, दि.९/१०/२०२०

४) मा. उच्च न्यायालय, मुंबई,खंडपीठ औरंगाबाद येथे दाखल सिव्हिल ॲप्लीकेशन क्र.७२६५/२०२० मध्ये दिनांक १४/१/२०२१ रोजी दिलेले आदेश.

**प्रस्तावना :**

जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष, जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण, अहदमनगर यांनी त्यांचे संदर्भाधिन पत्र क्रमांक (२) तसेच मुख्याधिकारी, शिर्डी नगरपंचायत, शिर्डी यांनी त्यांच्या संदर्भांकित पत्र क्रमांक (३) अन्वये कोविड-१९ या विषाणूच्या वाढत्या प्रार्दुभावामुळे जिल्हयात एक गॅस क्रिमॅटोरियम संस्थानामार्फत उभारणी करुन देण्याची विनंती केली होती . दिनांक ११/१२/२०२० रोजी संस्थानच्या तदर्थ समितीने चक्रीय पध्दतीने गॅस क्रिमॅटोरियम उभारण्याच्या प्रस्तावास मंजूरी दिली आहे. तसेच मा. उच्च न्यायालय मुंबई, खंडपीठ औरंगाबाद यांनी त्यांच्या उपरोक्त संदर्भिय क्र.४ च्या आदेशान्वये शिर्डी नगरपंचयातीस संस्थानामार्फत शिर्डी येथे एक गॅस क्रिमॅटोरियम बसविण्यास व तद्नंतर ते शिर्डी नगरपंचायतीस हस्तांतरीत करण्यात मान्यता दिली आहे . या गॅस क्रिमॅटोरियमची दुरुस्ती, देखभाल व इंधन खर्च शिर्डी नगरपंचायत, शिर्डी यांच्यामार्फत करण्यात येणार आहे, असेही आदेशात नमूद केले आहे. संस्थानाच्या संदर्भांकित पत्र क्रमांक १ च्या पत्रान्वये या प्रस्तावास मान्यता देण्याची विनंती करण्यात आली आहे . जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष , जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण, अहदमनगर तसेच मुख्याधिकारी, शिर्डी नगरपंचायत, शिर्डी,यांची विनंती, तदर्थ समितीचा दिनांक ११/१२/२०२० रोजीचा ठराव ,मा. उच्च न्यायालय, मुंबई,खंडपीठ

औरंगाबाद यांचा दिनांक १४/१/२०२१ रोजीचा आदेश व संस्थानाने दिनांक २१/४/२०२१ रोजीच्या पत्रान्वये केलेली विनंती विचारात घेता श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी यांचे मार्फत एक गॅस क्रिमॅटोरियम शिर्डी येथे बसवून देवून शिर्डी नगरपंचायत, शिर्डी यांना हस्तांतरीत करण्यास शासन मान्यता देण्याची बाब शासनाच्या विचाराधिन होती.

**शासन निर्णय :**

श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी यांचे मार्फत शिर्डी येथे एक गॅस क्रिमॅटोरियन बसवून देवून ते शिर्डी नगरपंचायत, शिर्डी यांना हस्तांतरीत करण्यास शासन मान्यता देण्यात येत आहे. सदर गॅस क्रिमॅटोरियमची दुरुस्ती, देखभाल व इंधन खर्च शिर्डी नगरपंचायत, शिर्डी यांच्या मार्फत करण्यात यावी.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

सुपसाळुंके

( सु.प. साळुंके)
कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन.

प्रति,

१. मा.मुख्यमंत्री महोदयांचे अपर मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई.
२. अध्यक्ष, श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी, ता. राहता, जि.अहमदनगर.
३. प्रधान सचिव व विधि परामर्शी, विधि व न्याय विभाग, मंत्रालय, मुंबई.
४. जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष, जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण, अहदमनगर.
५. मुख्य कार्यकारी अधिकारी, श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी.
६. मुख्याधिकारी, शिर्डी नगरपंचायत, शिर्डी.
७. निवड नस्ती.

महाराष्ट्र शासन

क्र. सासंवि १०१९/४१/प्र.क्र.१३/का.१६,
विधि व न्याय विभाग,
मादाम कामा मार्ग,हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२,
दिनांक :- २० जुलै,२०२१

प्रति,

मुख्य कार्यकारी अधिकारी,
श्री साईबाबा संस्थान विश्वस्त व्यवस्था शिर्डी,
ता.राहाता, जि.अहमदनगर.

विषय :- श्री साईबाबा संस्थानामध्ये कायम कर्मचाऱ्यांना द्यावयाच्या उपदानाच्या (Gratuity) रकमेची कमाल मर्यादा दि.२९/०३/२०१८ पासून सेवानिवृत्त होणाऱ्या कायम अधिकारी / कर्मचारी यांच्याबाबतीत रु.१० लाखावरुन रु.२० लाख करणेबाबत.

संदर्भ :- १)आपली क्र.एसएसएसटी/लेखा/४८५६/२०१८,दि.०१.०१.२०१९ व पत्र क्र.एसएसटी/लेखा/५५६९/२०१९ दि.१६/०२/२०१९ ची पत्रे.
२) शासनपत्र समक्रमांक दिनांक ०९.०७.२०२०.

महोदय,

उपरोक्त संदर्भांकित क्रमांक (२), दिनांक ०९.०७.२०२० रोजीचे पत्र या द्वारे अधिक्रमीत करण्यात येत आहे.

२ The Payment of Gratuity Act,१९७२ मधील कलम ४ च्या उपकलम (३) मध्ये The Payment of Gratuity (Amendment) Act,२०१८ (Act No.१२ of २०१८) अन्वये झालेल्या दुरुस्तीनुसार केंद्रशासनाच्या श्रम व रोजगार मंत्रालयाने दिनांक २९ मार्च २०१८ रोजी निर्गमित केलेल्या अधिसूचनेतील तरतुदीनुसार श्री साईबाबा संस्थान, शिर्डी येथील कायम अधिकारी/ कर्मचारी यांना उपदान अदा करता येईल.

आपली,

(सु.प. साळुंके)
कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन

C:\Users\sanjay.bagde\Desktop\BAGADE SANJAY\shirdi.letter.odt

विषय क्र.- ०६



खरेदी विभाग

"मा.तदर्थ समितीचे सभेपुढे निर्णयार्थ सादर"

विषय – मे. व्हि. एम. डिस्ट्रीब्युटर्स, नासिक यांचा दूध पुरवठा आदेश रद्द करणे व दूध खरेदीसाठी नव्याने ई-निविदा प्रक्रीया करणेबाबत...

मा. उच्च न्यायालयाकडून टोंड गाय दूध खरेदीसाठी रक्कम रु. ५,३१,६१,५००/- इतक्या रकमेला दि. १२.०३.२०२१ रोजी मान्यता मिळाल्यानंतर एप्रिल २०२१ ते मार्च-२०२२ या कालावधीत कॅन्टीन विभागासाठी त्यांचे मागणीनुसार आवश्यक असणारे टोंड गाय दूध खरेदी करण्यासाठी खरेदी विभागामार्फत ई-निविदा प्रक्रीया राबविण्यात आली होती. यामध्ये ०३ निविदा प्राप्त झाल्या होत्या.

सदर निविदा तांत्रिक दृष्ट्या ही पात्र ठरल्या होत्या. त्यांचा तपशील खालीलप्रमाणे:-

४. मे. गोदावरी खोरे. ना. प. पा. ता. सह. दुध संघ,कोपरगाव
५. मे. स्वामी समर्थ डिस्ट्रीब्युटर्स, तीसगाव
६. मे. व्हि. एम. डिस्ट्रीब्युटर्स, नासिक

वरील तीनही पात्र निविदाधारकांच्या ई- निविदा कमर्शिअल बीड ०७.०६.२०२१ रोजीचे खरेदी समितीचे सभेत उघडण्यात आले होते. यामध्ये मे. व्हि. एम. डिस्ट्रीब्युटर्स, नासिक यांचे दर न्युनतम प्राप्त झाले होते. सदर न्युनतम दरधारकाशी खरेदी समितीचे सभेत चर्चावाटाघाटी करुन त्यातुन प्राप्त अंतिम दराप्रमाणे पुरवठा आदेश देण्यासाठी मा. तदर्थ समितीची चक्रीय पध्दतीने मान्यता मिळाली होती. त्यानुसार दि.२८.०६.२०२१ रोजीच्या खरेदी समिती सभेत चर्चा वाटाघाटी होऊन जा.नं.एसएसएस/वशी-खरेदी/१०११/२०२१ दि. ०१.०७.२०२१ अन्वये मे. व्हि. एम. डिस्ट्रीब्युटर्स, नासिक यांना टोंड गाय दूधाच्या (Fat-३.५, SNF-८.५) पुरवठ्यासाठी दि.३१.०३.२०२२ पर्यंतचे कालावधीसाठी पुरवठा आदेश देण्यात आलेला आहे. त्यांनी त्याप्रमाणे दि. ०५.०७.२०२१ पासून आपला टोंड गाय दूधाचा पुरवठा सुरु केलेला होता.

दि. १३.०७.२०२१ रोजी कॅन्टीन विभागाकडील लिपीक, श्री. निकम यांनी सदर पुरवठादाराने पुरविलेले दुधाचा वास येत असलेबाबत तक्रार केली होती. त्यावेळी श्री. निकम यांना सदर दुधाचा लॅब रिपोर्ट करुन घेणेबाबत सुचना केली होती. तसेच मे. व्हि. एम. डिस्ट्रीब्युटर्स, नासिक यांना ही दूधाचा वास येत असलेबाबत कळविले होते त्यांनी दूध बदलून देणेची तयारी दाखविली होती. तसेच यापुढे अशी तक्रार येऊ नये म्हणून दूधाचा दर्जा सुधारणेबाबत मे. व्हि. एम. डिस्ट्रीब्युटर्स, नासिक यांना सुचना केली होती. त्यानंतर दि. २३.०७.२०२१ रोजी श्री. निकम, कॅन्टीन विभाग, लिपीक यांनी दूधाचा वास येत असलेबाबत तक्रार केली होती. यानुसार मा. प्रशासकीय अधिकारी, श्री. जगताप साहेब यांचेशी झालेले चर्चेनुसार पुरवठादार यांना दि. २४.०७.२०२१ रोजी समक्ष बोलविण्याचे ठरले होते. त्यानुसार पुरवठादार मे. व्हि. एम. डिस्ट्रीब्युटर्स, नासिक यांना दि. २३.०७.२०२१ रोजी फोनवर निरोप देण्यात आला होता. तथापी ते उपस्थित नव्हते. त्यांनी डेअरीचे प्रतिनिधी श्री. रोकडे यांना समक्ष दि. २४.०७.२०२१ रोजी शिर्डी येथे पाठविले होते.

दरम्यान दि. २४.०७.२०२१ रोजी सकाळी ११. वाजता डेअरीचे प्रतिनिधी श्री. रोकडे यांचे समक्ष मा. मुख्य कार्यकारी अधिकारी महोदय, मा. प्रशासकीय अधिकारी श्री. जगताप, प्र. अधीक्षक, कॅन्टीन विभाग, श्री. डांगे यांचेशी एकत्रित झालेल्या चर्चेत सदर पुरवठादाराने दि.०५.०७.२०२१ ते २४.०७.२०२१ या कालावधीत दूधाचा पुरवठा संस्थानचे मागणीप्रमाणे नसल्याचे श्री. डांगे यांनी समक्ष सांगितले. तसेच सदर पुरवठादाराने पुरविलेल्या ०२ पिशव्यांवर मॅन्युफॅक्चरींग व एक्सपायरी डेट नसल्याचे आढळून आले. ही बाब श्री. रोकडे डेअरीचे प्रतिनिधी यांना दाखविण्यात आली होती.

त्यानंतर याबाबत चर्चा होऊन मा. मुख्य कार्यकारी अधिकारी महोदय यांनी मे. व्हि. एम. डिस्ट्रीब्युटर्स, नासिक यांचा पुरवठा आदेश त्वरीत रद्द करण्याच्या सुचना दिल्या आहेत. तसेच संस्थानची अडचण होऊ नये म्हणुन मागील पुरवठादार मे. स्वामी समर्थ डिस्ट्रीब्युटर्स, तीसगाव व मे. गोदावरी खोरे. ना. प. पा. ता. सह. दुध संघ,कोपरगाव यांनी संस्थानला गेले ०५-०६ वर्षापासून चांगल्या दर्जाचे दूधाचा पुरवठा केला आहे त्यामुळे त्यांचेकडून दूध खरेदी करण्याच्या सुचना केल्या होत्या. त्यास अनुसरुन मे. गोदावरी खोरे. ना. प. पा. ता. सह. दुध संघ,कोपरगाव यांचेशी संपर्क करुन संस्थानची दूधाची नविन ई-निविदा प्रक्रीया होईपर्यंत त्यांना वरील मे. व्हि. एम. डिस्ट्रीब्युटर्स, नासिक यांचे दरात रु.३४.५० पैसे प्रती लिटर दराने पुरवठा करण्याबाबत विनंती केली असता त्यांनी ती मान्य करुन तसा ई-मेल पाठविला आहे. तसेच मे. स्वामी समर्थ डिस्ट्रीब्युटर्स, तीसगाव यांना देखील याबाबत विचारणा केली होती ते ही या दरात दूध पुरविण्यास तयार आहेत. असे फोनवर सांगितले होते तथापी अद्याप त्यांचा ई-मेल प्राप्त न झालेमुळे त्यांचेशी संपर्क केला असता त्यांनी त्यांच्या संघाच्या सभेत आज चर्चा होईल त्यानंतर ई-मेल देतो असे सांगितले आहे.

वरील निर्देशानुसार दि.२५.०७.२०२१ पासुन मे. व्ही.एम डिस्ट्रीब्युटर्स, नाशिक यांचा दूध पुरवठा बंद केलेला आहे व मे. गोदावरी खोरे. ना. प. पा. ता. सह. दुध संघ,कोपरगाव यांचेकडून तुर्त ०८ दिवसांसाठी दूध खरेदी करण्यात येत आहे.

दरम्यान सदर पुरवठादार यांनी दि.२५.०७.२०२१ रोजी मा. मुख्य कार्यकारी अधिकारी महोदय यांची समक्ष भेट घेतली त्यावेळी मा. उप मुख्य कार्यकारी अधिकारी, मा. मुख्यलेखाधिकारी, मा.प्रशासकीय अधिकारी श्री. जगताप साहेब, प्र. अधीक्षक, कॅन्टीन श्री. डांगे, प्र. अधीक्षक, खरेदी, श्री. कुलकर्णी हे उपस्थित होते. त्यावेळी श्री. जगताप साहेब व श्री. डांगे, प्र. अधीक्षक यांनी मे. व्हि. एम. डिस्ट्रीब्युटर्स, नासिक यांचा दूधाचा पुरवठा सुरु झाल्यापासून तो मागणीप्रमाणे नसल्याचे सांगितले होते. यावेळी मा. मुख्य कार्यकारी अधिकारी महोदय यांनी मे. व्हि. एम. डिस्ट्रीब्युटर्स, नासिक यांना तुमच्याकडून संस्थानला दुधाचा पुरवठा व्यवस्थित न झाल्यामुळे तुमचेकडून संस्थानला दूध खरेदी करावयाचे नाही असे समक्ष निर्देशीत केले आहे व त्यांची संस्थानकडे जमा असलेली डिपॉझिटची रक्कम जप्त करण्याचे ही निर्देश दिले आहेत.

कॅन्टीन विभागाने मे. व्हि.एम. डिस्ट्रीब्युटर्स, नासिक यांनी पुरविलेल्या दूधाबाबतचा लेखी अहवाल दि. २७.०७.२०२१ रोजी सायंकाळी ०५.०५ वाजता खरेदी विभागाकडे पाठविलेला आहे. त्याचा तपशील खालीलप्रमाणे :-

"कॅन्टीन विभागास आवश्यक असणारे गाय दूधासाठी आपले मार्फत मे.व्ही.एम डिस्ट्रीब्युटर्स, नाशिक यांना मधूर ब्रॅन्ड, होमोजिनाईज्ड व पाश्चराईज्ड, ३.५ फॅट, ८.५ एसएनएफ टोन्ड गाय दूधाचा जा.नं.एसएसएस/वशी-खरेदी/१०९१/२०२१ दि.०१/०७/२०२१ अन्वये पुरवठा आदेश देणेत आलेला असुन दि. ०५/०७/२०२१ रोजी पासुन गाय दूधाचा पुरवठा चालु झालेला आहे.

संबंधीत पुरवठा धारकाकडुन दि.०५/०७/२०२१ ते दि.१३/०७/२०२१ रोजी पर्यंतचे दूधाची फॅट व एसएनएफ पुरवठा आदेशाप्रमाणे होते परंतु त्यानंतर येणा-या दूधाची प्रतवारी कमी येत असल्याने व वास येत असल्याचे आपणांस तोंडी समक्ष कळविले होते. त्यावर आपले मार्फत पुरवठा धारकास दूरध्वनीद्वारे कळविले असता पॅकिंग पिशवी खराब असल्याने वास येत असल्याचे मान्य करून पॅकिंग पिशवी बदलुन दिले.

मा.चेअरमन साहेब यांच्या कुंटूंबियांनी दि.२३/०७/२०२१ रोजी साईनिवास अतिथीगृह येथे कॉफी मागितल्यानंतर सदर कॉफीचा वास येत असल्याचे तेथील कर्मचा-यांना निर्देशनास आणुन दिले. दि.२४/०७/२०२१ रोजी सकाळी गुरूस्थान अभिषेक, पुजेनंतर मा.वरिष्ठ अधिकारी यांना चहा, दूध दिले असता दूधाचा आंबट वास येत होता तसेच सकाळी १०.०० साई सभागृह येथे मा.मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे आढावा बैठकीवेळी साई सभागृह येथील कर्मचा-यांनी दुध तापविलेनंतर त्या दूधाचा उग्र वास येत असल्याचे सर्व अधिकारी यांचे निर्देशनास आले. त्यावेळी मे.व्ही.एम डिस्ट्रीब्युटर्स, नाशिक यांचे प्रतिनिधी श्री रोकडे समक्ष हजर होते व त्यांनीही प्रत्यक्ष दुधाचा उग्र वास येत असलेचे मान्य केलेले होते.

त्यामुळे दि.२४/०७/२०२१ रोजी प्रशासकिय अधिकारी डॉ.आकाश किसवे व श्री चंद्रकांत डांगे प्र.अधिक्षक कॅन्टीन विभाग यांनी पंचासमक्ष साईनाथ मंगलकार्यालय येथील बिल्डींग मध्ये असलेल्या कॅन्टीन मध्ये आवक झालेल्या मे.व्ही.एम डिस्ट्रीब्युटर्स, नाशिक यांचे मधूर ब्रॅडच्या दूधाचा पंचनामा केला व त्याचे व्हिडिओ शुटींगही केले .

मे. व्हि.एम. डिस्ट्रीब्युटर्स, नाशिक यांचेकडील दूध पुरवठा चालू केल्यानंतर अनेकदा काही पिशव्यांवर मॅन्यु. व एक्सपायरी डेटचा उल्लेख आढळुन आलेला नाही, कधी कधी दुध तापविलेनंतर त्या दुधाचा उग्र वास येत असल्याचे आपणांस व पुरवठाधारकास वेळोवेळी फोनद्वारे कळविण्यात आलेले होते. तसेच दि.०९/०७/२०२१ रोजी आलेल्या दुधापैकी ७५ लिटर खराब दूध व दि.२२/०७/२०२१ रोजी १६ लिटर लिकेज दूध पुरवठा दाराने बदलुन दिलेले आहे. तसेच दि.१४/०७/२०२१ पासुन फॅट व एसएनएफ कमी येत असल्याचेही पुरवठा धारकास दुरध्वनीद्वारे कळविणेत आलेले आहे.

सदर दुधाची कॅन्टीन कडे असलेल्या फॅट ॲनालायझर मशिनव्दारे दररोज प्रतवारी चेक केलेली असुन त्याचा तपशिल खालील प्रमाणे आपले माहीतीसाठी सादर"

| दिनांक | आवक झालेले दूध लिटर मध्ये | फॅट | एसएनएफ |
|---|---|---|---|
| ०५/०७/२०२१ | २०० | ४.६ | १०.९ |
| ०६/०७/२०२१ | २०० | ४.६ | १०.८ |
| ०७/०७/२०२१ | २०० | ४.६ | १०.९ |
| ०८/०७/२०२१ | २०० | ४.६ | ११.० |
| ०९/०७/२०२१ | २०० | ४.४ | १०.५ |
| १०/०७/२०२१ | २०० | ४.५ | १०.६ |
| ११/०७/२०२१ | २०० | ४.५ | १०.६ |
| १२/०७/२०२१ | २०० | ४.५ | १०.८ |

| दिनांक | आवक झालेले दूध लिटर मध्ये | फॅट | एसएनएफ |
|---|---|---|---|
| १३/०७/२०२१ | २०० | ३.९ | ९.२ |
| १४/०७/२०२१ | २०० | ३.४ | ८.१ |
| १५/०७/२०२१ | २०० | ३.३ | ७.८ |
| १६/०७/२०२१ | २०० | ३.२ | ७.५ |
| १७/०७/२०२१ | २०० | ३.१ | ७.५ |
| १८/०७/२०२१ | १९६ | ३.३ | ८.० |
| १९/०७/२०२१ | २०० | ३.४ | ८.१ |
| २०/०७/२०२१ | १९८ | ३.२ | ७.६ |
| २१/०७/२०२१ | २५० | ३.३ | ७.८ |
| २२/०७/२०२१ | २३४ | ३.४ | ८.१ |
| २३/०७/२०२१ | २५० | ३.३ | ७.८ |
| २४/०७/२०२१ | २५० | १.८ | ४.३ |
| एकुण | ४१७८ | | |

वरील अहवालाचे अवलोकन करता मे. व्हि. एम. डिस्टीब्युटर्स, यांनी दि. ०५.०७.२०२१ पासून दूध पुरवठा सुरु झाल्यानंतर दि.१३.०७.२०२१ पर्यंत चांगल्या प्रतीच्या दूधाचा पुरवठा केला असल्याचे वरील कॅन्टीन विभागाने दिलेल्या आकडेवारी वरुन दिसुन येते.

कॅन्टीन विभागाने ज्यावेळी दुधाला वास येतो असे खरेदी विभागाकडे कळविले होते. त्यावेळी पुरवठादाराला याबाबत सुचित केले होते. तसेच कॅन्टीन विभाग लिपीक, श्री. निकम यांना सदर दुधाची लॅब तपासणी करुन घेण्याचे ही सुचित केले होते.

कॅन्टीन विभागाकडे चौकशी करता, मे. व्हि.एम. डिस्ट्रीब्युटर्स, नासिक यांनी पुरविलेले सर्व दूध वापरण्यात आलेले आहे.

दूधाच्या पुरवठ्याबाबत पुरवठा आदेशात दिलेल्या याबाबतच्या अटी शर्ती खालीलप्रमाणे:-

२- पुरवठा कालावधी, पुरवठा करावयाचे दूधाचे स्पेसिफीकेशन, ब्रॅन्ड, अंदाजे परिमाण व दूधाचे मंजूर

दर वगैरे सर्व तपशील सोबतचे परिशिष्टात नमूद केला आहे. त्याप्रमाणे दुधाचा पुरवठा करावा लागेल. संस्थानचे कॅन्टीन विभागाकडून पुरविले जाणारे दुधाची दररोज तपासणी करून त्यांना योग्य वाटल्यास स्विकारले जाईल. पुरवठा आदेशात दिलेले स्पेसिफिकेशन व ब्रॅन्डप्रमाणे दुध पुरविण्याची दक्षता घ्यावी.

१०- ज्या ब्रॅण्डच्या निविदा मंजूर होतील त्याच ब्रॅण्डचे दुध पुरवावे लागेल. वेगळ्या ब्रॅण्डचे दुध स्विकारले जाणार नाही. खराब दुधाचा पुरवठा झाल्यास ते स्वखर्चाने तात्काळ परत घेऊन जाणे आपणांवर बंधनकारक राहील. ते न नेल्यास, त्या दूधाची नासधूस झाल्यास त्यास संस्थान जबाबदार राहणार नाही.

११- टोन्ड गाय दूध होमोजीनाईज्ड व पाश्चराईज्ड (३.५% फॅट, ८.५ एसएनएफ) गुणप्रतीचे, १/२ लिटर पॉलीथीन पॅकिंगमध्ये पुरविणे बंधनकारक आहे. त्यापेक्षा कमी गुणप्रतीचे दूध पुरविल्यास मा.दुग्धविकास मंत्रालय, महाराष्ट्र शासन निर्णय क्रं.एमएलके १०९९/प्रक्र३२१/पदुम८ दि.२७/१२/२००० मधील दूध खरेदीबाबतच्या मार्गदर्शनानुसार प्रत्येक ०.१ कमी फॅटसाठी रु.०.३५ पैसे कपात करणेत येईल.

१३- पुरवठा करीत असलेल्या दूधाची Quantity जास्त असल्यामुळे, संस्थानकडून Randomly Sample घेऊन दूध स्वीकारले जाते. तथापी दूध स्विकारलेनंतरही एखादा लॉट अगर काही दूध खराब आढळल्यास ते स्वखर्चाने बदलून द्यावे लागेल.

१४- दूध पुरवितांना FSSAI कायदयातील तरतुदीनुसार दूधाच्या ५०० मिलीच्या प्रत्येक पिशवीवर Date of Packing, Quantity and Best Before Date चा स्पष्ट उल्लेख असावा.

१५- पुरवठा आदेशातील पुरवठा केलेल्या दूधामध्ये भेसळ अथवा ते कमी प्रतीचे आढळल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी आपली राहील.

१७- पुरविलेल्या दूधाची गरजेनुसार संस्थान प्रयोगशाळा/जिल्हा आरोग्य प्रयोगशाळा/ NABL/केंद्र शासनाच्या/राज्य शासनाच्या मान्यता प्राप्त प्रयोगशाळेतून तपासणी करणेत येईल.

३०- आपण दुधाचा पुरवठा करावयाचे नाकारल्यास तसेच संस्थानने नमूद केलेले कुठल्याही अटी-शर्तींचा भंग आपल्याकडून झाल्यास सुरक्षा अनामत रक्कम जप्त करण्यात येऊन आपले नांव पुढील ३ वर्षासाठी काळया यादीत समावेश केले जाईल. याबाबत मा.तदर्थ समिती/मा.व्यवस्थापन समिती/मा.उपसमिती/मा.मुख्य कार्यकारी अधिकारी जो निर्णय घेतील तो आपणावर बंधनकारक राहील. याबाबत आपली काहीही तक्रार चालणार नाही.

सदर पुरवठादाराकडून दूध पुरवठा बंद केल्यामुळे याकामी नव्याने ई-निविदा प्रक्रीया करावी लागेल व ई-निविदा अंतिम होऊन पुरवठा आदेश देईपर्यंत संस्थानला आवश्यक असणारे टोंड गाय दूध

पुर्वीचे पुरवठादार मे. गोदावरी खोरे. ना. प. पा. ता. सह. दुध संघ,कोपरगाव व मे. स्वामी समर्थ डिस्ट्रीब्युटर्स, तीसगाव यांचेकडून, वरील नमूद विशेष अपवादात्मक परिस्थिती अचानक निर्माण झालेमुळे खरेदी करावे लागेल. पुढील ०१ वर्षाचे दूध खरेदीसाठी ई-निविदा प्रक्रीया करुन अंतिम निर्णय होणेकामी साधारण ४०-४५ दिवसांचा किमान कालावधी अपेक्षित आहे.

ई-निविदा प्रक्रीया पूर्ण होईपर्यंत कॅन्टीन विभागाकडून आवश्यक असणा-या दूधाची मागणी घेण्यात आली आहे. यामध्ये कॅन्टीन विभागाने ४५ दिवसांसाठी मंदिर चालू न झाल्यास ११००० लिटर दूधाची गरज लागेल व याकामी रु.३,७९,५००/- पर्यंत अंदाजे खर्च येईल. तर मंदिर चालू झाल्यास सरासरी ०१ दिवसासाठी १८०० लिटर दूध गृहीत धरुन ४५ दिवसांसाठी ८१००० लिटर अंदाजे दूध लागेल व त्यासाठी रक्कम रु.२७,९४,५००/- इतका अंदाजे खर्च येईल असे कळविले आहे.

प्रस्ताव:- वरील नमुद सर्व वस्तुस्थिती विचारात घेता खालीलप्रमाणे प्रस्तावित करण्यात येत आहे.

१. मे. व्हि.एम. डिस्ट्रीब्युटर्स, नासिक यांना ३१ मार्च २०२२ पर्यंतचा दिलेला पुरवठा आदेश रद्द करणेस
२. मे. व्हि.एम. डिस्ट्रीब्युटर्स, नासिक यांची बयाणा रक्कम रु. ३,००,०००/- जप्त करुन संस्थान जमा करणेस
३. मे. व्हि.एम. डिस्ट्रीब्युटर्स, नासिक यांचा दूध पुरवठा बंद केलेनंतर पुर्वीचे पुरवठादार मे. गोदावरी खोरे. ना. प. पा. ता. सह. दुध संघ,कोपरगाव मे. स्वामी समर्थ डिस्ट्रीब्युटर्स, तीसगाव यांचेकडून ०८ दिवसासाठी रु. ३४.५० पैसे प्रती लिटर नुसार गरजे प्रमाणे खरेदी करण्यात येत असलेल्या दुध खरेदीस व येणारे खर्चास कार्योत्तर मान्यता मिळणेस
४. नविन निविदा प्रक्रीया अंतिम होईपर्यंत ४५ दिवसांसाठी मंदिर चालू न झाल्यास खरेदी करावे लागणा-या अंदाजे ११००० लिटर दूध खरेदीस व याकामी येणारे अंदाजे रु.३,७९,५००/- आणि मंदिर चालू झाल्यास ८१००० लिटर अंदाजे दूध खरेदीस व याकामी येणारे अंदाजे रु.२७,९४,५००/- चे खर्चास व ही दूध खरेदी पूर्वीचे पुरवठादार मे. गोदावरी खोरे. ना. प. पा. ता. सह. दुध संघ,कोपरगाव मे. स्वामी समर्थ डिस्ट्रीब्युटर्स, तीसगाव यांचेकडून रु. ३४.५० पैसे प्रती लिटर प्रमाणे करणेस
५. सप्टेंबर-२०२१ पासून ते ऑगस्ट-२०२२ पर्यंत टोंड गाय दूध खरेदीची नविन ई- निविदा प्रक्रीया राबविणेस व याकामी वर्तमानपत्रात द्यावयाचे जाहिरात खर्चास

वरील १ ते ५ प्रमाणे प्रस्तावित कार्यवाहीस मान्यता मिळणेसाठी सदरचा विषय मा. तदर्थ समिती सभेसमोर सादर.

२९/७/२१

(कान्हूराज बगाटे, भा.प्र.से)
मुख्य कार्यकारी अधिकारी
श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी

२९/७/२०२१

**विषय क्र.- ०७**

खरेदी विभाग

"मा.तदर्थ समितीचे सभेपुढे निर्णयार्थ सादर"

विषय – संस्थानचे प्रसादालय व लाडू निर्मिती विभागांसाठी मसाले, ड्रायफ्रुट्स व इतर किराणामाल खरेदीकामी ई- निविदा प्राप्त न्युनतम दराबाबत निर्णय होणेबाबत...

संस्थानचे प्रसादालय व लाडू निर्मिती विभागांसाठी मसाले, ड्रायफ्रुट्स व इतर किराणामाल खरेदीकामी ऑनलाईन ई-निविदा प्रक्रिया राबविण्यात आली होती. त्याचा तपशिल खालीलप्रमाणे-

| | | |
|---|---|---|
| ०१ | खरेदी करावयाचे साहित्य/वस्तुचा तपशिल | मसाले, ड्रायफ्रुट्स व इतर किराणामाल |
| ०२ | मागणी | ५ महिनेसाठी |
| ०३ | ई-निविदा प्रसिद्धी | दि.०६.०५.२०२१ ते २१.०५.२०२१<br>प्रथम मुदतवाढ दि.२४.०५.२०२१ ते ०३.०६.२०२१ |
| ०४ | वृत्तपत्राच्या अधिसूचनेच्या व्यतिरिक्त चौकशी कशी पाठवली जाते? | www.mahatenders.gov.in, संस्थान वेबसाईट, ई-मेल व पुरवठाधारकांना दुरध्वनीव्दारे. |
| ०५ | तर तसे, कोणाला पाठविले? | संस्थानकडे उपलब्ध असलेल्या १३ ई-मेल आय डी वर व फोन नंबरव्दारे |
| ०६ | निविदा सुरु झालेची दिनांक व वेळ | दिनांक- ०६.०५.२०२१<br>टेक्निकल बीड- ०७.०६.२०२१<br>कमर्शियल बीड- २६.०७.२०२१ |
| ०७ | प्राप्त निविदाकारांची संख्या | ०४ |
| ०८ | पात्र निविदाकारांची संख्या | ०४ |
| ०९ | सर्व निविदाकारांनी नमुने दिली आहेत का. | होय |
| १० | सर्व निविदाकारांनी बयाणा रक्कम आदा केली आहे का? | होय |
| ११ | जर नमुने दिले नाही, तर का. | - |

१२ निविदाकारांनी सादर केलेले दर (नमुने निवड झालेल्या निविदाधारकांचे दर)-

| Sr.No | Description | Quantity | Unit | Sr.No | Bidders Name | Rate in Tender Rs. |
|---|---|---|---|---|---|---|
| | **DRY FRUITS, SPICES AND & OTHER GROCERY MATERIAL** | | | | | |
| 1 | Chillies (Mirchi) Guntur, Akhand,Red Dethasah, Dry | 60 | Quintal | 1 | मे.महावीर ट्रेडलिंक्स, पुणे | 13,896.00 |
| | | | | 2 | मे.मिलन स्टोअर्स, मुंबई | 17,500.00 |
| | | | | 3 | मे.मन्नत ट्रेडर्स, नागपूर | 30,500.00 |
| 2 | Coriander Seeds (Dhane) - Akhand, Gavran, Stoneless | 60 | Quintal | 1 | मे.आर.एस. बजाज टी कंपनी, जयपूर | 9,348.00 |
| | | | | 2 | मे.महावीर ट्रेडलिंक्स, पुणे | 8,795.00 |
| | | | | 3 | मे.मिलन स्टोअर्स, मुंबई | 11,000.00 |
| 3 | Poppy Seed (Khaskhas) Best Quality | 0.70 | Quintal | 1 | मे.महावीर ट्रेडलिंक्स, पुणे | 208,800.00 |
| | | | | 2 | मे.मिलन स्टोअर्स, मुंबई | 175,000.00 |
| 4 | Star Anaise (Chakriful) Best Quality | 0.70 | Quintal | 1 | मे.महावीर ट्रेडलिंक्स, पुणे | 165,900.00 |
| | | | | 2 | मे.मिलन स्टोअर्स, मुंबई | 175,000.00 |
| | | | | 3 | मे.आर.एस. बजाज टी कंपनी, जयपूर | 153,240.00 |
| 5 | Black stone flower (Dagadful) Best Quality | 0.70 | Quintal | 1 | मे.महावीर ट्रेडलिंक्स, पुणे | 67,200.00 |
| | | | | 2 | मे.मिलन स्टोअर्स, मुंबई | 60,000.00 |
| 6 | Mace (Jaipatri) Best Quality | 0.70 | Quintal | 1 | मे.महावीर ट्रेडलिंक्स, पुणे | 260,400.00 |
| | | | | 2 | मे.मिलन स्टोअर्स, मुंबई | 180,000.00 |
| 7 | Almonds (अखंड बदाम) High Quality, Gummy & Brown, उच्च दर्जाचे,परिपक्व व भरीव | 18.00 | Quintal | 1 | मे.मिलन स्टोअर्स, मुंबई | 57,800.00 |
| | | | | 2 | मे.मन्नत ट्रेडर्स, नागपूर | 75,500.00 |
| | | | | 3 | मे.आर.एस. बजाज टी कंपनी, जयपूर | 64,870.00 |
| | | | | 4 | मे.महावीर ट्रेडलिंक्स, पुणे | 61,110.00 |

| | | Sr.No | Description | Quantity | Unit | Sr.No | Bidders Name | Rate in Tender Rs. |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | 8 | Melon Seeds/ Magaz Seeds (Magaj Bee) Best Quality | 14.40 | Quintal | 1 | मे.मिलन स्टोअर्स, मुंबई | 17,800.00 |
| | | | | | | 2 | मे.आर.एस. बजाज टी कंपनी, जयपूर | 17,610.00 |
| | | | | | | 3 | मे.महावीर ट्रेडलिंक्स, पुणे | 14,760.00 |
| | | 9 | Dry Ginger (Sunth) - Dry, Best Quality | 2.25 | Quintal | 1 | मे.महावीर ट्रेडलिंक्स, पुणे | 26,640.00 |
| | | | | | | 2 | मे.आर.एस. बजाज टी कंपनी, जयपूर | 26,370.00 |
| | | 10 | Baking Soda- (खाता सोडा) | 0.90 | Quintal | 1 | मे.मिलन स्टोअर्स, मुंबई | 3,600.00 |
| | | | | | | 2 | मे.आर.एस. बजाज टी कंपनी, जयपूर | 21,060.00 |
| | | | | | | 3 | मे.महावीर ट्रेडलिंक्स, पुणे | 4,500.00 |
| | | 11 | Liquid Glucose, (लिक्विड ग्लुकोज) Almost colourless,viscous liquid, Sweet in taste, Shelf life minimum 06 months, Use for food grade quality. | 1.60 | Quintal | 1 | मे.आर.एस. बजाज टी कंपनी, जयपूर | 5,460.00 |
| | | | | | | 2 | मे.मिलन स्टोअर्स, मुंबई | 7,800.00 |

१३ यापुर्वी केलेल्या खरेदीचा तपशील आणि खरेदी दर- सन २०२०-२१ चे निविदेतील न्यूनतम दर खालीलप्रमाणे आहेत-

| अ.नं. | मालाचा तपशील | दर प्रती क्विंटल रुपये |
|---|---|---|
| 1 | Coriander Seeds (Dhane) - Akhand, Gavran, Stoneless | 7,050/- |
| 2 | Chillies (Mirchi) Guntur, Akhand,Red Dethasah, Dry | 9,900/- |
| 3 | Poppy Seed (Khaskhas) Best Quality | 53,800/- |
| 4 | Star Anaise (Chakriful) Best Quality | 45,000/- |
| 5 | Mace (Jaipatri) Best Quality | 1,85,000/- |
| 6 | Dry Ginger (Sunth) - Dry, Best Quality | 27,300/- |
| 7 | Almonds (अखंड बदाम) High Quality, Gummy & Brown, उच्च दर्जाचे,परिपक्व व भरीव | नवीन खरेदी |
| 8 | Baking Soda- (खाता सोडा) | नवीन खरेदी |
| 9 | Melon Seeds/ Magaz Seeds (Magaj Bee) Best Quality | 11,100/- |
| 10 | Liquid Glucose, (लिक्विड ग्लुकोज) Almost colourless,viscous liquid, Sweet in taste, Shelf life minimum 06 months. Use for food grade quality. | नवीन खरेदी |
| 11 | Black stone flower (Dagadful) Best Quality | 45,000/- |

| | | |
|---|---|---|
| १४ | मागील वर्षात वापरण्यात आलेल्या परिमाणाचा तपशिल | - |
| १५ | सध्याची शिल्लक स्थिती | - |
| १६ | मागील खरेदी दर | अ.नं.१३ मध्ये नमूद केलेप्रमाणे |
| १७ | मागील पुरवठादार | मे.शगुन गृहउदयोग, औरंगाबाद व न्यूहिंद किराणा स्टोअर्स, नाशिक |
| १८ | सध्याचे न्युनतम निविदाकाराने सादर केलेले दर | अ.नं.१२ मध्ये गडद व अधोरेखित केलेप्रमाणे |
| १९ | सध्याचे न्युनतम निविदाकाराचे नाव | अ.नं.१२ मध्ये गडद व अधोरेखित केलेप्रमाणे |
| २० | सदर खरेदीचा प्रस्ताव खरेदी समिती समोर सादर करण्यात आला आहे का. | होय. |
| २१ | सदर खरेदीचा प्रस्ताव खरेदी समिती समोर सादर करण्यात आला असल्यास उपस्थितांची नावे. | मा.मुख्य कार्यकारी अधिकारी, मा. उपमुख्य कार्यकारी अधिकारी, मा.मुख्य लेखाधिकारी तथा प्रशासकीय अधिकारी, प्र.अधिक्षक, खरेदी |
| २२ | घाऊक आणि किरकोळ दर यांचे तपशील - | ----- |

| | मागील खरेदी | सध्याचे प्राप्त दर | फरक | % ने कमी/जास्त |
|---|---|---|---|---|
| २३ | रु. -- | रु. -- | रु. -- | -- |

२४ विभागाने मसाले, ड्रायफ्रुट्स व इतर किराणामाल खरेदीसाठी मंजुरी घेतलेली अंदाजे रक्कम रू. ३६,९२,७००/-

संक्षिप्त टीप – (प्रस्ताव)

संस्थानचे प्रसादालय व लाडू निर्मिती विभागासाठी मसाले, ड्रायफ्रुट्स व इतर किराणामाल ११ आयटेमचे खरेदीकामी ऑनलाईन ई-निविदा प्रक्रिया राबविण्यात आली होती. यामध्ये ०४ निविदाधारकांनी भाग घेतला होता. तांत्रिक निविदेमध्ये सर्व ०४ निविदाधारक पात्र ठरले होते. पात्र ठरलेल्या निविदाधारकांनी निविदेसोबत सादर केलेले वरील १ ते १० आयटेमचे नमुने प्रसादालय आचारी यांच्या समितीने दि.०१.०७.२०२१ रोजी निवडुन अंतीम केले होते. तर अ.नं.११ लिक्वीड ग्लुकोज निवडण्याचा आयटेम नसल्याचे आचारी यांनी सांगितले होते. त्यानंतर पात्र ०४ निविदाधारकांच्या कमर्शिअल निविदा खरेदी समितीचे दि.२६.०७.२०२१ चे सभेत उघडण्यात आल्या आहेत. त्यावरुन नमुने निवडलेल्या निविदाधारकांच्या व लिक्वीड ग्लुकोजचे तुलनात्मक दरांचा तक्ता वरील अ.नं.१२ रकान्यात सादर केलेला आहे.

Q/२७

वरील तक्त्यातील अ.नं.०३ खसखस, अ.नं.५ दगडफुल, अ.नं.६ जायपत्री, अ.नं.०९ सुंठ यासाठी दोनच निविदाधारकांचे दर दिसत आहे. तथापि सदर आयटेमसाठी ३ निविदा व नमुने प्राप्त आहेत. संस्थानचे दर्जानुसार खरेदीचे धोरण असल्यामुळे सदर आयटेमची खरेदी करण्यास हरकत नाही असे मत आहे. तर अ.नं.११ लिक्वीड ग्लुकोज आयटेम्ससाठी दोनच निविदाधारकांचे दर प्राप्त झालेले आहेत. तथापि सुधारीत खरेदी नियमावलीतील ४.४.३.१ (ब) दोन निविदा तांत्रिकदृष्टया पात्र ठरल्यास खरेदीची वास्तविक किंमत व अंगोदर ठरलेली अंदाजित किंमत यामध्ये (-)२० टक्के ते (+)१० टक्के तफावत असल्यास ती मान्य करण्यास खरेदीदार विभागास मुभा राहील. या तरतुदीप्रमाणे सदर लिक्वीड ग्लुकोजचे निविदेतील दर हे रू.४८००-६,६०० या प्राईसबॅन्ड मध्ये असणे गरजेचे आहे. लिक्वीड ग्लुकोजचे ऑनलाईन निविदा प्राप्त दर हे रू.५,४६०/-.प्रती क्विंटल आहेत व ते सदर तरतुदीतील नियमानुसार पात्र आहेत. त्यामुळे सदर न्युनतम दरधारकाच्या दराचा विचार करावा लागेल. असे मत आहे.

तसेच वरील अ.नं.१२ मध्ये नमूद तक्त्यातील आयटेम्सपैकी अ.नं.४ चक्रीफुल, अ.नं.९ सुंठ व अ.नं.११ लिक्वीड ग्लुकोजसाठी मे.आर एस बजाज टी कंपनी, जयपुर यांचे दर निवडलेल्या नमुन्यांमध्ये न्यूनतम आहेत. तथापि सदर निविदाधारक हे जयपुर येथील म्हणजेच महाराष्ट्र राज्याबाहेरील असल्यामुळे महाराष्ट्र शासनाचे सुधारीत खरेदी नियमावलीतील तरतूद क्रं.३.१.२.८ नुसार अ.नं.४ चक्रीफुल, अ.नं.९ सुंठ व अ.नं.११ लिक्वीड ग्लुकोज या आयटेम्ससाठी न्युनतम दरधारकाचे चर्चा वाटाघाटीनंतरचे अंतिम दराने अगर चर्चा वाटाघाटीमध्ये दर कमी न केल्यास निविदेतील दराने पुरवठा करण्यास तयार असल्यास ५० टक्के परिमाणाचे पुरवठा आदेश त्यांना दयावा लागेल. मात्र जर सदर व्दितीय न्यूनतम दरधारक एल-१ चे दरात पुरवठा करणेस तयार नसलेस पूर्ण परिमाणाचा पुरवठा आदेश मे.आर एस बजाज टी कंपनी, जयपूर यांना दयावा लागेल. सदर अ.नं.४ व ९ साठी मे.महावीर ट्रेडलिंक्स, पुणे व अ.नं.११ साठी मिलन स्टोअर्स,मुंबई हे महाराष्ट्रातील व्दितीय न्यूनतम दरधारक आहेत. याबाबत त्यांना विचारणा करुन त्यानुसार अंतिम निर्णय घ्यावा लागेल.

तरी उपरोक्त रकाना क्रं.१२ मधील तक्त्याप्रमाणे Itemwise न्युनतम निविदाधारक यांचेशी न्युनतम दरांबाबत चर्चा वाटाघाटी होऊन निर्णय होणेकामी सदरचा विषय मा.तदर्थ समिती समोर निर्णयार्थ सादर.

३०/७/२१

(कान्हूराज बगाटे,भा.प्र.से.)
मुख्य कार्यकारी अधिकारी
श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी

२९/७/२०२१

Δ 2θΜ0· 288

भांडार विभाग

"मा. तदर्थ समितीचे सभेपुढे निर्णयार्थ सादर"



विषयः- संस्थानचे भांडार विभागाकडील गाईचे शुध्द तुपाची ई-निविदा कम लिलाव अगर ई-लिलाव पद्धतीने विक्री करणेबाबत...

कोव्हिड-१९ चे प्रादूर्भावामुळे महाराष्ट्रासह संपूर्ण देशात अचानक दि.१८/०३/२०२० ते १५/११/२०२० या कालावधीत लॉकडाऊन झालेमुळे लाडू निर्मिती व भांडार विभागाकडे शिल्लक असलेले १,०५०.१५ क्विंटल शुध्द तुप पुरवठाधारक हर्ष फ्रेश डेअरी प्रा.लि. हरिव्दार यांचेकडून ते शुध्द तुप परत घेणेस तयार नसलेमुळे त्यांचेकडून शुध्द तुप बदलून घेण्यात आलेले होते, त्याचा तपशील खालीलप्रमाणे-

| अ.नं. | बदलून घेतलेले तुप (क्विंटल) | बॅच नं. व उत्पादन दि. | दर (प्रति क्विंटल) | एकुण किंमत (रु./पै.) | मुदत संपण्याची तारीख |
|---|---|---|---|---|---|
| ०१ | ३६०.००० (२,४०० डबे) | २५/ २२.१०.२०२० | २६,१००/- | ९३,९६,०००-/ | २१.०७.२०२१ |
| ०२ | ४७०.१०० (३,१३४ डबे) | २८/ २३.११.२०२० | २६,१००/- | १,२२,६९,६१०-/ | २२.०८.२०२१ |
| ०३ | २२०.०५० (१,४६७ डबे) | ०२/ ०५.०१.२०२१ | २६,१००/- | ५७,४३,३०५-/ | ०४.१०.२०२१ |
| एकूण- | १,०५०.१५० (७,००१ डबे) | | | २,७४,०८,९१५-/ | |

दि.१६/११/२०२० पासून महाराष्ट्रातील सर्व मंदिरे भक्तांसाठी खुली झाली होती. त्या तारखेपासूनच श्री साई मंदिर दर्शनासाठी साईभक्तांना खुले करण्यात आले होते. तथापि, लाडू व बुंदी प्रसाद, श्री सत्यनारायण पूजा चालू नसल्यामुळे दि.०४/१२/२०२० रोजी वरील शुद्ध तुपाचा वापर प्रसादालयाकडील शिरा प्रसादासाठी करणेबाबत प्रस्ताव सादर करण्यात आला होता, त्यास मान्यता मिळालेली होती, त्यानुसार प्रसादालयात शिरा प्रसादासाठी शुद्ध तुपाचा वापर चालू आहे.

शुद्ध तूप बदलून घेणेसाठी १ डबा वाहतूक खर्च+ प्रोसेसिंग चार्जस रु. १६१/- म्हणजेच १५ किलोचा एक डबा बदलून घेण्यासाठी साधारण रु. ३४३.९१ इतका खर्च आलेला आहे, म्हणजेच १ किलो तूप बदलुन घेणेसाठी साधारण रु.२२.९२ चे दरम्यान खर्च आलेला होता. याकामी वाहतूक खर्चासह वरील तुप बदलून घेणेकामी रु.२४,०७,७१६/- इतका एकूण खर्च आलेला होता.

श्रींच्या समाधी मंदिरातून दर्शन करुन येणाऱ्या प्रत्येक साईभक्तास दि.०६.०३.२०२१ पासून शुध्द तुपातील एक बुंदीचा लाडू वाटप करणेत येत होता. तसेच २०.०३.२०२१ पासून साईभक्तांना लाडूप्रसाद विक्रीही चालू करण्यात आली होती.

संस्थानने शुध्द तूप बदलून घेतलेनंतर प्रसादालय, लाडू व मंदिर विभागाने शुध्द तूपाचा वापर केलेला आहे, त्याचा तपशील पुढीलप्रमाणे-

| अ.नं. | विभागाचे नांव | वापरलेले तुप (क्विंटल) |
|---|---|---|
| ०१ | प्रसादालय | १०८.०० |
| ०२ | लाडू निर्मिती | ५९.२५ |
| ०३ | मंदिर नैवेदय कोठी | १.९५ |
| | एकुण वापर - | १६९.२० |

वरीलप्रमाणे शुध्द तूपाचा बदलून घेतलेनंतर आतापर्यंत वापर झालेला आहे. दि.३१/०३/२०२१ पासून श्री साईभक्तांना दर्शनानंतर केले जाणारे लाडू वाटप व लाडू विक्री बंद करण्यात आलेली होती.

दरम्यान महाराष्ट्र शासनाने कोव्हीड १९ चे वाढते प्रादुर्भावामुळे दि.५ एप्रिलपासून सर्व धार्मिक स्थळे भक्तांना दर्शनासाठी बंद केली होती. त्यास अनुसरुन श्री साई मंदिरही साईभक्तांना दर्शनासाठी बंद करण्यात आले होते. ते अजुनही बंद आहेत. त्यामुळे संस्थानचे प्रसादालय, लाडू निर्मिती व श्री साई सत्यव्रत पुजाही बंद आहेत.

वरीलप्रमाणे लॉकडाऊन चालू झालेमुळे दि.१२/०४/२०२१ चे टिपणीअन्वये भांडार विभागाकडे शिल्लक असलेले शुध्द तुपाचे वापराबाबतची माहिती अवलोकनार्थ सादर करण्यात येवून त्याबाबत मार्गदर्शनासाठी प्रस्ताव सादर करण्यात आला होता. त्यावर "सदयस्थितीत प्रसादालयाला त्यांचे मागणीप्रमाणे तुप उपलब्ध करुन दयावे" असे निर्देश झाले होते.

सदर निर्देशाची प्रत प्रसादालय विभाग व लाडू निर्मिती विभाग यांना देण्यात आली होती. प्रसादालय अधिक्षक यांचेशी याबाबत चर्चा केली असता, लाडू निर्मिती विभागाने त्यांचेकडे असलेले वापरलेले शुध्द तुप प्रसादालय विभागाला दिल्यामुळे तेथे त्या वापरलेल्या शुध्द तुपाचा वापर झालेला आहे. सध्या फक्त Hospital पेशंट, प्रसादालय स्टाफ व इतर मुकबधिर शाळा यांना जेवण चालू आहे, तसेच या दरम्यान कोव्हीड रुग्ण संख्याही कमी असल्यामुळे शि-यासाठी शुध्द तुपाचा वापरही अत्यंत कमी झाला आहे. शुद्ध तुपाचे दैनंदिन वापराची माहिती घेतली असता, सध्या प्रसादालयात दररोज सरासरी फक्त १५ किलो शुध्द तुप वापरले जात आहे.

सध्या शुध्द तूपाचा भांडार व लाडू निर्मीती विभाग यांचेकडे खालीलप्रमाणे साठा शिल्लक आहे, त्याचा तपशील खालीलप्रमाणेः-

| अ.नं. | शिल्लक असलेले तुप (क्विंटल) | १५ कि.ग्रॅम डब्यांची संख्या | दर प्रती ) (क्विंटल | एकुण किंमत ( रु.पै.) | मुदत संपण्याची तारीख |
|---|---|---|---|---|---|
| ०१ | २३०.२५ - भांडार<br>९.०० लाडू विभाग<br>(बॅच नं. २५/२२.१०.२०) | १,५३५<br>६०<br>१,५९५ | २६,१००-/<br>२६,१००/- | ६०,०९,५२५-/<br>२,३४,९००/-<br>६२,४४,४२५/- | २१.०७.२०२१ |
| ०२ | ४३१.८५<br>(बॅच नं. २८/२३.११.२०) | २,८७९ | २६,१००-/ | १,१२,७१,२८५-/ | २२.०८.२०२१ |
| ०३ | २२०.०५<br>(बॅच नं.२/ ०५.०१.२१) | १,४६७ | २६,१००-/ | ५७,४३,३०५-/ | ०४.१०.२०२१ |
| | ८९१.४२० | ५,९४१ | | २,३२,५९,०१५-/ | |

शासनाकडून मंदिरे भक्तांना दर्शनासाठी अजुनही बंद आहेत व शासनाचे मंदिरे खुली होण्यासाठी कधी आदेश होतील याबाबत निश्चितपणे काहीही सांगता येणार नाही.

वरील २३९.२५ क्विंटल शुध्द तुप मे. हर्ष फ्रेश डेअरी प्रॉडक्टस प्रा.लि. यांनी बदलून न दिल्यास, वर्तमानपत्रात ७ दिवसाच्या मुदतीची जाहिरात प्रसिध्दी देवून सदर शुध्द तुपाची जाहीर लिलावाव्दारे उच्चतम दराने विक्री करणेस व प्राप्त होणारी रक्कम संस्थान जमा करणेस मा. तदर्थ समितीची चक्रीय पद्धतीने दि. ०६.०७.२०२१ रोजी मान्यता मिळालेली होती. त्यास अनुसरुन मे. हर्ष फ्रेश डेअरी प्रॉडक्ट्स प्रा.लि. यांचेशी संपर्क साधला होता, परंतु त्यांचेकडून प्रतिसाद मिळालेला नाही. त्यामुळे वरील अ.नं.१ २३९.२५ क्विंटल शुध्द तूपाची ई-निविदा कम ई-लिलावाद्वारे विक्री करण्यासाठी उचित कार्यवाही करण्यात आलेली आहे. त्यानुसार शुद्ध तुपाचे विक्रीसाठी महाराष्ट्र शासनाचे वेबसाईटवर सुरु असलेले ई-निविदा कम ई-लिलाव ऑनलाईन प्रक्रियेची २ मुदतवाढीनंतरची मुदत दि.२९/०७/२०२१ रोजी सायंकाळी ५ वाजता संपली आहे व याबाबत पुढील कार्यवाही करण्यात येत आहे.

तथापि वरील ई-निविदा कम लिलाव प्रक्रिया केलेले शुद्ध तूपाव्यतिरिक्त सध्या भांडार विभागामध्ये खालीलप्रमाणे शुद्ध तूप शिल्लक आहे.

| अ.नं. | शिल्लक असलेले तुप (क्विंटल) | १५ कि.ग्रॅम डब्यांची संख्या | दर प्रती ) (क्विंटल | एकुण किंमत ( रु.पै.) | मुदत संपण्याची तारीख |
|---|---|---|---|---|---|
| ०१ | ४३१.८५<br>(बॅच नं. २८/२३.११.२०) | २,८७९ | २६,१००-/ | १,१२,७१,२८५-/ | २२.०८.२०२१ |
| ०२ | २२०.०५<br>(बॅच नं.२/ ०५.०१.२१) | १,४६७ | २६,१००-/ | ५७,४३,३०५-/ | ०४.१०.२०२१ |
| | ६५१.९०० | ४,३४६ | | १,७०,१४,५९०/- | |

शासनाचे मंदिर सुरु होण्याचे आदेश झाले व लाडू विक्री आणि मोफत बुंदी प्रसाद पाकिटे वाटप जर लगेचच चालू झाले तर सदर शुध्द तूपाचा वापर होऊन सदर तूपाचा साठा काही प्रमाणात संपू शकतो. तथापि, धार्मिक स्थळे चालू होणे, बुंदी व लाडू प्रसाद वाटप सुरु होणे या सर्व बाबींबाबत सध्या तरी अनिश्चितता आहे.

वरील वस्तुस्थिती विचारात घेऊन, वरील तक्त्यातील अ.नं. १ मधील बॅच नं. २८ चे ४३१.८५ क्विंटल शुद्ध तुपाची Expiry दि.२२.०८.२०२१ रोजी संपत असलेमुळे भांडार विभागाकडे शिल्लक असलेले ४३१.८५ क्विंटल शुद्ध तुप संस्थानने खरेदी केलेल्या प्रती क्विंटल रु. २६,१००/- दर Base Price निश्चित करुन त्यापुढे उच्चतम दराने ई-निविदा कम ई-लिलाव अगर ई-लिलावाद्वारे विक्री करणेस मान्यता मिळणेसाठी सदर विषय चक्रीय पध्दतीने दि.१३.०७.२०२१ रोजी मा. तदर्थ समितीसमोर सादर केलेला होता. त्यावर मा. अध्यक्ष महोदयांचे Since expiry date is more than one month away, it would be beneficial to see the result/ response to the e-tendering of previous lot. Secondly, TTD etc. may be contacted to purchase. असे निर्देश आहेत. तसेच मा. तदर्थ समितीचे उर्वरित दोन सदस्यांनीही मा.अध्यक्ष महोदय यांचे निर्देशाप्रमाणे कार्यवाहीस सहमती दर्शविली आहे.

वरील निर्देशामध्ये मा.अध्यक्ष महोदय यांनी तिरुपती देवस्थानला संपर्क करणेबाबत निर्देश दिले आहेत. तथापि, याचदरम्यान संस्थानकडून मा.कार्यकारी अधिकारी, तिरुमला तिरुपती देवस्थान, तिरुपती यांना इकडील जा.नं.एसएसएसटी/स्टोअर/१२५१/२०२१ दि.१२/०७/२०२१ अन्वये संस्थानकडील शुध्द तूप संस्थानने खरेदी केलेले दराने खरेदी करण्याची विनंती करण्यात आली होती. तसेच याबाबत जनरल मॅनेजर (खरेदी), मार्केटींग विभाग, टीटीडी यांचेशी मोबाईलवर पाठपुरावाही करण्यात आला होता.

तिरुमला तिरुपती देवस्थानने त्यांचेकडे गाईचे शुध्द तूपाचा आवश्यक साठा आहे व त्यांचा कोव्हीड १९ चे परिस्थितीमुळे वापरही सध्या कमी आहे. त्यामुळे संस्थानकडून शुध्द तूप ते खरेदी करु शकणार नसलेबाबत व त्याबद्दल दिलगीर असल्याचे दि.२७/०७/२०२१ चे डिजीटल साईन केलेले पत्राने कळविले आहे.

संस्थानने शुध्द तूप विक्रीसाठी प्रथम ई-निविदा कम लिलाव प्रक्रिया केली होती. यामध्ये निविदा कालावधी ७ दिवसांचा दि.१५/०७/२०२१ अखेर ठेवण्यात आला होता. यामध्ये प्रतिसाद मिळाला नसल्यामुळे प्रथम मुदतवाढ ७ दिवसांची दि.२२/०७/२०२१ अखेर देण्यात आली होती. त्यात एकच निविदा प्राप्त झाली होती. त्याची मुदत दि.२२/०७/२०२१ रोजी संपलेनंतर पुन्हा दुसरी व अंतिम मुदतवाढ दि.२९/०७/२०२१ अखेर देण्यात आली होती. यामध्येही एकच निविदा प्राप्त आहे. म्हणजेच या प्रक्रियेलाही पुरेसा प्रतिसाद दिसून येत नाही.

आता संस्थानकडे शिल्लक असलेल्या शुध्द तूपासाठी पुरवठादाराकडून बदलून घेणे व पुन्हा याकामी ईनिविदा कम लिलाव किंवा ई लिलाव पध्दतीने सदर शुध्द तूपाची विक्री करणे हेच पर्याय उपलब्ध आहेत. तथापि यामध्ये पहिला पर्याय पुरवठादाराकडून शुध्द तूप बदलून घेणेबाबत पुरवठादार मालक श्री.पोमिल जैन यांना खूप वेळा विनंती केली आहे, परंतु त्यांचे म्हणणे असे आहे की, माझा प्लॅन्ट सध्या बंद असल्यामुळे, मी हे तूप बदलून देऊ शकत नाही. त्यामुळे दुस-या पर्यायाप्रमाणे संस्थानकडील शिल्लक असलेले ४३१.८५ क्विंटल शुध्द तूप ई-निविदा कम लिलाव अगर ई-लिलाव पध्दतीने विकणेसाठीची प्रक्रिया करणेशिवाय दुसरा पर्याय दिसून येत नाही, असे मत आहे.

तरी वरील नमूद प्राप्त परिस्थितीत भांडार विभागाकडे शिल्लक असलेले ४३१.८५ क्विंटल शुद्ध तुप संस्थानने खरेदी केलेल्या प्रती क्विंटल रु. २६,१००/- दर Base Price निश्चित करुन त्यापुढे उच्चतम दराने ई-निविदा कम ई-लिलाव अगर ई-लिलावाद्वारे विक्री करणेस मान्यता मिळणेसाठी सदर विषय मा. तदर्थ समितीचे सभेसमोर सादर.

३०/७/२१

(कान्हूराज बगाटे, भा.प्र.से.)
मुख्य कार्यकारी अधिकारी
श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी

---

**विषय :- संस्थानचे मंदिर व मंदिर परिसरातील सर्व इमारतीमध्ये स्थायी अग्निशमन यंत्रणा उभारणी उभारणी करणेकामी मागविणेत आलेल्या ई – निविदानुसार प्राप्त न्युनतम दरधारकास कार्यारंभ आदेश देणेबाबत निर्णय होणेबाबत....**

**संदर्भ :-** १.मा.व्य.समितीचे दि.१९.०६.२०१६ रोजीचे सभेतील विषय क्रं ०१ व निर्णय क्रं ३२२ नुसार

२. मा.व्य.समितीचे दि.०४.०४.२०१८ रोजीचे सभेतील विषय क्रं ३७ व निर्णय क्रं २६० नुसार

३. मा.व्य.समितीचे दि.०८.१२.२०१७ रोजीचे सभेतील निर्णय क्रं १०७५ नुसार.

४. मा.तदर्थ समितीची सिव्हील ॲप्लीकेशन सादर करणेबाबत चक्रीय पदधतीने मान्यता

५. मा.औरंगाबाद हायकोर्ट यांचा सिव्हील अर्ज क्रं १३६६/२०२१ चे मान्यता

६. जा.न.एसएसएस/फायर ॲण्ड सेफ्टी/२९/२०२१ दि.१२.०५.२०२१ रोजीची मंजुर टिपणी.

७. दि.२१.०५.२०२१ रोजी प्राप्त निविदाधारकांचा उघडणेत आलेला वाणीज्यीक तक्ता.

८. महाराष्ट्र शासन उर्जा , उदयोग व कामगार विभाग शानिक्रं भांखस-२०१४/प्र.क्र.८२/भाग III उदयोग ४ अन्वये

९. सामान्य प्रशासन आवक क्रं.०२४१६ दि.२६.०५.२०२१ रोजीचे फायर सल्लागार यांचे पत्र.

१०. मे.अल्ट्रा फायरटेक सिस्टीम , पुणे यांचे चर्चा वाटाघाटी नंतरचे कळविलेले दर.

१४. फायर सल्लागार मे.ग्राफीक औरंगाबाद यांचे सन २०२१-२०२१ एस.एस.आर दर.

१५. जा.न.एसएसएस/फायर ॲण्ड सेफ्टी/७३/२०२१ दि.०३.०७.२०२१ रोजीची मंजुर टिपणी.

१६. सामान्य प्रशासन आवक क्रं. ५४७३ दि.२०.०७.२०२१ रोजीचे फायर सल्लागार यांचे पत्र.

**संस्थान अधिनियम तरतुद :-** अधिनियम २००४ मधिल तरतुद -१७ (२) (झ) मध्ये सर्वसाधारणपणे विश्वस्थव्यवस्थेची मालमत्ता व तिचे कामकाज योग्य प्रकारे व्यवस्थापन, देखभाल व प्रशासन करण्याच्या प्रयोजनासाठी आवश्यक असतील अशा सर्व गोष्टी करील, असे नमुद आहे.

**प्रस्तावना** :- श्री साईबाबा संस्थानचे सर्व इमारतीचे फायर ऑडीट लाईफ लाईन सर्व्हीसेस व सी.आय.एस.एफ. मुंबई यांचे मार्फत करण्यात आलेले होते. सदर ऑडीटमध्ये निघालेल्या त्रुटीचे निवारण करणेकामी मे.ग्राफीक इंफ्रास्ट्रक्चर प्रा.लि.औरंगाबाद यांची उपरोक्त संदर्भ क्रं०१ नुसार ( ई – निविदा प्रक्रियाव्दारे) संस्थानचे फायर सल्लागार म्हणून नेमणूक करण्यात आलेली आहे. फायर सल्लागार यांनी साई मंदिर व मंदिर परिसराची पहाणी करुन मंदिर परिसरात स्थायी अग्निशमन यंत्रणा प्रस्थापीत करणेकामी शासनाचे सुधारीत DSR / CSR नुसार अंदाजे ०२ कोटी १५ लाख खर्चाबाबतचा आराखडा सादर केलेला होता. त्यानुसार मंदिर परिसरात स्थायी अग्निशमन यंत्रणा प्रस्थापीत करणेकामी (स्थायी अग्निशमन यंत्रणा, हायड्रंट सिस्टीम, स्प्रिंकलर सिस्टीम, स्मोक डिटेक्टर, अलार्म सिस्टीम) ई - निविदा मागविणेस व त्याकामी येणाऱ्या अंदाजे २ कोटी १५ लाख मात्रचे खर्चास उपरोक्त संदर्भ क्रं०२ व संदर्भ क्रं ०४ नुसार मान्यता घेण्यात आलेली आहे.

प्रस्तावीत अग्निशमन यंत्रणा ऊभारणी कामी येणाऱ्या रक्कम रु २.१५ कोटी मात्रचे अपेक्षीत खर्चास मान्यतेकरीता मा.उच्च न्यायालय मुंबई , खंडपीठ औरंगाबाद यांचेकडे सिव्हील ॲप्लीकेशन सादर करणेत आले असता दि.१२.०२.२०२१ रोजीचे आदेशान्वये प्रस्तावीत खर्चास मान्यता मिळालेली आहे.

संदर्भ क्रं ०३ नुसार मा. व्यवस्थापन समितीचे दि.०८.१२.२०१७ रोजीचे सभेतील निर्णय क्रं.१०७५ नुसार श्री साईबाबा संस्थानमध्ये विविध कामांसाठी प्रसिद्ध करण्यात येणाऱ्या ई निवीदा सुचनांना उत्स्फुर्त प्रतिसाद मिळावा याकरीता ज्या विभागांच्या कामांसाठी शासनाच्या DSR नुसार अंदाजपत्रकीय खर्च दाखवावा लागतो , अशा कामाचे अंदाजपत्रक DSR / CSR नुसार करावे. मात्र अंदाजपत्रकीय रक्कमेच्या २० % कमी दराने ई - निवीदा प्रसिद्ध करणेत यावी. असा निर्णय झालेला असलेने प्रस्तावीत कामी महाराष्ट्र शासनाचे www.mahatenders.gov.in. या संकेतस्थळावर अपेक्षित खर्च रक्कम रु.२.१५ कोटी याची २० % रक्कम कपात करुन टेंडर व्हॅल्यु रक्कम रु.१,९१,०८,८८०/- मात्र प्रसिध्द करणेत आलेली होती.

त्यानुसार प्राप्त ई – निविदांचे तांत्रीक बीड दि.१०.०४.२०२१ रोजी उघडणेत आले असता खालील प्रमाणे ०३ ई - निवीदा प्राप्त झाल्या.

| अ.नं. | प्राप्त ई-निवीदा धारकांचे नांव |
|---|---|
| ०१ | मे.लाईफलाईन फायर सर्व्हीसेस , नासीक |
| ०२ | विनटेक्स फायर प्रोटेक्शन प्र.ली. नवी मुंबई |
| ०३ | अल्ट्रा फायरटेक सिस्टीम , पुणे |

तिनही निवीदाधारक पात्र असलेने त्यांचे वाणीज्यीक ई-निवीदा दि.२१.०५.२०२१ रोजी मा.खरेदी समितीचे समक्ष उघडणेत आले असता खालील प्रमाणे दर प्राप्त झालेले आहेत.

| अ.नं. | प्राप्त ई-निवीदा धारकांचे नांव | मंजुर / प्रस्तावीत (२.१५ कोटी ) रकमेतुन २० % | निवीदा धारकांचे प्राप्त दर | निविदेपेक्षा अधिकचे प्राप्त दर % |
|---|---|---|---|---|

| | | कपात करुन प्रसिद्ध करणेत आलेली ई-निविदा रक्कम | | 43 |
|---|---|---|---|---|
| ०१ | मे.लाईफलाईन फायर सर्व्हीसेस , नासीक | रु.१,९१,०८,८८०/- | रु.२,३६,९५,०११/- | + २४.००० |
| ०२ | मे.विनटेक्स फायर प्रोटेक्शन प्र.ली. नवी मुंबई | | रु.२,४५,८३,५७४/- | + २८.६५० |
| ०३ | **मे.अल्ट्रा फायरटेक सिस्टीम , पुणे** | | **रु.२,२८,३४,१५६/-** | **+१९.४९५** |

उपरोक्त तुलनात्मक दरानुसार प्रस्तावीत कामी अ.नं.०३ मे. अल्ट्रा फायरटेक सिस्टीम , पुणे यांचे दर रक्कम रु. २,२८,३४,१५६/- ( अक्षरी- दोन कोटी अठ्ठावीस लाख चौतीस हजार एकशे छप्पन्न मात्र ) निम्नतम आहेत. मात्र सदरचे दर ई-निवीदेत प्रसिध्द करणेत आलेली टेंडर व्हॅल्यु रक्कम ( रु.१,९१,०८,८८०/- ) रक्कमेपेक्षा + १९.४९५ % जास्त तसेच मंजुर रक्कम रु.२.१५ कोटी पेक्षा ६.२० % इतकी रक्कम अधिक आलेली आहे.

**संदर्भ क्रं ८ खरेदी नियमावली मधील ३.१.२.१ किमंतीचा अदांज** – खरेदीची वास्तविक किमंत व अंदाजित किमंत यामध्ये ( - ) २० % ते ( + ) १० % तफावत असल्यास ती मान्य करण्यास खरेदीदारास विचार करता येईल असे नमुद करणेत आलेले आहे. उपरोक्त तरतुदीनुसार प्रस्तावीत कामी मा.तदर्थ समितीत मंजुर रक्कम ( रु.२.१५ कोटी ) पेक्षा प्राप्त झालेले निम्नतम दर हे + १० % पेक्षा कमी ( ६.२० % ) इतके असल्याने त्यांचेशी मा.तदर्थ समितीचे वतीने मा.मुख्य कार्यकारी अधिकारी सो यांचेद्वारे दराबाबत चर्चा / वाटाघाटी करुन त्यांना कार्यादेश देणे तसेच पुढील कार्यवाही करणेबाबतचे मान्यतेकरीता मा.तदर्थ समितीचे सभेपुढे प्रस्ताव सादर करणेत आला होता त्यास दि.३१.०५.२०२१ रोजी चक्रीय पद्धतीने मान्यता मिळालेली आहे.

उपरोक्त मान्यतेनुसार निम्नत्तम ( एल-१ ) निविदाधारक मे.अल्ट्रा फायरटेक, पुणे यांना दराबाबत चर्चा / वाटाघाटी करीता संस्थानचे साई सभागृह येथे दि.२८/०६ /२०२१ रोजी मा.मुख्य कार्यकारी अधिकारी सो. यांचे समोर समक्ष बोलाविणेत आले असता त्यांनी निवीदेत दिलेले दरच रक्कम रु.२,२८,३४,१५६/- ( अक्षरी- दोन कोटी अठ्ठावीस लाख चौतीस हजार एकशे छपन्न मात्र ) अंतिम असलेबाबत सांगीतले तसेच संदर्भ क्रं १० नुसार लेखी कळविलेले होते त्यानुसार दि.०३.०७.२०२१ रोजी फायर विभागामार्फत टिपणी सादर करणेत आली असता मा.मुख्य लेखाधिकारी सो यांनी सल्लागार यांचे अभिप्राय घेणेत यावा तसेच निवीदा प्रक्रीया नव्याने राबविणेबाबत किंवा कार्यादेश देणेबाबत आदेश देण्याची काय कारणे आहेत ते नमुद करुन पुन्हा सादर करणेबाबत उपरोक्त संदर्भ क्रं.१२ चे टिपणीवर अभिप्राय दिलेला असल्याने त्यासबंधी फायर सल्लागार यांना अभिप्राय देणेबाबत दि.१२.०७.२०२१ रोजी फायर विभागाचे इ-मेल द्वारे कळविणेत आले होते.

**फायर सल्लागार यांचे अभिप्राय** - उपरोक्त दि.२०.०७.२०२१ रोजी संदर्भ क्रं १३ अन्वये फायर सल्लागार यांनी सदरील निवीदा तयार करतांना आपण सन २०१७ -२०१८ चे दर विचारात घेऊन तयार केली होती परंतु जेव्हा ई- निवीदा प्रसिद्ध केली तेव्हा आपण सदरील निवीदेचे दर २० टक्के कमी करुन ई-निवीदा प्रसिद्ध केली होती. सदरचे ई - निवीदा प्रक्रियेमध्ये निवीदाधारकांनी सादर केलेले दर हे खुप जास्त असुन त्याला शासकीय नियमानुसार आपणास मान्यता देता येणार नाही तसेच निवीदा प्रसिद्ध केल्या नंतर नियमा नुसार आपण निवीदा ज्या वर्षीचया दराने प्रसिद्ध केली आहे त्या दरांमध्ये फेर बदल करुन सध्याच्या दराने तुलना करु शकत नाही. त्यासाठी आपणास फेर निवीदा करावी लागेल.

तसेच जर आपल्या संस्थानच्या नियमावलीनुसार जर सदरील निविदेला नियमानुसार मंजुरी देता येत असेल तर आपण आपल्या स्तरावर योग्य तो निर्णय घेवुन योग्य ती कार्यवाही करणेत यावी असे कळविलेले आहे.

**विभागाचे मत / स्पष्ट अभिप्राय** – संस्थानचे मंदिर व मंदिर परिसरातील सर्व इमारतीमध्ये स्थायी अग्निशमन यंत्रणा उभारणी करणेसाठी खर्चाचे अंदाजपत्रक तयार करतेवेळी फायर सल्लागार मे.ग्राफीक इंफ्रास्ट्रक्चर प्रा.लि.औरंगाबाद यांनी सन २०१७ -२०१८ चे डि.एस.आर / सि.एस.आर चे सुचीनुसार दर घेवुन अंदाजपत्रक तयार केलेले होते.

चर्चा वाटाघाटीचेवेळी मा.मु.का.अ.महोदय यांनी सध्याचे एस.एस.आर. नुसार प्रस्थावीत कामी किती खर्च येईल? याबाबत विचारणा केली होती त्यानुसार फायर विभागाचे सल्लागार यांचेकडुन ई-निवीदा प्रसिद्ध केलेल्या कालावधीतील सन २०२० -२१ चे दर सुचीनुसार फायर हायड्रंट सिस्टीम , स्प्रिंकलर सिस्टीम व फायर अलार्म सिस्टीम बसविणेकामी यंणा-या खर्चाचा अंदाजपत्रक मागविणेत आले असता सन २०१७-१८ शासन S.S.R. दर व सन २०२१-२२ दर नुसार येणा-या अपेक्षित खर्चाचा व त्यामधील तफावतीचा तपशिल खालीलप्रमाणे.

| अ.नं. | कामाचा तपशिल | सन २०१७ -२०१८ D.S.R. / C.S.R नुसार दर | सन २०२०-२०२१ S.S.R. नुसार दर | तफावत / वाढीव रक्कम |
|---|---|---|---|---|
| ०१ | फायर हायड्रंट सिस्टीम - | रु.९८,२२,५००/- | रु.१,१२,८९,१४५/- | रु.१४,६६,६४५/- |
| ०२ | स्प्रिंकलर सिस्टीम - | रु.८९,५२,१००/- | रु.१,०५,१६,६८०/- | रु.१५,६४,५८०/- |
| ०३ | फायर अलार्म सिस्टीम - | रु.२७,८६,५५५/- | रु.४९,३९,१४७/- | रु.२१,५२,५९२/- |
| ०४ | एकुण रक्कम - | **रु.२,१५,६१,१५५/-** | **रु.२,६७,४४,९७२/-** | **रु.५१,८३,८१७/-** |

उपरोक्त तुलनात्मक तक्त्यानुसार सन २०१७ -२०१८ चे D.S.R. / C.S.R मध्ये व नविन २०२०-२०२१ चे सुधारीत एस.एस.आर मध्ये रु.५१,८३,८१७/- इतकी सुमारे २५ % वाढ झालेली आहे. तसेच सध्याचे एल-१ निविदाधारक मे.अल्ट्रा फायरटेक, पुणे यांचे अंतिम दर – रु.२,२८,३४,१५६/- (अक्षरी- दोन कोटी अठ्ठावीस लाख चौतीस हजार एकशे छप्पन मात्र ) असून

सदरचे दर मंजुर खर्चाचे रक्कम रु.२,१५,६१,१५५/- पेक्षा ६.२०% वाढीव आहेत. त्यामुळे शासन खरेदी नियमावलीमधील तरतुदीनुसार ई – निविदा प्रक्रियेतील L1 मे.अल्ट्रा फायरटेक, पुणे यांना प्रस्तावीत कामी कार्यादेश देता येईल असे नम्र मत आहे. 44

**विभागाची मागणी**- संस्थानचे मंदिर व मंदिर परिसरातील सर्व इमारतीमध्ये स्थायी अग्निशमन यंत्रणा उभारणी करणेकामी निम्नतम दरधारक मे.अल्ट्रा फायरटेक सिस्टीम , पुणे यांना कार्यादेश देणेबाबत

**प्रस्ताव** - संस्थानचे मंदिर व मंदिर परिसरातील सर्व इमारतीमध्ये स्थायी अग्निशमन यंत्रणा उभारणी करणेकामी सध्याचे एल-१ निविदाधारक मे.अल्ट्रा फायरटेक, पुणे यांचे दर रु.२,२८,३४,१५६/- आहेत. मात्र सदर दर स्विकृती संदर्भात संस्थान नियुक्त फायर सल्लागार मे.ग्राफीक इंफ्रास्ट्रक्चर प्रा.लि.औरंगाबाद यांचे अभिप्रायनुसार निविदाधारकाने सादर केलेले दर मुळ अंदाजीत रक्कम २.१५ कोटी मधुन २० % कमी करुन आलेली १,९१,०८,८८०/- पेक्षा खुपच जास्त असल्याने फेर निविदा काढावी लागेल.

मात्र विभागाचे अभिप्रायनुसार प्रकल्पाची अंदाजीत रक्कम रु.२.१५ कोटी ही सन २०१७ -२०१८ चे D.S.R. / C.S.R नुसार काढलेली आहे. तत्कालिन व्यवस्थापन समितीने घेतलेल्या निर्णयानुसार सदर टेंडरमध्ये २०% कमी करुन रु.१,९१,०८,८८०/- अशी अंदाजीत रक्कम निश्चित करुन ई – निविदा प्रसिध्द केलेली आहे. मात्र आताचे सन २०२०-२०२१ S.S.R नुसार अंदाजीत रक्कम रु.२,६७,४४,९७२/- येते. तसेच दर स्विकृतीचा विचार करतांना यापुर्वीचे व्यवस्थापन समितीने मुळ अंदाजीत रकमेपेक्षा कमी केलेली २० % रक्कम विचार न घेता मुळ अंदाजीत रक्कम रु २.१५ कोटी पेक्षा आलेला न्युनतम दर ६.२० % जास्त आहे. तर सन २०२०-२०२१ च्या SSR नुसार अंदाजीत रक्कम रु.२,६७,४४,९७२/- येते त्यानुसार यापुर्वी प्रसिध्द केलेल्या ई – निविदा टेंडरमधील आलेले न्युनतम दर रु. २,२८,३४,१५६/- हे १४.६२ % कमी आहे.

**दि.०१.१२.२०१६ च्या खरेदी नियमावली मधील तरतुदीनुसार** खरेदी वास्तवीक किमंत व अंदाजे किमंत यामध्ये ( - २० % ) व ( + १० % ) तफावत असल्यास ती मान्य करता येते. मात्र मा.तत्कालिन व्यवस्थापन समितीचे निर्णयानुसार कमी केलेली अंदाजीत किमंत व सन २०२१-२२ चे SSR प्रमाणे येणारी अंदाजीत किमंत व खरेदी नियामावलीतील तरतुद यांचा विचार करता न्युनतम दरधारक मे.अल्ट्रा फायर यांचे न्युनतम दर रु.२,२८,३४,१५६/- ( सर्व करांसहीत ) स्वीकृत करण्यास हरकत नाही अशी धारणा आहे .

तरी उपरोक्त प्रमाणे फायर विभागाचे सल्लागार मे.ग्राफीक इंफ्रास्ट्रक्चर प्रा.लि.औरंगाबाद यांचे अभिप्राय व संस्थानचे फायर विभागाचे अभिप्राय / मागणी यांचे अवलोकन होवून न्युनतम दरधारक मे .अल्ट्रा फायर टेक , पुणे यांचे रु.२,२८,३४,१५६/- दर स्विकृतीबाबत निर्णय होण्यासाठी प्रस्ताव मा.तदर्थ समितीसमोर निर्णयार्थ सविनय सादर..

28/7/21

(कान्हूराज बगाटे , भा.प्र.से.)
मुख्य कार्यकारी अधिकारी
श्री साईबाबा संस्थान विश्वस्थव्यवस्था ,शिर्डी

283/2021

**विषय :- संस्थानचे मंदिर व मंदिर परिसरातील सर्व इमारतीमध्ये स्थायी अग्निशमन यंत्रणा उभारणी करणेकामी मागविणेत आलेल्या ई – निविदानुसार प्राप्त न्युनतम दरधारकास कार्यारंभ आदेश देणेबाबत निर्णय होणेबाबत....**

**विवरण पत्र.**

| अ.नं. | प्रस्तावित विषयांचा तपशिल | मागणी | यापुर्वी अनुषंगीक झालेला सभेतील ठराव / तपशिल | विषयाशी निगडीत विधीवत तरतुद / G.R | शेरा |
|---|---|---|---|---|---|
| ०१ | संस्थानचे मंदिर व मंदिर परिसरातील सर्व इमारतीमध्ये स्थायी अग्निशमन यंत्रणा उभारणी करणेबाबत... | संस्थानचे मंदिर व मंदिर परिसरातील सर्व इमारतीमध्ये स्थायी अग्निशमन यंत्रणा उभारणी करणेकामी निम्नतम दरधारक मे.अल्ट्रा फायरटेक सिस्टीम , पुणे यांना कार्यादेश देणेबाबत | १. मा.व्य.समितीचे दि.१९.०६.२०१६ रोजीचे सभेतील विषय क्रं ०१ व निर्णय क्रं ३२२ नुसार ( सोबत परिशिष्ट १ जोडले आहे )<br>२. मा.व्य.समितीचे दि.०८.१२.२०१७ रोजीचे सभेतील निर्णय क्रं १०७५ नुसार ( सोबत परिशिष्ट २ जोडले आहे )<br>३. मा.व्य.समितीचे दि.०४.०४.२०१८ रोजीचे सभेतील विषय क्रं ३७ व निर्णय क्रं २६० नुसार (सोबत परिशिष्ट ३ जोडले आहे )<br>४.मा.तदर्थ समितीची सिव्हील अॅप्ली केशन सादर करणेबाबत चक्रीय पदधतीने मान्यता. ( सोबत परिशिष्ट ४ जोडले आहे )<br>५.मा.औरंगाबाद हायकोर्ट यांचा सिव्हील अर्ज क्रं १३६६/२०२१ चे मान्यता ( सोबत परिशिष्ट ५ जोडले आहे ) | अधिनियम २००४ मधिल तरतुद -१७ (२) (झ) मध्ये सर्वसाधारणपणे विश्वस्थव्यवस्थेची मालमत्ता व तिचे कामकाज योग्य प्रकारे व्यवस्थापन, देखभाल व प्रशासन करण्याच्या प्रयोजनासाठी आवश्यक असतील अशा सर्व गोष्टी करील, असे नमुद आहे. | |

तरी संस्थानचे मंदिर व मंदिर परिसरातील सर्व इमारतीमध्ये स्थायी अग्निशमन यंत्रणा उभारणी करणेकामी सध्याचे एल-१ निविदाधारक मे.अल्ट्रा फायरटेक, पुणे यांचे अंतिम दर रु.२,२८,३४,१५६/- मात्र स्विकारुन त्यांना प्रस्तावीत कामी कार्यादेश देणेकामी मान्यतेकरीता प्रस्ताव मा.तदर्थ समितीचे सभेपुढे निर्णयार्थ सादर...

२६/७/२१

( कान्हूराज बगाटे , भा.प्र.से.)
मुख्य कार्यकारी अधिकारी
श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिर्डी

विषय क्र.- ५० 



## मा. तदर्थ समितीचे सभेपुढे निर्णयार्थ.

(प्रकाशने विभाग)

**विषय - संस्थान आस्थापनेवरील कायम, कायम कंत्राटी, मानधन तत्वावरील / एकत्रित वेतनावरील तसेच व्हिजिटर्स म्हणून सेवा देणारे वैद्यकीय अधिकारी आदि यांना संस्थान प्रकाशित श्री साईबाबा दैनंदिनी-२०२१ ही देणगी मूल्य रुपये २५/- मात्र प्रति नग स्वीकारुन उपलब्ध करुन देणेबाबत ..**

## टिपणी.

**(अ)** संस्थान व्यवस्थापनामार्फत दरवर्षी श्री साईबाबा दैनंदिनी व दिनदर्शिका प्रकाशित करणेत येतात. या विविध प्रकारच्या दैनंदिनी व दिनदर्शिका साईभक्तांना सशुल्क उपलब्ध करुन दिल्या जातात. त्यानुसार प्रकाशने विभागामार्फत सन २०२१ ची श्री साईबाबा दैनंदिनी (१,५०,००० प्रती) व श्री साई दिनदर्शिका (०१ पानी / मोठी) (५०,००० प्रती) साईभक्तांना सशुल्क वितरीत करणेसाठी प्रकाशित करणेत आलेली आहे.

संस्थानमार्फत सन २०२१ ची वैशिष्ट्यपूर्ण श्री साईबाबा दैनंदिनी ही ०४ भाषेत (मराठी, हिंदी, इंग्रजी व तेलगू) स्वतंत्र्यरित्या प्रकाशित करणेत आलेली आहे. या दैनंदिनीत एकूण **२७ QR CODE** देणेत आलेले आहेत, सदरचे **QR CODE SCAN** केले असतां, संबंधित स्थानाची अथवा विभागाची माहिती विविध छायाचित्रांसह दृकश्राव्य पध्दतीने (Video Clip व्दारे) उपलब्ध होते. याव्यतिरिक्त संस्थान व्यवस्थापनामार्फत साजरे होणारे सर्व उत्सव, धार्मिक व इतर कार्यक्रमांची सविस्तर माहिती, संस्थान प्रकाशित पुस्तके / फोटो, ऑनलाईन देणगी, निवासस्थाने, दर्शन व आरती इत्यादीबाबत नोंदणी करणेबाबतची माहिती समाविष्ट करणेत आलेली आहे.

सध्या उपरोक्त दैनंदिनी व दिनदर्शिकेची विक्री पुस्तक / फोटो विक्री काऊंटर्सवर आणि ऑनलाईन बुकींगव्दारे मागणी नोंदविणारे भक्तांना पोष्ट पार्सलव्दारे पाठवून करणेत येत आहे.

**(ब)** वर नमूद केलेप्रमाणे वैशिष्टयेपूर्ण श्री साईबाबा दैनंदिनीची एक प्रत संस्थान आस्थापनेवरील कार्यरत अधिकारी / कर्मचा-यांना देणगी मुल्य रक्कम रुपये २५/- मात्र स्वीकारुन उपलब्ध करुन दिल्यास, भक्तनिवासस्थाने, लेखाशाखा, रुग्णालये, जनसंपर्क, मंदिर, सामान्य प्रशासन विभाग व अन्य विभागातील, विशेषतः ज्या विभागांतील अधिकारी व कर्मचा-यांचा भक्तांशी व इतर सर्वसामान्य जनतेशी विविध कारणांनी संबंध येतो, अशा विभागातील अधिकारी / कर्मचारी त्याचा वापर भक्तांना माहिती देणेसाठी निश्चितच करतील. याचे कारण असे की, सदरहू दैनंदिनीत जे २७ QR CODE देणेत आलेले आहेत, त्याची डिजीटल कार्यप्रणालीची लिंक सदर अधिकारी / कर्मचारी अशा भक्तांना व जनतेला सहजासहजी इलेक्ट्रॉनिक माध्यमाव्दारे, सोशल मिडियाव्दारे उपलब्ध करुन देऊ शकतात. तसेच याच दैनंदिनीत सदरचे अधिकारी / कर्मचारी हे आपले दैनंदिन कार्यालयीन कामकाजाच्या महत्वाच्या नोंदीही ठेवू शकतील. थोडक्यात, सदरचे दैनंदिनीचा वापर अधिकारी / कर्मचारी हे दैनंदिन कामकाजात निश्चितपणे करु शकतील.

तसेच, सध्या कोव्हीड १९ या संसर्गजन्य रोगाचे प्रादुर्भावात रुग्णालये विभागाकडील मानधन तत्वावरील / एकत्रित वेतनावरील / व्हिजीटर्स वैद्यकीय अधिका-यांनी आपली सेवा अत्यंत चांगल्या रितीने प्रदान केलेली आहे, अशा अधिकारी / कर्मचारी यांनाही संस्थान व्यवस्थापनामार्फत प्रत्येकी ०१ नग श्री साई दैनंदिनी ही देणगी मुल्य रक्कम रुपये २५/- मात्र प्रति नग स्वीकारुन उपलब्ध करुन देता येईल.

**(क)** सध्या संस्थान आस्थापनेवर श्री साईभक्तांना विविध मूलभूत सोयी-सुविधा विनाविलंब, विनासायास उपलब्ध करुन देणेसाठी विविध एकूण ४० विभाग कार्यरत असून, आस्थापनेवर माहे जून, २०२१ अखेर एकूण १७९१ कायम कर्मचारी, ५९३ कायम कंत्राटी कर्मचारी तसेच रुग्णालये, मालमत्ता, प्रकाशने आदि विभागाकडे मानधन तत्वावर / एकत्रित वेतनावर / व्हिजिटर्स वैद्यकिय अधिकारी असे अंदाजे १०० कर्मचारी असे एकूण २४८४ कर्मचारी कार्यरत आहेत. या कर्मचा-यांना संस्थान व्यवस्थापनामार्फत वर नमुद केलेली श्री साईबाबा दैनंदिनी – २०२१ ची प्रत्येकी ०१ प्रत देणगी मूल्य रक्कम रुपये २५/- मात्र प्रति नग स्वीकारुन उपलब्ध करुन देणेसाठी खालीलप्रमाणे खर्च अपेक्षित आहे -

| अ.नं. | तपशील | कर्मचारी संख्या | विक्री किंमत रु. ७०/- प्रति नग याप्रमाणे होणारी रक्कम रुपये | देणगी मूल्य रु. २५/- प्रति नग याप्रमाणे होणारी रक्कम रुपये | संस्थानावर पडणारा आर्थिक भार रुपये (४-५=६) |
|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ |
| ०१ | कायम कर्मचारी | १७९१ | १,२५,३७०/- | ४४,७७५/- | ८०,५९५/- |
| ०२ | कायम कंत्राटी कर्मचारी | ०५९३ | ४१,५१०/- | १४,८२५/- | २६,८८५/- |
| ०३ | रुग्णालये, मालमत्ता, प्रकाशने आदि विभागाकडे मानधन तत्वावर / एकत्रित वेतनावर / व्हिजिटर्स डॉक्टर्स म्हणून कार्यरत असणारे कर्मचारी (अंदाजे) | ०१०० | ७,०००/- | २,५००/- | ४,५००/- |
| | एकूण - | २४८४ | १,७३,८८०/- | ६२,१००/- | १,११,७८०/- |

कृ.मा.प. .. .. पान २ वर .. ..

D:/diary2021 employee sale note/vhbajaj/3

थोडक्यात, संस्थान आस्थापनेवर कार्यरत असणारे कायम, कायम कंत्राटी, मानधन तत्वावरील / एकत्रित वेतनावरील तसेच व्हिजिटर्स म्हणून सेवा देणारे वैद्यकीय अधिकारी आदि अंदाजे एकूण २४८४ अधिकारी / कर्मचारी यांना श्री साईबाबा दैनंदिनी – २०२१ ची प्रत्येकी ०१ प्रत देणगी मुल्य रक्कम रुपये २५/- मात्र स्वीकारुन उपलब्ध करुन दिल्यास, याकामी संस्थानवर रक्कम रुपये १,११,७८०/- मात्र इतका आर्थिक भार पडेल / आर्थिक भार म्हणून सहन करावी लागेल.

(ड) **प्रस्ताव** –

उपरोक्त परिच्छेदांमध्ये विवेचन केलेनुसार,

०१. माहे जून, २०२१ अखेर संस्थान आस्थापनेवरील विविध ४० विभागात कार्यरत असणारे कायम, कायम कंत्राटी, मानधन तत्वावरील / एकत्रित वेतनावरील तसेच व्हिजिटर्स म्हणून सेवा देणारे वैद्यकीय अधिकारी आदि अंदाजे एकूण २४८४ अधिकारी / कर्मचारी यांना संस्थान व्यवस्थापन प्रकाशित श्री साईबाबा दैनंदिनी - २०२१ ची प्रत्येकी०१ प्रत देणगी मुल्य रक्कम रुपये २५/- मात्र प्रति नग स्वीकारुन उपलब्ध करुन देणेस मान्यता मिळणेकामी,

०२. याकामी संस्थान व्यवस्थापनावर पडणारा आर्थिक भार अंदाजित रक्कम रुपये १,११,७८०/- मात्र (अक्षरी रुपये एक लाख अकरा हजार सातशे ऐंशी मात्र) किंवा प्रत्यक्षात होणारी रक्कम ही विहीत पध्दतीने लेखाशाखेमार्फत खर्ची टाकणेस मान्यता मिळणेकामी,

०३. वर नमुद केलेप्रमाणे मान्यता मिळालेस, विषयांकित कामी प्रत्यक्षात होणारे विक्रीनुसार, त्याचा खर्च किंवा आर्थिक भार हा प्रकाशने विभाग व लेखाशाखेमार्फत विहित पध्दतीने जमा-नांवे करणेस मान्यता मिळणेकामी सदरचा प्रस्ताव मा. तदर्थ समितीचे सभेपुढे निर्णयार्थ सादर.

२०/७/२१

कान्हुराज बगाटे (भा.प्र.से.),
**मुख्य कार्यकारी अधिकारी,**
श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी.

२०/७/२१

# मा. तदर्थ (Ad- hoc) समितीचे सभेपुढिल विषय

*विभाग - मेकॅनिकल*

**विषय :- श्रीसाईप्रसादालय करीता नविन आटा यूनिट खरेदी करणेकामी निविदा प्रक्रिया रद्द करुन फेर ई निविदा मागविणेबाबत..**

## टिपणी.

मान्यतेकरीता सविनय सादर,

**अधिनियमामधील तरतूद २०१४ :** (१) कलम २(१४)(घ) –भक्तांचे सुरक्षिततेसाठी किंवा सोयीसाठी आवश्यक ते तातडीचे दुरुस्तीचे काम किंवा उपाययोजना हाती घेणे. (२) कलम २१ (घ) - भक्तांना जेवण पुरविणे आणि अन्नछत्र चालवणे.

**प्रस्तावना :-** श्री साईप्रसादालयात चपाती व पुरीचा आटा तयार करणेकामी नविन आटा युनिटची उपयुक्तता व भविष्यातील गरज पाहता श्री साईप्रसादालया करीता नविन अत्याधुनिक डस्ट विरहीत आटा युनिट खरेदी करणेकामी विहीत पद्धतीने ई निविदा प्रक्रिया राबविणेस व त्याकामी येणा-या अंदाजे रक्कम रु. २४,९३,७५०/- मात्रचे खर्चास दिनांक १४.०१.२०२० रोजीचे मा. तदर्थ (Ad- hoc) समितीचे सभेतील निर्णय क्रं. १५ अन्वये मान्यता मिळालेली आहे.

**विषयाची पार्श्वभुमी :-** मा. तदर्थ (Ad-hoc) समितीचे मान्यता नुसार श्री साईप्रसादालया करीता नविन अत्याधुनिक डस्ट विरहीत आटां युनिट खरेदी करणेकामी निविदा महाराष्ट्र शासनाच्या www.mahatenders.gov.in या वेबसाईवर दिनांक २४.०८.२०२१ ई निविदा अपलोड करणेत आली होती. निविदा भरणेची अंतिम तारीख १०.९.२०२० होती सदर मुदतीत एकच निविदा प्राप्त झालेने दिनांक १७.९.२०२० पर्यंत मुदतवाढ देणेत आली. परंतु सदर कालावधीमध्येही एकच निविदा प्राप्त झालेली असलेने दिनांक २४.९.२०२० पर्यंत दुस-यांदा मुदतवाढ देऊनही एकच निविदा आलेने सदरची ई निविदा प्रकिया रद्द करुन फेर ईनिविदा मागविणेत आल्या. फेर ई निविदा प्रक्रिया मध्ये दोन वेळेस मुदतवाढ देऊनही दोनच ई निविदा प्राप्त झालेत.

महाराष्ट्र शासनाच्या खरेदी नियमावलीमध्ये शासन निर्णय क्र. भांखस २०१४/प्र.क. ८२/ भाग-III/ उद्योग ४ दिनांक १ डिसेंबर २०१६ मधील परिशिष्ट ४.४.३१ (ब) मध्ये " दोन निविदा तांत्रिकदृष्टया पात्र ठरलेस खरेदीची वास्तवीक किमंत व अगोदर ठरलेली अंदाजीत किमंत यामध्ये (-) २० टक्के ते (+) १० टक्के पर्यंत तफावत असल्यास ती मान्य करणेस खरेदीदार विभागास मुभा राहील. या किमंत श्रेणीमध्ये किमती न आल्यास फेरनिविदा काढावी" नमुद असलेने दिनांक १६.१२.२०२० रोजी ई निविदा तांत्रीक बीड उघडणेत आले. दोन्ही निविदा तांत्रिक दृष्टया पात्र ठरलेले दि. २५ जानेवारी २०२१ रोजी कर्मशियल बीड उघणेत आलेले असून दराचा तपशिल खालीलप्रमाणे आहे.

| अ.नं. | निविदाधारकाचे नाव | दिलेले दर | शेरा |
|---|---|---|---|
| १ | हाय-मेक अॅग्रो प्रोडक्ट, राजकोट, गुजरात | ३८,५०,५००/- | L2 |
| २ | तुलसी अॅगो इंजि. मेक. प्रा. लि. राजकोट, गुजरात | ३६,२७,७५०/- | L1 |

उपरोक्त तुलनात्मक तक्तानुसार अ. नं. २ मे. तुलसी अॅगो इंजि. मेक. प्रा. लि., राजकोट, गुजरात यांचे दर रक्कम रु. ३६,२७,७५०/- मात्र निम्नत्तम आहेत. मात्र सदरचे दर हे मंजुर अंदाजपत्रकीय किमंत रक्कम रु.२४,९३,७५०/- पेक्षा ४५% अधिक आहे.

**मागणी :-** महाराष्ट्र शासनाच्या खरेदी नियमावली मधील तरतुदीनुसार खरेदीची वास्तवीक किमंत व अगोदर ठरलेली अंदाजीत किमंत यामध्ये १० टक्केपेक्षा जास्त तफावत असलेने फेर ई निविदा काढावी लागणार आहे.

**विभागाचा स्पष्ट अभिप्राय व मत :-** दिनांक १४.०१.२०२० रोजीचे मा. तदर्थ (Ad- hoc) समितीचे सभेतील निर्णय क्रं. १५ अन्वये आटा युनिट खरेदी येणा-या अंदाजे रक्कम रु. २४,९३,७५०/- मात्रचे खर्चास मान्यता मिळालेली आहे. सदरचे अंदाजपत्रक तयार करतांना मागविणेत आलेल्या कोटेशन मध्ये आटा युनिटमधील आटाचा कॉन्टेक्ट मध्ये येणारे काही पार्ट हे एम. एस.चे होते. मात्र FSSI चे नियमावली नुसार आटा तयार झालेनंतरचे कॉन्टॅक्ट पार्ट एस. एस. चे असणे आवश्यक असलेने ई निविदा मध्ये आटा युनिटमधील प्रत्यक्ष आटाचा कॉन्टेक्ट येणारे युनिटचे पार्ट हे स्टे. स्टीलचे नमुद करणेत आलेले आहे. एम. एस. पेक्षा स्टेनलेस स्टील चे दर जास्त असलेने आटा युनिट खरेदी अंदाज पत्रकीय किमतीत वाढ करावी लागणार आहे.

पान नंबर २ वर ...

ERP- MEETING - 290





प्रस्तावीत कामी नव्याने अपेक्षीत खर्चाचे अंदाजाकरीता सदरचे पुरवठा करणारे विविध पुरवठादार यांचेकडून ईमेल द्वारे दरपत्रक मागविणेत आलेले असून पाप्त झालेले दर खालील प्रमाणे आहे.

| अ.नं. | पुरवठादार यांचे नाव | दिलेले दर |
|---|---|---|
| १. | मे. हायमेक अग्रो प्रॉडक्टस, राजकोट | ४०,४७,७५०.०० |
| २. | मे. तुलसी अग्रो इंजि. मेकॅ. प्रा. लि. वेरावल , गुजरात | ३८,२७,२५०.०० |
| ३. | मे. हिंदुस्थान अग्रो इंजिनिअरींग, वेरावल, गुजरात | २८,७८,९३२.०० |
| | **सरासरी = (१+२+३) /३** | **३५,८४,६४४.००** |
| | **एकुण पुर्णांकित रक्कम रूपये :** | **३५,८५,०००.००** |

उपरोक्त तुलनात्मक तक्तानुसार तिन्ही पुरवठाधारक यांचे दराचे सरासरी नुसार रक्कम रु.३५,८५,०००/- मात्र खर्च अपेक्षीत आहे. सदरची खरेदी महाराष्ट्र शासनाच्या www.mahatenders.gov.in या संकेत स्थळावर ई निविदा प्रसिद्ध करुन करता येईल. तसेच एका विभागीय स्तरावरील वर्तमान पत्रात आणि एका राज्य स्तरावरील वर्तमान पत्रात जाहीरात प्रसिद्ध करणेत येईल.

**प्रस्ताव :-** श्री साईप्रसादालयात चपाती व पुरीचा आटा तयार करणेकरीता नविन अत्याधुनिक डस्ट विरहीत आटा युनिट खरेदी करणेकामी

१ अंदाजे रक्कम रु. ३५,८५,०००/- (अक्षरी रक्कम रुपये पस्तीस लाख पंच्याऐशी हजार) मात्रचे सुधारित अंदाजपत्रकिय खर्चास

२ Tender ID 2020 _SAI_617898_1 हि केलेली ई निविदा प्रक्रिया रद्द करुन सुधारित अंदाजपत्रकीय खर्चानुसार फेर ई निविदा प्रक्रिया राबविणेस तसेच

३ याकामी एका विभागीय स्तरावरील वर्तमान पत्रात आणि एका राज्य स्तरावरील वर्तमान पत्रात जनसंपर्क विभागामार्फत जाहीरात प्रसिद्ध करणे.

उपरोक्त अ. १ ते ३ प्रमाणे मान्यता घेणेकामी मा. तदर्थ (Ad- hoc) समितीचे सभेपुढे निर्णयार्थ सादर.

३०।७।२१

(कान्हुराज बगाटे, भा.प्र.से.)
मुख्य कार्यकारी अधिकारी
श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था शिर्डी

२९.७

विषय क्र.- १२

# मा.तदर्थ (Ad-hoc) समिती सभेसमोर निर्णयार्थ सादर.

## (विधी विभाग)

**विषयः- मा. उच्च न्यायालयाचे मार्गदर्शन मिळणेकामी सिव्हील ॲप्लीकेशन दाखल करणेबाबत..**

**टिपणी,**

उपरोक्त विषयान्वये मा. उच्च न्यायालयामध्ये श्री साईबाबा संस्थानमार्फत निळवंडे धरणाचे वितरीकांचे कामाकरीता महाराष्ट्र शासनास ५०० कोटी रुपये उसणवार पद्धतीने देणेबाबत तसेच संस्थानमार्फत ५०० अम्बुलन्स विवीध सामाजीक संस्था यांना देणेबाबतचे निर्णयाबाबत दाखल असलेल्या अनुक्रमे पी.आय.एल.नं.१५२/२०१८ व ८६/२०१८ मध्ये दि.३०/०१/२०१९ रोजीचा आदेश झालेला आहे. त्यात मा. उच्च न्यायालयाने "Shri Sai Baba Sansthan Trust, Shall not disburse an amount of the Trust for other purposes than routine expense, till the next date." असे निर्देश दिलेले आहे व पुढील सुनावणी दरम्यान सदरचा आदेश कायम झालेला आहे.

तसेच उत्तमराव रंभाजी शेळके यांनी दाखल केलेल्या पी.आय.एल.नं.१२०/२०१९ मध्ये श्री साईबाबा संस्थानवर मा. तदर्थ समिती नेमणेबाबत झालेल्या दि.०९/१०/२०१९ रोजीच्या आदेशामध्ये मा. उच्च् न्यायालयाने "14. We further direct that any major policy decision or financial decision, where the amount involved is more than Rs.50 lakhs be submitted to the said committee for its approval, except for routine expenses as referred to in the order dated 30th January, 2019 in Public Interest Litigation Nos.152 of 2018 and 86 of 2018.." असे निर्देश दिलेले आहे

तसेच उत्तमराव रंभाजी शेळके यांनी पी.आय.एल.नं.१२०/२०१९ मध्ये दाखल केलेल्या सिव्हिल ॲप्लिकेशन नं.१३०२९/२०१९ मध्ये झालेल्या दि.०७/११/२०१९ रोजीच्या आदेशामध्ये मा. उच्च् न्यायालयाने "the existing committee and the committee constituted by this Court is directed not to take any major decision in respect of management of the affairs of the Sansthan without intimating this Court." असे नमुद केले आहे.

मा. उच्च न्यायालयाचे उपरोक्त आदेशानुसार श्री साईबाबा संस्थानमार्फत मा. तदर्थ समितीमध्ये झालेल्या निणर्यानुसार वेगवेगळया विषयासंदर्भात सिव्हील ॲप्लीकेशन दाखल करण्यात येत आहेत. संस्थानमार्फत खालील विषयासंदर्भातील खर्च दरवर्षी नियमितपणे केला जात असल्याने सदरचा खर्च routine expenses असल्याचे मत आहे.

१. संस्थान कर्मचारी वेतन व भत्ते
२. दिपावली निमित्त संस्थान कर्मचारी यांना देण्यात येणारे सानुग्रह अनुदान
३. शिर्डी नगरपंचायत सहाय्यक अनुदाने
४. श्री साईप्रसादालय, लाडू प्रसाद निर्मिती, कॅन्टीन व मंदिर विभागासाठी आवश्यक किराणा माल व इतर अनुषंगीक साहित्य खरेदीकामी होणारा खर्च
५. निवासस्थान विभागाचे Housekeeping कामाकरीता होणारा खर्च
६. बाह्ययंत्रणेमार्फत कंत्राटी कर्मचारी पुरविणेबाबत होणारा खर्च
७. संस्थान/हॉस्पीटलमधील यंत्रसामुग्रीचे वार्षिक देखभाल दुरुस्ती करार व त्यासाठीचा अनुषंगिक खर्च
८. हॉस्पीटल वार्षिक औषधे/ वैद्यकिय साहित्य खरेदीकामी होणारा खर्च
९. संस्थानमार्फत प्रकाशित होणारी प्रकाशने, दैनंदिनी, कॅलेंडर इ.छपाईकामी होणारा खर्च

पान नं. २ वर ...

१०.संस्थानमार्फत दरवर्षी रुढी परंपरेनुसार साजरे होणारे उत्सवांसाठी होणारा खर्च

११.न्यायालयाच्या आदेशानुसार भुसंपादन मोबदला/वाढिव मोबदला अदा करणे

वरीलपैकी खरेदी/छपाई इ. बाबींकरीता खर्च करतांना पुरवठादार/ठेकेदार नेमणूक करणेपुर्वी विहित पद्धतीने निविदा प्रक्रिया राबविण्यात येते. मा.उच्च न्यायालयामध्ये मान्यतेसाठी सादर करण्यात आलेल्या सिव्हिल ॲप्लिकेशनला मान्यता मिळणेसाठी विलंब झाल्यास त्याचा विपरीत परीणाम संस्थानचे दैनंदिन कामकाजावर होतो. वर नमुद दर्शविण्यात येत असलेली सर्व कामे तसेच प्रक्रीया ही दरवर्षी राबवली जाते. सदर कामकाज हे दरवर्षी करण्यात येणारे कामकाज हे routine (नेहमीचे) आहे त्यामुळे सदर कामकाज कामी करण्यात येणारी प्रक्रीया व त्यासाठी लागणारा खर्च हा routine (नियमित) असल्याने या नियमित खर्चास मा. उच्च न्यायालयामध्ये सिव्हील ॲप्लीकेशन दाखल करुन मान्यता घेणे अपेक्षित आहे काय? याबाबत मा.उच्च न्यायालयात सिव्हील ॲप्लिकेशन दाखल करुन मा. उच्च् न्यायालयाचे याबाबत मार्गदर्शन पर निर्देश प्राप्त करता येतील असे नम्र मत आहे.

तरी मा.उच्च न्यायालयाचे मार्गदर्शन मिळणेकामी मा. उच्च न्यायालय मुंबई, खंडपीठ औरंगाबाद येथे सिव्हील ॲप्लिकेशन दाखल करणेबाबतचे निर्णयार्थ सादर.

२०/०८/२१

**(कान्हूराज बगाटे भा.प्र.से.)**
**मुख्य कार्यकारी अधिकारी,**
**श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी.**

विषय क्र.- ९३

**मा.तदर्थ (Ad-hoc) समिती सभेपुढे निर्णयार्थ सादर**

खरेदी विभाग, श्री साईबाबा हॉस्पिटल

**विषय संस्थान कर्मचारी व त्यांचेवर अवलंबीतांचा वैद्यकीय बिलाचा परतावा रक्कम रु.१४,११,१७४/- मात्र अदा करणेस मंजुरी मिळणेबाबत...,**

टिपणी,

**व्यवस्थापन समितीचा ठराव क्र.** – १) जा. नं. एसएसएस-वशी रुग्णालय ५८२-९७ दि. १६/०१/१९९९. २) मा. व्यवस्थापन समिती सभा दि. ०९/१०/२०१६ निर्णय क्र. ६९० (६) अन्वये रु. २०,०००/- पर्यंत मा. कार्यकारी अधिकारी यांचे अधिकारात तर त्यावरील खर्चाची बिले ही मा. व्यवस्थापन समितीचे सभेच्या मान्यतेने अदा करावी.

प्रास्ताविक – खालील संस्थान कर्मचा-यांची वार्षिक रु. २०,०००/- पर्यंतची खर्चाची मर्यादा संपल्यामुळे रु. २०,०००/- पेक्षा जास्त खर्चाचे बिले परतावा मिळणेकामी सादर केलेले आहेत.

मागणी – पुढील तक्यात नमुद केलेल्या कर्मचा-यांचे बिले परतावा मिळणेबाबत विनंती अर्ज.

| अ.नं. | कर्मचा-याचे नाव | कर्मचा-याशी नाते | आजाराचे नाव | डॉक्टरांचे नाव | रुग्णालयाचे नाव | एकूण मागणी रक्कम | एकूण देय रक्कम |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | **अ. संस्थान रुग्णालयात उपचार घेतलेले -** | | | | | | |
| १. | संध्या विनायक जाधव<br>विभाग –साईबाबा हॉस्पिटल<br>हुद्दा-स्टाफ नर्स | पत्नी | Hyper Tension<br>उच्च रक्तदाब<br>Ca कर्करोग | डॉ.जाधवर | श्री साईबाबा हॉस्पिटल | ९८५७.०० | ९८५७.०० |
| २. | लिली जोश विदयाथील<br>विभाग-साईनाथ हॉस्पिटल<br>हुद्दा-लॅब टेक्निशियन | पती | DM/Nephropath portutunge<br>मधुमेह व किडनी आजार | डॉ.वाघुळदे | श्री साईबाबा हॉस्पिटल | १३९४१.०० | १३९४१.०० |
| ३. | सुनिता बाळासाहेब एंरडे<br>विभाग-स्टाफ नर्स<br>हुद्दा-साईबाबा हॉस्पिटल | स्वत: | HTN Diabetes<br>उच्च रक्तदाब<br>मधुमेह | डॉ.इंगळे<br>डॉ.सदावर्ते | श्री साईबाबा हॉस्पिटल | ६२४५.०० | ६२१८.०० |
| ४. | संगिता प्रकाश नरोडे<br>विभाग-साईबाबा रुग्णालय<br>हुद्दा-स्टाफ नर्स | स्वत: | Diabetes<br>मधुमेह<br>कंबरदुखी | डॉ.बिडगर<br>डॉ.जाधवर<br>डॉ.पटेल | श्री साईबाबा हॉस्पिटल | ३२१२.०० | ३२१२.०० |
| ५. | अण्णासाहेब कारभारी दाभाडे<br>विभाग-संरक्षण<br>हुद्दा-पहारेकरी | स्वत: | Covid 19 RTPCR | डॉ.जाधवर | श्री साईबाबा हॉस्पिटल | ३७२७४.०० | ३७२३६.०० |
| ६. | लक्ष्मण सदाशिव चव्हाण<br>विभाग-माजी अधिक्षक<br>हुद्दा-सेवानिवृत्त कर्मचारी | पत्नी | Diabetes<br>मधुमेह | डॉ.पोरवाल | श्री साईनाथ हॉस्पिटल | ४४९१.०० | ४४९१.०० |
| ७. | बाबासाहेब बाजीराव भोसले<br>विभाग-प्रसादालय<br>हुद्दा-मदतनीस | स्वत: | Abd & Pelvic | डॉ.राम नाईक | श्री साईनाथ हॉस्पिटल | २३२७१.०० | २११२१.०० |
| ८. | मीना राजेंद्र ब्राम्हणे<br>विभाग- साईबाबा हॉस्पिटल<br>हुद्दा- स्टाफ नर्स | पती | Covid 19 RTPCR | डॉ.ढाकणे | श्री साईबाबा हॉस्पिटल | ३६७६५.०० | ३५६९५.०० |
| | | | | | **अ एकूण रक्कम रु.** | १३५०५६.०० | १३१७७१.०० |
| | **ब. संस्थानच्या रुग्णालयात उपचार होऊ शकत नसल्याने संस्थान मान्य यादीतील बाहेरील हॉस्पिटलमध्ये रेफर केलेले** | | | | | | |
| ९. | अशोक गणपत कुरणे<br>विभाग-लेखाशाखा<br>हुद्दा-मदतनीस | स्वत: | Senum themocytpma | डॉ.ढाकणे | रुबी हॉल क्लिनिक, पुणे | २९३२७.०० | २९३२७.०० |

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १०. | कल्पना दिनेश पुलाटे<br>विभाग-साईबाबा हॉस्पिटल<br>हुद्दा-हिस्टोपॅथ टेक्निशियन | स्वतः | Covid 19 RTPCR | डॉ.इंगळे | प्रवरा हॉस्पिटल, लोणी | ३२६२३.०० | ७७७४.०० |
| ११. | सोपान नरहरी पांगारकर<br>विभाग-स्टाफ नर्स<br>हुद्दा-साईबाबा हॉस्पिटल | स्वत:<br>पत्नी | Ca कर्करोग<br>Diabetes<br>मधुमेह | डॉ.राम नाईक<br>डॉ.पोरवाल | टाटा मेमोरियल हॉस्पिटल, मुंबई<br>साईबाबा हॉस्पिटल | २८९१३.०० | २८९१३.०० |
| १२ | किसन तात्याबा पगारे<br>विभाग-साईनाथ हॉस्पिटल<br>हुद्दा-मदतनीस | वडील | EYE Glycoma | डॉ.पाटील | तुळशी आय हॉस्पिटल , नासिक | २०१६६.०० | २०१६६.०० |
| १३. | श्रीकांत संपत गुंजाळ<br>विभाग-पाणीपुरवठा<br>हुद्दा-फिटर ऑपरेटर | आई | Pancradic head mass | डॉ.चौधरी | के.ई.एम.हॉस्पिटल, पुणे | ४०६६.०० | ४०६६.०० |
| १४ | कल्पना रघुनाथ मुसमाडे<br>विभाग-साईनाथ हॉस्पिटल<br>हुद्दा-स्टाफ नर्स | स्वत: | Covid 19 RTPCR | डॉ.पोरवाल | रुबी हॉल क्लिनिक, पुणे | १०५२६९.०० | ९९७२९.०० |
| १५. | महेश मोहनीराज शेळके<br>विभाग-मॅकेनिकल<br>हुद्दा-जोडारी | पत्नी | Physionogical Carinoma Thyroid | डॉ.राम नाईक | रुबी हॉल क्लिनिक, पुणे | ६५००.०० | ६५००.०० |
| १६. | सुशिल सुरजमल बिर्ला<br>विभाग-साईनाथ हॉस्पिटल<br>हुद्दा-औषधनिर्माता | वडील | Malignant Otris Extema k/c/o Dm HTN | डॉ.कोल्हे | रुबी हॉल क्लिनिक, पुणे | २४११८६.०० | २१२३५६.० |
| १७ | सुभाष मल्हारी बंदावणे<br>विभाग-ध्वनीक्षेपण<br>हुद्दा-विदयुत पर्यवेक्षक | मुलाकरिता | Renal Transplant | डॉ.जाधवर | डॉ.जाधवर | ३१५७०.०० | ३१५७०.०० |
| १८ | स्वाती इंद्रभान कडू<br>विभाग-ज्यु.कॉलेज<br>हुद्दा-सहा.शिक्षिका | पती | Acute Pancetitis with multingan Failuric with Hyprothyribism | डॉ.जाधवर | रुबी हॉल क्लिनिक पुणे | १९७७४.०० | १८७७४.०० |
| १९ | संजया सतिष वाणी<br>विभाग-साईनाथ रुग्णालय<br>हुद्दा-सि.इन्चार्ज | स्वत: | Sided invasive dust carcinorm breast with axillary lymph nodus metastasis for fruter mgnaymaor | डॉ.राम नाईक | रुबी हॉल क्लिनिक पुणे | २१४०९.०० | १८४२९.०० |
| २०. | भागवत सुर्यभान धामणे<br>विभाग-सामान्य प्रशासन<br>हुद्दा-लिपिक टंकलेखक | आई | Squamoss cell Crinorm Vaginal Vacult with local cervix | डॉ.राम नाईक | सेठ नंदलाल धूत हॉस्पिटल औरंगाबाद | २६२९२.०० | २३०९२.० |
| २१. | शकिला सलीम शेख<br>विभाग-साईनाथ हॉसिपटल<br>हुद्दा-मदतनीस | पती | Ca कर्करोग | डॉ.राम नाईक | रुबी हॉल क्लिनिक पुणे | २०८२६.०० | २०८२६.०० |
| २२ | विजय हरीश्चंद्र हिरे<br>विभाग-आय.टी.आय<br>हुद्दा-निर्देशक | स्वत: पत्नी २ मुले | Covid 19 RTPCR | डॉ.जाधवर | सहयाद्री हॉस्पिटल, नासिक | ५५३७०२.०० | ३७४३६२.०० |
| | | | | | **ब एकूण रक्कम रु.** | ११४१६२३.०० | ८८७८८४.०० |
| | **क.संस्थान रुग्णालयात उपचार घेतलेले रेफर केलेले तातडीने खाजगी हॉसिपटलमध्ये उपचार घेतलेले** | | | | | | |
| २३. | शिवाजी इंद्रभान फटांगरे<br>विभाग-साई आश्रम भक्तनिवास<br>हुद्दा-मदतनीस | स्वत: | Traumetic injury RT Shoulder | डॉ.खुराणा | निमसे हॉस्पिटल, नासिक | १०००६६.०० | ७६०३०.०० |
| २४. | संजय गोपीनाथ कोते<br>विभाग-बांधकाम<br>हुद्दा-मदतनीस | पत्नी | Ca कर्करोग | डॉ.गायकवाड | एम.बी.अग्रवाल ,मुंबई | ९७१४१.०० | ६९६५२.०० |

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| २५. | संजया सतिष वाणी<br>विभाग-साईनाथ रुग्णालय<br>हुद्दा-सि.इन्चार्ज | मुलगी | Fever with Cytopenia with Lymphaden Pathl cervical & axillary | डॉ.राम नाईक | डॉ.प्रितश सुभाष जुनागडे | १८००.०० | १४४०.०० |
| २६. | आशा भाऊसाहेब साबळे<br>विभाग-साईनाथ रुग्णालय<br>हुद्दा-वैद्यकीय अधिक्षक | स्वत: पती | Covid 19 RTPCR | डॉ.गायकवाड | राहाता कोविड हेल्थ सेंटर | ४२०४२४.०० | १४१३७०.०० |
| | | | | | **क एकूण रक्कम रु.** | ६१९४३१.०० | २८८४९२.०० |
| | **ड.संस्थान रुग्णालयात उपचार न घेतलेले रेफर न केलेले तातडीने खाजगी हॉस्पिटलमध्ये गेलेले** | | | | | | |
| २७ | शिवाजी बबन पुंड<br>विभाग-प्रसादालय<br>हुद्दा-मदतनीस | स्वत: | Rta with Polytracima | डॉ.मराठे | निरामय हॉस्पिटल,सुपा मराठे हॉस्पि.पुणे | १९७७३.०० | १३९१४.०० |
| २८ | सुनिल पोपटराव जाधव<br>विभाग-साईबाबा हॉस्पिटल<br>हुद्दा-लिपिक टंकलेखक | आई | उजवा व डावा डोळ्याचे ऑपरेशन | डॉ.गोरे | सुंदर नेत्रालय चौपाटी कारंजा अ.नगर | ७००८६.०० | ५५९४१.०० |
| २९. | विदया विजय कदम<br>विभाग-साईबाबा हॉस्पिटल<br>हुद्दा-इनचार्ज सिस्टर | आई | HTN उच्च रक्तदाब | डॉ.सत्यानंद | सत्यानंद हॉस्पिटल, पुणे | ४०३११.०० | ३३१७२.०० |
| | | | | | **ड एकूण रक्कम रु.** | १३०१७०.०० | १०३०२७.०० |
| | | | | | **अ+ब+क +ड एकूण रक्कम रु.** | २०२६२८०.०० | १४१११७४.०० |

सदर बिलांची संस्थान वैद्यकीय देखभाल नियमावली सन १९९९ अन्वये छाननी केली असून देय होणारी एकूण रक्कम रु.१४,११,१७४-/-मात्र आहे.

**विभागाचा अभिप्राय / स्पष्ट मत –**

नियमावली प्रमाणे छाननी केली असुन तसेच रुग्णांना संस्थान मान्य यादीतील हॉस्पिटलमध्ये पुढील उपचाराकरीता पाठविण्यात आले होते व काही ठिकाणी निकडीच्या प्रसंगी बाहेरील हॉस्पिटलमध्ये उपचार घेतले आहेत. सबब सदर रक्कम अदा करण्यास हरकत नाही,असे मत आहे.

तरी उपरोक्त २९ कर्मचा-यांना स्वत: व त्यांचेवर अवलंबित व्यक्ती(रुग्ण ३४) यांचे वैद्यकीय उपचारापोटी आलेल्या खर्चाच्या उपरोक्त तक्त्यामध्ये त्यांचे नावासमोर दर्शविलेल्या देय होत असलेल्या रकमेचा परतावा त्यांना अदा करणेस व त्याकामी येणा-या रु.१४,११,१७४/-मात्र रकमेच्या खर्चास मान्यता मिळणेस्तव सदरहू प्रस्ताव मा.तदर्थ समिती सभेसमोर सविनय सादर.

20/07/21

(कान्हूराज बगाटे भा.प्र.से.)
मुख्य कार्यकारी अधिकारी,
श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिर्डी.

SSH-meeting-281

विषय क्र.- १४

**मा.तदर्थ (Ad-hoc) समिती सभेपुढे निर्णयार्थ सादर**



खरेदी विभाग, श्री साईबाबा हॉस्पिटल

**विषय संस्थान कर्मचारी व त्यांचेवर अवलंबीतांचा वैद्यकीय बिलाचा परतावा रक्कम रु.८,६०,४७०/- मात्र अदा करणेस मंजुरी मिळणेबाबत...,**

टिपणी,

**व्यवस्थापन समितीचा ठराव क्र. –** १) जा. नं. एसएसएस-वशी रुग्णालय ५८२-९७ दि. १६/०१/१९९९. २) मा. व्यवस्थापन समिती सभा दि. ०९/१०/२०१६ निर्णय क्र. ६९० (६) अन्वये रु. २०,०००/- पर्यंत मा. कार्यकारी अधिकारी यांचे अधिकारात तर त्यावरील खर्चाची बिले ही मा. व्यवस्थापन समितीचे सभेच्या मान्यतेने अदा करावी.

प्रास्ताविक – खालील संस्थान कर्मचा-यांची वार्षिक रु. २०,०००/- पर्यंतची खर्चाची मर्यादा संपल्यामुळे रु. २०,०००/- पेक्षा जास्त खर्चाचे बिले परतावा मिळणेकामी सादर केलेले आहेत.

मागणी – पुढील तक्यात नमुद केलेल्या कर्मचा-यांचे बिले परतावा मिळणेबाबत विनंती अर्ज.

| अ.नं. | कर्मचा-याचे नाव | कर्मचा-याशी नाते | आजाराचे नाव | डॉक्टरांचे नाव | रुणालयाचे नाव | एकूण मागणी रक्कम | एकूण देय रक्कम |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | **अ. संस्थान रुग्णालयात उपचार घेतलेले -** | | | | | | |
| १. | प्रभाकर विश्वनाथ नागरे<br>विभाग-इं.मि.स्कूल<br>हुद्दा-सहा.शिक्षक | स्वत:<br>वडील | HTN Diabetes<br>उच्च रक्तदाब / मधुमेह | डॉ.पाटील<br>डॉ.जाधवर | श्री साईनाथ व साईबाबा हॉस्पिटल | ७४७६.०० | ७४७६.०० |
| २. | अभयकुमार शांताराम दुनाखे<br>विभाग-आय.टी.आय<br>हुददा-निर्देशक | स्वत:<br>पत्नी | HTN Ca<br>उच्च रक्तदाब व कर्करोग | डॉ.जाधवर<br>डॉ.बो-हाडे | श्री साईबाबा हॉस्पिटल | १३७६६.०० | १३७६६.०० |
| ३ | संध्या विनायक जाधव<br>विभाग-साईबाबा हॉस्पि.<br>हुद्दा-स्टाफ नर्स | पती | HTN Diabetes<br>उच्च रक्तदाब / मधुमेह | डॉ.जाधवर | श्री साईबाबा हॉस्पिटल | १०६६२.०० | १०६६२.०० |
| ४. | प्रफुल्ल गिताराम नागपुरे<br>विभाग-मोटार मॅकेनिकल<br>हुद्दा-वाहन विभाग | आई | Covid 19<br>RTPCR Positive | डॉ.ढाकणे | श्री साईबाबा हॉस्पिटल | २१२६७.०० | २१२२४.०० |
| ५. | नवनाथ साहेबराव जाधव<br>विभाग- बगीचा<br>हुद्दा-मदतनीस | आई | पटकी झटके येणे मेंदूचा आजार | डॉ.उंबरकर | श्री साईबाबा हॉस्पिटल | ६७७५.०० | ६४६४.०० |
| ६. | विजय पंढरीनाथ हुरे<br>विभाग-बगीचा<br>हुद्दा-मदतनीस | स्वत: | Chromic liver disease | डॉ.ढाकणे | श्री साईबाबा हॉस्पिटल | १७६४९.०० | १७६४९.०० |
| ७. | आण्णासाहेब गोवर्धन कुदळे<br>विभाग- बांधकाम<br>हुद्दा- मदतनीस | स्वत: | Diabetes<br>मधुमेह | डॉ.पोरवाल | श्री साईनाथ हॉस्पिटल | ७८६१.०० | ७८६१.०० |
| ८. | प्रदिप युवराज सोनवणे<br>विभाग-स्टाफ ब्रदर<br>हुद्दा- साईबाबा हॉस्पिटल | वडिल | HTN Diabetes<br>उच्च रक्तदाब / मधुमेह | डॉ.जाधवर | श्री साईबाबा हॉस्पिटल | ३६९७.०० | ३६९७.०० |
| ९. | वैशाली दिलीपकुमार देशमुख<br>विभाग-साईनाथ हॉस्पि.<br>हुद्दा-स्टाफ नर्स | आई | HTN<br>उच्च रक्तदाब | डॉ.राठी | श्री साईनाथ हॉस्पिटल | ८३९४.०० | ८३९४.०० |
| १०. | विलास राजाबापु जोंधळे<br>विभाग- स्टाफ ब्रदर<br>हुद्दा- साईबाबा हॉस्पिटल | आई | Covid 19<br>RTPCR Positive | डॉ.जाधवर | श्री साईबाबा हॉस्पिटल | २५९०.०० | २०७०.०० |

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| ११. | योगेश बाळकृष्ण गेठे<br>विभाग-साईनाथ हॉस्पि.<br>हुददा-ई.एन.टी.सर्जन | वडील<br>आई | HTN Diabetes<br>उच्च रक्तदाब<br>मधुमेह | डॉ. कडू | श्री साईनाथ<br>हॉस्पिटल | ८३८२.०० | ८३८२.०० |
| १२. | सुनिता बाळासाहेब एरंडे<br>विभाग-साईबाबा हॉस्पि.<br>हुददा-परिचारिका | स्वत: | पोट दुखणे<br>Diabetes<br>मधुमेह | डॉ.सदावर्ते<br>डॉ.इंगळे | श्री साईबाबा<br>हॉस्पिटल | २०५९.०० | २०५९.०० |
| १३. | सविता चांगदेव वर्पे<br>विभाग-साईबाबा हॉस्पिटल<br>हुद्दा-स्टाफ नर्स | आई | DM/HTN<br>/Nephropathy<br>Pain abdominal | डॉ.उंबरकर | श्री साईबाबा<br>हॉस्पिटल | ६९०५.०० | ६९०५.०० |
| १४. | संगिता प्रकाश नरोडे<br>विभाग-साईबाबा रुग्णालय<br>हुद्दा-स्टाफ नर्स | पती<br>स्वत: | Diabetes<br>मधुमेह<br>कंबरदुखी | डॉ.जाधवर | श्री साईबाबा व<br>श्री साईनाथ<br>हॉस्पिटल | १०९६.०० | १०९६.०० |
| १५. | राजेश रमणलाल वाकडे<br>विभाग-साईबाबा हॉस्पि.<br>हुददा-बायो. इंजिनिअर | स्वत:<br>आई | आतडयाच्या सुजेने<br>होणारा अल्सर<br>मधुमेह<br>कोविड -१९ | डॉ.बच्छाव<br>डॉ.जाधवर<br>डॉ.ढाकणे<br>डॉ.बिडगर | श्री साईबाबा<br>हॉस्पिटल | ५३८४९.०० | ५३५६९.०० |
| १६. | लक्ष्मण सदाशिव चव्हाण<br>विभाग- साईबाबा भक्त नि.<br>हुददा- (अधिक्षक)<br>सेवानिवृत्त कर्मचारी. | स्वत: | Diabetes<br>मधुमेह | डॉ.पोरवाल | श्री साईनाथ<br>हॉस्पिटल | ४७३९.०० | ४७३९.०० |
| १७. | अरूण अनंतराव खांबेकर<br>विभाग- सेवानिवृत्त कर्मचारी<br>हुद्दा-मदतनीस | पत्नी | Covid 19<br>RTPCR Positive | डॉ.सचिन<br>बागडे | श्री साईबाबा<br>हॉस्पिटल | २०१०३.०० | १९४९०.०० |
| | | | | | **अ एकूण रक्कम रु.** | १९७२७०.०० | १९५५०३.०० |
| | ब-संस्थान रुग्णालयात उपचार न झालेले बाहेरील हॉसिपटलमध्ये रेफर केलेले | | | | | | |
| १८. | सुनिल बाबुराव कोते<br>विभाग-साईबाबा हॉस्पि.<br>हुद्दा -मदतनीस | आई | Ca Esophaus | डॉ.बो-हाडे | क्युरी मानवता<br>कॅन्सर सेंटर<br>नासिक | ३२९६.०० | ३२९६.०० |
| १९. | संजया सतिष वाणी<br>विभाग- साईनाथ हॉस्पि.<br>हुद्दा-परिचारिका | स्वत:<br>पती | Rt Sided invasive dust Carcinonma breast with axillary lymph nods metastasis for further Dibetes menagmnt<br>Diabetes | डॉ.बो-हाडे | रुबी हॉल<br>क्लिनिक, पुणे | २१०४९.०० | १८१६९.०० |
| २० | शकिला सलीम शेख<br>विभाग-साईनाथ हॉस्पि.<br>हुद्दा-आया | पती | Ca<br>कर्करोग | डॉ.राम<br>नाईक | रुबी हॉल<br>क्लिनिक, पुणे | १०४५२८.०० | १०१६३८.०० |
| २१. | सुभाष निंबा खैरनार<br>विभाग-कन्या विदया मंदिर<br>हुद्दा-शिक्षक | स्वत: | Covid 19<br>RTPCR<br>Positive | डॉ.पोरवाल | रुबी हॉल<br>क्लिनिक, पुणे | ३७३१८०.०० | ३४८३६०.०० |
| २२. | मुकुंद त्रिंबक कापरे<br>विभाग-मंदिर<br>हुद्दा-पुजारी | स्वत: | Covid 19<br>RTPCR<br>Positive | डॉ.जाधवर | हेडगेवार<br>रुग्णालय<br>औरंगाबाद | ७३०१५.०० | २५१३५.०० |
| | | | | | **ब एकूण रक्कम रु.** | ५७५०६८.०० | ४९६५९८.०० |
| | क.संस्थान रुग्णालयात उपचार घेतलेले रेफर केलेले तातडीने खाजगी हॉस्पिटलमध्ये गेलेले | | | | | | |
| २३. | बाळासाहेब किसन खरात<br>विभाग-आरोग्य विभाग<br>हुद्दा-मदतनीस | मुलगा | Covid 19<br>RTPCR Positive | डॉ.ढाकणे | डॉ.प्रितिश<br>सुभाष जुनागडे<br>नासिक | १४८२८.०० | ९६६४.०० |
| २४. | नवनाथ बहिरु चौधरी<br>विभाग-भांडार विभाग<br>हुद्दा-लिपिक-टंकलेखक | स्वत: | Covid 19<br>RTPCR Positive | डॉ.सचिन<br>बागडे | संजीवन<br>हॉस्पिटल,<br>संगमनेर | १८७७३५.०० | १३०३६४.०० |

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | **क एकूण रक्कम रु.** | २०२५६३.०० | १४००२८.०० |
| | ड.संस्थान रुग्णालयात उपचार न घेतलेले रेफर न केलेले तातडीने खाजगी हॉस्पिटलमध्ये उपचार घेतलेले | | | | | | |
| २५. | विकास शांतवन शेलार विभाग-मालमत्ता विभाग हुद्दा-लिपिक –टंकलेखक | वडील | A.Bph with c return in of urine मुतखडयाचा त्रास | डॉ.वानखेडे | डॉ.वानखेडे किडनी हॉस्पिटल, अहमदनगर | ३८९४६.०० | २८३४१.०० |
| | | | | | **ड एकूण रक्कम रु.** | ३८९४६.०० | २८३४१.०० |
| | | | | | **अ+ब+क+ड एकूण रक्कम रु.** | १०१३८४७.०० | ८६०४७०.०० |

सदर बिलांची संस्थान वैद्यकीय देखभाल नियमावली सन १९९९ अन्वये छाननी केली असून देय होणारी एकूण रक्कम रु.८,६०,४७०-/-मात्र आहे.

**विभागाचा अभिप्राय / स्पष्ट मत –**

नियमावली प्रमाणे छाननी केली असुन तसेच रुग्णांना संस्थान मान्य यादीतील हॉस्पिटलमध्ये पुढील उपचाराकरीता पाठविण्यात आले होते व काही ठिकाणी निकडीच्या प्रसंगी बाहेरील हॉस्पिटलमध्ये उपचार घेतले आहेत. सबब सदर रक्कम अदा करण्यास हरकत नाही,असे मत आहे.

तरी उपरोक्त २५ कर्मचा-यांना स्वत: व त्यांचेवर अवलंबित व्यक्ती (रुग्ण ३१) यांचे वैद्यकीय उपचारापोटी आलेल्या खर्चाच्या उपरोक्त तक्त्यामध्ये त्यांचे नावासमोर दर्शविलेल्या देय होत असलेल्या रकमेचा परतावा त्यांना अदा करणेस व त्याकामी येणा-या रु. ८,६०,४७०/-मात्र रकमेच्या खर्चास मान्यता मिळणेस्तव सदरहू प्रस्ताव मा.तदर्थ समिती सभेसमोर सविनय सादर.

20/07/17

(कान्हूराज बगाटे भा.प्र.से.)
मुख्य कार्यकारी अधिकारी,
श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिर्डी

SSH-Meeting-280-2021

विषय क्र.- १५

मा तदर्थ (Ad-hoc) समितीसमोरील विषय
विभागाचे नाव - श्री साईबाबा हॉस्पिटल

विषय- बाह्ययंत्रणेद्वारे ठेकेदारामार्फत श्री साईबाबा व श्री साईनाथ रूग्णालयात कार्यरत बी ए एम एस वैद्यकीय अधिकारी यांचे वेतनाबाबत...

टिपणी -

संस्थान अधिनियम २००४-

१३(४) - समितीस, संस्थान विश्वस्त व्यवस्थेचा कारभार कार्यक्षमतेने चालविण्यासाठी आणि या अधिनियमान्वये तिची कर्तव्ये व कामे पार पाडण्यासाठी आवश्यक वाटतील अशा अधिका-यांची कार्यकारी अधिका-याव्यतिरिक्त व कर्मचा-यांची नेमणूक करता येईल.

परंतु, ज्या अधिका-याला किंवा कर्मचा-याला दरमहा दोन हजार रूपयांहून अधिक वेतन देण्यात येत असेल किंवा द्यावयाचे असेल, अशा कोणत्याही अधिका-याची किंवा कर्मचा-याची नेमणूक, समितीकडून, असे पद राज्य शासनाने मान्य केलेल्या कर्मचारी आकृतीबंधानुसार मंजूर करण्यात येईपर्यंत, केली जाणार नाही.

शासननिर्णय-

शासननिर्णय क्रमांक सासंवि-२००९/४३३/(३७/०९) का. सोळा दि. ०७/०८/२००९

मा व्यवस्थापन समितीचा ठराव क्र -

१) मा व्यवस्थापन समिती दि. १९/०९/२०१६ रोजीचे सभेतील निर्णय क्र ६६७.

संस्थान रूग्णालयांमधील रूग्णसंख्या व डॉक्टरांची असलेली कमतरता या बाबींचा विचार करता, रूग्णालयांमधील डॉक्टरांची पदे कायमस्वरूपी भरेपर्यंत रूग्णांची गैरसोय होऊ नये याकरीता सध्या संस्थानला कुशल / अकुशल कंत्राटी कर्मचारी पुरविणा-या ठेकेदारामार्फत कंत्राटी पध्दतीनें प्रस्तावात नमुद केलेप्रमाणे, बीएएमएस डॉक्टरांची नेमणूक करणेस व त्यांना प्रत्येकी एकत्रित मासिक रू. १६,२००/- मात्र मानधन देण्यास मान्यता देण्यात आली.

२) मा व्यवस्थापन समिती दि. ०१/०६/२०१८ रोजीचे सभेतील निर्णय क्र ४११.

सध्या हॉस्पिटलमध्ये ठेकेदारामार्फत नियुक्त केलेल्या BAMS डॉक्टरांना दरमहा रू.१६,२००/- मात्र इतके एकत्रित मानधन देण्यात येते. सदरचे देण्यात येणारे मानधन खुपच कमी आहे. असे सर्व समिती सदस्यांचे मत झाले.

मात्र BAMS डॉक्टर्सची पदे आकृतीबंधात मंजूर नाहीत. सदर प्रस्ताव शासनास सादर करण्यात आलेला आहे. मात्र त्यास मंजूरी मिळालेली नाही. मंजूरी मिळाल्यानंतर त्यांच्या वेतनवाढीबाबत निर्णय घेणे उचीत राहील. असे मुख्य कार्यकारी अधिकारी नमूद केले आहे.

यावर सविस्तर चर्चा होऊन, या सर्व BAMS डॉक्टरांना दि. ०१/०६/२०१८ पासून रू. ३५,०००/- मात्र मानधन लागु करावे, असे ठरले. हॉस्पिटलकडील BAMS डॉक्टरांना आकृतीबंधात मान्यता नसल्याने यासाठी शासनाची मान्यता घ्यावी, शासनाची मान्यता मिळाल्यानंतर BAMS डॉक्टरांना दि. ०१/०६/२०१८ पासून वाढीव मानधन देण्यात यावे असे ठरले.

३) मा व्यवस्थापन समिती दि. १३/१२/२०१८ रोजीचे सभेतील निर्णय क्र ७२८/४.

मा व्यवस्थापन समितीचे दि. ०५/१०/२०१८ रोजीच्या सभेतील निर्णय क्र ५९४ नुसार महाराष्ट्र दुकाने व व्यापारी संस्था कायदा २०१७ मधील तरतुदीनुसार कंत्राटी कामगारांना द्यावयाच्या सोयी सवलतीबाबत समिती सदस्य मा ॲड मोहन जयकर यांनी अभ्यास करून त्याबाबत शिफारस करावी, असे ठरले होते. सदर विषयावर कायद्यातील तरतुदीच्या अनुषंगाने पुन्हा सविस्तर चर्चा करण्यात आली. कायद्यातील तरतूदीनुसार कंत्राटी कामगारांना भरपगारी

सप्ताहीक सुट्टी (Paid Weekly off) अनुज्ञेय असल्याने कंत्राटी कर्मचा-यांना दि. ०१/१२/२०१८ पासून भरपगारी साप्ताहीक सुट्टी (Paid Weekly off) देण्यास मान्यता देण्यात आली.

प्रस्तावना-

वैद्यकीय अधिकारी (बी.ए.एम.एस) यांची काल्पनिक पदे निर्माण करून दि.०१.०६.२०१८ पासून प्रति कर्मचारी मासिक एकत्रित मानधन रू.३५,०००/- देऊन त्यांची सेवा तात्पुरत्या स्वरूपात बाह्ययंत्रणेद्वारे (outsoursing) घेण्यास मान्यता मिळणेविषयी वेळोवेळी मा विधी व न्याय विभाग, मंत्रालय, मुंबई यांचेकडे दि.१७/०७/२०१८, दि.०६/०८/२०१९, दि.०५/०३/२०२०, दि.०६/१०/२०२० व दि. ०३/१२/२०२० रोजी प्रस्ताव पाठविणेत आलेला आहे. त्यास अनुसरून विधी व न्याय विभागाकडून दि.१८/०३/२०१९, दि.०५/०८/२०१९, दि.०४/०९/२०१९, दि.०६/०२/२०२०, दि.१०/०९/२०२०, दि.०३/१२/२०२० व दि.२२/१२/२०२० रोजीचे पत्र प्राप्त झालेले आहे.

शासनाचे दि.१०/०९/२०२० रोजीचे पत्रास अनुसरून दि.०३/१२/२०२० रोजीचे पत्रान्वये पुढीलप्रमाणे कळविणेत आले आहे - श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डीचे सुधारित आकृतीबंध, सेवाप्रवेश नियम, पदोन्नतीची साखळी, कार्यपध्दती एकल पदे तसेच आरक्षण नियमानुसार बिंदु नामावलीचे प्रस्ताव तयार करणेकामी नेमणेत आलेल्या कार्यगटाने सुधारित आकृतीबंध प्रारूप मसुदे श्री साईबाबा संस्थानकडे दि.१८ सप्टेंबर २०२० रोजी सादर केले असून सदरचे प्रारूप आकृतीबंधाबाबत विभागनिहाय आढावा घेतला असून, त्यानुसार सुधारीत प्रारूप आकृतीबंधाबाबतची पुढील कार्यवाही सुरू आहे. तसेच सदरचे कार्यगटाने सादर केलेले विभागनिहाय व पदनिहाय सुधारित प्रारूप सेवाप्रवेश नियम मा तदर्थ समिती सभेपुढे मान्यतेस्तव सादर करणेत येत आहेत, सुधारित प्रारूप सेवाप्रवेश नियमांस मा तदर्थ समितीची मान्यता मिळालेनंतर, त्यावर हरकती मागवून त्या निकाली काढलेनंतर, अंतिम सेवाप्रवेश नियम मा शासन मान्यतेसाठी पाठविणेत येणार आहे. तरी, संस्थानचे दोन्ही रूग्णालयात वैद्यकीय सेवाकरीता सदर वैद्यकीय अधिकारी (बी.ए.एम.एस.) यांची आवश्यकता आहे. संस्थानला कंत्राटी कर्मचारी पुरविणा-या ठेकेदारामार्फत कार्यरत सर्व वैद्यकीय अधिकारी (बी.ए.एम.एस.) यांना मा व्यवस्थापन समिती दि. ०१/०६/२०१८ रोजीचे सभेतील निर्णय क्र ४११ नुसार रू. ३५,०००/- मात्र मानधन लागु करणेस मान्यता मिळणेस विनंती. करणेत आली.

त्यानंतर विधी व न्याय विभाग, महाराष्ट्र शासन यांचे दि.२२/१२/२०२० रोजीचे पत्र मध्ये खालीलप्रमाणे नमुद आहे.

वैद्यकीय अधिकारी बी.ए.एम.एस. या संवर्गातील काल्पनिक पदे निर्माण करून दि.०१/०६/२०१८ पासून प्रति कर्मचारी मासिक एकत्रित मानधन रू. ३५,०००/- देऊन त्यांची सेवा तात्पुरत्या स्वरूपात बाह्ययंत्रणेद्वारे (आऊटसोर्सिंगने) घेण्याच्या योग्य तो प्रस्ताव तसेच सदर वैद्यकीय अधिका-यांची पदे व संस्थानाच्या विविध्ध विभागातील आस्थापनेवरील पदांचा एकत्रित सर्वसमावेशक सुधारीत आकृतिबंध तयार करण्याचा योग्य तो प्रस्ताव मा उच्च न्यायालय, मुंबई, खंडपीठ, औरंगाबाद यांनी जनहित याचिका क्र १२०/२०१९ मध्ये तसेच सिव्हील ॲप्लीकेशन क्र १३०२९/२०१९ मध्ये दिलेल्या आदेशांच्या अनुषंगाने कार्यवाही करून सादर करावा, ही विनंती.

सार्वजनिक आरोग्य विभाग शासन परिपत्रक क्रमांक: मवैअ-१०५४/प्र.क्र.२४१/भाग-२/सेवा-३ दि. ०४ जुलै,२०१९ रोजीचे खालीलप्रमाणे शासन परीपत्रक पारीत करणेत आले आहे.

१. सार्वजनिक आरोग्य विभागांतर्गत (प्राथमिक आरोग्य केंद्रात) महाराष्ट्र वैद्यकीय व आरोग्य सेवा, गट-अ या संवर्गातील रिक्त पदे नियमीत वैद्यकीय अधिकारी उपलब्ध

होईपर्यंत कंत्राटी पध्दतीने एम.बी.बी.एस. (M.B.B.S.) अर्हताधारकांमधुन प्राधान्याने भरण्यात यावीत. त्यानंतरही सदर पदे रिक्त राहत असल्यास, ती पदे, B.A.M.S. अर्हताधारकांमधुन त्या ठिकाणी नियमीत अथवा कंत्राटी एम.बी.बी.एस. (M.B.B.S.) अर्हताधारक वैद्यकीय अधिकारी मिळेपर्यंत, यापैकी जे आगोदर घडेल तेवढ्या कालावधीसाठी कंत्राटी पध्दतीने भरण्यात यावीत. सदर पदे वाचा येथिल क्र.२ नुसार जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखालील गठीत समिती मार्फत भरण्यात यावीत.

२. उपरोक्त नमुद कंत्राटी वैद्यकीय अधिका-यांपैकी आदिवासी व दुर्गम भागात काम करण्यास इच्छुक बी.ए.एम.एस (B.A.M.S.) अर्हताधारकांना दरमहा रू.४५,०००/- व इतर भागात काम करणा-या बी.ए.एम.एस. (B.A.M.S.)अर्हताधारकांना रू.४०,०००/- इतके एकत्रित मानधन देण्यात यावे.

३. सदर मानधनासाठी येणारा खर्च २२१००१४६(१०)कंत्राटी सेवा या लेखाशिर्षाखाली मंजूर अनुदानातून भागविण्यात यावा.

४. उपरोक्त कंत्राटी वैद्यकीय अधिका-यांना सार्वजनिक आरोग्य विभाग, शासन निर्णय, दि.०२.०३.२०१५ व २१.०४.२०१५ मधील नमूद अटी व शर्ती लागु राहतील.

तहसिलदार तथा घटना व्यवस्थापक राहाता यांनी दि.११/०४/२०२१ रोजीचे पत्रान्वये, कोरोना रूग्णाची वाढती संख्या विचारात घेता श्री साईबाबा रूग्णालय शिर्डी येथे सुसज्ज ७० खाटांचे अद्यावत Covid Hospital संपूर्ण मनुष्यबळ, वैद्यकीय सुविधेसह तात्काळ कार्यान्वीत करणेबाबत इकडील कार्यालयास कळविले असुन त्यानुसार श्री साईबाबा रूग्णालयात १४० खाटांची कोव्हीड हॉस्पिटल सुरू करणेत आले आहे. वैद्यकीय सुविधा सुरू करणेत आल्याने रूग्णांवर वेळेवर उपचार करणेकामी सध्या वैद्यकीय अधिका-यांची नितांत आवश्यकता आहे.

मा व्यवस्थापन समिती दि. १९/०९/२०१६ रोजीचे सभेतील निर्णय क्र ६६७ नुसार सध्या ठेकेदारास कामगार विभागामार्फत देणेत आलेल्या कार्यादेशात साईबाबा रूग्णालयास प्रति दिन २० बी ए एम एस वैद्यकीय अधिकारी प्रति दिन रू.६२३.०७ वेतन दराने पुरविणेबाबत कळविणेत आलेले असुन सध्या ०७ बी ए एम एस वैद्यकीय अधिकारी पुरविणेत येत आहेत. सदर वैद्यकीय अधिकारी यांना प्रतिमहा रू.१८,६९२ रूपये वेतन अदा करणेत येत आहे. सदर बी ए एम एस वैद्यकीय अधिकारी हे श्री साईबाबा संस्थानचे आस्थापनेवर नेमणूक केलेली नसून ठेकेदाराच्यां आस्थापनेवर आहेत.

श्री साईबाबा व श्री साईनाथ रूग्णालयातील रिक्त जागा भरणेकामी प्रसिध्द केलेल्या जाहीरातीत एम बी बी एस पात्रताधारक निवासी वैद्यकीय अधिकारी / आरएमओ व कॅज्युअल्टी मेडीकल ऑफीसर / सीएमओ या पदांचा समावेश असलेल्या जाहीरात दिनांक, पदसंख्या, नेमणूका व राजीनामे माहिती खालीलप्रमाणे आहे.

| अ. नं. | पदनाम | जाहीरात प्रसिध्द केलेली दिनांक | पदसंख्या | मुलाखत दिनांक | नेमणूक केलेली संख्या | कामावर हजर संख्या | राजीनामे / नोकरी सोडून गेलेले |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | सीएमओ | ०४/०६/२०१७ | ५ | २०/०६/२०१७ | ० | ० | ० |
| २ | आरएमओ | ०४/०६/२०१७ | ९ | २०/०६/२०१७ | ९ | ७ | ५ |
| ३ | सीएमओ | १५/०२/२०१८ | ८ | १४/०८/२०१८ | ० | ० | ० |
| ४ | आरएमओ | १५/०२/२०१८ | १३ | १४/०८/२०१८ | ४ | २ | २ |
| ५ | सीएमओ | ०१/०१/२०१९ | ७ | ११/०१/२०१९ | ७ | ५ | ५ |
| ६ | आरएमओ | ०१/०१/२०१९ | १५ | ११/०१/२०१९ | १५ | १२ | १२ |
| ७ | सीएमओ | २३/०७/२०१९ | ०६ | ०२/०८/२०१९ | ० | ० | ० |

| अ. नं. | पदनाम | जाहीरात प्रसिध्द केलेली दिनांक | पदसंख्या | मुलाखत दिनांक | नेमणूक केलेली संख्या | कामावर हजर संख्या | राजीनामे / नोकरी सोडून गेलेले |
|---|---|---|---|---|---|---|---|
| ८ | आरएमओ | २३/०७/२०१९ | १० | ०२/०८/२०१९ | ३ | १ | १ |
| ९ | सीएमओ | २१/१०/२०२० | ०८ | १०/११/२०२० | ० | ० | ० |
| १० | आरएमओ | २१/१०/२०२० | २४ | १०/११/२०२० | ७ | ४ | २ |
| ११ | सीएमओ | ०६/०४/२०२१ | ०८ | २७/०४/२०२१ | १ | १ | ० |
| १२ | आरएमओ | ०६/०४/२०२१ | १६ | २७/०४/२०२१ | ८ | ७ | ० |
| १३ | सीएमओ | ०१/०५/२०२१ | ०७ | १५/०५/२०२१ | ० | ० | ० |
| १४ | आरएमओ | ०१/०५/२०२१ | ०८ | १५/०५/२०२१ | ४ | ३ | ० |

श्री साईबाबा व श्री साईनाथ रूग्णालयाचे मंजुर आकृतीबंधानुसार एम बी बी एस पात्रताधारक आरएमओ / निवासी वैद्यकीय अधिकारी व सीएमओ / कॅज्युअल्टी मेडीकल ऑफीसर या पदांची सद्यस्थिती खालीलप्रमाणे आहे.

| रूग्णालय | पदनाम | मंजुर पदसंख्या | भरलेली पदे | | | रिक्त पदसंख्या |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | स्थायी | कंत्राटी | एकूण | |
| श्री साईबाबा | आरएमओ | ४० | १८ | ०६ | २४ | १६ |
| | सीएमओ | ०६ | ०० | ०० | ०० | ०६ |
| श्री साईनाथ | आरएमओ | १६ | ०८ | ०६ | १४ | ०२ |
| | सीएमओ | ०६ | ०४ | ०१ | ०५ | ०१ |
| एकूण | | ६८ | ३० | १३ | ४३ | २५ |

एम बी बी एस पात्रताधारक वैद्यकीय अधिकारी रिक्त जागा भरणेकरीता वेळोवेळी जाहीरात प्रसिध्द करूनही रिक्त जागांवर आवश्यक एम बी बी एस पात्रताधारक आर एम ओ / सी एम ओ मिळालेले नाहीत.

विभागाचा स्पष्ट अभिप्राय-

सध्या बी ए एम एस वैद्यकीय अधिकारी ठेकेदारामार्फत पुरविणेत येत आहेत. सदर वैद्यकीय अधिकारी यांना प्रतिमहा रू.१८,६९२ रूपये वेतन अदा करणेत येत आहे. उपरोक्त महाराष्ट्र शासन आरोग्य विभागाचे दि.०४/०७/२०१९ रोजीचे परिपत्रकाचे अनुषंगाने बी ए एम एस वैद्यकीय अधिकारी यांना आठवडा सुट्ट्यांसह प्रतिमहा रू.३५,०००/- वेतन अदा करता येईल तसेच दि. ०१/०६/२०१८ रोजीचे सभेतील निर्णय क्र ४११ निरस्त करता येईल.

जसजसे एम बी बी एस पात्रताधारक वैद्यकीय अधिकारी प्राप्त होतील तसतसे बी ए एम एस वैद्यकीय अधिका-यांची सेवा संपुष्टात आणता येईल.

उपरोक्तप्रमाणे कार्यवाही करणेबाबत निर्णय होणेस विनंती.

निर्णयास्तव सादर.

२७/७/२१

(कान्हूराज बगाटे, भा.प्र.से.)
मुख्य कार्यकारी अधिकारी
श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी.